१

मराठ्यांच्या इतिहासाची साधने : भारतीय साधने

घटक रचना:

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ मराठ्यांच्या इतिहासातील भारतीय भाषेतील साधने

१.३ कागदपत्रांचे संकलन व संपादन

१.४ मराठ्यांच्या इतिहास अभ्यासाची परकीय भाषेतील साधने

१.५ परकीय प्रवाशांचे लिहिलेले वृत्तांत

१.६ सारांश

१.७ प्रश्न

१.८ संदर्भ

१.० उद्दिष्ट्ये

- मराठ्यांच्या इहिासातील भारतीय भाषेतील साधने समजून घेणे.
- मराठ्यांच्या इतिहासाच्या संदर्भ साधनांचे महत्त्व जाणून घेणे.
- मराठ्यांच्या इतिहासाच्या युरोपीय साधनांचा अभ्यास करणे.
- मराठ्यांच्या इतिहासाभ्यासाच्या दृष्टीने उपयुक्त असणाऱ्या परकीय प्रवाशांच्या वृत्तांताना जाणून घेणे.
- मराठ्यांच्या इतिहास लेखनातील परकीय लेखकांच्या दृष्टीकोणाला समजून घेणे.

१.१ प्रस्तावना

इतिहासाच्या शास्त्रशुद्ध अभ्यासासाठी व लिखाणासाठी ऐतिहासिक साधने महत्त्वाची मानली जातात. इतिहासाच्या वस्तुनिष्ठ लिखाणासाठी कोणत्याही इतिहास लेखकाला, इतिहास संशोधकाला इतिहासाच्या वस्तुनिष्ठ साधनांचा आधार हा घ्यावाच लागतो. म्हणजेच इतिहास लेखनात वस्तुनिष्ठ साधनाना महत्त्व आहे. पुढे या इतिहास लेखनात शास्त्रशुद्ध कल्पनेचा उदय

munotes.in

झाला. ही कल्पना म्हणजे "No documents no history". या कल्पनेचा प्रभाव आपणास मराठ्यांच्या इतिहास लेखनावर जाणवतो.

भारतीय इतिहासाच्या साधनांचा जर विचार केला तर मोगलाच्या व ब्रिटिशांच्या इतिहासाची साधने विपूल आहेत. मात्र मराठ्यांच्या इतिहासाची विशेषतः शिवशाहीच्या इतिहासाची साधने फारच थोडी उपलब्ध आहेत. परकीय सत्ताधिशांचे जे दरबारी लेखक होते त्यांनी आपल्या लिखाणातून शिवाजी महारांजांबाबत अभ्यासपूर्ण असे लिखाण केले नाही. कारण त्यांनी लिहिलेले लिखाण हे ऐकीव व उपलब्ध माहितीच्या आधारे केले आहे. शिवकाळावर प्रकाश टाकणाऱ्या अनेक बखरी आहेत. मात्र बखरीमध्ये दिलेली माहिती पूर्णपणे विश्वसनीय मानता येणार नाही. कारण सभासद बखर वगळता एकही बखर शिवकाळात लिहिली गेली नाही.

मराठ्यांच्या इतिहासाची साधने अनेक संस्थानिक व सरदार घराण्यांमध्ये विखुरली गेली होती. अशा विखुरलेली ऐतिहासिक कागदपत्रे गोळा करुन ती प्रकाशित करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य महाराष्ट्रामध्ये डॉ.साने, डॉ.खरे, डॉ.पारसनीय, डॉ.राजवाडे, डॉ.सरदेसाई इत्यादी संशोधनकांनी केले. या संशोधकांच्या कार्यामुळेच मराठ्यांच्या इतिहासलेखनाला चालना मिळाल्याचे दिसून येते.

मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांचा विचार करत असताना सर्व प्रथम आपण भारतीय साधनांचा विचार केला या भारतीय साधनामध्ये आपण मराठी, संस्कृत, हिदी व फारसी साधने जाणून घेतली या साधनांच्या आधारे आपण मराठ्यांच्या इतिहास कसा लिहिला गेला याची माहिती आपण पाहिली.

या प्रकरणात आपण मराठ्यांच्या इतिहास लेखनास परकीय म्हणजे युरोपीय साधने कशी उपयुक्त ठरली याचा आढावा घेणार आहोत. तसे पाहिले तर मराठ्यांच्या इतिहासात उपयुक्त ठरणारी राजकीय, सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय साधने मोठ्या प्रमाणात उपलब्ध होती मात्र ही साधने विखुरलेली होती.

मराठ्यांनी मराठा साम्राज्या नव्याने निर्माण केले, या साम्राज्याचा विकास केला, हे साम्राज्य उत्कर्षाला नेले, या साम्राज्याला नावलौकीक मिळवून दिला. मात्र या साम्राज्यातील कागदपत्रे त्यांनी जपून ठेवली नाहीत. साम्राज्यातील कागदपत्रे त्यांनी जपून ठेवली नाहीत. साम्राज्यातील महत्त्वपूर्ण घटनांच्या तारखा लिहून ठेवल्या नाहीत. मराठ्यांनी इतिहास निर्माण केला, परंतु इतिहास लिहिला नाही. त्यामुळे त्यांचे अपूर्व पराक्रम, प्रशासन, आर्थिक व्यवहार याविषयी मराठी साधनात त्रोटकता जाणवते. त्यामुळेच आपणास मराठ्यांचा इतिहास लिहिण्यासाठी परकीय साधनांवर अवलंबून राहावे लागते.

मराठ्यांच्या इतिहास ज्या परकीय साधनांच्या आधारे लिहिला गेला या साधनामध्ये इंग्रजी साधने, फ्रेंच साधने, डच साधने, पोर्तुगीज साधने या साधनांचा समावेश होतो. या साधना व्यतिरिक्त मराठा कालखंडात जे परकीय प्रवाशी आले होते या प्रवाशानी या काळातील सर्वांगीन परिस्थितीचे वर्णन आपल्या प्रवास वर्णनात केले आहे. या प्रवासवर्णनांचा – वृत्तांताचा उपयोग सुद्धा मराठ्यांच्या इतिहास लेखनासाठी झाला आहे. या सर्व परकीय साधनांची माहिती आपण या प्रकरणात सविस्तर पद्धतीने पाहणार आहोत. ही परकीय साधने जर उपलब्ध झाली नसती तर कदाचित मराठ्यांच्या इतिहास लेखनास दिशा मिळाली नसती. म्हणूनच या साधनाना इतिहास अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्व आहे.

mumtes.in

मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांचे दोन भागामध्ये विभाजन केले जाते.

१) मराठ्यांच्या इतिहासाची भारतीय साधने, या साधनामध्ये मराठ्यांच्या इतिहासाची मराठी साधने, संस्कृत साधने, हिंदी साधने, फारसी साधने या साधनांचा समावेश होतो.

२) मराठ्यांच्या इतिहासाची परकीय साधने या मध्ये इंग्लिश साधने, डच साधने, फ्रेंच साधने, पोर्तुगीज साधने, परकीय प्रवाशांची लिहिलेली वृतांते या साधनांचा समावेश होतो.

या प्रकरणात आपण मराठ्यांच्या इतिहासाच्या भारतीय साधनाची माहिती पाहणार आहोत. या महत्त्वपूर्ण माहिती व्यतिरिक्त मराठ्यांच्या इतिहासाच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांचे संकलन व संपादन कसे केले आहे याचाही आढावा घेणार आहोत.

१.२ मराठ्यांच्या इतिहासातील भारतीय भाषेतील साधने

अ) मराठी भाषेतील साधने :

मराठ्यांच्या इतिहासाच्या भारतीय साधनापैकी मराठी साधने ही महत्त्वपूर्ण साधने मानली जातात. ही साधने इतिहास संशोधक डॉ.राजवाडे, डॉ.पारसनीय, डॉ.साने, डॉ.खरे, डॉ.सरदेसाई यांच्या महत्त्वपूर्ण कामगिरीमुळे उपलब्ध झाली आहेत. मराठ्यांच्या इतिहासाच्या मराठी साधनामध्ये कागदपत्रे, पोवाडे, लावण्या, आज्ञापत्रे, ग्रंथ शकावल्या या साधनांचा समावेश आहे. मराठ्यांचा १७ व्या शतकातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, प्रशासकीय इतिहास लिहिण्यासाठी ही साधने अत्यंत उपयुक्त ठरली आहेत.

१. मराठी कागदपत्रे

मराठ्यांच्या इतिहासाची ऐतिहासिक साधने म्हणून मराठी कागदपत्रांकडे पाहिले जाते. मराठ्यांच्या इतिहास लेखनासाठी जेव्हा शास्त्रशुद्ध दृष्टिकोण पुढे आला तेव्हांपासून या कागदपत्रांना महत्त्व प्राप्त झाले.

मराठ्यांच्या इतिहास लिहिण्यासाठी जी कागदपत्रे उपयुक्त ठरली त्या कागदपत्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज, महाराणी ताराबाई, छत्रपती शाहू या भोसले घराण्यातील राजकर्त्याच्या व पेशव्यांच्या आज्ञापत्रांचा, वतनपत्रांचा, इनामपत्रांचा, निवाडे विषयक कागदपत्रांचा समावेश होतो. या राजकर्त्यांच्या कागदपत्रां व्यतिरिक्त ठाणेदार, किल्लेदार, सुभेदार, प्रधान, पेशवे, यांनी आपल्या कार्याला अनुसरुन लिहिलेल्या पत्रांचा समावेश होता. तसेच गोतसभा, ब्राम्हसभा पंचायत सभा यांने दिलेल्या निवाडेपत्राचा समावेश होता.

मराठ्याच्या कागदपत्रावर आधारित इतिहास लेखनाची सुरुवात जेम्स कॅनिंगहॅम, ग्रँट डफ या इतिहासकारानी केली. मात्र त्यांच्या या इतिहास लेखनात त्रुटी होत्या. या त्रुटीत बदल व्हावा व मराठ्यांचा कागदपत्रांच्या आधारे खरा इतिहास समोर यावा या दृष्टीने आरंभी निलकंठ जनार्दन किर्तने पुढे आले त्यांनी “Poona Youngman’s Association” या संघटनेला एक प्रबंध लिहून या प्रकरणाची सुरुवात केली. पुढे यावर विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी ‘निबंधमाला’ या मासिकातून लिखान केले. डॉ.साने यांनी ‘काव्येतिहास संग्रह’ मासिकातून मराठ्यांच्या कागदपत्रांच्या आधारे जास्तीत जास्त लिखाण केले. डॉ.पारसनिस यांनी पुढे ‘इतिहाससंग्रह’ ही माला सुरु करुन सलग आठ वर्ष मराठ्यांची कागदपत्रे प्रकाशित केली. डॉ.राजवाडे यांनी

muniotes.in

विजापूरकरांच्या ग्रंथमाला मासिकातून मराठ्यांची काही कागदपत्रे प्रसिद्ध केली. पुढे राजवाडे यांनी 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' या नावाने २२ खंड प्रकाशित केले. गो. स. सरदेसाईनी पेशवे दप्तराचे ४५ खंड प्रकाशित केले. डॉ.वा. वा. खरे यांनी ऐतिहासिक लेखन संग्रह या नावाने आपल्या हयातीत १२ खंड व त्यांच्या पश्चात त्यांच्या मुलाने ३ खंड प्रसिद्ध केले. डॉ.सरदेसाई, डॉ.कुलकर्णी, डॉ.काळे यांनी 'ऐतिहासिक पत्रव्यवहार' प्रसिद्ध केला. चंद्रचुड दप्तर, हिगणे दप्तर दाभाडे, दप्तर या दप्तरांच्या माध्यमातून मराठ्यांच्या साधनामध्ये मोलाची भर पडली. ग. चि. वाड यांनी शाहू महाराज व पेशव्यांच्या रोजनिसीवर १३ खंड प्रकाशित केले. या सर्व कागदपत्रांच्या आधारे मराठ्यांचा राजकीय, आर्थिक सामाजिक व प्रशासकीय इतिहास लिहिणे शक्य झाले आहे.

२. बखर वाङ्मय

मराठ्यांच्या इतिहासाच्या भारतीय साधनापैकी बखर वाङ्मय हे दुसरे महत्त्वपूर्ण साधन मानले जाते. बखर वाङ्मय हा एक वाङ्मयाचा प्रकार आहे. तत्कालीन बखरीना वाङ्मयीन व ऐतिहासिक दृष्टिकोणातून महत्त्व होते. बखर वाङ्मयात करीना, हकिकती, कैफियती, आज्ञापत्र, आत्मवृत्त, प्रसिद्ध ऐतिहासिक स्त्री-पुरुषांची चरित्रे, त्यांच्या संबधीच्या आख्यायिका इत्यादीचा समावेश होता.

बखरीचे लेखन प्रामुख्याने स्वराज्य स्थापनेपासून जास्त प्रमाणात झाले. स्वराज्य स्थापनेपासून पेशवाईच्या शेवटापर्यंत २०० ते २५० बखरींचे लिखान झाले असावे. बखरीचा मुख्य हेतू इतिहास कथन करणे हा असतो. राजकीय व्यक्तींच्या आज्ञेवरुन बखरींचे लिखान जास्त प्रमाणात झाले आहे.

बखर वाङ्मयाच्या निर्मितीनुसार शिवकाळातील बखरी व पेशवेकाळातील बखरी असे दोन भागात त्याचे विभाजन करण्यात आले आहे.

शिवकाळातील बखरी

१) सभासद बखर :

बखर वाङ्मयातील शिवकाळावर प्रकाश टाकणारी अत्यंत महत्त्वपूर्ण बखर म्हणून सभासद बखरीकडे पाहिले जाते ही म्हणजे बखर कृष्णाजी अनंत सभासद यांनी लिहिली आहे. ही बखर १६९४ मध्ये शिवकाळात लिहिली आहे. या बखरीत शिवाजी महाराजांच्या आरंभा पासून अंतापर्यंतच्या सर्व पराक्रमाचे वर्णन आहे. ही बखर अत्यंत संक्षिप्त आहे. मात्र ही बखर समकालीन असल्याने या बखरीला महत्त्व आहे. राजाराम महाराजांच्या आज्ञेनेला मान देवून सभासदाने जिंजिच्या किल्ल्यात ही बखर लिहिली. या बखरीत शिवाजी महाराजांच्या पराक्रमा व्यतिरिक्त राज्यव्यवस्था, सैन्यव्यवस्था, गडकोट, खजिना, रयतेच्या सुधारणा, देवस्थान, पीर, मशिदी, यांच्या देणग्या, अष्टप्रधान मंडळ या संबधीची माहिती आहे. या बखरीच्या आधारे आपणास शिवकाळातील राजकीय, धार्मिक, सामाजिक व आर्थिक परिस्थिती समजते.

सभासदांची बखर ही समकालीन असली तरी या बखरीत काही उणीवा आहेत. ही बखर स्मृतीवर आधारित असल्याने या बखरीत स्थळ, काल, घटना यांचा क्रम राहिलेला नाही. तसेच शिवाजी महाराजांच्या जीवनातील काही महत्त्वपूर्ण घटनांचा उल्लेख या बखरीत नाही. तसेच काही काल्पनिक घटनांच्या उल्लेखामुळे तीच्या विश्वसनियतेवर प्रश्न निर्माण केले जातात.

२) चिटणीस बखर :

बखर वाङ्मयातील शिवकाळावर प्रकाश टाकणारी दुसरी महत्त्वपूर्ण बखर म्हणजे 'चिटणीस बखर' होय. ही बखर मल्हार रामराव चिटणीस यांनी लिहिली. ही बखर 'शिव छत्रपती महाराज यांचे सप्तप्रकरणात्मक चरित्र' या नावाची सात प्रकरणाची बखर आहे. ही बखर प्रथम "विविध ज्ञान विस्तार" या मासिकात क्रमशः प्रसिद्ध करण्यात आली. या बखरीचे लिखान सातारच्या दप्तरखान्यातील कागदपत्रे, ऐकीव माहिती, आख्यायिका यांच्या आधारे करण्यात आले आहे. ही बखर शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर १३० वर्षाने म्हणजे साधारणतः १८१० मध्ये लिहिली आहे म्हणूनच या बाबत सर जदुनाथ सरकार यांनी असे मत व्यक्त केले आहे की, या बखरीत सभासद बखरीतील जास्तीत जास्त माहिती घेतल्याचे दिसते. इतिहासाचार्य राजवाडे या बखरी बाबत असे मत व्यक्त केले आहे की "ही बखर मल्हाररावाने कागदपत्रे, दिनचर्या, नकला यांच्या आधारे लिहिली आहे. या बखरीतील शिवचरित्रा विषयीची माहिती त्रोटक आहे. तरी पण ग्रँट डफच्या लिखानात न सापडणाऱ्या काही बाबी या बखरीच्या लिखानात सापडतात" या बखरीत स्थळ व काळ यांचा विपर्यास दिसतो मुद्देसूदपणाचा अभाव दिसतो. मात्र इतिहास अभ्यासाचे एक साधन म्हणून या बखरीला महत्त्व आहे.

३) श्री शिवछत्रपतींची ९१ कलमी बखर :

बखर वाङ्मयातील शिवकालावर प्रकाश टाकणारी तिसरी महत्त्वपूर्ण बखर म्हणजे श्री. शिवछत्रपतींची ९१ कलमी बखर होय. ही शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळातील मंत्री दत्ताजी त्रिमल वाकनविस यांनी लिहिली. ही बखर 'रायरी बखर' '९० किंवा ९६ कलमी बखर', व तारिख-ए-शिवाजी या नावानेही ओळखली जाते. ही बखर प्रथम भारत वर्ष या मासिकात इतिहास संशोधक वि. स. वाकसकर यानी १९३० मध्ये प्रकाशित केली. दत्ताजी त्रिमल हा शिवाजी महाराजांचा समकालीन व मंत्री होता. त्यामुळे या बखरीतील लिखान हे अस्सल दर्जाचे ठरते. या बखरीत मालोजीराजे पासून शिवाजी महाराजांच्या मृत्युपर्यंतची माहिती दिली आहे. मात्र या बखरीतील काही काल्पनिक गोष्टी व दैवी चमत्कारांचा समावेश यामुळे या बखरीचे मूल्य कमी झाले आहे.

४) चित्रगुप्ताची बखर :

बखर वाङ्मयातील शिवकाळावर प्रकाश टाकणारी चौथी महत्त्वपूर्ण बखर म्हणजे चित्रगुप्ताची बखर होय. ही बखर रघुनाथ यादव चित्रगुप्त यांनी लिहिली आहे. बखरीत चित्रगुप्ताने काही ठिकाणी काव्यात्मक लिखान केले आहे. चित्रगुप्त हा लिखानातील माहितगार असल्याने त्याचे लिखान महत्त्वपूर्ण मानले जाते. चित्रगुप्ताच्या बखरीबाबत इतिहासाचार्य राजवाडे म्हणतात "रघुनाथ यादवाला परंपरेने ऐकलेली शिवाजी महाराजांची व त्यांच्या कर्त्या पुरुषांची भरपूर माहिती होती. सभासद बखरीत ज्या व्यक्तींची आडनावे दिली नाहीत, त्यांची आडनावे चित्रगुप्त लिहिण्याच्या झोकात सहजासहजी देवून जातो. कधी कधी वर्णनात सभासद बखरीत जी नावे मुळीच नाहीत ती चित्रगुप्त नव्याने देतो" यावरुनच त्यांनी ही बखर अभ्यासपूर्ण अवलोकनातून लिहिली होती हे सिद्ध होते.

५) दलपतरायाची बखर :

बखर वाङ्मयातील शिवकाळावर प्रकाश टाकणारी ही पाचवी बखर आहे ही बखर शिवाजी महाराजांच्या शत्रूगोटातील व्यक्ती दलपतराय यांनी लिहिली. या बखरीतून शिवाजी महाराजांच्या

कार्याविषयी शत्रुपक्षातील लोकांचे मत काय होते याची माहिती मिळते. या बखरीतील तारखा शिवचरित्राच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठरल्या आहेत. परिणामी या बखरीला महत्त्व आहे.

६) शिवदिग्विजय :

बखर वाङ्मयातील शिवकालावर प्रकाश टाकणारी ही सहावी बखर आहे. ही बखर कोणी लिहिली या बाबतची माहिती उपलब्ध नाही. मात्र इतिहास संशोधक नंदुरबारकर व दांडेकर यांनी तिचे संपादन करुन सन १८९५ साली प्रसिद्ध केली. शिवचरित्रातील अनेक घटना व पराक्रम यांचे वर्णन या बखरीत आहे हे वर्णन करण्यासाठी आपण बारनिशी (जमाखर्च) दाखले, पत्रे, व जुने ग्रंथ याचा आधार घेतल्याचे बखरकार नमुद करतो बा. सी. बेंद्रे म्हणतात, "शिवदिग्विजयात इतर बखरीना माहिती असलेले कित्येक प्रसंग दिलेले नसून काही गोष्टींचा पाल्हाळ लावला असून बखरीची मांडणी अगदीच कथेकारी थाटाची आहे" राजवाड्यांच्या मते या बखरीचा मजकूर जुन्या बखरीवरुन घेतला असावा.

७) मराठा साम्राज्याची छोटी बखर :

बखर वाङ्मयातील शिवकालावर प्रकाश टाकणारी ही सातवी बखर आहे. या बखरीची रचना सन १८१७ झाली असावी. इतिहास संशोधक बाळाजी जनार्दन मोडक यांनी ती "काव्येतिहास संग्रह" या मासिकात प्रसिद्ध केली. स्थळ, काल व व्यक्ती यांचा बराच विपर्यास या बखरीत आहे. तरीही शिवचरित्रामधील काही नव्या बाबी या बखरीतून पुढे येतात. या दृष्टीने ही बखर महत्त्वाची आहे.

७) छ. संभाजी व छ. राजारामाची बखर :

बखर वाङ्मयातील शिवकालावर प्रकाश टाकणारी ही शेवटची दोन बखरीची नावे आहेत या दोन्ही बखरी मल्हारराव रामराव चिटणीस यांनी लिहिल्या. छ.संभाजी व छ.राजाराम महाराज यांचे चरित्र समजवण्यासाठी बखरीच्या माध्यमातून माहिती लिहित असताना काही घटना, गोष्टींच्या बाबत बखरकारांनी त्यांच्या विरोधात लिखान केल्याचे आढळते. मात्र छ.राजाराम महाराजांच्या संदर्भात लिहिलेल्या बखरीत बखरकाराने छ.राजाराम महाराजांची प्रशंशा केल्याचे आढळते. या दोन्ही बखरीत छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज यांच्या व्यतिरिक्त शिवकाळातील अनेक सरदार घराणी व त्यांचे पराक्रमी पुरुष यांची ही माहिती मिळू शकते

पेशवेकाळातील बखर

पेशवे काळासंबधीच्या बखरी :

बखर वाङ्मातील पेशवेकाळावर प्रकाश टाकण्याऱ्या या बखरी आहेत. पेशवेकाळात बखर वाङमयाचा खूप विकास झाला होता. पेशवेकाळात कागदपत्राची उपलब्धता मोठ्या प्रमाणात झाली होती. त्यामुळे या आधारे लिहिल्या गेलेल्या बखरी अधिक विश्वसनीय ठरल्या. या बखरीमध्ये वस्तुनिष्ठतेचे प्रमाण जास्त आहे.

थोरले शाहू महाराजांची बखर, पेशव्यांची बखर, छत्रपती धाकटे रामराजे व धाकटे शाहु महाराज यांची चरित्र, भट पेशवे घराण्याची हकीकत, नारायण पेशवे यांची बखर पनिपतची बखर, होळकरांची कैफियत आदी बखर वाङमयाचा समावेश या बखर वाङमयात होता.

बखरीचे मूल्यमापन :

मराठ्यांच्या इतिहासाचे एक महत्त्वपूर्ण साधन म्हणून बखरीकडे पाहिले जाते. काही समकालीन बखरकारांनी तर काही सत्ता अस्ता नंतर स्मरणात्मक लिखान करणाऱ्या बखरकारांनी मराठ्यांच्या कारकिर्दीबाबत बखरी लिहिल्या आहेत.

मराठ्यांच्या इतिहासाला दिशा देणारे सभासद, वाकेनिवीस, चित्रगुप्त, चिटणीस, दलपतराय, हे प्रमुख बखरकार आहेत. या बखरकारानी समकाळात व सत्तातोर काळात बखरी लिहिल्या आहेत.

बखरकार म्हणजे या काळातील इतिहासकार होते. मात्र बखरकारांनी लिहिलेला इतिहास हा पुराव्यांचा पुर्णत: संदर्भ घेवून न लिहिल्याने तसेच या वाङमयात वर्णनात्मक व रचनात्मक भाग जास्त असल्याने या प्रकारच्या लिखानात स्थळ, काळ, घटना आदिबाबत उणीवा जाणवतात म्हणूनच सर जदूनाथ सरकारानी ऐतिहासिक साधन म्हणून बखरीची हेटाळणी केली आहे. बखरकारांना शास्त्रीय लेखनपद्धती माहित नव्हती असे त्यांचे मत आहे.

मात्र बखरकारांनी बखरीच्या माध्यमातून इतिहास कथन करण्याचा केलेला प्रमाणिक प्रयत्न महत्त्वाचा होता. काही बखरकारांनी बखर लिहिण्यासाठी उपलब्ध कागदपत्रांचा आधार घेतला होता. मात्र ज्या ठिकाणी या गोष्टी त्यांना उपलब्ध झाल्या नाहित, त्या ठिकाणी त्यांनी ऐकीव माहितीचा आधार घेतला होता. त्यांचा हा त्या काळातील लिखानाचा प्रमाणिक प्रयत्न होता. म्हणूनच बखर रुपाने हे वाङ्मय तयार झाले होते.

याच वाङ्मयाच्या आधारे पुढे संशोधन पर मराठ्यांच्या इतिहासाचे लिखान झाले. व मराठ्यांच्या इतिहास लेखनास शास्त्रशुद्ध दिशा प्राप्त झाली. म्हणूनच बखर वाङ्मय हे महत्त्वाचे ठरले.

शकावल्या

मराठ्यांच्या इतिहासाचे कागदपत्र, बखर वाङ्,मयानंतरचे दुसरे महत्त्वपूर्ण साधन म्हणजे शकावल्या होय. शिवकाळात काही प्रसिद्ध घराण्यात ऐतिहासिक घटना स्मरणाने लिहून ठेवण्याची पद्धत होती. या नोंदी इतिहास संशोधकांना सापडल्या आहेत. अशा प्रकारच्या एकत्र नोंदी असणाऱ्या कागदपत्रांना शकावल्या असे म्हटले जाते. या शकावल्यांमध्ये तिथी, वार यांचा उल्लेख आहे. इतिहास संशोधक मंडळीने या शकावल्या 'शिवचरित्रदीप' ग्रंथात प्रथम छापल्या.

लोकमान्य टिळकांनी १९१५ मध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण अशा जेथे शकावलीचा शोध लावला. जेथे मंडळीनी छ.शिवाजी व छ.संभाजी महाराजांची सेवा केली होती. त्यामुळे ही शकावली महत्त्वपूर्ण ठरते. या शकावलीतील नोंदी व तारखा अचूक आहेत. जेथे शकावली बरोबरच शिवापूर देशपांडे शकावली, गदाधर प्रल्हाद शकावली, घोडगावकर शकावली, सहा कलमी शकावली या शकावल्या सुद्धा इतिहास संशोधकाना सापडल्या आहेत परिणामी हे साधन मराठ्यांच्या इतिहासाभ्यासाच्या दृष्टीने उपयुक्त ठरले आहे.

आज्ञापत्र :

मराठ्यांच्या इतिहासाचे एक महत्त्वपूर्ण साधन म्हणून आज्ञापत्राकडे पाहिले जाते. आज्ञापत्र हा एक महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. हा ग्रंथ शिवशाहीतील प्रधान रामचंद्रपंत अमात्य यांनी लिहिला. शिवाजी महाराजांच्या तालमीत वाढलेल्या रामचंद्रपंताना शिवाजी महाराजांची राजनिती पूर्ण समजली होती. महाराजांची राजनिती त्यांच्या वारसांना मार्गदर्शक ठरावी म्हणून रामचंद्रपंत अमात्य यांनी हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात एकुण ९ प्रकरणे आहेत. या प्रकरणात रामचंद्रपंत अमात्यानी राजा, त्याचे प्रधानमंडळ, व्यापार, सावकार, वतने, वतनदार, किल्ले, आरमार इत्यादी विषयावर विचार मांडले आहेत.

आज्ञापत्र ग्रंथाचे संपादक डॉ. व. दी. राव यांनी आपल्या संपादकीय प्रस्तावनेत असे म्हटले आहे की, "आज्ञापत्रात शिवकालीन राजनितीचे उत्कृष्ट प्रतिबिंब उमटले आहे. राज्यकारभाराच्या अनेक बारीकसारीक बाबीबद्दल यात विवेचन केलेले आहे. राज्यकारभाराविषयी नुसती तात्विक चर्चा किंवा राज्यकारभाराची मूलभूततत्त्वे याचे विवेचन न करता मराठी राज्याची उभारणी ज्या काही विशिष्ट पद्धतीवर आधारलेली होती ज्या काही विशिष्ट पद्धतीवर आधारलेली होती त्या पद्धतीचे सांगोपांग दर्शन या ग्रंथात सापडते... थोडक्यात सांगायचे म्हणजे प्रत्यत्र शककर्त्या युगपुरुषाच्या राजकीय तत्त्वांचे व अनुभवाचे बोल या ग्रंथात प्रतिबिंबित झाले आहे".

संत वाङ्मय :

मराठ्यांच्या इतिहासाचे एक विश्वसनीय साधन म्हणून संत वाङ्मयाकडे पाहिले जाते. शिवकाळात संतवाङमय बहरले होते. संत रामदास, संत तुकाराम, संत शामराज, संत भूषण असे अनेक संत या काळात होवून गेले. या संतानी निर्माण केलेले वाङ्मय तत्कालीन परिस्थितीवर प्रकाश टाकण्यासाठी उपयुक्त ठरले आहे. संत रामदास, संत तुकाराम यांचे लिखाण जरी परमार्थिक अथवा पारलौकिक विषयासंबधी असले ते ज्या समाजात वावरत होते त्या समाजाचे प्रतिबिंब त्यांच्या लिखाणात दिसते.

शंत रामदासांचा दासबोध :

शंत रामदासांचा 'दासबोध' ग्रंथ तत्कालीन रुढी-परंपरा, श्रद्धा, पूजा, संसारी माणसाची दु:खे, कब्जे, ब्राम्हणांचे स्थाने, भोंदूगीरी, करमणूक, लोकांचे दुर्गुण, निरनिराळ्या प्रकारची वृक्षे, फळे, लोकांचे पेहरावे आहार या बाबतची वास्तविक माहिती मिळवून देण्यासाठी उपयुक्त ठरतो. वास्तविकता व प्रबोधन या दोन गोष्टींची सांगड समर्थानी आपल्या या ग्रंथात घातली आहे. हा ग्रंथ समकालीन कालखंडातला असल्याने इतिहास अभ्यासाचे एक साधन म्हणून या ग्रंथाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

शंत तुकारामाची गाथा :

शंत तुकारामाची गाथा तत्कालीन कालखंडातील विविध विषयाला स्पर्श करणारी आहे. तुकाराम महाराजानी या गाथेत १७ व्या शतकातील लोकांचे पोषाख, जेवणखाणावण, खेळ, करमणूक व्यापार उदीम, जातीभेद, पंथभेद, सावकारी, ब्राम्हणांची स्थिती, काळ, कौटुंबिक दु:खे हे विषय हाताळले आहेत. ही गाथा समकालीन असल्याने इतिहासाचे एक साधन म्हणून या गाथेला महत्त्व आहे.

munotes.in

पोवाडे :

मराठ्यांच्या इतिहासाचे एक संदर्भ साधन म्हणून पोवाड्याकडे पाहिले जाते. पोवाडे हे वीररसप्रधान असतात. मात्र त्याचे अस्तित्व ऐतिहासिक सत्याला धरुन असल्याने इतिहासाचे एक साधन म्हणून त्यांना मान्यता आहे. इतिहास अभ्यासाच्या दृष्टीने अज्ञान दासाचा 'अफजलखान पोवाड', तुलसीदासाचा 'सिंहगड' व यामाजीचा 'बाजीपासलकर' पोवाडा हे पोवाडे महत्त्वाचे मानले गेले आहेत. पोवाड्यातून तत्त्कालीन शौर्य, रुढी, परंपरा, करमणूक या संबधीची बरीच माहिती मिळते. म्हणूनच या साधनाला महत्त्व आहे.

लावणी :

मराठ्यांच्या इतिहासाचे एक शृंगार प्रधान साधन म्हणून लावणीकडे पाहिले जाते मराठ्यांच्या राजवटीतील पेशवाईच्या कालखंडातया प्रकाराला महत्त्व आले होते. मराठी वाङ्मयातील श्रेष्ठ लावणीकार याच कालखंडात होवून गेले. अनंत फंदी, परशुराम, रामजोशी, प्रभाकर, सगनभाऊ होनाजी बाळा या प्रत्येक लावणीकाराने या कालखंडात स्वतःचे असे स्वतंत्र वैशिष्ट्ये निर्माण केले. परशुरामांचे तत्कालीन समाज जीवनाचे वर्णन, संगनभाऊचे पुण्याचे वर्णन ही या कालखंडातील लावण्यांची महत्त्वपूर्ण उदाहरणे आहेत. म्हणून या साधनाला महत्त्व आहे.

मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांची माहिती पहात असताना सर्वप्रथम आपण मराठ्यांच्या इतिहासासाठी उपयुक्त असणाऱ्या कागदपत्रांची माहिती पाहिली. त्या नंतर मराठ्यांचा इतिहास सांगणाऱ्या शिवकाळातील व पेशवेकाळातील बखर वाङ्मयाला जाणून घेतले. या दोन महत्त्वपूर्ण साधना व्यतिरिक्त 'शकावल्या' 'आज्ञापत्र' 'संतवाङ्मय' 'पोवाडे' 'लावण्या' या इतर साधनांचा आढावा घेतला हि सर्व साधने मराठ्यांचा मराठी साहित्य संदर्भ इतिहास समजून देण्यास अत्यंत उपयुक्त आहेत. या साधनाच्या आधारे आरंभी ब्रिटीश इतिहासकारानी हा इतिहास लिहिला त्यांच्या इतिहासातील उणीवा दूर करण्यासाठी भारतीय इतिहासकाराने पुढाकार घेवून मराठ्यांच्या इतिहासाला या उपलब्ध साधनेद्वारे खरे अस्तित्व प्राप्त करुन दिले. म्हणूनच या साधनाना महत्त्व आहे.

ब) संस्कृत साधने

मराठ्यांच्या इतिहासाच्या भारतीय साधनापैकी दुसरी महत्त्वपूर्ण साधने म्हणून संस्कृत साधनांकडे पाहिले जाते ही संस्कृत साधने परमानंद, जयरामपिंडे, रघुनाथ हणमंते केशव पंडित या लेखकांनी निर्माण केली आहेत. अशा या संस्कृत साधनांची माहिती खालील प्रमाणे आहे.

१. शिवभारत

मराठ्यांच्या इतिहासाचे एक विश्वसनीय संस्कृत साधन म्हणून शिवभारतकडे पाहिले जाते. शिवभारत हा संस्कृत ग्रंथ आहे. या ग्रंथाचे लेखक कर्ता परमानंद आहेत. या ग्रंथात ३२ अध्याय आहेत. या ग्रंथात परमानंदाने मालोजी-शहाजी राजे यांच्या कारकिर्दीपासून शिवाजी महराजांच्या दक्षिण कोकण विजयापर्यंतच्या इतिहास काव्यरुपाने सांगितला आहे. या ग्रंथात १६६१ पर्यंतच माहिती आहे. या ग्रंथात नंतरचे शिवचरित्र नसल्याने हा ग्रंथ अपूर्ण राहिला आहे. परमानंद शिवाजी महाराजाना 'अवतारी पुरुष' मानत होते. त्यामुळे त्यांच्या काव्यात अतिशयोक्ती आढळते.

सर जदूनाथ सरकारने परमानंदाच्या या काव्यावर टीका केली आहे. त्यांचे म्हणने असे आहे, "परमानंदाचे काव्य म्हणजे स्तुतीपर काव्य असून ते एका दरबारी भाटाने लिहिलेले काव्य आहे. ती एक वाङमयीन भिक्षेगिरी आहे. सत्य समजून घेण्याच्या दृष्टीने या काव्यास काहीही महत्व नाही."

सर जदूनाथ सरकार यांनी जरी शिवभारवर टीका केली असली तरी १७ व्या शतकातील सामाजिक परिस्थितीवर या काव्यातून चांगला प्रकाश पडला आहे. या कालखंडातील दुष्काळाचे वर्णन, शहरांचे वर्णन शस्त्रास्त्र व युद्धकेलेचे वर्णन, जाती व्यवस्थेचे वर्णन, धार्मिक श्रद्धांचे वर्णन, रुढी परंपराचे वर्णन सण-उत्सवाचे वर्णन या काव्यातून उत्तम व वास्तविक परिस्थितीशी निगडीत आहे.

परमानंद हे शिवाजी महाराजांचे समकालीन होते. म्हणूनच त्यांचे लिखाण नंतरच्या लेखकांपेक्षा अत्यंत विश्वसनीय व सत्य मानले जाते. शिवभारत हा ग्रंथ प्रसिद्ध संशोधक स. म. दिवेकर यांनी सन १९२७ मध्ये संपादित केला. दिवेकरानी संपादकीय प्रस्तावनेत असे म्हटले आहे की, "शिवाजी महाराजांचे विस्तृत व विश्वसनीय असे चरित्र जेव्हा भविष्यकाळात लिहिले जाईल त्याचा गाभा शिवभारत हा ग्रंथ होणार आहे" मात्र या ग्रंथाचा उपयोग अत्यंत काळजीपूर्वक व विचारपूर्वक केला पाहिजे. कारण या ग्रंथाचे लिखाण हे 'काव्यात्मक' व 'कल्पनात्मक' आहे. या सर्व माहितीचा विचार केला तर शिवभारतचा उपयोग संदर्भसाधन म्हणून होवू शकतो हे आपणास नाकारता येणार नाही.

२) अनुपुराण :

मराठ्यांच्या इतिहासाचे एक विश्वसनीय साधन म्हणून अनुपुराणकडे पाहिले जाते. अनुपुराण या ग्रंथाची रचना कवी परमानंदाने केली आहे. या ग्रंथात भोसले घराण्याच्या शहाजी राजे भोसल्यांपासून संभाजी महाराजापर्यंतचा काव्यात्मक इतिहास आहे. तसेच या ग्रंथाचे महत्त्वपूर्ण वैशिष्टे असे की या ग्रंथात शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांच्यातील सहसंबध अभ्यासपूर्ण दृष्टीकोनातून मांडले आहेत. त्यामुळे हा ग्रंथ महत्त्वाचा मानला जातो. हा ग्रंथ १९५२ मध्ये बडोदा ओरिएन्टल इन्स्टूटने प्रसिद्ध केला. मात्र या ग्रंथाच्या रचनेबाबत सुप्रसिद्ध इतिहास संशोधक शेजपलकर यांनी अक्षेप घेतला आहे त्यांच्या मते हा ग्रंथ कवी परमानंदाने लिहिल नसून या ग्रंथाची रचना त्यांच्या मुलगा देवदत्त व गोविदांने केली आहे.

३) राधामाधव विलास चंपू :

मराठ्यांच्या इतिहासाचे एक महत्त्वपूर्ण साधन म्हणून राधामाधव विलास चंपू कडे पाहिले जाते. हा काव्यमय ग्रंथ आहे. हा ग्रंथ जयराम पंडित यांने लिहिला आहे. शहाजी राजांचे चरित्र व पराक्रम हा या ग्रंथाचा मुख्य विषय आहे. शहाजी राजांच्या दक्षिणेतील हालचालींवर व राजकारणावर हा ग्रंथ प्रकाश टाकतो. या ग्रंथात शहाजीराजांची मीरजुलमावरील स्वारी, कर्नाटकातील अनेक राजांचा शहाजीने केलेला बिमोड, शहाजी-पोर्तुगीज संबध इत्यादी बदलची माहिती मिळते. भोसले हे मुळचे रजपूत होते हा संदर्भही या ग्रंथात मिळतो. हा ग्रंथ इतिहासाचार्य राजवाडे यांने शोधून काढला व तो आपल्या २०० पानाच्या प्रस्तावनेसह १९१२ साली प्रसिद्ध केला. त्यामुळे या ग्रंथाला संदर्भसाधन म्हणून महत्त्व आले.

४) पर्णालपर्वत ग्रहणाख्यान :

मराठ्यांच्या इतिहासाचे एक साधन म्हणून पर्णालपर्वत ग्रहणाख्यान कडे पाहिले जाते. हा ग्रंथ जयराम पिंड्ये यांनी लिहिला आहे. या ग्रंथामध्ये पन्हाळ्याच्या लढ्याचे वर्णन आहे. पर्णाल म्हणजे पन्हाळा. पन्हाळा हा गट शिवाजी महाराजांनी मार्च १६७३ मध्ये दुसऱ्यांदा जिंकला हा पन्हाळा विजय हाच या काव्यमय ग्रंथाचा विषय आहे. पन्हाळा विजयापासून ते उम्राणीजवळ बहलोलखान या विजापूरी सरदाराशी प्रतापरावाची लढाई झाली तेथपर्यंतची हकीकत जयराम पिंड्यानी या काव्यमय ग्रंथात सांगितली आहे. या हकीकती व्यतिरिक्त जयराम पिंड्यानी या ग्रंथात राजकुटुंबातील रुढी, परंपरा, चालीरीतींचे वर्णन केले आहे.

हा ग्रंथ तंजावर येथील सरस्वती महाल या ग्रंथालयात स. म. दिवेकर यांना मिळाला तो त्याने सन १९२३ मध्ये प्रकाशित केला. या ग्रंथात ५ अध्याय व ३५० श्लोक आहेत. मराठ्यांच्या इतिहास अभ्यासाचे एक साधन म्हणून या ग्रंथाला महत्त्व आहे.

५) शिवराज्याभिषेक कल्पतरु :

मराठ्यांच्या इतिहासाचे एक साधन म्हणून या ग्रंथाकडे पाहिले जाते. हा ग्रंथ कवी अनिरुद्ध यांनी लिहिला आहे. या ग्रंथात शिवाजी महाराजांच्या दुसऱ्या राज्याभिषेकाच्या माहितीचे कथन करण्यात आले आहे. शिवाजी महाराज क्षत्रि नाहित त्यामुळे त्यांना वैदिक पद्धतीने राज्याभिषेक करता येणार नाही. गागाभट्टाने केलेल्या वैदिक पद्धतीच्या विधी चुकीच्या आहेत. शिवाजी शुद्र असल्याने त्यांचा राज्याभिषेक तांत्रिक पद्धतीने झाला पाहिजे असे निश्चलपुरी आग्रहाने सांगतो. असे सांगणारा हा काव्यग्रंथ आहे.

या ग्रंथात २३४ श्लोक आहेत. गोविंद बर्वे आणि निश्चलपुरी यांच्या संवादाच्या रुपाने या ग्रंथाचे कथन करण्यात आले आहे. शिवाजी महाराजांच्या दुसरा राज्याभिषेक समजून घेण्याच्या दृष्टीकोनातून हा ग्रंथ महत्त्वाचा मानला जातो.

६) राज्यव्यवहारकोश :

मराठ्यांच्या इतिहासाचे एक साधन म्हणून या ग्रंथाकडे पाहिले जाते. शिवाजी महाराजांच्या अज्ञेनुसार या ग्रंथाची रचना रघुनाथ नारुण हणमंते यांच्या देखरेखीखाली धुंडीराज लक्ष्मण व्यास यांनी केली. हा ग्रंथ निर्मितीपाठीमागचा उद्देश मराठी भाषेवर जे फारसी भाषेचे जे आक्रमण होत होते ते दूर करणे हा होता हा ग्रंथ शिवकाळातील राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थितीवर प्रकाश टाकण्यासाठी उपयोगी ठरला आहे.

७) दंडनीती प्रकरण :

मराठ्यांच्या इतिहासाचे एक साधन म्हणून या ग्रंथाकडे पाहिले जाते. हा ग्रंथ केशव पंडित यांनी लिहिला आहे. हा ग्रंथ शिवकाळातील न्यायपद्धतीची माहिती सांगणारा आहे. वा. सी. बेंद्र यांच्यामते हा ग्रंथ संभाजी महाराजांच्या कारकिर्दीत लिहिला गेला आहे. म्हणजेच या ग्रंथातून संभाजी महाराजांच्या न्यायपद्धतीची माहिती मिळते.

८) राजाराम चरितम :

मराठ्यांच्या इतिहासाचे एक साधन म्हणून या ग्रंथाकडे पाहिले जाते. हा ग्रंथ राजाराम महाराजांच्या पदरी असणाऱ्या केशव पंडित यांने लिहिला. हा काव्यग्रंथ १६९० च्या सुमारास

रचला गेला. हा ग्रंथ तंजावर येथील सरस्वती महाल या ग्रंथालयातून वा. सी. बेंद्रे यांनी शोधून काढला व तो सन १९३१ मध्ये प्रसिद्ध केला. या ग्रंथात संभाजी महाराजांच्या वधा नंतरच्या परिस्थितीचे तसेच राजाराम महाराजांच्या जिंजी प्रवासाचे वर्णन आहे. केशव पंडित जिंजी प्रवासा दरम्यान राजाराम महाराजांच्या सोबत असावे. त्यामुळेच ऐतिहासिक दृष्ट्या हा ग्रंथ महत्त्वाचा मानला जातो.

मात्र या ग्रंथाच्या समालोचनात वा. सी. बेंद्र म्हणतात "काव्यात्मक दृष्टीकोनातून हा ग्रंथ चांगला आहे. भाषा व रचना साधी, सोपी व सरळ आहे. परंतु लेखन तत्कालीन पद्धती प्रमाणे सुरुवातीला कथा-पुराणाच्या थाटाने झाले असून विवेचनात स्वप्ननवृतांत व भविष्य कथानाचाच मार्ग कवीने स्विकारला आहे" या दोषामुळेच या ग्रंथातील ऐतिहासिक सत्य अभ्यासकांना शोधावे लागेल.

९) विश्वगुणदर्शन :

मराठ्यांच्या इतिहासाचे साधन म्हणून या ग्रंथाकडे पाहिले जाते. हा ग्रंथ प्रसिद्ध विद्वान व्यंकटधावरी यांनी १७ व्या शतकात लिहिला. या ग्रंथातील संपूर्ण एका प्रकरणात महाराष्ट्रचे वर्णन आले आहे. या प्रकरणात महाराष्ट्रातील ब्राम्हण कुटुंबाची स्थिती, मराठे व इतर समाजाची माहिती, या सर्व समाजाची वैशिष्ट्ये या ग्रंथात सांगण्यात आली आहेत. या ग्रंथात लेखकाने संभाषणात्मक स्वरुपात महाराष्ट्रातील लोकांचे गुणदोष सांगितले आहेत.

मराठ्यांच्या इतिहासाच्या संस्कृत साधनांचा विचार करत असताना आपण सर्वप्रथम शिवभारत, अनुपुराण, राधामाधवविलास चंपू, पर्णाल पर्वत ग्रहणाख्यान, शिवराज्याभिषेक कल्पतरु, राज्यव्यव्हारकोश, दंडनिती प्रकरण, राजाराम चरितम, विश्वगुणदर्शन या साधनांची माहिती पाहिली.

ही साधने निर्माण करणारे परमानंद, जयराम पंडित, कवी अनिरुद्ध, रघुनाथ हणमंते, केशव पंडित, व्यकंटधावरी जरी लेखक असले तरी त्यांनी हे सर्व ग्रंथ काव्यात्मक स्वरुपात लिहिले आहेत.

त्यांनी लिहिलेल्या ग्रंथाला काव्यात्मक स्वरुप असल्याने त्यांनी त्यांच्या पोटाच्या भूके साठी या वाङमयात काव्यात्मक रुप दिले असे म्हटले जाते. तसेच त्यांने या वाङमयाद्वारे राजकर्त्याची प्रशंसा केल्यामुळे त्यांनी भाटगीरी केली असे म्हटले जाते.

या दोषाना वगळले तर त्यांचा लिखानातील विवेचनात्मक आशय, ऐतिहासिक सत्याचा भाग प्रसंगाचा तपशील, त्यांना लाभलेला राजाश्रय, लिखानासाठी उपलब्ध झालेली साधने, या त्यांच्या लिखानाचा जमेच्या बाजू आहेत.

या सर्व माहितीच्या आधारे आपणास असे दिसून येते की भारतीय इतिहास अभ्यासाची म्हणून मराठी साधनांप्रमाणेच संस्कृत साधने ही महत्त्वाची आहे. या संदर्भ साधनांचा आधार घेवून पुढे आधुनिक इतिहासक रानी व इतिहास संशोधकानी मराठ्यांच्या इतिहासावर अधिकाधिक प्रकाश टाकला.

क) हिंदी साधने

मराठ्यांच्या इतिहासाच्या भारतीय साधनापैकी हिंदी साधनेसुद्धा मराठ्यांच्या इतिहासाच्या दृष्टीकोनातून उपयुक्त ठरली आहेत. मात्र ज्या प्रमाणे मराठ्यांच्या इतिहासाची मराठी, संस्कृत

फारसी साधने मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत त्या प्रमाणे हिंदी साधने मोठ्या प्रमाणात उपलब्ध नाहित.

मराठ्यांच्या इतिहासाची जी हिंदी साधने आहेत ती साधने शिवाजी महाराजांच्या कालखंडाची माहिती जास्त प्रमाणात मिळवुन देतात. कवी भूषण यांच्या काव्यातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या कालखंडातील राजकीय व सामाजिक परिस्थिती या बाबतची माहिती समजते.

ड) फारसी साधने

मराठा सत्तेच्या उदयापूर्वी व उदयानंतरही हिंदूस्थानच्या निरनिराळ्या भागात इस्लाम सत्ता राज्य करत होत्या. या सत्तामध्ये अदिलशाही, निजामशाही, कुतूबशाही, मोगलशाही अशा सत्तांचा समावेश होता. शिवाजि महाराजांचा हिदंवी स्वराज्याच्या राज्यकारभाराच्या निमित्त या सत्तांबरोबर संबध आला होता. इस्लाम राजकर्त्यांचे इतिहासकार फारसी भाषेतून चरित्र, पत्रे, बातमीपत्र लिहित होते या सर्व कागदपत्रातून मराठ्यांच्या इतिहासा संबधी बरीच माहिती मिळते.

फारसी इतिहासकारानी लिहिलेल्या साधनात एकांगीपणा, काल्पनिकता, कालविपर्यास, पक्षपातीपणा, चुकीच्या घटनांचा नोंदी असे अनेक दोष असेल तरी परकीयांच्या दृष्टीकोनातून मराठ्यांच्या इतिहास समजून घेण्यासाठी ही साधने अत्यंत उपयुक्त आहेत. अशी ही फारसी भाषेतील साधने पुढील प्रमाणे आहेत.

१) मसिरे अलमगिरी (अलमगिरीचे कर्तृत्व) :

मसिरे अलमगिरी हा ग्रंथ मराठ्यांच्या इतिहासाचे एक साधन असून या ग्रंथाचे स्वरुप चरित्रग्रंथाचे आहे. या ग्रंथात औरंगजेबाचे चरित्र असून या ग्रंथाचे लिखान औरंगजेबाच्या मृत्युनंतर दोन वर्षानी त्याच्या दरबारात असणाऱ्या साकी मुस्तैदखान यांनी केले. या ग्रंथाला 'रॉयल एशियाटीक सोसायटी ऑफ बांगला' या संस्थेने प्रथम प्रसिद्धी दिली. पुढे या ग्रंथाचे जदूनाथ सरकारानी इंग्रजी भाषांतर केले. तर याच ग्रंथाचे पुढे सेतू माधवराव पगडी यांनी "मराठे व औरंगजेब" या नावाने प्रकाशन केले.

या ग्रंथाच्या कर्ता साकी मुस्तैदखान हा औरंगजेबाच्या तैनातीमधील खास अधिकारी होता त्यांनी औरंगजेबाच्या दरबारात अनेक महत्त्वाच्या जागांवर काम केले होते. औरंगजेबाच्या दक्षिण स्वारी दरम्यान १६६२ ते १७०७ पर्यंत प्रत्यक्ष हजर होता. मोगल मराठा संघर्षाच्या असंख्य घटना त्यांनी आपल्या प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिल्या होत्या.

"साकीने आपल्या चरित्रात महत्त्वपूर्ण घटनांच्या तारखा बिनचूक दिल्या आहेत. त्यामुळे मोगल-मराठा संघर्षाचा अभ्यास करणाऱ्यांना या ग्रंथाची बहुमोल मदत होते. या ग्रंथात शिवाजी, संभाजी, राजाराम, ताराबाई यांच्या कारकिर्दीचीही माहिती आहे. मात्र साकीने मोगलांचे पराभव या चरित्रात झाकून ठेवले आहेत. त्यामुळे या बाबतची माहिती इतिहास अभ्यासकांना इतर ग्रंथातून पडताळून पहावी लागते.

या ग्रंथावर भाष्य करताना सेतू माधवराव पगडी म्हणतात, "मोगलांच्या विजयाचे वर्णन करताना साकीची लेखणी अनावर होते. पण त्यांच्या नामुष्कीचे प्रसंग सांगताना मुस्तैदखानाची तारांबळ उडते असे प्रसंग त्यांनी उडत उडत करण्याकडे हेतू पुरस्कर लक्ष दिल्याचे जाणवते."

२) तारिखे खाफीखान (खाफीखानाचा इतिहास) :

तारिखे खाफीखान हा ग्रंथ मराठ्यांच्या इतिहासाचे एक साधन असून हा ग्रंथ मोगलांचा एक अधिकारी महमद हाशिम खाफीखान यांने लिहिला आहे. त्याचा हा ग्रंथ १८७४ मध्ये 'रॉयल एशियाटीक सोसायटी ऑफ बांगलाने' प्रकाशित केला. त्याच्या या ग्रंथात औरंगजेब बादशहा व त्यांच्या नंतर सत्तेवर बसलेले बहादूर शहा, जहाजशंहा, फरुकसियर या मोगल बादशहाची माहिती आहे. तारिखे खाफीखानचे इंग्रजी रुपांतर इलियट व डाऊन्स या दोघा पाश्चात्य पंडिताने केले आहे. या ग्रंथाचे मराठी भाषांतर ग. ह. खरे व सेतू माधवराव पगडी यांनी प्रसिद्ध केले आहे. खरे यांचे भाषांतर "शिवचरित्रवृत्तसंग्रह" खंड ३ मध्ये तर पगडीचे यांचे भाषांतर "मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध" या नावाने प्रसिद्ध आहे.

खाफीखान मोगलांचा एक अधिकारी होता. तो औरंगजेबाच्या दक्षिण मोहिमे प्रसंगी स्वत: हजर होता. त्यांनी मोगल मराठा संघर्ष स्वत: पाहिला आहे. साकि प्रमाणेच खाफीखानानेही मोगलांची दुर्दशा लपवून ठेवली आहे. असे जरी असले तरी हा ग्रंथ शिवाजी महाराजांच्या हालचाली, संभाजी महाराजांचा स्वभाव व कर्तृत्व संताजी, धनाजी, राजाराम व ताराबाई यांची कामगिरी प्रकाश टाकतो.

मराठ्यांसंबधी लिखान करताना खाफीखानाने संयम दाखवित नाही. काफर, नर्कवासी, नालायक, हीन, दृष्ट, पीडा देणारे, फुटक्या नशिबाचे अशी कितीतरी विशेषणे तो मराठ्यांना बहाल करतो.

सेतू माधवराव पगडी यांनी या खाफीखानाच्या लिखाना बाबत मत व्यक्त करतांना असे म्हटले आहे की, "खाफीखानाने मराठ्यांबाबत जरी अनुद्गार काढले असले तरी त्यांनी मराठ्यांच्या शौर्याची प्रशंसा केली आहे. शिवाजी महाराजांबद्दल गौरवाचे उद्गार काढले आहेत. संताजी घोरपडेची मोगल सरदाराना किती भीती वाटत होती याचे वणङनही त्याने मन मोकळेपणाने केले आहे. ताराबाईच्या कामगिरीचीही त्यांने मुक्त कंठाणे प्रशंसा केली आहे. शत्रुपक्षातील इतिहासकाराने मराठ्यांसबधी काढलेले उद्गार महत्त्वाचे समजले पाहिजे." या माहितीचा संदर्भ मराठ्यांच्या इतिहासाबरोबर असल्याने हे साधन मराठ्यांच्या इतिहासाचे संदर्भ साधन मानले जाते.

३) तारिखे दिल्लकुशा (मनोरम इतिहास) :

तारिखे दिल्लकुशा हे एक मराठ्यांच्या इतिहासाचे साधन असून औरंगजेबाच्या पदरी नोकरी करणाऱ्या भीमसेन सक्सेना याचे हे आत्मचरित्र आहे.

या ग्रंथाचा पहिला इंग्रजी अनुवाद कॅप्टन जोनाथन स्कॉट यांने सन १७९४ मध्ये केला. महाराष्ट्रात पांडुरंग नरसिंह पटवर्धन यांनी "बुंदेलखंडाची बखर" या नावाने मराठी भाषांतर करुन सन १९२० मध्ये प्रसिद्ध केला. हाच ग्रंथ सेतू माधवराव पगडी यांनी "मोगल आणि मराठे" या नावाने आणून अभ्यासकांची सोय केली.

भीमसेन सक्सेना हा धार्मिक वृत्तीचा होता. प्रवासात त्याने अनेक तीर्थक्षेत्र पाहिली त्याचे वर्णन त्यांन आपल्या ग्रंथात लिहिले आहे. शिवाय औरंगाबाद, मुलहेर, जुन्नर, अहमदनगर, विजापूर, हैद्राबाद या शहरांची वर्णने ही त्यांने आपल्या ग्रंथात केली आहेत.

भीमसेन सक्सेनानी आपल्या ग्रंथात १६५६ पासून १७०९ पर्यंतचा इतिहास दिला आहे. या त्याच्या इतिहासात स्वराज्य स्थापना, संभाजी महाराजांची कारकिर्द, औरंगजेबाचे आगमन, मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध या घटनांची माहिती आहे.

सेतू माधवराव पगडीनी या ग्रंथातील दोषांचे विवेचन करताना असे म्हटले आहे की, "भीमसेन सक्सेना हा जरी हिंदू असला तरी तो मोगलांचा सननिष्ठ अधिकारी होता. त्यामुळे त्यांनी मराठ्यांकडे त्रयस्थाप्रमाणे पाहिले आहे. त्यांने शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा साधा उल्लेखही आपल्या ग्रंथात केला नाही. त्याचे सर्व लिखान स्मृतीवर आधारित असल्याने तो इतिहासाचा ग्रंथ होवू शकत नाही त्याने आठवणीवर भर दिल्याने घटना व तारखापुठे मागे झाल्या आहेत."

मात्र सर जदूनाथ सरकारांनी आपल्या "History of Awrangjeb" a "Shivaji and His Times" या पुस्तकांसाठी तारिखे दिलुकुशा ग्रंथाचा वापर करुन घेतला आहे.

४) फुतूहाते आलमगिरी (आलमगीर विजय) :

फुतूहाते आलमगिर हे एक मराठ्यांच्या इतिहासाचे साधन असून या ग्रंथाची निर्मिती औरंगजेब बादशाहाच्या मुख्य न्यायाधिशाच्या कारकून ईश्वरदार यांनी केली. तो कारकून असल्याने त्याचे वास्तव्य बादशहाच्या सानिध्यात जास्त असे. त्यांनी १७१० ते १७२० या काळात हा ग्रंथ लिहिला असावा. याचा अनुवाद सेतू माधव पगडी यांनी मराठीमध्ये 'मोगल संघर्ष' पुस्तकात केला आहे.

ईश्वरदासाने आपल्या ग्रंथात शाहिस्तेखान मोहिम, साताऱ्याचा वेढा, राजाराम महाराज, संताजी व बादशाही सरदार आदिंची माहिती नमुद केली आहे. मात्र त्यांनी शिवाजी महाराजांबद्दल लिहिलेली माहिती हस्यापद आहे.

सेतू माधवराव पगडी या ग्रंथाबाबत म्हणतात, "या ग्रंथात काही दोष असले तरी मराठ्यांच्या इतिहासाच्या दृष्टीने हा ग्रंथ उपयुक्त आहे. कारण सन १४८० पासून ते १७०७ पर्यंतची माहिती या ग्रंथात आहे. या काळातील परिस्थितीवर प्रकाश टाकणारी थोड्या प्रमाणात ग्रंथ संपाद आहे म्हणून जरी या ग्रंथातील माहिती त्रोटक असली तरी मराठ्यांच्या या काळातील इतिहास अभ्यासाच्या दृष्टीने हा ग्रंथ महत्त्वाचा आहे."

५) खुतूने शिवाजी (शिवाजीची पत्रे) :

खुतूने शिवाजी महाराजांची पत्रे होय. या ग्रंथात एकुण ३२ पत्रे आहेत. या ३२ पैकी फक्त २ पत्रे शिवाजी माहाराजाशी संबधीत आहेत. बाकी सर्व पत्रे शिवकाळापासून शाहूकाळापर्यंतची आहेत. या पत्रामध्ये शिवाजी महाराजानी जिजिया कराच्या निषेधार्थ औरंगजेबाला लिहिलेली पत्रे, शहाजादा अकबराने औरंगजेबाला लिहिलेली पत्रे, कवी कलश व संभाजी महाराजांची पत्रे, जुल्फिकार खानाची पत्रे, शाहू महाराजानी जंजिऱ्याच्या सिद्दीला लिहिलेली पत्रे, या पत्रांचा समावेश होतो. ही पत्रे मराठ्यांच्या इतिहासाच्या दृष्टीने उपयुक्त ठरतात.

या पत्रांचा मराठी अनुवाद शेतू माधवराव पगडी यांनीही "मोगल मराठा संघर्ष" या ग्रंथात केला आहे. यावरुनच ही पत्रे इतिहास अभ्यासाच्या दृष्टीने उपयुक्त आहेत हे सिद्ध झाले आहे म्हणूनच या पत्रांना इतिहास अभ्यासाच्या साधनाचा दर्जा प्राप्त झाला आहे.

६) लुत्फुल्लाखानाची पत्रे :

लुत्फुल्लाखानाची पत्रे हे एक मराठ्यांच्या इतिहासाचे साधन मानले जाते. लुत्फुल्लाखान हा औरंगजेबाच्या सरदार होता. त्याने बादशहाचा सरदार म्हणून विजापूर, औरंगाबाद, वऱ्हाड, खटाव, अकलुज इत्यादी ठिकाणी काम केले होते. सन १६९० ते १७०० या कालखंडात त्यांनी लिहिलेल्या पत्रात मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धातील महत्त्वपूर्ण घटनांचा उल्लेख केला आहे. या पत्रात इतिहास अभ्यासासाठी मोगल मराठा संघर्ष, संताजी-धनाजी पराक्रम, मराठ्यांचे गनिमी कावा तंत्र या विषयांची माहिती मिळते. या पत्रांचा मराठी अनुवाद शेतू माधवराव पगडी यांनी आपल्या मराठा-मोगल संघर्षांत केला आहे. या ग्रंथात लुत्फुल्लाखानाची १८४ पत्रे आहेत त्या पैकी ४० पत्रांचा अनुवाद पगडी यांने केला आहे.

७) हफ्त अंजुमन :

मिर्झा राजा जयसिंग यांच्या पत्राचा संग्रह म्हणजे हफ्त अंजुमन होय. या पत्रामध्ये जयसिंगाने औरंगजेबाला लिहिलेल्या पत्रांचा समावेश आहे. मिर्झा राजे दक्षिणेच्या मोहिमेवर असताना त्यांनी औरंगजेबाला पत्र लिहिली होती. जयसिंगाचे चिटणीस उदयराज यांने ही पत्र संग्रहित करुन त्यास 'हफ्त अंजुमन' हे नाव दिले.

या पत्रातून जयसिंगाच्या सन १६६५ च्या शिवाजी महाराजांच्यावरील मोहिमेसंबधीची बरीच माहिती मिळते या ग्रंथाच्या तिन मूळ प्रती उपलब्ध आहेत. एक प्रत पॅरिस येथील राष्ट्रीय संग्राहलयात आहे, दुसरी प्रत बनारस येथे एका कायस्थ ब्राम्हण कुटुंबात व तिसरी प्रत जयपूर येथे आहे.

या पत्रांचा मराठी अनुवाद सेतू माधवराव पगडी यांनी आपल्या मोगल-मराठा संघर्ष पुस्तकात केला आहे. तर जदूनाथ सरकारानी या पत्रांचा इंग्रजी अनुवाद आपल्या "House of Shivaji" या ग्रंथात केला आहे.

८) अखबारात :

मोगल राजवटीत राजकर्ते आपल्या दरबारातील दैनंदिन घडामोडींचा वृत्तांत सरकारी अधिकाऱ्यांकडून लिहून घेत असत या वृत्तांत लेखनाच्या वार्तापत्राला अखबारात असे म्हटले जात असे. अखबारातचा वापर सर जदूनाथ सरकारानी आपल्या "House of Aurangjeb" या पुस्तकाच्या लिखानासाठी केला आहे. ग. ह. खरे, व सेतू माधवराव पगडी यांनी या अखबरातचे मराठी भाषांतर करुन प्रसिद्ध केले आहे.

दक्षिणेतील मराठा मोगलांचा संघर्ष, मराठा सरदार व त्यांच्या हालचाली ठाणेदार व किल्लेदार यांची नावे इत्यादी बाबीवर अखबारात चांगला प्रकाश टाकतो.

९) ब्रुसातिन-ई-सलातीन :

ब्रुसातिन-ई-सलातिन हा विजापूरच्या आदिलशाहीचा इतिहास आहे. याचे लिखान सन १८२४ मध्ये मुहम्मद इब्राहिम अझ्झुबैरी यांने केले. मोडक व वझे यांनी "विजापुरच्या आदिलशाहिचा इतिहास" या नावाने या ग्रंथाचा मराठी अनुवाद केला. खरे बेंद्र यानीही या ग्रंथाचे मराठी अनुवाद केले.

या ग्रंथातून शिवाजी महाराजांच्या हालचाली, पराक्रम, राजकारण आदिलशाहि बरोबरचे संबध आदीबाबतची माहिती मिळते.

१०) अलीनामा :

अलीनामा हे महाकाव्य आहे. हे महाकाव्य महमद नुश्रकी या कवीने दक्षिणी उर्दूत लिहिले आहे. या काव्यात आदिलशाहीचा मराठ्यांबरोबर जो संघर्ष सुरु होता त्याचा उल्लेख आहे. या व्यतिरिक्त अफझलखान प्रकरण, पन्हाळ्यांा वेढा, शाहिस्तेखानावरील छापा, बहलोलखान व प्रतापराव गुजर यांच्या लढाया इत्यादींचा तपशीलवार उल्लेख या ग्रंथात आहे.

११) पेशवेकालीन फारशी साधने :

पेशवेकालीन फारशी साधने शिवकालातील फारशी साधनांच्या तुलनेत फार कमी आहेत. 'अखबारात', 'तारिखे इरादतखान', 'मिराझे अहमदी', 'सियारउल मुतख्खरीन' ही पेशवेकालातील फारशी साधने होय. या साधनांच्या आधारे पेशवे-निजाम संबध, पानिपतचा संग्राम, गुजरातमधील मराठ्यांच्या हालचाली या विषयीची बरीच माहिती उपलब्ध होते.

मराठ्यांच्या इतिहासाच्या फारशी साधनांचा विचार करत असतांना सर्वप्रथम आपण मसिरे अलमगिरी, तारिखे खाफीखान, तारिखे दिल्लुकुशा, फुतूहाते आलमगिरी, खुतूते शिवाजी, लत्फुल्लाखानाची पत्रे, हफ्त अंजुमन, अखबारात, बुसतिन-ई-सलातीन, अलीनामा या साधनांचा आपण विचार केला.

या साधनांचे कर्ते, निर्माते, लेखक साकी, खाफीखान, भीमसेन सक्सेना, ईश्वरदास नागर, लुत्फुल्लाखान उदयराज, सरकारी अधिकारी महमंद इब्राहीम, मंहमद नुसुकी हे होते.

ही सर्व साधने समकालीन असल्याने हि सर्वच साधने मराठ्यांच्या इतिहासाच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठरली आहेत.

या सर्व साधनांच्या माध्यमातून आपणास मराठ्यांच्या राजकीय इतिहासाची मोठ्या प्रमाणात माहिती उपलब्ध होते. मात्र ही साधने मराठ्यांच्या प्रशासकीय, सामाजिक व आर्थिक इतिहासाला स्पष्ट करण्यास असमर्थ ठरतात.

फारशी इतिहासाची साधने निर्माण करणारे लेखक हे बहुतांशी बादशहाचे चाकर असल्याने त्यांच्या निष्ठा बादशहाच्या मर्जीला संबधीत असत. परीणामी मराठ्यांबद्दल त्यांच्या मनामध्ये अनादर असे परिणामी या साधनांच्या माध्यमातून जो इतिहास लिहिला गेला आहे अथवा लिखान केले गेले आहे त्यामध्ये एकांगीपणा, एकपक्षीयता दिसते.

असे जरी असले तरी याच साधनांचा आधार घेवून खरे, राजवाडे, सर जदूनाथ सरकार, सेतू माधवराव पगडी यांनि या साधनाचे इंग्रजी व मराठी अनुवाद करुन या साधनांा आधारे मराठ्यांचा इतिहास शास्त्रीय दृष्टीकोनाच्या चौकटीत बसवला आहे. परिणामी मराठ्यांच्या इतिहासाच्या दृष्टीने ही साधने महत्त्वपूर्ण ठरली आहेत.

१.३ कागदपत्रांचे संकलन व संपादन

मध्ययुगीन कालखंडात मराठा सत्तेचा उदय ही भारतीय इतिहासातील एक महत्त्वपूर्ण घटना मानली जाते. अशा या मराठ्यांचा इतिहास लिहिण्यासाठी वेगवेगळ्या साधनांचा वापर केला

गेला. या साधनात कागदपत्रीय साधनाना महत्त्वाचे स्थान आहे. सर्वसाधारणपणे १९या शतकाच्या इतिहासाच्या शास्त्रशुद्ध लिखाणासाठी कागदपत्रांचा उपयोग होवू लागला. व अल्पकाळातच महाराष्ट्रामध्ये साने, पारसनिस, खरे, राजवाडे, सरदेसाई इत्यादीनी मराठ्यांच्या विखुरलेल्या साधनाना एकत्रीत केले व हि साधने प्रकाशित करण्याची महत्त्वपूर्ण भूमिका निभावली. त्यामुळेच मराठ्यांच्या इतिहास लेखनास चालना मिळाली.

१. काशिनाथ नारायण साने यांची कामगिरी :

काशिनाथ नारायण साने यांचा जन्म १८५१ मध्ये वसई जवळच्या एका खेड्यात झाला. उच्च शिक्षण पुणे डेक्कन कॉलेजात झाले. आरंभी शिक्षकी पेशा त्या नंतर ट्रेनिंग कॉलेजचे प्राचार्य नंतर या पेशातून निवृत्ती असा त्यांचा सेवा प्रवास झाला.

त्यांना आरंभीपासूनच मराठी वाङमय व इतिहास विषयाची आवड होती. पुण्यातील इतिहास मंडळाचे ते काही वर्ष कार्यकारी सभासद व अध्यक्ष होते. त्यांच्या या मंडळाच्या कार्याबद्दल त्यांना शवबहादूर ही पदवी सरकारकडून मिळाली होती. चिटणीसाच्या बखरी शिवाय कोणतेही मराठी वाङमय प्रकाशीत झाले नव्हते म्हणूनच एखादे मासिक सुरु करण्याचा त्यांनी विचार सुरु केला. त्यांच्या या विचारांना त्यांचे मित्र विष्णु कृष्णा चिपळूणकराने मान्यता दिली. त्यामुळेच सानेने मराठी व संस्कृत कागदपत्रे प्रसिद्ध करण्याच्या कामाला सुरुवात केली. यासाठी त्यांने 'काव्येतिहास संग्रह' या नावाने मासिक सुरु केले. या मासिकाचे साने, चिपळूणकर व मोडक हे संपादक होते. या मासिकातून सानेने बरेचसे वाङमय व ऐतिहासिक कागदपत्रे प्रकाशित केली. हे मासिक जवळ जवळ १ वर्ष सुरु होते. या मासिकातून ६३०० पाने प्रकाशित झाली.

या मासिकाच्या उपयुक्ततेचे वर्णन करतांना भांडारकर म्हणतात, "या मासिकाने इतिहासाच्या क्षेत्रात एकप्रकारची क्रांती घडवून आणली. तसेच महाराष्ट्रात अप्रकाशित कागदपत्रांचा खजिना आहे हे दाखवून दिले."

ऐतिहासिक कागदपत्रांच्या प्रकाशनाशिवाय सानेनी स्वतंत्रपणे स्वत: सभासद बखर, चिटणीस बखर, भाऊसाहेबांची बखर, पानिपत बखर, आज्ञापत्र या बखरींचे संपादन केले. या पैकी सभासद बखर व चिटणीस बखरीचे त्यांच्या टिपणासह साने यांनी केलेले संपादन बरेच मान्यता पावले. मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांच्या दृष्टीने सानेने ही केलेली कामगिरी अत्यंत महत्त्वाची मानली जाते.

२. वासुदेव वामनशास्त्री खरे यांची कामगिरी :

वासुदेव वामनशास्त्री खरे यांचा जन्म १८८५ मध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर येथे झाला. त्यांच्याकडे उपजत बुद्धीमत्ता होती प्रापंचीक अडचणीवर मात करत त्यांनी आपले शिक्षण पुर्ण केले. खरे साताऱ्यात आल्यानंतर त्यांना 'महाराष्ट्र मित्र' या वृत्तपत्रात काम करण्याची संधी मिळाली. त्यांनी साताऱ्यात तीन वर्षात संस्कृत, व्याकरण वाङमय व तर्कशास्त्राचा अभ्यास केला. नंतर त्यांनी पुण्यात येवून लोकमान्य टिळकांनी स्थापन केलेल्या 'न्यु इग्लिश स्कूल' या शाळेत संस्कृत शिक्षकाची नोकरी स्विकारली. याच काळात त्यांची मैत्री इतिहास संशोधक साने व मोडक यांच्याबरोबर झाली. 'काव्यतिहास संग्रह' या मासिकाचे संपादन करण्यास मोडक व साने यांना खरेनी महत्त्वपूर्ण मदत केली.

पुणे सोडून खरे मिरजला स्थायीक झाले. व तेथे त्यांनी अस्सल कागदपत्रावर आधारित 'नाना फडणींसाचे चरित्र' प्रसिद्ध केले. मिरजमध्ये असतांना त्यांचे लक्ष पटवर्धन घराण्याकडे

असणाऱ्या ऐतिहासिक कागदपत्राकडे गेले. पटवर्धनानी पेशव्यांच्या मुलकी सेवेत महत्त्वाची कामगिरी बजावली होती. या घराण्यातील लोकांनी पेशव्यांना लिहिलेली पत्रे, दस्तुररकद पेशव्यांनी या घरण्यातील लोकांना लिहिलेली पत्रे मराठ्यांच्या इतिहासात अत्यंत उपयुक्त ठरणारी होती.

खरेजी पटवर्धन घराण्यातील लोकांची परवानगी काढली. व ऐतिहासिक कागदाच्या संकलन व संपादनाचे कार्य सुरु केले. ही कागदपत्रे मोडी लिपीत होती. या कागदपत्रातून खरेनी मराठ्यांच्या इतिहासात उपयुक्त असणारी मोडी लिपीतील कागदपत्रे निवडून काढली. व त्यांचे मराठी भाषांतर केले. या पत्रात खलिते, खाजगी पत्रे, हिशोबाचे कागद, पेशव्यांकडुन आलेली कागदपत्रे यांचा समावेश होता. या कागदपत्रांच्या प्रकाशनासाठी त्यांनी "ऐतिहासिक लेखन संग्रह" नावाचे मासिक सुरु केले. सलग तिन वर्ष त्यांनी हे मासिक सुरु ठेवले. पैशाअभावी या मासिकाच्या प्रकाशनात खंड पडला. मात्र नंतर अडचणींवर मात करत त्यांनी आपल्या मृत्युपर्यंत हे मासिक सुरु ठेवले.

वैशिष्ट्यपुर्ण लिखाण हे खऱ्यांच्या लिखाणाचे मुख्य वैशिष्ट्ये होते. कागदपत्रांची पद्धतशीर मांडणी त्यांचा निपक्षपाती दृष्टीकोन, त्यांची विद्वता, आकर्षक प्रस्तावना ही आहेत.

ऐतिहासिक लेखन संग्राहाशिवाय खऱ्यांनी 'हरिवंशाची बखर' 'इचलकरंजी सस्थांनाचा इतिहास' 'अधिकार योग' 'गुणोत्कर्ष नाटक' संगीत देशकंटक नाटक इत्यादी महत्त्वपूर्ण नाटक लिहून मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनात मोलाची भर टाकली.

३. दत्तात्रेय बळवंत पारसनीस यांची कामगिरी :

दत्तात्रेय बळवंत पारसनिसांचा जन्म १८७० मध्ये सातारा येथे एका कुटुंबात झाला त्यांचे मॅट्रिक पर्यंत शिक्षण झाले. त्यांना थोर पुरुषांचे चरित्र वाचण्याची आवड होती. आवडीला अनुसरुनच त्यांनी थोर पुरुषांच्या चरित्राचा अभ्यास केला. नंतर त्यांनी 'महाराष्ट्र कोकीळा' नावाचे मराठी भाषेतील एक मासिक सुरु केले. नंतर त्यांनी 'भारतवर्ष' हे त्रैमासिक सुरु केले. या प्रकारे त्यांच्या या कार्याचा आरंभ झाला. मात्र 'भारतवर्ष' अल्पकाळातच बंद पडले नंतर त्यांनी 'इतिहास संग्रह' नावाने त्रैमासिक सुरु केले व या मासिकातून ऐतिहासिक कागदपत्रे प्रकाशित करण्यास सुरुवात केली. हे मासिक त्यांनी सातवर्ष चालविले.

पुणे या ठिकाणी दप्तरखान्यात पारसनीसानी न्यायमूर्ती रानडे यांच्या मार्गदर्शनाखाली बरीच बर्ष काम केले. ऐतिहासिक दृष्टीकोनातून महत्वपूर्ण असणारी कागदपत्रे त्यांनी निवडून काढली व ती त्यांनी प्रकाशित केली. पारसनिसाने जे निरनिराळे साहित्य प्रकाशित केले आहे. ते पुढील प्रमाणे आहे.

१. ऐतिहासिक भाग लेख संग्रह – १ ते १५

२. पेशव्यांच्या रोजनिशीतून निवडलेले कागद शाहू महाराजांचा काळ

३. पेशव्यांच्या रोजनिशितून निवडलेले कागद – बाळाजी बाजीराव खंड १ ते २

४. पेशवा दप्तरातून शाहू व पेशवे यांनी घेतलेल्या निर्णया संबधीची कागदपत्रे.

५. सनदा व पत्रे

६. कैफियद, याद्या.

७. तह, करारनामे आणि सनदा

८. ब्रम्हेंद्रस्वामीचे जीवन व त्यांची पत्रे

९. तंजावरचे राज घराणे

१०.ग्वाल्हेरच्या शिंदे घराण्या विषयीची कागदपत्रे खंड १ ते ५

या शिवाय पारसनिस यांनी मराठ्यांच्या इतिहासाविषयी काही पुस्तके लिहिली ़हेत. ही मराठ्यांच्या इतिहासाला मिळालेली देणगी आहे. 'झाशीच्या राणीचे चरित्र', 'बुंदलखंडातील मराठे', 'बायझाबाईचे चरित्र' ही त्यातील महत्त्वाची पुस्तके आहेत.

पारसनिसाच्या या कार्याबाबत सर जदूनाथ सरकारांनी असे उद्‌गार काढले आहेत की, "पारसनिस हे एक इतिहासकार म्हणून नव्हे तर संग्राहक व प्रकाशक म्हणून जगले व मेले".

४. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांची कामगिरी :

विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांचा जन्म एका चित्पावन ब्राम्हण कुटुंबात पुणे येथे १८६४ मध्ये जाला. बी. ए. झाल्या नंतर त्यांनी नाईलाजाने चरितार्थासाठी पुण्याच्या 'न्यु इग्लिश स्कुल' मध्ये शिक्षकाची नोकरी पत्करली. सांसारिक जीवनातील अडचणी व पत्नीचा मृत्यु या मुळे त्यांनी ही शिक्षकाची नोकरी सोडली व आपले आयुष्य इतिहास, समाजशास्त्र, भाषाशास्त्र या विषयातील संशोधनासाठी वाहून घेतले. उपजीविकेच्या प्रश्नाकडे मुळीच लक्ष न देता त्यांनी सन १८९३ पासून मृत्युपर्यंत म्हणजे १९२६ पर्यंत संशोधनासाठी आवश्यक असणाऱ्या साधनसामुर्गी जमविण्यासाठी घालविले त्यांचे मराठ्यांच्या इतिहासातील योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

मराठ्यांच्या इतिहासाच्या कागदपत्र संकलन व संपादनामध्ये काशिनाथ नारायण साने, वासुदेव वामनशास्त्री खरे, दत्तात्रय बळवंत पारसनिस व विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. या सर्व अभ्यासकांनी, संशोधकानी जी मराठ्यांच्या इतिहासाची साधने संकलीत केली. संपादीत केली त्यामुळे मराठ्यांच्या इतिहासाला खऱ्यार्थाने दिशा प्राप्त होऊन मराठ्यांच्या वस्तुनिष्ठ इतिहास लोकांसमोर आला.

१.४ मराठ्यांच्या इतिहास अभ्यासाची परकीय भाषेतील साधने

अ) इंग्रजी भाषेतील साधने :

मराठ्यांच्या इतिहासाच्या युरोपीय साधनापैकी इंग्रजी साधने ही महत्त्वाची साधने मानली जातात. या साधनांची निर्मिती इंग्रजांच्या वेगवेगळ्या कार्याच्या अनुशंगाने झाली आहे. इंग्रजांचे दप्तरखाने, वखारीचे वृत्तांत, इंग्रजानी केलेले करारनामे, वेगवेगळ्या संस्थांचे, प्रवाशांचे वृत्तांत, भेटी, तह, या घटकांच्या कार्याच्या अनुशंगाने ही साधने निर्माण झाली आहेत. अशी ही मराठ्यांच्या इतिहासाची इंग्रजी साधने पुढील प्रमाणे आहेत.

१) वखारीचे वृत्तांत :

वखारीचे वृत्तांत मराठ्यांच्या इतिहासाचे इंग्रजी साधन मानले जाते. इस्ट इंडिया कंपनीच्या सुरत, मुंबई, राजापूर, कारवार, मद्रास, कलकत्ता या ठिकाणी वखारी होत्या. या वखारीना आपापल्या प्रांतातील राजकीय व्यापारी घडामोडी आपल्या मुख्य वखारीना वृतांत रुपाने मुख्य वखारीना कळवाव्या लागत असत. भारतातील मुख्य वखारी आपला वृतांत इंग्लड मधील कंपनीच्या संचालकाना कळवत असत. या वृत्तांतत मराठ्यांचे राजकारण, मराठ्यांच्या हालचाली, मराठ्यांची धोरणे या विषयी अत्यंत मोलाची माहिती असे. इंग्रज व्यापारी ही आपल्या व्यापाराच्या व संरक्षणाच्या दृष्टीकोनातून माहिती जमा करुन त्याचा वृत्तांत कंपनीकडे पाठवत असत. या वृत्तांताचे स्वरुप लिखित असल्याने या वृत्तांताची मोठ्या प्रमाणात कागदपत्रे इंग्रजी साधन रुपात उपलब्ध झाली आहेत. या कागदपत्रांचा कालखंडानुसार तारिखवार इतिहास लिहिण्यासाठी उपयोग झाला आहे.

२) सरकारी दप्तरखाने :

सरकारी दप्तरखान्यात असणारी असंख्य कागदपत्रे मराठ्यांच्या इतिहासाची साधने बनली आहेत. ब्रिटीश शासनाचे लंडन, कलकत्ता, मद्रास, मुंबई येथे दप्तरखाने होते.

मुंबंई येतील दप्तरखान्यात ही कागदपत्रे पहावयास मिळतात. पुणे येथील दप्तरखान्यातील कागदपत्रे पहावयास मिळतात. पुणे येथील दप्तरखान्यातील कागदपत्रे “English Records on Shivaji” या ग्रंथाच्या रुपाने एकत्रीत छापली आहेत. ही कागदपत्रे सन १६५९ ते १६८२ या कालखंडातील आहेत.

‘मद्रास फॅक्टरी रेकॉर्ड’ सुद्धा अनेक खंडात प्रसिद्ध झाला असून या रेकॉर्डचा फायदा शिवाजी महाराजांच्या कर्नाटक हालचाली जाणून घेण्यासाठी फायदा होतो.

लंडनमधील ‘इंडिया ऑफिस’ मधील शेकडो कागदपत्राचे उतारे श्री. वा. सी. बेंद्र यांनी नकलून आणले आहेत. या रेकॉर्डचे २०-२२ खंड भारत इतिहास संशोधक मंडळाच्या ग्रंथालयात आहेत. याच मंडळाने प्रकाशित केलेल्या “शिवकालीन पत्रसार संग्रह” या ग्रंथात या इंग्लिश रेकॉर्डचा मराठी अनुवाद दिला आहे.

पुणे, मुंबई, मद्रास, कलकत्ता व इंग्लड या ठिकाणच्या दप्तरखान्यातून जी शिवशाही बद्दलची माहिती उपलब्ध झाली आहे ती समकालीन कागदपत्राच्या आधारावर असल्याने ही कागदपत्रे मराठ्यांच्या इतिहास समजून देण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरली आहेत. त्यामुळे या कागदपत्रांना महत्त्व प्राप्त झाले आहे.

३) फॉरेन बायॉग्राफीज ऑफ शिवाजी :

बंगाली इतिहास संशोधक व लेखक डॉ. सुरेद्रनाथ सेन यांनी सन १९२७ साली ”Foreign Biographics of Shivaji” हा ग्रंथ संपादन करुन मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनात मोलाची भर टाकली आहे. या ग्रंथाच्या माध्यमातून त्यांनी शिवाजी महाराजांसंबधी केलेल्या लिखानाचा अनुवाद प्रकाशित केला आहे. परकीय लेखकांमध्ये कॉस्मा दि गार्डा, थेवनाट, फ्रांसीस मार्टिन, इत्यादी लेखकांचा समावेश आहे या लेखकांच्या लिखानाच्या अनुवादाच्या या मध्ये समावेश आहे या अनुवादामुळे परकीयांच्या दृष्टीकोनातून शिवाजी महाराजांच्या कार्याची ओळख झाली आहे. या ग्रंथाच्या अनुवादा मध्ये शिवाजी महाराजानी इंगजी व्यापाऱ्यांबरोबर

केलेल्या करारनाम्यांचा व त्यांच्या वकीलांच्या वृत्तांताचा ही समावेश आहे. त्यामुळे या अनुवादाला इतिहास अभ्यासाच्या दृष्टीकोनातून महत्त्व प्राप्त झाले आहे.

४) हिस्टॉरिकल फ्रॅगमेंट:

हिस्ट्रॉरिकल फ्रॅगमेंट हा ग्रंथ रॉबर्ट आर्म यांनी लिहिला आहे. या ग्रंथामध्ये रॉबर्ट आर्म यांनी शिवकालातील घटना कागदपत्राच्या आधारे देण्याच्या प्रयत्न केला आहे. म्हणूनच हा ग्रंथ मराठ्यांच्या इतिहासाचे एक साधन म्हणून महत्त्वपूर्ण ठरला आहे. या ग्रंथाच्या आधारे शिवकाळातील बऱ्याच घटना समजण्यास मदत होते.

५) वकिलांचे वृत्तांत :

शिवकाळात शिवाजी महाराजांना वेगवेगळ्या प्रशासकीय, राजकिय व आर्थिक कामानिमित अनेक इंग्रज वकिल भेटले होते. त्यांनी आपल्या भेटीचे वृत्तांत लिहून ठेवले आहेत हे वृत्तांतसुद्धा इतिहासाचे साधन म्हणून मानले जातात. याचे उत्तम उदाहरण म्हणजे "राजापूर व हुबळीची वखार लुटल्यानंतर नुकसान भरपाई मिळविण्याच्या इराधाने इंग्रजानी डस्ट्रिक, थॉमस निकोलस या आपल्या वकिलांना शिवाजी महाराजांकडे पाठविले होते. राज्याभिषेका प्रसंगी ऑकिझडेन यांने सन १६७४ मध्ये रायगडावर येवून शिवाजी महाराजांची भेट घेतली होती या भेटीचा वृत्तांत या इंग्रज वकिलांनी लिहून ठेवला आहे या वृत्तांताचा उपयोग मराठ्यांच्या इतिहास लेखनासाठी झाला आहे."

१) इतर साधने :

मराठ्यांच्या इतिहासाच्या इंग्रजी साधनांचा विचार करता तंजावर येथील सरस्वती महाल ग्रंथालयातील साधने, मद्रास येथील 'मॅकेझी संग्रह' अनेक अप्रकाशीत साधने, बारनिशी, रोजनिशी, तहनामे करारनामे या साधनांचा उपयोगही मराठ्यांच्या इतिहास लेखनासाठी झाला आहे.

मराठ्यांच्या इहिासाच्या इंग्रजी साधनांचा आढावा घेत असताना आपण सर्वप्रथम वखारीचे वृत्तांत, सरकारी दप्तरखान्यांची माहिती, इंग्रज लेखकांचे ऐतिहासिक ग्रंथ, इंग्रजी ग्रंथाचे अनुवाद, वकिलांचे वृत्तांत, तसेच वेगवेगळ्या प्रकारच्या तहांची, करारांची, वृत्तांतांची व प्रकाशित – अप्रकाशित साधनांची माहिती पाहिली. ही सर्व साधने समकालीन आहेत. या साधनांचे निर्माते त्यांचे त्या घटनांबरोबर आलेले प्रत्यक्ष संबध तसेच त्यांनी त्या घटनांचा घेतलेला अनुभव या सर्व गोष्टींमुळे त्यानी निर्माण केलेल्या या साधनांना महत्त्व आहे. मात्र त्यांनी ज्या दृष्टीकोनातून ही साधने निर्माण केली आहेत तो दृष्टीकोन योग्य होता की अयोग्य हे त्या साधनांचा उपयोग करत असताना तपासणे आवश्यक आहे.

मराठ्यांच्या कालखंडात अनेक इंग्रज लेखकाने, वकिलाने, प्रशासकीय अधिकाऱ्याने, प्रशासकीय कंपन्याने आपल्या कार्याच्या अनुशंगाने कागदपत्रे तयारी केली आहेत. ही कागदपत्रे समकालीन असल्याने या कागदपत्रांना महत्त्व आहे. मात्र परिसरांचे, ठिकाणांचे, चालीरितीचे, नावांचे अचूक ज्ञान नसल्याने त्यांच्या लिखानात अनेक ठिकाणी चूका आढळतात. त्याने केलेल्या लिखानाचे प्रचलीत घटनेपेक्षा वेगळेच अर्थ निघतात. म्हणूनच अशा या लिखानाचा उपयोग साधन या नात्याने करत असताना दक्षता घेणे आवश्यक आहे. असे जरी असले तरी मराठ्यांच्या इतिहासाच्या इंग्रजी साधनांच्या बाबतीत बा. सी. बेंद्र यांनी असे म्हटले आहे की,

muinotes.in

"बारकाईने माहिती मिळवून ती तपशिलवार व क्रमवार सांगण्याची पद्धती शास्त्रशुद्ध होती. इंग्रजी दप्तरखान्यातील समकालीन साधने अस्सल आहेत".

ब) फ्रेंच भाषेतील साधने

मराठ्यांच्या इतिहासाच्या युरोपीय साधनांपैकी दुसरी महत्त्वपूर्ण साधने म्हणजे फ्रेंच साधने होय. इंग्रजाप्रमाणे फ्रेंचाच्याही भारतात वखारी होत्या. वखारींचया प्रशासकीय कामाच्या निमित्ताने फ्रेंचानी आपल्या मायदेशात अनेक पत्र लिहिली आहेत. या पत्रांचा उपयोग या इतिहासाच्या संदर्भ साधनासाठी झाला आहे. फ्रेंचानी हिंदुस्थानातील राजकर्त्यांना लिहिलेली पत्रे, अधिकाऱ्यांना लिहिलेली पत्रे, सरदारांना लिहिलेली पत्रे या सर्व पत्रांचा समावेश इतिहास अभ्यासाच्या साधनात झाला आहे.

मराठ्यांच्या इतिहासाच्या दृष्टीने उपयुक्त असणारी फेंच साधने पॅरिस व लंडन येथील दप्तरखान्यात आहेत.

फेंच गव्हर्नर मार्टिन यांने लिहिलेली 'रोजनिशी' हे फ्रेंच साधन मराठ्यांच्या इतिहासाचे एक महत्त्वपूर्ण साधन मानले जाते. या रोजनिशीचे इंग्रजी भाषांतर सर जदूनाथ सरकार यांनी प्रसिद्ध केले आहे. या रोजनिशीच्या अभ्यासाद्वारे मराठ्यांच्या कर्नाटकातील हालचालींचा अभ्यास समजू शकतो. या व्यतिरिक्त शिवाजी महाराजांची कर्नाटक स्वारी व राजारामांच्या राजवटीतील जिंजीचा वेढा याची उत्तम माहिती या साधनाद्वारे आपणास समजण्यास मदत होते.

फ्रेंच प्रशासकीय कार्यच्या अनुशंगाने फ्रेंचानी अनेक कागदपत्रांची निर्मिती केली आहे. या कागदपत्रात पत्रे, करारनामे, वृत्तांत, अनुवाद, रोजनिशी या कागदपत्रांचा समावेश आहे. या सर्व प्रकाशित व अप्रकाशित कागद पत्राचा वापर करुन प्रसिद्ध इतिहास संशोधक डॉ. हताळकर यांनी "Relation between the French and the Marathas" (1668-1885) हा उत्कृष्ट ग्रंथ लिहिला आहे. हा ग्रंथ अत्यंत उपयुक्त असून मराठ्यांच्या इतिहासाचे एक महत्त्वपूर्ण साधन ठरला आहे.

क) डच भाषेतील साधने

मराठ्यांच्या इतिहास अभ्यासाच्या दृष्टीकोनातून उपयुक्त असणारी तिसरी महत्त्वपूर्ण साधने म्हणजे डच साधने होय. डच साधने ही वखारीचे वृत्तांत, डच प्रवाशांची वर्णने, वेगवेगळ्या प्रशासकीय कार्याच्या अनुशंगाने आलेली व पाठवलेली पत्रे, दप्तरखान्यांची कागदपत्रे, या रुपाने उपलब्ध आहेत. या साधनांची माहिती पुढील प्रमाणे आहे.

१) वखारीचे वृत्तांत :

हिंदूस्थानामध्ये इंग्रजाप्रमाणे डंचाचीही वखारी होत्या. मच्छलीपट्टण, सुरत, वेंगुर्ला, मलबार ही डचांच्या वखारीची ठिकाणे होती. या वखारींचा शिवकालाबरोबर संबध होता. वखारीनी आपल्या वृत्तांतात शिवकालीन घटनांचा बऱ्याचवेळा उल्लेख केला आहे. या वृत्तांताचा उपयोग मराठ्यांच्या इतिहास समजण्यास मदत होतो.

२) व्यापाऱ्याचे वृत्तांत :

डच व्यापारी दक्षिण कर्नाटकात बरेच दिवस व्यापार करत होते. त्यांनी व्यापार करत असतांना व्यापाराच्या प्रशासकीय कार्याच्या अनुशंगाने बरीच माहिती जमा केली होती. या पैकी काही

माहिती त्यानी लिखीत स्वरुपात जमा केली होती. या सर्व माहितीच्या आधारे मराठ्यांच्या इतिहास समजण्यास मदत झाली आहे.

३) दप्तरखान्यातील माहिती :

डचाने आपला दप्तरखाना आमस्टरडम शहरी वेस्ट इंडियन स्कॉलर्स येथे संकलीत केला होता. पुढे हा दप्तरखाना हेगला येथे नेण्यात आला. नंतर मिडलब्रगचा दप्तरखानाही हेगला येथे नेण्यात आला. या दप्तरखान्यात व्यापारविषयक कागदपत्रे, जमाखर्चाची कागदपत्रे, हकिकतीचे अहवाल, राजांबरोबर झालेले तह, करारनामे इत्यादी प्रकारची कागदपत्रे आहेत. या कागदपत्रापैकी डचांनी व्यापार विषयक कागदपत्रांचा नाश केला. मात्र जमाखर्चाची कागदपत्रे निट जोपासली आहेत. डचानी जमाखर्चाची कागदपत्रे १९२३ पर्यंत तारीखवार निट लावून ठेवली आहेत.

त्यांनी १९३४ नंतरची कागदपत्रे स्थळवारीने म्हणजे सुरत, करोमांडल, मलबार वगैरे स्थळांच्या नावाने लावली आहेत. डचांच्या कागदपत्रात हिंदुस्थान विषयक कागदपत्रांचा समावेश असून या कागदपत्रांच्या संग्रहात ५६४ बंडल अथवा दप्तरे हिंदुस्थान विषयक आहेत. लिस्बन, एव्होरा, गोवा येथेही डच साधने असल्याचे समजते. डचाची साधने ही जास्त प्रमाणात अनुवादीत झाली नाहीत ही जर साधने अनुवादीत झाली तर शिवशाहीच्या इतिहासात मोलाची भर पडेल.

४) डाग रजिस्टर :

डच साधनातील महत्त्वाचा पत्रव्यवहार 'डाग रजिस्टर' नावाने प्रकाशित झाला आहे. डाग रजिस्टरचे बरेच ग्रंथ प्रकाशित झाले असून या ग्रंथात सन १६४० ते १८०७ पर्यंतचे अहवाल छापले आहेत. या ग्रंथातून हिंदूस्थान विषयक बरीच माहिती मिळते.

५) इतर प्रकाशित माहिती :

डाग रजिस्टर व्यतिरिक्त इतर नामवंत व्यक्तीने आपल्या लेखनाच्या माध्यमातून बरीच माहिती प्रकाशित केली आहे. या माहिती प्रकाशित करणाऱ्या लेखाकांमध्ये ड जंग व एल. व्हान डिवेंटर यांचा समावेश आहे.

ड नंग यानी सन १५९५ ते १६१० पर्यंतचा डच लोकांचा हिंदुस्थानातील पत्रव्यवहार प्रकाशित केला आहे. तर एल. व्हान. डिवेंटर यांनी सन १६१० ते १८२० पर्यंतचा डच लोकांचा हिंदूस्थानातील पत्रव्यवहार प्रकाशित केला आहे.

रेव्हरंड हेरॉस यांने अनेक डच कागदपत्रांचा इंग्रजी अनुवाद केला हे. या व्यतिरिक्त अनेक प्रवाशांच्या प्रवासवृत्तांताचे ग्रंथ व डच ईस्ट इंडिया कंपनीच्या सफरीच्या वर्णनांची पुस्तके इंग्रजीत भाषांतरीत केलेली आढळतात. लंडन येथील इंडिया ऑफिसमध्ये जी डच साधने आहेत ती 'हेग ट्रान्सक्रिप्टस' म्हणून ओळखली जातात. यातील बराच भाग इंग्रजीत भाषांतरीत झाला आहे.

डच साधनांचे परिक्षण करतांना वा. सी. बेंद्र म्हणतात, "या ऐतिहासिक साधनांचे महत्त्व असे आहे की, ज्या कालनिर्देशाच्या अभावी मराठ्यांच्या इतिहास विस्कळीत व त्रुटीत होवून राहिला आहे त्या कालनिर्देशाला ही साधने महत्त्वाची ठरतात. यातील दक्षिण कर्नाटकातील माहिती समकालीन व स्थानिक असल्याने महत्त्वाची आहे. या डच लोकांना स्थानिक माहितीचा अहवाल

लिहिण्याा परिपाठ होता. त्यासाठी ते स्वतंत्र माणूस नेमत असत. त्यांच्या लेखनातील अहवालात मराठ्यांच्या इतिहासातील दुर्घट परंतू अज्ञात स्थळे उकलण्यास योग्य अशी माहिती मिळू शकते''.

मराठ्यांच्या इतिहास अभ्यासाच्या साधनांचा आढावा घेताना सर्व प्रथम आपण डच साधनातील वखारीचे वृत्तांत, व्यापाऱ्यांचे वृत्तांत, दप्तरखान्यातील माहिती, डाग रजिस्टरची माहिती, इतर प्रकाशित साधनातील लेखकांच्या लिखानांची माहिती, आदी बाबत माहिती पाहिली या माहितीचे सहसंबध डच व हिंदूस्थानातील तत्कालीन सत्तेबरोबर आढळून आल्याचे जाणवते. ही माहिती समकालीन असल्याने मराठ्यांच्या इतिहास अभ्यासाचे एक साधन म्हणून या माहितीचा आधार घेतला जातो.

ड) पोर्तुगीज भाषेतील साधने

मराठ्यांच्या इतिहासाच्या युरोपिय साधनापैकी पोर्तुगीज साधने महत्त्वाची मानली जातात. हिंदुस्थानच्या राजकारणात सक्रीय सहभागी होवून आपले राज्य हिंदूस्थानात स्थापन करणारे पोर्तुगीज हे पहिले युरोपियन होते. त्यांनी हिंदूस्थानमध्ये गोवा, दमण, दिव, साष्टी या ठिकाणी वर्चस्व मिळवून सत्ता स्थापन केली होती. मराठै पोर्तुगीजाच्या जवळचे शेजारी सत्ताधीश होते. शिवाजी महाराजांच्या साम्राज्याच्या सीमा पोर्तुगीजांच्या सरहद्दीपर्यंत जावून पोहचल्या होत्या. त्यामुळे पोर्तुगीजांच्या कागदपत्रात मराठ्यांच्या राजकारणाचे पडसाद उमटणे स्वाभाविकच होते.

१) दप्तरखान्यातील साधने :

पोर्तुगीजांची मराठ्यांच्या इतिहासाशी संबधी असणारी हजारो कागदपत्र गोवा व पोर्तुगालमध्ये लिस्बन येथे असणाऱ्या दप्तरखान्यामध्ये आहेत. या दप्तरखान्यामध्ये पोर्तुगीज व्हाईसरॉयने आपल्या राजास लिहिलेली पत्रे, मराठा व मोगल सरदारांना लिहिलेली पत्रे, आपल्या मंडळाच्या ठरावासंबधीची कागदपत्रे, मासिक व वार्षिक अहवाले, पोर्तुगीज राजाकडून व्हाईसरॉयला आलेली पत्रे आम्ही साधनांचा समावेश आहे. पोर्तुगीजांचे गोवे येथील दप्तर अत्यंत महत्त्वाचे असून हे दप्तर जणू मराठ्यांच्या ऐतिहासिक साधनांचे आगर मानले जाते. या दप्तराची व्यवस्था निट लावण्यात आली आहे. तसेच हे दप्तर सुव्यवस्थित अवस्थेत आहे.

२) ग्रंथ :

मराठ्यांच्या इतिहासाच्या ग्रंथरुपी साधनाचा विचार करत असताना आपणास इतिहास संशोधक डॉ. पांडुरंग पिसुर्लेकराच्या ग्रंथाच्या विचार करावा लागेल. त्यांनी पोर्तुगीज भाषेत मराठ्यांच्या इतिहासावर अनेक ग्रंथ लिहिले आहेत. त्यांचा पुणे विद्यापीठाने प्रकाशित केलेला ''पोर्तुगीज मराठा संबध'' हा मराठीतील ग्रंथ या संदर्भात महत्त्वाचा आहे.

३) कागदपत्र व त्यांचे प्रकाशन :

मराठ्यांच्या इतिहासाच्या संदर्भात अनेक कागदपत्रांचे प्रकाशन झाले आहे. गोव्याचे पुराणवस्तू संशोधन विभागाचे प्रमुख ब्रागास परेरा यांनी पोर्तुगीज कागदपत्राचे अनेक खंड प्रकाशित केले आहेत. या कागदपत्रांचा मराठी अनुवाद ''महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने'' मराठ्यांच्या इतिहासाची साधने पोर्तुगीज दप्तर नावाने दोन खंडात प्रकाशित केला आहे. हा अनुवाद प्रसिद्ध पोर्तुगीज पंडित व संशोधक श्री. स. रा. देसाई यांनी केला आहे. शिवाजी विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या ''ताराबाइकालीन कागदपत्रे'' या साधन ग्रंथात हि श्री. देसाईनी

अनुवादीत केलेली अनेक पोर्तुगीज पत्रे छापली आहेत. त्यामुळे मराठ्यांच्या इतिहासाच्या अभ्यास सखोल पद्धतीने होण्यास मदत झाली आहे.

४) संस्थांच्या संग्रहातील साधने :

लिस्बन येथे 'ॲकेडेमिक रिऊल देस सायान्सिस' ही संस्था आहे. या संस्थेत मराठ्यांच्या इतिहासास उपयोगी पडणारी काही साधने आहेत. या संस्थेने प्रकाशित केलेल्या साधन ग्रंथात सन १६४९ ते १६७७ पर्यतच्या हिंदूस्थानची ऐतिहासिक माहिती देणाऱ्या ऐतिहासिक साधनांचा समावेश आहे.

५) लिस्बन व एव्होरा येथील साधने :

पोर्तुगीजाची साधने ही जास्त प्रमाणात लिस्बन न एव्होरा या ठिकाणी आहेत. एव्होराच्या पब्लीक लाथब्ररीत पोर्तुगीज कागदपत्रांचा बराच संग्रह आहे. या संग्रहातूनच रिव्हेरा यांने 'अर्काइव्ह पोर्तुगीज ओरिएंटल' या नावाने सहा साधने ग्रंथ तयार केले आहेत.

लिस्बन येथील सरकारी दप्तरखान्यात एकुण १२४६५ पत्र उपलब्ध असून या पत्रांपैकी बरीच पत्रे प्रकाशित झाली आहेत. या दप्तरखान्यात 'पोबल कलेक्शन' या नावाने हिंदूस्थान विषयक जास्त प्रमाणात माहिती सापडते. ही साधने १६०३ ते १८२३ या कालखंडातील आहेत.

मराठ्यांच्या इतिहास अभ्यासाच्या पोर्तुगीज साधनांचा आढावा होत असतांना आपण दप्तरखान्यातील साधने, पोर्तुगीज ग्रंथ, पोर्तुगीज कागदपत्र, पोर्तगीज कागदपत्रांची प्रकाशने, वेगवेगळ्या संस्थांनी निर्माण केलेली कागदपत्रे, वेगवेगळ्या ठिकाणांची कागदपत्रे, लेखकांनी अनुवादीत केलेले ग्रंथ व कागदपत्रे आदीबाबत माहिती पाहिली. भारतातील पहिले परकिय सत्ताधीश, समकालीन सत्ताधीश तसेच भारतीय राजकारणाबरोबर आलेले त्यांचे नजिकचे संबध व त्यांच्या लगतच्या सरहद्दी या सर्व बाबीमुळे त्यांनी निर्माण केलेली कागदपत्रे ही जास्त प्रमाणात विश्वसनीय वाटत. या कागदपत्राच्या आधारे मराठ्यांच्या इतिहासाला बऱ्याच प्रमाणात प्रकाशात आणण्यास मदत झाली आहे.

१.५ परकीय प्रवाशांचे लिहिलेले वृत्तांत

मराठ्यांच्या इतिहासाच्या परकीय भाषेतील साधनापैकी परकीय प्रवाशांच्या वृत्तांताना परकीय साधने म्हणून अग्रक्रम देण्यात आला आहे. १७ व्या शतकात भारतात ३० हून अधिक परकीय प्रवासी आले होते. हे परकीय प्रवासी वेगवेगळ्या कारणास्तव भारतात आले होते. कोण व्यापारी कामाच्या निमित्ताने, कोण वैद्यकीय कार्याच्या निमित्ताने, कोण धार्मिक कार्याच्या निमित्ताने तर कोण लष्करी कार्याच्या निमित्ताने भारतात आले होते. तर काही सह प्रवासी भिन्न-भिन्न कारणाच्या निमिताने भारतात आले होते. या परकीय प्रवाश्यांच्या प्रवासवृत्तांतातून मराठ्यांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीची जास्त प्रमाणात माहिती मिळते. ही प्रवास वृत्तांते समकालीन मराठ्यांच्या इतिहास समजून घेण्यास अत्यंत उपयुक्त आहेत. या प्रवाशानी आपल्या वृत्तांतातील माहिती शास्त्रशुद्ध कालनिर्देश करुन देण्याचा प्रयन्न केला आहे. तत्कालीन लोकांची भाषा, पोषाख, सवयी, दैनंदिन जीवन, बाजारभाव, सामाजिक सुखसोयी, प्रवासातील अडचणी, अदिकाऱ्यांच्या वर्तनूकी, दळणवळणाची साधने, मजुरीचे दर इत्यादी बाबी विषयीचा माहिती त्यांनी आपल्या प्रवास वर्णनात देण्याच्या प्रयत्न केला आहे. इतिहास अभ्यासकांना या वृत्तांताचा चांगला उपयोग झाला आहे.

muhots.in

१७ व्या शतकात जरी भारतात ३० परकीय प्रवासी आले असले तरी या काळात फक्त मोजकेच प्रवासी महाराष्ट्रात येवून गेले आहेत. त्यामुळे या प्रवाशांकडून महाराष्ट्राबाबत त्रोटक माहिती मिळते. तरी पण ही माहिती इतिहास अभ्यासाच्या दृष्टीकोनातून अत्यंत उपयुक्त आहे. महाराष्ट्रात १७ व्या शतकात जे प्रवासी येवून गेले त्यांच्या बाबतची माहिती पुढील प्रमाणे आहे.

१) डॉ. जॉन फ्रायर :

डॉ. जॉन फ्रायर हा इंग्रज प्रवासी होता. तो ईस्ट इंडिया कंपनीचा सर्जन होता. तो इस्ट इंडिया कंपनीच्या वतीने या विभागाचे काम पहात होता. त्याचे हिंदूस्थानात १६७२ ते १६८१ पर्यंत वास्तव्य होते. कार्याच्या अनुशंगाने त्याचा संबंध महाराष्ट्राबरोबर आला होता. त्याने आपल्या कार्याला अनुसरुन मुंबई, रायगड, जुन्नर, वेंगुर्ला आणि कारवार या ठिकाणांना भेटी दिल्या होत्या. या व्यतिरिक्त त्यांनी गोवा, गोकर्ण या ठिकाणांनाही भेटी दिल्या होत्या. या सर्व ठिकाणाबाबतचे वर्णन त्यांनी आपल्या प्रवासवर्णनात केले आहे.

विशेष म्हणजे शिवाजी महाराजांच्या राज्यभिषेक प्रसंगी तो रायगडावर हजर होता. त्यांनी तो आपला प्रवास वृत्तांत लिहिला आहे तो सन १७७३ साली,"Travels in India in the 17th century" या पुस्तकात प्रकाशित करण्यात आला आहे.

त्यांच्या या वृत्तांतात तत्कालीन महाराष्ट्रातील लोकांचे पोषाख कसे होते, त्यांच्या आहाराच्या पद्धती कशा होत्या, मराठ्यांच्या राजदरबाराच्या पद्धती कशा होत्या, तत्कालीन मुंबई व वसई ही शहरे कशी होती. या बाबतची माहिती आहे. या सर्व बाबबरोबरच त्यांने पाहिलेला शिवराज्याभिषेक व त्याचे त्यांने आपल्या प्रवासवृत्तांतात केलेले वर्णन हा भाग महत्त्वाचा मानला जातो.

२) निकोलस मनुची :

निकोलस मनुची हा इटालीयन प्रवासी होता. तो १७ व्या शतकात म्हणजे सन १६५६ मध्ये भारतात आला होता. १६५६ ते १७१७ असा त्याचा भारतातील वास्तव्याचा कालखंड होता. आपल्या वास्तव्य कालखंडात तो संपूर्ण हिंदूस्थानात फिरला. या कालखंडात त्याने अनेक ठिकाणी नोकऱ्या केल्या. त्याने या कालखंडात हिंदूस्थानात जे पाहिले, ऐकले व अनुभवले ते त्यांनी आपल्या प्रवास वृत्तांतात लिहिले. त्यांने आपला हा वृत्तांत "storia Do Mogar" या नावाने प्रसिद्ध आहे. हा वृत्तांत पोर्तुगीज व फ्रेंच भाषेत प्रसिद्ध आहे. निकोलस मनुचीच्या या वृत्तांताचे इंग्रजी भाषांतर आयर्विन या इंग्रज पंडिताने केले आहे. तर महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळाने हा वृत्तांत मराठीत "असे होते मोगल" या नावाने प्रसिद्ध केला आहे. निकोलस १६५६ मध्ये भारतात वास्तव्यासाठी आला होता. त्याचा मृत्यु १७१७ मध्ये झाला. याचा अर्थ असा होता की त्याने जे जे भारतात अनुभवले, पाहिले, ऐकले ते त्यांनी आपल्या लिखानातून भारतामध्येच प्रतिबिंबित केले हे स्पष्ट होते. म्हणूनच मराठ्यांच्या इतिहास अभ्यासाच्या दृष्टीने निकोलसचा हा वृत्तांत महत्त्वाचा ठरला आहे.

डॉ. जॉन कॅरेरी :

डॉ. जॉन जेमिली कॅरेरी हा इटालीयन वैद्यक शास्त्रज्ञ होता. त्याने या कालखंडात वसई, घोडाबंदर, कान्हेरी, चौल, दाभोळ, फोंडा, चिक्कोडी, मुधोळ, बेळगाव या गावांना व शहरांना

भेटी दिल्या होत्या. या गावासंबधी व शहरांसंबधी तसेच तेथील सामाजिक व आर्थिक परिस्थिती संबधीची माहिती त्यांने आपल्या प्रवास वृत्तांतात दिली आहे. या वृत्तांतातून या परिसरात भौगोलिक परिस्थिती शहरांची, गावांची रचना, लोकांचे जीवनमान, लोकांची आर्थिक परिस्थिती आदीबाबतची माहिती मिळते.

३) अबे कॅरे :

अबे कॅरे हा फ्रेंच प्रवासी होता. तो सन १६८८ मध्ये भारतात आला होता. त्यांनी महाराष्ट्राच्या कोकण प्रांतास भेटी दिल्या होत्या. तो चिकित्सक होता. त्यांनी आपल्या प्रवास वर्णनात घटनांची व कालखंडाची अचूक नोंद केली आहे. अचूक नोंदी करणारा अभ्यासू व चिकित्सक वृत्तीचा प्रवासी अशी त्याची ख्याती होती. त्याच्या प्रवासवर्णनातून शिवाजी व संभाजी महाराजांच्या कारकिर्दी विषयी बरीच माहिती मिळते. त्यांने आपल्या प्रवास वृत्तांतात शिवाजी महाराजांचे वर्णन "One of the greatest man, the east has never seen" असे केले आहे. त्यांने आपल्या सहा वर्षाच्या प्रवासवर्णनात जे जे अनुभव अनुभवले ते अनुभव अभ्यासपूर्ण वृत्तीने आपल्या प्रवास वर्णनात नमुद केले आहेत. शिवाजी महाराजांबद्दलच्या अनेक हकीकतीचे वर्णन घटना परिस्थिती व तारखाना अनुसरुन अचूक मांडल्या आहेत. मराठ्यांच्या इतिहास अभ्यासाच्या दृष्टीकोनातून त्याच्या या वर्णनाला महत्त्व आहे.

४) थेवेनॉट :

थेवेनॉट हा फ्रेंच प्रवासी होता तो हिंदूस्थानात १६६५ ते १६६८ या कालखंडात प्रवासाच्या निमित्ताने आला होता. त्यांने आपल्या प्रवासकाळात औरंगाबाद, दौलताबाद, वेरुळ, अजिंठा, भागानगर, सुरत या ठिकाणांना भेटी दिल्या होत्या. त्याला भूगोलाचे चांगले ज्ञान होते. त्याच्या प्रवासवर्णनातून या ठिकाणाच्या तत्कालीन भौगोलिक परिस्थितीची माहिती मिळते. त्याच बरोबर या ठिकाणच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीची माहिती मिळण्यास मदत होते. थेवेनॉटच्या प्रवासवर्णनात अनेक चूका आहेत. असे जरी असले तरी त्यांनी लिहिलेली सर्वच माहिती चूकीची नव्हती. म्हणून एक साधन या नात्याने या प्रवास वर्णनाला महत्त्व आहे. थेवेनॉट सुरत या ठिकाणी शेवटच्या वास्तव्यात होता. नंतर तो सुरतहून प्रर्शियाकडे परत गेला.

५) फ्रॅन्सिस मार्टिन :

फ्रान्सिस मार्टिन हा फ्रेंच प्रवासी होता. तो फ्रेंच कंपनीतील अधिकारी होता. त्यांनी आपल्या प्रवास वर्णनात शिवाजी महाराजांच्या कर्नाटक मोहिमेची सविस्तर माहिती दिली आहे. या व्यतिरिक्त त्याच्या प्रवासवर्णनातून आपणास शिवाजी महाराजांच्या लष्करी मोहिमांची माहिती मिळण्यास मदत होते. फ्रॉन्सिस मार्टिनने आपल्या प्रवास वर्णनात शिवाजी महाराजांच्या लष्कर व्यवस्था, प्रशासन व्यवस्था या बाबतची माहितीही नमुद केली आहे. परिणामी त्याच्या या प्रवासवर्णनातून शिवाजी महाराजांबद्दलची माहिती जाणून घेण्यास मदत होते.

६) कॉस्मा – डा – गुर्डा :

कॉस्मा-डा-गुर्डा फेंच लेखक होता. तो हिंदुस्थानात १६९५ मध्ये आला होता. त्याच्या लिखानातून आपणास तत्कालीन चलनव्यवस्था, नाणी, मराठ्यांचे लष्करी संघटन, सैन्याला मिळणारी वागणूक, महाराष्ट्रातील राजा व प्रजा यांचे संबध इत्यादी बाबतची महत्त्वपूर्ण माहिती

मिळते. त्याच्या लिखानात अपूर्णता जाणवते मात्र असे जरी असले तरी एक साधन या नात्याने त्याच्या लिखानाला महत्त्व आहे.

मराठ्यांच्या इतिहास अभ्यासाच्या दृष्टीने परकीय प्रवाशांच्या प्रवासवृत्तांताचा आढावा घेत असताना आपण परकीय प्रवासी डॉ. जॉन फ्रायर, निकोलस मनुची, डॉ. जॉन जेमिली कॅरेरी, अबे. कॅरे, थेवेनॉट, फ्रॉन्सिस मार्टिन, कॉस्मा-डा-गुर्डा यांच्या प्रवास वृत्तांताची माहिती पाहिली.

या सर्वच परकीय प्रवाशांच्या प्रवास वर्णनातून आपणास तत्कालीन राजकिय, सामाजिक, आर्थिक, भौगोलिक व प्रशासकिय परिस्थिती कशी होती यांची माहिती उपलब्ध झाली आहे.

हे सर्वच प्रवासी जरी वेगवेगळ्या कामानिमित्त हिंदूस्थानात आले असले तरी त्यांनी लिहून ठेवलेले वृत्तांत इतिहासाचे साधन म्हणून उपयुक्त ठरले आहे. त्याच्या लिखानात आत्मप्रौढी जास्त दिसते. त्यांनी हिंदूस्थानच्या तत्कालीन सर्वांगीण परिस्थितीवर टीका केल्याचेही आढळते. पौरात्य संस्कृतिच्या चालीरितीवर उपाहासात्मक लिखान केल्याचेही आढळते. मात्र त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेली वस्तुस्थिती, तिचे त्याने केलेले वर्णन वर्णनातील सहजता, वर्णनातील शुद्धता, चांगली आहे. त्यांनी केलेले आपल्या प्रवासवर्णनातील निसर्गरचनेचे वर्णन, पशुपक्षांची माहिती, वनस्पती व जंगलांची माहिती फार महत्त्वाची आहे. वजन, मापे, व चलनपद्धतीचे वर्णन त्यांनी अत्यंत बारकाईने केले आहे. परिणामी इतिहास अभ्यासाच्या दृष्टीने या वर्णनाना महत्त्व आहे.

आपली प्रगती तपासा

१) मराठ्यांच्या इतिहासाभ्यासाठी उपयुक्त कागदपत्रांची माहिती तपासा.

२) मराठ्यांच्या इतिहास अभ्यासाच्या परकीय भाषेतील साधनांची माहिती जाणून घ्या.

३) मराठ्यांच्या इतिहास अभ्यासाच्या दृष्टीकानेातून उपयुक्त ठरलेल्या परकीय प्रवाशांच्या वृत्तांताची माहिती जाणून घ्या.

१.६ सारांश

मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांचा या प्रकरणात आपण आढावा घेतला आहे. मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनाचे दोन भागात विभाजन करण्यात आले आहे. हे दोन भाग मराठ्यांच्या इतिहासाची भारतीय साधने व मराठ्यांच्या इतिहासाची परकीय साधने असे आहेत.

या प्रकरणात आपण मराठ्यांची भारतीय साधने आभ्यासली आहेत. भारतीय साधनांचे आपण एकूण चार भागात विभाजन केले आहे हे विभाजन मराठ्यांच्या इतिहासाची मराठी साधने, संस्कृत साधने, हिंदी साधने व फारशी साधने असे आहे.

या साधना पैकी मराठी, संस्कृत व हिंदी साधने ही जास्त प्रमाणात मराठेशाहीशी संबधीत असणारे हिंदू कवी, लेखकांनी निर्माण केल्याचे दिसून येते. मात्र फारशी साधनावर जास्त प्रमाणात मुस्लीम लेखक कवीचा प्रभाव जाणवतो.

या कालखंडातील बहुतांशी कवी लेखक हे दरबारी असल्याने या लेखनात स्वामीनिष्ठा जाणवतात. मात्र या लेखकांचा समकालीन अस्तित्वाचा भाग जर लक्षात घेतला तर बऱ्याच लेखक, कवीने या साधनाद्वारे वास्तविकता दर्शवील्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

munotes.in

ही जी साधने निर्माण केली आहेत. या साधनाना पुर्णत्व प्राप्त झाले नव्हते. मात्र राजवाडे, जदूनाथ सरकार, सेतू माधवराव पगडी, खरे या लोकांनी नंतर या साधनांचा वस्तुनिष्ठ स्वरुपात अभ्यास केला व या साधनाना वस्तुनिष्ठ स्वरुप प्राप्त करुन दिले. म्हणूनच आपण आज मराठ्यांचा वैभवसंपन्न राजकीय इतिहास समजू शकलो. या साधनांच्या आधारे मराठ्यांचा इतिहास लिहिला गेल्याने इतिहास अभ्यासाच्या दृष्टीने या साधनांचे महत्त्व आपण नाकारु शकत नाही. मराठ्यांच्या इतिहासाच्या युरोपीय साधनांचा विचार करत असतांना सर्व प्रथम आपण इंग्रज साधने, फ्रेंच साधने, डच साधने व पोर्तुगीज साधने या साधनांचा अभ्यास केला. ही साधने जरी परकियांनी निर्माण केली असली तरी ती समकालीन आहेत. या समकालीन साधनाचा आधार इतिहास अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे.

इंग्रजी साधनातील दप्तरखान्यातील कागदपत्रे इंग्रजांच्या वखारीचे वृत्तांत, ऐतिहासिक ग्रंथ, वकिलांचे वृत्तांत, ग्रंथाचे कागदपत्रांचे अनुवाद रोजनिशी, तह करारनामे यांची माहिती ही सर्व साधने मराठ्यांच्या इतिहासाची लिखीत स्वरुपाची समकालीन संदर्भ साधने ठरली आहेत. या सर्व साधनांची निर्मिती जरी त्यांनी केली असली तरी त्या साधनामध्ये पूर्णत: त्यांचा दृष्टीकोन एकांगी नव्हता तर काही ठिकाणी त्यांनी हिंदूस्थानातील वास्तविक परिस्थितीही रेखाटली आहे.

या प्रवास वर्णन कर्त्यानी तेव्हाच्या हिंदूस्थानच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, प्रशासकीय व भौगोलिक परिस्थितीवर प्रत्यक्ष – अप्रत्यक्ष दृष्टीक्षेप टाकण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या प्रवासवर्णनातील परिसर, ठिकाणे, घटना, कालखंड, घटनांचे सह-संबध, या आधारे मराठ्यांच्या इतिहासाला एक वेगळीच दिशा प्राप्त झाली आहे. या सर्व माहितीवरुन ही साधने महत्त्वाची होती हे स्पष्ट होते.

१.७ प्रश्न

१) मराठ्यांच्या इतिहासाच्या मराठी साधंनाचा आढावा घ्या.

२) मराठ्यांच्या इतिहासाच्या संस्कृत साधनांची माहिती लिहा.

३) मराठ्यांच्या इतिहासाच्या फारशी साधनांचे परिक्षण करा.

४) मराठ्यांच्या इतिहासाच्या कागदपत्रांच्या संकलन व संपादन प्रक्रियेचा आढावा घ्या

५) मराठ्यांच्या इतिहास अभ्यासाच्या परकीय साधनांचा आढावा घ्या.

६) परकीय प्रवाशांची प्रवास वर्णने मराठ्यांच्या इतिहास समजून देण्यासाठी कशी उपयुक्त ठरतात उदाहरणासह स्पष्ट करा.

१.८ संदर्भ

१) मराठ्यांचा इतिहास – प्रा. डॉ. श. गो. कोलारकर

२) मराठ्यांचा प्रशासकीय, सामाजिक व आर्थिक इतिहास – प्रा. बी. एस. सावंत प्रा. जाधव

३) मराठेकालीन संस्था व विचार – गायकवाड, सरदेसाई, थोरात, हनमाने

4) Shivaji and his times – J. N. Sarkar

5) Shiva Chhatrapati – S. N. Sen

६) मराठ्यांच्या इतिहासाची साधने. खंड - ४ – वि. का. राजवाडे

७) मोगल आणि मराठे – सेतू माधवराव पगडी

8) Shivaji and his times – J. N. Sarkar

9) Shiva Chhatrapati – S. N. Sen

१०) साधन चिकित्सा – वा. सी. बेंद्रे.

❖❖❖❖

munotes.in

२

भौगोलिक घटकांचा मराठ्यांच्या सामाजिक, आर्थिक जीवनावरील प्रभाव

घटक रचना:

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रस्तावना

२.२ महाराष्ट्राची भौगोलिक वैशिष्ट्ये

२.३ भौगोलिक घटकांचा मराठ्यांच्या आर्थिक जीवनावरील प्रभाव

२.४ भौगोलिक घटकांचा मराठ्यांच्या सामाजिक जीवनावरील प्रभाव

२.५ सारांश

२.६ प्रश्न

२.७ संदर्भ

२.० उद्दिष्ट्ये

- महाराष्ट्राची भौगोलिक परिस्थिती समजून घेणे.
- भौगोलिक घटकांचा मराठ्यांच्या आर्थिक जीवनावरील प्रभाव समजून घेणे.
- भौगोलिक घटकांचा मराठ्यांच्या सामाजिक जीवनावरील प्रभाव समजून घेणे.
- मराठ्यांच्या नियंत्रणाखाली असणाऱ्या भौगोलिक विणभागांचे विश्लेषण करणे.

२.१ प्रस्तावना

सतराव्या शतकाच्या मध्यावर मराठा सत्तेचा उदय झाला. अल्पकाळातच मराठ्यांने आपले स्वराज्य स्थापन केले. त्यांच्या या स्वराज्य स्थापनेला दक्षिणेकडील क्रांती असे म्हटले जाते. या क्रांतीचा उगम महाराष्ट्रात झाला. पुढे ही सत्ता दोनशे वर्ष टिकली. अशा या सत्तेस पुरक ठरलेल्या महाराष्ट्राची भौगोलिक रचना कशी होती, या रचनेचा महाराष्ट्रातील मराठ्यांच्या आर्थिक जीवनावर काय प्रभाव पडला होता तसेच सामाजिक जीवनमानावर काय प्रभाव पडला होता याचा आढावा आपण या प्रकरणात घेणार आहोत.

munotes.in

२.२ महाराष्ट्राची भौगोलिक वैशिष्ट्ये

मध्ययुगीन कालखंडातील महाराष्ट्राच्या भौगोलिक परिस्थितीचा विचार करता महाराष्ट्र हा डोंगर दऱ्यांचा, पठारांचा, छोट्या छोट्या नद्यांचा प्रदेश आहे. सह्याद्री हा महाराष्ट्राचा भूगोलच नव्हे तर इतिहास, घडविणारा पर्वत आहे. या पर्वताच्या असंख्य रांगानी, त्यावरील अभेध किल्ल्यांनी घनदाट अरण्यांनी, नदीनाल्यांनी मराठ्यांच्या स्वराज्य स्थापनेच्या प्रयत्नात त्यांना अमोल साहाय्य केले. म्हणूनच सह्याद्रीच्या कुशीत मराठ्यांच्या स्वराज्याचा पहिला प्रयत्न झाला.

महाराष्ट्राचा आकार त्रिकोणाकृती असून उत्तरेस सातफडा, दक्षिणेस पंचगंगा, पूर्वेस वैनगंगा तर पश्चिमेस अरबीसमुद्र अशा महाराष्ट्राच्या सर्वसाधारण सीमा आहेत. सह्याद्रीच्या उत्तर-दक्षिण विस्तारामुळे महाराष्ट्राचे कोकण व देश असे दोन भाग पडले आहेत.

महाराष्ट्राची प्राकृतिक रचना अतिशय साधी परंतु वैशिष्टेपूर्ण आहे. भारताच्या प्राकतिक विभागापैकी दक्षिण भारतीय पठारी प्रदेश व पश्चिम किनारपट्टीचे मैदान या दोन विभागामध्ये महाराष्ट्र वोटकरी आहे. वस्तूतः संपूर्ण महाराष्ट्र हा एक विस्तृत पठारी प्रदेश आहे. या पठाराचा पश्चिमेकडील भाग खाली खचून कोकणचा सखल भाग निर्माण झाला आहे.

अशा या महाराष्ट्राची भौगोलिक वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत.

१) कोकण :

सह्याद्री पर्वत व अरबी समुद्र यांच्या दरम्यान असलेल्या अरुंद, दक्षिणोत्तर प्रदेशाला कोकण असे म्हणतात. कोकण या शब्दाची व्युत्पत्ती पुढील प्रमाणे झाली असावी. भडोचच्या (गुजरात) दक्षिणेकडील प्रदेशास प्राचीन इतिहासात अपरान्त म्हणत. कोकण हे आपरान्तचे समानार्थी नाव आहे. परशुराम ऋषीची माता 'कुंकणा' हिच्या नावावरुन कोकण शब्द आला असावा. कारण परशुरामाच्या कतृत्वाशी संबधीत वज्रेश्वरी, शूर्पारक आहेत. त्याच प्रमाणे पेरिप्लस स्ट्रॅलो, प्लिनी, टॉलेमी अल्बेकनी इत्यादी प्राचीन परदेशी लेखकांच्या लिखाणात कोकणचा उल्लेख आढळतो.

कोकणचा विस्तार उत्तरेस दमणगंगा नदीपासून दक्षिणेस तेरेखोल खाडीपर्यंत झाला आहे. कोकणाची उत्तर दक्षिण लांबी ७२० किमी. मात्र रुंदी कमी असून ती सरासरी ३० ते ६० किमी. आहे. कोकणाचे एकुण क्षेत्रफळ ३०,३९४ चौ. किमी आहे.

कोकणाचे उत्तर कोकण व दक्षिण कोकण असे दोन भाग आहेत. समुद्रसपाटीच्या उंची नुसार उपविभाग आहेत ते म्हणजे खलाटी व वलाटी होय. खलाटी म्हणजे समुद्रसपाटीपासून कमी उंचीचा सखल प्रदेश व वलाटी म्हणजे समुद्रसपाटीपासून तुलनात्मक दृष्ट्या उंचीचा असणारा प्रदेश.

कोकण प्रदेशात जी भूरुपे आढळतात त्यामध्ये खाड्या, सागर किनारे, वाळूचे दांडे, बेटे यांचा समावेश होतो.

२) सह्याद्री पर्वत / पश्चिम घाट:

सह्याद्री पर्वत हा महाराष्ट्राचा प्राकृतिक रचनेच्या दृष्टीने महत्त्वाचा असा पर्वतीय विभाग आहे. हा पर्वत दक्षिणोत्तर दिशेत पसरला आहे. उत्तरेस तापी नदीच्या खोऱ्यापासून दक्षिणेस कन्याकुमारी पर्यंत पसरला आहे. या पर्वत रागांची एकूण लांबी १६०० किमी आहे. त्यापैकी

४४० किमी लांबीच्या पर्वत महाराष्ट्राच्या हद्दीत आहे. या पर्वताची सरासरी उंची १२०० ते १३०० मिटर आहे.

या पर्वताची निर्मिती 'प्रस्तरभंग' या प्रक्रियेमुळे झाली आहे. सह्याद्री हा बेसॉल्ट प्रस्ताराचा पहाड आहे. द्विपकल्पीय डठाराचा पश्चिमेकडील भाग खचल्यामुळे या पर्वताची निर्मिती झाली. सह्याद्रीच्या मुख्य शिरोधारेच्या पश्चिमेस अति तीव्र उतार, पायथ्याशी तळकोकण तर पूर्वेकडे सौम्य उतार व भावळ अशी रचना झाली आहे.

या पर्वताची अनेक उंच शिखरे, घाट, पठारे ही भूरुपे आहेत. सह्याद्रीच्या पर्वताचा महाराष्ट्राच्या हद्दीतील जो भाग आहे त्या भागात कळसुवाई, साल्हेर, सप्तशृंगी, त्र्यंबकेश्वर ही महत्त्वाची शिखरे आहेत. शिखरा प्रमाणेच घाट आहेत थळघाट, बोरघाट, खंबाटकी घाट, माळशेज घाट, आंबेनळी घाट, कुंभार्ली घाट, फोंडा घाट, अंबोली घाट, आंबा घाट, पसरणी घाट हे महत्त्वाचे घाट आहेत.

सह्याद्री पर्वताच्या व त्याच्या शिखरावर उंच व सपाट पठारे आहेत. या पठारांना घाटमाथा असे म्हणतात. माथेरान, पाचगणी व महाबळेश्वर या ठिकाणी आपणास या प्रकारची प्राकृतिक रचना आढळते.

शिवकाळात घाटमाथ्यांवर व शिखरांवर किल्ले बांधण्याचे पुरावे आजही उपलब्ध आहेत. याचे उत्तम उदा. शिवनेरी, रायगड, सिंहगड, प्रतापगड, पन्हाळगड व विशालगड हे किल्ले होय.

३) महाराष्ट्र पठार :

सह्याद्रीच्या पूर्वेस जो विस्तृत असा पठारी प्रदेश आहे त्यास महाराष्ट्र पठार असे म्हणतात. या पठाराने महाराष्ट्राच्य एकुण क्षेत्रफळाच्या ९०% भाग व्यापला आहे. त्यामुळेच महाराष्ट्र पठार हा महाराष्ट्राच्या प्राकृतिक रचनेचा महत्त्वाचा भाग बनला आहे. नद्यांच्या खोऱ्यानी महाराष्ट्र पठार तयार झाला आहे. या पठाराचा सर्वसाधारण उतार पश्चिमेकडून पूर्वेकडे आहे. या पठाराची पूर्वपश्चिम लांबी ७५० किमी व दक्षिणोत्तर रुंदी ७०० किमी आहे. पठाराची सर्वसाधारण उंची ७५० मिटर आहे.

या पठाराची निर्मिती ज्वालामुखीच्या उद्रेकामुळे झाली आहे. सुमारे ७० दशलक्ष वर्षापूर्वी दख्खनच्या प्रदेशात भूपृष्ठावर प्रचंड भेग पडून भ्रंशमूलक उद्रेक झाला आणि लाव्हारसाचे संचयन झाले. अशा प्रकारचा उद्रेक सुमारे २९ वेळा झाला. प्रत्येक वेळेस लाव्हारसाचे संचयन झाले. त्यामुळे लाव्हारसाचे थरावर थर साचून या पठाराची निर्मिती झाली. हा लाव्हारस बेसीक प्रकारचा होता. त्यामुळे त्यापासून बेसाल्ट खडकाची व खडकाच्या विदरणाने रेगूर मृदेची निर्मिती झाली.

४) महाराष्ट्रातील नद्या :

प्राकृतिक रचनेनुसार महाराष्ट्रातील नद्यांचे कोकणातील नद्या व महाराष्ट्र पठारावरील नद्या असे दोन जल वाहन विभाग मानले जातात. जल वाहनाच्या दिशेला अनुसरुन पूर्व वाहिनी नद्या व पश्चिम वाहिनी नद्या असे नद्यांचे वर्गिकरण करण्यात आले आहे.

गोदावरी, कृष्णा, व भीमा या पठारावरील नद्या पूर्ण वाहिनी नद्या आहेत तर कोकणातील सर्व नद्या पश्चिम वाहिनी नद्या आहेत. तापी-पूर्णा ही महाराष्ट्रातील सर्वात मोठी पश्चिम वाहिनी नदी आहे. महाराष्ट्रातील नदी प्रणालीला अनुसरुन नदी प्रणालीचे गोदावरी नदीप्रणाली, तापी-पूर्णा नदी भीमा नदी प्रणाली, कृष्णा नर्मदा नदी प्रणाली, व कोकणातील नद्या असे वर्गिकरण करण्यात आले आहे.

munotes.in

गोदावरी ही महाराष्ट्रातील सर्वात मोठी नदी प्रणाली असून गोदावरी खोऱ्याचे क्षेत्रफळ (महाराष्ट्रात) १ लक्ष ५१ हजार चौ. कि. मी. हे. महाराष्ट्रातील एकुण नदी खोरे क्षेत्राच्या ते ४९% पेक्षा जास्त आहे. संपूर्ण भारताच्या दृष्टीने ही नदी महत्त्वाची आहे. या नदीचा उगम सह्याद्रीमये त्र्यंबकेश्वर जवळच्या ब्रम्हगिरी डोंगरावर होतो. नाशिक, पुणे, मराठवाडा, नांदेड हून सीमा पार करत ही नदी आंध्र प्रदेशात प्रवेश करते.

प्राणहिता हि गोदावरीची उपनदी आहे. पेनगंगा व वैनगंगा नद्यांच्या संयुक्त प्रवाहाला प्राणहीता असे नाव आहे. प्राणहीताने पूर्व विदर्भाचा भाग सुपिक बनवला आहे.

भीमा ही कृष्णेची उपनदी आहे. भीमेचा उगम पुण्याजवळ खंडाळ्याच्या उत्तरेस भीमाशंकर येथे झाला आहे. वेळ, घोड व सीना या भीमेच्या डाव्या तिरावरच्या उपनद्या आहेत. तर इंद्रायणी, मुळा, मुठा, नीरा व माण या उजव्या तिरावरच्या उपनद्या आहेत.

कृष्णा नदी प्रणाली ही दक्षिणेकडील नदी प्रणाली आहे. उत्तरेकडील शंभू महादेवाचे डोंगर व पश्चिमेस सह्याद्रीच्या रांगा या मध्ये ती बंदिस्त आहे. कृष्णेच्या उगम सह्याद्रीमध्ये महाबळेश्वर जवळ झाला आहे. येरला ही कृष्णेच्या अन्य तिरावरील उपनदी आहे. तर वेण्णा, कोयना, वारणा, पंचगंगा, दुथगंगा व वेदगंगा या कृष्णेच्या उजव्या तिरावरील नद्या आहेत.

तापी-पूर्णा ही उत्तर महाराष्ट्रातील महत्त्वाची नदी प्रणाली हे. तापी पूर्णा खोऱ्यात दोन्ही उतारावर धळ्या व उंच दरडी हेत. या गाळाच्या संचयनामुळे सुपिक मृदा तयार झाली आहे. हा प्रदेश शेतीच्या दृष्टीने महत्त्वाचा समजला जातो.

नर्मदा नदी महाराष्ट्राच्या वायव्य सिमेवरुन वहाते ही नदी अतिशय खोल आहे. नर्मदेच्या दक्षिण तिरालगत डोंगराळ प्रदेश असून सातपुड्याच्या उंच रांगा आहेत. तोरणमाळ डोंगर, अक्राणी डोंगर, अस्तंभा डोंगर या डोंगरामध्ये उमग पावून नर्मदेला मिळणाऱ्या उपनद्या खोल घळ्या निर्माण करत गेल्या आहेत. त्यामुळे हा प्रदेश अतिशय दुर्गम बनला आहे.

कोकण किनारपट्टीला सखल प्रदेश अतिशय अरुंद आहे. कोकणातील सर्वच नद्या सह्याद्रीमध्ये उगम पावतात. या विभागातील नद्या शीघ्र प्रवाही आहेत त्या लवकर समुद्राला जावून मिळतात. नद्यांच्या मुखात समुद्राचे पाणी शिरत असल्याने खाड्यांची निर्मिती झाल्याचे दिसून येते. या नद्यांचे पात्र अरुंद असल्याने या नद्याना लवकर पूर येतो.

५) हवामान :

महाराष्ट्र हा भारताचा द्वीपकल्पाचा भाग असल्याने महाराष्ट्राचे हवामान मोसमी प्रकारचे आहे. परंतू विशिष्ट भौगोलिक स्थान, विस्तार व प्राकतिक रचना या घटकांचा परिणाम म्हणून महाराष्ट्राचे हवामान वैशिष्टेपूर्ण आहे. तापमानाची स्थिती, पर्जन्याची तिव्रता व कालावधी आर्दता व दैनंदिन हवेची स्थिती अशा सर्वच बाबतीत महाराष्ट्रात विविधता आढळते. एकाच ऋतूत एकाच ठिकाणी मनरची उकाडा तर दुसऱ्या ठिकाणी सुखद गारवा अनुभवास येतो. महाराष्ट्राचा प्राकृतिक रचनेमुळे महाराष्ट्र पठारी प्रदेश अवर्षणग्रस्त ठरतो तर कोकण किनारपट्टी दमट हवामानाचा अनुभव घेते तर मराठवाडा कोरड्या हवामानाचा अनुभव घेते.

munotes.in

६) वन (जंगल) :

महाराष्ट्रातील एकुण वनक्षेत्र ६४ हजार चौ. कि.मी. हे. राज्याच्या एकुण क्षेत्रफळाच्या ते २०.८ टक्के इतके आहे. महाराष्ट्राचे वनक्षेत्र प्रामुख्याने तीन क्षेत्रात विभागले असून सह्याद्री व त्याच्या पायथ्यालगतचा पश्चिम भाग, सातपुडा व त्याच्या पायथ्यालगतचा उत्तर विभाग आणि पूर्व विदर्भाचा पूर्व विभाग असे तीन विभाग आहेत. या वन विभागातील वनस्पतीवर महाराष्ट्राच्या प्राकृतिक रचनेचा, हवामानाचा, मृदेचा, नदी प्रणालीचा, मानवी हस्तक्षेपाचा, परिणाम झाल्याचे दिसून येते. या वनांमध्ये उष्णकटिबंधीय सदाहरित वने, निम सदाहरित वने, उप उष्णकटिबंधीय सदाहरित वने, आर्द पानझडी वने, शुष्क पानझडी वने, कस काटेरी वने, खाजण अथवा खार वने या वनांचा समावेश होतो.

७) मृद्रा :

महाराष्ट्राच्या विविध भागात विविध प्रकारची मृदा आहे. महाराष्ट्रातिल रासायनिक घटना व भौतिक गुणधर्म याच्या आधारे मदांचे काळी कापसाची मृदा, जांभी मृदा, तांबडी मृदा, गाळाची अथवा भावर मृदा, किनाऱ्यावरील पुळण, भरड उथळ मृदा, चिकण पोयटा, तपकीरी करडी मृदा, क्षारयुक्त व आम्लारी मृदा हे मृदांचे वर्गिकरण आढळते.

महाराष्ट्राच्या भौगोलिक वैशिष्ट्यांचा विचार करता महाराष्ट्राच्या प्राकृतिक रचनेतील पर्वत, पठारे व मैदाने या रचनेमध्ये या काळात आपणास विविधता व वैशिष्ट्येपुर्णता आढळते. महाराष्ट्रातील या काळातील वनरचनेचा ही वैशिष्ट्येपूर्ण अवस्थेत आढळते. महाराष्ट्राची या काळातील जल संपदा आपणास नदी व सागर प्रणालीच्या संरचनेतून अभ्यासपूर्ण दृष्टीकोनातून पहावयास मिळते. महाराष्ट्राच्या प्राकृतिक रचनेतील मृदा, मृदेची विविधता आपणास स्वतंत्र अस्तित्व आहे हे सांगते. तसेच महाराष्ट्राच्या वाट्याला आलेले हवामान हे मोसमी असल्याने याचा प्रभावही सर्वच घटकांवर झाल्याचे जाणवते. या सर्वच घटकांमुळे महाराष्ट्राच्या भौगोलिक वैशिष्ट्यांना स्वतंत्र अस्तित्व निर्माण झाले आहे.

२.३ भौगोलिक घटकांचा मराठ्यांच्या आर्थिक जीवनावरील प्रभाव

मराठ्यांनी जरी आपले साम्राज्य भारतात दक्षिणोत्तर वाढवले असले तरी या साम्राज्याचा उगम, केंद्र बिंदू महाराष्ट्र ठरला आहे. अशा या महाराष्ट्राचा सर्वांगीन प्रभाव आपणास मराठ्यांवर पडल्याचे जाणवते. या घटकात आपण मराठ्यांच्या आर्थिक जीवनावर भौगोलिक महाराष्ट्राचा काय प्रभाव पडला आहे हे जाणून घेणार आहोत.

१) प्राकृतिक घटकांचा प्रभाव :

महाराष्ट्राच्या प्राकृतिक रचनेचा विचार करता प्राकृतिक वैशिष्ट्याचच्या आधाराव महाराष्ट्राचे चार भागात विभाजन करण्यात आले आहे हे चार विभाग म्हणजे

१) कोकण किनारपट्टीचा सखल प्रदेश
२) सह्याद्री व त्याच्या पूर्वेकडील शाखा
३) महाराष्ट्र पठार
४) सातपुड्याच्या डोंगर रांगा

या चार घटकांना अनुसरुन मराठ्यांच्या आर्थिक जीवनावर या घटकांचा काय प्रभाव होतो हे जाणून घ्यावयाचे आहे. महाराष्ट्रातील या रचनेला अनुसरुन जे लागवड क्षेत्र आहे याचा विचार करु. महाराष्ट्रात प्राकृतिक रचनेला अनुसरुन लागवडीखाली नसलेले क्षेत्र, पडिक क्षेत्र, बिगर पडिक क्षेत्र, लागवडीखाली असणारे क्षेत्र, वनक्षेत्र असे लागवडीखाली असणाऱ्या व नसऱ्या क्षेत्राचे वर्गिकरण करण्यात आले आहे. या एकुण क्षेत्रा पैकी लागवडीखाली असणाऱ्या क्षेत्रांचे एकुण प्रमाण ५८.२% आहे. या लागवडीखाली असणाऱ्या प्राकृतिक क्षेत्राचा परिणाम आपणास मराठ्यांच्या आर्थिक जीवनावर झाल्याचे दिसून येते. या प्राकृतिक रचनेचा क्षेत्रातून लागवडीच्या माध्यमातून मराठ्यांना उत्पादन व उत्पन्न मिळत होते. या प्रक्रियेत शेतकरी, मालक, मजूर, दलाल, व्यापारी, पेठा, शासन यांचा सहभाग होता त्यामुळे या सर्वच घटकांवर या प्राकृतिक घटकांचा प्रभाव पडला होता असे दिसून येते.

२) जमीनीचा प्रभाव :

महाराष्ट्राच्या भौगोलिक घटका पैकी एक महत्त्वपूर्ण घटक म्हणून जमीनीकडे पाहिले जाते. महाराष्ट्रातील तत्कालीन जमीन विविध प्रकारची होती. काळी जमीन, ताबंडी जमीन, हलकी जमीन, तपकीरी जमीन, ताबंट जमीन असे जमीनीचे वर्गिकरण करण्यात आले होते. 'वरकस' व 'आवत' असे जमीनीचे प्रकार होते. लागवडी खालील जमीन व पडीक जमीन तसेच जिरायती जमीन व बागायत जमीन असे सुद्धा उत्पादन प्रक्रियेनुसार जमीनीचे प्रकार पाडण्यात आले होते.

भौगोलिक घटका पैकी जमीन या घटकाचा मराठ्याच्या आर्थिक जीवनावर जास्त प्रमाणात चांगला परिणाम झाल्याचे दिसून येते.

मराठे जमीन या भौगोलिक घटकातून जी पिके होत होत त्यात नगदी पिकांचा समावेश होता. ज्वारी, बाजरी, मटकी, हुलगा, वरी, नाचणी, भात ही नगदी पिके घेतली जात होती. ही पिके नैसर्गिक पावसावर अवलंबून होती. बागायती पिकांमधून भाजीपाला व फळे ही नगदी पिके घेतली जात होती.

मराठ्यांने आपल्या कालखंडात जास्तीत जास्त जमीन लागवडीखाली आणण्याचा प्रयत्न केला होता. परिणामी त्याचा फायदा मराठ्यांना झाला. मराठ्यांचे या घटकामुळे उत्पन्न वाढले. शेतकरी, शेतमजूर, व्यापारी, सर्वसामान्य लोक या सर्वच समाज व साम्राज्यातील लोकांवर चांगला परिणाम झाला. मराठ्यांचे साम्राज्य धनधान्यानी परिपूर्ण बनविण्यासाठी तसेच आर्थिक दृष्ट्या समृद्ध बनविण्यासाठी हा घटक उपयुक्त ठरला.

३) हवामानाच्या प्रभाव :

महाराष्ट्राचे हवामान मोसमी प्रकारचे आहे. असे जरी असले तरी प्राकृतिक रचनेच्या विविधतेमुळे महाराष्ट्राच्या हवामानावर परिणाम जास्त प्रमाणात झाल्याचे दिसून येते. सह्याद्रीच्या पर्वतरांगामुळे तसेच सातपुड्याच्या रांगामुळे हवामानावर जास्त परिणाम झाल्याचे आढळते.

हवामानाचा परिणाम मराठ्यांच्या आर्थिक जीवनावर जाणवतो. कोकणात पश्चिमघाटात व घाट-माथ्यावर हवामानाच्या विविधतेमुळे जास्त पाऊस पडतो तर पठारी प्रदेशात अवर्षणग्रस्त परिस्थिती आढळते.

muniotes.in

अतिवृष्टीमुळे अनेक वेळा मराठ्यांच्या जिरायती शेतीचे अनेक वेळा नुकसान झाल्याची उदाहरणे आहेत. तसेच बदलत्या हवामानाचा परिणाम मराठ्यांच्या शेतीवर, पिकांवर, व्यापारी वस्तुंवर झाल्याचे दिसून येते. अतिवृष्टीमुळे दळण वळणाचे मार्ग नादुरुस्त झाल्याची उदाहरणे आहेत. दळणवळणात अडथळे आल्याची उदाहरणे आहेत.

मात्र काहि प्रसंगी हवामानाचे उत्तम साथ दिल्याने मराठ्यांच्या उत्पादनाची, व्यापाराची उत्पन्न प्रक्रियेची भरभराट झाल्याचे आढळून येते.

४) वनांचा प्रभाव :

महाराष्ट्रातील भौगोलिक घटकापैकी वन हा एक आर्थिक प्रणालीशी संबधीत असणारा महत्त्वपूर्ण घटक आहे. मराठ्यांच्या आर्थिक जीवनावर या घटकाचा चांगला प्रभाव झाला होता.

इमारतीसाठी लागणारे लाकूड, जळावू लाकूड, इतर लाकूड, कच्चा माल म्हणून वनातील वनस्पती, भीक, रामोशी लोकांचे निवास स्थान, वन्य प्राण्यांचे आश्रयस्थान म्हणून वनाना महत्त्व होते.

आर्थिक दृष्टीकोनातून जर विचार केला तर मराठ्यांनी वनातील लाकडांचा उपयोग गृहबांधणी साठी केल्याची कितीतरी उदाहरणे आहेत. इंधनासाठी या वनातील लाकडांचा उपयोग केला जात होता. पण त्याही पेक्षा शिवाजी महाराजांनी ज्या आरमाराचा पाया घातला त्या आरमाराचा जहाज बांधणिसाठी मराठ्यांने वनातील लाकडांचा वापर केलेला होता हे आपण नाकारू शकत नाही.

लाकडी खेळणी, लाकडी नित्योपयोगी वस्तु प्रवेशद्वार घरगुती वस्तु आदिच्या निर्मितीसाठी वनातील लाकडांचा उपयोग केला जात होता.

या घटकामुळे मराठ्यांच्या कालखंडातील या प्रकारच्या उद्योगांच्या उत्पादनात वाढ झाली होती, मराठ्यांचे उत्पन्न वाढले होते. या उद्योगात गुंतलेल्या अनेक लोकांना रोजगार उपलब्ध झाला होता. परिणामी या घटकांचा मराठ्यांच्या आर्थिक जीवनावर चांगला प्रभाव पडला होता असे दिसून येते.

५) **नद्यांचा प्रभाव :**

महाराष्ट्रातील भौगोलिक घटकापैकी नद्या हा आर्थिक प्रणालीशी संबधीत असणारा अंत्यत महत्त्वपूर्ण घटक आहे. नद्यांचा मराठ्यांच्या आर्थिक जीवनावर चांगला व वाईट असा दुहेरी प्रभाव जाणवतो. सर्व प्रथम आपण मराठ्यांवर झालेल्या नद्यांच्या चांगल्या प्रभावाचा विचार करु नंतर नदी प्रणालीचे वाईट परिणाम काय झाले याचा विचार करु.

महाराष्ट्रातील नदी प्रणालीचा विचार करता गोदावरी नदी प्रणाली, प्राणहिता नदी प्रणाली, भीमा नदी प्रणाली, कृष्णा नदी प्रणाली, तापी नदी प्रणाली तापी पूर्णा नदी प्रणाली, नर्मदा नदी प्रणाली व कोकणातील नद्या असे नद्यांचे वर्गिकरण करण्यात आले आहे. या नद्यांच्या प्रणालीने मराठ्यांच्या आर्थिक जीवनमानास कशी मदत केली आहे हे सर्वप्रथम स्पष्ट करु.

नद्यांच्या जल प्रवाहामुळे ज्या ज्या ठिकाणी त्रीभूज प्रदेश तयार जाले होते अशा ठिकाणी या कालखंडात उत्तम शेतीयोग्य जमीन तयार झाली होती. अशा जमीनीतून उत्तम पिके घेतली जात

munotes.in

होती. परिणामी या मार्गातून मिळणाऱ्या उत्पादनातून व उत्पन्नातून मराठ्यांचे आर्थिक जीवनमान सुधारण्यास मदत झाली होती.

विशेष करुन कोकणातील नद्यांच्या वापर जलवाहतूकीसाठी केला जात होता. जलवाहतूकीमध्ये मानवी वहातूक व मालाची वहातूक केली जात असे याचा फायदा मराठ्यांचे आर्थिक जीवनमान उंचावण्यासाठी झाला होता.

मराठ्यांच्या कालखंडात कोकणातील नद्यांमध्ये मच्छीमारी केली जात असे. त्यामुळे हा घटक मत्स व्यवसायास पुरक ठरला होता. या बाबीतून सुद्धा मराठ्यांना उत्पादन व उत्पन्न मिळत होते.

नद्यांच्या पाण्यातुन कालव्याना पाणीपुरवठा केला जात असे. या कालव्यांच्या पाण्याचा वापर मराठ्यांना काळात बागायती शेतीसाठी केला जात असे. याचा फायदा सुद्धा त्या काळात मराठ्यांच्या उत्पादन वाढीससाठी झाला होता.

थोडक्यात शेती हा मराठ्यांच्या अर्थव्यवस्थेचा कणा असल्याने नदीप्रणालीचा प्रभाव या घटकासाठी अत्यंत उपयुक्त व चांगला ठरला. असे जरी असले तर काही प्रसंगी या घटकाने मराठ्यांच्या आर्थिक जीवनावर वाईट परिणाम घडवून आणल्याची उदाहरणे समोर आहेत.

पावसाळ्यात नद्यांची पात्र अरुंद असल्याने अतिवृष्टी झाली तर नद्याना पुर येत असे विशेष करुन कोकणातील नद्याना जास्त प्रमाणात पुर येत असे अशा प्रसंगी मराठा साम्राज्यातील शेतीचे, पिकांचे, वहातूकीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असे. असे प्रकार अनेक वेळा घडल्याची उदाहरणे आहेत.

६) पठारांचा प्रभाव :

महाराष्ट्रातील भौगोलिक घटकापैकी पठार हा एक महत्त्वपूर्ण घटक असून या घटकाने महाराष्ट्राचे ९०% क्षेत्रफळ व्यापले आहे. परिणामी या भागात मानवी वसाहतीचे प्रमाण जास्त आहे. मानवी वसाहती जास्त असल्याने अर्थ-प्रणालीशी संबधीत असणाऱ्या सर्वच घटकांवर या भौगोलिक घटकांचा प्रभाव जाणवतो. पठारी भागात व्यापारी पेठा, व्यापारी केंद्र, व्यापारी मार्ग या मध्य सुसुत्रता जाणवते. मराठ्यांच्या कालखंडातील जे वेगवेगळ्या प्रकारचे उद्योग विकसीत झाले होते त्या उद्योगांचे केंद्रिकरण या भागामध्ये झाल्याचे आढळते. परिणामी आर्थिक केंद्रीकरणाचे महत्त्वपूर्ण केंद्र हा घटक असल्याने या घटकाचा मराठ्यांचा अर्थप्रणालीवर झाल्याचे दिसून येते.

सर्वसाधारण मराठ्यांच्या आर्थिक जीवनमानावर परिणाम करणारे भौगोलिक घटक आपण घटकात मांडले. या मांडणी नंतर या सर्व घटकांचा मराठ्यांच्या अर्थप्रणालीशी संबधीत असणाऱ्या शेतीवर, शेतीपुरक व्यवसायांनवर, मराठ्यांच्या उद्योगसमुहांवर, व्यापारी पेठांवर, मराठ्यांच्या उद्योगांच्या उत्पादन क्षमतेवर, मराठ्यांच्या उत्पन्नावर, मराठा साम्राज्याच्या जीवनमानावर काय प्रभाव पडला याचा याची माहिती नमुद केली.

mynotes.in

२.४ भौगोलिक घटकांचा मराठ्यांच्या सामाजिक जीवनावरील प्रभाव

मराठा कालखंडातील समाज हा वेगवेगळ्या जातीत विभागला होता ब्राम्हण, मराठा या जाती व्यतिरिक्त इतर जाती जमातीचा ही मराठा साम्राज्याच्या समाज समुहामध्ये सहभाग होता. कुंभार, सोनार, सुतार, शिंपी, धनगर, तेली, नाव्ही, माळी, गोंधळी गुरव या इतर जाती जमाती होत्या. भटक्या व विमुक्त जातीमध्ये वडार, बेलदार, कैकाडी, बुकड, पारधी यांचा समावेश होत होता.

अस्पृश्यांमध्ये महार, मांग, चांभार, ढोर या प्रमुख जाती होत्या.
एकंदरीत या सर्व जाती समुहाने मराठा कालखंडातील समाज बनला होता.

मराठा कालखंडातील या समुहाच्या सामाजिक जीवनावर महाराष्ट्राच्या भौगोलिक घटकांचा काय प्रभाव पडला याची माहिती आपण या घटकात पहाणार आहोत.

१) लोकसंख्या वितरण :

महाराष्ट्राच्या भौगोलिक घटकांचा मराठा कालखंडातील लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम झाल्याचे जाणवते. प्राकृतिक रचनेच्या नियमानुसार मैदानी भागात लोकवस्तीचे प्रमाण जास्त असते. अशाच प्रकारची परिस्थिती मराठा कालखंडात होती. मात्र राजकर्त्यांचा याला अपवाद होता. राजकर्ते गटकिल्ल्यांवर रहात होते. राजसत्ता व साम्राज्य संरक्षण हा त्यांचा दृष्टीकोन होता. असे जरी असले तरी पर्वतीय भागांपेक्षा पठारे व मैदाने या भागांमध्ये मराठ्यांच्या कालखंडातील समाज विभागला होता विखुरला होता असे दिसून येते.

२) घनतेबाबत फरक :

महाराष्ट्राच्या भौगोलिक घटकांचा मराठा साम्राज्यातील लोकसंख्येच्या घनतेवर परिणाम झाला होता. डोंगर, पर्वत, या ठिकाणी मराठ्यांची लोकसंख्या कमी असे. मात्र पठारी- मैदानी भागात लोकसंख्येची घनता ही जास्त होती. सुरुवातीच्या मराठ्यांच्या सत्ता आरंभाच्या काळात ही घनता डोंगर पर्वतमय भागात व पठार मैदानी भागात समसमान असल्याचे जाणवते मात्र सत्तेचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण झाल्यानंतर या घनतेमध्ये तफावत पडला व पठारी व मैदानी भागात लोकसंख्येची घनता वाढत गेली.

३) भाषेतील फरक :

प्राकृतिक रचना ही समान अथवा सारखी नसते. या रचनेत उंच-खोलपणा जाणवतो. हा उंच खोलपणा आपणास पर्वत पठारे मैदाने या रचनेतून आढळतो. यातूनच वेगवेगळे प्रदेश निर्माण झाले. जस जसे प्रदेशाचे स्वरुप बदलते तस तशी बोली भाषा बदलते मराठा साम्राज्यात वास्तव्य करणाऱ्या वेगवेगळ्या आढळतात. म्हणजेच प्राकृतिक घटकांचा मराठ्यांच्या समाज जीवनाशी संबधीत असणाऱ्या भाषेवर परिणाम झाला होता हे आपण नाकारु शकत नाही.

४) राहणीमान :

भौगोलिक घटकांचा मराठ्यांच्या राहणीमानावर परिणाम झाला होता. पठारी मैदानी भागात राहणाऱ्या लोकांचे राहणीमान चांगले होते. मात्र खडतर जीवन जगणाऱ्या व डोंगरमय व पर्वतमय भागात राहणाऱ्या आदिवासी, भिल्ल, रामोशी लोकांचे जीवन खडतर होते. जीवनावश्यक गरजा

भागविण्यासाठी या लोकांना अनंत अडचणींवर मात करावी लागत होती. राजे, राजदरबारातिल इतर लोक यांच्या वाट्याला सुखी जीवन होते.

५) अन्न :

भौगोलिक घटकांच्या रचनेनुसार मराठ्यांच्या अन्नामध्ये तांदुळ, गहु, ज्वारी, बाजरी, मका, हरभरा, नाचणी, पालेभाज्या व मांस यांचा समावेश असे मात्र पर्वतमय भागात मराठ्यांच्या साम्राज्यातील जो समाज होता समुह होता त्यांना त्यांच्या अन्नाच्या सर्व साहित्याच्या गरजा भागवता येत नव्हत्या. कारण त्यांचे कमी उत्पन्न, दळणवळणाच्या साधनांचा अभाव, त्यांच्या वास्तव्यापासून बाजारपेठांचे असणारे दूरचे अंतर, डोंगराळ भागात पाणी साठ्यांची नसणारी उपलब्धता या सर्व गोष्टीमुळे त्यांच्या वाट्याला हि बिकट अवस्था होती. मात्र राजकर्ते, राजदरबारातील लोक, त्यांचे प्रशासक यांच्या बाबतीत सकस अन्न उपलब्ध होत असे.

६) कार्यक्षमता :

भौगोलिक घटकांचा मराठ्यांच्या कार्यक्षमतेवर परिणाम झाला होता हे आपण नाकारु शकत नाही. कारण मराठ्यांनी शुन्यातून स्वराज्य निर्माण केले होते. मराठ्यांचे दुर्गम प्रदेश, डोंगरा प्रदेशातील वास्तव्य मराठ्यांना काटक, बाणेदार बनविण्यासाठी उपयुक्त ठरले होते. त्यांनी लढलेल्या लढाया, गाजवलेले पराक्रम व मिळविलेले विजय ही त्यांच्या कार्यक्षमतेची उत्तम उदाहरणे आहेत. याही पुढे जावून स्वराज्य स्थापून स्वराज्याचा केलेला विकास ही बाब महत्त्वाची आहे. त्यांच्या सत्ता निर्मिती मध्ये सहभागी झालेले मराठे, कोळी, भंडारी, रामोशी हे लोक या जमाती काटक होत्या हे आपण नाकारु शकत नाही. हा प्रभाव तेथील भौगोलिक परिस्थितीचा होता.

७) वर्तणूक :

भौगोलिक घटकांचा मानव समुहाच्या वर्तणूकीवर परिणाम होतो. महाराष्ट्राचा वारसा चांगल्या वर्तनुकीचा होता. दूर्लक्षीत, दुर्गम परिसरात, भागात जरी राहणारे मराठे साम्राज्यातील लोक असले तरी त्यांच्या वर्तनूकीत आदब होती. कपट निती नव्हती, जर 'शत्रु जाच करत असेल तरच शत्रुचा प्रतिकार' या प्रवृत्तीची मराठ्यांची वर्तनुक होती हा प्रभाव सुद्धा महाराष्ट्राच्या भौगोलिक परिस्थितीचा होता. शिवरायांच्या हिंदवी स्वराज्याच्या संकल्पनेमध्ये सहभागी झालेले डोंगर दऱ्या-खोरे परिसरातील मावळे राज निष्ठेसाठी, स्वातंत्र्य निष्ठेसाठी, हिंदवी स्वराज्य निष्ठेसाठी एकत्र आले होते. याचा प्रभाव महाराष्ट्राच्या भौगोलिक रचनेशी संबधीत आहे.

८) रुढी-परंपरा :

भौगोलिक घटकांचा मराठा साम्राज्यातील रुढी-परंपरांवर प्रभाव जाणवतो. डोंगर भागात राहणारे भिल्ल, रामोशी, आदिवासी, यांच्या रुढी परंपरा डोंगरी व अरण्याशी वास्तव्य दर्शविणाऱ्या होत्या. राजे रजवाड्यामध्ये राहणाऱ्या राजकर्त्यांच्या त्यांचे समर्थक असणाऱ्या दरबारी अधिकाऱ्यांच्या रुढी परंपरा साही राजवटीला अनुसरुन होत्या. सर्वसामान्यापासून राजपदापर्यंत असणाऱ्या सर्वच लोकांच्या रुढी परंपरावर भौगोलिक घटकांचा प्रभाव जाणवतो सण-उत्सव, मनोरजंन, खेळ, विवाहपद्धती या सर्वच घटकांवर भौगोलिक घटकांचा प्रभाव झाल्याचे दिसून येते.

९) व्यवसाय :

व्यवसाय हा मानवी समुहाशी संबंधीत असणारा महत्त्वपूर्ण घटक आहे. या घटकांवर महाराष्ट्राच्या भौगोलिक परिस्थितीचा प्रभाव चांगलाच जाणवतो. या व्यवसायाचे अविभाज्यक घटक असणाऱ्या शेती, खाणकाम, लाकूड उद्योग, पशुपालन उद्योग, वहातूक उद्योग, दळणवळण सुविधा या सर्वच घटकांवर परिणाम झाला आहे. नद्यांच्या त्रीभूज प्रदेशांमध्ये झालेला शेतीचा विकास हे याचे उत्तम उदाहरण आहे. शेती बरोबरच जे जोड उद्योग होते ते उद्योग सुद्धा आपणास प्रांतवार रचने नुसार बदलल्याचे आढळतात वहातूक व्यवस्थेमध्ये सुद्धा प्रांतवार बदल झाल्याचे जाणवते. मराठअ कालखंडात लोहोद्योग, कापड उद्योग, हे उद्योग मोठे होते. परंतू बारा बलूतेदार व बारा अलूतेदारानी सुरु केलेले उद्योग यावर सुद्धा भौगोलिक घटकांचा प्रभाव जाणवतो.

१०) मनोरंजन :

प्राकृतिक घटकांच्या रचनेनुसार जसे समाज समुह निर्माण झाले तसेच मनोरंजनाचे प्रकार निर्माण झाले. तत्कालीन महाराष्ट्रात गाणे, नृत्य, चित्रकला वेगवेगळ्या स्पर्धा ही मनोरंजनाची साधने होती. मात्र जाती प्रकाराला अनुसरुन समुह प्रकाराला अनुसरुन, प्रादेशिक रचनेला अनुसरुन या मध्ये तफावत जाणवते ही तफावत प्राकृतिक घटकांच्या प्रभावामुळे निर्माण झाली आहे. आदिवासी नृत्य, वारली नृत्य, कोळी नृत्य, हे नृत्य त्या त्या परिसरातील भौगोलिक घटकांच्या प्रभावामुळे वैशिष्ट्येपूर्ण बनले होते.

गीत-गाण्यामध्ये ओव्याचा परिसरानुरुप प्रभाव जाणवत होत्या. मनोरंजनासाठी कुसत्या, बैलगाड्यांच्या शर्यती, सामुहिक नृत्य वैयक्ती नृत्य असे प्रकार प्रचलीत होते. मात्र प्रादेशिक रचनेअनुरुप या सर्व प्रकारांना स्वतंत्र अस्तित्व होते. प्रत्येक मनोरंजनाच्या कार्यक्रमाचा स्वतंत्र प्रभाव होता.

११) वेशभुषा :

प्राकृतिक घटकांचा मराठ्यांच्या वेशभुषेवर परिणाम जाणवतो. प्राकृतिक रचनेला अनुसरुन वेशभुषेत बदल झालेला आहे. ब्राम्हण, मराठा, कुंभार, सोनार, माळी, सुतार, सिंपी, धनगर, तेली, नाव्ही, गोंधळी, गुरव, वडार बेलदार, केंकाडी बुरुड, यांच्या पातवार रचनेनुसार वेशभुषा वेगवेगळ्या होत्या हे जाणवते.

वेशभुषेसाठी हवामानाला अनुसरुन कपडे घेतले जात असत. सुती कपडे, रेशमी कपडे, लोकरी कपडे असे कपड्याचे प्रकार वेशभुषेसाठी प्रचलीत असत. ऋतुमानानुसार वेशभूषेसाठी या कापड प्रकाराचा वापर केला जात होता. सण-उत्सव प्रसंगी वेगवेगळ्या रंगबिरंगी कपड्यांचा वापर केला जात असे. एकंदरीत प्रादेशिक रचनेला अनुसरुन जात समुहाला अनुसरुन वेशभुषेवर प्रभाव जाणवतो.

एकंदरीत सर्व माहितीचा विचार करता भौगोलिक घटकांचा मराठ्यांच्या सामाजिक जीवनावर कसा परिणाम झाला आहे हे जाणून घेतले आहे. या मध्ये आपण लोकसंख्या वितरण प्राकृतिक रचनेनुसार कसे झाले आहे. प्राकृतिक रचनेचा घनतेवर काय परिणाम झाला आहे. भाषेवर प्रांतरचनेनुसार काय परिणाम झाला आहे. राहणीमानावर काय परिणाम झाला आहे. अन्नसेवन प्रक्रियेवर काय परिणाम झाला आहे कार्यक्षमतेवर काय परिणाम झाला आहे. वर्तनुकीवर काय

परिणाम झाला आहे. रुढी परंपरावर काय परिणाम झाला आहे. व्यवसायांवर काय परिणाम झाला आहे. मनोरंजनाच्या साधनावर काय परिणाम झाला आहे. वेशभुषेवर काय परिणाम झाला आहे. याची माहिती जाणून घेतली आहे. या सर्वच प्रभावात नाविण्यता आहे त्याच बरोबर विविधता आहे.

आपली प्रगती तपासा

१) महाराष्ट्राच्या भौगोलिक वैशिष्ट्याची माहिती जाणून घ्या.
२) भौगोलिक घटकाच्या मराठ्यांच्या आर्थिक जीवनावरील प्रभाव जाणून घ्या.
३) भौगोलिक घटकांचा मराठ्यांच्या सामाजिक जीवनावरील प्रभाव जाणून घ्या.

२.५ सारांश

मराठ्यांच्या सत्तेचा उदय विकास व उत्कर्ष ही मध्ययुगीन कालखंडातील एक महत्त्वपूर्ण ऐतिहासिक घटना. या ऐतिहासिक घटनेचा प्रभाव सत्ता रुपाने जवळ जवळ २०० वर्ष टिकला. अशा या घटनेला स्वतंत्र राजकीय अस्तित्व आहे. मात्र त्याही पेक्षा म्हणजे या घटनेने पुढे दोनशे वर्ष सामाजिक व आर्थिक अस्तित्वही निर्माण केले.

या घटकात आपण महाराष्ट्राच्या भौगोलिक रचनेची वैशिष्टे, या वैशिष्ट्यांचा मराठ्यांच्या आर्थिक जीवनावर तसेच सामाजिक जीवनावर कार्य प्रभाव झाला आहे. हे जाणून घेतले आहे.

ज्या महाराष्ट्रातून शिवाजी महाराजानी शून्यातून स्वराज्य निर्माण केले. तो महाराष्ट्र प्राकृतिक दृष्ट्या विविधांगी आहे महाराष्ट्राला लाभलेली प्राकृतिक रचना उंच-उंच पर्वत, पठारे व मैदानाने व्यापली आहे. कोकण सह्याद्री पवर्तत रांगा, महाराष्ट्राचे पठार, महाराष्ट्रातील गोदावरी, कृष्णा, भीमा, नर्मदा, तापी, पुर्णा या नद्या, महाराष्ट्राच्या वाट्याला आलेले मोसमी हवामान, वनक्षेत्रांची विविधता, मृदेची विविधता या सर्व गोष्टीमुळे महाराष्ट्र या बाबतीत वैशिष्ट्यपूर्ण बनला आहे. या वैशिष्ट्यामुळेच महाराष्ट्राला स्वतंत्र राजकीय अस्तित्व निर्माण झाले. अशा या भौगोलिक वैशिष्ट्यानी ज्या प्रमाणे राजकीय कार्यप्रणालीवर परिणाम केला होता तशाच प्रकारचा परिणाम तत्कालीन आर्थिक जीवनमानावर व सामाजिक जीवनमानावर परिणाम केला होता.

भौगोलिक घटकांचा आर्थिक प्रभाव पहात असताना शेती, शेतीस फरक उद्योग, उत्पादन, व्यापार, वहातूक, दळणवळणाची साधने, पिक पद्धती आयात निर्यात या घटकांवर भौगोलिक घटकांचा परिणाम झाल्याचे दिसून येते. त्या घटकाने काही प्रसंगी मराठ्यांची आर्थिक भरभराट केली. तर काही प्रसंगी नुकसानही केले आहे. मात्र साधनसामुग्रीची उपलब्धता व पुरेस व्यावसायिक असित्व या मुळे जास्त प्रमाणात या घटकांचा मराठ्यांना आर्थिक दृष्टीकोनातून फायदा झाला.

भौगोलिक घटकांचा सामाजिक प्रभाव जाणून घेत असताना आपण भौगोलिक घटकांचा मराठ्यांच्या लोकसंख्येच्या वितरणावर, घनतेवर भाषेवर, राहणीमानावर, अन्न पद्धतीवर, कार्यक्षमतेवर वर्तनुकीवर रुढी परंपरेवर, व्यवसायावर, मनोरंजनाच्या साधनावर, वेशभुषेवर परिणाम झाल्याचा दिसून आला आहे. हा प्रभाव परिसर बदलानुसार आढळून आला आहे. या प्रभावात विविधता आढळते. हा अभ्यास घटक वेगळ्या स्वरुपाचा असून या घटकात आपण

भौगोलिक स्वरुपाचा अभ्यास करत असताना या स्वरुपांचा मराठ्यांच्या आर्थिक व सामाजिक जीवनावर काय परिणाम झाला आहे हे संपुर्ण माहितीच्या आधारे जाणून घेतले आहे.

२.६ प्रश्न

१) महाराष्ट्राच्या मराठअ कालखंडातील भौगोलिक वैशिष्ट्यांचा आढावा घ्या.
२) भौगोलिक घटकांचा मराठ्यांच्या आर्थिक जीवनावर कसा प्रभाव पडला त्याची माहिती लिहा.
३) भौगोलिक घटकांचा मराठ्यांच्या आर्थिक जीवनावर कसा प्रभाव पडला त्याची माहिती लिहा.

२.७ संदर्भ

१) मराठ्यांच्या प्रशासकीय, सामाजिक व आर्थिक इतिहास – प्रा. बी. एस. सांवत
२) महाराष्ट्राचा भूगोल – प्रा. सुभाषचंद्र सारंग
३) New History of The Marathas Vol. 1 – G. S. Sardesai
४) Shirraj & Sivakal, Poona 1957 Bhave V. K.
५) Geography of Maharashtra National Book Trust New Delhi 1971

❖❖❖❖

munotes.in

३अ

भक्तीपंथ चळवळ

घटक रचना:

३अ.० उद्दिष्ट्ये

३अ.१ प्रस्तावना

३अ.२ भक्तीपंथ चळवळीच्या उदयाची कारणे

३अ.३ भक्तीपंथ चळवळीची महत्त्वपूर्ण वैशिष्टे

३अ.४ भक्तीपंथ चळवळीतील महत्त्वपूर्ण संत

३अ.५ भक्तीपंथ चळवळीचे परिणाम

३अ.६ सारांश

३अ.७ प्रश्न

३अ.८ संदर्भ

३अ.० उद्दिष्ट्ये

- भक्तीपंथ चळवळीच्या उदयास जबाबदार परिस्थिती जाणून घेणे
- भक्तीपंथ चळवळीची महत्त्वाची वैशिष्ट्ये जाणून घेणे
- भक्तीपंथ चळवळीतील महत्त्वपूर्ण संताची माहिती जाणून घेणे
- भक्तीपंथ चळवळीचे तत्कालीन समाजावर काय परिणाम झाला याचा अभ्यास करणे
- सुफी संप्रदायाच्या उदयास जबाबदार परिस्थिती जाणून घेणे
- सुफी पंथाचे अध्ययनाच्या माध्यमातून तत्वज्ञान समजून घेणे
- सुफी संप्रदायाचा तत्कालीन समाजावरील प्रभाव जाणून घेणे

३अ.१ प्रस्तावना

मध्ययुगीन कालखंडात हिंदूस्थानात जो भक्तीपंथ चळवळीचा उदय, विकास झाला होता तो हिंदुस्थानच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त व महत्त्वपूर्ण ठरला होता. कारण या चळवळीने हिंदुस्थानातील जातपात, वर्णभेद अंहकार व द्वेषाचे निराकरण करुन समाजात एकसंघपणा व स्थिरता आणण्याचा प्रयत्न केला होता. या चळवळीने परमेश्वराच्या भक्तीवर भर दिला होता.

munotes.in

भक्तीमार्गावर भर देत असतानाच या चळवळीने असे स्पष्ट केले की "समाजातील सर्व थरातील लोकांना परमेश्वराची भक्ती करण्याचा अधिकार आहे. इश्वरभक्ती हेच मोक्षप्राप्तीचे साधन आहे. म्हणून प्रत्येक माणसाने भक्तीमार्गाचा अवलंब करावा." या कामी अनके साधुसंतानी आपले आयुष्य वाहून घेतले त्यामुळेच ही चळवळ विकसीत झाली.

प्राचीन हिंदू विचारवंतानी मानव जीवनमुक्तीचे तीन मार्ग सांगितले आहेत हे तीन मार्ग म्हणजे ज्ञानमार्ग, कर्ममार्ग व भक्तीमार्ग या तीन मार्गापैकी साधुसंतानी भक्तीमार्गाचा अवलंबून करुन भक्तीमार्ग चळवळ निर्माण केली.

मध्ययुगीन कालखंडात इसलाम राजकर्त्याचा हिंदुस्थानावर प्रभाव होता. त्यामुळे त्यांनी हिंदुस्थानात इसलाम धर्माचा प्रसार करणे सुरु केले होते. हिंदूना काफीर म्हणून वागविणे, हिंदूवर धार्मिक अत्याचार करणे, हिंदूच्या मंदिराचा विध्वस करणे, मुर्तीची विटंबना करणे, धार्मिक उत्सवांवर मनाई आणणे, गुलामगीरी पद्धत लादणे, जिझीयानावाचा धार्मिक कर लादणे या सर्व परिस्थितीमुळे हिंदुस्थानातील समाज दुर्बल बनला होता. अशा कठीण परिस्थितीत दुर्बल समाजाला धैर्य देण्यासाठी भक्तीपंथ चळवळीचा उदय झाला.

भक्तीपंथ चळवळीचा उदय कसा झाला या बाबत इतिहासकारात मतभेद आहेत.

सर चार्लस इलियट यांनी आपल्या 'हिंदूइजम ॲन्ड बुद्धिझम' या ग्रंथात 'रामानुज, मध्व तथा लिंगायत (विरशैव) इत्यादीच्या विचाराचा इस्लामी प्रभाव अशू शकतो' असे मत मांडले आहे.

डॉ. ताराचंद यांनीही या विचारांना समर्थन दिले आहे. मात्र इतर विद्वानाना हे मत मान्य नाही.

डॉ. रामधारीसिंह दिनकर यांनी या बाबत असे मत व्यक्त केले आहे की - "शंकराचार्याच्या अद्वैतवादाचा मूलाधार, उपनिषद आणि भगवद्गीता हे ग्रंथ आहेत. त्यामुळेच भक्तीमार्गाचा उगम हा उपनिषदे व शंकराचार्याच्या अद्वैतवादातून झाला आहे."

भक्तीपंथ चळवळीत ईश्वर प्राप्तीसाठी अथवा ईश्वर दर्शनासाठी देवाची मनोमन भक्ती करणे हा मार्ग सांगितला आहे. या साठी भक्तीसाधना महत्त्वाची आहे असे त्यांचे म्हणने आहे. भक्तीपंथ चळवळीत अंधश्रद्धा, धार्मिक कर्मकांड, जातीभेद या गोष्टींना महत्त्व नाही. भक्तीपंथ चळवळीचे उद्गाते म्हणून रामानुज, नामदेव, जयदेव, चैतन्य, रामानंद, कबीर आणि गुरु नानक यांची नावे घेतली जातात.

३अ.२ भक्तीपंथ चळवळीच्या उदयाची कारणे

मध्ययुगीन कालखंडात सुरु झालेली भक्तीपंथ चळवळ ही एकाएकी निर्माण झाली नव्हती तर हिंदू व मुसलमान या दोन धर्माच्या परस्परांच्या संपर्काने, संघर्षाने, प्रभावाने, समन्वयाने निर्माण झाली होती. अशा या चळवळीच्या उदयास जबाबदार कारणे पुढील प्रमाणे आहेत.

१) हिंदू धर्मातील अनिष्ठ प्रथा: हिंदू धर्मातील कर्मकांड, पूजापाठ, बहुदेवतावाद, भोंगळ अंधश्रद्धा, अनिष्ठ संस्कार यामुळे हिंदू धर्मामध्ये दोष निर्माण झाले होते. त्यामुळे हिंदू धर्माचा ऱ्हास होत चालला होता. भ्रष्ट ब्राम्हणवर्गानी तेव्हा हिंदू धर्माला गढूळ डबक्याचे रुप दिले होते. अशा कठिण प्रसंगी साधुसंतानी कर्मकांड, बहुदेवतावाद व जातीयवाद तसेच अनिष्ठ संस्कारांना विरोध करत समाजात सामाजिक समता निर्माण करण्याचे कार्य सुरु केले. तसेच ब्राम्हणांपासून शूद्रांपर्यत सर्वांनाच भक्तीकरण्याचे अधिकार आहेत असे सांगितले. त्यामुळे शुद्र भक्तीमार्गाकडे

आकर्षित झाले. यातूनच देव आणि भक्त एकमेकांच्या / आकर्षणाने एकत्र आले व भक्तीपंथ चळवळीची मुहूर्तमेढ रोवली गेली.

२) हिंदू व रजपूत राजांचा पराभव: मध्ययुगीन कालखंडात इ.स. १२ व्या शतकापासून १५ व्या शतकापर्यंत भारतात सर्वत्र हिंदू व रजपूतराजे पराभूत झाले होते. त्यामुळे इसलाम राजकर्त्यांची सत्ता भारतावर प्रस्थापीत झाली होती. या इस्लाम राजकर्त्यांने भारतात इस्लाम धर्माचा प्रसार करण्यास सुरुवात केली होती. या साठी त्यांनी हिंदूवर अत्याचार करण्यास सुरुवात केली होती. त्यांच्या या धोरणामुळे हिंदू धर्मानुयाची निराश झाले होते. अशा स्थितीत देववादी हिंदू परमेश्वराच्या उपासनेकडे वळले. अशा या लोकांना या कालखंडातील संतानी ईश्वर भक्तीचा मार्ग दाखविला, भावनिक आधार दिला त्यामुळे या लोकांमध्ये ईश्वर भक्तीबद्दल आदर निर्माण झाला. त्यामुळेच या चळवळीचा उदय झाला.

३) हिंदूवरील अत्याचार: मध्ययुगीन कालखंडात इस्लाम राजकर्त्यांनी हिंदूवर खूप अत्याचार केले होते. हिंदूच्या मंदिरांचा व देव-देवतांचा विध्वंस केला होता. हिंदूच्या जीविताला धोका निर्माण झाला होता. हिंदूना सुरक्षीतता राहिली नव्हती अशा कठिण प्रसंगी पिडीत हिंदूनी भक्तीमार्गाचा स्विकार करुन ईश्वराकडेच आपल्या संरक्षणासाठी मदतीचे आवाहन केले. या बाबत के. एम. पत्रीकर यांनी असे मत व्यक्त केले आहे की 'इस्लाम धर्माच्या अनुयायांनी हिंदूवर केलेले अत्याचार हेही भक्तीमार्ग चळवळ उद्‌भवण्यास जबाबदार कारण ठरले आहे.'

४) भक्तीमार्गाची लोकप्रियता: मध्ययुगीन कालखंडात इस्लाम राजकर्त्यांचे व इस्लाम धर्माचे संकट भारतीयांवर उभे राहिले होते. या संकटाला दूर करण्यासाठी संतानी सामान्य जनांना देवाप्रत पोचण्याचा भक्तीमार्ग सुचवला हा मार्ग साधा, सोपा, सरळ व देवा विषयी गाढ प्रीती बाळगणारा होता. हा मार्ग लोक सहज स्विकारण्यास तयार झाले. त्या मुळे या चळवळी उदय होण्यास पार्श्वभूमी तयार झाली.

५) हिंदू मुस्लिम समन्वय: मध्ययुगीन कालखंडात इस्लामी सत्ता भारतावर अनेक वर्ष होती. अनेक वर्षाच्या या सत्ता सानिध्याने हिंदू-मुस्लिम संस्कृतिचा काही प्रमाणात समन्वय घडून आला. या कालखंडात दोन्ही धर्मियांच्या असे लक्षात आले की आपणास एकाच ठिकाणी राहावयाचे आहे. परिणामी परस्परांतील वैर, घृणा व द्वेष दोघांनाही घातक होते. त्यामुळे उभय धर्मातील विचारवंत व साधुसंत यांनी सामंजस्याची व ऐक्याची भुमिका घेतली. समन्वयाचा व ऐक्याचा मार्ग स्वीकारला. त्यामुळेच दोन्ही जातीचे लोक एक दुसऱ्याच्या जवळ येऊ शकले. त्यामुळे भक्तीमार्ग चळवळीस पार्श्वभूमी तयार झाली.

६) सुफी संप्रदायाचा प्रभाव: सुफी संताची जीवन पद्धती, त्यांची शिकवण, धार्मिक संहिष्णुता व कर्मकांड विरोध या बाबींचा हिंदूवर व हिंदू साधुसंतावर परिणाम झाला. त्यामुळे भक्तीमार्ग चळवळीला प्रेरणा मिळाली.

डॉ. जदुनाथ सरकार म्हणतात "वस्तुस्थिती अशी आहे की, मध्ययुगीन काळात भारतात घडून आलेल्या या हिंदूच्या आंदोलनाला (भक्तीमार्ग चळवळीला) त्यांचे शेजारी मुस्लीम, त्यांच्या विचारसरणीपासून प्रेरणा मिळाली होती."

प्रो. बी. एन. लुणियानी असे लिहिले आहे की, "इस्लामांचा एकेश्वरवाद व विश्वबंधुत्व या कल्पना हिंदूच्या डोक्यावर प्रेरकरुपाने प्रभाव पाडणाऱ्या ठरल्या" इस्लामांमधील एकेश्वरवादाची कल्पना हिंदूवर निश्चितपणे प्रभावकरणारी ठरली आहे.

प्रा. आर. सी. मुजुमदार म्हणतात "इस्लामांचे प्रजातांत्रिक विचार आणि उदार भावनांचाही काही प्रमाणात भक्तीपंथ चळवळीचा उदयावर प्रभाव जाणवतो."

भक्तीपंथ चळवळीच्या उदयास जबाबदार कारणाचा आढावा घेत असताना सर्वप्रथम आपण हिंदू धर्मातील अनिष्ठ प्रथा कशा होत्या त्यामध्ये बदल करणे कसे गरजेचे आहे. याची माहिती पाहिली तद्नंतर भारतातील दुर्बल राजकर्ते, त्याचे पराभव त्यांचा समाजावर होणारा परिणाम व सामाजिक अस्थिरता का निर्माण झाली होती याचीही माहिती पाहिली. तसेच तत्कालीन लोकांवर होणारे अन्याय तसेच संघर्षमय परिस्थिती याबाबतची माहिती पाहिली या सर्व परिस्थितीतून तत्कालीन समाजाला बाहेर काढण्यासाठी एका महत्त्वपूर्ण मार्गाची गरज होती ती गरज या चळवळीच्या उदयाने पूर्ण झाली. म्हणूनच या चळवळीला त्याकाळात महत्त्व होते.

३अ.३ भक्तीपंथ चळवळीची महत्त्वपूर्ण वैशिष्टे

मध्ययुगीन कालखंडामध्ये भक्तीपंथ चळवळ अद्वैतवादी होती. या चळवळीमध्ये सहभागी होणाऱ्या भक्ताने व्यक्तीसापेक्ष एकाच देवाची पूजा-अर्चा करावी असा नियम होता. उपनिषदाच्या अद्वैत तत्वज्ञानावर त्यांचा विश्वास होता. या चळवळीतील भक्त ईश्वराच्या सगुण व निर्गुण अस्तित्वाला मानणारे होते.

भक्तीपंथ चळवळीने सर्व भारतीय उपखंडात भारतीय जनमाणसांचे आयुष्य व्यापले होते. ही चळवळ खऱ्या अर्थाने लोकांची होती व या चळवळीत लोकांना आत्यंतिक रस होता. अद्वैत रुपाच्या दृष्टीने प्रेम आणि भक्ती ही एकाच देवाभोवती गुंतलेली होती, ही संकल्पना पूर्णतः देव एकच आहे या तत्त्वाच्या कार्यप्रणालीवर आधारलेली होती. त्यातूनच या चळवळीचा प्रसार दक्षिण-उत्तर भारतात झाला होता.

अशा या भक्तीपंथ चळवळीची महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत.

१. **अद्वैतवाद :** प्राचीन कालखंडात लोक अनेक देव-देवतांची पूजा करत होत. अनेक देव आवताराना मानत होते. तीच प्रथा पुढे मध्ययुगीन कालखंडाच्या आंरभापर्यंत सुरु होती. परिणामी समाजामध्ये ईश्वरी स्वरुपाबाबत, संकल्पनेबाबत वाद निर्माण झाले होते. मात्र भक्तीसंप्रदयाने ईश्वर हा एकच आहे की संकल्पना लोकांच्या मनामध्ये रुजवण्यास सुरुवात केली. याही पुढे जावून या पंथातील लोकांनी या पंथात येणाऱ्या लोकांना एकाच ईश्वराची पूजा करण्याचा संदेश दिला. परिणामी हा घटक या संप्रदायाच्या महत्त्वपूर्ण वैशिष्ट्याचा एक भाग बनला.

२. **समर्पित भक्ती :** भक्ती संप्रदायाने ज्या प्रमाणे ईश्वराच्या एक स्वरुपाला महत्त्व दिले होते. त्याच प्रमाणे आपल्या संप्रदयात त्यांनी ईश्वर भक्तीला सुद्धा महत्त्व दिल्याचे दिसून येते. त्यांनी आपल्या संप्रदयात सहभागी होणाऱ्या प्रत्येक भक्तांना अंतःकरणपूर्वक भावनेने ईश्वराची भक्ती करण्याची विनंती केली आहे. याही पुढे जावून त्यांनी लोकांना असे सांगितले आहे की आपण ईश्वर भक्ती बरोबर ईश्वरासाठी प्रार्थना, भजने, स्तुतिस्त्रोत्रे जर गाईली तर ईश्वर कृपेने आपणास मोक्षप्राप्ती होऊ शकते. भक्तीसाठी ईश्वरावरील श्रद्धा महत्त्वाची आहे. त्या बाबतचे तत्त्वज्ञान या घटकात आहे.

३. **त्यागमय भक्ती :** भक्ती संप्रदायाने ईश्वराचे एकरुप, भक्ती मार्ग या गोष्टींना महत्त्व दिले आहे. याबाबतची माहिती आपण पाहिली आहे. या मुद्यात या संप्रदयाने त्यागमय भक्ती बाबत

सांगितले आहे. या संप्रदायात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने आपल्या जीवनातील ऐहिक इच्छा, आकांक्षा, व्यक्तीगत लोभ यांचा त्याग करावा व सत्मार्गाने ईश्वरभक्तीशी एकरुप व्हावे. असे केल्याने ईश्वराबरोबर एकरुपत्व मिळते. हे केवळ त्यागमय भक्तीनेच शक्य होते. म्हणूनच हा घटक या संप्रदयाच्या वैशिष्ट्याचा एक भाग बनला आहे.

४. **गुरुभक्ती :** भक्ती संप्रदायाने ज्या प्रमाणे ईश्वराच्या एकरुपाला महत्त्व दिले आहे. त्याच प्रमाणे गुरुच्या अस्तित्वाला व गुरुच्या मार्गदर्शनाला आपल्या संप्रदायामध्ये महत्त्व दिले आहे. या संप्रदायामध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक भक्ताने भक्तीसाधनेसाठी गुरु करावा या साठी प्रत्येक भक्ताने 'गुरुविण कौन बताये वाट' हे वचन लक्षात ठेवावे. देवाप्रत जाण्याची वाट गुरुच्या आशीर्वादाने चोखाळता येते हे भक्ताने विसरु नये. म्हणूनच हा घटक या संप्रदायाच्या वैशिष्ट्याचा एक भाग बनला आहे.

५. **जातिपंथास नकार:** भक्ती संप्रदायाने ईश्वराच्या एकरुप अस्तित्वाला व गुरुमार्गदर्शनाला महत्त्व दिले आहे. त्याचबरोबर सर्व समावेशक भक्तीपंथाला सुद्धा महत्त्व दिले आहे. ईश्वराला सर्व भक्त सारखे असतात. म्हणून या संप्रदायामध्ये सहभागी होणाऱ्या कोणत्याही भक्ताने जात-पात भेदभाव मानू नये. या संप्रदायात कोणत्याही जातीच्या लोकांचा-भक्तीचा समावेश होवू शकता असे सांगण्यात आले होते. परिणामी हा संप्रदाय मोठ्या प्रमाणात वाढण्यास मदत झाली. म्हणूनच हा घटक या संप्रदायाच्या वैशिष्ट्याचा भाग बनला.

६. **मूर्तिपूजेवर अविश्वास:** भक्ती संप्रदायाने ईश्वराच्या एकरुपाला मानले आहे. मात्र ईश्वराच्या प्रतिकात्मक रुप असणाऱ्या मूर्तिपूजेला अमान्य केले आहे. म्हणजेच या संप्रदायाने मूर्तिपूजेवर अविश्वास दाखवला आहे. या बाबत काही संताची मते विचारात घेणे आवश्यक आहे. संत नामदेव म्हणतात 'दगडाच्या मूर्तीमध्ये देव असता तर तुर्कानी मूर्ती फोडल्या तेव्हा त्या मूर्तीतील देव गप्प का बसला ?' कबीर म्हणतात 'दगडात देव असेल तर मी पर्वतांची पूजा करीन' किंवा गुरुनानक म्हणतात 'कोणत्याही आकाराच्या पुतळ्यात देव असत नाही. म्हणून मूर्तिपूजा करु नये.' या सर्व महान संताच्या विचार प्रणालीचा विचार करता या संप्रदायाने मूर्तिपूजेवर अविश्वास दाखविला होता असे दिसते. म्हणजेच या संप्रदायात मूर्तिपूजेला महत्त्व नव्हते. म्हणूनच हा घटक या संप्रदायाच्या वैशिष्ट्याचा एक भाग बनला होता.

७. **धार्मिक कर्मकांडास विरोध:** भक्ती संप्रदाय धार्मिक विचार जागृतीचा आगळा-वेगळा प्रवाह होता या संप्रदायास परंपरागत धार्मिक कर्मकांड अमान्य होता. म्हणूनच या संप्रदायाने धर्माच्या नावावर चालणाऱ्या यज्ञ, होम, हवन, बळी या गोष्टींना व धर्माच्या नावे चालणाऱ्या अनाचाराला, अत्याचाराला कडाडून विरोध केला म्हणजेच या संप्रदायाने स्वच्छ धर्मासंकल्पनेस विकसीत करण्याचा प्रयत्न केला. परिणामी हा घटक या संप्रदायाच्या वैशिष्ट्यांचा एक भाग बनला.

८. भक्तीसाठी ठरावीक भाषा नाही. भक्ती संप्रदायाने ईश्वर भक्तीला महत्त्व दिले होते. या भक्तीसाठी कोणत्याही एक भाषेची गरज नाही हे या संप्रदायाने आपल्या संप्रदायीक विचारात स्पष्ट केले होते. या बाबतीत अधिक स्पष्टीकरण करताना या संप्रदायाने असे म्हटले आहे की ईश्वरभक्तीसाठी भाषेपेक्षा भक्ती, साधना व श्रद्धा महत्त्वाची. ज्या भक्ताची जी भाषा असेल त्या भाषेत त्या भक्तांने साधना करावी. भाषा स्वातंत्र्याने असंख्य अनुयायी

या संप्रदायास प्राप्त झाले. या वेगळ्या विचार प्रवाहामुळे हा घटक या संप्रदायाच्या वैशिष्ट्याचा एक भाग बनला.

भक्तीसंप्रदाय ईश्वराच्या एकरुपाला मानणारा होता, ईश्वराच्या भक्तीसाधनेला मानणारा होता, ईश्वरासाठी त्यागमय भक्ती समर्पित करणारा होता. गुरुच्या अस्तित्वाला व मार्गदर्शनाला मानणारा होता, जातीपंथ नमानणारा होता, मूर्तीपूजेवर विश्वास ठेवणारा नव्हता, धार्मिक कर्मकांडास विरोध करणारा होता. एकसंघतेला व समाज विकास व परिवर्तनास महत्त्व देणारा होता. त्यामुळेच या संप्रदायास वेगळे अस्तित्व निर्माण झाले होते. व हा संप्रदाय वैशिष्ट्येपूर्ण बनला होता.

३अ.४ भक्तीपंथ चळवळीतील महत्त्वपूर्ण संत

मध्ययुगीन कालखंडात संतानी भक्तीमार्ग चळवळ वाढविली. या चळवळीचे क्षेत्र उत्तर-दक्षिण भारतात किंबहुना संपूर्ण देशात होते. या कालखंडातील संतानी आपल्या सुलभ काव्याच्या व अभंगाद्वारे लोकांना सदुपदेश करुन सामाजिक व धार्मिक सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. धर्माच्या बाह्य अवडंबरावर त्यांनी हल्ला चढविला. प्रेममय ईश्वरभक्ती ही मोक्षप्राप्तीचे प्रभावी साधन आहे असे सांगितले भक्तीमार्ग चळवळ ही सातत्याने चाललेली व सुत्रबद्ध चळवळ होती असे म्हणता येणार नाही तर वेळोवेळी होवून गेलेल्या संतांच्या प्रभावी विचारामुळे व मार्गदर्शनामुळे ही चळवळ चालू राहिली.

अशा या भक्तीपंथ चळवळीतील महत्त्वपूर्ण संतांची माहिती खालील प्रमाणे आहे. सर्व प्रथम आपण महाराष्ट्रातील भक्तीपंथ चळवळीतील संताची माहिती पहाणार आहोत तद्नंतर संपूर्ण भारतातील इतर संताची माहिती पहाणार आहोत.

अ) महाराष्ट्रातील भक्तीसंप्रदायातील संत:

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे भक्तीसंप्रदयाने महाराष्ट्रात जात, धर्म, पंथ विरहित मार्ग मोक्षप्राप्तीसाठी निवडला. त्यासाठी देवाची उत्कट भक्ती करणे आवश्यक आहे असे भक्तीसंप्रदायातील थोर संतानी आपल्या कृतीने सर्व समाजाला पटवून दिले. महाराष्ट्रातील हा संप्रदाय सामाजिकदृष्ट्या सखोल, उदार आणि एकात्म होता. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील जनतेच्या प्रेमभावना विठ्ठलाभोवती केंद्रीत झाल्या होत्या. पंढपूरचा विठोबा कृष्णाचे दुसरे रुप आहे. अशी सर्व लोकांची भावना झाली होती. या भक्तीपंथातून मराठी साहित्यवाङमयाचा विकास झाला होता, जातीपातीच्या शृखंला सैल होण्यास मदत झाली होती. सहिष्णुतेचे वारे वाहू लागले होते. स्त्रीयांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त होण्यास मदत झाली होती. पूजापाठा पेक्षा प्रेम आणि श्रद्धा यांची वाढ लोकांच्या मनात झाली होती आणि एकेश्वरवादाला चालना मिळाली होती.

महाराष्ट्रातील भक्तीसंप्रदायाचे 'वारकरी' व 'धारकरी' असे दोन पंथ मानले जातात. 'वारकरी' पंथ हा काहीसा सौम्य व समजुतदार तर 'धारकरी' पंथ काहीसा आक्रमक, व्यवहारी व वैचारिक बैठक पक्की असलेला होता. वारकरी पंथातील लोक दरवर्षी विठ्ठलाला भेटण्यासाठी जावून आपणास मोक्ष प्राप्ती मिळेल अशी आशा मनात ठेवतात. ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, एकनाथ हे वारकरी भक्तीसंप्रदायातील प्रमुख संत मानले जातात तर धारकरी पंथीय रामाची भक्ती करतात व त्याही पुढे जावून महाराष्ट्राविषयी विशेष प्रेम व्यक्त करतात. रामदास हे धारकरी पंथातील

सर्वश्रेष्ठ संत मानले जातात. या दोन्ही पंथातील संतांची माहिती आपण संक्षिप्त स्वरुपात पहाणार आहोत.

१) संत ज्ञानेश्वर: भागवत धर्माचा पाया घालणारे आद्य संत म्हणून संत ज्ञानेश्वराचे नाव घेतले जाते. गोदावरीच्या तीरी पैठणजवळ आपेगाव येथे १२७५ मध्ये ज्ञानेश्वरांचा जन्म झाला. बालपणापासूनच त्यांच्यामधील विलक्षण बुद्धीची चमक स्पष्टपणे जाणवत होती. 'भिंत चालवणे' 'पाठीवर मांडे भाजणे' या सारखे अनेक चमत्कार त्यांनी केल्याचे सांगितले जाते.

वयाच्या १६ व्या वर्षी भगवत गीतेवरील लिहिलेला 'ज्ञानेश्वरी' नामक ग्रंथ हा त्यांच्या विलक्षण बुद्धीसामर्थ्यातील वैचारिक चमत्कार होय. तेव्हा ज्ञानेश्वरीने मराठी अक्षर वाङमयात सर्वोच्य स्थान प्राप्त केले होते. माय मराठीत त्यांनी ज्ञानेश्वरी लिहून सर्वसामान्य लोकांपर्यंत भगवतगीतेचे तत्त्वज्ञान पोहचविले. आठशे वर्षापेक्षा जास्त वर्ष होऊनही आजही ज्ञानेश्वरीची लोकप्रियता यत्किंचितही कमी झाली नाही. आज ज्ञानेश्वरीचे अनेक भाषामध्ये अनुवाद झाले आहे.

मराठीमध्ये अध्यात्माची व भक्तीची श्रेष्ठता सांगणारे ज्ञानेश्वर हे पहिले संत आहेत. ज्ञानेश्वरी व्यतिरिक्त ज्ञानेश्वराने 'अमृतानुभव' 'आत्मानुभव' 'भावार्थ दीपिका' हे ग्रंथही लिहिले आहेत.

त्यांच्याकडे असणारे विलक्षण बुद्धीचातुर्य, ज्ञानसाधना, ज्ञानवाणी याच्या जोरावर त्यांनी आपले असंख्य अनुयायी निर्माण केले होते. त्यांचे अनुयायी सर्व जातीपंथातले होते. यज्ञयाग, धार्मिक कर्मकांड, पूजापाठ त्यांना अमान्य होता.

भजन, ओव्या गावून देवाच्या सानिध्यात जाणे, देवाची मनापासून भक्ती करणे, देवाची मनोभावे प्रार्थना करणे यातच जीवनाचे सार आहे अशी त्यांची धारणा होती. पंढरीच्या विठोबाच्या वारीसाठी जाणे हा त्यांचा परिपाठ होता. त्यांचा देव विश्वात्मक होता. पसायदानाच्या माध्यमातून प्रत्येक प्राणीजाताला जे हवे ते त्यास मिळावे अशी त्यांनी मनिषा व्यक्त केली होती. अशा हा अगाध ज्ञानी, श्रेष्ठ विठ्ठल भक्त वयाच्या २३ व्या वर्षी आपले अवतारकार्य संपवून पुण्याजवळ आळंदी येथे समाधिस्थ झाला. ज्ञानेश्वरी ग्रंथात केलेले पसायदान हे मानवतेचे दिव्य प्रतिक वाटते. त्यांचा ज्ञानेश्वरी ग्रंथ श्रोतृसंवाद, अमृतानुभव हा आत्मसंवाद, चांगदेव पासष्टी हा मित्र संवाद तर अभंगगाथा हा लोकसंवाद ग्रंथ मानला जातो.

२) नामदेव: ज्ञानेश्वराचे निष्ठावंत अनुयायी समजल्या जाणाऱ्या नामदेवाच्या जन्म इ.स. १२७० मध्ये पंढरपूर येथे एका शिंपी कुटुंबात झाला होता. ते ज्ञानेश्वरांपेक्षा वयाने ५ वर्षानी मोठे होते. असे असुनही ते ज्ञानेश्वरांना गुरु मानत होते. त्यांच्या वडिलांचे नाव दामाशेट्टी व आईचे नाव गोणाई होते. नामदेव विठ्ठलभक्त होते.

सर्व माणसे समान आहेत, देवाच्या प्राप्तीसाठी भक्ती हा एकमेव मार्ग आहे असा त्यांचा गाढा विश्वास होता. त्यांनी आपल्या भक्तीचा अविष्कार शेकडो अभंगामध्ये केला आहे. वारकरी संप्रदयातील ज्ञानेश्वरा प्रमाणेच विठ्ठलावर श्रद्धा असणारे ते प्रामाणिक व महान भक्त होते. संत ज्ञानेश्वर व गुरु विठोबा खेचर यांच्या उपदेशामुळेच त्यांची भक्ती डोळस बनली.

ज्ञानेश्वरांच्या मृत्युनंतर नामदेवानी त्यांचे तत्त्वज्ञान सर्व भारतभर प्रस्तृत करण्यासाठी मोठी भ्रमंती केली होती. त्यांनी मराठी बरोबरच हिंदी भाषेतही अनेक काव्यरचना केल्या आहेत. उत्तर भारतात त्यांनी भागवत धर्माचा प्रसार केल्यामुळे त्यांना तेथे हजारो शिष्य मिळाले. त्यांनी मराठी व हिंदी भाषेत हजारो अभंग रचले आहेत.

नामदेवाने या काळात कर्मकांडास विरोध केला. जातपात भेदभाव करणाऱ्यांना विरोध केला, सर्वच जातीच्या माणसांना भक्तीचा अधिकार दिला. बहुजन समाजातिल लोक त्यांच्या शिकवणीकडे आकर्षित झाले. शिखांचा धर्मग्रंथ 'गुरुग्रंथसाहेब' यात नामदेवाची अनेक हिंदी पदे समाविष्ट करण्यात आली आहेत. पंजाबातील त्यांचा अनुयायांनी 'घुमान' या ठिकाणी त्यांचे विशाल स्मृतीमंदिर बांधले आहे. नामदेवाचा देहांत पढंरपूर येथे झाला.

३) संत एकनाथ: भक्ती संप्रदायातील संत ज्ञानेश्वर, संत नामदेवा प्रमाणेच नावारुपाल आलेले तिसरे महत्त्वपूर्ण संत म्हणजे संत एकनाथ होय. संत एकनाथांचा जन्म १५३८ मध्ये गोदावरी नदीच्या काठी असलेल्या पैठण या ठिकाणी झाला. त्यांच्या लहान वयातच त्यांच्या आई वडिलांचा मृत्यु झाला. त्यांचे संगोपन त्यांचे आजोबा चक्रपाणी यांने केले. वयाच्या १२ व्या वर्षी त्यांना अध्यात्माची गोडी लागली. व त्यांनी जनार्दन स्वामींचे शिष्यत्व स्विकारले.

संत ज्ञानेश्वर, संत नामदेवा प्रमाणेच एकनाथानाही सामाजिक एकात्मतेची कास धरली. तत्कालीन समाजातील जात-पात, पंथभेद नष्ट करण्यासाठी प्रयत्न केले. प्रपंच करुन परमार्थ साध्य करता येवू शकतो. असा उपदेश त्यांनी सामान्यजनापर्यंत पोहचवीला.

पुजापाठ, धार्मिक विधीवर त्यांचा विश्वास नव्हता, सर्वसामान्य लोकांना अध्यात्मिक शिकवण द्यायची असेल तर ती त्यांच्याच भाषेत द्यायला हवी असे त्यांनी आपले मत प्रकट केले होते. त्यांनी मराठी भाषेत अनेक भजने, पदे, ओव्या लिहिल्या व वैशिष्ट्यर्पू दाखले देण्यासाठी भारुडे लिहिली. गरीब-श्रीमंत असा भेदभाव न करता दीन-दलित दु:खीतांची सेवा करावी, पशु-पक्षी, प्राणी यांच्यावर दया करावी असे त्यांनी आपल्या भारुडात व अभंगात प्रतिपादन केले. तसेच त्यांनी स्वत:ही या गोष्टी आचरणात आणल्या.

संत एकनाथाची अभंगे, भारुडे याशिवाय भागवत पुराण, 'एकनाथी भागवत' 'रुक्मिणी स्वयंवर' 'भावार्थ रामायण' अशा भाष्यवजा रचना ही केल्या आहेत. त्याचे पवित्र आचरण व लोकमानसात मिसळून अध्यात्माची शिकवण देण्याची हातोटी यामुळेच ते स्वत:च एक आपल्या विचारांचे उत्तम उदाहरण झाले होते. त्यांचा मृत्यू १५९९ मध्ये झाला.

४) संत तुकाराम : महाराष्ट्र भक्तसंप्रदाय चळवळीतील संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथा प्रमाणेच भक्तीमार्गाची कास धरणारे आणखी एक महत्त्वपूर्ण संत म्हणजे संत तुकाराम होय. संत तुकारामाचा जन्म एका वैश्य वाण्याच्या कुटुंबात पुण्या जवळील देहु येथे १६०८ मध्ये झाला लहाणपणापासूनच त्यांना धार्मिकेतेची आवड होती. ते पंढरपूरच्या विठ्ठलाचे गुणगान करणारी पदे व स्त्रोत स्वत: रचून ती गात फिरत असत. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ या महान संताप्रमाणेच संत तुकारामानेही भक्तीमार्गाची कास धरली होती. शेती, घर, दुकान स्वमालकिचे असूनही ते कधी संसारात रमले नाहीत. ते गावापासून दूर असणाऱ्या टेकडीवर जावून विठ्ठलाचे गुणगान करणारे स्वरचित अभंग गात असत व नामस्मरणात तल्लीन होत असत. आषाढी व कार्तिकी वारीत नियमित सामील होवून विठ्ठलाच्या दर्शनाला जात असत.

संत तुकाराम शिवाजी महाराजांचे समकालीन होते. तुकाराम महाराजांची किर्ती ऐकून शिवाजी महाराज खूप प्रभावित झाले होते. तुकाराम महाराजांचा आदर करण्यासाठी त्यांना भेटी-नजराणे पाठविले होते. पण तुकाराम महाराजांनी ते निरीच्छपणे स्वीकारले नाहीत.

संत तुकाराम महाराजांचे स्वरचित अभंग अत्यंत लोकप्रिय झाले होते. त्यांनी आपल्या किर्तनातून समाजातील अनिष्ट रुढी, दोष, अंधश्रद्धा, चुकीच्या समजूती यावंर बोट ठेवून समाज

प्रबोधनाचे, समाज सुधारणेचे महान कार्य केले. 'जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले, देव तेथेचि जाणावा' अशी तुकाराम महाराजांची शिकवण होती. महाराष्ट्रातील खेड्यापाड्यात त्यांनी अभंग भक्तीने गायले. त्यांच्या नंतर त्यांचे अभंग या खेड्यापाड्यातील लोक गावू लागले. मराठी साहित्य विश्वात या अभंगाना महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले. तीन-चार शतके उलटून गेल्यानंतरही संत तुकारामांच्या अंभगाची लोकप्रियता रीतभर ही कमी झाली नाही. अशा या महान संताचा मृत्यु १६५१ मध्ये झाला.

५) समर्थ रामदास : धारकरी पंथातील एक सर्वश्रेष्ठ संत म्हणून ज्यांचे नाव घेतले जाते. त्या समर्थ रामदासाचा जन्म गोदावरीकाठी असणाऱ्या जांब येथे १६०८ मध्ये झाला. त्यांचे मूळ नाव नारायण हे होते. प्रपंचात अडकून आपणास आपले जीवनकार्य पार पाडता येणार नाही याची त्यांना जाणीव झाली होती म्हणूनच ते लग्नाच्या बोहल्यावरुन निघून गेले आणि त्यांनी पंचवटीत तपःसाधना केली. नंतर ते श्रीरामाचे भक्त बनले. श्रीरामाचे ते दास बनले म्हणूनच त्यांनी स्वतःला रामदास हे नामामिधान घेतले. श्रीरामाचे लाडके सेवक असणाऱ्या हनुमानाचेही ते भक्त होते. हनुमान ही शक्तीची देवता असल्याकारणे त्यांनी अखंड ब्रम्हचर्य पत्करुन शक्तीची आराधना केली. तसेच त्यांनी श्रीराम व हनुमानाची अनेक मंदिरे महाराष्ट्रात स्थापन केली.

समर्थ रामदास शिवछत्रपतींचे समकालीन होते. शिवाजी महाराजांचे हिदवी स्वराज्य स्थापनेचे कार्य सुरु असतानांच महाराष्ट्रातील जनतेला जागृत करण्याचे तसेच जनतेला कार्यप्रवृत्त करण्याचे काम रामदासानी केले. जेव्हा मुस्लीम सत्तांनी हिदुंवर अन्याय सुरु केला होता तेव्हा रामदासानी महाराष्ट्रातील हिंदूना एक होण्याचे आवहान केले होते. महाराष्ट्र धर्म वाढविण्यासाठी कार्य केले होते. 'मराठा तितुका मिळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा' हा त्यांचा जनतेला मोठा संदेश होता. त्यांनी लोकांना ' आधी प्रपंच करावा नेटका ' ही प्रवृत्तीपर शिकवण देवून आपली कर्तव्य पार पाडण्यास लोकांना प्रवृत्त केले.

समर्थ रामदासांचा जनसामान्याना उपदेश करणारा 'दासबोध' हा ग्रंथ अनेक पिढ्यांना मार्गदर्शक ठरला आहे. त्यांचे कार्य महाराष्ट्राला व महाराष्ट्रातील जनतेला संघटनेचे महत्त्व सांगणारे आहे. 'सामर्थ्य आहे चळवळीचे' हे लक्षात ठेवून अन्यायाविरुद्ध सतत झगडणाऱ्यांना बळ देणारे आहे. अशा या तेजस्वी संताने १६८२ मध्ये सज्जनगडावर समाधी घेतली.

ब) भक्ती संप्रदायातील इतर संत:

दक्षिण व उत्तर हिंदुस्थानातील भक्तीसंप्रदायातील संत जात-पात, गरीब श्रीमंत, शिक्षीत-अशिक्षीत, साक्षर-निरक्षर असा भेदभाव मानत नव्हते. त्यांना उपनिषदातील अद्वैतवादाशीही काही देणे घेणे नव्हते. उलट त्यांच्याकडे उदात्त दृष्टीकोन होता. सर्वाभूती परमेश्वर आहे असे मानण्याची वृत्ती, तसेच त्यांच्या मनाचा मोठेपणा या गुणामुळे ते अत्यंत मनापसून स्विकारली होती. अशा या संप्रदायातील काही महत्त्वपूर्ण संतांची माहिती पुढील प्रमाणे आहे.

१) रामानुज: दक्षिणेतील एक थोर वैष्णव पंथीय संत म्हणून रामानुजांचे नाव घेतले जाते. १२ व्याशतकात त्यांनी लोकाद्धार करण्यासाठी त्यांनी देवभक्तीचा वापर केला. यांना भक्तीमार्गाचे जनक मानले जाते. त्याचा जन्म दक्षिण भारतात १०१६ मध्ये झाला. कांची येथे त्यांनी शिक्षण संपादन केले. त्रिचन्नापल्ली जवळील श्रीरंगम या गावी राहून त्यांनी चिंतन केले. त्यांनी वेदांत सारम, वेदांत संग्रहम, भगवतगीता की टीका, वेदांत दीपक व त्रीभाष्य हे ग्रंथ लिहिले. त्यांनी शंकराचार्याचा मायावाद व अद्वैतवादाचे खंडन करुन त्या जागी विशिष्ट द्वैतवादाचा प्रसार केला. सगुण उपासनेवर त्यांनी भर दिला. सगुण ब्रम्हाची प्राप्ती करण्यासाठी

त्यांनी भक्तीमार्गाची कास धरा असा सल्ला दिला. कर्मयोगावर त्यांनी भर दिला. ब्रम्ह व आत्मा हे वेगवेगळे आहेत असे प्रतिपादणारे ते पहिले भक्तीमार्गी संत होते. ते विष्णू पुजक होते. देशातील निरनिराळ्या ठिकाणी ७०० वैष्णव मठांची त्यांनी स्थापना केली होती. तिरुपती या ठिकाणी त्यांनी वैष्णवधर्माचे केंद्र बनविले होते. त्यांनी कनिष्ठ जातीतील लोकांनाही परमेश्वर भक्तीचा मार्ग खुला केला होता. त्यांचा संप्रदाय श्री संप्रदाय या नावाने ओळखला जात होता. डॉ. युसूफ हुसैन म्हणतात, "रामानुजाचार्य मध्यकालीन संतांचे मार्गदर्शक होते. समाजसुधारणेच्या दृष्टीने त्यांचे कार्य महत्त्वपूर्ण होते."

२) रामानंद: उत्तर भारतातील एक महान संत म्हणून रामानंदाचे नाव घेतले जाते. त्याने जात, पात, धर्म, लिंग, जन्म असा भेदभाव न करता भक्तीची कवाडे सर्वानाच खुली केली. तो रामभक्त होता. 'देवाप्रती पूर्ण प्रेम' व 'सर्वाभूती बंधुता' ही दोन तत्त्वे त्यांनी प्रतिपादन केली. लोकभाषा हिंदीतून त्यांनी आपली शिकवण लोकांना दिली. जाती-जातीतील बंधने सौम्य करुन त्याने देवासमोर शूद्र हेही समान आहेत, धर्म ही संकल्पना श्रद्धेची, भावनेची गोष्ट आहे. तथाकथित हलक्या जातीतील माणसालाही देवभक्ती करता येते आणि कोणाच्याही मध्यस्थी शिवाय त्याला देवाप्रत पोहचता येते या गोष्टी सांगितल्या. रामानंदाचे पहिले बारा अनुयायी विविध जातीपंथाचेच होते. चांभार रविदास, कोष्टी कबीर, जाट शेतकरी धन्ना, न्हावी सेना, रजपूर पिपा, भावानंद, सुखानंद, आसानंद, सूरसुरानंद, परमानंद, महानंद आणि श्रीआनंद या बारा अनुयायानी रामानंदाची शिकवण सर्वत्र प्रसृत केली.

३) रविदास: रामानंदाचा सर्वात जास्त प्रसिद्ध अनुयायी म्हणून रविदासकडे पाहिले जाते. रविदास हा जन्माने चांभार होता. मात्र त्याचे धार्मिक आचरण अत्यंत शुद्ध व पवित्र होते. गुरु ग्रंथसाहिब या शिख ग्रंथात रविदासाच्या तीसहुन अधिक रचनांचा समावेश करण्यात आला आहे. कबिराने सुद्धा आपल्या दोह्यात रविदासाचा आदरपूर्वक उल्लेख केला आहे. "देव आपल्या ह्रदयात असतो, त्याच्या प्राप्तीसाठी कोणतीही धार्मिक विधी वा कर्मकांड करण्याची गरज नाही, ज्याला देवभेटीची अत्यंतिक तळमळ आहे त्यालाच देव भेटतो आणि आयुष्यातील सर्वात महत्त्वाचे धार्मिक कार्य म्हणजे मानव सेवा होय." अशी रविदासाची शिकवण होती.

४) कबीर: मध्ययुगीन कालखंडातील एक श्रेष्ठ संत म्हणून कबीराकडे पाहिले जाते. कबीर रामानंदाचा अनुयायी होता. रामानंदाने उभारलेल्या जाती पंथा विरुद्धच्या लढ्याने कबीर प्रभावित झाला होता. म्हणूनच हे कार्य पुढे नेण्यासाठी त्यांनी तत्कालीन भारतीय समाजात धार्मिक व राष्ट्रीय सुसंवाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. कबीर रुढार्थाने देव मानणारा आस्तिक व चिंतनशील तत्त्वज्ञानीही नव्हता. तो जगाला शिकवण देणारा एक शिक्षक होता. 'भक्ती' ही कबीराच्या शिकवणीची मध्यवर्ती कल्पना होती. कबीराच्या शिकवणीतीला महत्त्वाची तत्त्वे अशी होती.

१) जातीपंथ भेदास नकार

२) हिंदू धर्मातील षडदर्शने, चातुवर्ण्य यास पूर्ण विरोध

३) भक्तीशिवाय धर्म अशक्य

४) भजनाविना उपासतपास, दानधर्म निरर्थक

कबीराने आपल्या तत्त्वज्ञानातून हिंदू-मुसलमानाना समान शिकवण दिली. त्याला ते योग्य वाटेल तेच त्यांनी जाहिरपणे सांगितले. धार्मिक कर्मकांडाला त्यांनी कसून विरोध केला. तिर्थक्षेत्रांची

यात्रा करणे हा त्यास अंधश्रद्धाळूपणा वाटत असे सती, पडदा पद्धती इत्यादी प्रथांची कबीराने आपल्या दोह्यात खिल्ली उडवली आहे. ब्राम्हणवर्णाच्या श्रेष्ठत्वाला त्यांनी विरोध केला आहे. पुर्नजन्माच्या कल्पनेची त्यांनी खिल्ली उडवली आहे. माणसाची जन्मा नंतर जात ठरते. मात्र जन्माला येताना मानव एकाच प्रकाराने जन्माला येतो. तद्वत दोघेही समान आहेत असे त्यांनी प्रतिपादन केले. गरीब श्रीमंत, उच्च-निच हे भेदभाव करु नका असे सांगितले आहे. हिंदू व मुसलमानात बंधूभाव निर्माण होण्यासाठी त्यांनी आपल्या आयुष्यात आटोकाट प्रयत्न केले. परिणामी त्यास दोन्ही धर्माचे अनुयायी मिळाले.

कबीर हा संसारी संत होता. त्यांनी मानवी जीवनासाठी सदाचाराचे नियम सांगितले व स्वत: ते नियम कटाक्षाने आचरणात आणले. त्याचे जीवन अगदी साधेसुधे होते. प्रत्येकाने श्रम करुन उदरनिर्वाह करावा एकमेकांना सहकार्य करावे, मदत करावी. अनावश्यक धनसंपत्ती कोणी साठवू नये, साठवलीच तर त्याचा वापर मानवतेच्या सेवेसाठी करावा. व्याव्हारीक सत्याचे ज्ञान त्यांनी सर्वसामान्य लोकांपर्यत पोहचवीले कबीराची शिकवण साधी होती. शिकवणीसाठी प्रसंगी त्यानी लोकभाषेचा वापर केला. कबीराचे शिकवणीतील शब्द जरी साधे असले तरी त्या शब्दांचा अर्थ गहन असे. कबीराच्या मृत्युनंतर हिंदू आणि मुस्लिम धर्मियांनी कबीराची वेगवेगळी स्मारके उभारली. 'कबीराचे दोह' अक्षर वाङमयात मोडणारे असून भक्तीसंप्रदायातील थोर शिकवण त्यात ग्रंथीत करण्यात आली आहे.

५) मलूकदास व दादू : हे कबीराचे महान शिष्य होते या शिष्यांनी कबीराची शिकवण संपूर्ण उत्तर हिंदुस्थानात प्रसृत केली. दादूचे शिष्य सुंदरदास व रज्जब यानीही कबीराच्या शिकवणीचा प्रसार करण्याचे कार्य पुढे सुरु ठेवले.

६) गुरु नानक: उत्तर हिंदुस्थानात रामानंदाने भक्तीसंप्रदाय चळवळीचा आरंभ केला. नंतर उत्तर हिंदुस्थानात या चळवळीस गुरु नानकांच्या रुपाने दुसरा उत्कट भक्त मिळाला. देवाला प्रसन्न करुन घेण्यासाठी त्याची मनोभावे भक्ती करावी या संकल्पनेचा विकास होत असतानाच नानकाचे व्यक्तीमत्त्व घडत होते. या भक्तीतूनच एका नव्या शिकवणीचा जन्म झाला. भारतीय समाजाला वेगळी दिशा देणारा नवा 'शीखधर्म' गुरु नानक यांनी स्थापन केला. हिंदु आणि मुसलमान या दोहोंना एकत्रीत आणणारा तसेच त्यांच्यात एकतेची भावना निर्माण करणारा हा धर्म होता. देवासाठी त्यांनी राम, गोंविद, हरी, मुरारी, रब, रहिम, अशी दोन्ही धर्मातील नावे आपल्या धर्मातील देवासाठी उपयोगात आणली. दोन्ही समाजातील भेद दर्शविणाऱ्या कृत्रीम भिंती नष्ट करुन त्यांना एकच धर्म प्रस्थापित करावयाचा होता.

गुरुनानकाची शिकवण :

- जातीपातीचा विचार करणे मुर्खपणाचा आहे.
- माणसाची प्रतिष्ठा त्याच्या स्थानापेक्षा त्याच्या भावभक्तीच्या उत्कटतेवरुन ओळखावी.
- देव मानवाचे गुण जाणतो, तो मानवाच्या जातीची दखल घेत नाही.
- देव आकार नसलेला 'निरंकार' आहे.
- मूर्तीपूजा निषेधार्ह आहे.
- अंधश्रद्धा म्हणजे सांस्कृतिक मागासलेपणा आहे.

- अंधश्रद्धेपासून धर्ममूल्य वेगळी आहेत.
- समाजात भिती निर्माण करणारी अस्पृश्यता नष्ट केली पाहिजे.
- सद्गुणाशिवाय भक्ती शक्य नाही.
- सत्य श्रेष्ठ आहेच पण त्याहूनही सत्याचे आचरण श्रेष्ठ आहे.
- भक्तीचा एक मार्ग म्हणजे देवाचे नामस्मरण होय.
- सत्याच्या शोधात असणाऱ्याने देवाचे सतत स्मरण केले पाहिजे व त्यासाठी सर्वस्वाचा त्याग केला पाहिजे.
- देवाचा शोध बाहेर करु नका देव तुमच्या ह्रदयात आहे.
- सत्य बोला म्हणजे आपल्यातील देवाची प्रचिती येईल.
- सर्वशक्तीमान वास्तव म्हणजेच देव होय.

गुरुनानक यांना उत्तम शिक्षण मिळाले होते. पंजाबी शिवाय त्यांना हिंदी व फारशी भाषा येत होत्या त्यांनी धर्म कार्यासाठी भारतभर प्रवास केला होता. या प्रवासात त्यांना भारतातील अनेक जाती, धर्म, पंथ, चालीरीतीचा परिचय झाला. त्यांनी अनेक स्फूर्तीदायक कवने लिहिली. त्यांची कवने नंतर 'अदिग्रंथ' या ग्रंथात प्रसिद्ध झाली. लहानपणापासूनच त्यांची प्रवृत्ती वैराग्याकडे होती. वयाच्या ३० व्या वर्षी त्यानी गृहस्थाश्रमाचा त्याग करुन वैराग्य धारण केले. त्यानी शीख धर्माची स्थापना केली. त्यानी एकेश्वरवादाचा पुरस्कार केला. व ईश्वराची निर्गुण उपासना श्रेष्ठ मानली गुरुनानकांनी तीर्थयात्रा, जपजाप्य, ब्रम्हावडंबर उच्चनिच भेदभाव व जातिभेदाचा धिक्कार केला. हिंदु-मुसलमानात समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. १५३९ मध्ये पंजाबात त्यांचा देहांत झाला.

७) चैतन्य महाप्रभू: भक्तीसंप्रदाय चळवळीतील एक महान संत म्हणून बंगालमधील चैतन्य महाप्रभूंना ओळखले जाते. त्यांच्या जन्मापूर्वी भक्ती संप्रदायाचा एक घटक असलेला वैष्णव पंथ बंगालमध्ये अस्तित्वात होता. पंरतू चैतन्य महाप्रभूनी वैष्णवपंथास एक नवी दृष्टी दिली. व या पंथास बंगाल व ओरिसामध्ये अत्यंत लोक प्रियता मिळवून दिली. चैतन्यप्रभूचे मूळ नाव विश्वंभर आणि त्यांचा जन्म नवद्वीप येथे फेब्रुवारी, १४८६ मध्ये झाला.

चैतन्य महाप्रभू अत्यंत हुशार होते. संस्कृत, व्याकरण, तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र, साहित्य या विषयामध्ये त्यांनी प्राविण्य मिळवीले होते. त्यामुळेच त्यांना 'विद्यासागर' ही उपाधी मिळाली होती. त्यांनी वयाच्या २२ व्या वर्षी ईश्वरपूरी या साधूकडून सन्यास 'दीक्षा' घेतली. सन्यासदीक्षेनंतर चैतन्याची सर्व सांसरिक व ऐहिक बंधने गळून पडली. व तो मुक्त झाला.

चैतन्य महाप्रभू सर्वोच्य स्थानी असणाऱ्या देवाची अंत:करणपूर्वक भक्ती करत होते देवास ते 'कृष्ण' व 'हरी' असे मानत. कोणत्याही धार्मिक विधीवर त्याचा विश्वास नव्हता. त्यांची देवभक्ती उत्कट होती. गीत, संगीत, नृत्य, या जल्लोषात ते देवासमोर तल्लीन होत असत 'कृष्ण' हाच पूर्ण परमेश्वर आहे असा त्यांना विश्वास वाटत होता. त्यांनी हे कार्य करत असताना हजारो अनुयायी मिळविले. आयुष्याच्या अखेरीस ते पुरी येथे वास्तव्यास आले. तेथेच त्यांचा १५३३ मध्ये मृत्यु झाला.

८) संत मीराबाई : १६ व्या शतकातील संतशिरोमणी म्हणून संत मीराबाईचे नाव घेतले जाते. मीराबाईचा जन्म राज्यस्थानातील मर्ता जिल्ह्यातील कुडवी या गावी १४९८ मध्ये झाला. राणा संगाचा थोरला मुलगा व राज्याचा वारस भोराजा याच्याशी मीराचा विवाह झाला होता. तीचे वडील आजोबा यांच्या वंशपरंपरेने कृष्णभक्ती तीच्याकडे आली. पतीच्या मृत्युनंतर तिने स्वतःला कृष्णभक्तीमध्ये झोकून दिले. तिच्या उत्कट कृष्णभक्तीमुळे राजपुताण्यातील सर्व थरातील स्त्री-पुरुष चितोडकडे ओढले गेले. भक्त संप्रदायातील एक सर्वश्रेष्ठ संत म्हणून तिची ख्याती दूरवर पसरली होती.

मीराबाईची भजने, भक्तीगीते सर्व उत्तर हिंदुस्थानात प्रसिद्ध झाली होती. तिची काही पदे व्रज व काही राज्यस्थानी भाषेत लिहिली गेली आहेत. तिची पदे अति भावनेने व कृतज्ञतेने भरलेली आहेत. त्यामुळे तिची कृष्णभक्ती सर्वकालिक व अमर स्वरुपात चिरंतन झाली आहे.

मर्ता संस्थान जोधपूरच्या मार्लदेवने जिंकून घेतल्या नंतर ती कृष्णचरणी लीन होण्यासाठी द्वारकेला गेली व तेथेच तिने १५४६ साली देह ठेवला.

९) वल्लभाचार्य : वैष्णव पंथातील कृष्णभक्ती अनुसरणारा वल्लभाचार्य याचा जन्म वाराणशी येथे झाला. कृष्णभक्तीची आवड असणाऱ्या वल्लभाचार्याने सर्व भारतभर संचार करुन वृदांवन येथे स्थायिक होवून कृष्णभक्तीच्या पंथाचा प्रसार सुरु केला. कबीर व नानक यांच्या प्रमाणेच संसारात राहूनच त्यांनी कृष्णभक्ती केली. त्यांनी संस्कृत व व्रज भाषेत अनेक ग्रंथ लिहिले.

वल्लभाचार्याचा मते देव प्राप्ती हा एकट्याने अनुसरण्याचा मार्ग असून त्यासाठी कृष्णाची भक्ती हा एकमेव उपाय आहे. 'मुक्ती' मिळविण्यासाठी देवाची 'पुष्टी' प्राप्त करुन घेतली पाहिजे. कृष्णभक्ती निर्हेतुक केली पाहिजे. मात्र अशा प्रकारच्या भक्तीतून फलप्राप्तीची अपेक्षा बाळगू नये. अशी श्रीनाथजी म्हणजे वल्लभाचार्यांची श्रद्धा होती.

१०) सूरदास : कृष्ण आणि राधा यांची भक्ती करणारे सुरदार होते. सगुण रुपात आलेल्या कृष्णाच्या भक्तीशिवाय मोक्षप्राप्ती शक्य नाही असे सुरदासाचे मत होते. 'सूर सरावली' 'साहित्य रत्न' व 'सूर सागर' या सूरदासाच्या तीन प्रसिद्ध काव्यग्रंथात त्यांनी कृष्णाची भक्ती किती उत्कटतेने आळवलेली आहे हे लक्षात येते. कृष्णाच्या बाललीलांचे वर्णन करताना त्याने बालमानसशास्त्राचे जे ज्ञान व्यक्त केले आहे त्यास तोड नाही सूरदासाच्या काव्य रचनांचा फार मोठा प्रभाव तत्कालीन जनमानसांवर झाल्याचे दिसून येते.

११) तुलसीदास: सूरदासा इतकाच उत्कट व कवीमनाचा संत म्हणून तुलसीदास ख्यातनाम आहे. सुर्यपूरियन ब्राम्हण कुटुंबात तुलसीदासाचा जन्म १५३२ मध्ये वाराणशी येथे झाला. पत्नी रत्नावली हिने केलेली त्याची निर्भत्सना त्यास कृष्ण भक्तीकडे घेवून गेली. त्यांनी आपली काव्यरचना 'रामचरितमानस' या काव्याने रचण्यास सुरुवात केली. या शिवाय त्यांनी गीतावली, कवीतावली, विनयपत्रिका इत्यादी काव्यरचना केल्या. तुलसीदास रामभक्त होता. त्यांनी आपल्या देवतेची 'राम' स्तुतिकाव्य इतकी सुंदर लिहिली आहेत की त्यांनी रामाचे नवे रुपच जनूकाही लोकांच्या समोर उभे केले आहे. राम हा एक आवतार आहे आणि भक्ती केल्यास भक्ताला रामरुप प्राप्त होवू शकते असे तुलसीदासाचे म्हणणे होते 'रामचरित्र मानस' हा त्यांचा काव्यग्रंथ हिंदी साहित्यक्षेत्रातील सर्वोत्कृष्ट रचना समजली जाते. 'रामचरित मानस' व 'विनयपत्रिका' या ग्रंथ रचनेमुळे तुलसीदासाची वैष्णवभक्ती उत्तर हिंदुस्थानातील प्रत्येक माणसाच्या हृदयात जावून पोहचली होती. त्यांचा वयाच्या ९१ व्या वर्षी मृत्यु झाला.

धर्म सुधारणा, समाज सुधारणा अशा दुहेरी उद्देशाच्या साधतेसाठी भारतातील मध्ययुगीन कालखंडातील संतानी महत्वपूर्ण भूमिका बजावली. महाराष्ट्रातील भक्तीसंप्रदायातील संता पैकी ज्ञानेश्वर महाराजानी या संप्रदायाचा पाया घातला तर नामदेव, एकनाथानी या संप्रदायाची इमारत विस्तारीत स्वरुपात उभी केली तर या इमारतीवर कळस चढविण्याचे काम तुकाराम महाराजांनी केले.

संपूर्ण भारताचा विचार करत असताना रामानुज, रविदास, कबीर, मलूकदास, गुरुनानक, चैतन्य महाप्रभू, मीराबाई, वल्लभाचार्य, सूरदास, तुलसीदास या संतांनी संपूर्ण भारतभर ईश्वराच्या एकरुपी अस्तित्वाला मानत भक्तीसाधनेला महत्त्व देत जात, धर्म, पंत, रीती रिवाज, अंधश्रद्धा, कर्मकांड, या विरुद्ध आवाज उठवून समानतेचे तत्त्व भक्तीभावात व समाजात रुजविण्यासाठी प्रयत्न केले. त्याच्या या निस्वार्थी सेवेमुळे आजही या महान संतांचे स्थान समाजत अढळ आहेत. आजही त्यांची ज्ञान साधना, ग्रंथ, तत्त्व, कार्य, समाजाच्या दृष्टीने मार्गदर्शक व प्रेरक आहेत.

३अ.५ भक्तीपंथ चळवळीचे परिणाम

मध्ययुगीन कालखंडात भारतात घडून आलेली भक्तीपंथ चळवळ ही एक अतिशय महत्वपूर्ण चळवळ मानली जाते. या चळवळीने अतिशय प्रभाविपणे कार्य केले. हिदुं धर्म व समाजातील दूषीत प्रवृत्ती, कर्मकांड, जातीयता नष्ट करण्याचा प्रयत्न या चळवळीने केला. ही लोकचळवळ होती. या चळवळीमुळे सर्वसामान्य लोकांच्या मनामध्ये भक्तीमार्गाबाबत मोठ्या प्रमाणात आस्था निर्माण झाली. डॉ. श्रीवास्तव यांच्या मतानुसार "भक्तीमार्ग चळवळ हे एक जन आंदोलन होते. त्याने लोकांना खोलवर प्रभावीत केले होते. बौद्ध धर्माच्या पतनानंतर भक्ती आंदोलनासारखे देशव्यापी आंदोलन आपल्या देशात झाले नाही."

या चळवळीचे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष व दूरगामी परिणाम भारतीय समाजावर घडून आले या परिणामांची माहिती खाली नमुद करण्यात आली आहे.

- **समाज परिवर्तन:** भक्तीमार्ग पंथाने समाजातील ढोंगी लोकांची ढोगंबाजी, धार्मिक अवडंबर, कर्मकांड, मुर्तिपूजा, व्रतवैफल्य, जातीभेद, मद्यपान या वाईट गोष्टींना विरोध केला. तर याहीपुढे जावून संतचरित्र व अंत:करण शुद्धतेला महत्व दिला. त्यामुळे सामाजिक सुधारणेला उत्तेजन मिळाले त्याचा फायदा तत्कालीन समाजास होवून समाज परिवर्तनास मदत झाली.

- **हिंदु-मुस्लिम समन्वय:** मध्ययुगीन कालखंडातील गुरुनानक, कबीर व दादू यासारख्या निर्गुणोपासक संताच्या प्रयासामुळे हिंदू व मुसलमान या दोन्ही धर्मातील वैषम्य व कटुता बरीच कमी झाली. या दोन्ही धर्मांना एकत्र आणण्याची महत्वपूर्ण कामगीरी या संतानी केली. परीणामी या दोन धर्मातील संघर्ष कमी होण्यास मदत झाली.

- **प्रादेशिक भाषेत साहित्य निर्मिती:** भक्तीपंथ चळवळीतील सर्वच संत उत्तम प्रकारचे साहित्यिक व कवी होते. आपल्या भक्तीपंथाचे विचार सामान्य लोकांना कळावेत, सामान्य लोकांपर्यंत पोहचावेत म्हणूनच त्यांनी लोकांच्या भाषेतून, प्रादेशिक भाषेतुन आपले वाङमय तयार केले. हिंदी, मराठी, गुजराती, राजस्थानी, बंगाली. या भाषेतून या काळात विपूल वाङमय तयार झाले होते. ज्या परिसरात ज्या भाषा प्रचलीत होत्या. त्या परिसरात त्या

प्रकारच्या वाङमयाची निर्मिती केली जात होती. परिणामी त्या लोकांना ते वाङमय समजणे सोपे जात असे. म्हणजेच लोकभाषेची गरज व प्रबोधनाचे उद्दिष्ट्ये नजरेसमोर ठेवून तत्कालीन संतानी या माध्यमाचा चांगला वापर केल्यांचे दिसून येते. या माध्यमाचा परिणाम तत्कालीन समाजावर चांगला झाला होता

- **हिंदूना आशावादी दिलासा :** मध्ययुगीन कालखंडात हिंदूवर झालेली इस्लामांची आक्रमणे. त्यांच्या सत्ता स्थापनेनंतर सुरु झालेला इस्लामी सत्तेचा सततचा त्रास या गोष्टीमुळे हिंदू त्रस्त झाले होते. मात्र या कालखंडात सुरु झालेल्या भक्तीमार्गाने या लोकांना दिलासा दिला. या चळवळीने परमेश्वर व भक्ती या दोन गोष्टींना महत्त्व दिले होते. म्हणूनच या लोकांना असा आशावाद वाटत होता की परमेश्वर आज ना उद्या या संकटातून आपले रक्षण करेल. चळवळीतील काही लोकांनी याला पलायनवाद म्हटले आहे मात्र ही टीका बरोबर नाही असे काही तज्ञांचे मत आहे.

- **जातीप्रथेला विरोध :** भक्तीमार्ग चळवळीतील सर्व संतानी सामाजिक समतेचा पुरस्कार करत प्रचलीत जाती प्रथेला विरोध केला. परिणामी कनिष्ठ जातीतील लोकांना मोक्षाचे दरवाजे मोकळे झाले. परमेश्वर हा एक आहे, सर्वश्रेष्ठ आहे, त्याच्या दरबारात उच्च-नीच असा भेदभाव नाही हे सर्व संतानी लोकांना पटवून दिले. कोणत्याही व्यक्तीला परमेश्वराची भक्ती करण्याचा अधिकार आहे, त्यास मोक्ष आहे, त्यास परमेश्वर प्राप्ती होवू शकते असे या संतानी सांगितले. परिणामी सर्वच जातीना समानतेची वागणूक मिळाली. त्यामुळे हा परिणाम तत्कालीन समाजाच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरला.

- **ऐक्यभाव वाढ:** भक्तीमार्ग चळवळ ज्याच्या ठिकाणी वाढली त्या त्या ठिकाणी ऐक्यभाव निर्माण झाला. पंजाब, महाराष्ट्र, बंगाल, गुजरात इत्यादी प्रदेशात जनजागृती घडून आली. स्वत:च्या संस्कृतीचा आणि धर्माचा अभिमान वाढीस लागला. त्यामुळे मुसलमानी अत्याचार हिंदुनवर कमी होवू लागले. जबरदस्तीने हिंदूना बाटवून मुसलमान करण्याचे प्रकार कमी झाले. या भक्तीमार्ग चळवळीमुळे हिंदुमध्ये एक नवीन प्रेरणा निर्माण झाली. भक्तीमार्ग चळवळीचे तत्कालीन कालखंडात सर्वच क्षेत्रावर परिणाम घडून आल्याचे दिसते. धार्मिक, सामाजिक, राजकीय, साहित्य, वाङमय या दृष्टीने परिवर्तन झाल्याचे जाणवते. या चळवळीला लाभलेल्या कार्यक्षम संताच्या नेतृत्वाने ही चळवळ तर प्रभावशाली ठरलीच पण या चळवळीने तत्कालीन समाजावरही मोठ्या प्रमाणात प्रभाव निर्माण केला.

३अ.६ सारांश

भक्तीपंथ चळवळ ही मध्ययुगीन कालखंडातील एक महत्त्वपूर्ण चळवळ या चळवळीचा उगम तत्कालीन अनिष्ठ प्रथा, रीती, रीवाज राजकर्त्याचा दुबळे पणा, परकीय राजकर्त्यांचे अत्याचार, धार्मिक चूकीचे कर्मकांड यामुळे झाला.

या चळवळीला लाभलेले महान संत या संतानी तत्कालीन समाज प्रबोधनासाठी केलेल कार्य, समाजानी त्यांच्या ज्ञानाची केलेली कदर तसेच समाजामध्ये घडून आलेले बदल याचे श्रेय या संताना द्यावेच लागेल. या चळवळीतील संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत रामदास हे महाराष्ट्रातले नामवंत संत. तसेच रामानुज, रामानंद, रविदास, कबीर, मलूलदास, दादू, गुरुनानक, चैतन्य महाप्रभू, संत मिराबाई, वल्लभाचार्य, सुरदास तुलसीदास हे

संपूर्ण भारताशी समधीत असणारे संत या सर्व संत महात्म्यानी तत्कालीन भारतीय समाजातील अज्ञान दूर करुन भारतीय समाजाला ज्ञानी बनविण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली.

या चळवळीच्या प्रभावाने समाज परिवर्तन, हिंदु मुस्लिम समन्यवय, प्रबोधनपर वाङमय निर्मिती, आशावाद, दिलासा. अनिष्ठ प्रथा बिमोड, ऐक्यभाव वाढ आदी चांगली परिवर्तने घडवीली.

सुफी संप्रदायाचा उगम, उत्कर्ष, तत्त्वज्ञान व प्रभाव हे इस्लाम चळवळीशी संबधीत घटक या चळवळीची अधिक माहिती स्पष्ट करतात.

३अ.७ प्रश्न

१) भक्तीपंथ चळवळीच्या उदयास जबाबदार कारणांचा आढावा घ्या.

२) भक्तीपंथ चळवळीची ठळक वैशिष्टे स्पष्ट करा.

३) भक्तीपंथ चळवळीतील संताची संक्षिप्त माहिती लिहा.

४) भक्तीपंथ चळवळीचे परिणाम विषद करा.

५) सुफी संप्रदायाच्या उगमाची माहिती सांगून या संप्रदायाचे तत्वज्ञान स्पष्ट करा.

३अ.८ संदर्भ

१) मध्ययुगीन भारत – प्रा. गजानन भिडे
डॉ. विजय नलावडे
डॉ. वैजयंती नाईकनवरे

२) समग्र भारताचा इतिहास – प्राचार्य य. ना. कदम.

३) मध्ययुगीन भारताचा इतिहास – डॉ. श. गो. कोलारकर

४) मुघल भारत – प्राचार्य कदम – देशपांडे.

५) मराठेकालीन संस्था व विचार – गायकवाड, सरदेसाई थोरात. हनमाने.

६) मराठ्यांचा प्रशासकीय सामाजिक व आर्थिक इतिहास – प्रा. बी. एस. सावंत. प्रा. जाधव.

❖❖❖❖

mumbes.in

३ब

सुफिवाद / सुफि पंथ

घटक रचना :

३ब.० उद्देश

३ब.१ प्रस्तावना

३ब.२ सूफि पंथाचा उदय

३ब.३ सूफि पंथाचे वैशिष्ट्ये

३ब.४ संकल्पना आणि सूफिवादाची शिकवण

३ब.५ सिलासिला किंवा सूफि पंथाच्या शाखा

- ३ब.५.१ चिश्ति पंथ
- ३ब.५.२ सुहरावर्दी पंथ
- ३ब.५.३ दख्खनमधील सूफि संप्रदाय

३ब.६ भक्ति पंथ आणि महाराष्ट्रातील सूफि संप्रदाय

३ब.७ समारोप

३ब.८ प्रश्न

३ब.९ संदर्भ

munotes.in

३ब.० उद्देश

- भारतातील सूफि संप्रदायाचा उगम व तत्त्वज्ञान अभ्यासणे.
- भारतातील सूफि संप्रदायाचा स्वरूप अभ्यासणे.
- विद्यार्थ्यांना सूफि संप्रदायाची संकल्पना व सिलसिलो (उपशाखा) समजावून सांगणे.
- सूफि संप्रदायाचे इतर धर्मियांशी संबंध तपासणे.
- दख्खन मधील सूफि संप्रदायाचा प्रसार अभ्यासणे.
- महाराष्ट्रातील आध्यात्मिक संश्लेषण (देवाणघेवाण) अभ्यासणे.

३ब.१ प्रस्तावना

मध्यकालीन भारतातील इस्लामचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट हे सूफि संप्रदाय होते. मध्यकालीन इतिहासाने धार्मिक अट (झाविया), मुस्लिम धार्मिक चळावळी, पंथ आणि विचारप्रवाह पाहिले होते. यातील इस्लामी गुढवाराला सूफिवाद किंवा सूफि चवळ म्हटले जाते. इस्लामच्या भारतातील आगमनाच्या वेळी हिदू - मुस्लिम संस्कृतिचे देवाणघेवाण झाली होती. अनेक प्रसिद्ध मुस्लिम विद्वानांनी या आध्यात्मिक देवाणघेवाणीसाठी कार्य केले. इस्लामिक तत्त्वज्ञान व गुढवाद / रहस्यवादाचा प्रचार प्रसार केला. पवित्र कुराण मधील धार्मिक वचने आणि इस्लामचे प्रेषित मुहम्मदचे विचारधन (हदीस) याद्वारे सूफि दर्शनाचा प्रचार प्रसार केला. सूफिवादाचा मूख्य पाया कुशन व हदीसच होते. सनातनापासून दुर राहून सुफिंनी इस्लामची मूळ समतावादी, प्रेम व शांतीवादी संकल्पना प्रसृत केली. फकिरीत राहून, जाडेभरडे लोकरी वस्त्र (सूफ) घालून निवृत्ती जीवन जगणारे सूफि लोकप्रिय झाले. 'सूफ' या शब्दापासून त्यांना 'सूफि' म्हणून ओळखले गेले. उत्तर भारतात या सूफिंना आध्यात्मिक संबंध भक्ति चळवळींशी आला. त्यातूनच मिदा संस्कृती व सर्वधर्म समभाव, बंधुभावाची संकल्पना विकसित झाली.

मध्ययुगीन भारतातील राष्ट्रीय एकात्मता वाढविण्यामागे भक्ति - सूफि संप्रदायाचा मोठा वाटा होता.

३ब.२ सूफि पंथाचा उदय

सूफि संप्रदाय एक गूढात्मक रहस्यवादी तत्त्वज्ञानावर आधारित एकांतात ईशभक्ति करणारा पंथ आहे. प्रसिद्ध विद्वान ताराचंदांच्या मते, सूफि संप्रदायाची निर्मिती विविध विचारप्रवाहांच्या मिलनाने झाली आहे. निओ प्लेटोनिअम व ईसाइ धर्माच्या प्रभाव त्यावर दिसतो. विविध भक्ति परंपरा आणि साधना पद्धतींच्या स्वीकार या सूफि संप्रदायात केलेला दिसतो. मूळ गाभा मात्र पवित्र कुराण आणि हदीसचाच आहे. हिन्दू, बौद्ध आणि इराणी पर्शियन तत्त्वज्ञानाचाही प्रभाव दिसतो. इस्लामी आध्यात्मिक गुढवादी तत्त्वज्ञानाला सूफि पंथ किंवा तसव्वूफ म्हटले गेले. सूफि संप्रदायाचा उदय तसा मूळ इस्लाम उदयातच झालेला दिसतो. प्रेषित मुहम्मदांच्या काळात काही लोक सामाजिक जीवनातून विरक्ती घेऊन एकांतात ईशभक्ति करित असत. त्यांची मूळ प्रेरणा ही कुराणमधील अल्लादची भक्ती आणि प्रेषित मुहम्मदांचे विचार (हदीक्ष) आचरण होते. त्यांचा मूळ उद्देश सनातनी कर्मकाण्डापेक्षा स्वत:ला युद्ध करणे, नि:स्वार्थी जीवन जगणे आणि आध्यात्मिक मार्गाने आत्मशुद्धी करणे, हा होता.

आठव्या शतकापासून सूफि संप्रदायाचा विकास झाला. त्यामध्ये उपशाखा किंवा पंथापंथ भेद नव्हते. नवव्या शतकापर्यंत पर्शिया किंवा इराणपर्यंत सूफि संप्रदायात मोठा विकास झाला. विविध साधना पद्धतींचा स्वीकार या पंथाने विविध धर्मांतून घेतला. ज्यामध्ये हिंदू, बौद्ध, जैन आणि ख्रिाश्चन धर्माचा समावेश होतो. बगदादच्या अब्बासी खिलाफत काळात सूफि संप्रदाय प्रौढत्वास आले. अल गझालि (१०५७-१११२ इ.स.) या अरबी विद्वानाने सूफि संप्रदायाचे आधिभौतिक तत्त्वज्ञान आपल्या लिखाणात चर्चिले होते. इस्लामी धर्मशास्त्राच्या मूळातूनच सूफिंचे भक्ति संप्रदाय विकसित झाले, असे मत त्याने मांडले.

mumotes.in

इस्लाम उदयाच्या काळात आठव्या शतकात अरब आणि इराणी व्यापारी जलमार्गे भारताशी व्यापार करित. तयात यमन आणि पर्शियन आखाताद्वारे भारतीय अखंडाशी जलमार्गे व्यापार चाले. त्यात चीनपासून पूर्व आशिया, मध्यपूर्व आशिया, इजिप्त व भूमध्यसामरीय प्रदेशांचा व्यापार समाविष्ट होता. झामेरिन (सामुकी) राजाने केरळ किनार्यावरील अरब व्यापार्यांना आश्रय दिला होता. या काळात भारतात सर्वप्रथम इस्लामचा प्रचार प्रसार झाला. केरळ, लक्षद्वीप आणि श्रीलंका भागात अनेक स्थानिकानी इस्लामचा स्वीकार केला. या व्यापारी मार्गांचा वापर करुन अनेक विद्वान सूफि संत भारतात आले. ते सर्व शरीअतचे जाणकार, नमाज पठण करणारे इमाम, जलमार्गातील प्रवाशांचे आध्यात्मिक गुरु आणि परकिय व्यापारी व ऐतदेशीयांतील मध्यस्थ म्हणून कार्य करित. अबू इसहाक कझरुणी यांचे असंख्य खानकाह (सूफि आश्रम) यमन ते चीनपर्यंत स्थापन झाले होते. तेराव्या शतकातील प्रवाशी इब्न बतूताने केरळ ते वॅटन (चीन) पर्यंतच्या सूफि माहिती लिहिली आहे. यावरु समजते की, बाराव्या शतकाच्या पूर्वीपासूनच भारतात अनेक सूफिंचा प्रवेश झाला होता. त्यांचा इरानवाद काठीयावाद, सिंध ते केरळ, श्रीलंका, लक्षद्वीप, मालदीवजपर्यंत स्थापन झाला होता. पंजाबमध्ये सुद्धा सुलतान महमूद गझनीच्या आक्रमणापूर्वीच सूफिंचे स्वानकाह स्थापन झाले होते. भूमार्गे पंजाबमध्ये लाहोर व मूलतान परिसरात अनेक सूफि स्थायिक झाले होते. पृथ्वीराज चौहानच्या राजवटीत गझनीहून अजमेरच्या ख्वाजा मुईनुद्दीन चिश्ती (मृत्यू १२३५) येऊन स्थायिक झाले. त्यांची दर्गाहय (कबर) आजही अनेक तिर्थाटन करणार्यांचे आकर्षण केंद्र आहे. मुसलमानी आमदनी मध्य आशिया आणि इराणमधून असंख्य सूफि भारतात आले.

भारतीय भक्ति संप्रदायातील साधूंप्रमाणे त्यांनी स्थानिक पोषाखांचा स्वीकार करुन आदान (खानव्याह) स्थान केले. अस्पृश्य आणि कमी लेखिल्या गेलेल्या दीनदलितांची सामाजिक बांधिलकीने सेवा केली. शांततेच्या मार्गाने समता, बंधुभाव व ईशप्रेमाची वाणी प्रसृत केली. त्यांच्या विचारधनांनी धर्मप्रसार झाला.

इस्लाम धर्मात गुढवाद म्हणजे इहसाण (अलंकृत अंमला), कुर्ब (अल्हादची साधना), तरीकत (अल्लाहकडे प्रवास), सुलूक (अल्लाशी एकरूप होणे) आणि तसव्वूफ (जाडे भरडे कपडे परिधान करणे) होय. तसखूफ संकल्पना, जाडे भरडे लोकरी वस्त्र परिधान करुन एकांतात अल्लाहची भक्ति करित जीवन जगण्याचा मार्ग, मानली जाते.

त्याशिवाय अनेक संकल्पना आहेत, ज्या विविध प्रवाहाने सूफिंचा अर्थ सांगतात.

अदूल उस सुपोफा : काही सूफिंना आपला संबंध प्रेषित मुहम्मद पैगंबरांच्या काळातील अहल उस सुपोफाशी जोडणे योग्य वाटतो. ते लोक मुहाजिरीन होते. जे मक्का ते मदीना शहयन स्थलांतरित होऊन आले होते. अशा निवारारहित लोकांची राहण्याची व्यवस्था मस्जिदे नबवीच्या अंगणात एक चबूतर्यावर होती. चबूतर्याला अरबीत सूपोफा म्हणतात. प्रेषितांच्या काळापासून अशाप्रकारे सुफिंची परंपरा विकसित झाली.

अस सफ अल अव्वल : नमाजमध्ये सर्वप्रथम ओळीत थांबून प्रार्थना करणार्या लोकांचे भक्तिवंत पायीक सूफिच आहेत. असा मानणारा एक गट सूफि संप्रदायात आहे. त्यांना अस सफ अला अव्वल या अरबी शब्दावरुन सूफि नाव मिळाले.

अय सफा : सफा किंवा साफ म्हणजे पवित्र. या पवित्र आणि शुद्ध जीवन जगणार्यांचा पंथ म्हणून सूफी, असा एक मतप्रवाह आहे.

अस सूफ : इब्ज तयमिया व इब्ज खल्दूनच्या जाडे भरडे चिद्यांचे कपडे घालणारे ते सूफि लोक. लोकरी वस्त्रांपेक्षा कापडी ढिगळे लावलेले वस्त्र परिधान करणारा तो सूफि, अशी संकल्पना या भक्ति संतांची नावलौकिक झाली. असा एक मतप्रवाह आहे.

थोडक्यात सांगावे तर, तसव्वूफ हा अरबी शब्द इंग्रजीत सुफिझम म्हणून वापरला जातो. आध्यात्मिक मार्गाने जो सूफि तत्त्वज्ञानावर चालतो व भक्तित लीन होतो, त्याला सूफि म्हणण्याचा प्रघात पडला असावा असे वाटते. सूलामी (मृ. १०२१) या अरबी लेखकाच्या लिखाणात सूफि शब्दप्रयोग सर्वप्रथम आढळतो. सर्व सूफि भक्त सर्व इस्लामी तत्त्वज्ञानावर आणि कुराणमधील धर्माचरणावर अंमल करताना दिसतात. ते प्रामुख्याने प्रेषित मुहम्मदांच्या विचारधनांवर अंमल करित व अल्लाहाच्या भक्तित लीन राहत. आत्म्याला शांततेच्या मार्गाने पवित्र करुन ईशभक्ति करणे हाच त्यामागील हेतू होता. फकिरी आणि दरवेशी जीवन जगून ते आत्मक्लेपाद्वारे नि:स्वार्थी जीवन जगत. धार्मिक व आध्यात्मिक ज्ञान मिळवून आलीत बनत. त्यांच्या गुरु शिष्य परंपरेला पीर-मुरीदी म्हणतात.

आपली प्रगती तपासा :

१) सूफि संप्रदायाच्या उदयावर टिपण लिहा.

३ब.३ सूफि पंथाचे वैशिष्ट्ये

सूफिंचे विचार फार गूढ धार्मिक होते. आत्म परिक्षणातून अतिशय नियमांनी चांगली आचरण करुन ते जीवन जगत. ईशसेवा म्हणजेच मानव सेवा ते मानतात. आत्मसमर्पण करुन अल्लाहाच्या ध्यानधारणेत ते जीवन व्यतीत करतात. नामजप किंवा झिकर करुन आत्मसाधना केले जाते. सूफिंमध्ये अनेक उपशाखा आहेत. त्यांचा विशिष्ट संस्थापक किंवा ग्रंथ नाही. इस्लामचे प्रेषित मुहम्मद त्यांचे मार्गदर्शन आहेत. त्यांचा पवित्र ग्रंथ कुराण आहे. आत्मशांती व पवित्र मनासाठी ते ध्यानधारणा करतात. प्रेममार्गाने अल्लाहाला खुष करणे त्यांचे उद्देश असते. अल्लाहाच्या प्राप्तीसाठी संगित आणि नृत्यसादने करते ते भक्तिमार्ग अवलंबिताना दिसतात. ईशभक्तित लीन होऊन मृत्यूला कवटाळून फना होणे, हे त्यांचे उद्देश होते.

सफा किंवा पावित्र्याद्वारे जीवन यशस्वी जगण्याचे प्रयत्न करणारा पंथ सूफि होय. दुसर्या मतप्रवाहात प्रथम ओळीत प्रार्थना करणार्या लोकांना सूफि म्हटले गेले. प्रेषितांचे सहकारी मित्र (सहावा) यांच्या मधूनच काही जे सुफावर (चबुतर्यावर) वसत, त्यांच्यातून या पंथाचा उदय झाला, असेही मानले जाते. तर अंतिम प्रवाह असे सांगतो की, जाडे भरडे चिद्यांचे लोकरी वस्त्र किंवा घोंघडे घालणारे भक्त म्हणून सूफि असादी मतप्रवाह आहे.

हे सर्व सूफि शांततावादी विचारात, चळवळी आणि धर्मोपदेशक होते. त्यांनी जेथे जेथे गेले तेथील स्थाकि भाषा शिकून सोप्या भाषेत कुराण आणि हदीसचा अर्थ प्रवचनाद्वारे सांगितला. मानवतावाद आणि जातपात विरहित समानतेचे विचार मांडले. त्यांच्या खानकाह किंवा सूफि आश्रयात धार्मिक आणि लौकिक शिक्षणाची सोय होती. कधी कधी

दुष्काळ, युद्ध किंवा महापुरासारख्या नैसर्गिक आपत्तीत खानव्यसते स्वरूप अनभवले, लंगर स्वरूपात पालटत असत. दिनदलित व गरीबांची सेवा केली जाई. अनेक खाकाहनी विहीरी व तलावांची सोय करुन जनमाणसांची सेवा केली होती. अशाप्रकारे शांतता मार्गाने सूफिनी धर्मप्रसारही केला होता. सूफि साहित्याकार लिखित स्वरूपात इतिहास लिखाणासाठीची अनेक साधने मिळतात. त्यातून मध्ययुगीन इतिहासाचे धार्मिक व सामाजिक पैलू कळतात. भारतात अरबी, फारसी, उर्दू, बंगाली, पंजाबी आणि इतर अनेक स्थानिक भाषांमध्ये सूफि साहित्य मिळतो. विविध विभागांमध्ये सूफि साहित्याचे वर्गीकरण करता येते.

१) मलफूझ (सूफि गुरुचे विचारधन व तत्त्वज्ञान जे त्यांनी किंवा त्यांच्या शिष्याने लिखाणबद्ध केले.)

२) मक्कूबात (सूफिंचे पत्र व्यवहार)

३) सूफि संप्रदायाविषयी स्वत: सूफिंनी लिहिलेले साहित्य

४) तधकिरात (चरित्र, शिष्य किंवा भक्ताने तत्कालीन सूफि संतांचे जीवनपट, प्रंसग किंवा चमत्कारी नोंदी वही)

३ब.४ संकल्पना आणि सूफिवादाची शिकवण

सूफि संत फार उदारमतवादी विचारांचे पायीक होते. भारतीय जनमाणसांत ते मिळून मिसळून गेले होते. त्यामुळेच त्यांना आज मोठी प्रसिद्धी मिळाली. त्यांनी अनेक भारतीय परंपरांचा स्वीकार केला होता. तयाचया सिलसिल्यांच्या (उपशाखा) साधनापदरतीत हिंदू प्रभाव जाणवतो. त्यांनी मानव सेवेत आपले जीवन व्यतीत केले. वहदतूल वुजुद म्हणजे निर्मात्याच्या तत्त्वात निर्मित जनमाणसांचा लीनत्व प्राप्त करुन देणारा मतप्रवाह. शेख मुईबुद्दीन ईब्जुल अरबीच्या मते, अल्लाहशिवाय काही नाही. सर्वत्र तोच आहे. अंतिम तोच उरुन राहणार आहे.

सूफिंनी आत्मसमर्पण करुन सर्वोच्य शीलत्व लीन होण्यासाठी प्रेमसाधनेचा मार्ग सांगितला. पीर म्हणजे गुरु हे सूफींचे आध्यात्मिक मार्गदर्शन होते. मुरीद म्हणजे शिष्य. मरिकत म्हणजे अल्लाहशी एकत्व आणि आत्मसमर्पणासाठी पीर हा मुरीदला मार्गदर्शन करतो.

अनंत शक्ति परमात्याला प्राप्त करण्यासाठी प्रेममार्गच एकमेव मार्ग आहे. त्यासाठी प्रार्थना व भक्ति साधना आवश्यक आहे. असे सर्व सूफि मानतात. त्यासाठी मन:शुद्धी झाली पाहिजे. तौबा (प्रायश्चित), जुहद (शीला), फक्र (विरक्ती), सब्र (सबूरी), शुक्र (आभार) आणि खौफ (भीती), रजा (आशा), तवक्कल (संतोष) आणि रिझा (आत्मसमर्पण) या तत्त्वांद्वारे जीवन व्यतीत करित. तर्के दुनिया म्हणजे लौकिक नश्वर जीवनापासूर दुर राहणे. तसेच खानलाह किंवा जमातखानामध्ये आध्यात्मिक जीवन जगून सूफी अल्लाहची भक्ती करित असत.

आपली प्रगती तपासा :

१) सूफि संप्रदायाचा अर्थ व स्वरूप सांगा.

२) सूफि संप्रदायाची शिकवण व संकल्पना स्पष्ट करा.

३ब.५ सिलासिला किंवा सूफि पंथाच्या शाखा

सूफिंच्या शिकवणी व साधना पद्धतींच्या भेदाभेदावरुन अनेक उपशाखा (सिलसिले) निर्माण झालेले दिसतात. संस्थात्मक सूफी संताच्या नावाने या उपशाखा विकसित झाल्या त्यांनाच साखळी किंवा सिलसिला म्हटले जाते. पीर मुरीद परंपरेने यात अधिकच भर पडली. १७५ पेक्षा जास्त सूर्फा सिलसिले मुस्लिम जगतात विकसित झालेत. मुघल भारतात अबुल फझलने १४ सूफि सिलसिल्यांचा उल्लेख केला आहे. त्यात चिश्ती सिलसिला संपूर्ण भारतात आढळतो. सुहरावर्दी सिलसिला सिंध आणि उत्तर पश्चिम भारतात (वायक) आढळतो.

३ब.५.१ चिश्ति पंथ :

ख्वाजा मुईनुद्दीन चिश्ती गरीब नवाज यांनी या सिलसिल्याची स्थापना चिश्त (अफगाणिस्तान) येथे केली. भारतात अजमेरमध्ये याचा विकास झाला. संपूर्ण भारतात राजस्थान, पंजाब, उत्तर प्रदेश, बिहार, बंगाल, ओरिसा आणि दख्खन पठारावर चिश्ति सूफि सिलसिला आढळतो. सिजीस्तान इराण - अफगाणिस्तान सीमांत प्रदेशातून आलेल्या या संप्रदायाने अनेक भारतीय साधना पद्धती स्विकारल्या. जसे समा (संगित) साधना करवावी.

ख्वाजा मुईबुद्दीन चिश्ती यांनी दिनदलीतांची सेवा करुन जणमाणसात स्थान मिळविले. इ.स. १२३५ मध्ये त्यांचे निधन झाले. आजही हिंदू-मुस्लिम भाविक मोठ्या भक्तिभावाने अजमेरला त्यांच्या दर्ग्याला जातात. त्यांच्यानंतर शेख हमिदोद्दीन नाजौरी, शेख फरीदोद्दीन बाक फरीद, शेख बुतबुद्दीन बस्तियार काकी, शेख निझामुद्दीन औबीया आणि शेख सलीम चिश्ती यांनी चिश्ती संप्रदाय संपूर्ण भारतात पसरविला.

चिश्ति जनमाणसापासून निखल राहून जमातखान किंवा खाननाहमध्ये जीवन व्यतीत करित. चिश्ती संत उदारमतवादी होते. मानव सेवा आणि समाजात सरमिसळून जाण्याच्या प्रवृत्तीने त्यांना प्रसिद्धीस आणले. ते फकिरीत राहत. राज्यकर्त्यांच्या देणग्यांच्या लोभापासून दूर राहत. धनसंपत्तीची लालसा मानवाच्या आध्यात्मिक विकासाला बाधित आहे असे ते मानित.

३ब.५.२ सुहरावर्दी पंथ

वायव्य भारतातील हा महत्त्वाचा सिलसिला होता. बजदार येथे शिहाबुद्दीन सहरावर्दी यांनी १२.४ मध्ये या सिलसिल्याची स्थापना केली. शेख बहाउद्दीन झकारिया यांनी मुलतात येथे या सिलसिल्याचा भारतात विकास केला. सहरावर्दी विरक्त जीवन जगत नसत. त्यांनी गृहस्थ जीवन जगून साधना करणे व राजकीय देणग्या स्विकारुन जनसेवा करण्याचा मार्ग स्विकारला. बरेच सुहरावर्दी मुघल अमरलित मोठमोठ्या प्रशासकीय पदावर होते. हाच सुहरावर्दी व चिश्तिंमधील फरक होता.

याशिवाय अनेक सूफि सिलसिले भारतात विकसित झाले. त्यामध्ये प्रांताप्रातांत फरक दिसतो. त्यात कादरी सिलसिला. भारतात सय्यद मुहम्मद गिलानी (१४१७), तर फिर्दोसी सिलसिला शेख बुदुद्दीन, रालार्स सिलसिला शेख अबु शलारी व नक्शबंदी सिलसिला ख्वाजा बाकी बिल्बाद यांनी विकसित केला.

चौदाव्या शतकाच्या मध्यापर्यंत या सूफिंमध्ये अनेक भेदाभेद वाढले. राजकीय परिस्थितीतही बदल त्यामागील कारण होते. परंतु भारतीय जनमाणसात व भक्ति संप्रदायाशी आलेल्या संबंधामुळे सूफींचे सांस्कृतिक योगदान विसरता येत नाही.

३ब.५.३ दख्खनमधील सूफि संप्रदाय

खिलजी व तुघलक राजवटीनंतर दख्खनच्या पठारावर बहामणी राजवट प्रस्थापित झाली. बहामणींनी १३७३ मध्ये तेलंगणा, १४२१ मध्ये वारंगल तर १४७२ मध्ये आंध जिंकले. १४८२ मध्ये पाच शाघ्यांमध्ये बहामणी साम्रज्याचे तुकडे झाले. अहमदनगरची निझामशाही, बिजापूरची आदिलशाही, बिदरची बदीलशाही, बेरारची इमादशाही आणि गोवलकोंड्याची कुतुबशाही मध्ये दख्खनच्या पठार राजकियरित्या विभागला गेला. १६८६ मध्ये आदिलशाही, १६२६ मध्ये निझामशाही, १६८८ मध्ये कुतुबशाही मुघलांनी जिंकून घेतली. १७०७ मध्ये बादशहा औरंगजेब आलमगीरच्या निधनानंतर दख्खनमध्ये मुघल पकड निसरडी झाली. १७२४ मध्ये आसफजहा प्रथम निझाम उल मुल्कने स्वतंत्र्य निझाम राज्याची स्थापना केली.

या राजकीय परिपेक्ष्यात तेराव्या शतकापासूनच दख्खनमध्ये सूफी सांप्रदाय विकसित व प्रचार प्रसार झाला. दिल्लीच्या निझामुद्दीन औकीचा यांच्या चिश्ति संप्रदायाने १४०० शिष्य दिल्लीहून दौलताबादला स्थलांतरित झाले. तुपवाल व्यक्तीला राजधानी बदलाचाही या स्थलांतराना तात्कालिन निमित्त ठरला. निझामुद्दीन अवलिया चिश्ति हे बाबा फकीर यांचे शिष्य होते. बाबा फरीर गंज शकरचे नातू ख्वाजा अझिझोद्दीन चिश्ति दौलतबादला येऊन स्थायिक झाले.

मुहम्मद धिन तुघलाकच्या दिल्ली ते दौलताबाद राजधानी स्थलांतराच्या निर्णयाने दिल्लीची लोकसंख्या दौलताबाद-खुलताबादला येऊन स्थायिक झाली. शेख बुर्हाणुद्दीन गरीब चिश्ति यांना आध्यात्मिक शिघत्वाची विलायत (खिलाफत) देऊन शेख निझामुद्दीन अवलियांनी खुलताबादला पाठविले. त्यांच्यासह मौलाना फक्रुद्दीन, अमीर हसन सिजसी, सय्यद युसूफ राजू हुसैनी, ख्वाजा हुसैन, ख्वाजा उमर, आणि अनेक सूफी विद्वान दख्खनमध्ये स्थलांतरित झाले.

तेराव्या शतकापासून दख्खनमध्ये चिश्ति, कादरी, इफाई, नक्थबंदी आणि सहुरावरी खानकाह स्थापन झाले. आजही खुलताबाद, दौलताबाद, औरंगाबाद, बुर्हानपुर, बिजापूर, बिदर, गुलबर्गा, बालापूर आणि हैद्राबाद येथे सूफी दर्गे पाहावयास मिळतात. असंख्य हिंदू मुस्लिम भक्त उर्स कार्यक्रमाना मोठ्या भक्तिभावाने भेट देताना दिसतात.

खिलजी- तुघलाक काळात दौलताबाद व खुलताबाद दे सूफी केंद्रे विकसित झाले. बहामणी व पाच शाध्यांच्या काळात बिदर, गुलबर्गा, बिजापूर, हैद्राबाद, कंधार, औरंगाबाद, बुर्हाणपुर आनि बालापूर केंद्रे विकसित झाले. निझामुद्दीन अवलिया चिश्तींचे शिष्य दौलताबाद -

खुलताबाद येथे येऊन स्थायिक झाले होते. त्यापैकी त्यांचे मुख्य प्रतिनिधी किंवा खालिफा बर्हानउद्दीन गरीब हे १४०० सूफींसोबत दौलताबादला आले होते. शहा युंतजिब झर झरी झरक्वश, हमिद कलंदर, रुक्त अल दिन काशानी, फरीर अदीब चिश्ती, झैनुद्दीन शिसनी (१३०१-१३६९) शहा जलालुद्दीन चिश्ती, युसूफ हुसैदी, अमीर हसन रिससी (कवायत उल फवाद ग्रंथाचे लेखक) इत्यादींचा समावेश त्या १४०० शिष्यांमध्ये होतो. दौलताबाद येथे हजरत मोमीन सुहरावर्दी यांची दर्गा आहे. त्याशिवाय शेख चाँद बोधले कादरी यांची दर्गाह दौलताबाद येथे आहे. बहामणी काळात ख्वाजा सखर मगदूम सयाह रफाई हे सूफी संत इराकमधून येऊन कंधार येथे स्थायिक झाले. नांदेडजवळ त्यांचा कंधार दर्गाह फार प्रसिद्ध आहे. पैठण येथे सय्यद निझामुद्दीन चिश्ती आणि शहा मुईनोद्दीन चिश्ती संत स्थायिक झाले. ख्वाजा अबुल फझल कोचकधाह शहेनशादबली बीडमध्ये स्थायिक झाले. बीडच्या मन्सुरशाह वली दर्ग्याचा मराठी सरदार महादजी शिंदे पेशवेकाळात भेट देत असते. मलील अंबरने १६०८ मध्ये खडकी या खेड्याजवळ औरंगाबाद शहराची स्थापना केली. मुघल काळात औरंगाबदाचा विकास झाला. मुघल काळात अनेक खानकाह आणि सूफी दर्गे येथे विकसित झाले. शहापुर मिया हसकी कादरी इराकमधून येऊन येथे स्थायिक झाले. १६९२ मध्ये त्यांचे निधन झाले. त्यांची दर्गा आज औरंगाबादमध्ये महत्त्वाचे सूफी केंद्र आहे. बाबा शाह मुस्ताफिर व बाबा शहा पचंगपोष नक्थबंदी याच काळात औरंगबादला येऊन स्थायिक झाले. त्यांची पनचक्की दर्गा फार प्रसिद्ध आहे. १८६४ मध्ये इंग्रज मेजर रॉबर्ट गिला पनचक्की दर्ग्याला हिंदू - मुस्लिम भाविकांचे महत्त्वाचे श्रद्धास्थान असल्याचे नोंद करतो. निझामुद्दीन चिश्ति औरंगाबादी हे सुद्धा आसफनार्क्र निजाम राजवटीत महत्त्वाचे सूफी होते. त्यालाही दर्गा आज औरंगाबाद येथे प्रसिद्ध आहे.

दख्खनमधील अनेक दर्गा आणि खानकाह तुघलाक काळापासून ते मुघल -मयन कालखंडापर्यंत अनेक देवद्यांनी संपन्न झालेले हाते. स्वत: छत्रपती शिवाजी महाराज केळशीच्या बाबा याकूब सरबरी यांच्या खातबादला भेट देत. सुवर्णईर्ज, रत्नागिरीजवळ महाराजांनी बाबा याकूतांना जमिनी इनाम दिली होती. बाबा याकूतांचे निधन १६८१ मध्ये झाले. त्यांची दर्गाह आनंदी कोकण परिसरात प्रसिद्ध आहे.

आपली प्रगती तपासा :

१) चिश्ति सिलासिलाचे योगदान सांगा.

२) दख्खनचे सूफी कोण होते? ते लिहा.

३) महाराष्ट्रातील सूफी केंद्रे लिहा.

४) सुहरावर्दी सिलसिलाची माहिती द्या.

३ब.६ भक्ति पंथ आणि महाराष्ट्रातील सूफि संप्रदाय

मध्यकाळात हिंदु भक्ति पंथ आणि सूफी संप्रदायाची आपापसात अनेक बाबींची देवाणघेवाण केलेली दिसते. त्यामध्ये योगसाधना, जपमाल, संगीत, ध्यानधारणा व भजन कीर्तने यांचा समावेश होतो. योगी नाथ पंथाथी कादरी सूफींचे संबंध आले होते. उत्तर भारतात त्यांनी श्वासावासावर नियंत्रण मिळवून झिकर (नामस्मरण / जमपाळ) करण्याची योगसाधना नाथ

योगींकडून शिकली. लंगर परंपरा सुद्धा हिंदू - मुस्लिम सांस्कृतिक देवाणघेवाणाचे प्रतिक आहे. गुरु शिष्य परंपरा किंवा सूफींची पीर मुरीद परंपरा बरेच साम्य आहे. वेदांत किंवा उपविषधातिक ईशउपासना तत्त्वज्ञान सूफींनी स्वीकारलेला दिसतो. बिहार, बंगाल व आसाममध्ये तर नवमुस्लिमांनी जुन्या भारतीय सांस्कृतिक परंपरांना आपल्या आचरणात तसेच ठेवलेल्या दिसतात. या सर्व बाबींचा परिणाम भक्ति-सूफी आध्यात्मिक देवाणघेवाणीत झाला. भक्ति पंथातील अनेक शैव आणि वैधव संतानी जातिव्यवस्था आणि अस्पृश्यतेचा विरोध केलेला दिसतो.

तेराव्या शतकात महाराष्ट्रात अनेक भागात मराठी कवी लेखकांनी समाज सुधारणा आणि जातिअंत चळवळ सुरु केलेली दिसते. संत ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेत गीतायिका, भावार्थ विविध किंवा ज्ञानेश्वरी लिहून भक्ति चळवळीचा विकास केला. आळंदी, नेवासा आणि पंढरपूर येथून भक्ति चळवळ वाढत गेली. पंढरपूरचे श्री विठ्ठल मंदिर वारकरी व नाथांचे केंद्रस्थान बनले. या मराठी वैष्णव पंथाचे मूळ जातिनियदित समाज व जनसामान्यांतह ईषभक्तीची समाज संधी या वारकरी चळवळीने मिळवून दिली.

भागवत धर्म व वारकरी परंपरेने विष्णू अवतार मानल्या गेलेल्या श्री विठ्ठल मंदिराला केंद्रस्थान बनविले. असंख्य मराठी गद्य-पद्य रचना आपल्याला तत्कालीन महाराष्ट्राची सामाजिक धार्मिक व आध्यात्मिक माहिती देतात. वर्षातून दोनदा वारी करुन या तीर्थयात्रेचा ओघ मराठी मनात उत्कर्ष पावलेला दिसतो. या भक्ती रसात सर्व जातीतील सामील होते. शुद्र, अतिशुद्र, कुंभार, माळी, महार, सोनार सर्व अलुतेदार व बलुतेदार त्यात सामील होते. संत चोखामेळा, गोरा कुंभार, नरहरी सोनार, बांला, महार, इत्यादी अनेक जातीतील लोक संत-कवी म्हणून याच काळात विकसित झाले. सत नामदेव, तुकाराम, एकनाथ आणि रामदास यांनीही ही भक्ती परंपरा विकसित केली. संत एकनाथांचे भारुडं हिंदू-तुर्क संवाद दखनी भाषा मिश्रित आहे. त्यावर दौलताबाद - पैठण परिसरातील सूफी संप्रदायाचा प्रभाव जाणवतो. तुकारामाच्या गाथाही महत्त्वाच्या भक्ति साधना आहेत. मराठी भजन कीतर्नाद्वारे या काळात मराठी भाषा विकसित होत गेलेली दिसते. कुणबी, व्यापारी वाणी व कलाकारानी या सांस्कृतिक चळवळीत योगदान दिलेला दिसतो. महादेव गोविंद रानडे यांच्या मते, याच काळात मराठी भाषा साहित्य व सामाजिक प्रबोधन युगाचा विकास सुरु झाला. ताराचंदांनी तर मुस्लिम आमदानीतील महाराष्ट्रातील मराठी भाषा विकास व भक्ति सूफी आध्यात्मिक - देवाणघेवाणीला फार महत्त्व दिले आहे. बहामणी, आदिलशाही व कुतुबशाही दरबारात मराठीही बोलली जात असे. अनेक मराठा सरदार या राजवटींमध्ये मोठा पदांवर होते. कुतुबशाही आणि आदिलशाही व्यापारातील साहित्यावर दख्खनी, मराठी व फारसी भाषा प्रभाव स्पष्ट जाणवतो. उत्तर भारतातील फकीर आणि नानक परंपरेत जसे भक्ती -सूफी मिश्रण दिसते तसेच महाराष्ट्रतही झाले.

बाबा फरीदांचे काव्य आपल्याला श्री गुरु ग्रंथ सापडते. संत कबीर यांचा पुत्र कमाल ने आपल्या कवितेत संत नामदेवांचा उल्लेख खालीलप्रमाणे केला आहे. (हिन्दी) 'दख्खनका नामा दरजी, उनके बंधा विठ्ठल है, और सेवा कुछ नहीं जाने अंदर भीतर केशव है, उचर माने भावे कबिरा रामचरण का बंदा है, उनका पूत है कमाल, दोनोका बोलबाला हैं।"

अशाप्रकारे कमालने संत नामदेव व संत कबीराची तुलना केली आहे. बाराव्या व तेराव्या शतकापर्यंत ब्रह्मण - अब्रह्मण जातीव्यवस्था भक्ति पंथांच्या कार्यामुळे थितिका होत होती. मराठी भाषेचा वापर संस्कृतपेक्षा जास्त होऊ लागला होता. संत ज्ञानेश्वर ते मुक्तेश्वरापर्यंत मराठीचा विकास वेगाने झाला.

महाराष्ट्र भक्तीचा मोठा केंद्रस्थानी प्रदेश आहे. कृष्णपतार श्री विट्ठलाची पुजा वारकरी सांप्रदाय करतो. पंढरपूरला सर्व वारकरी जमा होता. संत ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, एकथान, नरहरी, चोखा मेळा, दामाजी पंत, कान्हे पात्रा, गोरा कुंभार, आणि अनेक संतांनी भक्त पतंच विकसित केलेली दिसते. अठराव्या शतकात महिपतीने लिहिलेल्या संतचरित्राचे भाषांतर करुन जस्टीन अबॉटने मध्ययुगीन मराठी भक्ती परंपरेवर महत्त्वपूर्ण प्रकाश टाकला आहे.

ग्रामीण महाराष्ट्राने या मराठी भक्ती परंपरेला विकसित केले. कर्मकाण्डातून समाजाला बाहेर काढून ज्ञानेश्वराने मराठीत रचना लिहून जनमाणसात धार्मिक परिवर्तन आणले. संत तुकारामांचा जन्म १६०८ मध्ये देहू येथे झाला होता. ते छत्रपति शिवाजी महाराजांचे रामकालीन होते. त्यांची दखवी ओवी - 'अल्लाह देणे, अल्ला दिखावे, अल्ला देवे, अल्ला खिलावे, अल्ला बिन भी कोय, अल्ला करे से होया.“ 'फिकिर करो अल्ला की, बाबा सवाल्या अंदर भेरु. तुका जो नार बुझे सोहि दरवेश.“ 'नकी एक तू, नर्क एक तू.“ 'अल्लाह एक तू“ अशा अनेक दखनी ओवी तुकारामांच्या लिखानात आल्यात.

संत एकनाथ पैठणचे प्रसिद्ध संत होते. त्यांचा जन्म १४३३ मध्ये पैठण येथे झाला. त्यांचे गुरु दौलतबागचे श्री स्वामी जनार्दन होते. संत एकनाथांचे एकनाथी भागवत व भावार्थ रामायण लिखाण प्रसिद्ध आहे. नांदापूरकरांच्या मते, संत एकनाथ हे एकमेव नाथ होते ज्यांनी वारकर्यांना मार्गदर्शन केले. संत एकनाथांची गुरुपरंपरा खालीलप्रमाणे आहे.



शेख चाँद केधले कादरी प्रसिद्ध कादरी सूफी संत होते. त्यांचा दर्गा दौलताबाद किल्ल्याच्या समोर आजही हिंदू मुस्लिम भाविकांना आकर्षित करताना दिसतो.

मध्ययुगीन महाराष्ट्रात अनेक मुस्लिम सूफींनी मराठी साहित्य निर्मिती केलेली दिसते. भक्ति परंपरेशी त्यांचे आध्यात्मिक देवाणघेवाण झालेली दिसते. जैन, शैव, वैष्णव, महानुभाव, नाथयोगी आणि भागवत वारकरी पंथांशी त्यांचे संबंध आलेले दिसतात. शेख मुहम्मद श्रीगोंदेकर, महामुनी, हुसैन अंबरखान, जमालशाह, अस्लम खान, शेख सुलतान इत्यादींचा त्यात समावेश होतो. त्यांचे मराठी भाषेतील साहित्य तत्कालीन आध्यात्मिक देवाणघेवाण व धार्मिक सौहार्दचे प्रतिक आहे. अल्लामखान हे नामेश संप्रदायातील शिष्य

होते. भानजी त्रिंबक देशपांडे यांचा १८२४ च्या नागेशबीलामृत या ग्रंथात ३९ व्या प्रकरणात अल्लमखान यांची माहिती मिळते. करबी कारणी (उस्मानाबाद जिल्हा) येथे अलमखान यांची कबर आहे. श्रीगोधांच्या शेख मुहम्मद श्रीगोंदेवर महाराजांचे शिष्य आझमनेही अनेक मराठी आरत्या लिहिल्या आहेत.

हजरत लालाडे मशेख राघवचैतन्य (१४६०-१५६०) हे सुद्धा एक मराठी मुस्लिम कवि होते. त्यांच्यावर दत्त संप्रदायाचा प्रभाव होता. आखंद (जि. गुलबर्गा) येथे त्यांची समाधी आजही हिंदू, जैन, लिंगायत व मुस्लिम भाविकांमध्ये प्रसिद्ध आहे.

शहामुनी (१७३०-१८०८) हे उत्तर भारतातून महाराष्ट्रात श्रीगोंदा येथे येऊन स्थायिक झाले. शहामुनीने सिद्धांतबोध हा मराठी ग्रंथ लिहिला. यानंतर हुसैन अंबरखान (१६०३-१६५३) यांनीही मराठी साहित्यात भर टाकली. त्यांनी ज्ञानेश्वरानंतर मराठी भाषेत गीता भाष्य लिहिले. त्याचे नामकरण अंबरहुसैनी असे केले. अंबरखानचे पिता याकूतखान दौलताबाद किल्यावर अधिकारी होते. तंजावरच्या वैद्यनाथकृत चिंदबाराव्यंती ग्रंथात अंबरखानचा संदर्भ येतो.

शेख मुहम्मद श्रीगोंदेकर मुळचे धारुरचे. माळोजीराजे भोसलेंच्या काळात श्रीगोंधारा स्थायिक झाले. ते कादरी सिलसिल्याने सूफी संत होते. त्यांनी योगसंग्राम, निष्कलंक बोध, पवन विजय आणि ज्ञानसागर ग्रंथ लिहिली. त्यांना महाराष्ट्राचे कबीर म्हटले जाते.

योगसांडाममध्ये शेख मुहम्मद लिहितात - 'नमो श्री चाँद बोधले। यानी ज्ञानोपंत अंगीकारले।। ज्ञानोबाने एका उपदेशिले।"

नाव	ठिकाण / प्रवेश	लिखाण / पंथ	कालखंड / राजवट
अल्लमखान	करळी कारळी (समाधी) उस्मानाबाद जिल्हा	नाजेश पंथ	बहामणी / तुघलक
लाडले मशेख (१४६० - १५६०)	आबेंद (दर्गा) जिल्हा कलबुर्जी	दत्त पंथ	बहामणी
अल्लाम प्रभू (१४७८ - १५३९)	दौलताबाद	दत्त पंथ	बहामणी
हुसैन अंबरखान	श्रीगोंदा	गीताभालकार अंबरहुसैनी	निझामशाही
चाँद बोधले कादरी	दौलताबाद	सूफी पीर	निझामशाही
शहामुनी	शहागड (बीड)	मराठी कवी	निझामशाही
शेख मुहम्मद श्रीगोंदेकर	श्रीगोंदा (जि. अहमदनगर)	महाराष्ट्राचे कबीर - मराठी रचना	निझामशाही / मुघल

आपली प्रगती तपासा :

१) महाराष्ट्रातील भक्ति पंथ व सूफी संप्रदायावर टिपण लिहा.

२) मराठी साहित्यातील मुस्लिम लेखनांचे योगदान स्पष्ट करा.

३ब.७ समारोप

सुरुवातीचे सूफी फार तपस्वी स्वरूपाचे एकांत जीवन जगणारे होते. त्यात काहींनी संन्यास जीवनही अंगिकारला होता. लौकिक जीवनातील स्वार्थ व्यक्तीला पारलौकिक भक्तिपासून दूर करतात असे ते मानत. त्यामुळे खानलाहमध्ये एकांतात प्रार्थना, उपवास, नामजप करीत जीवन व्यतीत करित. चिश्ती व सहरावर्दी सूफींनी राज्यकर्त्यांना आध्यात्मिक मार्गदर्शन करुन मध्यकाळात धार्मिक सौहार्दचे व सांस्कृतिक देवाणघेवाणीचे केले. सूफींच्या पूण्यतिथीला उर्स महोत्सव साजरा होतो. दर्गे यावेळी हिंदू मुस्लिम भाविकांनी गजबजलेली असतात. महाराष्ट्रा अनेक ठिकाणी जिल्हा प्रशासन स्थानिक सुट्टी जाहिर करतात. मध्यकालीन सूफी दर्ग्यांच्या व्यवस्थेसाठी इनामी जमिनी व असंख्य देणग्या दिल्या. बहामणी ते पाच शाह्या, निजाम, मराठे व मुघलेतर राजवटीपर्यंत देणग्या दिलेल्या आहेत.

munotes.in

चौदाव्या शतकापासून मात्र सूफी संप्रदायाचा र्हास होताना दिसतो. राजकीय घडामोडी त्याला कारणीभूत आहेत. मात्र सूफींना सांस्कृतिक देवाणघेवाण व मिश्र संस्कृती निर्माण केली. कला, भाषा, साहित्य व संगित क्षेत्रात भरभराट आली. भक्ति व सूफि संतांनी भारताच्या विविधतेतील एकतेने नटलेल्या समाजाची निर्मिती केली. चिश्तिंच्या सभा व करवाली संगित प्रेरणेने संपूर्ण समाज आजही आनंदोत्सवात विविधांगाने परंपरा जोपासताना दिसतो. आध्यात्मिक देवाणघेवाण व धार्मिक सौहार्दासाठी एक प्रतिक म्हणून सूफी संप्रदायाचे महत्त्व नाकारता येत नाही.

३ब.८ प्रश्न

१) सूफि संप्रदायाचे तत्त्वज्ञान चर्चा करा. सूफी संप्रदायावरील भक्ती चळवळीचे प्रभाव सांगा.

२) मुघल राजवटीतील धार्मिक व आध्यात्मिक परंपरांचे टिकात्मक परिक्षण लिहा.

३) भारतातील सूफी संप्रदायाचे धार्मिक धोरण टिकात्मक मांडा.

३ब.९ संदर्भ

1. एस.आर. शर्मा, 'द रिलीजीयस पॉलिसी ऑफ मुघल इम्परर्स', कलकत्ता, १९४०.
2. हुसैन, वाय, 'ग्लिपसेस ऑफ इंडियन कल्चर - मेडिकल', मुंबई, १९५७
3. अरबेरी, ए.जे., 'इन्ट्रोडक्शन टू हिस्ट्री ऑफ सूफिझम। लंडन, १९४२
4. फिल्ड डोरोथी, 'रिलीजन ऑफ सिखस', लंडन, १९४२
5. रिझवी एस.एस.ए., 'ए हिस्ट्री ऑफ सुफिझम इन इंडिया', मुन्यियम मनोहरलाल पब्लिकेशन प्रायवेट लिमिटेड, न्यू दिल्ली, १९७८
6. शेख मुसाक रज्जाक, 'ए हिस्ट्री ऑफ सुफिझम इन डेकन', ब्रऊन पाली, न्यू दिल्ल, २०१५
7. सेन के. एम., 'मेडिकल सिस्टीसीझम इन इंडिया', न्यू दिल्ली १९७४
8. नाईक ग्रीन, 'इंडियन सुफिझम सिन्स द सेनेन्टीन सेंच्युरी, सेंट, बुकस अ@न्ड इम्पायरर्स इन द मस्लिम डेकन', रुटवेज टेलर फ्रान्सिस ग्रुप, लंडन, २००४
9. निझामी के.ए., 'सूफी मुव्हमेंट इन द डेकन', एच.के. शेरवानी ॲन्ड पी.राम. जोशी (संपा), हिस्ट्री ऑफ मेडिकल डेकन (१२०५-१९२०, २ खंड, हैद्राबाद, १९७३)
10. पगडी, सेतू माधवराव, 'सूफी संप्रदाय' (मराठी), परचुरे प्रकाशन, मुंबई, १९५३
11. निझामी के.ए., 'सन असपेक्ट ऑफ रिलीजन ॲण्ड पॉलिटिक्स इन इंडिया ड्युरिंग थर्टीन सेंच्युरी', अलीगड, १९६१

12. कार्ल डब्लू. अर्नस्ट, 'इटर्नल गार्डन : मिस्टिसीझम, हिस्ट्री ॲण्ड पॉलीटिक्स ॲट अ साउथ एशियन सूफी सेंटर। ऑक्सफर्ड युनिव्हसिटी प्रेस, न्यू दिल्ली २००४

13. पठाण, यु. राम, 'मुसलमान मराठी संतांचे मराठी साहित्य', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई २०११

14. तारा चंद, 'इन्पोयुरान्स ऑफ इस्लाम इन इंडियन कल्चर' इलाहाबाद, १९५४

15. त्रिमिंघम, मे. स्पेन्सर, 'द सूफी ऑर्डर इन इस्लाम', ऑक्सफर्ड युन्हिवर्सिटी प्रेस, लंडन, १९७३

16. हमिद हुसैन, 'सुफिझम ॲण्ड भक्ती मुव्हमेंट : इटर्नल रिलेव्हेन्स', मानक प्रकाशन, दिल्ली १९७०

❖❖❖❖

munotes.in

४

मराठा कालखंडातील ग्रामव्यवस्था

घटक रचना:

४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ मराठा कालखंडातील खेड्याचे स्वरुप

४.३ मराठा कालखंडातील खेड्यातील समाज रचना

४.४ मराठा कालखंडातील खेड्यातील वतन संस्था

४.५ मराठा कालखंडातील खेड्यातील वतनदार

४.६ मराठा कालखंडातील खेड्यातील वतनदाराचे हक्क व कामे

४.७ सारांश

४.८ प्रश्न

४.९ संदर्भ

४.० उद्दिष्टे

- मराठा कालखंडातील खेड्याचे स्वरुप समजून घेणे.
- मराठा कालखंडातील खेड्यांची समाज रचना जाणून घेणे.
- मराठा कालखंडातील खेड्यातील वतन संस्थांची माहिती जाणून घेणे.
- मराठा कालखंडातील वतनदारांची माहिती जाणून घेणे.
- मराठा कालखंडातील वतनदारी पद्धतीची माहिती समजून घेणे.

४.१ प्रस्तावना

मराठा कालखंडातील महाराष्ट्र हा असंख्य खेड्याने मिळून बनला होता. या काळात खेडी ही आर्थिकदृष्ट्या समृद्ध होती. मराठा कालखंडातील खेडी ही सामाजिक व आर्थिक विकासाची केंद्रबिंदू बनली होती. खेड्याना मराठा कालखंडात ग्राम, देहे, मौजा असेही नावे होती. मराठा

munotes.in

कालखंडातील समाज म्हणजे खेड्यातील ग्रामीण समाज आणि या समाजाची रचना आणि सामाजिक व आर्थिक व्यवहार म्हणजे 'शिवकालीन गावगाडा' होय.

मराठा कालखंडातील ग्रामव्यवस्थेचा अभ्यास करतांना आपण या प्रकरणात मराठा कालखंडातील खेड्यांचे स्वरुप कसे होते, खेड्यातील समाजरचना कशी होती, खेडे प्रशासनासाठी वतन संस्था कोणत्या होत्या, वतनदार कोण होते, वतनदाराना कोणत्या प्रकारचे हक्क होते, वतनदारांना कोणत्या प्रकारची कामे करावी लागत होती या सर्व माहितीचा आढावा घेणार आहोत.

४.२ मराठा कालखंडातील खेड्याचे स्वरुप

शेती करण्यायोग्य जमीनीच्या सभोवताली रहाण्याच्या उद्देश्याने एकत्र आलेली लोकवस्ती व त्यांनी निवडलेले हे रहाण्याचे कायम वास्तव्याचे ठिकाण म्हणजे गाव होय. या गावात जे रहाणारे लोक असत ते तेथील शेतीवर आधारलेले व्यवसाय करत असत. गावांची निर्मिती केव्हा झाली हे सांगता येत नाही. पण काही गावे साहसी वृत्तीच्या लोकांनी पुढे येऊन वसवली. तर काही राजकर्त्यांनी आपल्या सोयीनुसार, गरजेनुसार व उपयुक्तेनुसार वसवली.

गावाच्या उगमाचा विचार केल्यानंतर गावाचे स्वरुप समजून घेण्यासाठी आपणास गावाच्या क्षेत्रफळाचा विचार करावा लागेल. या काळात गावांचे क्षेत्रफळाला अनुसरुन दोन भाग पाडण्यात आले होते. पहिला भाग म्हणजे गावातील लोकवस्ती राहतो तो भाग. या भागाला 'पांढरी' किंवा 'पांढरी आई' असे म्हटले जात असे. या भागातील घरे ही पांढऱ्या मातीवर बांधलेली असत. दुसरा भाग म्हणजे शेतजमीनीचा. या जमीनीला 'काळी' अथवा 'काळी आई' असे म्हणत 'काळी' व 'पांढरी' मिळून गाव बनत असे. अशा या गावाला शिवकाळात 'देहे', 'मौजा' किंवा 'ग्राम' असे म्हटले जात असे.

मराठा कालखंडातील बदलत्या परिस्थितीनुसार गावाची लोकसंख्या वाढत गेली. पुढे लोक या गावाच्या शेजारी वसती करु लागले. पुढे अशा वस्ती वाढत गेल्या. या वस्त्या गावाच्या उपविभागाचा भाग बनू लागल्या. अशा या उपविभागास देशावर 'मजरा' अथवा 'वाडी' असे म्हणत. तर कोकणात 'पाडी' अथवा 'खारी' म्हणत.

मराठा कालखंडात जेव्हा एखाद्या गावाच्या शेजारी वस्ती वाढत असे व त्या वस्तीचे रुपांतर जेव्हा दुसऱ्या गावात होत असे, तेव्हा दोन गावे तयार होत असत. अशा दोन गावांचे वेगळेपण दाखविण्यासाठी मूळच्या मोठ्या गावास 'बुद्रुक' म्हटले जात असे व छोट्या गावास 'खुर्द' म्हटले जात असे.

मराठा कालखंडातील शिवकालीन कागदपत्रात गांवाना 'मौजा', 'कसबा', 'पेठ' असे संबोधले जात असे. दहा-विस मौजांच्यामध्ये एखादे मोठे गाव असे. त्यास कसबा असे म्हणत. कसबा हा शब्द 'कसब' या शब्दापासून तयार झाला आहे. ज्या गावात मौजापेक्षा कसबी कारागीर, व्यापार-उदीम करणारे लोक अधिक संख्येने वस्ती करुन राहतात त्यास कसबा असे म्हटले जात असे. काही कसब्यांचे बाजरहटीच्या माध्यमातून आर्थिक उलाढालीचे व्यवहार वाढल्याने त्या कसब्यांचे पेठेत रुपांतर होत असे. काही प्रसंगी व्यापार-उदीमासाठी खास 'पेठ' बसविण्याची सनद काही लोकांना दिली जात असे. त्यासाठी त्यांना इनामही दिले जात असे बंदरांच्या ठिकाणी आयात-निर्यात व्यापारामुळे त्यास पेठेचे स्वरुप आपोआपच तयार होत असे. अशा बंदरांच्या गावास मिरे असे म्हटले जात असे.

४.३ मराठा कालखंडातील खेड्यातील समाजरचना

मराठा कालखंडातील खेड्यातील समाज रचना ही पद्धतशीर निर्माण झालेली समाज रचना होती. ही समाजरचना गरज, काम, अधिकार, हक्क, जबाबदाऱ्या या घटकांना अनुसरुन निर्माण झाल्याचे आपणास दिसून येते. या ठिकाणी आपण खालील माहितीला अनुसरुन मराठा कालखंडातील समाजरचनेची माहिती पहाणार आहोत.

शेतीच्या सभोवतालच्या परिसरात बहुसंख्य गावाची निर्मिती झाल्याने व शेती हाच उदरनिर्वाहाचे साधन असल्याने ज्यांच्याकडे जमीन असे तो शेतकरी त्या गावच्या प्रमुख रहिवाशी असे. त्यांच्या वंशपरंपरेने शेती करण्याचा व्यवसाय कायमस्वरुपी सुरु असे. परिणामी असे लोक या गावाचे कायम रहिवाशी असत.

शेतकऱ्यांबरोबरच शेतजमीन नसणारे व दुसऱ्याच्या शेतीवर मोलमजूरी करणारे मजूर हे सुद्धा उदरनिर्वाहासाठी या गावात रहात असत. कधी कधी या लोकांपैकी काही लोक शेतकऱ्यांकडून खंडाने कसण्यासाठी जमीनी घेत असत. त्यांचे उदरनिर्वाहासाठी या गावात कायम अस्तित्व असे. परिणामी हे लोक गावातील समाज रचनेचा एक भाग बनले होते.

शेतकरी, शेतमजूरा नंतर गावातील समाज रचनेतील ज्याना वरिष्ठ मंडळी म्हणून समजले जात असे ते वरिष्ठ दर्जाचे शाश्वत अधिकारी म्हणजे पाटील, कुलकर्णी, चौगुला, शेटे, महाजन होय. ही मंडळी वतनदार होती. कागदपत्रात यांना 'देशक' असे संबोधले जात असे. या अधिकाऱ्यांना आपल्या सेवेबद्दल सरकरातून जमीन, इनाम व ठरावीक हक्क तसेच मानपान मिळत असे.

मराठा कालखंडातील समाज रचनेतील शेतकरी, शेतमजूर, अधिकारी यांच्या बरोबरच आणखीन एक महत्त्वपूर्ण लोकांचा वर्ग प्रचलीत होता तो वर्ग मिरासदारांचा वर्ग होय. मिरासदार म्हणजे वंशपरंपरेने जमीनीची मालकी उपभोगणारे लोक होय. याच मिरासदारांना थळकरी अशी संज्ञा होती. समाजरचनेतील या वर्गाला मानाचे स्थान होते.

या नंतर गाव रचनेतील महत्त्वाचा घटक म्हणजे 'बलुतेदार' होय हे गावाची सेवा करणारे ग्रामसेवक होते. त्यांच्या सेवेचा मोबदला म्हणून त्यांना आपल्या उत्पन्नांचा काही वाटा-बलुते देत असत. साधारणपणे बलुतेदारांची संख्या १२ असे. यात सुतार, लोहार, चांभार, महार, मांग, कुंभार, न्हावी, धोबी, गुरव, जोशी, भाट अथवा शाहिर व मुलाणा यांचा समावेश असे.

या व्यतिरिक्त गावरचनेत एकूण चार सत्ता प्रचलित होत्या. या मधील पहिली सत्ता म्हणजे गावातील अधिकाऱ्यांची सत्ता या मध्ये 'हवालदार' 'मुजुमदार' 'कारकून' या अधिकाऱ्यांचा समावेश असे. हे राजसंस्थेचे अधिकारी असत. यांची सत्ता ही 'दिवाणी सत्ता'.

गावरचनेतील दुसरी सत्ता म्हणजे 'देशक सत्ता' होय. या देशक सत्तेमध्ये गावचे पाटील, कुलकर्णी, देशमुख-देशपांडे, शेटे-महाजन, बारा बलुतेदार यांचा समावेश असे. ही सत्ता दिवाणी सत्तेहून भिन्न असे. या सत्तेला स्वतंत्र अस्तित्त्व असे. या सत्तेला खरे म्हणजे गावची खरी सत्ता असेही म्हटले जात असे.

गावरचनेतील तिसरी सत्ता म्हणजे 'धर्मसत्ता' अथवा 'ज्ञातीसत्ता' होय. ही सत्ता स्वतंत्र होती. धर्म परंपरा किंवा ज्ञांती परंपरा या संदर्भात जर गावात काय वाद निर्माण झाला तर ही सत्ता या कामामध्ये महत्त्वाची व निर्णयांक भूमिका निभावत असे.

गावसत्तेतील चौथी प्रतिष्ठित सत्ता म्हणजे 'व्यापारी' सत्ता होय. ही सत्ता सर्वसाधारणपणे 'कसबा' अथवा 'पेठ' या ठिकाणी अस्तित्त्वात असे. शेठे-महाजन हे या सत्तेचे प्रमुख अधिकारी असत.

थोडक्यात गावरचनेत वतनादार, मिरासदार, बलुतेदार व उपरी असे चार सामाजिक वर्ग व उपरिनिर्दिष्ट चार सत्ताही नांदत होत्या.

४.४ मराठा कालखंडातील खेड्यातील वतनसंस्था

मराठा कालखंडातील वतन संस्था ह्या खेड्यातील प्रशासनाच्या आधारभूत घटक बनल्या होत्या. या वतनीसंस्था तत्कालीन समाज जीवनाशी निगडीत पायाभूत संस्था असल्याने या संस्थाना समाजात प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. गावांच्या स्थैर्यासाठी व विकासासाठी वतनसंस्थांची निर्मिती करण्यात आली होती. प्रांतिक सत्तेच्या विक्रेंद्रिकरणातूनच वतन संस्थांची निर्मिती झाली होती.

गावाचा कारभार सुनियंत्रित राहावा. गावामधले कज्जे, खटले व इतर बाबी गावातील यंत्रनेकडूनच निकालात निघाव्यात, गावात शांतता रहावी, गावाच्या शेतीचा विकास व्हावा, गावातील सण-उत्सव यात्रा सुव्यवस्थीत आयोजित व्हाव्यात गावाचे संरक्षण व्हावे या प्रकारची कामे या वतनी संस्थाना करावी लागत होती.

वतनसंस्थेमध्ये जे काम करणारे वतनदार होते ते एक प्रकारचे ग्रामधिकारीच होते. ग्रामाचा कारभार कार्यक्षम पद्धतीने चालावा यासाठीच त्यांची नियुक्ती करण्यात आली होती.

४.५ मराठा कालखंडातील खेड्यातील वतनदार

मराठा कालखंडामध्ये वतनदारी पद्धत प्रचलित असल्या कारणे वतनदारी चालविण्यासाठी वतनदार नेमले जात असत. एखाद्या व्यक्तीच्या कार्यक्षमतेचा विचार करुन या व्यक्तीची निवड सरकारकडून या पदासाठी केली जात असे. चाकरीच्या मोबदल्यात वतनदाराला जी जमीन देणगी म्हणून मिळत असे तिला 'वतन' असे म्हटले जात असे. एकदा का एखाद्या व्यक्तीला वतनदारी मिळाली की ती पुढे त्या व्यक्तीच्या कुटुंबासाठी वंश परंपरेने चालत असे. जो पर्यंत या कुटुंबातील व्यक्ती वतनाच्या नेमणूकीचे काम प्रामाणिकपणे करीत असत तो पर्यंत ते वतन त्या कुटुंबाकडेच राहत असे. वतनदारीमध्ये अप्रामाणिकता जर जाणवली तर त्या व्यक्तीकडून वतनदारी काढून घेतली जात असे.

पाटील, कुलकर्णी, देशमुख, देशपांडे, चौगुला, शेटे-महाजन हे गावातील प्रमुख वतनदार होते. या वतनदारांचे पालन पोषण संपूर्ण गावाकडून होत असे. या वतनदाराना गावाकडून, गावाची सेवा करण्याच्या मोबदल्यात गावकऱ्यांकडून 'नख्त' (रोख रक्कम) आणि 'गला' (वस्तू) मिळत असत. या शिवाय प्रत्येक वतनदारात गावाकडून 'हक्कलाजिमे' प्राप्त होत असत. हक्क म्हणजे वतनदारास हक्काने मिळणारी बाब तर लाजिमा म्हणजे वतनदारास ऐच्छिक स्वरुपात मिळणारी बाब या कालखंडात प्रत्येक वतनदाराचे हक्कलाजिमे वेगवेगळ्या प्रकारचे असत.

mumotes.in

४.६ मराठा कालखंडातील खेड्यातील वतनदारांचे हक्क व कामे

मराठा कालखंडात पाटील, कुलकर्णी, देशमुख, देशपांडे, चौगुला, शेटे, महाजन हे प्रमुख वतनदार होते याही पुढे जाऊन बारा बलुतेदार व आलुतेदारांचाही समावेश या वतनदारांमध्ये करण्यात आला होता. या वतनदारांच्या हक्काचा व कामांचा आढावा आपण खालिलप्रमाणे घेत आहोत.

अ) पाटील

मराठा कालखंडातील खेड्यातील एक महत्त्वपूर्ण वनतदार म्हणून पाटलाकडे पाहिले जात होते. पाटील हा गावचा प्रमुख असे. त्याला गावचा राजा म्हटल्यास चुकीचे होणार नाही. शिवकालखंडातील पत्रात पाटलाचा उल्लेख 'पाटील', 'गावपाटील', 'मोकादम', असा केलेला आढळतो. राज्यव्यवहारकोशांत त्याला 'ग्रामगोपक' अशी संज्ञा दिलेली आहे.

पुरातन काळात ग्रामाधिकारी पाटील हे पद प्रचलित होते. पुढे साहसी मिरासदार पाटील पदावर नियुक्त झाले. गावातील मिरासदाराचे घराणे प्रमुख मानले जाऊ लागले. पाटलाला गावाबाबतचे मुलकी व दिवाणी अधिकार असत. पुढे या पाटलातूनच पुढे सरदार उदयाला आले. पेशवाईत महादजी शिंदेसारख्या पराक्रमी सरदारासही आपणास पाटील म्हणवून घेण्यात धन्य वाटत होते.

१) पाटलाचे हक्क :

पाटलांना जे हक्क होते ते पाटिलकीच्या सनदेत उपभोगावयाच्या हकलाजिमामध्ये नोंदविले आहेत. या हक्कांची माहिती पुढील प्रमाणे आहे.

२) मानपान :

गावात गाव प्रमुख या नात्याने पाटलाला मानपान मिळत असे. सणासुदीला अथवा आनंदप्रसंगी पाटलाला अग्रहक्क मिळत असे. गावातील जत्रा अथवा उत्सवाचा तो नायक असे. मानपानाचा भाग म्हणून त्यास होळीची पोळी व मकर संक्रातीस तीळ मिळत असे.

३) खुर्दा किंवा रोकड :

सरकारचा प्रतिनिधी व गावाचा प्रमुख म्हणून पाटील गावासाठी काम करत असे. गावापासून सरकारला जोडउत्पन्न मिळत असे. त्यातील काही रक्कम पाटलाला मिळत असे. पाटलाला दिली जाणारी रक्कम सरकार ठरवत असे. काही कागदपत्रात पाटीलकीच्या हक्काचे प्रमाण उपलब्ध आहे. हे प्रमाण २२% आहे. या बाबत असे लिखान आहे, "पाटीलकीचा हक्क २२% दिवाणाचे नेमून घेतले".

४) गला अथवा ऐनाजिनसी :

पाटलाला गाव प्रमुख या नात्याने गावातील लोकांकडून ज्या काही वस्तू मिळत त्याला गला असे म्हटले जात होते. जमीनदाराकडून पाटलाला धान्य अथवा वस्तू मिळत त्याला 'घुगरी' व 'पळकी' असे म्हणत. 'घुगरी' म्हणजे पसाभर धान्य व 'पळकी' म्हणजे पळीभर तेल अथवा तूप. गावातील कारागिराकडून व व्यापाऱ्यांकडून काही वस्तू भेट म्हणून दरसाल मिळत असत. उदा.

muhotes.in

चांभाराकडून पायपोसी, कोष्ट्याकडून पासोंडी, विणकराकडून 'चोळखण' पेठेतील व्यापाऱ्याकडून नारळ, सुपारी, मांस इ. वस्तू त्यांना विनामूल्य मिळत असत.

५) वेठबिगारी :

पाटलाला वेठबिगार ठेवण्याचा हक्क होता. एक राबता महार पाटलाच्या तैनातीला असे. तसेच त्याला महार, वाजंत्री व कारागीर यांच्याकडून विनामूल्य काम करुन घेण्याचे अधिकार होते. म्हणजेच या काळात पाटलाला वेठबिगार ठेवण्याचे हक्क होते हे सिद्ध होते.

६) कर :

पाटलाला कर रुपाने जमा होणाऱ्या सरकारी रक्कमेतून काही हिस्सा मिळत असे. उदा. गावातील लग्नांवर आकारला जाणारा 'वऱ्हाडटका' अथवा 'पाटदाम' आणि गावातील आयात-निर्यात मालावरील जकात करातील हिस्सा पाटलाला मिळत असे.

२) पाटलाची कामे :

पाटील या कालखंडात गावाचा प्रमुख होता. गावाचा प्रमुख या नात्याने ज्या प्रमाणे त्याला हक्क त्याच प्रमाणे त्याला गावासाठी वेगवेगळ्या प्रकारची कामेही करावी लागत असत. ही कामे पुढील प्रमाणे आहेत.

१) गावातील लावणी-संचणी-उगवणी व्यवस्था पहाणे.

२) गावातील पडीक जमीन लागवडीखाली आणने.

३) गोतसभेचा प्रमुख या नात्याने गोतसभेच्या बैठकांचे संचलन करणे.

४) गोतसभेच्या माध्यमातून गावातील तंट्यांचा न्यायनिवाडा करणे.

५) गावातील शांतता व सुरक्षिततेची जबाबदारी सांभाळणे.

६) कुलकर्ण्याच्या मदतीने प्रतिवर्षी गावाच्या उत्पन्नाचा संभाव्य अंदाजपत्रक तयार करणे.

७) गावाच्या सारा निश्चितीबाबत सरकारी अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करणे.

८) दुष्काळ, शत्रु हल्ला, व इतर आपत्तीमुळे जर रयतेचे नुकसान झाले तर रयतेचे सरकारी दरबारात प्रतिनिधित्व करुन रयतेला साऱ्यात सूट मिळवून देणे.

९) गावातील मिरासदारांची माहिती सरकारला पुरवणे.

१०) गावात घेतल्या जाणाऱ्या पिकांची माहिती सरकारला पुरवणे.

११) गावातील उत्पन्नांची माहिती सरकारला पुरवणे.

१२) गावातील सारा वसूलीची माहिती सरकारला पुरवणे.

१३) गावातील सारा वसूलीचे काम करणे.

१४) वेळ प्रसंगी सरकारची चाकरी करणे.

munotes.in

ब) कुलकर्णी :

पाटील हा गावाचा मुख्य वतनदार होता. पाटलाच्या खालोखाल कुलकर्णी हा पदास कागदपत्रात 'कुलकर्ण' अथवा 'लेखनवृत्ती' असे म्हटले आहे. गावाचा हिशेब ठेवणे हे मुख्य काम त्याच्याकडे असे. पाटलाचा हिशेबनीस म्हणून त्यास काम करावे लागत असे.

मराठा कालखंडात ज्या प्रमाणे पाटील हे वतनदार पद प्रत्येक गावासाठी असे तसे प्रत्येक गावासाठी कुलकर्णी हे वतनदार पद असे असे नाही. कारण त्या कालखंडात साक्षरतेचे प्रमाण अति अल्प असे. परिणामी कुलकर्णी पदासाठी आवश्यक असणारी माणसे उपलब्ध होत नव्हती. परिणामी एकेका कुलकर्ण्याकडे काही वेळा पाच-दहा गावेही नेमून दिलेली असत.

कुलकर्ण्यांच्या घरात 'कुलकर्ण' वतन वंशपरंपरेने नांदत असे. कुलकर्णी घराण्यात त्या दृष्टीने लिखापढी करणारे वारस तयार होत असत. किंबहूना ती कुलकर्ण्यांची जबाबदारी असे. काही ठिकाणी कुलकर्णी आपल्या वतनावर अन्य माणूस 'मुतालिक' म्हणून नेमत असत. तर काही गावात कुलकर्णीपद रिक्त राहिले तर गावकरी एकत्र येऊन लायक माणसाची निवड या पदावर करत असत व सरकार दरबारी अर्ज करुन मान्यता घेत असत.

कुलकर्णी हा बहुधा ब्राह्मण जातीतील असे. पण क्वचित प्रसंगी तो लिगांयतासारख्या समाजातील असे.

१) कुलकर्ण्याचे हक्क :

पाटला प्रमाणेच कुलकर्णी हा गावाचा वतनदार असल्याने त्यालासुद्धा गाव वतनदारीचे हक्क प्राप्त झाले होते. त्याचे हक्क पुढील प्रमाणे आहेत.

२) महसूलाचा काही भाग :

महसूल जमा करण्याचे महत्त्वपूर्ण काम कुलकर्ण्याला करावे लागत असल्याने महसूलाचा काही भाग कुलकर्ण्याला मिळत असे. मात्र याचे प्रमाण किती होते या बाबत माहिती उपलब्ध नाही.

३) सा दिल वार :

कुलकर्णी हा ज्या प्रमाणे गावाचा वतनदार असे त्याच प्रमाणे तो गावाच्या महसूल दप्तराचा प्रमुखही असे. परिणामी या दप्तराचे संपूर्ण कामकाज त्याला पहावे लागत असे. या दप्तराच्या कामकाजाच्या खर्चासाठी त्याला काही रक्कम मिळत असे. ही रक्कम सरकारकडून अथवा गावाकडून मिळत असे. या रक्कमेलाच सा दिल वार असे म्हणतात. या रक्कमेवर त्याचा हक्क असे.

४) भेटवस्तू :

कुलकर्ण्याला त्याच्या कामकाजाच्या ज्या प्रमाणे सरकारी मोबदला हक्क रुपाने मिळत होता, त्याच प्रमाणे गावकऱ्यांकडून सुद्धा त्याला हक्क स्वरुपात भेटवस्तू म्हणून मोबदला मिळत असे. उदा. चांभाराकडून पायपोसी, शेतकऱ्यांकडून घुगरी, हुर्डा, घरत, तूप, फळे, भेटवस्तू स्वरुपात मिळत असत.

munotes.in

५) वेठबिगारी :

कुलकर्ण्याला पाटला प्रमाणेच वेठबिगारी बाबत हक्क होते. त्याच्या खाजगी कामासाठी त्याला एक राबता महार मिळत असे. त्याच्याकडून काम करुन घेण्याचे अधिकार त्याला होते.

पाटील व कुलकर्ण्याच्या हक्काचा विचार केला तर या दोहोत अधिकाराच्या बाबतीत खूप तफावत जाणवते. गावात पाटलाला मानाचे स्थान होते. मात्र कुलकर्ण्याला मानाबाबत दुय्यम स्थान होते. वस्तू अथवा रक्कमाच्या हक्का बाबत जरी विचार केला तरी पाटलापेक्षा कुलकर्ण्याला हे हक्क व त्यापासून मिळणारा मोबदला हा कमी होता. मात्र दप्तरखर्चासाठी मिळणारी रक्कम ही कुलकर्ण्याच्या जमेची बाजू होती. असे जरी असले तरी या दोन्ही वतनदारांना परस्पर संगणमताने व समान उद्देशाना गावासाठी कामे करावी लागत होती.

२) कुलकर्ण्याची कामे :

कुलकर्णी हा पोतपाटलाचा मदतनीस असे. त्याचा उल्लेख 'गावकुलकर्णी', 'ग्रामलेखी' असा करण्यात आला आहे. त्याला आपल्या कार्याला अनुसरुन खालिल प्रकारची कामे करावी लागत असत.

१) गावाचा जमा खर्चाचा हिशेब लिहिणे.

२) गावातील सर्व प्रकारच्या जमिनीच्या नोंदी ठेवणे.

३) प्रत्येक व्यक्तीच्या नावावर असणाऱ्या जमीनीच्या व महसूलाचा जमा-खर्च ठेवणे.

४) महसूलातून जमा होणाऱ्या रक्कमेची खातेवहीत नोंद ठेवणे.

५) महसूल बाकीचा तक्ता तयार करणे.

६) गावाच्या लावणी-संचणीकडे लक्ष देणे.

७) गावातील शेती व्यवसायास प्रोत्साहन देणे.

८) गावातील जास्तीत जास्त जमीन लागवडीसाठी प्रयत्न करणे.

९) महसूल जमा करण्यासाठी पाटलाची मदत घेणे.

१०) महसूलाची रक्कम सरकार दरबारी जमा करणे.

११) पाटलाच्या अनुपस्थितीत गोतसभेचे नेतृत्त्व करणे.

एखाद्या कुलकर्णी जर कार्यक्षम असला तर तो गावपाटलाला बाजूला सरकावून गावाचे व गोतमजलीसचे नेतृत्त्व करत असे. मग त्या गावचा पाटील हा नामधारी रहात असे.

मात्र एखाद्या कुलकर्णी जर अप्रामाणिक असेल तर त्याला कडक शासन होत असे. त्याचे वतनही काढून घेतले जात असे. एखाद्या ठिकाणी कुलकर्णी घराणे निर्वंश झाले असेल तर ते वतन गावाच्या मालकीचे होत असे व गावकरी त्या वतनाची विक्री करत असत. विक्रीपासून प्राप्त होणाऱ्या रक्कमेला 'शेरणी' असे म्हटले जात असे. या शेरणीचा वापर गावाची कर्जे भरण्यासाठी किंवा गावकीच्या इतर कामासाठी केला जात असे.

munotes.in

क) चौगुला

ग्रामव्यवस्थेतील मराठा कालखंडातील तिसरा महत्त्वपूर्ण वतनदर म्हणजे चौगुला होय. मराठ्यांच्या राज्यव्यवहार कोशात चौगुल्याला 'ग्रामीण' असे म्हटले आहे. चौगुल्याला वतनदाराचा दर्जा आहे. सामान्यत: चौगुला हा मराठा जातीचा असे. पण अपवाद म्हणून काही ठिकाणी लिगांयत, जैन, मुसलमान इत्यादी समाजातील चौगुले असत. एकंदरीत पाटलाच्या खालोखाल या वतनास प्रतिष्ठा असावी. चौगुल्यास पाटील कुलकर्ण्यांनंतर मानाचे स्थान होते. गोतसभेत त्याला पाटलानंतरचे स्थान होते. त्यास कागदपत्रात काहीवेळा 'देश चौगुला' असा शब्दप्रयोग सापडतो. यावरुनच तो देशमुख, देशपांड्याप्रमाणेच परगण्याचाही अधिकारी असला पाहिजे. त्याची निशाणी काही ठिकाणी 'नांगर' तर काही ठिकाणी 'काठी' आहे. यावरुनच तो जमीन मोजणीशी संबधीत असावा व पाटलाला या कामी तो मदत करत असावा असा अंदाज काढला जातो. त्याच्या हक्काबाबत पुरेशी माहिती उपलब्ध नाही.

१) चौगुल्याची कामे :

ग्राम व्यवस्थेतील चौगुला हा जरी वतनदार असला तरी तो कुलकर्ण्याप्रमाणेच गाव प्रशासनाला अनुसरुन प्रशासकीय स्वरुपाची कामे पहात होता. या जबाबदारीला अनुसरुन त्याला पुढील प्रकारची कामे करावी लागत होती.

१) गावाच्या कारभारासाठी पाटलाला मदत करणे.

२) सरकार दरबारी गावा संदर्भातील पत्रव्यवहार पोहचविणे.

३) सरकार दरबारी हिशेबाची कागदपत्रे पोहचविणे.

४) गावाचा सारा वसूल करण्यास पाटलाला मदत करणे.

५) गाव सोडून गेलेल्या कुळांना परत गावात आणून त्यांना स्थिर करणे.

६) गावातील वस्तूरुपाने जमा झालेला महसूल सुरक्षित राखणे.

७) गावातील कोठाराच्या सुरक्षिततेची जबाबदारी सांभाळणे.

८) गावातील गोतसभेस प्रतिनिधी म्हणून उपस्थित रहाणे.

९) गावातील जमीन मोजणीच्या कामास मदत करणे.

१०) गावातील जमा झालेल्या महसूल परगण्याच्या मुख्य कचेरीत नेवून भरणे.

ड) शेटे महाजन :

मराठा कालखंडातील शेटे महाजन हे ग्राम व्यवस्थेतील आर्थिक व्यवहाराशी संबधित असणारे वतनदार होते. गावाच्या पेठेचे ते वंशपरंपरागत अधिकारी होते. गावात 'पेठ' वसविण्याचे काम 'शेटे' करत असे म्हणूनच तो पेठेचा प्रमुख असे तर पेठेचा 'हिशेब' ठेवण्याचे काम 'महाजन' करत असे. गावामध्ये भरणाऱ्या गोतसभेत पेठेचे सभासद म्हणून ते बसत असत. ते गोतसभेच्या कामकाजातही सहभागी होत असत. गोतसभेच्या निवाड्यावर त्यांची तराजू ही निशाणी

munotes.in

उमटवली जात असे. गावातील सावकारी व्यवहार मुख्यत: शेटे-महाजनांकडून केले जात असत.

१) शेटे महजनांचे हक्क :

मराठा कालखंडात पाटील, कुलकर्णी यांना ज्या प्रमाणे वतनदारीचे हक्क त्याच प्रमाणे शेटे महाजनानासुद्धा वतनदारीचे हक्क होते.

२) दुकानापासून मिळणारे हक्क :

प्रत्येक गावात पेठा असत. या पेठांमध्ये ठरावीक दिवशी बाजारपेठ भरत असे. या बाजारपेठेत जेवठी दुकाने असत तेवढ्या सर्व दुकानापासून शेठे महाजनांना सुपारी मिळत असे. हा त्यांचा हक्क कायम स्वरुपाचा होता.

३) पाने मिळविण्याचा हक्क :

पेठांमध्ये जेवढी पानांची दुकाने असत ती दुकाने तांबोळ्यांची असत. या तांबोळ्याकडून दररोज पाच पाने मिळविण्याचा हक्क शेठे महाजनांना असे.

४) तेल मिळविण्याचा हक्क :

पेठांमध्ये जेवठी तेलाची दुकाने असत त्या तेल्यान पासून नऊ टाक (पळ्या) तेल मिळविण्याचा हक्क शेठे-महाजनांना असे.

५) दुकानदारांकडून मिळणाऱ्या वस्तू :

पेठांमध्ये असणाऱ्या दुकानांमधून शेठे महाजनाना अर्धाशेर हरभरे मिळत असत. तसेच दसरा, दिवाळी, शिमगा, पाडवा या सणांच्या दिवशी प्रत्येक दुकानदारांकडून पावशेर गहु अथवा तांदूळ मिळत असत.

६) विणकरांपासून मिळणाऱ्या वस्तू :

मराठा कालखंडात कापड उद्योगाचा विकास मोठ्या प्रमाणात झाला होता. परिणामी विणकराना महत्त्व आले होते. हे विणकर पेठांमध्ये आपल्या तयार केलेल्या वस्तू आणत होते. अशा प्रत्येक विणकरांकडून शेठे-महाजनाना एक पासोडी मिळत असे.

७) चांभारापासून मिळणाऱ्या वस्तू :

मराठा कालखंडात शेठे-महाजनांना प्रत्येक वर्षी प्रत्येक चांभाराकडून एक जोडा मिळत असे.

८) घरपट्टी बाबत सवलत :

शेठे महाजन जरी वतनदार असेल तरी ते पेठांच्या कामकाजाच्या माध्यमातून मराठा सरकारचे प्रतिनिधीत्व कर होते. परिणामी त्याना ज्या गावात रहात असत त्या घराला घरपट्टी नसे.

munotes.in

२) शेटे महाजनांची कामे :

शेटे महाजन हे आर्थिक बाबीशी संबधीत असणारे वतनदार असल्याने त्यांचा संबंध जास्त प्रमाणात व्यापारी पेठा व पेठांतर्गत चालणाऱ्या व्यवसायांबरोबर येत असे. त्या अनुशंगाणे त्यांना वेगवेगळ्या प्रकारची कामे करावी लागत असत ही कामे पुढील प्रमाणे आहेत.

१) गावात नवीन पेठा वसविणे.

२) एखाद्या गावात बाजार भरत नसेल तर त्या गावात नव्याने बाजार भरवून तो बाजार नियमित सुरु राहण्याची व्यवस्था पहाणे.

३) व्यापारी पेठांमधील वजनांची तपासणी करणे.

४) पेठेतील लोकांकडून करांची वसूली करणे.

५) पेठाचा हिशेब ठेवणे.

६) पेठाबद्दल सरकारला माहिती देणे.

७) गावाच्या गोतसभेस पेठांचे प्रतिनिधी म्हणून हजर रहाणे.

८) गावाच्या गोतसभेच्या कामकाजात सहभागी होणे.

९) गोतसभेच्या निवाडापत्रावर 'तराजू' ही निशाणी उमटवणे.

१०) गावातील सावकारी व्यवहारांबाबत मध्यस्ती करणे.

११) पेठांच्या संरक्षणाकडे लक्ष देणे.

१२) पेठांमधील व्यापाऱ्यांच्या अडी-अडचणी समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणे.

१३) व्यापारी पेठांचे व्यवस्थापन सुयोग्य पद्धतीने सुरु आहे किंवा नाही याची पहाणी करणे.

इ) मिरासदार व उपरी :

वंशपरंपरेने अस्तित्वात आलेला खेडेगावातील दुसरा वर्ग म्हणजे मिरासदार व उपरी होय. गावातील लागवडीसाली असणारी जमीन कसण्याचे काम हा वर्ग करत असे.

१) मिरासदार : मिरासदार हे गावातील जमिनीचे वंशपरंपरागत व वहिवाटीने जमीन कसत असत. गावातील ७५ ते ८०% जमिन या वर्गाच्या मालकीची असे. मिरासदारांना नागरिकत्त्वाचे सर्व हक्क उपभोगावयास मिळत असत. त्यांना खालील प्रकारची कामे करावी लागत होती.

१) खेडेगावात वसाहती तयार करणे.

२) खेडे गावातील जमिनी लागवडीखाली आणणे.

३) बाहेरच्या लोकांना जमिनी लागवडीखाली आणण्यास प्रोत्सहान देणे.

४) गोतसभेत प्रतिनिधी म्हणून उपस्थित रहाणे.

munotes.in

५) गोतसभेच्या कामकाजात सक्रीय सहभाग घेणे.

६) लागवडीखाली असणाऱ्या आपल्या मालकीच्या जमीनीच्या नियमित सारा भरणे.

मिरासदाराना जे हक्क प्राप्त झाले होते त्या हक्काना मिरासी हक्क असे म्हटले जात होते. मराठ्यांच्या महसूल उत्पन्नाचा संबध या लोकांबरोबर असल्याने या लोकांना या राजवटीत स्वतंत्र अस्तित्व निर्माण झाले होते. म्हणूनच या लोकांचे महत्त्व वाढले होते.

२) उपरी :

मिरासदारांना त्यांच्या शेतीच्या अथवा अन्य कामासाठी मदत करण्यासाठी जे लोक गावात येत असत त्याना उपरी असे म्हटले जात असे. उपऱ्यांन परके मानले जात असल्याने गोतसभेबरोबर त्यांचा काही संबध नसे. गोतसभेत स्थान नसल्याने त्यांना गावातही कसलेच स्थान नसे. काही वेळा गावाची वजावट जमीन करण्यासाठी ते सरकारातून मुदतीने घेत. कालातरांने त्या जमीनीचे मालकी हक्क त्यांना मिळून त्यांची गणना मिरासदारात होत असे. उपऱ्यातून मिरासदारी मिळालेल्या या लोकांनी पुढे ग्राम विकासास हातभार लावल्याची माहिती मराठ्यांच्या इतिहासातून पुढे आली आहे.

ई बलुतेदार व आलुतेदार :

मराठा कालखंडात खेडेगावात परंपरेने चालत आलेल्या वतनदारात बलुतेदार व आलुतेदार यांचा समावेश असे. गावाच्या अभ्युदयासाठी आणि स्थैर्यासाठी बलुतेदार-आलुतेदार फार मोलाची कामगिरी बजावत असत. डॉ. बाळकृष्ण आपल्या Shivaji the Great Vol. IV या ग्रंथात म्हणतात, "बलुतेदार पद्धतीने महाराष्ट्रातील खेडेगावांच्या समाजरचनेत व राजकीय जीवनात महत्त्वाची कामगिरी बजावली जात व सामाजिक स्थान याचा विचार करुन प्रत्येक बलुतेदार हा गावाच्या प्रशासनात महत्त्वाची कामगिरी करत असे". खऱ्या अर्थाने बलुदेदार हे ग्रामसेवकच होते. बलुतेदारांना गावकऱ्यांकडून त्यांच्या कामाचा मोबदला म्हणून सुगीच्या दिवसात पिकांचा काही भाग हिस्सा म्हणून मिळत असे. त्याला 'बलुता' म्हणत. या बलुत्याच्या मोबदल्यात संबध वर्षभर त्या बलुतेदाराला त्या शेतकऱ्याची कामे करावी लागत असत. बलुतेदार हा स्वतंत्र असला तरी अनेक बाबतीत त्याला शेतकऱ्यांवर अवलंबून रहावे लागत असे. बलुतेदारांची माहिती तत्कालीन महजरावरुन (निवाडापत्रावरुन) मिळते.

गँट डफने "History of the Marathas" या ग्रंथात १२ बलुतेदार व १२ आलुतेदार यांची यादी दिली आहे.

बलुतेदार : १) सुतार २)लोहार ३) चांभार ४) महार ५) मांग ६) कुंभार ७) न्हावी ८) धोबी ९) गुरव १०) जोशी ११) भाट १२) मुलाणा

आलुतेदार : १) सोनार २) जंगम ३) शिंपी ४) कोळी ५) तराळ ६) माळी ७) गोसावी ८) घडसी ९) रामोशी १०) तेली ११) तांबोळी १२) गोंधळी.

शिवकाळातील समाजस्थितीचे एक संशोधक डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनी बलुतेदार व आलुतेदार यांचे गावसेवेसाठी जे योगदान आहे, त्या वरुन तिन भाग पाडले आहेत. १) कारागीर अथवा व्यावसायिकांचा वर्ग २) सेवकांचा वर्ग ३) धार्मिक सेवकांचा वर्ग.

१) कारागीर अथवा व्यावसायिकांचा वर्ग :

या वर्गात सुतार, लोहार, न्हावी, चांभार, कुंभार, धोबी यांचा समावेश होतो. या वर्गातील सुतार गावकऱ्यांना लागणारी शेतीची अवजारे बनवत असत. लोहार शेतीसाठी लागणारी लोखंडी अवजारे बनवत असत व दुरुस्त करत असत. कुंभार मातीची भांडी बनवून ती शेतकऱ्यांना पुरवत असे. धोबी गावातील प्रमुख वतनदारांचे कपडे धुवून देत असत. न्हावी गावातील लोकांच्या हजामती करीत असे.

२) सेवकांचा वर्ग :

या वर्गात महार, तराळ, मांग, रामोशी, यांचा समावेश होतो. महार-मांग हे वतनदारांचे सेवक होते. त्यांच्या वतनाला 'हडकी' अथवा 'पाडेवारी' असे म्हणत. ग्रॅट डफ म्हणतो, की "महाराष्ट्रातील महार जमात ही अत्यंत कामसू उपयुक्त आणि हुषार अशी होती" गावातील मृत जनावराना हलविण्याचे काम त्यांच्याकडे असे. गावात घडणाऱ्या गोष्टींची खडानखडा माहिती महाराला असे. गावकीच्या कामात त्यांचा वाटा मोठा असे. पाडेवार म्हणजे गावकीवर नेमून दिलेला महार आणि रायता मदार म्हणजे घरकामासाठी दिलेला महार. आपला धनी पाटील याचा तो संरक्षक असे. तराळ व महारकीचे वतन बहुधा एकाच व्यक्तीकडे असे. सरकारी दंवडी रयते पर्यंत पोहचविण्याचे काम तराळ करत असे.

मांग मोटेचे दोरखंड, चाबूक, चामड्याच्या वादी इत्यादी वस्तू तयार करुन तो शेतकऱ्यांना पुरवत असे. गावाच्या रक्षकाचे काम त्याच्याकडे असे गावातील चोरी व गुन्ह्यांच्या तपासाचे काम रामोशी करत असे.

३) धार्मिक सेवकांचा वर्ग :

या वर्गात जोशी, गुरव, ठाकूर, जंगम व मुलाणा या बलुतेदारांचा समावेश होतो. गावातील गावकऱ्यांच्या धार्मिक व सामाजिक गरजा भागविण्याचे काम हा वर्ग करत होता. जोशी पंचाग वाचून लावणी-संचणीसाठी तसेच मंगल कार्यासाठी मुहूर्त काढण्याचे काम करत असत. गुरव मंदिराच्या पुजाऱ्याचे काम व मंदिराची देखभाल करत असत. जगंम हे लिंगायत पुरोहित होते. ते बेल वाटण्याचे काम करीत असत. ठाकूर हा शुद्र जातीतील विशेषतः जंगलात राहणाऱ्या काही जमातीचा पुरोहित होता. मुलाणा हा गावच्या मशिदीची व कबरस्तानाची देखभाल मुलाणा करीत असे. तसेच गावाच्या खाटीक अथवा कसाई म्हणूनही तो काम करी. मुसलमान समाजाचे सर्व धार्मिक विधी तोच करत असे. मुलाणा हा मुसलमान गृहस्थ बलुतेदारांमध्ये समाविष्ट केला होता.

आलुतेदार :

बलुतेदारांशीवाय गावात जे कारागिर अथवा व्यावसायिक असत. मात्र त्यांची सेवा गावकऱ्यांना अनिवार्य नव्हती. परिणामी या कालखंडात समाजव्यवस्थेत या लोकांना महत्त्वाचे स्थान नव्हते. परंतू प्रसंगी गावकऱ्यांना त्यांची गरज लागत असे. म्हणुनच त्यांना गावात राहण्याची व आपली उपजिविका करण्याची सवलत दिली जात असे. त्यांचा दर्जा उपरी लोकांसारखा असे. अशा लोकांना आलुतेदार म्हणण्याचा प्रधान होता. आलुतेदारांची संख्याही १२ होती असे मानले जाते.

ग्रॅट डफने आलुतेदारांची यादी दिली आहे ती पुढील प्रमाणे, सोनार, कोळी, जंगम, शिंपी, तराळ, माळी, डवरी, घडशी, रामोशी, तेली, तांबोळी, गोंधळी.

वरील नावे महजरातून बलुतेदाराच्या यादीतही आढळतात. व्यवसाय करणाऱ्या लोकांना 'कारु' व 'नारु' असे म्हणत. 'कारुला' बलुतेदार आणि 'नारुला' अलुतेदार असे म्हटले जाते. या दोहोत फरक असा की ज्यांच्या सेवावाचून शेतकऱ्यांचे हरघडी नडते तो कारु अथवा बलुतेदार व ज्याची सेवा मिळाली नाही तरी शेतकऱ्याचे फारसे नडत नाही तो नारु अथवा आलुतेदार

बलुतेदारांना गोतसभेच्या सभाना हजर राहून कामकाजात सहभागी होण्याच्या अधिकार होता. गावाच्या महजरावर त्यांची नाव निशाणी असे. प्रत्येक बलुतेदाराची स्वतंत्र निशाणी असे. व ती त्यांच्या नावा समोर काढली जात असे. गाव जर लहान असेल तर सर्व बलुतेदारांना गावाची सेवा करणे शक्य होत असे. मात्र गाव जर मोठे असेल तर त्यांना संपूर्ण गावाला सेवा देणे शक्य होत नसे. त्यासाठी श्रमविभागणीच्या तत्त्वाचा अवलंब केला जात असे. मग अशा प्रसंगी बाहेरच्या गावातील बलुतेदार बोलाविला जात असे व त्याच्याकडे गिऱ्हाईके बांधून दिली जात असत.

झ) देशमुख :

देशमुख हे जरी परगण्याचे वतनदार असले तरी परगण्यातील गावात त्यांची जास्त जमिन असल्याने गावाबरोबर त्यांचा निकटचा संबध येत असे.

१) देशमुखांचे हक्क :

देशमुखाचा दर्जा हा सर्व वतनदारात श्रेष्ठ असल्याने देशमुखांचे हक्क विस्तृत होते. त्याचे हक्क पुढील प्रमाणे आहेत.

२) रोख रक्कमेचा हक्क :

देशमुख हा जरी परगण्याचा अधिकारी असला तरी त्याचे संबध गावाबरोबर येत असत. प्रत्येक गावाकडून त्याला त्याचा दौरा खर्च म्हणून १ होन रोख रक्कम मिळत असे. त्याच बरोबर जनावरांच्या खरेदी विक्रीवर ३ रुके (ताब्यांची नाणी) रोख स्वरुपात मिळत असत. तसेच गावावर प्रशासकीय कामासाठी येण्याचे मानधनही मिळत असे.

३) सेवा हक्क :

देशमुख हा श्रेष्ठदर्जाचा वतनी अधिकारी होता. परिणामी त्याला त्याच्या वैयक्तीक कामासाठी विनामूल्य सेवा घेण्याचा हक्क प्राप्त झाला होता. परिणामी दरवर्षी महिना-दोन महिन्यासाठी त्याला राबता महार कामासाठी विनामूल्य घेण्याचा अधिकार होता.

४) नजराण्याचा हक्क :

देशमुख परगण्याचा अधिकारी असल्याने या पदाला प्रतिष्ठा होती. परिणामी प्रत्येक खेड्यातून त्याला भेट अथवा नजराणा रुपाने अनेक वस्तू मिळत असत. उदा. शेतकऱ्याकडून पिकविलेल्या धान्याचा काही हिस्सा, गवतफाटा, जळण इत्यादी वस्तू त्याला गावकऱ्यांकडून मिळत असत. तसेच बलुतेदारांकडून तयार केलेल्या वस्तू मिळत असत. उदा. धनगराकडून लोकर, चर्मकाराकडून वहाणा, कुंभाराकडून मातीची भांडी, तेल्याकडून तेल इत्यादी मिळत असे. मोमीनकडून सुताच्या गुंड्या, परवेगाराकडून रेशमाच्या गुंड्या, तांबोळ्याकडून पान, सुपाऱ्या, भाजीवाल्याकडून भाजी इत्यादी वस्तू त्याला विनामूल्य मिळत असत.

mumtes.in

५) कारागिराच्या बाबतीतला हक्क :

देशमुखांना स्वत:च्या कामासाठी कारागिरांची मदत घेण्याचा हक्क होता. म्हणूनच जेव्हा जेव्हा गरज लागत असे तेव्हा तेव्हा देशमुख आपल्या कामासाठी अशा लोकांची मदत घेत असत. कारागिराबरोबरच व्यापाऱ्यांची सुद्धा मदत घेत असत.

२) देशमुखाची कामे :

देशमुख हा जरी परगण्याचा अधिकारी असला तरी त्याचे संबध गावांबरोबर येत असत. परगण्यातील गावांवर त्याला देखरेख ही ठेवावी लागत असे. तो गावातील सर्व पाटलांचा नायक असे. त्याला पुढील प्रकारची कामे करावी लागत असत.

१) परगण्यातिल गावांच्या पाटलांवर कामावर देखरेख ठेवणे.

२) गावातील वजावट जमीन लागवडीखाली आणणे.

३) गावातील जमीनीचा सारा वाढविण्यासाठी प्रयत्न करणे.

४) परगण्यातील गावांमध्ये दौरा काढून गावांचा सारा निश्चित करणे.

५) परगण्यातील गावांच्या समस्या सोडविणे.

६) परगण्यातील गावांची लोकवस्ती टिकविणे व लोकवस्तीचा विकास करणे.

७) गावातील जमीनीच्या लागवड-सिंचनाकडे लक्ष देणे.

८) पाटलांच्या मदतीने गावातील सारा वसुल करुन तो सरकार दरबारी भरणे.

९) दुष्काळ अथवा टंचाईच्या वेळी गावकऱ्यांना साऱ्यात सूट देणे.

१०) परगण्यात येणाऱ्या गावात शांतता व सुव्यवस्था राखणे.

११) परगण्यातील गावांच्या संरक्षणाची जबाबदारी सांभाळणे.

थोडक्यात देशमुख हा सरकार व गाव यांच्यामधील दुवा असे. म्हणूनच सरकार, परगणा व गाव या तिन्ही घटकात देशमुखाला महत्त्वाचे स्थान होते.

झ) देशपांडे :

परगण्याचा दुसरा महत्त्वपूर्ण अधिकारी म्हणजे देशपांडे. देशपांडे जरी परगण्याचा अधिकारी असला तरी त्याचा संबध देशमुखा प्रमाणेच गावा बरोबर येत असे.

१) देशपांडेचे हक्क :

देशपांडेला खालील प्रकारचे हक्क प्राप्त झाले होते.

mumotes.in

२) रोख रक्कमेचा हक्क :

देशमुखा प्रमाणेच देशपांडेला सुद्धा परगण्यातील गावांमधून रोख रक्कम मिळविण्याचा हक्क होता. मात्र हे प्रमाण देशमुखाला जी रक्कम मिळत असे त्याच्या निम्मे असे.

३) सेवा हक्क :

देशपांडेला देशमुखा प्रमाणेच बलुतेदारांकडून सेवा मिळविण्याचा हक्क प्राप्त झाला होता. तो प्रसंगानुरुप व गरजेनुसार या सेवेचे हक्क उपभोगत होता.

४) मानपाणाचा हक्क :

परगण्यातील गावात जर लग्न असेल तर देशपांडेला मान दिला जात असे. त्याला मान म्हणून साखर, पान, सुपारी व शेला, पागोटे भेट मिळत असे.

५) इतर हक्क :

देशपांडेला खटल्यातील 'हारकी' पैकी काही रक्कम मिळत असे. तसेच प्रत्येक ऊस मळ्यामागे ५ शेर गुळ, एक ऊसाचा भारा व एक ऊसाच्या रसाची घागर मिळत असे. शेतकऱ्यांकडून भाजीपाला मिळत असे, धान्य मिळत असे, कोष्ट्याकडून पासोडी, चांभाराकडून पायपोसी व गुरुवाकडून पत्रावळ्या त्याला मिळत असत.

२) देशपांडेची कामे :

देशपांडे हा परगण्याचा वतनी अधिकारी होता. त्याच प्रत्यक्ष संबध परगण्यातील गावांबरोबर येत असे. त्याला या गावांसदर्भात वेगवेगळ्या प्रकारची कामे करावी लागत असत ही कामे पुढील प्रमाणे आहेत.

१) परगण्यातील गावांचे हिशेब पहाणे.

२) परगण्यातील गावांच्या कुलकर्ण्यांच्या कामावर देखरेख ठेवणे.

३) परगण्यातील कोणत्याही गावाचा अचानक हिशेब तपासणे.

४) पाटलांना सरकार दरबारी कामकाजात मदत करणे.

आपली प्रगती तपासा

१. मराठा कालखंडातील खेड्याचे स्वरुप जाणून घ्या.

२. मराठा कालखंडातील खेड्याती समाज रचनेला जाणून घ्या.

३. मराठा कालखंडातील खेड्यात कोणत्या वतनसंस्था होत्या त्यांची माहिती जाणून घ्या.

४. मराठा कालखंडातील खेड्यातील वतनदारांची माहिती जाणून घ्या.

muptesin

४.७ सारांश

मराठा कालखंडाती ग्रामव्यवस्था जाणून घेत असताना आपण सर्व प्रथम या कालखंडात खेड्यांचे स्वरुप जाणून घेत असतांना खेड्याची निर्मिती कोणी केली, खेड्यांचे क्षेत्रफळ त्या क्षेत्रफळानुसार खेड्यांचे पडलेले भाग, खेड्याती मुख्य भाग, उपभाग याची माहिती पाहिली. त्याचबरोबर या कालखंडात खेड्यांना असणारी ऐतिहासिक कागदपत्रातील नावे जाणून घेतली. या सर्व माहितीवरुन आपणास तत्कालीन खेडयाचे स्वरुप समजण्यास मदत झाली.

खेड्यातील समाजरचना ही शेतकरी, शेतमजूर, गावातील वतनी अधिकारी पाटील, कुलकर्णी, चौगुला, शेटे, महाजन यांच्या वर्गवारीने कशी रनचाबद्ध झाली तसेच गावासाठी सेवा पुरविण्याची कामगिरी करणाऱ्या बलुतेदार व आलुतेदारांचा यामध्ये कसा समावेश झाला या सर्व माहितीचा आढावा खेड्यातील समाजरचना या घटकाच्या अनुशंगाने घेतला.

त्याच बरोबर गावातील वतनी अधिकार गाजवणाऱ्या अधिकाऱ्याना वतनी अधिकार कसे प्राप्त झाले, त्यांच्या अधिकाराचे स्वरुप काय होते. तसेच या अधिकाऱ्यांना कोणत्या प्रकारची कामे करावी लागत होती याची माहिती जाणून घेतली.

या सर्व माहितीच्या आधारे आपणास शिवकाळ व पेशवेकाळातील खेड्याचे स्वरुप, खेड्यांची समाजरचना, खेड्यातील वतनी संस्था, खेड्यातील वतनी अधिकारी, त्याचे हक्क, त्यांची कामे या बाबतची माहिती समजण्यास मदत झाली.

४.८ संदर्भ

१) श. ना. जोशी, "मराठेकालीन समाजदर्शन"

२) डॉ. अ. रा. कुलकर्णी, "मध्ययुगीन महाराष्ट्र"

३) शिवकालीन वेठबिगार, "ना. गो. भवरे"

४) पेशवेकालीन महाराष्ट्र, "वा. कृ. भावे"

५) महाराष्ट्र संस्कृती-घडण व विकास, "प्रा. ह. शी. शेणोलीकर", डॉ. प्र. न. देशपांडे.

६) "मराठी सत्तेचा उदय" डॉ. जयसिंगराव पवार

७) "मराठ्यांच प्रशासकीय, सामाजिक व आर्थिक इतिहास" – प्रा. बी. एस. सांवत, प्रा. जाधव

४.९ प्रश्न

१) मराठा कालखंडातील खेड्याचे स्वरुप सांगून खेड्यातील समाजरचनेची माहिती लिहा.

२) मराठा कालखंडातील ग्रामव्यवस्थेची रचना सांगून, ग्रामव्यवस्थेच्या कार्यपद्धतीचा आढावा घ्या.

३) मराठा कालखंडातील वतनदारांची माहिती सांगून, त्यांच्या हक्क व कर्तव्यांचे स्पष्टीकरण द्या.

❖❖❖❖

munotes.in

५

सामाजिक रचना :
जात, वर्ण, गुलामगिरी आणि अस्पृश्य वर्ग

घटक रचना:

५.० उद्दिष्टे

५.१ प्रस्तावना

५.२ जातिव्यवस्थेचा उगम

५.३ मराठा काळातील जातिव्यवस्थेची विविध अंगे

५.४ जातीचे संघटन

५.५ अस्पृश्यतेच्या उगमासंबधी सिध्दांत

५.६ मराठा काळातील अस्पृश्यता

५.७ मराठा काळातील अस्पृश्यतेचे स्वरुप

५.८ अस्पृश्यता आणि बावन्न अधिकार

५.९ मराठा वर्चस्वाखाली गुलामगिरीचे स्त्रोत

५.१० मराठा सत्तेखाली गुलामगिरीचे स्वरुप

५.११ पुरुष गुलामगिरी

५.१२ गुलामांचा व्यापार

५.१३ स्त्रीयांची गुलामगिरी

५.१४ समाजातील गुलामांचे स्थान

५.१५ गुलामगिरी

५.१६ सारांश

५.१७ प्रश्न

५.१८ संदर्भ

munotes.in

५.०. उद्दिष्ट्ये

या प्रकरणाच्या अभ्यासानंतर विद्यार्थ्यांना

- जाती संस्थेचा उगम समजेल.
- मराठा काळा दरम्यान असलेली जातिव्यवस्थेची वेगवेगळी अंगे माहित होतील
- मराठा कालीन समाजामध्ये असलेले जातीचे स्थान माहित होईल.
- मराठा काळातील अस्पृश्यतेचे स्वरूप स्पष्ट करणे.
- मराठा सत्तेच्या वर्चस्वाखाली असलेल्या समाजातील अस्पृश्यतेची स्थिती माहिती करून घेणे.

५.१ प्रस्तावना

जात ही एक स्थिर संघटना असून, ती अशी एकमेव वर्गीय रचना आहे जिचे सभासदत्त्व ज्याच्या आधारे ठरते, ती विशिष्ट रूढीवादी बंधनांमध्ये जखडली आणि ठराविक अधिकारांवर आधारली आहे. `Cast' हा शब्द पोर्तुगाली शब्द `Casta' मधून आला आहे ज्याचा अर्थ अवलाद (उत्पत्ती), वंश वा दर्जा असा होतो. भारतीय उपखंडातील हिंदू समाजातंर्गत असलेली सामाजिक वर्गवारी दशविण्यासाठी हा शब्द पहिल्यांदा वापरला गेला. जरी तो `Cast' या शब्दाचा मूळ सूचित अर्थ असला तरी जगातील इतर भागामध्ये वेगवेगळी उदयास आलेल्या सामाजिक व्यवस्थेचे संपूर्णपणे वा अंशत: वर्णन करण्यासाठी उपयोगात आणला गेला आहे.

सर्वसाधारण जात ही रचना त्या काळातील प्रमुख सत्ताधारी आणि त्याच्या सल्लागार मंडळाच्या मसलतीतून संघटीत केली गेली. ठराविक धार्मिक उत्सव आणि सांस्कृतिक कार्यक्रम साजरे करण्यासाठी ती नेहमी एकसंघ असायची.

पुढे जाऊन जाती संघटनेचे हे सभासद व्यवसाय आणि विशेषत: विवाह, अन्न आणि प्रदूषणाचा प्रश्न या अनुषंगाने आलेल्या रूढींनी जखडले गेले. अश्याप्रकारे अन्न आणि पेय हे त्याच जातींच्या सभासदांपुरते मर्यादित झाले याचाच अर्थ एकत्र जेवण्यासाठी त्याच जातीतील सभासद एकत्र बसू लागले. पुढे काही काळानंतर कुटुंबाचा गटांचा समुह जो सामायिक घरात राहू लागला आणि दंतकथेतील सामायिक पूर्वज, मनुष्य वा ईश्वरी शक्तीची वंशज असल्याचा दावा करू लागला तो जात मानला गेला. या मोठ्या वर्तुळाचा भाग असलेला सभासद सामायिक नावानेच ओळखला जाई आणि तो त्या वर्तुळाबाहेरील व्यक्तीशी विवाह करू शकत नसे, या अर्थाने जाती ही बहुतांश अंतर्गामीच व्यवस्था होती. याच विस्तृत वर्तुळात देखील अनेक छोटी वर्तुळे होती. ज्यातील प्रत्येक जण अंतर्गामी गटच होता.

५.२ जातिव्यवस्थेचा उगम

अ) जातिव्यवस्थेच्या उगमा संदर्भात भारतामध्ये अनेक सिद्धांत आहेत. त्याचा सारांश खालीलप्रमाणे

१) पारंपरिक सांस्कृतिक सिद्धांत : या सिद्धांतानुसार जातिव्यवस्था ही चार वर्णामुळे अस्तित्वात आली. या वर्णव्यवस्थेचा संबंध दंतकथेतील ईश्वराशी जोडला असून ज्यानुसार या

ईश्वराच्या मुखातून ब्राह्मण निर्माण झाला, दंडातून क्षत्रिय निर्माण झाला, वैश्य हा मांड्यातून जन्माला आला तर शूद्राची उत्पत्ती त्याच्या तळपायातून झाली असा उल्लेख आहे.

२) वांशिक दृष्टिकोन : या सिद्धांतानुसार, जात ही आर्य आणि द्रविडा दरम्यानच्या संबंधातून अस्तित्वात आली.

३) कुटुंब आणि पुनरुत्पादन सिद्धांत : प्राचीन इराणी, रोमन आणि भारतीय सामाजिक व्यवस्थामध्ये असलेल्या साम्यस्थळांतून असा दृष्टीकोन ह्या सिद्धांताद्वारे समोर ठेवला जातो.

४) व्यवसाय आदी सिद्धांत : हा सिद्धांत असे प्रतिपादित करतो की, लोकांमधील व्यावसायिक आणि सांस्कृतिक भेदातून जात ही समाजामध्ये उदयास आली.

५) समाजाच्या स्तरीकरणाचा सिद्धांत : हा सिद्धांत श्रमविभागणीच्या तत्त्वावर आधारलेला आहे ज्यानुसार माणसाची जात ही समाजातील त्याची नैसर्गिक आणि अचूक जागा आहे. हा सिद्धांत पुढे असं सांगतो की, पूर्वेकडील आणि पश्चिमेकडील देशांमध्ये असलेला जात आणि वर्गीय भेद हे गुणवत्तेवर आधारित होते आणि नंतरच्या काळात त्यांनी वंश परंपरागत आणि भारतातील जाती व्यवस्था ही जगाच्या इतिहासातील एकमेवाद्वितीय सामाजिक संघटन आहे. हे संघटन जरी अनेक वर्षापूर्वी काळाच्या ओघात निर्माण झाले असले तरीही त्याचा उगम अजूनही दैवी इच्छेचाच भाग मानला जातो.

जातिव्यवस्थेच्या उगमासंबंधीच्या पारंपारिक सिद्धांतानुसार जात ही ऐतिहासिक काळा एवढी प्राचीन आहे आणि वैदिक काळात वर्णव्यवस्थेअंतर्गत तिने आद्य स्वरूप धारण केले. पै एक वैदिक काळातील साधी चार वर्णाची व्यवस्था होती. परंतु काळाच्या ओघात ती गुंतागुंतीच्या आणि विस्तृत व्यवस्थेच्या रूपात वाढली.

ती व्यवस्था विनासायास पित्याकडून मुलाकडे सोपविली गेली. त्यामुळेच ती बदलली ही नाही आणि संमुळ नष्टही झाली नाही. ती वंशपरंपरेने चालत आलेली साचलेली स्थिर बनली आणि काळाच्या ओघात तिच्या अंशी मूलतः असलेली लवचिकता हरवून बसली.

५.३ मराठा काळातील जातिव्यवस्थेची विविध अंगे

मराठा काळातील जातिव्यवस्था अभ्यासण्यामागील मुख्य उद्दिष्ट हे त्या काळातील समाजव्यवस्थेवर या जातव्यवस्थेचा पडलेला प्रभावाचा अंदाज घेण्याचा प्रयत्न करणे हे आहे. या काळात जात ही तुलनेने स्थिर राहिली आणि नंतरच्या काळात अनेक आघातांना सामोरी जात ती उपजातींमध्ये खंडीत झाली. नंतरच्या काळात ती निश्चित सामाजिक सांस्कृतिक दर्जा असलेली झाली ज्याद्वारे आंतर-जातीय संबंधाचे स्वरूप आणि व्याप्ती ठरविले गेले.

१) व्यक्तीची जात ही त्याच्या जन्मावरून ठरविली गेली : एखाद्या व्यक्तीला त्याची जात बदलणे वा जातीच्या शिक्क्यापासून सुटका करून घेणे शक्य नव्हते, जरी त्याने आपला धर्म बदलला तरी त्याच्या जातीचा नियम आणि बंधनापासून तो सुटका तर करून घेत नाही ना यावर लक्ष ठेवले जाई. ही बंधने इतर कुठल्याही सामाजिक संस्थेच्या नैतिक संकेतापेक्षाही अधिक जखडणारे होते आणि संबंधित व्यक्तीने त्याच्या समाजगटा प्रती करावयाची ती कर्तव्ये आहेत असे समजले जायचे. या नियमांना व संकेताना कोणताही भौगोलिक बंधने नव्हती आणि व्यक्तीचा समाजगट त्या व्यक्तीवर या संकेताना पाळण्याची अपेक्षा ठेवीत असे.

२) व्यक्तीची जात ही त्याच्या व्यवसायानुसार ठरली : धुर्येच्या मतानुसार, देशात जातीव्यवस्थेचा उदय होण्यामागे व्यवसाय हा सर्वात महत्त्वाचा घटक होता. प्रत्येक जात ही निश्चित व्यवसायाशी घट्ट जोडली गेली होती. जर एखादी व्यक्ती त्याच्या जातीशी संबंधित व्यवसाय सोडू इच्छित असेल तरी त्याला तसे करण्याची परवानगी दिली जात नसे. असं म्हटलं जातं की, प्रत्येक समाज गटाने आपल्या सभासदांना इतर कुठलाही व्यवसाय करणे कसं अपवित्र वा हल्या दर्जाचे काम आहे असं बिंबवून त्यापासून परावृत्त केले. एखाद्या व्यक्तीने आपला स्वत:चा व्यवसाय सोडून आकर्षणापोटी इतर व्यवसाय निवडण्यावर त्याच्या स्वत:च्या समाजगटा माफत लावले गेलेले हे एक नैतिक बंधनच होते. दुसऱ्या समाजगटातील लोकांद्वारे आपल्या व्यवसायावर अतिक्रमण होते आहे असे जेव्हा वाटले त्या वेळेस आर्थिक घटकाशिवाय इतर समाज गटातील सभासदांनी त्याला जोरदार आक्षेप घेतला.

३) जातीव्यवस्थेने उतरंडीची व्यवस्था उभारली : या व्यवस्थेमध्ये व्यक्तीचा सामाजिक स्तर हा व्यक्तीच्या समारंभपूर्वक केलेल्या शुद्धीच्या ठराविक दर्जावर आधारलेला होता. याचाच अर्थ, सामाजिक उतरंडीद्वारे समाजातील त्याचे (व्यक्तीचे) स्थान ठरविताना विधीवर संस्कार घटकाला आर्थिक घटकापेक्षा अधिक महत्त्वाचे समजले गेले, जे संपूर्णत: आतर्किक होते. सर्वात वरच्या जातीने स्वत:कडे उच्चतम विधीवत शुद्धतेचा दावा केला तर इतर काही जाती नकारात्मक विधीवत शुद्धतेने ग्रासलेल्या आहेत असे सांगितले गेले, त्यामुळे मराठा काळात सामाजिक रचनेमध्ये पहिल्या जातीला सर्वात वरची पायरी आणि दुसऱ्या जातीला सर्वात खालची पायरी मिळाली.

४) व्यक्तीचे सुरवातीचा विधीवतस्तर जन्माने ठरला गेला : मराठा काळात वर नमूद केल्यानुसार, व्यक्तीचा सुरवातीचा विधीवतस्तर ठरविण्यासाठी जन्म हाच केवळ एक निकष होता. उदा. व्यक्ती ज्या विशिष्ट जातीत जन्माला येई त्याला त्या जातीला असलेला हाच त्याचा दर्जा असे. परंतु वंशपरंपरेने आलेला विधीवर दर्जा हा कुठल्याही प्रकारे वरच्या स्तरावर नेला जात नसे. अश्या अनेक घटना बघायला मिळतात ज्यामध्ये असे विधीवत दर्जा खालच्या स्तरावर नेण्यात आला वा कमी प्रतिष्ठेचा करण्यात आला. उदा. बेकायदेशीररित्या जन्माला आलेल्या लहान मुलाचा दर्जा हा कायदेशीर जन्माला आलेल्या मुलापेक्षा हलका प्रतीचा मानला जाई. त्यामुळे एखाद्याला आपल्या वंशपरंपरागत विधीवत दर्जा टिकवून ठेवण्यासाठी त्याच्या स्वत:च्या जातीद्वारे तयार करण्यात आलेल्या आचारनियमांना चिकटून त्याचे पालन करणे आवश्यक बनते.

५) पावित्र्य आणि अपवित्र्यासंदर्भातील (विटाळ) काही विचित्र श्रद्धा : जातीव्यवस्थेच्या प्रक्रियेदरम्यान, पावित्र्य व अपवित्र्यच्या संकल्पना आस्तित्वात आल्या असे सांगितले गेले की, व्यक्तीला अपवित्र्याची लागण खालील गोष्टीमुळे होते.

१) निम्नविधीवत दर्जा असलेल्या व्यक्तीशी स्पर्शाद्वारे, अन्नाद्वारे व लैंगिक संबंधाद्वारे संपर्कात आल्यास दुसऱ्या व्यक्तीला त्या संपर्काद्वारे.

२) गायीची हत्या करणे सारख्या धर्मघाती कृत्ये केल्यास

३) जन्म, मृत्यू आणि मासिक पाळी घटनाद्वारे

४) ज्या व्यक्तिचा विधीवत दर्जा निम्नपातळीवर केला गेला आहे आणि ज्यामुळे त्यास अपवित्र गोष्टीची लागण झाली आहे. अश्याशी येणाऱ्या संपर्काद्वारे, मासिक पाळी चालू असल्याच्या कालावधीत त्या स्त्रीशी आलेला संपर्क, जन्म, मृत्यू यावेळेस त्या जन्मलेल्या व मृत असलेल्या व्यक्तीशी झालेला संपर्काद्वारे निर्माण होणारी अपवित्रता ही तांत्रिकदृष्ट्या अपवित्रता समजली जायची आणि त्या ठराविक काळापुरता व्यक्तीचा दर्जा कमी होत असे. त्यासाठी नेमून दिलेली उपाययोजना केल्यानंतर पूर्ववत दर्जा प्राप्त होत असे.

असं म्हटलं जातं की पावित्र्यापेक्षा हे अपवित्र्याचाच प्रभाव जात असे. खालच्या जातीच्या व्यक्तीच्या संपकात अल्याने उच्च जातीय व्यक्तीची व्यक्ती अपवित्र होत असे परंतु खालच्या जातीची व्यक्ती उच्च जातीय व्यक्तीच्या संपर्काने पवित्र झाली असे कधी समजले जायचे नाही. त्यामुळे त्या व्यक्तीला त्याच्या स्वतःच्या जातीने नेमून दिलेल्या आचारांशी चिकटून रहायलाच लागे. यातूनच अनेक रूढी वा विवाहसंबंधातील त्याज्य गोष्टी किंवा बंधने सूचित झाली. जी पुढे जाऊन मराठा काळातील जातीव्यवस्थेची खास वैशिष्टे बनली.

६) जमातवाढी नीतिबाह्य गोष्टी

अनेक निर्बंध होते परंतु सर्वात महत्त्वपूण निर्बध खालीलप्रमाणे

१) अन्न स्वीकारण्यास प्रतिबंध : खालच्या जातीतल्या माणसाद्वारे शिजविलेले अन्न स्वीकारल्यास

२) खालच्या जातीच्या माणसांच्या हातून दिले गेलेले पाणी स्वीकारल्यास प्रतिबंध

३) खालच्या दर्जा असलेल्या व्यक्तीसोबत जेवर करण्यास प्रतिबंध

असं म्हटलं जात यासर्व प्रकरणात एकाच प्रकारचा अपवित्र्यता असत नाही. खालच्या जातीतल्य माणसाकडून अन्न स्विकारल्यास प्रतिबंध ही बाब वगळता इतर प्रकरणात काही प्रमाणात ही बंधने शिथील असत. असंही जरी पाहण्यात येत असे की, खालच्या दर्जाच्या जातीतल्या व्यक्तीबरोबर जेवण घेण्यास परवानगी असली तरी असं म्हटलं जात असे की, जर उच्चजातीय स्तरावरील व्यक्ती हे पाळण्यास नाखूष असेल तर त्यावर भर देऊ नये.

७) विवाहसंबंधाबाबतची बंधने : या काळात, विवाह हे व्यक्तीच्या विधीवत दर्जाशी निकटरीत्या जोडले गेले होते. साहजिकच त्याच्या गटाअंतर्गतच विधीवतरीत्या हे विवाह होत असत. सेपिडा आणि सप्रवरागटामधील विवाहसंबंधामध्ये इतरही काही बाबींचा विचार होत असे. जरी अंतर्गत विवाह (अंतर्गामी) करणारेच होते तरी त्यांना बाटाच्या बाहेर विवाह (बहिर्गामी) करणारे असे मानले जायचे आणि त्यामुळे त्यांच्याशी विवाह जुळणी टाकली जात असे ही विधीवत पावित्र्य जपण्यसाठी नव्हे तर इतर काही समजुतीनुसार असे केले जात असे.

८) विवाहसंबंधी बंधनांचे उल्लंघन अक्षम्य गोष्ट असे : ज्या व्यक्तीने विवाह संदर्भातील बंधनांचे उल्लंघन केले असेल त्याला खालचा दर्जा भोगावा लागत असे. एखाद्या व्यक्तीने प्रतिबंधित जातीतील व्यक्तीबरोबर विवाह केल्यास त्यास त्याचा विधीवत दर्जा तेव्हाच पुन्हा प्राप्त होऊ शकत असे जेव्हा ती व्यक्ती तो विवाह मोडून काही प्रायश्चित भोगत असे. त्यामुळे इतर व्यक्तीच्या शारीरिक स्पर्श टाळणे आणि जाती अंतर्गतच संबंध मर्यादित ठेवण्यास व्यक्तीस बाध्य केले गेले.

mpnotes.in

९) अस्पृश्यतेस तिची स्वत:ची खास वैशिष्ट्ये होती : या काळात असे मानले जात असे की, शारीरिक स्पर्शाद्वारे दूषितता पसरविले जाते म्हणून अपवित्रतेच्या कालावधीत शारीरिक स्पर्श टाळला जात असे. रक्ताचे नाते संबंध असलेल्या व्यक्तीच्या जन्मामुळे वा मृत्यूमुळे ही अपवित्रता निर्माण होते. स्त्रियाच्या बाबतीत जेव्हा मासिक पाळी चालू असते त्या काळात ही अपवित्रता निर्माण होते. परंतु या प्रकरणा लावली जाणारी अस्पृश्यता ही तात्पुरत्या कालावधीसाठी असायचा तर खालच्या दर्जातील व्यक्तीबाबत लादली जाणारी अस्पृश्यता ही कायमस्वरूपी असायची. याचाच अर्थ या काळात पाळली जाणारी अस्पृश्यता ही सापेक्ष होती. काही जाती या काही ठराविक जातींकडून अस्पृश्य ठरवल्या गेल्या परंतु इतर जाती त्यांना अस्पृश्य मानत नव्हते. याचा अर्थ, विधीवत पवित्र्य हे अस्पृश्यतेशी निगडीत नव्हते. काही जाती अपवित्र समाजाचा जात वा ज्यांच्याशी विवाहसंबंधी जोडले जात नसत मात्र अश्या जातींना अस्पृश्य म्हटले जात नसे. अपवित्रतेसंदर्भात काही प्रमाणात भेद होता. काही जातींना अस्पृश्य म्हटले जात होते मात्र त्यांच्याकडून घरातील कामे करवून घेण्यास मुभा होती तर दुसरीकडे काही जातींना उच्च जातीयांच्या सोयीनुसार तीव्र अस्पृश्यतेची वागणूक दिली जात असे ज्यामागे काही तर्कीक आधार नव्हता. परंतु त्या संपूर्णत: अस्पृश्य ठरविल्या गेलेल्या जातींना सर्वात निर्दयी आणि टोकाची अपमानास्पद वागणूक दिली जात असे. या वर्गात अनेक दुर्लक्षित जातींचा समावेश होता. त्यांना अतिशय वा अत्यंत म्हणजे सर्वात तिरस्करणीय जाती म्हटले जात असे व त्यांना गावाच्या वेशीच्या आत रहायची परवानगी नसल्याने गावाबाहेर रहावे लागायचे.

१०) खालच्या जातीतील लोकांना नागरी हक्क नाकारले जात असत : असे म्हटले जाते की अतिशूद्रांना नागरी हक्क दिले जात नसत कारण त्यांच्या स्पर्शामुळे गोष्टी अपवित्र होतात असे काही जातींना वाटत असे. त्यांना गावचा पुजारी, न्हावी यांच्याकडून काम करून घेता येत नसे तसेच गावातील इतर लोक ज्या विहिरीतून पिण्याचे पाणी वापरीत असत तेथून पाणी घेण्यास मज्जाव होता. मेलेल्या गुरांची कातडी सोलणे आणि इतर हमालीची कामे करणे याशिवाय जगण्यसाठी त्यांना कोणताच आर्थिक आधार नव्हता. वरच्या जाती स्वत:ला समाजामध्ये सर्वात पवित्र मानत असत. साहजिकच ते जातीच्या उतरंडीमध्ये सर्वात वर आणि सामाजिक रचनेत सर्वात श्रेष्ठ गणले जात असत. त्यांनी ठराविक नागरी व धार्मिक कार्ये ही त्यांची निसर्गदत्त हक्क आणि अधिकार म्हणून जाहीर केली तसेच इतर जातींवर बहुतांश शूद्रांवर ठराविक जाचक अटी लादल्या जेणे करून त्यांचे वर्चस्व अबाधित राहील.

११) उच्चजातीयांनी दावा केला की वेदांचा अभ्यास हा त्यांचा विशेष अधिकार आहे : वेदाभ्यासाच्या काळात उच्चजातीची वैदिक मंत्रानुसार सामाजिक, धार्मिक विधींचा पुरेपुर लाभ घेतला. हा केवळ त्यांचाच अधिकार वा हक्क आहे असा दावा त्यांनी केला. दुसऱ्या कोणत्याही जातीद्वारे हे विधी करण्याची परवानगी त्यांनी दिली नाही. खालच्या जातीतील लोकांनी त्या पौराणिक मंत्राच्या आधारेच त्यांचे सामाजिक धार्मिक विधी करावेत अशी सक्ती केली. ज्याने कुणी या नियमाचा भंग केला त्याला उच्च जातीकडून शिक्षा देण्यात आली. अश्याच एका सोनाराने जेव्हा ह्या नियमाचा भंग केला तेव्हा त्याची जीभ कापण्यात आली. अश्याच प्रकारे लिंगायत जातीच्या पुजाऱ्याने रुद्राभिषेक हा वैदिक विधी केला जो केवळ उच्चजातीयांचाच अधिकार आहे या कारणाने चिडून त्याला ही शिक्षा करण्यात आली.

१२) खालच्या जातीच्या लोकांना मंदिरात प्रवेशाची परवानगी नाही : खालच्या जातीतील सभासदांना उच्चजातीयांच्या मंदिरात प्रवेश करण्यास परवानगी दिली जात नसे असे म्हटलं जाते. नानसाहेब पेशवे यांनी नाशिक येथील त्र्यंबकेश्वर मंदिराच्या देखभालीकडे विस्तृत नियम व शर्ती आखून दिल्या होत्या. पेशव्यांनी असा आदेशच काढला होता की खालच्या जातीतील

कोणाही व्यक्तीने मंदिरात प्रवेश करु नये, त्याने केवळ मंदिरा बाहेरूनच देवाला नमस्कार करावा.

१३) उच्च जातीयांनी अनेक सामाजिक व धार्मिक प्रतिबंध लादले : सवाई माधवराव पेशव्यांच्या काळात खालच्या जातीवर अनेक नागरी व धार्मिक प्रतिबंधे लादली गेली होती. ती खालीलप्रमाणे :

१. त्यांना जरी वैदिक मंत्र अवगत असतील तरी त्यांचा वापर म्हणजेच उच्चार करू नये. केवळ पुराणिक मंत्रांचाच वापर करावा.

२. पूर्वजांना (पित्रांना) दान (पिंडदान) अर्पण करताना उच्चजातीय देतात त्याप्रमाणे भाताचे गोळे वापरू नयेत.

३. त्यांनी उच्च जातीयांना घरी बोलावून शिजविलेले अन्न देऊन नये वा जेवण देऊ नये.

४. नियमांनुसार खालचा जातीतल्या व्यक्तीस त्याच्या घरी कोणाही ब्राह्मण स्त्री व पुरुषांस स्वयंपाकी, पाणी आणण्यासाठी वा नोकर म्हणून कामास ठेवता येत नसे.

५. ब्राह्मणी देवतांची पूजा करण्यास वा ब्राह्मणी मंदिरांना भेटी देण्यास खालच्या जातींना मनाई होती.

६. उच्च जातीय व्यक्तीस नमस्कार करताना खालच्या जातीतील व्यक्तीने पूर्ण वाकूनच नमस्कार केला पाहिजे असे बंधन असायचे ज्यास 'दंडवत' म्हणत असत.

७. उच्च जातीय विधवांच्या पुनर्विवाहास खालच्या जातीतल्या व्यक्तींनी हरकत घेऊ नये अशी सूचनाच उच्च जातीयांकडून केली गेली होती. समाजातील या आचारविचारांमुळेच उच्च जातीयांना उच्च दर्जा आणि खालच्या जातींना हलका दर्जा अशी विभागणी केली.

१४) उच्च आणि निम्न सामाजिकस्तर अशी सर्वसाधारण प्रवृत्ती : या काळात, अधिकार आणि प्रतिबंधे हेच मुद्दे त्यावेळच्या समाजातील जाती-जातीमधील तेढ आणि तणावाचे प्रमुख स्त्रोत बनले. काही महत्त्वपूर्ण असे खालीलप्रमाणे-

१. तांबट आणि वाणी यामधील तेढ : दोन्ही जातींचा असा दावा होता की लग्नाची वरात काढतना धार्मिक विधीसाठी वापरला जाणारा पाण्याचा घडा घेऊन बाजारपेठेच्या रस्त्यावरून लग्नाची वरात काढण्याचा अधिकार त्यांच्याच जातीला आहे. हा दीर्घकाळ चाललेला झगडा होता आणि मराठा काळानंतरही तो सामोपचाराने सोडविला गेला नाही.

२. कुंभार विरूद्ध सुतार, तांबट आणि लोहार मधील तेढ : नवीन लग्न करणाऱ्या जोडप्यांची घोड्यावरून वरात काढण्याच्या अधिकारावरून या जातीत भांडणे होती. हा देखील दीर्घकाळ चाललेला झगडा होता जो मराठा काळात सुटला नाही.

३. ब्राह्मण आणि प्रभू दरम्यान तेढ : असं म्हटलं जातं की, सामाजिक दर्जा ठरविताना जातीचा विधीवत दर्जा ठरविला जात असे किंवा दोन गोष्टी परस्परांवर आधारित होत्या. पेशव्यांच्या काळात मराठा सत्तेचा विस्तार झाला. मराठा राज्य मराठा साम्राज्यात रुपांतरित झाले. या बदलामुळे व्यक्तीगत गुणवत्ता, शौर्य दाखविण्याची संधी मिळाली आणि जात काही असली तरी वेगळी सामाजिक पत निर्माण झाली. विविध जातीमध्ये अनेक जणांना सुबत्ता प्राप्त

munotes.in

झाली आणि तो उच्च विधीवत दर्जासाठी उच्च जातीयांशी स्पर्धा करू लागले. खालच्या जाती देखील उच्च विधीवत दर्जा मिळविण्यासाठी प्रयत्न करत असताना, उच्च विधीवत दर्जा राखून असलेला दुसरा एक गट त्यांनी केलेल्या दाव्यास विरोध करू लागले. अश्या प्रकारे ही तेढ दीर्घकाळ चालत राहिली. पेशव्यांनी हा वाद मिटविण्यासाठी बनारस येथून उच्चतम जाणकारांना आमंत्रण केले. परंतु तरीही पेशव्यांच्या काळानंतरही हा वाद मिटला नाही. कारण त्यातून कुठलाही समाधानकारक तोडगा निघाला नाही. दिले गेलेले निवाडे भरभक्कम आधाराचे नव्हते. ते कधी ब्राह्मणांचे बाजूने तर कधी प्रभूंच्या बाजूने होते. अश्याप्रकारे हे वैर दीर्घकाळ चालू राहिले.

५.४ जातीचे संघटन

वर नमूद केल्याप्रमाणे, विविध जाती दरम्यान असलेल्या तेढीमुळे समाजामध्ये प्रत्येक वेळी आणि त्या त्या वेळी तणावाची परिस्थिती निर्माण होते. एकाच जातीमधील विविध गटा दरम्यान देखील वैमनस्य अस्तित्वात होते. समाजमधील वर्गाच्या तुलनेत जात हा एक बंदिस्त गट असला तरी जात उतरंडीमध्ये व्यक्तीच्या प्राप्त कौशल्यामुळे नाही तर त्याच्या जन्मामुळे त्याचा धर्म ठरत असतो. जातीचा किंवा जातीअंतर्गत गटाचा विधीवत दर्जा हा जातीने निर्धारित केलेल्या आचारसंहितेच्या चौकटीचे पालन करण्यावर अवलंबून असतो. जर ती आचारसंहिता पाळली नाही, तर विधीवत दर्जा खाली जातो. या प्रक्रियेने जातीर्गत अनेक गटांना जन्म दिला तसेच समाजात जातीचे विशिष्ट प्रशासन निर्माण केले.

जातीने एखाद्या व्यवसायिक गटासारखे स्वत:चा विधीवत दर्जा राखला आणि तिच्या सभासदांचे हितसंबंध जोपासले. तिने आपल्या सभासदांच्या वर्तनाचे नियमन केले आणि सहभोजन, वैवाहिक संबंध आणि जातीमध्ये पुर्नप्रवेश वगैरे बाबी संदर्भात जाती नियमांचा भंग सहित इतर न्यायिक सत्ताधिकाराद्वारे निमंत्रण घट्ट केले. जातीअंतर्गत झालेली अनौतिक संबंध, घटस्फोट आणि इतर विवादास्पद प्रकरणांचा सोक्षमोक्ष लावण्याचा अधिकार जातीकडेच होता. ही कामे करण्यासाठी जात एक स्वयंभू संघटन रचनेत परावर्तित झाली. जातीच्या प्रमुखाला वेगवेगळ्या नावाने ओळखले जाऊ लागले व वंशपरंपरेने त्याला ते पद मिळू लागले असेही म्हटले जाते की काही जातींच्या प्रमुखांना सरकारकडून वतने मंजूर झाली. जातीच्या प्रमुखाला जातीच्या सभासदांकडून विशेष अधिकार मान मिळू लागला. हे विशेष अधिकार असे होते.

१) शेला म्हणजे डोक्याला बांधायचा पटका

२) जात सभासदांच्या विवाहावेळी किंवा पुनर्विवाहवेळी काही रक्कम

३) त्या घरावर आणि गुरांवर कर घेतला जात नसे

४) चंदनाचा लेप, विड्याची पाने आणि कपाळावर शिक्का हा मान त्यालाही मिळत असे.

या व्यतिरिक्त न्यायनिवाडा चालवण्याचा अधिकार महत्त्वाचा समजला जात असे परंतु तो खास अधिकार नसे, स्वत:च्या जातीतील लोकांकडून बैठकीमध्ये त्याचे पुनरावलोकन केले जात असे. उदा. मुंबईच्या आगरी कुणबी जातीच्या प्रमुखाचा निर्णय त्याचा जातीच्या इतर सभासदांद्वारे तपासला गेला. कारण आगरी कुणबी जातीच्या प्रमुखाने काही हलक्या समजल्या गेलेल्या लोकांना त्या इतरांशी सल्लामसलत केल्याविना प्रवेश दिला होता, ज्यामुळे आपल्या जातीचा सामाजिक दर्जा खाली गेला असे जातीतील इतरांचे मत झाले. यावरून असे दिसते की हे

अधिकार अंतर्गत चौकशीपासून मुक्त नव्हते असेही निदर्शनास येते की जातीचे विवाद हे सर्वसाधारणत: त्याच जातीच्या प्रमुखाच्या अध्यक्षतेखाली जात सभासदाच्या पंचायतीद्वारे सोहविले जात असत. या जात पंचायती जाती सभा नावाने ओळखल्या जायच्या. या जात पंचायतीच्या घटक रचनेबद्दल आणि त्याच्याद्वारे चालविल्या जाणाऱ्या न्यायनिवाडाच्या कामकाजपद्धतीबद्दल स्पष्ट माहिती उपलब्ध नसली तरी विविध कागदपत्रांतून गोळा केलेल्या माहितीनुसार त्याची काही रूपे खालील प्रमाणे-

१) जेव्हा कधी प्रसंग येई त्यावेळेस जात पंचायत ही जात प्रमुखाच्या निवासस्थानी बैठक घेत असत आणि घटनेची चर्चा करीत असत. त्या बैठकीसाठी इतर जातीच्या प्रमुखाला किंवा एखाद्या सरकारी अधिकाऱ्याला निमंत्रित केले जात होते का हे स्पष्ट नाही परंतु प्रकरण मिटविले जात असे आणि दिलेला निवाडा त्याच जातीच्या सर्व सभासदांना मान्य होत असे.

२) दुसऱ्या एका नोंदीनुसार चेऊल व रेवदांडाचे पाठारे प्रभू जातीचे विवाद त्यांच्या आपापसातच सोडवीत असत. त्यांनी त्यांच्या जाती संदर्भात विवाद कधीही कोणत्याही सरकारी अधिकाऱ्याकडे वा संस्थेकडे सोपविले नाही आणि अंतिम निवाडा त्यांच्या जातीतील ज्येष्ठ व्यक्तीकडे एक आदराचे स्थान या नात्याने सोपविला जाई.

३) कसबा नाटे यांच्या सिदानक यांचे पुढील प्रकरण सांगते की, तक्रारदार सिदानक पेशव्यांकडे आले आणि तक्रार केली की, जेव्हा ते सैन्यातील कामगिरीसाठी दूर नागपूरकडे गेले होते, त्यांची बायको एकटी असल्याने तिच्या आईसोबत रहात होती. कोणी एक सोनक नामक व्यक्ती सिदनाक यांच्या सासुबाईच्या घरी गेला आणि तेथून सिदनाकच्या बायकोला फितवून प्रतापगडावर नाटेपासून फार दूर घेऊन गेला. सिदनाक ने जात पंचायतीकडे (गोटासाबी) तक्रार केली. ज्यांनी सोनकला सिदनाकची बायको त्यास परत करण्याचा निर्देश दिला परंतु सोनकने तो आदेश धुडकाऊन लावला. पेशव्यांनी त्यानंतर प्रतापगड किल्ल्यावरील हवालदारास आदेश दिला की सिदनाकच्या जात पंचायतीची (गोटासाबा)ची बैठक नव्याने घ्यावी आणि मामला न्यायिक पद्धतीने प्रकरण सोडवावे. इथे निर्णय काय झाला हे महत्त्वाचे नसून गोटासबा म्हणजे जात पंचायतीने कश्या रितीने काम केले आणि प्रकरण कसे सोडविले गेले हे महत्त्वाचे ठरते. प्रतापगडावरील हवालदाराने पेशव्यांना अहवाल दिला की सदर प्रकरण जात पंचायतीद्वारे सोडविले गेले.

४) अजून एक कागदपत्र मराठा काळातील जात पंचायतीच्या कामकाज पद्धतीवर झोत टाकते. व्ही.टी.गुणे यांच्या मतानुसार मराठा काळाच्या सुरवातीला न्यायालयीन प्रकरणे मजलिसद्वारे म्हणजे जातमेळाव्याद्वारे सोडविली जात. परंतु नंतरच्या मराठा काळात ही प्रकरणे जात पंचायतीद्वारे सोडविली जात आशि त्या जात पंचायती म्हणजे छोटे पण त्या त्या ठिकाणचे जात एककच असत. सर्वसाधारणत: ही गोटासभा वा जात पंचायतीची छोटे एकक क्षुल्लक महत्त्वाची प्रकरणे तपासीत असत. तर पवित्र करून घेणे, बहिष्कृतला जातीमध्ये पुन: प्रवेश किंवा कुणाला जातीबाहेर हाकलणे यासारखी जास्त महत्त्वाची प्रकरणे असतील ती विविध जिल्हा जात पंचायती किंवा त्या प्रदेशातील जात पंचातीकडे पाठविली जात असत आणि त्यांची मंजुरी घेतली असे. याचे एक उदाहरण म्हणजे पुणे आणि सारसवडमधील शिंप्याच्या दरम्यान निर्माण झालेला विवाह असं झालं की, त्यावेळी पुण्यातील शिंप्यांनी त्यांच्या समाजातील ज्या एकाने खालच्या जातीतील मुलीशी लग्न केले होते त्यास पुन्हा आपल्या जातीत घेतले. सासवडमधील शिंपी जातीने या प्रवेश प्रकरणास आक्षेप घेतला कारण त्यांच्या म्हणण्यानुसार अश्या प्रकारे पुन्हा जातीत प्रवेश देते वेळी पुण्यातल्या शिंपी जातीने

त्यांना विश्वासात घेतले नाही. जातपंचायतीच्या न्यायिक अधिकारांमध्ये गुन्हा करणाऱ्यास शिक्षा करण्याचा अधिकाराचा देखील समावेश असतो. शिक्षा दोन प्रकारच्या असतात. १) दंड ठोठावणे, २) बहिष्कार घालणे. या शिक्षा एखाद्या जात सभासदाने स्वत:च्या जातीने घालून दिलेल्या आचारसंहितेचा भंग केल्याच्या आधारावर ठोठावल्या जातात. हा भंग खालीलप्रमाणे असू शकतो.

१) खालचा जातीचा दर्जा असलेल्या एखाद्या व्यक्तीबरोबर लग्न करणे व त्याबरोबर भोजन करणे.

२) स्वत:च्या नातलगाच्या मृत्यूनंतरचे दिवस पाळणे म्हणजे त्या दिवसातील अपवित्र्याचा प्रसार होऊ न देणे.

३) मनुष्याच्या वा गायीच्या मृत्यूस कारणीभूत ठरणे.

४) चेटूक व जादूटोणाचा अवलंब करणे.

बहिष्कार म्हणजे ज्या व्यक्तीस जातीमधून बहिष्कृत केले असेल त्याच्याशी सर्व प्रकारचे सामाजिक संबंध ठेवण्याचे बंद करणे. १) राटी-बेटी व्यवहार बंद, २) नाव्ही आणि धोब्याकडून सेवा मिळणे बंद, ३) सदर व्यक्तीच्या घरी धार्मिक समारंभ पार पाडण्यास पुजाऱ्याचा नकार, ४) बहिष्कृत व्यक्तीस कुंकुवाचा टिळा लावण्यास व संध्या विधी करण्यास मनाई. अश्या प्रकारच्या बहिष्कारास सरकारचा पाठिंबा असे आणि अनकेवेळा अश्या व्यक्तीची मालमत्ता जप्त केली जात असे व सरकारी अधिकाऱ्याद्वारे याची अंमलबजावणी केली जाई. अश्या प्रकारचे गंभीर अधिकार जात पंचायतीकडे होते.

जातीचे तोटे : यामुळे उच्च जातीयांना समाजात अनेक मोक्याची स्थाने आणि विशेषाधिकार मिळाले परंतु सर्वसाधारणत: या जातव्यवस्थेने खालच्या जातीसाठी पुष्कळ तोटेच निर्माण केली.

१) या व्यवस्थेने व्यक्तींवर अन्न व विवाह संबंधीबाबत अनेक बंधने लादली.

२) तिच्या धार्मिक समजुतीमुळे जात ही पूर्णार्थाने असह्य असे सामाजिक ओझे होऊन बसले. एखाद्या सभासदाकडून त्याच्या जातीच्या नियमाचा भंग झाल्यास सरकारी यंत्रणा त्याच्या विरोधात कारवाई करत असे आणि त्यास त्याच्या जाती नियमानुसार वर्तणूकीस भाग पाडले जाई. अनेक प्रकरणात सरकार अश्या जातीच्या विरोधात वर्तणूक करण्याच्या व्यक्तीकडे असणाऱ्या वतनावर जप्ती आणत असे.

३) जातीने समाजावर अतिशय घट्ट पकड बसविली आणि सामाजिक व आर्थिक स्थिरता निर्माण केली. काही उच्च जातीयांकरीता ती वरदान ठरली परंतु खालच्या जातीसाठी नाशाचे कारण बनले. त्यांच्यासाठी उत्पन्नाचे काहीच साधन न उरल्याने समाजामध्ये त्यांना स्थिरता लाभू शकली नाही.

४) जातीने फुटीची व बेकीची भावना वाढीस लावली ज्यामुळे समाजाचे तुकडे पडले आणि त्यामुळे मराठ्यांच्या नेतृत्त्वाखालील समाजाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

mumotes.in

५) जाती ह्या स्वयंभू सामाजिक एकक बनल्या ज्या प्रत्येकाचे सामाजिक व आर्थिक हितसंबंध इतर समाजाशी पूर्णपणे विलग झाले आणि सामाजिक समरसतेसाठी काही वाव राहिला नाही.

६) समाजात असलेला विधीवत दर्जा हाच जातीचा आधार होता. ज्यातून जात ही काही लोकांसाठीच असलेला बंदिस्त गट बनला ज्यामध्ये व्यक्तीच्या विकासाला वाव राहिला नाही.

७) मराठ्यांच्या काळात जात ही वरच्या स्तरात पोहचण्यास आडकाडी ठरली.

८) प्रत्येक जातीने आपल्यात अनेक उपगट तयार केले, ज्यांनी उतरंडीमध्ये वर जाण्यासाठी व आपल्या गटाचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी स्वत:च्या पवित्र्यसिद्ध करण्याचा प्रयत्न केला. यातून समाजात टोकाचे सामाजिक व राजकीय वैर निर्माण झाली.

९) वर्गाच्या तुलनेत जातव्यवस्थेने जुळवून घेतले नाही आणि मराठा काळात जातीचा प्रभाव टिकूनच राहिला त्यामुळेच ती प्रतिगामी, स्थितीशील आणि ताठरच राहिली.

वर्तमान जातीव्यवस्था : जात वा वर्ण गंड अजूनही अस्तित्वात आहे आणि तो त्याच्या स्वत:च्या चौकटीत कमी अधिक सुधारीत रूपात कार्य करीत आहे. अजून त्या त्या जात पंचायतीच्या निवाड्यानुसार सभासदांना जातीची अचार संहितेचा भंग केल्यावरून जातीबाहेर असेल वा पुन:प्रवेश दिला असेल. साहजिक व्यक्तीचा सामाजिक दर्जा त्याच्या स्वत:च्या जातीवरूनच ठरला गेला आहे.

असे असले तरी वेगवेगळ्या जातींना वा वर्णांना नेमून दिलेले हक्क आणि कर्तव्यामध्ये आमूलाग्र बदल झाले. तिसरा वण हा वेगवेगळ्या आर्थिक धडीत स्वत:हून उदयास आला तर चौथा वर्ण १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून लक्षात घेण्याजोगा बदलला. ग्रामीण लोकसंख्येचे शहरी भागास होत असलेल्या स्थलांतरामुळे जातीच्या धडीमध्ये मूलभूत बदल झाले. अश्याच रीतीने काही बहिर्गामी गट जे खूप वाढले होते ते छोट्या छोट्या गटात तुटले आहेत ते समाजामध्ये जातीचा दर्जा पुसट करीत आहेत. स्थलांतरामुळे व्यवसाय बदलले आहेत आणि बदलेला व्यवसाय काही सामाजिक व धार्मिक रूढींना तसेच बदलत्या जाती दृष्टिकोनाला दरस्तरीय आहेत. तरीदेखील भारतीय समाजावरील जातीव्यवस्थेची पकड पूर्णत: सुटली आहे असा कुठलाही पुरावा नाही. प्रत्येक जातीमध्ये वर्तमान कल पाहता जसजशी प्रत्येक निवडणूक जात संघटनाच्या आधारे लढविली जात आहे तससे प्रत्येक जात सामाजिक, आर्थिक, राजकीय हितसंबंधानुसार स्वत:ला घडवीत आहे.

इतर क्षेत्रातील जातिव्यवस्था : असं म्हटलं जातं की, जात हा अचल वर्ग आणि वर्ग हा चालती जात आहे. हे जगातील प्रत्येक समाजात आढळते. प्राचीन रोममध्ये पॅट्रिशियन्स आणि प्लेबियनस् हे अश्याच गुंत्याने जोडलेले होते. जेव्हा जेव्हा रोम आर्थिकदृष्ट्या व सैनिकीदृष्ट्या वाढला, समाजाने मुक्त विहाराला वाव दिला परिणामी वर्गामध्ये संघर्ष होऊन दोन्ही वरच्या पातळीवर पोहचले. जेव्हा कधी अश्या संघर्षामुळे समाजातील कायदा व सुव्यवस्था धोक्यात आली, न्यायाच्या नावाखाली स्थिर समाजव्यवस्थेची मागणी केली गेली, रोमन समाजामध्ये समता प्राप्त करण्यासाठी वर्गानी नेहमीच संघर्ष केले तर जातीने तिच्या शेवटच्या टप्प्यात समाजातील जैसेथे परिस्थितीस संरक्षण देत अंतर्गत कुरबुर टाळली. हा जात वर्ग अखंड संघर्ष जगातील आधुनिक असते वा प्राचीन सर्व समाजात अनुभवास येतो. जेव्हा समाज गतिशील

असतो आणि बदलास सामोरा जात असतो तेव्हा तो नक्कीच वर्ग व्यवस्थेचा विस्तार करत असतो तर दुसरीकडे जेव्हा समाज वर्ग बंदिस्त करू पाहतो, तो जातीमध्ये रुपांतरीत होतो किंवा ते जातीच्या अधिक्षणाखाली केले जाते. युरोपमधील जुन्या सामजिक गटांकडून त्यांचे जातिव्यवस्थेचे घटक कधीच गमावलेले गेले नाहीत. अगदी सामाजिक स्थित्यंतरे आणि लोकशाही मूल्यवर्तणूकीच्या काळात अंतर्जातीय विवाह फारसे व सहजपणे झालेले नाहीत. काही समाजशास्त्रज्ञांनी त्यांच्या आदर्श कल्याणकारी समाजव्यवस्थेच्या तात्त्विक उद्देशावर आधारित युरोपियन बोल्शेविण आणि नाझी चळवळीतील जाती विसाव्या शतकातील भिमुख तत्वज्ञानाचा आढावा घेतला आहे. अमेरिकेत जरी जातव्यवस्था नसली तरी काही वर्ग सदृश्य व्यवस्थांचे आणि श्वेतवर्णीय व कृष्णवर्णीय मधील फरक याचे अस्तित्व नाकारणे अतिशय अवघड आहे.

सर्वसाधारणपणे, जात ही धार्मिक, पुराण कथा व आर्थिक-राजकीय कारणांमुळे विस्तारत आहे व सत्तेसाठीच्या संघर्षाभोवती फिरत आहे. युरोपियन जातीव्यवस्था आर्थिक राजकीय प्रकारची तर भारतीय जातीव्यवस्था धार्मिक-पुराणकथा वादी प्रकारची समजली जाते. परंतु काही उत्तर-आधुनिक समाजशास्त्रज्ञ त्याचा माग काढला आहे की ही व्यवस्था आर्थिक-राजकीय प्रकारची नजीकच्या काळातील गुणधर्मेधारण करीत आहे. युरोपमध्ये, असा एक प्रवाह आहे की, जात ही वर्गामध्ये विलय पावत आहे व वर्ग हे जातीमध्ये घट्ट होत आहे. परंतु भारतात हा प्रवाह कधीच पृष्टभागी आला नाही कारण भारतातील जातव्यवस्था ही नेहमीच राजकीय सत्तेसाठीचे साधन कार्य करीत राहिली जे ग्रामीण भारतातील बहुसंख्य लोकांद्वारे स्वीकारले गेलेले आहे.

५.५ अस्पृश्यतेच्या उगमासंबधी सिध्दांत

डॉ. बी. आर. आंबेडकरांच्या मांडणीनुसार अस्पृश्यता म्हणजे अशुद्धता, पावित्र्यभंग, दूषितता, बाबतची संकल्पना आणि या अशुद्धतेपासून सुटका करून घेण्याचे मार्ग त्याची साधने.

आदिम काळापासून अस्पृश्यतेचा प्रश्न अस्तित्वात आहे. डॉ. आंबेडकर म्हणतात की, आदिम समाजाने अस्वच्छतेच्या कल्पनेवर केवळ विश्वासच ठेवला असे नाही तर त्यांच्या या ठाम समजुतीतूनच विधी आणि रूढींची सुस्पष्ट सांगड असलेली जिवंत व्यवस्थाच वाढीस घातली. आदिम समाजाची धारणा होती की, अशुद्धता ही १) काही ठराविक वस्तूंशी संपर्क आल्याने, २) ठराविक व्यक्तींशी संपर्क झाल्याने, ३) आणि जन्म, मुंज, वयात येणे, लग्न एकत्र राहणे आणि मृत्यू इत्यादी कारणामुळे होते. या समाजाची अशी ही धारणा होती की वरील घटनांच्या समयी दृष्टात्मा एका व्यक्तीतून दुसऱ्या व्यक्तीत प्रक्षेपित होत असतो.

अस्पृश्यतेच्या उगमा संदर्भात अनेक सिद्धांत आहेत. त्यापैकी जी सर्वसाधारणपणे मानली जाते ती अशी, असे म्हणले जाते की, भारतामध्ये ३००० पेक्षा अधिक जाती आहेत. ज्या संख्येने आणि आकाराने अनेक पटीने वेगळ्या आहेत. भारतीय समाज हा मुलत: वर्णाच्या (अर्थ संस्कृतमध्ये रंग) आधारे चार भागात विभागलेला आहे. या वर्णसंदर्भ प्रथम संदर्भ सर्वात प्राचीन भारतीय ग्रंथापैकी एक असलेल्या ऋगवेदात सापडतो. ऋगवेदानुसार भारतीय समाज हा पाच टप्प्याच्या उतरंडीचा बनलेला आहे. पहिले चार वर्ण पुढीलप्रमाणे १) ब्राह्मण म्हणजे पुजारी आणि विद्वान, २) क्षत्रिय म्हणजे योद्धे आणि सत्ता चालविणे ३) वैश्य म्हणजे व्यापारी, कारागिर आणि ४) शेतकरी आणि शूद्र म्हणजे नोकर व गुलाम ५) पाचवा विभाग हा वर्णव्यस्थेच्या बाहेर म्हणजे अस्पृश्य. पहिल्या तीन वर्णाना पवित्र ग्रंथ वाचण्याची मुभा होती कारण जन्मानंतर त्यांच्यावर मुंजसंस्कार झालेला असतो. शूद्र हे स्वच्छ व अस्वच्छ अशा दोन भागात विभागले होते. अस्वच्छ शूद्राकडून स्पर्श झालेले अन् आणि पेय इतर तीन वर्णाकडून आणि स्वच्छ शूद्राकडून स्वीकारले

जात नसे. अश्या रीतीने अस्पृश्यतेचा प्रश्न समाजात तयार झाला. सुरवातीच्या काळातील लवचिकता तीने गमावली आणि मराठा काळात ती एका ताठर समाजव्यवस्थेत रूपांतरीत झाली.

देशातील हिंदुत्ववादामध्ये अस्पृश्यतेचा उगम व वाढ कशी झाली याचे एखादेच विशिष्टच कारण मांडणे अवघड आहे. हिंदु समाजामध्ये हलकी कामे करणाऱ्यास चांडाळ म्हणजे जो गुलामींच्या लायकीचा आहे. दास आहे म्हणजेच वैदिक काळात ज्याला पराभूत केलेला आहे. त्यांना इतर समाजापासून वेगळे ठेवण्यात आले होते आणि देशातील बहुतांश समाजाकडून त्यांना पशुपेक्षाही हीन वागणूक मिळत असे. हिंदू देवळात प्रवेश करण्यापासून, कोणत्याही हिंदू मेळाव्यापासून आणि त्यांच्या विकासासाठी शिक्षण घेण्याच्या हक्कापासून त्यांना वंचित ठेवले गेले. अस्पृश्य लोकसंख्या ही समाजाचा एक मोठा हिस्सा असतानाही भारतातील बहुसंख्य समुदायाला त्याचे काहीच वाढले नाही आणि त्यांनी अस्पृश्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहापासून इतके दूर लोटले की त्यांची सावली देखील पडली तरी अपवित्र समजले जाई. परिणामी, ते दारिद्र्य, अज्ञान, निरक्षरता व भीकेचे वाटेकरी ठरले.

५.६ मराठा काळातील अस्पृश्यता

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ते अस्पृश्यता हे हिंदू तत्वज्ञानाचे अभिन्न अंग आहे. कायद्याने जरी तिला मज्जाव केला तरी हिंदू मानसिकतेतून ती जाऊ शकली नाही. हिंदू नेहमीच म्हणतात की, अस्पृश्यांची स्थिती फारच दयनीय आहे, अस्पृश्यता मिटविण्यासाठी काहीतरी केले पाहिजे, अस्पृश्यता आपोआप नाश पावेल. स्वत:ला स्पृश्य समजणाऱ्यांना बदलण्यासाठी काही करण्याची गरज नाही. ही समज योग्य नाही. स्वत:ला स्पृश्य समजणाऱ्यांनी स्वत:ला बदलले पाहिजे आणि त्यातून अस्पृश्यता विलयास जाईल. परंतु असे झाले नाही आणि हा प्रश्न अनेक पिढ्या तसाच राहिला.

मराठा सत्तेच्या काळात, पेशव्यांनी प्रधानमंत्री या नात्याने जास्तीत जास्त काळ बंधने राबविण्यास सुरवात केली. त्यामुळे सनातनी आणि जातीबंधनांना समाजात प्रमुख स्थान मिळाले. यदुनाथ सरकार यांनी म्हटले आहे की, छत्रपती शिवाजी आणि पहिला बाजीराव यांनी मिळविलेल्या विजयाची प्रतिक्रिया म्हणून हिंदू सनातनवादास बल मिळाले आणि दैनंदिन व्यवहारात विधीवत पावित्र्य आणि जातीभेद वाढले. अश्या प्रकारे जात आणि परंपरेने जखडलेला मराठा समाजाने व्यापक प्रमाणात अस्पृश्यता पाळण्यास सुरवात केली.

५.७ मराठा काळातील अस्पृश्यतेचे स्वरुप

मराठा काळात अस्पृश्यता ही सापेक्ष होती कारण काही लोक काही जातींना अस्पृश्य मानीत परंतु इतरांसाठी ती जात अस्पृश्य नसे. काही ठराविक जाती या इतर जातींच्या संदर्भात विधीवत अपवित्र समजल्या जात आणि त्या जाती अशा अपवित्र समजल्या जातीसोबत सहभोजने करीत नसत. तरीदेखील त्यांना अस्पृश्य समजले जात नसे. पवित्रतेच्या संदर्भात अशी एक कल्पना होती की ज्यानुसार ठराविक खालच्या जातीच्या शारीरिक स्पर्शाने वरच्या जाती अपवित्र होत असत. अशा खालच्या जाती अस्पृश्य समजल्या जात असत. परंतु वरच्या जातीच्या लोकांच्या घरात भाजी चिरणे, भांडी स्वच्छ करणे व इतर कामे करण्याची मुभा त्यांना असे. अशा अनेक खालच्या जातीही होत्या की, ज्यांच्याबाबतीत इतक्या टोकाची अस्पृश्यता पाळली जात असे की, त्यांची सावली देखील अपवित्र समजली जात असे. अशा खालच्या जातीसंदर्भात अस्पृश्यता ही सापेक्ष नव्हे तर पूर्ण पक्की असे. साहजिकच या जाती जात उतरंडीच्या सर्वात खाली होत्या.

मराठा काळामध्ये या जातींना उच्च जातीयांकडून केल्या जाणाऱ्या अत्यंत अपमानास्पद आणि कठोर वर्तणुकीला सामोरे जावे लागे. या काळात त्यांना गावात रहायची परवानगी नसे आणि गावाच्या वेशीबाहेर हुसकावून लावून तेथे राहण्यास बाध्य केले जात असे. पुण्यातील उच्चजातीय लोक त्यांच्या लांब सावलीने अपवित्र होऊ नयेत म्हणून दुपारी ३ ते रात्री ९ दरम्यान त्यांना पुणे शहरात प्रवेश करण्यास मनाई होती. एवढेच नव्हे तर ज्या ज्या वेळेस ते गावात प्रवेश करत असत त्या त्या वेळी त्यांना थुकण्यासाठी गळ्यात मडके आणि त्यांची उमटलेले पावलांचे ठसे पुसण्यासाठी हातात झाडू घेऊन जावे लागे. याचे कारण असे की त्यांची थुंकी आणि त्यांच्या पावलांचे ठसे ह्या दोन्ही गोष्टींमुळे आपण अपवित्र होऊ असे उच्च जातीयांना वाटत असे. यात त्यांना मानवी हक्काचा काही संबंध वाटत नसे. अस्पृश्य जाती ज्या ज्या गोष्टींला स्पर्श करतील त्या त्या सर्व अपवित्र होतील, त्यांना प्रत्येक गोष्टच नाकारली जात असे. त्यांना कोणत्याही आवश्यक गोष्टी पुरविल्या जात नसत. त्यांना ना पुजारी ना न्हावी सेवा देत असे. त्यांना त्यांची कामे स्वत:च करावी लागत असे. त्यांना सामायिक विहीरीतून पाणी घेऊन दिले जात नसे किंवा इतरांप्रमाणे समाजात काही रोजगार करून आपला चरितार्थ चालवण्यास मनाई असे. नानासाहेब पेशव्यांनी नाशिक येथील त्र्यंबकेश्वर मंदिरातील व्यवस्थापनाबाबत कडक अटी व नियम बनवून अस्पृश्यांना तेथे प्रवेश करण्यास मनाई केली व त्यांना मंदिराबाहेरूनच पूजा करावी लागत असे.

मराठा काळात, सर्वात वरच्या जातीने आपण सर्वांपेक्षा जास्त पवित्र असल्याचा दावा केला आणि समाजास स्वत:ची सामाजिक श्रेष्ठता लादली. या जातीने नागरी व धार्मिक विधी करण्याचा विशेषाधिकार स्वत:लाच असल्याचा दावा केला आणि उपलब्ध असलेल्या प्रत्येक साधनाचा विशेषत: राजकीय सत्तेच्या साधनाचा वापर करून त्या विधी व रूढी पार पाडण्याचा एकाधिकार स्थापित केला. अश्या सर्व विशेषाधिकारांमध्ये वेदांचा अभ्यास करण्याचा आणि सामाजिक धार्मिक विधी वैदिक मंत्रानुसार पार पाडण्याचा विशेषाधिकार सर्वात महत्त्वाचे होते. साहजिकच सर्वात वरच्या जातीने खालच्या जातींना त्यांचे सामाजिक धार्मिक विधी व रूढी पुराणिक मंत्रानुसार करण्यास भाग पाडले जे सामाजिक दर्जानुसार वैदिक मंत्रापेक्षा खालच्या दर्जाचे समजले जात. ज्यांनी ह्या प्रकारच्या व्यवस्थेला विरोध केला त्यांना दंड व कठोर शिक्षा केली गेली. अनेक प्रकरणात, ह्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीचा जिभेचा शेंडा छाटण्यात आला जेणे करून समाजात उच्च जातींचा श्रेष्ठत्व दर्जा स्थापित व्हावे.

असामाजिकतेच्या स्वरूपाबद्दल बोलताना डॉ. बी. आर. आंबेडकर म्हणाले, अस्पृश्यतेचा प्रश्न ज्यूंच्या प्रश्ना समान आहे. ज्यांना सलग काही शतक विविध युरोपियन देशात ख्रिश्चनांद्वारे असे खूप काही सहन करावे लागले. ज्यूसाठी ख्रिश्चन जसे होते तसेच स्पृश्य हे अस्पृश्यांसाठी होते. परंतु एका बाबतीत ज्यूचा प्रश्न ख्रिश्चनांच्या प्रश्नांशी विसंगत होता. ज्यूंचा धर्मग्रंथ व ख्रिश्चनांच्या धर्मग्रथाला परस्परविरोधी होते त्या अर्थाने ते दोघेही वेगळे होते. परंतु अस्पृश्य जाती व स्पृश्य जातीमध्ये कुठलेही दोन विचारांमुळे वेगळे नव्हते. त्यांचा एक समान धर्मग्रंथ होता आणि ते समान प्रथा पाळत असत असे असतानाही ख्रिश्चनांना भूतकाळात ज्यूंना आपल्यात सामावण्याचे अनेक प्रयत्न केले. असा पहिला प्रयत्न १८९५ मध्ये केला गेला. जेव्हा बटालियन प्रजासत्ताक स्थापन झाले; तर दुसरा प्रयत्न नेपोलियन बोनोपार्टच्या काळात १८०६ मध्ये झाला. ज्यूंनी त्यांचे ज्यूवाद जपण्याचे पसंत केले आणि त्यांच्या श्रद्धेनुसार ती पाळली. परंतु स्पृश्य जातींना कधीच सुचले नाही की अस्पृश्य जातींना सामावून घ्यावे. धार्मिक मतभेदाची कुठलीही दरी स्पृश्य व अस्पृश्या दरम्यान नव्हती. त्यांना एकत्र आणण्याची प्रत्येक शक्यता होती. परंतु असे केले गेले की अस्पृश्यांना सक्तीने वेगळे ठेवले गेले. म्हणूनच अस्पृश्याता ही खालच्या जातींवर लादली गेलेली गोष्ट आहे ना की त्यांच्या इच्छेनुसार घडलेली.

५.८ अस्पृश्यता आणि बावन्न अधिकार

मराठा काळात, सर्व आर्थिक कामकाज जातीच्या आधारावरच चालत असे अस्पृश्यांना हलकी कामे त्यांच्या उदरनिर्वाहासाठी सक्तीने करावी लागत असत. अशाच अनुत्पादक हलक्या कामापासून सुटका करून घेण्याचा कोणतीही मार्ग त्यांना उपलब्ध नव्हता. साहजिकच त्यांना अत्यंत अपमानास्पद व दु:खमय जीवन जगावे लागे. मराठा काळात व्यापक प्रमाणावर पाळली जाणारी अस्पृश्यता ही त्यावेळच्या सामाजिक रचनेतील गंभीर दोष होता. या प्रश्नाची तीव्रता कमी करण्याचा एकानेही प्रयत्न केला नाही उलट विविध माध्यमातून आणि वेगवेळ्या पातळीवर नियम बनवून तिला अधिकच खतपाणी घालणे, अश्या परिस्थितीत सासवडमधील लोकांद्वारे बाजीराव पेशव्यांस लिहिलेल्या पत्रात अस्पृश्यांद्वारे पाळल्या जाणाऱ्या बावन्न अधिकारांकडे लक्ष वेधण्यात आले. त्यात असे म्हटले होते की, ते ५२ अधिकार मुलत: मराठा काळाच्या आधीच्या शतकात बिदरच्या बहामनी राजाकडून अस्पृश्यांना देण्यात आले होते. त्यातील काही महत्त्वाचे अधिकार खालीलप्रकारे-

१) गावातील जमीनदारांच्या जमिनीच्या मोजणी संदर्भातील सर्व कामे अस्पृश्यांना हाती घ्यावी लागे.

२) गावातील जमीनीचा महसूल प्रत्यक्ष गोळा करण्याचे काम देखील अस्पृश्यांना करावे लागत असे.

३) गावातील तयार उभी पिकांचे रक्षण करण्याची जबाबदारी अस्पृश्यांची असे.

४) गावकरी आणि पोलिस विभाग दरम्यानचा महत्त्वाचा दुवा म्हणजे अस्पृश्य असत.

५) वतनी जमिनीच्या संदर्भातील विवादामध्ये महत्त्वाचे साक्षीदार ते असत.

६) गावात घडणाऱ्या घटनांबाबत सरकार दरबारी खबऱ्या म्हणून त्यांना काम करावे लागत असे.

७) एका गावातून दुसऱ्या गावात पत्र पोहचविणाऱ्या पोस्टमनच्या अंगरक्षक म्हणून त्यांना काम करावे लागत असे.

८) गावातील घाणीची कामे वा मरून पडलेली जनावरे विल्हेवाट लावण्याची कामात मदत करण्याचे काम त्यांना करावे लागत असे.

९) अस्पृश्यांना सार्वजनिक ठिकाणे, रस्ते आणि गावाच्या महत्त्वाच्या सरकारी अधिकाऱ्यांची निवासस्थानांची सफाई करावी लागत असे.

१०) गावाची सुरक्षा (वेस राखण्याचे) काम अस्पृश्यांना करावे लागत असल्याने गुन्ह्याचा प्रकरणात त्यांची साक्षपुरावा महत्त्वाची ठरत असे.

११. चोरी आणि दरोड्याच्या सारख्या प्रकरणात, जर खरा गुन्हेगार सापडला नाही तर ज्याच्या घरी चोरी वा दरोडा पडला असेल त्याला नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी अस्पृश्यांवर येऊन पडते.

muntes.in

१२. गावच्या धार्मिक उत्सवामध्ये आणि कार्यक्रमामध्ये इंधनासाठी लागडं तोडून आणण्याचे सेवा अस्पृश्यांना बजावी लागत असे. गावच्या पाटीलाच्या घराला रंग देणे, धार्मिक उत्सवाच्या दिवशी संध्याकाळी शोभेच्या फुलांनी सजावट करण्याचे काम देखली त्यांना करावे लागत असे.

आपली प्रगती तपासा

१. जातीच्या उगमसंबंधी कोणती वेगवेगळी सिद्धांकने आहेत ?

२. अस्पृश्यतेच्या उगमाबाबत थोडक्यात चर्चा करा.

३. मराठा काळातील अस्पृश्यतेचे स्वरूप स्पष्ट करा.

५.९ मराठा वर्चस्वाखाली गुलामगिरीचे स्त्रोत

प्राचीन लोकजीवन आणि तत्कालीन समाजव्यवस्थेत गुलामगिरीचे अनेक स्त्रोत होते. मराठा काळात गुलामगिरीचा उदय होण्याची काही महत्त्वाची कारणे खालीलप्रमाणे

१. युद्ध आणि त्यानंतरची लूट

२. गुलाम स्त्रीला जन्म

३. व्यापार

४. सुटकेसाठी दिली जाणारी रक्कम, खंडणी

५. आर्थिक विपन्नावस्था

६. अनाथ

७. व्यभिचार

त्याच्या कारणांची चर्चा थोड्या विस्ताराने खालीलप्रमाणे केली आहे.

१) **युद्ध आणि त्यानंतरची लूट :** भारतातील गुलामगिरीच्या प्रश्ना संदर्भातील आकडेवारी आज उपलब्ध आहे. जी ब्रिटिश अधिकाऱ्यांनी मराठाचा प्रदेश लाभात घेतल्यानंतर गोळा केली आहे. ब्रिटिश अधिकाऱ्यांनी मिळविलेल्या माहितीनुसार मराठा काळातील गुलामगिरीचे सर्वात महत्त्वाचे कारण हे युद्ध आणि त्यातून मिळविलेली लूट हे होते. युद्धकाळात आणि त्यांनतर पराभूत राजाकडील बायका व मुलींना मुक्तपणे आणि विजयी राजाच्या हस्तक्षेपाशिवाय ताब्यात घेतले जात असे. त्यांना आपल्या देशात घेऊन जाऊन खुल्यारितीने गुलाम म्हणून विकले जात असे. अश्या रीतीने विजयी राजाचे शस्त्रधारी सैन्य, राजाला माहिती असो वा नसो जे मिळेल ते बायका, मुलीसहित लूटत आणि बाजारात विविध मोबदल्याच्या बदल्यात आणि किंमतीत विकत असत.

२) **जन्म :** असे म्हटले जाते की मराठा सत्तेच्या सार्वत्रिक समाजव्यवस्थेत असे समजले जात असे की गुलामाच्या पोटी गुलामच जन्माला येतो. स्त्री गुलामाच्या पोटी जन्माला येणारे मूल

munotes.in

मग ते तिच्या मालकाचे असो वा कुणा इतराचे ते गुलामच समजले जाई. अश्या रितीने मराठा सत्तेमध्ये गुलामगिरी वाढीस लागण्याचे हे ही एक कारण होते.

३) **व्यापार :** गुलामगिरीचे हे कारण राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील कारण आहे. या काळात देखील हेच महत्त्वाचे कारण होते असे म्हटले जात असे की, असे अनेक गट होते जे एकेकटे लोक आणि टोळ्यांवर लक्ष ठेवीत. त्यांना पकडले जाई आणि बाजारात गुलाम म्हणून विकले जाई.

४) **खंडणी :** वर नमूद केल्याप्रमाणे युद्ध लढल्यानंतर विजयी सैनिक शत्रूपक्षाच्या मुली, बायका आणि पुरुषांना गुलाम म्हणून विकण्यासाठी पकडत असत. परंतु त्यातही अशी एक पद्धत होती की, पकडलेल्या पुरुषांना लगेचच गुलाम म्हणून विकले जात नसे तर त्यांच्या सुटकेसाठी खंडणी मागितली जात असे. ठराविक काळात ती खंडणीची रक्कम दिली गेली नाही तर पकडलेल्या पुरुषांना दूरच्या बाजारात गुलाम म्हणून विकले जात असे तर, हे ही एक कारण होते ज्यामुळे मराठा काळात गुलामगिरी निर्माण झाली.

५) **आर्थिक विपन्नावस्था :** मराठा काळात पिकाचे नुकसान, पूर, दुष्काळ आणि वादळे यासारखे अनेक आर्थिक प्रश्न निर्माण होते. या प्रश्ना व्यतिरिक्त राजकीय अस्थिरतेमुळे देखील अन्न टंचाईचा प्रश्न निर्माण झाला? त्यातून अनेक गरीब पालकांना आपली मुले, भाऊ आणि बहिणींना गुलाम म्हणून विकावे लागले.

६) **अनाथ :** मराठा काळातील बिकट आर्थिक संकटादरम्यान मोठ्या प्रमाणावर लोक मृत्यूमुखी पडले. वाचलेली अनेक जीव ही लहान बाळे होती. ज्यांची काळजी घेणारे कुणी नव्हते जे आपसूकच अनाथ बनले. साहजिकच अश्या निराधारांना गुलाम म्हणून विकले जात असे वा ते स्वत:हुन गुलामगिरीत ढकलले जात.

७) **अनैतिक संबंध :** अनैतिक संबंधाच्या गुन्ह्यासाठी स्त्रियांना गुलामीत ठेवण्याची प्रथा आस्तित्वात होती. पण असे म्हटले जाते ज्या स्त्रियांना अनैतिक संबंध ठेवण्या प्रकरणात दोषी सिद्ध होत त्यांना अश्या गुन्ह्यासाठी दंड केला जात असे. जर का त्या स्त्रिया दंड भरू शकल्या नाही आणि त्या जर प्रतिष्ठित कुटुंबातील नसतील तर त्यांना गुलामगिरीत ढकलणे ही त्यांच्या गुन्ह्यासाठी शिक्षा असे.

बहुतांशरित्या, गुलामगिरीचे एखादे अजून काही कारण नव्हते. एखाद्या सरकारी अधिकाऱ्याने स्वत:च्या फायद्यासाठी कुणाला गुलाम म्हणून ठेवण्याचा प्रतय्न केला तर सरकारला ते मंजूर नसायचे आणि अश्या अधिकाऱ्याला सदर प्रकरणी सक्त ताकीद दिली जात असे. उदाहरणार्थ एका हवालदाराने एका गरीब स्त्रीस जी उदरनिर्वाहासाठी काही हलके काम करीत असायची गुलाम बनविण्याचा प्रयत्न केला; जेव्हा हवालदाराचे हे कृत्य उघडकीस आले तेव्हा हवालदाराची चांगली खरडपट्टी काढण्यात आली आणि गरीब स्त्रीस सोडून देऊन गुलामीतून मुक्त करण्यात आले.

५.१० मराठा सत्तेखाली गुलामगिरीचे स्वरुप

मराठा काळात गुलामगिरी ही मध्यम स्तरापुरतीच मर्यादित होती. कुठल्याही प्रकारे ना ब्राह्मण ना अस्पृश्य गुलाम केले गेले असं म्हटलं जातं की गुलाम व्यापाऱ्यांपैकी काहींनी प्रतिष्ठित कुटुंबातील काही स्त्रियांना फूस लावून पळवून नेले आणि दूरच्या बाजारात गुलाम म्हणून विकले. जेव्हा ही

गोष्ट पेशव्यांच्या कानावर गेली, त्यांनी या प्रकरणाची चौकशी करावयास लावली आणि दोषी व्यापारांना सजा देऊन अशा नराधर कृत्यांचे गंभीर परिणाम भोगावे लागतील असा इशारा इतरांना दिला. त्यावेळेस समाजामध्ये कर्जदार-देणारे यांमध्ये कुठल्याही कराराची प्रथा नव्हती. तरीदेखील कर्ज फेडले नाही या कारणास्तव एखाद्या व्यक्तीला गुलाम केले जायचे. त्यावेळेस अशी प्रथा होती की कर्जदार कर्जफेडीच्या मोबदल्यात स्वच्छेने कर्ज देणाऱ्या व्यक्तीला आपली सेवा देत असे. परंतु अश्या रीतीने देवाणघेवाणीमध्ये कोणतीही अट नसे आणि त्यातून कोणी गुलाम झाला नाही. जर का असं काही झाल्याचं लक्षात आलं किंवा कोणी लक्षात आणून दिलं, कर्ज देणाऱ्यास कडक शिक्षा भोगावी लागे. असे ही लक्षात आले होते की कर्ज घेणाऱ्यालाच कर्ज फेडीच्या मोबदल्यात अश्या प्रकारे कर्ज देणाऱ्याला सेवा पुरविण्याची इच्छा होती. परंतु कर्ज घेणारी व्यक्ती मुदती पूर्वीच वारली. त्यानंतर त्याच्या मुलांना कर्ज फेडण्यास जबाबदार धरले गेले नाही. त्याच्यापैकी कुणाला गुलाम बनवले गेले. पेशव्यांच्या काळात गुलामगिरी म्हणजे जातीवर आधारित भेदभावात्मक वर्तणूकच होती. सरकारच्या आदेशानुसार ना ब्राह्मण ना अस्पृश्य गुलाम बनवले गेले. पहिल्यांदा आदराचे स्थान होते आणि दुसरा समाजाच्या दृष्टीने निरुपयोगी; त्यामुळे दोघांनाही गुलाम बनवण्यापासून दूर ठेवण्यात आले आणि ते पूर्वापार चालत आलेल्या व्यवस्थेचे बळी ठरले. मुस्लिम आणि अबीसिनीथनसचा बाबत काही संदर्भ आहेत की ज्यांना गुलाम बनविले गेले किंवा इतर देशांतून गुलाम म्हणून विकत घेतले गेले. परंतु सर्वसाधारणपणे प्रभू, सोनार, धनगर, मराठा आणि कुणबी सारख्या समाजातल्या मध्यम स्तरातल्यांना वर नमूद केलेल्या गृहीतकाच्या आधारे गुलाम केले गेले होते. वरच्या जातीतील गुलामांना साधारण श्रीमंतांच्या व उच्चजातीयांचा घरात दाखल केले जात असे आणि त्यांच्याकडून त्यांना काहीही कामे करवून घेता येत असे. या काळात गुलाम त्यांच्या त्याच्या वडिलांची नाही तर आईची जात लावीत असत. परंतु शूद्रांनी त्यांच्या गुलाम स्त्रियांच्या मूलांना स्वतःच्या जप्तीनुसारच वाढविणे. ह्याबद्दल समाजातील कोणत्याच घटकाने आक्षेप घेतला नाही.

मराठा सत्तेखाली गुलामगिरी ही मुलतः घरगुती होती. हे गुलाम शेतावर काम करीत परंतु ही गुलामगिरी अनेक पाश्चिमात्य देशांमध्ये पाळल्या जाणाऱ्या औद्योगिक गुलामगिरीच्या एखवटलेल्या स्वरूपाची नव्हती. तरीदेखील त्यांना दिली जाणारी वागणूक ही पाश्चिमात्य देशात दिल्या जाणाऱ्या अमानुष वागणुकीपेक्षा काही कमी नव्हती. घुलामाना त्यांच्या अवज्ञेबद्दल झोडपले जात असे. मालकाने गुलामाला मरेस्तोवर मारल्याची अशी अनेक उदाहरणे आहेत, तेंही अगदी क्षुल्लक चुकांसाठी. त्यामुळे अनेक गुलाम मालकाच्या तावडीतून सुणून पळून जात असत. गुलामांना चांगली वागणूक दिली तरी त्यांच्या हालअपेष्टांना पारावार नसे. घुलामाचे वय झाले वा तो वृद्ध झाला तरी त्याला ठेवून घ्यायची जबाबदारी मालकावर नसे. त्यांच्या भविष्याची कोणतीही तरतूद न करता मालक त्याला वाऱ्यावर सोडून देत असे. जे गुलाम काम करण्याच्या लायकीचे उरले नाहीत आणि ज्यांना विकूनही कोणी घेत नसे आणि जे आर्थिक भार बनतात अशा गुलामांना कोणतीही सुविधा व त्यांच्या उत्पन्नाचे साधनाची सोयी नकरता मालक त्यांना सोडून देत असे. अश्या रीतीने या काळातील गुलामगिरी ही अत्यंत असह्य व अमानवी व्यवस्था होती.

५.११ पुरुष गुलामगिरी

मराठा सत्तेअंतर्गत समाजात गुलामगिरीची काही वेगळी वैशिष्ट्ये होती जी पाश्चिमात्त्य देशांतील गुलामगिरी व्यवस्थेत आढळून येत नाहीत. यापैकी एक वैशिष्ट्य म्हणजे बहुतांश पुरुषच गुलाम केले जात. बऱ्याचवेळी आक्रमणकर्त्यांनी युद्धबंद्यांना पकडले तरी खंडणीसाठीच त्यांना पकडून ठेवले होते. खंडणी मिळताच त्यांना सोडले जाई. सरकारच्या आदेशानुसार१० वर्षे वयावरील

पुरुषांना गुलाम म्हणून विकता येत नसे. असे केल्याचे आढळून आल्यास सरकारच्या आदेशाचा भंग केल्याच्या कारणास्तव अशी विक्री करणाऱ्यास शिक्षा केली जाई. प्रचलित असलेल्या प्रथेनुसार गुलाम असलेल्या स्त्रीची मुले मालकाची मुले समजली जात. परंतु त्यापैकी पुरुष मुले पुढील एक पिढी गुलाम म्हणून बांधली जात असत. याचाच अर्थ पुरुष गुलामांची मुले मुक्त व्यक्ती समजली जात. मध्य भारतातील गुलामगिरी संदर्भात विचार करता, सर जॉन माल्कम म्हणतात की ती फक्त स्त्री गुलामगिरीपर्यंतच मर्यादित राहिली. कोणीही पुरुष गुलाम केले गेले नाहीत वा तसे त्या प्रदेशात आढळले नाहीत. तेथे अनेक लोक मालमत्ताधारक सरदार होते. जे त्यांच्या मालमत्तेची देखरेख करण्यासाठी अनेक नोकर बाळगून होते. परंतु ते गुलाम नसून नोकरी करणारे होते.

५.१२ गुलामांचा व्यापार

या काळात व्यापार हा गुलामगिरीच्या अनेक स्त्रोतापैकी एक स्त्रोत होता. स्त्रिया आणि मुले मुक्तपणे बाजारात खरेदी व विकली जात. परंतु हा गुलामांचा व्यापार एवढा व्यापक व पसरलेला नव्हता जेव्हढा तो तत्कालीन पाश्चिमात्य समाजात चालत असे. उपलब्ध दस्तऐवज पुराव्यानुसार, वंजारी, बंजारा, गवारिहक, हेडे आणि चरण वगैरे भटक्या जमाती या काळात गुलामांचा व्यापार करीत असत. असे दिसते की या जमातीच्या आंतरराष्ट्रीय गुलाम व्यापाऱ्यांशी संबंध नव्हता. त्यांचा वस्तीवरून राहण्याचा प्रदेश फारच मर्यादित होता. हा गुलामांचा व्यापार स्त्रिया व मुलांपुरताच होता ज्यांना ते शिताफीने पकडीत आणि वेश्या अथवा श्रीमंत लोकांकडे घरगडी वा शेतावर काम करण्यासाठी गुलाम म्हणून विकत असत. अन्नधान्य टंचाईच्या आणि वादळाच्या काळात हा गुलामाचा व्यापार तेजीत असे. एवढेच नाही तर हे गुलामांचे व्यापारी केवळ व्यापाराच्या उद्देशासाठी मुलांना आणि स्त्रियांना पकडीत असत. अश्या स्त्रिया आणि मुलांना दूरच्या बाजारात नेले जाई आणि तेथेच विकले जाई. मालकाच्या मते, अनेक मराठा आणि ब्राह्मण या गुलामांच्या व्यापात गुंतलेले होते. ते स्त्रियांची खरेदी करत आणि त्यांना पुण्याला पाठवित. तेथे त्यांच्यासाठी जास्त पैसे मिळत. पुणे ही पेशव्यांची राजधानी होती आणि बहुतेक सर्व उच्चभ्रू आणि सरदार त्या शहरात रहात असत. असे म्हटले जाते की पुण्याच्या काही गुलामाच्या व्यापाऱ्यांनी या धंद्यात अमाप पैसा मिळविला. मराठा सत्तेअंतर्गत असलेल्या ह्या गुलामांच्या व्यापाराबद्दल बोलत असतात. पश्चिमी देशाच्या तुलनेत इथला व्यापार स्थानिक आणि मवाळ होता. या काळात गुलामाच्या किंमती गुलामानुसार वेगवेगळ्या होत्या. त्यांचे दिसणे, तरुणपण आणि जातीच्या आधारावर त्यांना ३५ रु. पासून ४०० रु. पर्यंत भाव दिला जाई. साधारणतः सुंदर दिसणाऱ्या मुली आणि स्त्रिया सोबतीसाठी व वेश्याव्यवसायासाठी खरेदी केल्या जात. साहजिकच अशा गुलामांना जास्त भाव दिला जात असे. घरातील कामे करण्यासाठी खरेदी करण्यात येणारे गुलाम सदृढ व मजबूत असत. सरकार देखील विविध कार्यक्रमासाठी गुलाम खरेदी करत असे. काळे, सडपातळ बांध्याचे आणि चपळ असणाऱ्या गुलामांना अधिक प्राधान्य दिले जात असे कारण राज्याच्या मोहिमांसाठी तसेच विविध सरकारी मिरवणूकांमध्ये असे गुलाम सैनिकासोबत वेग राखू शकत असत.

५.१३ स्त्रीयांची गुलामगिरी

गुलामगिरी व्यवस्थेसंदर्भात ब्रिटिश अधिकाऱ्यांनी जमा केलेल्या माहितीनुसार पुरुष गुलामांना **गुलाम** म्हटले जात असे आणि स्त्री गुलामांना **बाटकिन** वा **कुणबीन** म्हटले जात आहे. फरसबंदी पुसणे, शेणाने सारवणे, भांडी साफ करणे, कपडे धुणे, भाजी स्वच्छ करणे व चिरणे,

धान्य दळणे व मालकाचा किंवा मालकिणीचे अंथरुण घालूण देणे वगैरे घरगुती कामे करण्यासाठी स्त्री गुलामांना पाठविले जात असे किंवा कामावर ठेवून घेतले जात असे. ब्रॉटनने केलेल्या सर्वेक्षणानुसार असे दिसून येते की, सर्वसाधारणत: श्रीमंत घरी असलेल्या गुलाम स्त्रियांचे आणि सिंधिया लोकांनी कामावर ठेवलेल्या गुलाम स्त्रियांचे दैनंदिन जीवन अतिशय आरामात असायचे. सिंधिया लोकांच्या घरी असलेल्या गुलाम स्त्रियांनी सांगितले की, त्यांचा दैनंदिन व्यवहार म्हणजे सिंधियाच्या बायकांना हवे नको तो पाहणे आणि घरातील वृद्ध, ज्येष्ठ्य आराम करत असताना त्यांचे पाय चोळणे. रात्रीच्या वेळी त्या त्यांना हवे तसे जगायला मोकळ्या असत. श्रीमंत आसामी आणि सरदार साधारणपणे अशा स्त्री गुलामांना स्वत:च्या लैंगिक सुखासाठी ठेवून घेत असत. लष्करी अधिकारी, राजपुत्र आणि मोठ्या पदावरील अधिकाऱ्यांच्या पदरी अनेक गुलाम स्त्रिया असत. त्या स्त्रियांना नाच, गाणे आणि मनोरंजन करण्यास तयार केले जात असे आणि शेवटी त्यांच्यासोबतीसाठी ठेवून घेतले जात असे.

अशा अनेक गुलाम स्त्रिया होत्या ज्यांना सरकारने तबेले, हत्ती व उंटाचा विभाग, स्फोटके विभाग, हेरगिरी व पुरवठा विभागात कामास ठेवले होते. प्रत्येक विभागातील काही ठराविक व नेहमीची कामे असत. पण ज्यावेळी सरकारला काही वेगळ्या रीतीची कामे करण्याची गरज भासे त्यावेळेस ती कामे ह्या गुलाम स्त्रियांवर सोपविली जात. त्या व्यतिरिक्त काही इतर असहाय्य गुलाम स्त्रिया असत ज्या वेश्यांच्या तावडीत सापडीत आणि त्यांना वेश्याव्यवसाय चालविणाऱ्या नायकिणीच्या वेश्यागृहात सार्वजनिक वेश्याव्यवसाय करावा लागत असे. जेनकिनच्या अहवालानुसार, मराठा सत्तेमध्ये गुलाम स्त्रियांना अत्यंत मोकळीक होती व त्यांना मानवी वागणूक दिली जात असे. गुलाम स्त्रियांना खरेदी करणारे त्यांना आपल्या कुटुंबातच इतर कुटुंबीयासमवेत पालनपोषण करीत व वाढवीत असत. या गुलाम स्त्रियांना घरगुती कामासाठी विकत घेतले जात असे तरी ज्या लोकांना मुलबाळ नसे ते या स्त्रियांना स्वत:सारखेच जेवण व कपडेलत्ते देत असत. त्यांना दत्तक घेलेल्या मुलाप्रमाणेच वागणूक देत असत आणि त्यांच्या लग्नासाठी भरपूर खर्च करत असत. कोट या एका परदेशी पर्यटकाने सांगितल्यानुसार, पुण्याजवळील लोणी येथे वस्ती करून असलेल्या गुलाम स्त्रियांच्या आठ कुटुंबाच्या कुटुंब प्रमुखाच्या चांगल्या वर्तणुकीमुळे गुलामगिरीच्या बंधनातून कायमची सुटका करण्यात आली. ब्रॉटनच्या म्हणण्यानुसार, सिंदियाच्या सेवेत असलेल्या गुलाम स्त्रियांना रोज चांगले अन्न दिले जाई आणि वर्षातून दोन जोडी कपडेदेखील पुरविले जात असत. या व्यतिरिक्त, गुलाम स्त्रियांना इतर कोणत्याही त्यांना हवे ते काम करून पैसे कमविण्याची मुभा होती. ब्रॉटन पुढे म्हणतो सिंदियाकडील काही गुलाम स्त्रियांना रात्री थांबविले जात असे परंतु इतरांना मात्र रात्री कुठेही जाण्याची मुभा असे. साधारणत: गुलामस्त्रिया या त्यांच्या मालकांच्या कुटुंबाशी/जोडूनच रहात असत.

५.१४ समाजातील गुलामांचे स्थान

मराठा सत्तेच्या काळात गुलामांना विविध प्रकारे वागविले जात असे. श्रीमंत आणि उच्चभ्रू व्यक्तीकडील गुलामांना अनेक सुविधा आणि स्वातंत्र्य उपभोगता येत असे परंतु सामान्य माणसांकडील गुलामांना हलाखीत दिवस काढावे लागत असे. त्यामुळेच मराठा सत्तेअंतर्गत समाजातील गुलामांच्या स्थितीबद्दल प्रश्न विचारला जातो असे म्हटले जाते की, या काळात गुलामांना मालकीची गुरे समजली जात. साहजिकच तो त्यांना हवे तेव्हा टाकून देऊ शकत असे, एखाद्या वस्तूप्रमाणे विकू शकत असे. कर्जासाठी दुसऱ्याकडे गहाण टाकू शकत असे आणि एखाद्याला भेट म्हणूनही देऊ शकत असे. असे अनेक संदर्भ सापडतात. ज्यानुसार लोकांनी

अंत्यविधी संस्कार केल्याबद्दल या काही धार्मिक पूजाविधी केल्याबद्दल ब्राह्मणाला आपल्याकडील गुलाम स्त्री भेट म्हणून दिली आहे. अश्या गुलाम स्त्रियांना विशेष समारंभ प्रसंगात श्रीमंत आणि धनाढ्य व्यापाऱ्यांना भेट म्हणून दिले जात असे तसेच मुलींच्या लग्नात देखील तिच्या लग्नाची भेट म्हणून तिच्या पालकांकडून गुलाम स्त्री दिली जात असे. असे अनेक संदर्भ आहेत ज्यानुसार अनेक गुलाम स्त्रिया मालकाकडून होणाऱ्या छळास वैतागून पळून जात. परंतु सरकार मालकांना असे गुलाम परत मिळविण्यात मदत करत असे. अशा एखादा गुलाम अनेक वर्षांनी सापडला तर नियमानुसार त्यास त्याच्या मालकाकडे सुपुर्द केले जायचे. थोडक्यात, गुलामांना खाजगी संपत्तीनुसार वागविले जायचे. काही गुलाम स्त्रियांच्या बाबतीत, जर का त्या पळून गेलेल्या गुलाम स्त्रीने लग्न केले आणि नवऱ्यासोबत रहात असेल तर मालक तिच्यावरील आपला दावा सोडून देत असे असे म्हटले जाते की लग्नानंतर गुलाम स्त्री ही प्रतिष्ठित स्त्री समजली जात असे. सरकार मालकाला गुलाम स्त्रीवरील दावा सोडण्यास बद्ध करत असे आणि अश्या लग्न झालेल्या स्त्रीला पुन्हा गुलाम म्हणून ठेवू नये अशी ताकीद देत असे. तरी देखील गुलाम स्त्रीने लग्न करावे का नाही याचा अंतिम निर्णय मालकाच्या हाती असतो आणि जो कोणी मालकाच्या अधिकाराला आव्हान देईल त्यास सरकार शासन करीत असे. परंतु मालक विशाल अंत:करणाने लग्न झालेल्या गुलाम स्त्रीवरील मालकी हक्क सोडत असे आणि तिला तिच्या नवऱ्याच्या स्वाधीन करत असे.

मालकाला गुलामावर संपूर्ण हक्क असला तरी हे त्या गुलामाला जिवे मारण्याचा हक्क त्याला नसे. अश्या वेळी मृत गुलामांचे नातेवाईकाने केलेल्या तक्रारीवरून सरकार मालकाला सक्त ताकीद देत असे, असे जाते की मराठा सत्तेमध्ये एखाद्या गुलामाला स्वत:च्या बचतीच्या पैश्यातून दुसऱ्या गुलामाला विकत घेता येत असे. गुलाम दुसऱ्या गुलामाला नफा कमविण्यासाठी भाड्याने देऊ शकत असे. याचाच अर्थ विकत घेणाऱ्या गुलामाचा विकत घेतलेल्या गुलामाच्या कमाईवर पूर्ण हक्क व मालकी असे. अश्या रीतीने या काळात गुलामाचे महत्त्व एखाद्या क्रयवस्तूपेक्षा अधिक नसते कारण त्यांना माणूस नाही तर वस्तूसारखेच वागविले जात असे.

५.१५ गुलामगिरी

सर्वसाधारण ही व्यवस्था इतर देशांमधील व्यवस्थेइतकी कठोरपणे चालत नसे. असे अनेक संदर्भ आहेत की ज्यानुसार मालक स्वत: सणासुदीसाठी गुलामांसाठी कपडे, चपला, स्वस्त दागिने विकत घेत असे. त्यांना भेट वस्तू दिल्या जात आणि एवढेच नाही तर काही मालक स्वत: गुलाम स्त्रीशी स्वखर्चाने लग्न करून तिला गुलामीतून मुक्त करीत असत. एक घटनेमध्ये मालकाने गुलामाला त्याच्या गुलामीतून केवळ मुक्तच केले नाही तर आपल्याकडील जमिनीचा एक तुकडा ही वतन म्हणून त्याच्या उदरनिर्वाहासाठी दान दिला. या काळात अजून एक सुविधा गुलामाला दिली जात असे की, त्याने किंवा तिने पर्यायी गुलामाची व्यवस्था केल्यास त्याची मुक्तता केली जाईल. उदा. पुण्यातील अम्युनिशन फॅक्टरीमध्ये दोन गुलाम स्त्रिया होत्या. त्यापैकी एक वयोवृद्ध आई होती आणि दुसरी तिची मुलगी, जी देखील गुलाम होती. दुसरी तरुण होती परंतु एका अपघातात सापडली आणि अपंग झाली. दोन्ही गुलाम स्त्रिया काम करण्यास अपात्र ठरल्या. त्यामुळे त्यांनी एक सुदृढ गुलामाचा पर्याय सरकारला फॅक्टरीमध्ये काम करण्यासाठी दिल्यावर दोघींनाही गुलामीतून मुक्त करण्यात आले.

मराठा काळात गुलामगिरी अजिबातच कालबाह्य झाली नव्हती. समाजामध्ये अनेक मुद्यांवर गुलामांच्या नमुमिशन वा मुक्तीसंदर्भात विचार होत असे. त्यापैकी काही सारांशारुपाने खालीलप्रमाणे

१. गुलामांच्या उद्धटपणाला आणि कामचुकारपणाला वैतागून मालकांनी गुलामांना गुलामगिरीच्या बंधनातून मुक्त केले.

२. काही प्रकरणात जेव्हा गुलामांच्या नातेवाईक आणि त्याचे जातीबांधव मालकास पैसे देत व खरेदी करत असत त्यावेळी मालक गुलामीचे बंधन शिथील करीत असे.

३. इतर काही प्रकरणात, गुलामांच्या नातेवाईकाच्या आणि जात बांधवाच्या नैतिक दबावापुढे नमते घेऊन मालक गुलामाला मुक्त करत असे. उदा. असेच एकदा जेव्हा गुलाम स्त्रीया अल्पवयीन आणि पुरुष गुलाम १० ते १५ वर्ष दरम्यान होता अश्या विनंत्या करण्यात आल्या, पुरुषांच्या गुलामगिरीला मान्यता नव्हती, शेतावर काम करण्याची गुलामी माहित नव्हती आणि फक्त घरगुती गुलामगिरी प्रचलित होती.

४. मराठा सत्तेत गुलामगिरीच्या प्रथेने आर्थिक फायदा व्यापलेला नव्हता, त्यामुळे मालकांनी सहजपणे गुलामांना मुक्त केले.

५. गुलामगिरी प्रथेने जमीनदारांना स्वस्त मजुर पुरविले नाही तर आणि व्यापारांसाठी ही ती फायदेशीर स्त्रोत ठरू शकली नाही.

६. या काळात गुलाम पदरी ठेवणे हे त्या व्यक्तीच्या संपत्ती आणि प्रतिष्ठेचे लक्षण होते तरी गुलामांचे वृद्धपण आणि त्यांच्याकडून मिळणारी चांगली सेवा लक्षात घेऊन ही पद्धत कमी होत गेली तसेच काही बाबतीत धार्मिक हेतू ही प्रभावी होत गेलेला दिसून येत असे.

५.१६ सारांश

जात ही रुढार्थाने स्थिर संघटना असून ती एक वैशिष्ट्यपूर्ण असा सामाजिक वर्ग आहे आणि तिचे सभासदत्त्व जन्माच्या आधारे ठरविले जाते. तिच्यात विशिष्ट रूढीवादी बंधने सामाविष्ट आहेत. आणि ती विशेष अधिकारावर आधारित आहे. जात (cast)ही पोर्तुगाली शब्द ' cast ' म्हणजे अवलाद, वंश त्या जातीचा मधून आला आहे आणि तो भारतीय उपखंडातील हिंदू समाजाची सामाजिक विभागणी दर्शविण्यासाठी पहिल्यांदा वापरला गेला. भारतातील जातीसंस्थेच्या उगमासंदर्भात पारंपारिक सांस्कृतिक सिद्धांत, वांशिक दृष्टिकोनाधारित सिद्धांत, कुटुंब व ०००००० सिद्धांत, व्यवसायधारित सिद्धांत आणि सामाजिक स्तरीकरण सिद्धांत असे अनेक सिद्धांकने आहेत. ही सिद्धांकने एक वाक्यी नसून जातीच्या उगमासंदर्भात ती वेगवेगळी माहिती देतात परंतु ते मान्य करतात की जात ही वंशपरंपरेने चालत येऊन साचलेली आणि स्थिर बनली आहे आणि तिने तिची मूळची लवचिकता काळाच्या ओघात गमावलेली आहे.

मराठा काळातील जातीव्यवस्थेचा अभ्यास करण्यामागील मुख्य उद्देश हा त्यावेळच्या जाती व्यवस्थेचा प्रभाव तत्कालीन समाजावर कसा होता हे अभ्यासणे आहे. या काळात जात ही तुलनात्मकरीत्या स्थिर, प्रवाहाच्या ओघात उपजातीत खंडीत झाली आणि आंतरजातीय संबंधाचे स्वरूप व व्याप्ती ठरविणाऱ्या एकच सामाजिक रूढींवादी दर्जा असणाऱ्या छोट्या बंदिस्त सामाजिक गटामध्ये संघटीत झाली.

या काळातील जातीव्यवस्थेची अनेक वैशिष्ट्ये व अंगे होती : व्यक्तीच्या जन्मावरून त्याची जात ठरत असल्यामुळे जात बदलणे वा जातीचा शिक्का टाळणे त्यास शब्द नव्हते. एखाद्याने आपला धर्म बदलला तरी त्याच्या जातीच्या नियम व अटीपासून त्याची सुटका होत नसे. व्यक्तीची जात ही त्याच्या व्यवसायाशी जोडली गेली होती. धुर्येच्या म्हणण्यानुसार, प्रत्येक जात ही एका विशिष्ट

व्यवसायाशी जोडली गेली होती. तो जातगण त्या जातीचा व्यवसाय सोडून दुसरा कोणता व्यवसाय करण्यास आपल्या सभासदांना कधीच परवानगी देत नसे. झातीने विधीवत पावित्र्य आणि नकारात्मक विधीवत पावित्र्याच्या आधारे समाजात उतरंडीची व्यवस्था उभारली. साहजिकच, त्यातून सहभोजने, विवाहसंबंध आणि सामाजिक देवाण-घेवाणीबाबत बंधने तयार झाली. तिने खालच्या जातीतील लोकांना अनेक नागरी अधिकार नाकारले, सामाजिक व धार्मिक बंधने लादली आणि सामाजिक विधीवत दर्जाच्या निमित्ताने त्यांच्यात भांडणे लावली. झात हे एक संघटन म्हणून, तिचे मंडळ व त्याचा एक प्रमुख या रूपात होते. या प्रमुखाला अनेक अधिकार असत आणि जात संघटन चालविण्यासाठी विशेषाधिकार असत. जरी काहींनी त्यांच्या हितसंबंधानुसार या जातीव्यवस्थेचे काही फायदे आहेत असे दर्शविले तरी मराठा काळात जातीव्यवस्थेचे अनेक तोटेच होते असे दिसून येते.

भारतातील अस्पृश्यतेचा उदय आणि विकास कामे कोणते एक कारण नमूद करणे अवघड आहे. हिंदू समाजात हलकी कामे करणाऱ्यांना बहुतांशी चांडाळ म्हणजे जे गुलामीच्या लायकीचे आहेत. वैदिक काळात ज्यांचा पराभव झालेला आहे. त्यांना अस्पृश्यतेची वागणूक दिली जात असे व देशातील इतर बहुसंख्य समाजापासून अलग ठेवले जात असे. हिंदू मंदिरात प्रवेश, हिंदू सण-समारंभात सामील होणे, विकासासाठी शिक्षणासारखे अधिकारापासून त्यांना वंचित ठेवले जात असे. खरे पाहता ते समाजातील लोकसंख्येचा एक मोठा हिस्सा असतानाही, बहुसंख्य सामाजाने त्यांना मुख्य प्रवाहापासून तोडून इतके दूर ठेवले की, त्यांची सावलीदेखील अपवित्र ठरविली, परिणामी, दारिद्र्य, पूर्णार्थाने भीकेची अवस्था, निरक्षरता आणि अज्ञानाच्या गर्तेत ते पिचत राहिले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, अस्पृश्यता ही हिंदू तत्वविचाराचे अभिन्न अंग आहे. अस्पृश्याता ही कायद्याने जरी प्रतिबंधित केली तरी हिंदूच्या मनातून ती जाऊ शकली नाही. मराठाकाळातत पेशव्यांनी पंतप्रधान या नात्याने पूर्ण अधिकार वापरण्यास सुरवात केली. ज्यामुळे समाजात सनातन विचार व जातीबंधने निर्माण झाली. अस्पृश्य ठरविल्या गेल्या. अश्याच रीतीने, अश्या काही जाती होत्या ज्या इतर जातींच्या तुलनेत विधीवत पवित्र समजल्या जात असत. ज्या जाती स्वत:ला विधीवत पवित्र समजत असत त्या विधीवत अपवित्र समजल्या जाणाऱ्या जातीसोबत रोटी व्यवहार करीत नसत. तरीदेखील, त्या अस्पृश्य समजल्या जात नसत. अपवित्र्याची संकल्पना अस्तित्वात होती. ज्यानुसार खालच्या जातीच्या व्यक्तीच्या शारीरिक स्पर्शाने ज्या उच्च जाती अपवित्र होत असत अश्या खालच्या जातीना अस्पृश्य समजले जात असे परंतु उच्च जातीच्या घरात भाजी चिरणे, भांडी स्वच्छ करणे कामे करण्याची मुभा त्यांना होती. अनेक अशा खालच्या जाती होत्या ज्या भांडी स्वच्छ करण्याचे काम करीत असत. इतर काही अश्या खालच्या जाती होत्या की ज्यांना अत्यंत टोकाचे अस्पृश्य समजले जायचे म्हणजे त्यांची सावलीदेखील अपवित्र समजली जात असे.

या काळात, सर्व आर्थिक व्यवहार जातीच्या आधारे चालत असत. हलकी अनुत्पादला कामे करण्यासाठी अस्पृश्य जातीला बाह्य केले जायचे. त्यामुळेच त्यांचे आयुष्य घृणास्पद व कष्टी बनले. अश्या काळात सासवडच्या लोकांनी थोरल्या बाजीराव पेशव्यांना लिहिलेले पत्र प्रकाशात आले ज्यामध्ये अस्पृश्यांच्या बावन्न अधिकारांबद्दल उल्लेख आहे. मुळात ते अधिकार म्हणजे बिदरच्या बहामनी राजाने अस्पृश्याना दिलेली सनद होती ज्यामध्ये सर्व हलकी व अनुत्पादक कामे देखील समाविष्ट होती.

५.१७ प्रश्न

१. मराठा काळातील जातीव्यवस्थेचे महत्त्व स्पष्ट करा.

२. मराठा काळातील अस्पृश्यतेचे विवेचन करा.

३. मराठा सत्तेखाली असलेल्या सामाजिक रचनेची चर्चा करा.

५.१८ संदर्भ

१. धुर्ये जी. एस. : कास्ट, क्लास अँड ऑक्युपेशन इन इंडिया, ४थी एडिशन, न्यूयॉर्क, १९६१.

२. हदन जे. एच. : लास्टस इन इंडिया: त्याचे स्वरूप

३. प्रसाद एन. : दमिय ऑल द कास्टसिस्टीम, पटना १९५७

४. धुर्ये जी. एस. : कास्ट ॲण्ड रेस इन इंडिया, पाप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६९.

५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राईटिंग ॲण्ड स्पीचेस, व्हा. ७, संपादितद्वारा वसंत मून, शिक्षण विभाग, महाराष्ट्र सरकार, १९९०.

६. हटन जे. एच. कास्टस इन इंडिया, ईट्स नेचर, फंक्शन्स ॲण्ड ओरिजन्स, केंब्रिज, इंग्लंड १९५२.

❖❖❖❖

munotes.in

६

सामाजिक संरचना : वेठबिगार, शेतकऱ्यांची स्थिती, स्त्रियांची स्थिती

घटक रचना:

६.० उद्दिष्टये

६.१ प्रस्तावना

६.२ वेठबिगार

६.३ सामाजिक तत्वज्ञान

६.४ सामाजिक संस्था

६.५ हिंदू कायदा

६.६ धर्म

६.७ मालमत्ता अधिकार किंवा स्त्रीधन

६.८ स्त्रियांची भूमिका

६.९ मराठा सत्तेच्या अधिपत्याखाली असलेल्या स्त्रियांच्या स्थितीचे मूल्यमापन

६.१० शेतकऱ्यांची स्थिती

६.११ सारांश

६.१२ प्रश्न

६.१३ संदर्भ

munotes.in

६.०. उद्दिष्टये

खालील एककांचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थ्यांना शक्य होईल.

- गुलामगिरीचे मूळ आणि त्याचा अर्थ समजून घेणे.
- पुरुष आणि स्त्रियांची गुलामगिरी समजून घेणे.
- या काळातील गुलामांचा व्यापार व त्याचा व्याप माहिती करून घेणे.
- मराठा काळातील सामाजिक तत्त्वज्ञान समजून घेणे.
- मराठा काळात अस्तित्वात असलेल्या सामाजिक संस्था माहिती होणे.
- मराठा अधिपत्वाखाली विवाह संस्थेची ठळक वैशिष्ट्ये समजून घेणे

६.१ प्रस्तावना

गुलामगिरी ही मानवी वंशाच्या काही मूठभर सभासदांनी इतर मानवांवर लादलेली अस्वैच्छिक सक्तमजुरीच होती. ही अवस्था इतिहासाच्या सुरुवातीपासूनच मानवी समाजात आस्तित्वात होती.

मराठा काळातील समाजात राजसत्ता ही ईश्वरी सत्तेचेच रूप आहे. हा विचार देव या कल्पनेवर पकड ठेवून इतका प्रचलित होता की बाकी सर्व काही त्यापुढे गौण होते. मराठा हे धार्मिक अंगाने विचार करणारे होते आणि वेळ आली तर ते स्वतःच्या स्वाथ सोडतील पण धर्मासाठी सर्वकाही करायला तयार असत. राजा हा पवित्र असतो, गाय ही पवित्र असते, ज्ञानी माणूस पवित्र असतो, त्यांची पुस्तके पवित्र असतात आणि आई देखील पवित्र असते, अश्या प्रकारे पवित्र्याची कल्पना मराठा समाजात आणि त्यांच्या नसानसात भिनली होती. मराठा समाजाची सामाजिक रचना ही विविध व्यवस्थावर आधारलेली होती. ज्याचे मूळ पुन्हा ईश्वरी इच्छेच अवतार म्हणूनच बघितले जात असे आणि त्यामुळेच ती रचना दीर्घकाळ बदलली गेली नाही आणि पित्याकडून मुलाकडे अशी पिढ्यानपिढ्या विना अडथळा सोपविण्यात आली. जेव्हा व्यवस्था वंशपरंपरागत बनल्या, स्थिरतेचे नवीन तत्व समाजात आणले गेले. अशा सामाजिक रचनेमध्ये स्त्रियांचे स्थान काय होते याचा अभ्यास अतिशय रंजक आहे.

कोणत्या ही समाजातील स्त्रियांची स्थिती मुख्यतः दोन प्रमुख घटकांवर म्हणजे १) त्या समाजातील सामाजिक तत्वज्ञान, २) त्या समाजाद्वारे विकसित केल्या गेलेल्या सामाजिक संस्था यावर अवलंबून असते. ह्या दोन घटकांची चर्चा खालीलप्रमाणे-

६.२ वेठबिगार

मराठा काळाचा अभ्यास सुलभतेच्या दृष्टीने सर्वसाधारणपणे त्याचे राजेशाही काळ आणि दुसरा पेशव्यांचा काळ असे दोन भाग पडतात. सामाजिक स्तरीकरण आणि सामाजिक व्यवस्था या दोन्ही बाबींवर आधारित या दोन काळाचे काही अलौकीक वैशिष्टे आहेत. राजेशाहीचा काळ हा पूर्णतः सामंतशाही व्यवस्थेवर आधारलेला होता तर पेशवाईचा काळाने मराठा सरदारांच्या एका नवीन वर्गाच्या उदयाचा काल पाहिला आहे. हा म्हणजे त्यावेळच्या समाजामध्ये अस्तित्वात असलेल्या वतनदारी व्यवस्थेचा थेट परिणाम होता. या वर्गाच्या स्वतःच्या काही गरजा होत्या म्हणून पेशव्यांच्या अधिपत्याखालील सामाजिक घडीमध्ये खोती पद्धत आणि वेठबिगारीसारख्या अनेक पद्धतीचा जन्म झाला. वेठबिगार म्हणजे सक्तीची मजुरी. इ्या समाजामध्ये गुलामगिरी एक संस्थात्मक रूप म्हणून प्रत्येक सामाजिक कोपऱ्यात फोफावली, तिथे वेठबिगार ठेवण्याची पद्धती सर्व ठिकाणी मोठ्या प्रमाणावर अंमलात आणणे सहज शक्य होते.

ही व्यवस्था उदयास येण्यामागे अनेक कारणे असली तरी सावकार अथवा कर्ज देणाऱ्या व्यक्तीकडून घेतलेले कर्ज फेडता न आल्याने कर्जदाराकडून सक्तीने काम करवून घेण्यात येत असे. हे खरे कारण आहे. साहजिकच समाजातील वंचित घटक आणि खालच्या जातीमधून असलेल्या लोकांना सक्तीने अश्या वेठबिगारीचा स्वीकार करावा लागे. ब्राह्मण आणि इतर उच्च जातीतील लोकांना अश्या सक्तीच्या कामातून वगळले जात असे. वेठबिगार मजूर सर्वसाधारणपणे खालील उद्देशांकरीता वापरले जात.

१. किल्ले, पोलिस स्टेशनस्, सार्वजनिक, खाजगी, सरकारी इमारती, धरणे आणि तलाव वगैरेच्या बांधकामासाठी वेठबिगार मजूर राबविले जात. ही बांधकामे अतिशय उपयुक्त आणि कोणत्याही सरकारसाठी मुलभूत गरजा असत. शत्रू बहुतांश वेळा या बांधकामावरच आक्रमण करीत आणि उद्धस्त करीत असे. अश्या वेळी सरकारला त्याच्या दुरुस्तीसाठी असे वेठबिगार मजूरांचीच गरज असे. अश्या तऱ्हेने त्यांना दिले जाणारे हे मोठे काम असे.

२. अशा बांधकामासाठी लाकडी ओंडक्यांची मोठ्या प्रमाणावर आवश्यकता असे. त्यामुळे वेठबिगार मजूरांना मोठाली झाडे पाडणे, त्यांना योग्य अश्या फळ्या व बांबूसारखे कापणे आणि जिथे कुठे गरज असेल तेथपर्यंत वाहून नेणे अश्या कामासाठी जुंपले जात असे.

३. मराठा सत्तेच्या काळात, विज्ञान आणि कीटकनाशकांच्या क्षेत्रात फारशी प्रगल्भ नव्हती. शेतातील उभी पिके नाश होण्यास अनेक गोष्टी कारणीमूत ठरत असत. साहजिकच मग वेठबिगार मजुरांना सामान्यतः शेतीतील उच्च पिकांचे रक्षण करण्यास आणि विशेषतः प्रमुख व्यक्तींच्या शेतातील पिकांचे रक्षण करण्याचे काम सोपविले जात असे.

४. अभ्यासा दरम्यान असे आढळून आले की, या काळात घोडे, हत्ती, बैल आणि म्हैशीसारख्या अनेक जनावरांना युद्धात आणि लढ्यात वापरले जात असे आणि अशा जनावरांना पोसणे आणि खाऊ घालण्यासाठी स्वस्त मजूरांचा एक वर्गच आवश्यक असे. वेठबिगार मजूरांना सरकारी जागांवर वाढलेले गवत कापण्यासाठी आणि त्याचे योग्य त्या आकाराचे आणि वजनाचे भारे बांधण्यासाठी पाठवीत असत.

५. वेठबिगार मजूरांना सरकारी कार्यालयात आणि सार्वजनिक ठिकाणी कामे दिली जात.

६. राजाची खाजगी जागा सरकारी अधिकाऱ्यांची निवासस्थाने आणि राजाचा राजवाडा आणि नंतर पेशव्यांच्या दरबारात घरगुती कामे करण्यासाठी वेठबिगार मजूर ठेवले जात.

७. मराठा सत्तेत, नियमित अशा पोलिस दल नव्हते त्यामुळे सरकारने शहरातील व्यापारी केंद्रे, पवित्र स्थळे, बाजार, मनोरंजनाच्या जागा, क्रीडा व व्यायामशाळा ठिकाणांची निगा व संरक्षणासाठी वेठबिगार मजूरांना अशा विविध ठिकाणच्या चौक्यांवर तैनात ठेवले.

८. मराठ्यांच्या काळात, वतनदार आणि सरदार होते. ज्यांना त्यांच्या वतन सांभाळण्यासाठी विविध कामे करणारी वेठबिगार मजूर हवे असत. अश्या वेळी वतनदार सांगेल त्या कामासाठी त्यांना पाठविले जात असे.

गुलामगिरी, खोती पद्धत आणि अस्पृश्यता अश्या अनेक व्यवस्था आस्तित्वात असताना, सक्तीचे मजूर असणे फार अवघड गोष्ट नव्हती. समाजातील काम विभागलेले होते आणि त्यांच्याकडून करून घेतले जात असे. सार्वजनिक समारंभ, धार्मिक उत्सव आणि नियमित येणाऱ्या जत्रांमध्ये त्यांच्या सेवांना मागणी असे. सामान्यतः वेठबिगार मजुरांना नेहमीच फुकट काम करण्यास बोलविले जात नसे. अशा घटना मर्यादित असत. स्थानिक आणि निम्न अधिकाऱ्यांना नेमून दिलेल्या ठराविक काळापेक्षा जास्त काळ कुणाकडूनही मोफत काम करून घेण्याच अधिकार नसे. तरीदेखील, अशा अनेक तक्रारी असत ज्यानुसार काही व्यक्तीकडून अधिकारी बिना मोबदला काम करू घेत आणि नेमून दिलेल्या कामापेक्षा जास्त वेळ थांबवून घेत. परिणामी अनेक वेळा सक्तीचे काम टाळण्यासाठी वेठबिगार मजूर पळून जात आणि कुठेतरी सुरक्षित जागी आसरा शोधीत.

सर्वसामान्यत: काही ठराविक प्रसंगी सरकारकडून खाजगी व्यक्ती आणि संस्थांकडून विनामोबदला काम करून घेण्याची मागणी ही आदेशाबाहेर असे. आधुनिक व्यवस्थेत देखील गरजेच्या वेळी, टंचाई, दु:ख, युद्ध व नैसर्गिक आपत्तीपेक्षा सरकारने अशा सेवांची, मदतीची अपेक्षा करू शकते. प्रत्येक ठिकाणचे लोक अश्यावेळी ती समस्या निवारण होईपर्यंत प्रचंड प्रमाणात प्रतिसाद देतात. त्यामुळे हे काही आश्चर्यजनक नाही की मराठा काळात मोठ्या प्रमाणात वेठबिगार पद्धती राबविली जात असे.

६.३ सामाजिक तत्वज्ञान

ह्या घटकाची दोन उपघटकात विभागणी होते.

a) त्या समाजातून उदयास आलेली सांस्कृतिक पातळी

b) काळानुसार समाजामध्ये पक्का झालेला सर्वसाधारण दृष्टिकोन

हे दोन घटक त्या वेळच्या समाजामध्ये दिले गेलेल्या शिक्षणाचा अविभाज्य भाग असतात. कारण ते त्या वेळच्या समाजामध्ये दिले गेलेल्या शिक्षणाचा अविभाज्य भाग असतात कारण ते त्या वेळच्या शैक्षणिक सूचनांनी संपूर्णपणे प्रभावित झालेले असतात. मराठा काळातील शिक्षणपद्धती ही प्राचीन काळातील शिक्षण व्यवस्थेवर आधारलेली होती. साहजिकच स्त्रीला पुरुषाच्या तुलनेत समान पातळीवर विचारात घेतले जात नसे आणि तिला दुय्यम लेखले जात असे. थोडक्यात स्त्रीकडे बघण्याचा सर्वसाधारण दृष्टिकोन हा तुच्छतावादी होता. ती जरी समाजाचा मुख्य स्तंभ होती तरी क्षुल्लक समजली जात असे आणि दुर्लक्षित केली जात असे. पुरुषांकडे ज्या उदार दृष्टिकोनातून बघितले जायचे तसा दृष्टिकोन स्त्रियांबाबत नसे.

६.४ सामाजिक संस्था

अभ्यासाच्या सोयीसाठी ह्याचे अनेक भागात खालीलप्रमाणे विभागणी केली जाते.

१) कुटुंब, २) विवाह, ३) हिंदू कायदा, ४) धर्म

१. कुटुंब : ही आजपर्यंत राहिलेली समाजाची सर्वात उपयोगी आणि मूलभूत सामाजिक संस्था आहे. कुटुंब हाच एक घटक असा आहे की जो ज्या समाजात आहे त्या समाजाची रचना निर्धारित करतो आणि त्याच्या सभासदांचे चरित्र घडवतो. शमाजाचा एक पायाभूत एकक म्हणून कुटुंब समाजाची लैंगिक, पुनरुत्पादक, आर्थिक आणि शैक्षणिक अशी चार अतिशय अत्यावश्यक कार्ये पार पाडतो. पहिले आणि दुसरे कार्य माणसाच्या मूलभूत जैविक आणि सामाजिक गरजांची पूर्ती करते आणि याच कारणामुळे कुटुंब हे मूलभूत सामाजिक एकक समजले जाते. ही दोन्ही मूलभूत कार्ये इतकी परस्पसंबंधित असतात की ते परस्परांना मजबूत करतात आणि एक दुसऱ्याचे समाधान करतात त्यामुळे त्यांना साधारणपणे एकत्रित लक्षात घेतले जाते. वरील चार कार्ये पार पाडीत असताना स्त्री आणि पुरुष समानरीत्या जबाबदारी उचलत असतात. तरीदेखील स्त्रियांना विनाकारण दुय्यम लेखले जाते. पेशव्यांच्या काळात कुटुंब हे मुलांना सामाजिक स्तर विनम्रता, उतरंडीनुसार करावयाचे कार्य, स्वयंशिस्त गुणांची जोपासना, स्वार्थत्याग, आज्ञाधारकपणा आणि वडीलधाऱ्या मंडळींची सेवा आणि धर्माची शिकवणीचे तंतोतंत पालक वगैरे सामाजिक गुणांचे प्रशिक्षण देणारी शाळाच असे. एखाद्याने हे गुण अंगीकारणे आवश्यक असले तरी मुलीच्या बाबतीत ते कठोर असायचे. राघोजी भोसले ३रे यांच्या पत्नी

दर्याबाईस पार्वतीबाईंद्वारा दिल्या जाणाऱ्या सूचना याबाबतीत स्वस्पष्टीकरण देणाऱ्या आहेत. पार्वतीबाईंनी दर्याबाईस सूचना दिल्या होत्या की दररोज सकाळचे धार्मिक विधी होताच घरातील सर्वात ज्येष्ठ असलेल्या बाईस म्हणजे आजीबाईचा नमस्कार करावा, तिच्या खोलीत येणाऱ्या प्रत्येक ज्येष्ठाशी विचारपूस करावी आणि ते त्या खोलीत असे तोवर उभेच रहावे, पान खाऊ नये आणि ज्येष्ठासमोर तळ्याचा वापर ढाळावा. त्यांनी लहान मुलीमध्ये ज्येष्ठ आणि वडीलधाऱ्यांची आज्ञा पाळणे आणि त्यांचा मान राखणे यांसारखे गुण सजविले होते. जे गुण त्यांच्यासाठी चांगले जगण्यासाठी आवश्यक होते. त्यांनी मुलींच्या मनात पूर्णपणे बिंबविले होते की, मुलींनी त्यांच्या ज्येष्ठांच्या आज्ञेचा वा इच्छेचा अवमान करू नये. तसेच ते रागावले किंवा त्यांनी शिक्षा केली तरी त्यांच्याविरूद्ध तक्रार करू नये. या पुराव्यावरून हे स्पष्ट होते की, सर्व बंधने आणि अटी या फक्त लहान मुलींसाठीच होत्या.

२. विवाह : ही समाजाद्वारे निर्माण केली गेलेली पहिली अशी संस्था आहे जिने सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये समाजाला सर्वात जास्त सहाय्य केले. कुटुंब हा विवाह संस्थेचा मूलभूत हिस्सा आहे. खरं तर विवाहाशिवाय कुटुंबच अस्तित्वात येऊ शकत नाही. मराठा काळातील कुटुंब रक्ताच्या नात्यातील पितृसत्ताक कुळ जपणाऱ्या पितृसत्ताक गटांची बनलेली आहे. भाऊ, सावत्र भाऊ, मुलगा, बहिणी, विधवा काकी, त्यांची मुले आणि अनाथ अशा प्रकारचे सर्व सभासदांचे मिळून असलेली ते एक संयुक्त कुटुंबच होते. जे गटातले ज्येष्ठ सभासद असलेल्या वडीलांसोबत एकत्र रहात असत. अशा कुटुंबामध्ये सर्व निर्णय आणि भोवतालची वस्तूस्थिती स्त्रीच्या विरोधात गेले आणि ती दुय्यम, क्षुल्लक ठरली. संयुक्त कुटुंबामधील विवाह ही करार स्वरूपाची असत आणि विवाह ही करार स्वरूपाची असत आणि विवाह करणाऱ्या जोडप्याच्या मतांना विचारात न घेता लहान वयात ज्येष्ठ मंडळाद्वारे लावली जात. परिणामी अनेक अनिष्ट आणि बेजबाबदार घटना पुढे आल्या.

१) विवाह करण्यास जोड्यांमधील विसंगती सर्वात जास्त निर्माण झाली.

२) नवीन लग्न झालेल्या जोडप्यांमधील वैवाहिक प्रेम अधिक घट्ट होण्याच्या शक्यता तुलनेने कमी झाली.

३) संयुक्त कुटुंबातील सभासद अनेक पिढ्या एकत्र राहात असल्यामुळे पुत्र-पितामधील प्रेमाचे नाते अधिक घट्ट झाले.

४) नवरा मुलगा त्याच्या आई, बहिणी आणि घरातील इतर सभासदांच्या प्रभावाखाली बायकोच्या तुलनेत जास्त असे.

५) नव्याने लग्न झालेल्या नवऱ्या मुलीस किंवा सुनेस सासू सासऱ्यांच्या किंवा कुटुंबातील ज्येष्ठ स्त्रीच्या दयेवर सोडले जात असे.

६) हे सासू सासरे किंवा ज्येष्ठ स्त्रिया बऱ्याचदा या नवीन लग्न झालेल्या मुलींशी जुलामी राजांप्रमाणे वागत असत.

७) नवरे ह्या ना त्या कारणाने आपल्या असहाय्य बायकोस समजून घेण्याऐवजी आईची व नातेवाईकांची बाजू घेत असत.

८) साहजिकच अपरिहार्यपणे या तरुण सुना सासू सासऱ्यांच्या छळाला बळी पडत असत आणि आत्महत्या करीत.

अशा रीतीने विवाह, जी मराठा काळातील एक प्रमुख सामाजिक संस्था होती ती स्त्रीयांच्या अंतास कारणीभूत ठरत होती आणि त्यातूनच त्या काळातील स्त्रियांच्या स्थितीचा दर्जा सिद्ध होतो. मराठा काळातील विवाह व्यवस्थेची काही ठळक आणि विशेष वैशिष्ट्ये होती जिच्या प्रभावामुळे स्त्रियांची परिस्थिती बिकट झाली. ही वैशिष्ट्ये अशीच कार्यरत राहिली असती तर त्याचे स्त्रियांवर अनिष्ट परिणाम झाले असते. ही वैशिष्ट्ये अशी होती.

१. हुंडा

२. बालविवाह

३. बहुपत्नीत्व

४. विधवा विवाहाला प्रतिबंध

५. घटस्फोट

३. हुंडा : मराठा आधिपत्याखालील समाजात कुटुंबाद्वारे आणि ज्येष्ठ व्यक्तीद्वारे विवाह जुळविले जात असत आणि विवाह करणाऱ्या जोडप्यांना मात्र विचारात घेतले जात नसे. दोघांच्या कुंडल्या, कौटुंबिक पार्श्वभूमी, जात, परस्परा योग्य गोत्र आणि हुंडा हेच घटक जोडीदार निवडीसाठी महत्त्वाचे असत. पेशव्यांच्या काळातील हुंडा देवाणघेवाण संदर्भात अनेक संदर्भ सापडतात. सरदार तुळशी बागवाले यांच्या दैनंदिनीमध्ये नोंद आहे की, १) कुणी पुणे येथील देशपांडे यांनी त्याच्या वधू पक्षाकडून ८०० रुपये हुंडा घेतला, २) सावकार वैद्य यांनी त्याच्या वधूकडून १५०० रुपये हुंडा म्हणून स्वीकार केला. मॅक्डॉनल्ड या गृहस्थांनी नाना फडणविसांबाबतच त्यांच्या आठवणीतून सांगितले आहे की नाना फडणविसांबाबतच्या त्यांच्या आठवणीतून सांगितले आहे की नाना फडणवीसांनी त्यांच्या दत्तक पुत्राच्या लग्नात जास्तीत जास्त म्हणजे २५०००/- एवढा हुंडा घेतला. जेव्हा हुंड्यासारखा विवाह प्रथेचा रोग बळावला जात होता आणि उपवर मुलींना वा त्यांच्या पालकांना हुंड्याची रक्कम देण्याची सक्ती केली जात असे. त्यातूनच हे निदर्शनास आले की समाजात स्त्रियांची स्थिती ही पुरुषांच्या तुलनेत समान नाही तर खालच्या पातळीवर आहे.

४. बालविवाह : मराठा अधिपत्याखालील समाजातील विवाह व्यवस्थेचे हे अजून एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होते असे म्हटले जाते की, हिंदूचे कायदे बनविणाऱ्यांनी आणि धर्मशास्त्रांनी बालविवाह वा तारुण्यपूर्ण विवाह करण्याची जोरदार शिफारस केली आहे आणि असे सूचविले आहे की जे पालक आपल्या मुलींचे विवाह तारुण्यपूर्ण वयात पार पाडण्यात अपयशी ठरतील त्यांच्याकडून घोर पाप होईल. पेशवे हे चित्पावन ब्राह्मण असल्याने स्वतःला हिंदू कायदे आणि धर्माचे पालनकर्ते समजत आणि विवाहाचे नियमांचे पालन होते वा नाही यांकडे कडक लक्ष पुरवित असत. पेशव्यांनी अनेक वेळा तुरुंगातील कैद्यांना एवढ्यासाठी बाहेर सोडणे जेणे करून त्यांना त्याच्या मुलीचे विवाह तारुण्यपूर्ण वयात करून देता यावे. दुसऱ्या बाजीराव पेशव्याने सर्व ब्राह्मणांना असा आदेश काढला की त्यांनी त्यांच्या मुलींचे विवाह वयाच्या ९व्या वर्षाच्या आत करावेत. काही अपवादात्मक परिस्थितीत, जेव्हा मुलींचा विवाह लांबणीवर म्हणजे वयाच्या ११ व्या वर्षापर्यंत होत असे, तेव्हा ती वयाची सर्वात जास्त मर्यादा समजली जात असे. जर का कुणी आपल्या मुलीचा विवाह वयाच्या ११ व्या वर्षापर्यंत लावू शकला नाह तर त्याच्याशी संबंध तोडले जात असे किंवा त्यास जातीबाहेर वाळीत टाकले जात असे. विवाहासाठी मुलीच्या वयाला मर्यादा असली तर पुरुषांना अशी कमीत कमी वयाची मर्यादा असल्याचा कोणताही उल्लेख नाही. मुलीचे

विवाह वयाच्या अडीच वा तिसऱ्या वर्षी झाल्याच्या असंख्य घटना आहेत. परंतु असे निदर्शनास येते की वय वर्षे ५ हे सर्वसाधारणत: मान्य केलेले आणि व्यावहारिक दृष्ट्या लग्नासाठी योग्य वय असायचे. जेव्हा मुलीचा विवाह वयाच्या १० वर्षाच्या आत होत असे अश्यावेळी त्या नववधू मुलीचे जीवन अत्यंत शोचनीय आणि हालअपेष्टांनी भरलेले असे.

५. बहुपत्नीकत्व : मराठा अधिपत्याखालील लोकांच्या वैवाहिक जीवनाचे हे अजून एक वैशिष्ट्य होते. मुलीचा विवाह योग्य वयावर काही मर्यादा असल्या तरी पुरुषांच्या विवाहयोग्य वयाबाबत अशी काही मर्यादा नव्हती. ते कोणत्याही वयात कितीही वेळा लग्न करू शकत असत. याचाच अर्थ पुरुष कोणत्याही भीडेशिवाय बहुपत्नीकत्व पाळत असत आणि कोणीही या व्यवस्थेविरूद्ध हरकत दीर्घकाळ घेतली नाही. असे म्हटले जाते की पुरुष त्यांना हव्या तेवढ्या संख्येने विवाह करार करू शकत. थॉमस कोट सांगतो की, मराठा अधिपत्याखालील बहुपत्नीकत्व प्रथा प्रचलित असण्यामागे आर्थिक फायदा हेच उघड कारण होते. नाना फडणवीस, दुसरे बाजीराव पेशवे आणि महादजी शिंदे अश्या महत्त्वाच्या पदावरील लोकांना एकापेक्षा अधिक बायका होत्या. अश्यारीतीने प्रत्येक स्तरावर बहुपत्नीकत्व प्रथेचा अवलंब होत असे त्यावरून मराठा समाजातील स्त्रियांची स्थिती समजून येते.

६. विधवा पुनर्विवाहांना प्रतिबंध : मराठा काळात स्त्रियांची स्थिती दर्शविणारे हे अजून एक निदर्शक आहे. मराठा अधिपत्याखालील समाजाने पुरुषांच्या पुनर्विवाहांना छोटीशी देखील हरकत घेतली नाही. परंतु अत्यंत निकडीच्या वेळी देखील स्त्रियांना पुनर्विवाहाचे स्वातंत्र्य देण्याचे याच समाजाने नाकारले. काही इंग्रजीचे अहवाल असे दर्शवितात की आर्थिकदृष्ट्या दुर्बल समाजघटकात आणि साध्या गरीब जातींमध्ये विधवांच्या पुनर्विवाहा परवानगी असे परंतु वरच्या जातीमध्ये त्यास पूर्ण प्रतिबंध असे. आर्थिकदृष्ट्या गरीब वर्गात विधवांना तसेच ज्यांचे पती बराच काळापासून बेपत्ता आहे अशा स्त्रियांना पुनर्विवाह करण्यास परवानगी असे मात्र अशा स्त्रियांना त्यांच्या पतीची वाट बघण्यास नेमून दिलेल्या मुदतीपूर्वी पुनर्विवाह करता येत नसे मग हा मुदतीचा काळ ५ वर्षापासून १२ वर्षापर्यंत देखील असे तर दुसरीकडे पुरुषांसाठी मग तो कुठलही जातीचा वा वर्गाचा असो असा कुठलाही मुदतीचा काळ नेमून दिलेला नसे. या काळात स्त्रियांची स्थिती कशी होती याचे हे अत्यंत पारदर्शी उदाहरण आहे.

७. घटस्फोट : समाजातील स्त्रियांची स्थिती निर्धारित करणाऱ्या महत्त्वाच्या विषयापैकी हा एक विषय आहे. काही खालच्या जातीमध्ये घटस्फोटास अधिकृत मान्यता होती. तरीदेखील त्यात अश्या काही जाती होत्या की ज्यांना त्यांच्या जातीमध्ये घटस्फोटास मान्यता देणे अवडत नसे कारण त्यायोगे ते ब्राह्मण जातीशी स्पर्धा करून स्वत:च्या जातीला काही प्रमाणात उच्च दर्जा असल्याचा दावा करू शकत असत. ब्राह्मणांनी कधीच घटस्फोटाला मान्यता दिली नाही कारण त्यांच्या दृष्टीने विवाह हे अत्यंत पवित्र बंधन असते आणि हा निर्णय परत फिरवता येत नाही. परंतु जेव्हा समाजात हे सिद्ध होत गेले की विवाह हा घाईघाईने आणि योग्य विधी कर्मकांडाशिवाय केला गेला तेव्हा विवाहाचा निर्णय परत फिरविला ही गेला.

घटस्फोट हा आजकाल वापरला जाणारा मराठी शब्द असला तरी मराठा काळात तो काहीशा वेगळ्या अर्थाने वापरला जात असे. स्त्रियांशी असलेले संबंध पूर्णपणे तोडून टाकणे किंवा तिच्या नवऱ्याकडून आणि त्याच्या कुटुंबाकडून तिच्यावर सामाजिक बहिष्कार टाकणे म्हणजे घटस्फोट असे समजले जाई. जर का नवऱ्याने इस्लाम धर्म स्वीकारला असेल किंवा बायकोने मुस्लिम वा शूद्र व्यक्तीशी अनैतिक संबंध ठेवले असतील व अशा संबंधातून ती गरोदर राहिली असेल व याशिवाय दुसरे कोणतेही कारण नसेल तर घटस्फोट होत असे आणि त्यास मान्यता दिली जाई.

घटस्फोटाप्रमाणेच खालच्या जातीत विवाहसंबंध तोडण्याच्या प्रक्रियेस काडीमोड म्हटले जात असे. काडीमोड खालील आधारावर घेतला जात असे.

१. नवरा मुलगा व मुलीची जात वेगवेगळी असल्याचे विवाहोत्तर निदर्शनास आल्यावर.

२. बायकोच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी घेण्यास नवरा असमर्थ असेल तर

३. दोघांमधील भांडणे विवाहसंबंध तोडण्यासाठी दोघांची संमती असेल तर

४. पहिला नवरा जिवंत असताना बायकोने दुसऱ्याशी पुनर्विवाह केला तर

या आधारांव्यतिरिक्त इतर असा कुठलही आधारावर काडीमोड मान्य केला जात नसे जरी तो नवरा अत्यंत क्रूर असला आणि बायकोला मारझोड करीत असला व बायकोला त्याच्याबरोबर राहणे अशक्य होत असले तरी अश्या रीतीने घटस्फोटाचा आश्रयाचा अभाव असल्याने स्त्रियांची दु:खे वाढत गेली आणि उपायाशिवायच राहिली ज्यातून मराठा काळातील स्त्रियांची स्थिती कळून येते.

८. सती : भारतामध्ये अनेक काळ चालत आलेल्या सर्वात क्रूर व्यवस्थापैकी सती ही एक व्यवस्था होय. मराठा काळात ज्यावेळी बालविवाह मोठ्या प्रमाणावर असत ही प्रथा सर्वत्र जोमाने चालू होती. मराठा अधिपत्याखालील समाज जो विधवांच्या बाजूने ना बालविधवांच्या बाबतीत सहानुभूतीने विचार करणारा होता. उलटपक्षी या समाजाने त्यांच्यावर अनेक बंधने लादून त्यांचे जगणे इतके दु:खद आणि कष्टी केले की त्यांना त्यांच्या नवऱ्याच्या मृत्यूनंतर त्याच्या जळत्या चितेवर स्वत:ला जाळून घेणे भाग पडते म्हणजेच सती जाणे. त्यावेळच्या समाजाचा स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोन कसा होता आणि स्त्रियांची स्थिती काय होती याच हे निदर्शक आहे.

या काळात सतीची प्रथा ब्राह्मण, मराठा सारख्या उच्चजातीमध्ये आणि लढाऊ वर्गातही पाळली जात असे. अशी असंख्य उदाहरणे आहेत की केवळ लग्यात बायकोनेच नाहीतर सोबत राहणाऱ्या स्त्रियांनी आणि गुलाम स्त्रियांनी देखील आपल्या मालकाच्या मृत शरीरासोबत स्वत:ला जाळून घेतले. विधवांद्वारे सती जाण्यामागचे खरे कारण हे नवऱ्याच्या मृत्युनंतर त्यांच्या विधवांना समाजामध्ये जो हीन दर्जा आणि ज्या सामाजिक बंधनांना सामोरे जावे लागत असे ते आहे. त्यांचा छळ करून आणि समाजाच्या मुख्य प्रवाहातून बाजूला ढकलून त्यांना हीन दर्जात ढकलले जात असे. साहजिकच त्या सती जाण्याचा वेदनामय मार्ग स्वीकारीत. पतीच्या मृत्यूनंतर विधवांना कोणत्या हालअपेष्टांना तोंड द्यावे लागते याचे अनेक पुरावे आहेत. त्रावगिरच्या मते, भारतामध्ये पुरुषाच्या मृत्यूनंतर त्याच्या बायकोला पुन्हा लग्न करण्याची परवानगी नसे, तिचे दागिने काढून घेतले जात आणि तिचे केस कापून तिला विद्रूप केले जात असे. तिला जन्मभर तशाच अवस्थेत कोणत्याही अपेक्षा न ठेवता गुलामांपेक्षाही भयंकर जिणे जगत रहावे लागे. असे असह्य जीवन जगावे लागू नये या तिरस्कारातून ती तिच्या नवऱ्याच्या मृतदेहासोबत स्वत:ला जाळून घेत असे. अश्याच रीतीने दुसरा एक परदेशी पर्यटक एडमंड टेरी म्हणतो, की नवऱ्याच्या मृत्यूनंतर तिरस्कारणीय नजरांनी लज्जास्पद जगणे टाळण्यासाठी भारतातील विधवा नवऱ्यांच्या अंत्यसंस्कारची चितेच्या पायऱ्या चढत असत. जेम्स फोर्बसने देखील हे पुर्नप्रतिपादित केले की, भारतीय विधवांना आश्रित, क्षुल्लक आणि अपकीर्तीकारक उर्वरित आयुष्य जगण्यास भाग पाडले जात असल्याने त्या सन्मानाने नवऱ्याच्या मृतदेहासोबत मरणे पसंद करतात व सती जातात. अश्या रीतीने हे पुरावे आपणांस मराठा काळातील स्त्रियांची स्थिती स्पष्टपणे दर्शवितात.

६.५ हिंदू कायदा

हिंदू कायद्यातील काही तरतुदींचा अभ्यास केल्याशिवाय स्त्रियांच्या स्थितीचा अभ्यास निष्कर्षाप्रत येऊ शकणार नाही. कारण हाच तो कायदा होता जो त्या काळात लोकांच्या जीवनावर परिणाम करून गेला. वस्तुस्थितीचा एक भाग असा की, जमिनी बाबतच कायदा हा पुरुष आणि स्त्रीला समानरीत्या लागू झाला पाहिजे. परंतु असे झाले नाही. हिंदू कायद्यातील काही निरीक्षणे जी स्त्रियांच्या संदर्भातील आहेत.

१. प्रचलित हिंदू कायदा पुरुषांच्या बाजूने होता. विशेषत: विवाह संदर्भातील कायदे पुरुषांच्या पक्षपातीत होते.

२. अनैतिक संबंधाबाबतचा कायदा केवळ स्त्रियांनाच बंधनकारक होता पुरुष मात्र काहीही करण्यास मोकळे होते किंवा सोबतीण वा वेश्येशी संबंध ठेवू शकत असे.

३. हिंदू कायद्याने घटस्फोटास मान्यता तर दिली नाहीच आणि स्त्रियांना त्यांच्या नवऱ्याकडून होणाऱ्या छळापासून मुक्ततेसाठी देखील काही केले नाही.

४. घटस्फोटावर असलेल्या बंधनामुळे स्त्री आणि पुरुष दोघांनाही काही प्रमाणात त्रास भोगावा लागतो. परंतु या बाबतीत पुरुषांची काहीही गैरसोय झाली तरी बहुपत्नीकत्वाच्या प्रथेमुळे त्याची भरपाई होत असे. स्त्रियांना अश्या प्रकारची सोय नसे.

५. मराठा अधिपत्याखाली विवाह कायदे इतके स्त्रीविरोधी होते की मुलींना पळवून नेऊन अथवा तिला जबरदस्तीने अनुरूप नसलेल्या पुरुषाशी लग्न करण्यास भाग पाडले जात असताना, तिला कोणत्याही प्रकारे मदत करू शकत नसत आणि जीवनभर तिला हे दु:ख भोगावे लागत असे. मराठा अधिपत्याखालील तिच्या नवऱ्याची वैयक्तिक समाजात स्त्रियांना त्यांच्या नवऱ्याची वैयक्तिक मालमत्ता समजले जात असे. नवरे स्त्रियांना आयुष्याची जोडीदार म्हणून वागणूक न देता त्यांचे मालक वा सरंजामदार समजत असत. एका माळ्याने एकदा त्याची बायको त्याच्या सावकाराकडे कर्जाच्या मोबदल्यात अनामत म्हणून ठराविक मुदतीसाठी ठेवली होती. परंतु ठराविक मुदतीत तो सावकाराचे कर्ज फेडू न शकल्या कारणास्तव सावकाराने त्याची बायको शय्यासोबतीसाठी स्वत:कडे ठेवून घेतली. हिंदू कायद्याने याबाबत काही हरकत घेतली नाही.

६. हिंदू कायद्याने स्त्रीला कनिष्ठ दर्जाचा मानवजात समजले असे अपेक्षिले की, त्यांनी त्यांच्या नवऱ्यांसमोर अश्या रितीने अज्ञाधारक असले पाहिजे की, नवऱ्याने त्यांना विष प्राशन करण्याची वा उघड्या विहिरीत उडी मारण्याची आज्ञा केली तरी न डगमगता त्याच्या आज्ञेचे पालन केले पाहिजे. एवढेच नाही तर, अनैतिक संबंधाच्या संशयावरून पुरुषाने स्त्रीला गुलाम करून ठेवण्यासही कायद्याने पुरुषांना परवानगी दिली. अश्या रीतीने हिंदू कायद्याद्वारे दिली जाणारी असमान वागणुकीने स्त्रियांना अधिकच असहाय्य बनविले.

६.६ धर्म

मराठा काळात स्त्रियांची स्थिती बिकट होण्यास कारणीभूत असलेला अजून एक घटक म्हणजे धर्म. मराठा अधिपत्याखाली असणाऱ्या धर्मश्रद्धांपैकी हिंदू धर्मश्रद्धा ही सर्वात जास्त लोकप्रिय धर्मश्रद्धा होती. या धर्माचा दीर्घ इतिहास आहे आणि तो उत्क्रांति, व्याख्या, संघटन, वर्गीकरण

आणि वाढ या विविध टप्प्याचे प्रतिनिधित्व करतो. मराठा काळाच्या आधीच हे सर्व टप्पे या धर्मात पार झाले होते. हा धर्म चार पुरुषांवर अवलंबून होता विशेषतः कर्मसिद्धांत, मोक्ष, दया, गुणवत्तेनुसार अवतार प्राप्ती, भक्ती शिकवण आणि अनेक युगांपासून असलेले इतर काही कर्म, सती आणि मोक्ष या संकल्पनावर आधारित धार्मिक आचरण मराठा काळात प्रभावी होते. कर्मसिद्धांतात शिकवण असे सांगते की, प्रत्येक क्रियेतून काही प्रतिक्रिया निर्माण होते जी तुमच्या चांगल्या वा वाईट कृतीचा परिणाम असणे व जी तुम्हाला सुख वा दुःख देते. माणसाचे वर्तमान आयुष्य हे त्यांच्या पूर्वायुष्यात केलेल्या कार्याच्या आधारावर ठरलेले असते जे कोणी टाळू शकत नाही. साहजिकच सर्व मानवी वर्तन हे पुढील आयुष्यात त्याला चांगले किंवा वाईट फळ देते. त्यामुळे लोक वेगवेगळ्या धार्मिक ग्रंथानी सुचविल्याप्रमाणे विविध मार्गाने पुण्य गोळा करतात. जेणेकरून पुढील आयुष्यात त्यांना सुख मिळेल. धर्म ज्यानी पुढील आयुष्यातील सुखावरच जास्त लक्ष केंद्रित केले आणि वर्तमान आयुष्याकडे दुर्लक्ष केले त्या धर्माने स्त्रियांची स्थिती बिकट केली. तो पुरुषांच्या बाजूने आणि स्त्रियांच्या विरोधात खालीलप्रमाणे होता-

- धर्माने पुण्य कमावण्यासाठी दान करण्यास सुचविले आणि धान्य, कपडा, गाय, दागिने आणि स्त्रिया ब्राह्मणांना दान केले गेले.

- जप-जाप्य, उपचार, पूजा अशा विधीवर भर दिला. जे विधी एखाद्यासाठी दिवसभराचे धार्मिक कर्तव्य ठरले. स्त्रिया जगण्याच्या इतर अंगापेक्षा स्त्रिया या विधीमध्येच बहुतांश गुरफटून गेल्या.

- धर्माने स्त्रियांना पुरुषांपेक्षा कमी प्रतिची मानवजात मानले.

- धर्माने एकापेक्षा अधिक बायका करण्यास हरकत घेतली नाही.

- ह्या काळात प्रचलित असलेल्या सती प्रथेस धर्माची मान्यता होती. असे सांगितले गेले की, ज्या स्त्रिया आपल्या पतीच्या मृतदेहासोबत स्वतःला चितेच्या स्वाधीन करतात त्या पतीची सर्व पापांपासून मुक्ती करतात आणि त्यांनी कमविलेल्या पुण्यामुळे त्यांना स्वर्गप्राप्ती होते जेथे ते दोघे पती-पत्नी एकमेकांसोबत चिरंतन सुखात राहतात. परंतु असेही सांगितले की, धर्मामुळे नाहीतर पतीच्या निधनानंतर विधवा म्हणून भोगाव्या लागणाऱ्या त्रासास घाबरून स्त्रिया सती जात असत. अशा वेळी धर्म त्यांना समाजातील इतर घटकांकडून सहाय्य मिळवून देऊन त्यांना वाचवू शकला असता. परंतु धर्मांनी हे काम केले नाही आणि विधवांना असहाय्य परिस्थितीत ढकलले. ज्यामुळे त्यांना अश्या वेदनादायक निर्णय घ्यावा लागला.

६.७ मालमत्ता अधिकार किंवा स्त्रीधन

मराठा अधिपत्याखाली स्त्रियांची स्थिती त्यांच्याकडे असलेल्या मालमत्ता अधिकार वा स्त्रीधनावरून निश्चित ठरवता येते. स्त्रियांना हा अधिकार असता तर त्यांना भेडसावण्याच्या अनेक समस्यांवर त्या मात करू शकल्या असत्या.

वास्तविक पाहता, मराठा काळामध्ये स्त्रियांना दुय्यम स्थानावर ढकलले गेले होते. त्यांच्या पित्याच्या मालमत्तेचा कोणी कायदेशीर वापर अथवा त्यांचे भाऊ नसताना देखील त्यांच्या त्या मालमत्तेवर हक्क नाकारला गेला. याचा अर्थ कोणत्याही विवाहीत स्त्रियांना त्यांच्या पित्याच्या मालमत्तेतील वाट्यासाठी हक्क सांगता येणार नाही, फक्त अविवाहीत मुलीच पितृधन म्हणून

आणि त्यांच्या लग्नास लागणारा खर्च म्हणून ठराविक रक्कमेसाठी दावा करू शकतील. या काळातील स्त्रिया त्यांना त्यांच्या वडिलांकडून, भावाकडून किंवा दुसऱ्या कोणा सभासदाकडून विविध समयी भेट म्हणून जे जे काही देतील त्याचा त्या लाभ घेऊ शकतील आणि त्याउपर काही त्यांना मिळणार नाही. तर दुसरीकडे, स्त्रियांचा त्यांच्या नवऱ्याच्या मालमत्तेतील वाटा देखील मर्यादित असे. स्त्रिया त्यांच्यासाठी मालमत्तेतील हक्क म्हणून केवळ त्यांच्या उदरनिर्वाहा इतकीच रक्कम त्यांच्या नवऱ्याकडून मिळण्यासाठी दावा करत असत. नाहीतर पुरुष त्यांच्या बायकांना उदरनिर्वाहासाठीची तरतूद करण्यास अपात्र असल्याच्या कारणांवरून स्त्रियांना घटस्फोट मिळत असे, असे म्हटले जाते की, जर का नवरे संयुक्त कुटुंबातून अलग झाले असतील आणि कोणा कायदेशीर वारसाविना मृत्यू पावले असतील तर अश्यावेळी त्यांच्या विधवा नवऱ्याच्या मालमत्तेवर वारसदार होत असे. तरी देखील अशा प्रकरणात फक्त विधवांनाच मालमत्तेचा वारस होऊ शकत नसे तर सरकारदेखील त्या मालमत्तेत काही वाट्यासाठी दावा करू शकत असे जो वेगळ्या मालमत्तेनुसार मालमत्तेच्या २/५ ते १/२ पर्यंत असे. संयुक्त कुटुंबामध्ये जर का विधवेच्या फक्त उदरनिर्वाहासाठी तरतूद केली असल्यास त्यांना पतीच्या मालमत्तेचा वारसदार रहाता येत नसे. जर का संयुक्त कुटुंब तिला उदरनिर्वाह खर्च देण्यास असमर्थ असेल, सरकार त्या कुटुंबाला उदरनिर्वाह खर्च देण्यासाठी ताकीद देण्यासाठी असे; सोडलेल्या बायकांना देखील उदरनिर्वाह खर्च दिला जात असे. श्रीमंत कुटुंबामद्ये हे उदार वातावरण होते आणि बायकांच्या किंवा विधवांच्या मृत्यूनंतर ते पुन्हा मुलांकडे किंवा संयुक्त कुटुंबाकडे जात असे.

मराठा काळात स्त्रिया स्वतंत्रपणे मालमत्ता बाळगू शकत आणि मालमत्ता विकून टाकणे वा भेट म्हणून देणे यांवर त्यांचा पुरेपुर हक्क असे. ज्यालाच स्त्रीधन मालमत्ता म्हटले जाते. ज्ञानेश्वराच्या पुस्तकात स्त्रियांना त्यांच्या मुळ हक्काच समान वाटत असला पाहिजे याचा पुरस्कार केला आहे. याच पुस्तकात असेही सांगितले आहे की, स्त्रीधनाचा अर्थ वारसा हक्काने, खरेदीद्वारे आणि स्त्रियांची विभागणी करून मिळविलेली मालमत्ता जिला ती विकून टाकण्याता सर्व अधिकार असे. काही इतर स्त्रोतांच्या मते, लग्नाआधी वा लग्नानंतर स्त्रीयांना दिले गेलेला दागिना आणि त्यांना तो विकून टाकण्याचा, भेट म्हणून ठेवून घेण्याचा वा विभागून देण्याचा त्यांच्या इच्छेप्रमाणे अधिकार असे. असे अनेक संदर्भ आहेत खुद्द सरकारने देखील त्यांच्या सासूच्या ताब्यातील त्यांचे दागिने परत मिळवून देण्यात आणि त्यांना हवे तेव्हा घालण्यात त्यांची मदत केली आहे. अश्या प्रकारे स्त्रीचा मालमत्तेचा अधिकार हा तिच्या नवरा आणि पुरुषांच्या मालमत्तेतील अधिकार असे. परंतु सर्वच स्त्रियांना त्यांच्या लग्नाच्या वेळचे त्यांचे दागिने परत मिळणे शक्य नव्हते. त्यामुळे त्यांना आयुष्याच्या ठराविक काळात अनुक्रमे वडील, नवरा आणि मुलावर अवलंबून रहावे लागत असे. अश्या रीतीने मालमत्तेतील अधिकारासंदर्भात स्त्रियांना दुय्यम स्थान असे ज्यासाठी हिंदू धर्म आणि तिचे कायदे जबाबदार होते.

६.८ स्त्रियांची भूमिका

स्त्रियांनी प्रत्यक्ष बजावलेल्या भूमिकांचे सर्वेक्षण केल्याशिवाय स्त्रियांच्या स्थितीचे अभ्यासपूर्ण होऊ शकत नाही. प्रगती आणि विकासासाठी शिक्षण हीच गुरुकिल्ली आहे. परंतु स्त्रियांना शिक्षण दिले गेले नाही. वाचन आणि लेखन कौशल्ये आत्मसात करण्याची कुवत त्यांच्याकडे नसते असेच समजले गेले. शिक्षण हा एकचपुढचे पाऊल मानले गेले आणि ते थोड्या लोकांपुरतेच मर्यादित केले गेले. साहजिकच मराठा अधिपत्वाखालील श्रीमंत सरदार कुटुंबातील स्त्रियांनीच वाचन व लेखनाची कौशल्ये शिकविली गेली जेणे करून त्या धार्मिक व सामाजिक

साहित्य वाचू शकतील. स्त्रियांनी धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये अधिकाधिक वेळ घालवावा असे अपेक्षिले गेले.

सर जॉन माल्कम म्हणतात, राजघराण्यातील स्त्रियांना घोडेस्वारी आणि तलवार, भाला, खंजीर वगैरे शस्त्रे चालविण्याचे शिक्षण देण्यात येत असे. यमुनाबाई शिंदे, लक्ष्मीबाई, करवीरच्या अहिल्याबाई, जीनाबाई आणि ताराबाईनी लढाईच्या रणांगणात आपल्या सैन्याचे नेतृत्व केले आणि त्यांच्या काळात अनेक लढाया केल्या कॅप्टन ब्रॉटन मराठा स्त्रियांमध्ये अनेक वैशिष्ट्ये व गुण आढळले.

१. मराठा स्त्रिया या दखल घेण्याजोग्या होत्या.

२. देशातील इतर स्त्रियांमध्ये नसणारा धीटपणा त्यांच्या अंगी होता.

३. त्या पुरुषाइतक्यात धीट होत्या.

४. त्यांना पुरुषांइतकी चांगली घोडेस्वारी करता येत असे आणि घोडा उधळला तरी त्यांना त्याचे भय वाटत नसे.

५. त्यांना पुरुषापेक्षा अधिक चिकाटी होती.

असे अनेक पुरावे आहेत की राजघराण्यातील आणि सरदार कुटुंबातील स्त्रियांनी त्यांच्या वडिलांच्या, नवऱ्याच्या वा मुलांच्या राज्यकारभारात आणि राजकारणात अतिशय सकारात्मक आणि महत्त्वाची भूमिका बजावली. तुलसाबाई, अहिल्याबाई होळकर, उमाबाई दाभाडे, महादजी शिंदे यांच्या पत्नी लक्ष्मीबाई आणि यमुनाबाई शिंदे, दर्याबाई भोसले, पेशव्याच्या कुटुंबातील ताराबाई, जिजाबाई, राधाबाई, गोपिकाबाई, आनंदीबाई, अनुबाइ घोरपडे या स्त्रियांनी मराठा इतिहास आणि भारताचे सांस्कृतिक जीवन घडविण्यात योगदान केले. या आणि इतर अनेक स्त्रिया असामान्य धैर्य, राजकीय सहलपण, प्रशासकीय क्षमता किंवा मुत्सद्देगिरी आणि त्या काळातील सार्वजनिक जीवनात कार्यरत रहाण्याची कुवत अंगी असलेल्या स्त्रिया होत्या. काही स्त्रियांची नावे त्यांच्या प्रशासनातील सकारात्मक भूमिकेमुळे आपल्या डोळ्यासमोर येतात तरी अशा अनेक स्त्रिया होत्या ज्यांच्या अंगी अनेक भूमिकांच्या क्षमता होत्या. परंतु त्यांनी मुकपणे सहभाग घेतला आणि पाटील, देशमुख, देशपांडे, देश कुलकर्णी यांच्या जागा घेतल्या आणि त्यांची कर्तव्ये कार्यक्षमरित्या पार पाडली. या स्त्रियांनी त्यांच्या अल्पवयीन मुलांच्या वतीने राज्यकारभार हाती घेतला, दैनंदिन व्यवहार हाताळणे, हिशेब तपासले, दैनंदिन पत्रव्यवहार केला आणि विविध नियुक्त्यांसाठी सत्तेच्या आतील आणि बाहेरील चांगली माणसे हेरली.

झेम्स फोबर्स त्यांच्या नोंदीत म्हणतो, मराठा स्त्रिया पडदा ठेवीत नसत, त्या पुरुषांप्रमाणेच धीट आणि सार्वजनिक जीवनात सहभागी होत असत. तो पुढे म्हणतो बडोद्याचे फत्तेसिंग गायकवाड यांचे दिवाण हिरानंद यांच्या पत्नीने त्याच्या अनुपस्थितीत अत्यंत कार्यक्षतेने प्रशासन चालविले. समाज रूढीवादी आणि धार्मिक विचारांचा असताना सामाजिक प्रश्न व चालरीतीचा प्रभाव असताना, अशाही काही स्त्रिया होत्या की ज्यांना शत्रुपक्षांशी सत्ता स्पर्धेच्या काळात आपल्या मुलांचे आणि नवऱ्यांचे हितसंबंध सुरक्षित राखण्याची संधी मिळाली. त्यांनी ही परिस्थिती अतिशय जवळून आणि बारकाईने पाहिली, त्या ह्या परिस्थितीमध्ये निष्णात झाल्या आणि कार्यक्षमतेने ती हातळली. अश्या रीतीने राज घराण्यातील, उच्च अधिकार पदावरील कुटुंबातील मराठा स्त्रियांनी पुरुषांना तोडीस तोड प्रत्येक कार्य केले आणि त्या पुरुषांइतक्याच समान आहेत हे सिद्ध केले.

६.९ मराठा सत्तेच्या अधिपत्याखाली असलेल्या स्त्रियांच्या स्थितीचे मूल्यमापन

मराठा काळातील सामाजिक तत्वज्ञान, सामाजिक संस्था आणि हिंदू कायदा व धर्म या सर्व घटकांचा विचार केल्यानंतर, असे दिसते की या सर्व घटकांनी स्त्रियांची स्थिती असमानरीत्या प्रभावित केली व तिच्यावर परिणाम केला. समाजातला मध्यम स्तर होता जो सर्वात जास्त प्रभावित व परिणामित झाला. उच्च व श्रीमंत वर्गातील स्त्रियांनी त्यांच्या पती, मुलगा वा पित्यांच्या सामाजिक स्थिती व संपत्तीमुळे सर्व सामाजिक फायदे उपभोगले. स्त्रियांना शिक्षण दिले जात नसल्याने, उच्च वर्गातील स्त्रियांना वाचन व लेखनाचे कौशल्य शिकवित गेल्यामुळे त्या सार्वजनिक जीवनात विशिष्ट पदे उपभोगू शकल्या आणि अनेक वर्षे सत्तेत राहू शकल्या. विवाह कायदे आणि इतर सामाजिक रूढी बंधामुळे ह्या पुरुषांच्या तुलनेत दुय्यम राहिल्या तरी त्यांच्या कुटुंबाच्या सांपत्तिक स्थितीमुळे त्यांच्या मूलभूत गरजा भागल्या गेल्या आणि सामाजिक बंधने व रूढी जाचक ठरल्या नाहीत. असे म्हटले जाते की कष्टकरी वर्गातील स्त्रियांना त्यांच्या सामाजिक स्थितीचा प्रश्न कधी पडला नाही. त्या पुरुषांच्या तुलनेत जवळपास समानच होत्या कारण कष्टकरी वर्गातील पुरुष आणि स्त्रिया दोघांनाही त्यांच्या उदरनिर्वाहासाठी समानरीत्या काम करावे लागत असे किंवा दुसऱ्या शब्दात सांगायचे तर शेतीतील कामामध्ये स्त्री व पुरुष दोघांच्या श्रमाची प्रत्येक आर्थिक बाबीसाठी भूमिका जरूरीची असल्याने या वर्गामधील स्त्रियांची स्थिती पुरुषांच्या तुलनेत अधिक वरची राहिली. धर्म आणि विवाह संदर्भातील कायदे हे खालच्या जातीतील आणि वर्गातील स्त्रियांसाठी मवाळ व लवचिकच होते. त्यांच्यासाठी ना सतीची प्रथा होती ना विधवांचे केशवपन केले जायचे. उलट घटस्फोटांना संमती असे आणि विधवा विवाहाना देखील परवानगी असे. थोडक्यात विवाह कायद्यांची कठोरपणे आणि कडकपणे अंमलबजावणी केली जात नसे. वरच्या वर्गाने बहुपत्नीकत्व आणि शय्यासोबतीसाठी बाई ठेवण्याची प्रथा आर्थिक कारणांसाठी पाळली ज्यातून स्त्रीचे स्थान पुरुषांच्या तुलनेत खाली गेले. परंतु या प्रथा कष्टकरी वर्गात पाळल्या जात नसत. थॉमस कोट म्हणतो बहुपत्नीकत्वाची व्यवस्था आस्तित्वात असली तरी ती फार तुरळकरित्या विशेषत: जेव्हा पहिल्या पत्नीपासून मुले नसतील तेव्हा पाळली जात असे. असेही निरीक्षणास आले आहे की स्त्रीयांच्या मालमत्ता हक्का संदर्भातील कायद्याने कष्टकारी वर्गातील स्त्रियांच्या जीवनात फारसा फरक पडत नाही. त्या गरीबच असल्याने मालमत्तेत हिस्सा मिळण्या इतकी मालमत्ता त्यांच्या पाशी नसते; त्यांना त्यांच्या उदरनिर्वाहापेक्षा जास्त काही मिळण्याची अपेक्षा नसते. त्यांच्या दैनंदिन जीवनात त्या स्वत:च स्वतंत्रपणे कमाई करीत असत आणि कठीण श्रम करीत असत; ज्या गुणांचा उच्च वर्गातल्या स्त्रियांमध्ये अभाव असे.

मध्यम वर्गात असणाऱ्या स्त्रियांना सर्वात जास्त भोगावे लागे कारण त्या उच्चवर्गाएवढी धनिक नसत आणि खालच्या वर्गांना असलेल्या रुढी त्यांना लागू नसत. सर्वसाधारणपणे मध्यम वर्ग हा उच्च जातीमधूनच तयार झालेला होता परंतु त्यांच्या स्त्रियांना श्रीमंत स्त्रियांप्रमाणे उपभोग घेता येत नसे तसेच खालच्या वर्गांना दिलेल्या नियम, रुढी मधील सुटीचा लाभ घेण्याची परवानगी नसे. साहजिकच या वर्गातील स्त्रिया प्रत्येक बाबतीत दोन्ही बाजूनी दडपल्या जात. बालविवाह प्रथेमुळे त्यांचे व्यक्तिमत उध्वस्त होत असे, संयुक्त कुटुंब पद्धतीमध्ये त्यांना दुय्यम स्थानावर रहावे लागे तसेच बहुपत्नीकत्व, शय्यासोबतीची प्रथा, घटस्फोटास नकार आणि विधवा विवाहास प्रतिबंध यामुळे त्यांची कोंडी होत असे. या रुढी, प्रथा आणि व्यवस्थेमुळे त्या त्यांच्या नवऱ्यांकडून संपूर्णत: दुर्लक्षित होत असत आणि क्षुल्लक गुन्ह्यासाठी टाकून दिल्या जात असत. या वर्गातील विधवा ज्या वैधत्व सक्तीचे ब्रह्मचर्य, हीन वागणूक, इतरांवर अवलंबित्व

आणि सततची अवहेलना टाकू पाहतात; त्या गौरवाने त्यांच्या नवऱ्याच्या मृतदेहासोबत सती जात किंवा मग शेवटपर्यंत अत्यंत नीरस आयुष्य जगत राहत असत.

आपली प्रगती तपासा

१. मराठा अधिपत्याखाली कोणती वेगवेगळी दडपणे होती जी गुलामगिरीचे स्त्रोत बनली ?

६.१०शेतकऱ्यांची स्थिती

मराठा कालखंडामध्ये शेतकऱ्यांची स्थिती समाधानकारक होती. पशुपालन हा शेतीला पूरक व्यवसाय असल्यामुळे त्यापासून उत्पादित होणाऱ्या वस्तूंमुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती समाधान कारक असल्याचे दिसून येते. प्रामुख्याने दक्षिण महाराष्ट्र, खान्देश, बिदर या भागामध्ये दुधाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे शेतकऱ्यांना त्याचा मोठयाप्रमाणावर लाभ झाल्याचे दिसून येते आजही पश्चिम महाराष्ट्रामध्ये दुधाचे उत्पादन मोठयाप्रमाणावर होत असून त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये समृद्धता आलेली दिसून येते, ही परंपरा मराठा कालखंडापासून चालत आलेली आहे.

मराठा कालखंडामध्ये खेड्यामध्ये स्वयंपूर्णता होती, खेडे हे समृद्ध होते त्याचे कारण असे की शेतकऱ्यांनी शेतीला पूरक असलेले व्यवसाय सुद्धा जपलेले होते. अल्पभूधारक तसेच भूमीहीन शेतकऱ्यांनी पूरक व्यवसायाच्या माध्यमातून आपली सामाजिक-आर्थिक स्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला होता. एकत्रित शेतीबरोबर, हस्तकलाउद्योग, कुटीरउद्योग, हातमाग, कापडउद्योग इ. व्यवसाय सुद्धा भरभराटीस आल्यामुळे शेतकरी समृद्ध असल्याचे दिसून येते. कापडउद्योग, दुग्धउद्योग व हस्तकलेच्या उद्योगामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती मराठा कालखंडामध्ये समाधानकारक होती.

६.११ सारांश

गुलामगिरी ही मानवी वस्तीतील काहींनी इतर माणसांवर लादलेली अस्वैच्छिक गुलामी होय. इतिहाच्या सुरवातीच्या काळापासूनच अशी परिस्थिती समाजात होती. गुलामगिरी ही साधारणतः युद्ध किंवा काही गंभीर कायद्याचा भंग किंवा कर्ज परतफेड न केल्याचा परिणाम होता. अशी व्यवस्था प्रत्येक प्राचीन आणि मध्ययुगीन समाजात आस्तित्वात होती. इजिप्त, रोम, ग्रीक, अमेरिका, आफ्रिका आणि युरोपियन समाजाचे गुलामगिरी हे एक वैशिष्ट्यपूर्ण अंग होते. ती भारतामध्ये देखील प्रचलित होती आणि मध्यमयुगीन काळात या गुलामांपैकी एकाने भारतावर राज्य केले होते. मराठ्यांच्या आधिपत्याखाली झालेल्या युद्ध आणि नंतरच्या लुटालुटीमध्ये अनेक स्त्रिया गुलाम झाल्या, गुलामांचा व्यापार, खंडणी, अनाथ व निराधारांची संख्या व व्यभिचार अशा अनेक गुलामगिरीचे स्त्रोत निर्माण झाले. या काळातील गुलामगिरी समाजाच्या मधल्या स्तरामध्येच मर्यादित राहिली. जर का एखाद्याने वरच्या जातीतील कोणास गुलाम बनविण्याच प्रयत्न केला, सरकार त्या दोषी माणसाला जबरदस्त ताकीद देत असे. उपलब्ध स्त्रोत असे सांगतात की, एखादा कर्जदार माणूस कर्ज न फेडता मेला तर त्याच्या मुलांना कर्जफेडीच्या मोबदल्यात कर्ज दिलेल्या व्यक्तीला सेवा पुरविणे बंधनकारक नसे. मराठ्यांच्या काळात गुलामगिरी ही प्रामुख्याने घरगुती स्वरूपाची असे आणि पाश्चिमात्य देशातल्याप्रमाणे औद्योगिक स्वरूपाची नसे.

munotes.in

तुमच्या अभ्यासाअंतर्गत येणाऱ्या काळातील गुलामगिरी ही फक्त स्त्रियांपुरती मर्यादित होती. पुरुषांना ना विकले जात असे ना ही त्यांना गुलाम केले जात असे. जरी तो गुलाम स्त्रिच्या पोटी जन्माला आला असला तरी वयाच्या दहा व्या वर्षानंतर त्यास मुक्त केले जाई. याचाच अर्थ पुरुषांना एका पिढीपेक्षा अधिक काळ गुलाम ठेवले जात नसे. सर जॉन माल्कमने केलेले निरीक्षणानुसार माळवा प्रांतात गुलामगिरी अस्तित्वात होती आणि पुरुषांना क्वचितच गुलाम केले जात असे. गुलामांच्या व्यापारामध्ये बंनारा भाट आणि चरण यासारख्या भटक्या जमातीचा बहुतांश समावेश असे ते स्त्रिया आणि मुलाची तस्करी करीत असत ज्यांना शेवटी घरकाम करण्यासाठी वा वेश्या व्यवसायासाठी विकले जात असे. मालक जे गुलामांचा व्यापार करणाऱ्या काही ब्राह्मणाचा संदर्भ दिला आहे जे स्त्री गुलाम खरेदी करीत आणि त्यांना पुण्याला पाठवीत असत जेथे त्यांना चांगली किंमत मिळत असे हे गुलाम खरेदी करताना शारीरिक तंदुरुस्ती, जात, तारुण्य विचारात घेतले जात असे. परंतु सर्वसाधारपणे काळ्या, उंच, सडपातळ आणि मजबूत बांध्याच्या स्त्रिया विविध प्रकारच्या कामासाठी विकत घेतल्या जात असत.

पेशव्याच्या काळात स्त्री गुलामांना बाटकिणी व कुणबिणी म्हणत असत. या गुलामांना मालमत्ते प्रमाणं वागवलं जात असल्याने सरकार गुलामांच्या संस्थेनुसार जो त्यांना पसंत करतो त्याच्यावर कर लावत असे. गुलामांचा मालक त्याला हवे तेव्हा या गुलामांना विकू, गहाण ठेवू किंवा पाठवू शकत असे. या मालकाला त्याच्या गुलामांवर पूर्ण अधिकार असला तरी तो त्याच्या गुलामांना निर्दयीपणे मारून टाकू शकत नसे. असे काही पुरावे आहेत की मालक आपल्या गुलामांसाठी पादत्राणे, कपडे आणि काही स्वस्त दागिने खरेदी करत असे. याचा अर्थ या काळात गुलामांना उदारपणे वागविले जात असे काही गुलाम वृद्ध किंवा काम करण्यास लायक न राहिल्यास त्यांना इतर गुलाम भाड्याने घेण्यास किंवा त्यांच्यासाठी पर्यायी गुलाम म्हणून ठेवण्यास परवानगी असे. त्यांना स्वतःची मालमत्ता करण्याचा अधिकार असे. काही गुलाम हे त्यांच्या मालकाच्या कुटुंबाशी अजन्म जोडून रहात असत.

मराठा समाजात ईश्वरी राजसत्तेची तत्वे वर्चस्व राखून होती. देवदासी संकल्पना इतकी प्रचलीत होती की त्यापुढे सर्व काही गौण होते. मराठा धार्मिक वृत्तीचे लोक होते ते स्वतःसाठी काही न करतील तरी धर्मासाठी काहीही करायला तयार असत. त्यांच्या सामाजिक संघटनेची रचना ही विविध व्यवस्थांवर आधारलेली होती ज्यांचे मूळ ईश्वरी प्रेरणेत आहे असे ते मानीत. त्यामुळे ती दीर्घकाळ तशीच राहिली आणि विना अडथळा वडिलांकडून मुलांकडे पिढ्यानपिढ्या सोपविण्यात येत राहिली. ज्यावेळेस या व्यवस्था वंशपरंपरागत बनल्या, समाजात स्थिरतेचे एक तत्व आले. अशा रितीने ते समाजातील स्त्रियांच्या स्थितीसाठी जरूरीचे बनले. कोणत्याही समाजातील स्त्रियांची स्थितती ही त्या समाजात विकसित झालेल्या सामाजिक तत्वज्ञान व सामाजिक संस्था या दोन घटकांवर अवलंबून असते. सामाजिक तत्वज्ञान हे समाजाचा सर्वसाधारण दृष्टिकोन आणि सांस्कृतिक पातळी यावर आधारलेले असते. याच रीतीने कुटुंब, विवाह, हिंदू कायदे आणि धर्म ह्यासारख्या सामाजिक संस्था प्रभावित झाल्या आणि त्यातून समाजातील स्त्रियांच्या स्थीवर परिणाम झाला. मराठा काळामध्ये संयुक्त कुटुंबपद्धती आस्तित्वात होती ज्यामध्ये त्यावेळी स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोन उदार नव्हता. या संयुक्त कुटुंब व्यवस्थेत विवाह हे करार पद्धतीने उदार नव्हता. या संयुक्त कुटुंब व्यवस्थेत विवाह हे करार पद्धतीने कोवळ्या वयात होत असत; विवाह करणारे जोडीदार परस्परांना अनुरूप नसण्याची शक्यता जास्त असे. या व्यवस्थेमध्ये नवीन लग्न झालेल्या जोडप्यांमधील प्रेम कमी आणि पालकांप्रतीचे प्रेम जास्त असे. नवरे बायकोपेक्षा आई आणि बहिणिच्या प्रभावाखाली जास्त असत. नवीन लग्न झालेल्या सुनांना सासूच्या मर्जीवर अवलंबून रहावे लागे ज्या जुलमी राजांप्रमाणे वागत आणि सुनांना आत्महत्येस प्रवृत्त करीत असत. मराठा काळात बाल विवाह, बहुपत्नीकत्व, विधवा विवाह प्रतिबंध व

घटस्फोट अश्या अनेक वैशिष्ट्यांनी विवाहसंस्था बनलेली होती. ज्यामुळे स्त्रियांची स्थिती मोठ्या प्रमाणावर बिकट झाली. सतीप्रथेचे गौरवीकरण केले गेले आणि असे म्हटले गेले की जी स्त्री सती गेली तिने स्वर्गात जाग मिळविली आणि नवऱ्याची पापे नष्ट केली. धार्मिक आधाराने कित्येक स्त्रियांना स्वत:ला जिवंत जाळून घेण्यास प्रवृत्त केले. बहुपत्नीकत्वाची वा एकापेक्षा जास्त बायका ठेवण्याच्या प्रथेमुळे नवरा बायकोच्या प्रेमात ताण निर्माण झाला आणि नवऱ्याचा बायकोवरील दबाव वाढला. परिणामी दैनंदिन जीवनामध्ये नवरे बायकांशी क्रूरतेने वागू लागले.

हिंदू कायदा आणि धर्माने देखील पुरुषांची बाजू घेतली आणि स्त्रियांशी पक्षपाती व्यवहार केला. कायद्याने पुरुषांना शय्यासोबतीण ठेवण्यास वा वेश्येकडे जाण्यास आडकाठी केल नाही आणि दुसरीकडे मात्र स्त्रियांना घटस्फोट घेण्यापासून परावृत्त केले व विधवांना पुनर्विवाह करण्यास मनाई केली. कायद्याने सुद्धा पळविले गेलेल्या व जबरदस्ती लग्न लावण्यात आलेल्या स्त्रियांना मदत केली नाही. स्त्रियांनी त्यांच्या नवऱ्याच्या आज्ञेचे पूर्ण पालन केले पाहिजे अशी अपेक्षा केली गेली. या काळातील स्त्रियांना त्यांच्या वडिलोपार्जित मालमत्तेस कोणी वारस नसतानासुद्धा मालमत्तेचा वाटा दिला गेला नाही आणि त्यांना फक्त पतीच्या मालमत्तेतून त्यांच्या उदरनिर्वाहासाठीचा खर्च मिळण्याची सोय असे. असे सांगितले जाते की या काळातील स्त्रियांना त्यांच्या पालकांकडून लग्नामध्ये दिले गेलेले दागिने, भेटवस्तू यांवर पूर्ण हक्क सांगता येत असे ज्यास स्त्रीधन म्हटले जाते.

स्त्रियांनी या काळात राजकारण आणि प्रशासनात बजावलेली भूमिका लक्षात घेतल्याशिवाय या काळातील स्त्रियांच्या स्थितीविषयी अभ्यासपूर्ण होऊ शकत नाही. श्रीमंत आणि राजघराण्यातील स्त्रियांनी त्यांच्या वडिलांची, नवऱ्याची आणि मुलाचे प्रशासकीय कारभार सांभळले. त्यांनी रणांगणावर लढाया देखील लढल्या आणि त्यांच्या नवऱ्याच्या अनुपस्थितीत दैनंदिन आर्थिक व्यवहार ही केले. बहुतेक सर्व परदेशी पर्यटकही सांगतात की मराठा स्त्रिया पडदा पाळीत नसत आणि हिंदूस्थानातील इतर स्त्रियांमध्ये नसणारा धीटपणा मध्यम स्तरातील स्त्रियांना सर्वात जास्त त्रास भोगावा लागत असे व त्यावेळेस कष्टकरी स्त्रियांना पुरुषांप्रमाणेच कठीण श्रम करावे लागत असे. साहजिकच कष्टकरी वर्गातील स्त्रियांची स्थी पुरुषांच्या जवळपास समान होती.

६.१२ प्रश्न

१) मराठा काळातील गुलामगिरीची स्थितीचे परीक्षण करा.

२) मराठा आधिपत्याखालील गुलामगिरी आणि वेठबिगारीच्या उदयास कारणीभूत असणाऱ्या घटकांचा आढावा घ्या.

३) मराठा काळातील स्त्रियांच्या स्थितीचे परीक्षण करा.

४) मराठा अधिपत्या खालील काळात स्त्रियांची स्थितीवर परिणाम करणारे घटक थोडक्यात स्पष्ट करा.

५) टीपा लिहा –

१) गुलामांचा व्यापार, २) पुरुष गुलामगिरी

३) स्त्री गुलामगिरी, ४) मोनुमिशन

६.१३ संदर्भ

१) जोशी एस. एन, मराठे कालीन समाजदर्शन, पूना, ए व्ही गृह प्रकाशन, १९६०.

२) काळे डी. व्ही., सोशल लाईफ इन प्रि-ब्रिटिश, महाराष्ट्र.

३) बी.जी. गोखले, पूना इन द एटीन्थ सेंच्यूरी.

४) आर. व्ही. नाडकर्णी, द राईज ॲण्ड कॉल ॲक्ट मराठा एम्पायर

५) भावे, पेशवेकालीन महाराष्ट्र

६) अट्टेकर, हिंदू संस्कृतीत स्त्रियांची स्थिती

७) थॉमस, इंडियन वुमेन थ्रू द अेजेस

८) सुधा देसाई- पेशव्यांच्या अधिपत्या खालील सामाजिक जीवन

munotes.in

७

मराठ्यांचे प्रशासन :
केंद्रिय व प्रांतिय प्रशासन

घटक रचना:

७.० उद्दिष्टे

७.१ प्रस्तावना

७.२ राजपद

७.३ अष्टप्रधान मंडळ

७.४ अष्टप्रधान मंडळाचे कार्य

७.५ सचिव

७.६ अठरा कारखाने

७.७ बारा महल

७.८ प्रांत व जिल्हे

७.९ देशमुख व देशपांडे

७.१० कमाविसदार व मामलेदार

७.११ दरखदार

७.१२ पाटील व कुलकर्णी

७.१३ सारांश

७.१४ प्रश्न

७.१५ संदर्भ

munotes.in

७.० उद्दिष्ट्ये

- मराठ्यांच्या कालखंडातील राजपदाची प्रशासनातील भूमिका समजून घेणे.
- मराठ्यांच्या प्रशासनातील अष्टप्रधान मंडळाचे कार्य समजून घेणे.
- मराठ्यांच्या प्रशासनातील प्रांत व जिल्ह्यांची प्रशासकीय रचना जाणून घेणे.
- मराठ्यांच्या प्रशासनातील देशमुख व देशपांडेची भूमिका जाणून घेणे.
- मराठ्यांच्या प्रशासनातील कमाविसदार व मामलेदाराची भूमिका जाणून घेणे.
- मराठ्यांच्या प्रशासनातील दरखदाराची भूमिका जाणून घेणे.

- मराठ्यांच्या प्रशासनातील विविध अधिकार पदांचे महत्व समजून घेणे.

७.१ प्रस्तावना

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक समजले जाणारे छत्रपती शिवाजी महाराज उत्कृष्ठ राजकर्ते होते. त्याच बरोबर ते उत्कृष्ठ प्रशासन निर्मातेही होते. त्यांना माहित होते की साम्राज्य उभारण्यासाठी, टिकविण्यासाठी व विस्तारीत करण्यासाठी उत्तम प्रशासनाची गरज असते. ही गरज लक्षात घेऊनच त्यांनी आपली उत्तम प्रतीची प्रशासन व्यवस्था निर्माण केली होती. म्हणूनच मध्ययुगीन भारताच्या इतिहासात जे उत्कृष्ट राज्यकर्ते व प्रशासक होऊन गेले त्यामध्ये शिवाजी महाराजांच्या आवर्जून उल्लेख केला जातो.

प्रस्तृत प्रकरणात आपण शिवाजी महाराजांच्या कारकिर्दी पासुन मराठा सत्तेच्या अस्तापर्यंत मराठ्यांची केंद्रिय व मुलकी प्रशासन व्यवस्था कशी होती या बाबतची माहिती पहाणार आहोत. या माहितीमध्ये मराठ्यांच्या प्रशासनातील राजपद, अष्टप्रधान मंडळ, अधिकारी आदी बाबतची माहिती असणार आहे.

७.२ राजपद

मराठ्यांच्या केंद्रिय प्रशासनाती सर्वोच्य पद म्हणजे राजपद होय. या पदाच्या निर्मितीवर हिंदूग्रंथ, श्रृती, स्मृती, शुक्रनीचा प्रभाव जाणवतो. तसेच चाणक्यनीतीचा प्रभाव जाणवतो. शुक्राचार्याने आपल्या शुक्रनीती या ग्रंथात राजाची वैशिष्ट्ये सांगितली आहेत. "स्वधर्माचे पालन करणारा, प्रजेचे संरक्षण करणारा, शत्रुला जिंकणारा, दानधर्म करणारा, क्षमाशील, शूर, निःस्पृही व वैराग्यशील राजा शेवटी मोक्षाला जातो" ही सर्व वैशिष्ट्य आपणास शिवाजी महाराजांमध्ये दिसतात. यावरुन ासे दिसते की मराठ्यांच्या राजपदावर शुक्रनीतीचा जास्त प्रभाव जाणवतो. शिवकाळ व पेशवेकाळ अशा दोन्ही कारकिर्दीत हे राजपद टिकून होते. मात्र शिवकाळात जे राजपदाला महत्त्व होते ते महत्त्व पुढे पेशवेकाळात टिकले नाही. असे जरी असले तरी प्रशासकीय दृष्टीकोनातून या पदाबाबतची माहिती जाणणे आवश्यक आहे.

अ) सत्तेच्या केंद्रबिंदू :

मराठ्यांच्या प्रशासनातील राजा हा राजयंत्रणेचा केंद्रबिंदू होता. राजाच्या नियंत्रणाखाली अष्ट प्रधान मंडळ, १८ कारखाने, १२ महल, सर्व सचिव, अधिकारी, सैन्य, आरमार होते. प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करणे, बढत्या करणे व अधिकाऱ्यांना बडतर्फ करण्याचे अधिकार राजाला असत. मराठा साम्राज्यात अधिकाऱ्यांना स्वतंत्र वागण्याची परवानगी होती. परंतू हे अधिकारी राजालाच जबाबदार असत.

ब) राजाची कर्तव्य :

प्रशासनातील राजा हा सर्वोच्यपदी असल्याने राजाला वेगवेगळी कर्तव्ये बजावावी लागत होती. ही कर्तव्य खाली नमुद करण्यात आली आहेत.

१. साम्राज्याचे संरक्षण करणे.

२. साम्राज्यात शांतता व सुव्यवस्था निर्माण करणे.

३. साम्राज्यातील प्रजेचे पालनपोषण करणे.

४. साम्राज्यातील भेदभावना पायबंद घालणे.

५. साम्राज्यातील समाजव्यवस्थेतील दुर्गुणांना पायबंद घालणे.

६. साम्राज्यातील अधिकाऱ्यांच्या दुर्गुणांना पायबंद घालणे.

७. साम्राज्याबद्दल लोकांच्या मनामध्ये निष्ठा निर्माण करणे.

८. साम्राज्यातील लोकांना न्या मिळवून देणे.

शिवकाळात शिवाजी महाराजांनी राजपदाला न्यायभुमिकेतून श्रेष्ठत्वाला नेले. पुढे त्यांच्या मृत्युनंत संभाजी महाराज, राजाराम महाराज यांच्या कालखंडात निर्माण झालेल्या अंतर्गत परिस्थितीमुळे या पदाचे महत्त्व कमी झाले. शाहू महाराजांच्या कालखंडात पेशवाईच्या उदयाने व उत्कर्षाने या पदाचे अस्तित्व पुढे संपुष्टात आले. असे जरी असले तरी सत्तेचे केंद्रस्थान म्हणून या पदाकडे या कालखंडात आदराने पाहिले जात होते.

७.३ अष्टप्रधान मंडळ

मराठ्यांच्या प्रशासनातील अत्यंत महत्त्वपूर्ण घटक म्हणून अष्टप्रधान मंडळाकडे पाहिले जाते. साम्राज्याचा राज्यकारभार व्यवस्थीत चालावा म्हणून शिवाजी महाराजानी अष्टप्रधान मंडळाची नियुक्ती केली होती. हे अष्टप्रधान मंडळ पुढे मराठा सत्तेच्या विकासापासून उत्कर्षापर्यंत व पेशवाईच्या अस्तापर्यंत सुरु होते. मात्र बदलत्या परिस्थितीला अनुसरुन यात बदल होत गेले. अष्टप्रधान मंडळाची निर्मिती शिवाजी महाराजाने कोणत्या प्रेरणेतून घेतली या बाबत इतिहासकारात मतभेद आहेत. ही प्रेरणा रामायण, महाभारत, मनुस्मृती, व शुक्रनीतीपासून घेतली असावी असे काही इतिहासकारांचे मत आहे.

इतिहासकार शेजवलकर, वा. कृ. भावे यांच्या मते, शिवाजी महाराजांनी ही प्रेरणा शुक्रनीतीतून उचलली असावी. परंतू अगदी अलीकडचे संशोधक लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या मते, शिवाजी महाराजांनी आपल्या मंत्रिमंडळाची निर्मिती रामायण, महाभारत या काव्यग्रंथावरुनच केली आहे.

शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळाची निर्मिती एकाच वेळी झालेली नाही असे मत सर जदुनाथ सरकार यांनी व्यक्त केले आहे. याचा आरंभ शहाजीराजे भोसल्यांनी केला. शिवाजी १२ वर्षाचे असताना त्यांची रवानगी पुण्याच्या जहागिरीसाठी केली. त्यावेळीस त्यांच्या मदतीसाठी दादोजी कोडदेवांच्यासह पेशवे, मुजुमदार, डबीर व सबनीस असे चार अधिकारी दिले. दादोजी कोडंदेवांचा मृत्यु झाल्याने नंतर शिवाजी महाराजाने सरनोबत हे पद निर्माण केले. जावळी विजयानंतर शिवाजी महाराजांनी सुरनिस व वाकनिस अशी दोन पदे निर्माण केली. व १६६७ मध्ये मुख्य न्यायाधीशाचे पद निर्माण केले. अशी ही शिवाजी महाराजांची मंत्रीमंडळाची प्रक्रिया राज्यभिषेकाच्या वेळी पूर्ण झाली.

शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळात पुढील पदांचा व त्या पदांवर काम करणाऱ्या व्यक्तींचा समावेश होता.

अ. न.	पद	प्रधानाचे नाव
१.	मुख्य प्रधान (पेशवा)	मोरो त्रिंबक (मोरोपंत)
२.	अमात्य (मुजुमदार)	नारो नीळकंठ व रामचंद्र निळकंठ
३.	सेनापती (सरलष्कर)	हंबीरराव मोहिते
४.	सचिव (सुरनिस)	अण्णाजी दत्तो
७.	मंत्री (वाकनिस)	दत्ताजी त्रिंबक
६.	पंडितराव	रघुनाथपंत
७.	सुमंत (डबीर)	रामचंद्र त्रिंबक
८.	न्यायाधीश	निराजी रावजी

७.४ अष्टप्रधान मंडळाचे कार्य

मराठा साम्राज्याच्या प्रशासनाची घडी सुव्यवस्थीत बसावी या उद्देशाने शिवाजी महाराजांनी अष्टप्रधान मंडळाची निर्मिती केली होती. वरील मुद्यात आपण अष्टप्रधान मंडळाची निर्मिती कशी झाली तसेच या मंडळातील पदे व या पदांवर काम करणाऱ्या व्यक्तींची नावे या बाबतची माहिती पाहिली आहे. या मुद्यात आपण अष्टप्रधान मंडळाच्या कार्यपद्धतीचा आढावा घेणार आहोत.

सातारकर छत्रपतींच्या दप्तरखान्यात अष्टप्रधान मंडळाची कामे कोणती या विषयी माहिती सांगणारे एक पत्र सापडले आहे. हे पत्र इतिहास संशोधक का. ना. साने यांनी सनदापत्रे या पुस्तकात प्रकाशित केले आहे. तसेच मल्हार रामराव, चिटणीस यांच्या 'शककर्ते श्री छत्रपती महाराज यांचे सप्तप्रकरणात्मक चरित्र' या बखरीतही अष्टप्रधान मंडळाची कामे व कर्तव्य सांगितली आहेत. या दोन साधनाद्वारे आपण अष्टप्रधान मंडळाच्या कार्याचा आढावा घेणार आहोत.

१. मुख्य प्रधान (पेशवा) :

मराठ्यांच्या अष्टप्रधान मंडळातील सर्वोच्य मंत्रीपद म्हणून मुख्य प्रधान पदाला महत्त्व होते. हे पद शिवाजी महाराजांच्या राजवटीत मोरो त्रिंबकांकडे होते. शिवाजी महाराजानंतर मराठा साम्राज्यावर यांचाच अधिकार चालत असे. या पदावर काम करणाऱ्या व्यक्तीला पुढील प्रकाचे कार्य करावे लागत असे.

- मुलकी व लष्करी खात्यावर देखरेख ठेवणे.
- राज्यकारभार सुव्यवस्थीतपणे चालला आहे किंवा नाही हे पहाणे.
- राज्यात शांतता व सुव्यवस्था राखणे.
- प्रसंगी मोहिमा काढून युद्ध चालविणे.

- सरकारी कागदपत्रांवर आवश्यकतेनुसार सह्या करणे.
- सरकारी कागदपत्रे तपासून या कागदपत्रांवर शिक्के मारणे.
- राज अज्ञांचे पालन करणे.
- राजाच्या गैरहजेरीत त्यांचे प्रतिनिधीत्व करणे.
- निरनिराळ्या खात्यांच्या समन्वयातून राज्यकारभारात ऐक्य वाढविणे.

२. अमात्य (मुजुमदार) :

मराठ्यांच्या अष्टप्रधान मंडळातील अर्थ खात्याशी संबधीत हे पद होते. शिवाजी महाराजांच्या राजवटीत या पदावर नारो निळकंठ व रामचंद्र निळकंठ संयुक्तरीत्या काम करत होते. अष्टप्रधान मंडळातील या विभागावर काम करणाऱ्या व्यक्ताला अर्थमत्र्यांचा दर्जा होता. या पदावर काम करणाऱ्या व्यक्तीला पुढील प्रकारचे कार्य करावे लागत होते.

- राज्यातील सर्व जमा-खर्चाच्या व्यवहारांवर देखरेख ठेवणे.
- राज्यातील लष्करी व मुलकी खात्यांचे हिशेब पाहणे.
- राज्यातील सर्व किल्ल्यांचे हिशेब पहाणे.
- सर्व प्रांतातील जमा-खर्चाचे तक्ते पहाणे.
- राज्यातील सर्व दप्तरदार व फडणीस यांच्यावर देखरेख ठेवणे.
- राज्यातील सर्व दप्तरदार व फडणीसांकडून आलेल्या कागदपत्रांवर सह्या करणे.
- प्रसंगी गरज पडल्यास युद्ध मोहिमांवर जाणे.

३. सेनापती (सरलष्कर) :

मराठ्यांच्या अष्टप्रधान मंडळातील लष्कर खात्याशी संबधीत हे पद होते. शिवाजी महाराजांच्या राजवटीत या पदावर हंबीरराव मोहिते काम करत होते. या पदावर काम करणाऱ्या व्यक्तीला सेनापती पदाचा दर्जा होता. या पदावर काम करणाऱ्या व्यक्तीला पुढील प्रकारचे कार्य करावे लागत होते.

- सैनिकाची चांगल्या प्रकारची व्यवस्था ठेवणे.
- राजा आज्ञेनुसार युद्धमोहिमा काढून त्यांचे नेतृत्त्व करणे.
- युद्धांत जिंकलेल्या नवीन प्रदेशांची व्यवस्था ठेवणे.
- सेनेचे रक्षण करणे.
- सेनेच्या अडीअडचणी छत्रपतींच्या कानावर घालणे.
- सेनेच्या वेतन व्यवस्थेकडे लक्ष देवून त्यांचे वेतन वेळेवर होते किंवा नाही हे पहाणे.
- बहादुर, पराक्रमी सैनिकांची नावे छत्रपती पर्यंत पोहचवून त्यांचा गौरव करणे.
- युद्धातील सर्व लुटीचा (हिशेब राजाला देणे).

muniotes.in

- शत्रुपक्षाच्या हाचलालीवर नजर ठेवणे.

४. सचिव (सुरनिस) :

मराठ्यांच्या अष्टप्रधान मंडळातील पत्रव्यवहार खात्याशी संबधीत हे पद होते. शिवाजी महाराजांच्या राजवटीत या पदावर अण्णाजी दत्तो काम करत होते. या पदावर काम करणाऱ्या व्यक्तीला सचिव पदाचा दर्जा होता. या पदावर काम करणाऱ्या व्यक्तीला पुढील प्रकारचे कार्य करावे लागत होते.

- सरकारी दप्तरावर देखरेख ठेवणे.
- सरकारी खात्याच्या दप्तरांची व्यवस्था नीट व शिस्तवार ठेवणे.
- साम्राज्यांतर्गत व साम्राज्यबाह्य येणाऱ्या व जाणाऱ्या पत्रांची, खलितांची तपासणी करणे, त्यांचा आशय समजून घेणे.
- पत्रे, खलिते, हवालपत्रे, इनामपत्रे, सनदा इत्यादींच्या नोंदी ठेवणे.
- सरकारी कागदपत्रांवर सह्या करणे.
- महाल परगण्याचा हिशेब तपासून त्यावर संमत असे लिहणे.
- प्रसंगी युद्धात सेनेचे नेतृत्त्व करणे.

५. मंत्री (वाकनीस) :

मराठ्यांच्या अष्टप्रधान मंडळातील हे एक स्वतंत्र पद असून या पदाचा दर्जा राजाचा खाजगी चिटणीस असा होता. शिवाजी महाराजांच्या राजवटीत या पदावर दत्ताजी त्रिंबक काम करत होते. या पदावर काम करणाऱ्या व्यक्तीला पुढील प्रकारचे कार्य करावे लागत होते.

- राज्याच्या मुलकी व लष्करी कामावर देखरेख ठेवणे.
- राजाच्या खाजगी दप्तरावर व पत्रव्यवहारावर देखरेख ठेवणे.
- राजाची दैनंदिन कृत्य व राज्यात होणाऱ्या घडामोडींच्या नोंदी ठेवणे.
- गुप्तहेर संघटनावर नजर ठेवणे.
- राजाचा गुप्त पत्रव्यवहार सांभाळणे.
- राजास भेटण्यास येणाऱ्या लोकांनवर नजर ठेवणे.
- राजाची रोजनिशी लिहिणे.
- राजाच्या आमंत्रित पाहुण्यांवर देखरेख ठेवणे.
- राजाला अन्नातून विषबाधा न होईल याची खबरदारी घेणे.

६. पंडितराव :

munotes.in

मराठ्यांच्या अष्टप्रधान मंडळातील धार्मिक खात्याशी संबधीत हे पद होते. शिवाजी महाराजांच्या राजवटीत या पदावर रघुनाथपंत काम करत होते. या पदावर काम करणाऱ्या व्यक्तीला धर्म मंत्र्याचा दर्जा होता. या पदावर काम करणाऱ्या व्यक्तीला पुढील प्रकारचे कार्य करावे लागत होते.

- धार्मिक बाबतीत निर्णय देणे.
- विद्वानांचा साधुसंतांचा आदर-सत्कार करणे.
- धर्मशास्त्रानुसार न्याय देणे.
- सरकारतर्फे होणारे विधी व दानधर्म वेळच्या वेळी पार पाडणे.
- गुन्हेगारानी धर्मबाह्य आचरण केल्यास अथवा अत्याचार केल्यास त्यास शासन करणे.
- फौजदारी खटल्यांचा न्याय निवाडा धर्मशास्त्राप्रमाणे होतो किंवा नाही हे पाहणे.
- निरनिराळ्या जाती-जमातीमधील भांडणे सोडविण्यासाठी प्रयत्न करणे.
- धर्म, रुढी, शास्त्र यांचे अर्थ समाजातील लोकांना समजावून सांगणे.

७. सुमंत (डबीर) :

मराठ्यांच्या अष्टप्रधान मंडळातील परराष्ट्र खात्याशी संबधीत हे पद होते. शिवाजी महाराजांच्या राजवटीत या पदावर रामचंद्र त्रिंबक काम करत होते. या पदावर काम करणाऱ्या व्यक्तीला परराष्ट्र मंत्र्यांचा दर्जा होता. या पदावर काम करणाऱ्या व्यक्तीला पुढील प्रकारचे कार्य करावे लागत होते.

- परराष्ट्रीय व्यवहारांची देखरेख ठेवणे.
- परराज्यांबरोबर संबध ठेवणे.
- परराज्यातील दूतांच्या व्यवस्थेची जबाबदारी सांभाळणे.
- आपल्या राज्यातील दूतांची परराज्यात व्यवस्था कशी होईल या बाबत परराज्यांबरोबर सल्लामसलत करणे व त्यांची व्यवस्था करुन देणे.
- आपल्या साम्राज्याची इभ्रत व दर्जा वाढविणे.
- आपल्या साम्राज्यासंबधीच्या परराज्यातील बातम्या जमा करणे.
- पर राज्याबरोबर युद्ध करावे किंवा नको याबाबत राजाला योग्य तो सल्ला देणे.

८. न्यायाधीश :

मराठ्यांच्या अष्टप्रधान मंडळातील न्याय खात्याशी संबधीत हे पद होते. शिवाजी महाराजांच्या राजवटीत या पदावर निराजी रावजी काम करत होते. या पदावर काम करणाऱ्या व्यक्तीला कायदे मंत्र्यांचा दर्जा होता. या पदावर काम करणाऱ्या व्यक्तीला पुढील प्रकारचे कार्य करावे लागत होते.

- दिवाणी व फौजदारी न्यायदान योग्य पद्धतीने होते किंवा नाही हे पहाणे.

muinotes.in

- गोतसभा अथवा सरकारी अधिकाऱ्यांनी केलेला न्याय निवाडा योग्य आहे किंवा नाही हे पहाणे.
- जमीनीचे हक्क आपल्या समंतीने, सहीने जाहिर झाले आहेत किंवा नाही हे तपासणे.
- ग्रामाध्याक्षाचे हक्क योग्य आहेत किंवा नाहीत हे तपासणे.

शिवाजी महाराजांनी आपल्या राजवटीत जे अष्टप्रधान मंडळ निर्माण केले होते. कार्यक्षम होते. गुणवत्तेवर आधारीत होते. परिणामी ते वैशिष्ट्यपूर्ण बनले होते. या मंडळातील पदे त्यांनी कार्यक्षमतेचा विचार करुन बहाल केली होती. प्रधानांना जहागिरी ऐवजी रोख वेतन दिले होते. पंडितराव व न्यायाधीश वगळता सर्व प्रधानांकडे लष्करी जबाबदारी दिली होती. अष्टप्रधान मंडळाकडे संयुक्त जबाबदारी सोपविली होती. म्हणूनच शिवाजी महाराजांच्या राजवटीतील एक कार्यक्षम मंत्रीमंडळ म्हणून अष्टप्रधान मंडळाकडे पाहिले जाते.

संभाजी महाराजांच्या राजवटीतही अष्टप्रधान मंडळ प्रचलीत होते. मात्र या मंडळात 'छंदोगामत्य' या नवव्या मंत्र्यांची भर पडली. या मंत्र्याला संभाजी महाराजांच्या राजवटीत महत्त्व प्राप्त झाले. इतर आठ प्रधान या पदापुढे निष्प्रभ पडले. संभाजी महाराजांच्या जास्त विश्वास या पदावर होता. शिवकाळात ज्या प्रमाणे मुख्य प्रधानपदाला महत्त्व होते. तशाच प्रकारचे महत्त्व संभाजी महाराजांच्या राजवटीत 'छंदोगामत्य' पदाला आले.

राजाराम महाराजांच्या कालखंडात अष्टप्रधान मंडळी कार्यरत होते. मात्र अष्टप्रधान मंडळात समतोल नव्हता, मंडळात शिवाजी महाराजांना अपेक्षित नसणारी जाहगिरी पद्धत सुरु झाली.

पेशवेकाळात अष्टप्रधान मंडळातील पदे वंशपरंपरेने भरली जावू लागली. व मुख्य पेशवेपदाचे महत्त्व वाढत गेले. व पेशवेपदाच्या सभोवताली सत्तेची पार्श्वभूमी तयार झाली. मराठ्यांचे राजपद दुर्बळ झाले. अष्टप्रधान मंडळातील इतर मंत्री निष्प्रभ झाले व पेशव्यांच्या हाती सत्तेचे केंद्रीकरण झाले.

७.५ सचिव

मराठ्यांच्या केंद्रिय प्रशासनातील मंत्रालय हा एक महत्त्वपूर्ण भाग होता. शिवकाळात मंत्रालयाला अष्टप्रधान मंडळाची कचेरी असेही म्हटले जात असे. या मंत्रालयामध्ये काम करणाऱ्या अधिकाऱ्याला सचिव असे म्हटले जात होते. डॉ. सेन म्हणतात, "मंत्रीमंडळापेक्षा बाहेरच परंतू मंत्र्यापेक्षा कोणत्याही प्रकारे कनिष्ठ न समजले जाणारे अधिकारी म्हणजे सचिव होय." मंत्रालयात या कालखंडात एकुण २१ सचिव कार्यरत होते. या सचिवांमध्ये दिवाण, हिशेबनीस, फडणीस, दप्तरदार, कारखानीस, चिटणीस, खजिनदार, पोतनीस यांचा समावेश होता.

या सर्व सचिवांमध्ये चिटणीसाचे महत्त्व जास्त होते. कारण चिटणीस हा राजाचा खाजगी कारकून म्हणून काम करत असे. शिवराज्यभिषेकाच्या वेळी बाळाजी आवजी हा शिवाजी महाराजांचा चिटणीस होता.

चिटणीसा बाबत मल्हार रामराव चिटणीस म्हणतो, "चिटणीस हा अधिकारी पत्रलेखकच होता. राजाचे मनोगत जाणून योग्य मजकूर लिहिण्याचे, तसेच पत्रांना योग्य भाषेत उत्तर लिहिण्याचे काम तो करत असे."

कशीनाथ नारायण साने यांनी प्रकाशित केलेल्या 'पत्रे याद्या वगैरे' या ग्रंथातील संदर्भानुसार चिटणीसाला पुढील प्रकारची कामे करावी लागत होती.

- सरकारी पत्रव्यवहार सांभाळणे.
- पर राज्यातून येणाऱ्या पत्रांना उत्तरे लिहिणे.
- सनदा, आज्ञापत्रे यांचे नियमानुसार लिखान करणे.
- सनदा, पत्रे, आज्ञापत्रे यावर राजाच्या सह्या घेवून मुद्रा करुन स्वत: सही करणे व ती ज्या ठिकाणी पाठवावयाची आहेत त्या ठिकाणी पाठवणे.

सचिव म्हणून काम पहाणाऱ्या अधिकाऱ्यांचे हुद्दे व कामे पुढे स्पष्ट करण्यात आली आहेत.

अ.न.	**हुद्दा**		**कामे**
१.	फडणीस	-	मुजुमदाराचा व फडातील हिशेब ठेवणे.
२.	दप्तरदार	-	सरकारी दरबारातील सर्व पत्रव्यवहार व्यवस्थित व सुरक्षित ठेवणे.
३.	कारखानीस	-	कारखान्यांचा प्रमुख म्हणून काम पहाणे.
४.	खजिनदार	-	किल्ल्यांवरील खजिन्यांचे संरक्षण ठेवणे व हिशेब ठेवणे.
७.	पोतनीस	-	मुख्य खजिन्यांच्या जमा-खर्चाचा हिशेब ठेवणे. नाणी पाडणारा अधिकारी
६.	गडणीस	-	गडावरील अधिकाऱ्यांबरोबर पत्रव्यवहार करणे.
७.	पारसनीस	-	दिल्ली दरबाराबरोबर पत्रव्यवहार करणारा.

शिवकाळा प्रमाणेच पेशवेकाळातही मंत्रालय अस्तित्त्वात होते. मंत्रालयाला पेशवेकाळात हुजूर दप्तर असे म्हटले जात होते. या कालखंडात हुजूर दप्तरात २०० कारकून काम करत होते. हे कारकुन ज्या ठिकाणी काम करत होते. त्या ठिकाणाला 'फंड' असे म्हटले जात होते. मराठ्यांच्या राज्यकारभाराची सर्व कागदपत्रे या ठिकाणी काळजीपूर्वक जपून ठेवली जात असत. या कागदपत्रामध्ये महसूल व्यवस्थेची कागदपत्रे, अबकारी कागदपत्रे, सरंजामाबाबतची कागदपत्रे, इनामाची कागदपत्रे, खेडेगावातील अधिकाऱ्यांची कागदपत्रे, सार्वजनिक महसूलाची कागदपत्रे, सर्व प्रांतातील संभाव्य जमा-खर्चाची कागदपत्रे, या कागदपत्रांचा समावेश असे. पेशवेकाळात दोन प्रकारचे दप्तर प्रचलीत होते ते म्हणजे चालते दप्तर व बेरजी दप्तर होय. या मंत्रालयात सुद्धा सचिव कार्यरत होते. व दप्तरांचा कारभार या सचिवांमार्फत चालवला जात असे.

मराठ्यांच्या प्रशासन व्यवस्थेतील सचिव हे एक महत्त्वपूर्ण पद होते. मंत्रीमंडळातील मंत्र्या प्रमाणेच या पदाला महत्त्व होते. प्रशासकी कार्यातील या सचिवांची भूमिका ही महत्त्वाची होती. कारण यांचे सह-संबध प्रशासकीय कार्याबरोबर प्रत्यक्ष स्वरुपात येत असत.

७.६ आठरा कारखाने

मराठ्यांच्या नियंत्रणाखाली असणाऱ्या कारखाण्यांवर देखरेख करण्याची प्रशासकीय जबाबदारी ही अष्टप्रधान मंडळाची होती. असे जरी असले तरी मराठ्यांच्या नियंत्रणाखाली जे आठरा कारखाने होते त्या कारखान्यांवरील प्रमुख हा कारखानीस असे. डॉ. सेन यांनी या सर्व कारखानीसांची कामे काय होती हे निश्चित सांगता येणार नाही. असे म्हटले आहे. असे जरी असले तरी कारखान्याच्या प्रकारावरुन त्यांच्या स्वरुपाची कल्पना साधारणतठ येते. असे म्हटले आहे.

या कारखान्यांची नावे पुढे दिली आहेत.

१. खजिना -रोख रक्कम

२. जवाहिरखाना -हिरे ठेवणे.

३. अंबरखाना -धान्याचे कोठार

४. राखतखाना -दवाखाना

७. तोफखाना -तोफदल

६. दप्तरखाना -कागदपत्रे ठेवण्याचे ठिकाण

७. जिरातखाना -धान्य ठेवण्याचे ठिकाण

९. मदपाकखाना -स्वयंपाकगृह

१०. उष्टरखाना -उंटदल

११. नगारखाना - नगारे ठेवण्याचे ठिकाण

१२. तालीमखाना -व्यायामशाळा

१३. पीलखाना -हत्तीखाना

१४. फरासखाना -तंबुचे साहित्य ठेवण्याचे ठिकाण

१७. अबदारखाना -पेये ठेवण्याचे ठिकाण

१६. शिकारखाना -खेळ व मनोरंजनाची साधने ठेवण्याचे ठिकाण.

१७. दारुखाना -दारुगोळा ठेवण्याचे ठिकाण

१८. शहतखाना -मत्सालय

७.७ बारा महल

मराठ्यांने आपल्या राज्यकारभाराचे आठरा कारखाने व बारा महलामध्ये विभाजन केले होते. ज्या प्रमाणे कारखान्याच्या कारभाराची जबाबदारी कारखानीसवर देण्यात आली होती. तशी महाला बाबतची जबाबदारी कोणावर देण्यात आली होती याची खात्रीलायक माहिती नाही. मात्र राजाचे खाजगी नोकरच याचे प्रमुखपद सांभाळत होते असा संदर्भ आहे.

munotes.in

या बारा महलांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

१. पोते महल - (खजिना)

२. सौदागिर महल - (माल)

३. पालखी महल - (पालखी)

४. कोठी महल - (गोदाम)

७. इमारत महल - (बांधकाम)

६. वहिली महाल - (रथ)

७. पागा महल - (तबेला)

८. सेरी महल - (विनोदन गृह)

९. दारुनी महल - (अंत:पुर)

१०. भट्टी महल - (गोशाला)

११. टकसाळ महल - (नाणी पाडण्याचे ठिकाण)

१२. सबिना महल - (पहारेकरी राहण्याचे ठिकाण)

७.८ प्रांत व जिल्हे

मराठ्यांच्या प्रशासनामध्ये ज्याप्रमाणे केंद्रिय प्रशासन व्यवस्थेला महत्त्व होते. त्याच प्रमाणे प्रातीय प्रशासन व्यवस्थेला महत्त्व होते त्याच प्रमाणे प्रातीय प्रशासन व्यवस्थेला सुद्धा महत्त्व होते. प्रशासकीय गरज लक्षात घेवून स्वराज्याची विभागणी विविध प्रांतात करण्यात आली होती. मल्हार रामराव चिटणीस यांनी शिवाजी महाराज्यांच्या स्वराज्याचे एकूण चौदा प्रांत नमुद केले आहेत. रानडे यांनीही थोड्याफार फरकाने प्रांताचे चौदा भाग सांगितले आहेत. या प्रातांची माहिती पुढे सांगितली आहे.

१. प्रांत मावळ – मावळ, सासवड, जुन्नर खेड व १८ किल्ले.

२. प्रांत वाई - सातारा आणि कराड : सध्याच्या साताऱ्या जिल्ह्याचा पश्चिम भाग व १५ किल्ले.

३. प्रांत पन्हाळा – सध्याच्या कोल्हापूरचा भाग व १३ किल्ले.

४. प्रांत दक्षिण कोकण – रत्नागिरी जिल्ह्याचा काही प्रदेश व समुद्रातील जलदुर्ग आणि ५८ किल्ले.

munotes.in

५. प्रांत ठाणा – उत्तर कोकणचा भाग व १२ किल्ले.

६. प्रांत त्रिंबक व बागलाण – सध्याच्या नाशिक जिल्ह्याचा पश्चिम भाग आणि ६२ किल्ले.

७. प्रांत वनगड - धारवाड जिल्ह्याचा दक्षिणेचा प्रदेश व २२ किल्ले.

८. प्रांत बिदनूर, कोल्हापूर, श्रीरंगपट्टम – पूर्वीच्या म्हैसूर प्रांतातील प्रदेश व १८ किल्ले.

९. प्रांत कर्नाटक – मद्रास राज्यातील कृष्णेच्या दक्षिणेकडील प्रदेश व १८ किल्ले.

१०. प्रांत वेलोरे – हल्लीच्या अर्काट जिल्ह्यातील प्रदेश व २५ किल्ले.

११. प्रांत तजावर – फक्त ६ किल्ले.

प्रांत प्रमुखास 'सुभेदार' अथवा 'देशाधिकारी' असे म्हटले जात होते. सुभेदाराच्या मदतीस कारकून व मजुमदार असत. सुभ्याच्या हिशेबाची जबाबदारी मुजुमदाराकडे असे. सुभ्याची विभागणी महालात करत. साधारणत: दोन महाल मिळून सुभा तयार होत असे. प्रांतांच्या विभागीय कचेरीस 'प्रांत राजमंडळ' असे म्हटले जात होते. राजमंडळाचे काही प्रधान हे मध्यवर्ती सत्तेचे प्रमुख आणि विभागीय कारभाराचे प्रमुख अशा दुहेरी कक्षेत कार्य करत होते.

७.९ देशमुख व देशपांडे

मराठ्यांच्या प्रांतिक प्रशासनातील हे दोन महत्त्वपूर्ण अधिकारी. शिवकाळात जरी प्रशासनात या अधिकाऱ्यांना स्थान नसले तरी शिवपूर्वकाळ व पेशवाईच्या कालखंडामध्ये या अधिकाऱ्यांना प्रांतिक प्रशासनात महत्त्वाचे स्थान होते. देशमुख व देशपांड्यांना जमिनदार असे म्हणत. या दोन्ही अधिकाऱ्यांचे प्रांताप्रमाणेच खेडेगावातही नियंत्रण चालत असे. पेशवेकाळात तर हे अधिकारी सामान्य रयतेचे मित्र व हितकर्ते म्हणून ओळखले जावू लागले. देशमुख व देशपांड्यांना पुढील प्रकारचे हक्क होते.

१. प्रत्येक गावातील अबकारी उत्पन्नापैकी १०० पैकी २ रुपये देशमुखांना व १ रुपया देशपांड्यांना द्यावा.

२. सरकारातून येणारा शिरपाव प्रथम देशमुखाना व नंतर देशपांड्यांना द्यावा.

३. वतनाच्या कागदपत्रावर प्रथम देशमुखांनी व नंतर देशपांड्यांनी सही करावी.

४. सरकारी अधिकाऱ्यांनी पहिल्यांदा देशमुखाना भेटावे व नंतर देशपांड्यांना भेटावे.

५. सरकारकडून व इतरांकडून येणारी मानाची पत्रे प्रथम देशमुखाना व नंतर देशपांड्यांना द्यावीत.

६. कसब्याच्या ठिकाणी जर जागा असेल तर देशमुखाना घर बांधण्यास हरकत नाही.

७. पूर्वापार परंपरेप्रमाणे देशमुख व देशपांड्यांना भाजीपाला द्यावा.

८. जिराईत व बागाईत इनाम हे पूर्वीप्रमाणेच दोघांकडे चालत रहावे.

९. सणासुदीला पूर्वीप्रमाणेच जळणफाटा दोघाणां देण्यात यावा.

१०. संक्रातीच्या वेळी प्रत्येक खेड्यातून तीळ दोघांना देण्यात यावेत.

११. धनगराकडून प्रत्येक खेड्यातून वर्षाला एक कांबळे प्रत्येकी द्यावे.

१२. प्रत्येक खेड्यातून प्रत्येक वर्षी दोघांनाही चर्मकारांनी पायपोशी द्यावी.

१३. शहादावल या मशिदीच्या साफसपाईबद्दल जो काही खर्च येईल त्यापैकी $\frac{२}{३}$ रक्कम ही देशमुखाला द्यावी व $\frac{१}{३}$ रक्कम ही देशपांड्यांना द्यावी.

१४. गावात जर एखादा संगितकार आला अथवा नर्तकी आली तर त्यांना प्रथम देशमुखानी पैसा द्यावा व नंतर देशपांड्यांनी द्यावा.

१५. या शिवाय प्रांतातील इतर बाबीपासून येणाऱ्या रक्कमेपेकी $\frac{२}{३}$ ही देशमुखांनी स्वतःसाठी ठेवून घ्यावी व $\frac{१}{३}$ रक्कम देशपांड्यांनी घ्यावी.

अ) देशमुखाची कामे :

- परगण्यातील जमीन लागवडीखाली आणणे.
- परगण्यात वार्षिक दौरे काढून रयतेची गाऱ्हाणी ऐकूण घेणे.
- परगण्यातील पडीक जमीन लागवडीखाली आणण्यासाठी प्रयत्न करणे.
- संकट समयी गावकऱ्यांच्या सारा माफीसाठी सरकारी दरबारी पयत्न करणे.
- परगण्याच्या रयतेच्या रक्षणासाठी प्रयत्न करणे.
- सरकारने सांगितलेला सारा नियमाप्रमाणे वसूल करणे.
- वतनदारांच्या मदतीने लावणी-संचणीची कामे पूर्ण करुन घेणे.

ब) देशपांडेची कामे :

- परगण्यातील कुलकर्ण्याच्या कामावर देखरेख ठेवणे.
- परगण्याचे हिशेब ठेवणे.
- परगण्याचे हिशेब तपासणे.

७.१० कमाविसदार व मामलेदार

मराठ्यांच्या प्रांतीय प्रशासनातील हे दोन महत्त्वाचे अधिकारी आहेत. मराठ्यांच्या परगण्यातील प्रतिनिधी म्हणून या दोन अधिकाऱ्यांकडे पाहिले जात असे. एल्फिन्स्टनच्या म्हणण्याप्रमाणे,

munotes.in

"मामलेदार हे प्रांतातील मोठ्या विभागावर तर कमाविसदार हे प्रांतातील लहान विभागावर काम करणारे मुख्य अधिकारी होते."

कमाविसदार :

मराठ्यांच्या प्रशासनात मुलकी अधिकाऱ्यात कमाविसदारांचा भरणा जास्त असे. त्यांच्या ताब्यात एक गाव कधी अनेक गावे तर कधी संपूर्ण परगणा असे. कमाविसदाराला त्याच्या ताब्यात असणाऱ्या प्रदेशाच्या उत्पन्नाच्या ४% मेहनताना मिळत असे. त्याला सालाना ८०० रुपये इतके वेतनही मिळते असे. कमाविसदार मामलेदाराच्या नियंत्रणाखाली काम करत असे. कमाविसदाराला पुढील प्रकारची कामे करावी लागत होती.

- जमीन महसूल विषय कामे करणे.
- परगण्यातील जमीन महसूलाचे उत्पन्न वाढविणे.
- रयतेच्या कल्याणाकडे लक्ष देणे.
- परगण्यातील प्रशासनातील विविध विभागांवर लक्ष पुरविणे.
- आपल्या विभागातील न्यायालयीन कामे पहाणे व ती पूर्ण करणे.
- पंचायतीच्या सदस्यांच्या नियुक्त्या करणे.

मामलेदार :

मराठ्यांच्या प्रशासनातील मुलकी अधिकाऱ्यामधील एक महत्त्वपूर्ण अधिकारी म्हणून मामलेदाराला महत्त्व होते. प्रामाणिकपणा व जबाबदारी लक्षात घेऊन मामलेदारांची नियुक्ती केली जात होती. पण ती कायमस्वरुपी नसे. कार्यक्षमता असेल तरच ही नियुक्ती कायम केली जात असे. मामलेदाराच्या हाताखाली कमाविसदार, मुजुमदार, फडणीस हे अधिकारी असत. मामलेदारास वार्षिक वेतन २००० रु असे. त्याला नेमणूकीची सनद दिली जात असे. त्या सनदेमध्ये त्याचे अधिकार व कामे दिली जात असत. मामलेदाराचे अधिकार व कामे पुढील प्रमाणे आहेत.

- सरकारकडून रयतेला मिळालेल्या जमीन महसूल विषयक हक्काचे संरक्षण करणे.
- जास्तीत जास्त जमीन लागवडीखाली आणणे.
- शेतकऱ्यांचे व पर्यायाने राज्याचे उत्पन्न वाढविणे.
- प्रांताच्या शेतीव्यवसायाला प्रोत्सहान देणे.
- शेतकऱ्यांना लागणाऱ्या कर्जाची व्यवस्था करणे.
- जमीन महसूल जमा करण्याच्या कामी मदत करणे.
- जमीन महसूल सरकार दरबारी जमा करणे.
- जमीन विक्री, गहाणवर या व्यवहारांकडे कायदेशीर प्रक्रीयेतून बंधने व हे व्यवहार योग्य तऱ्हेने होतात की नाही हे पहाणे.
- दिवाणी न्यायदानाचे खटले न्याय पद्धतीने सोडविणे.
- किल्ल्यांच्या व्यवस्थापनाकडे लक्ष देणे.

mubotes.in

- राज्यातील आरमाराकडे लक्ष देणे.
- जहाज चालकांना परवाना देणे.
- प्रांतात शांतता व सुव्यवस्था ठेवणे.

७.११ दरखदार

मराठ्यांच्या प्रांतीक प्रशासनातील दरखदार हा एक महत्त्वपूर्ण अधिकारी होता. प्रांतातील कमाविसदार व मामलेदार यांच्यावर अप्रत्यक्ष देखरेख ठेवण्यासाठी दरखदार या अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जात असे. प्रांताच्या सर्व विभागांवर देखरेख ठेवण्याचे काम त्याच्याकडे असे. त्यांची नियुक्ती सरकारकडून होत असे. त्यामुळे त्याला अधिकाराहुन दूर करण्याचा अधिकार कमाविसदार अथवा मामलेदाराला नसे. दरखदाराला पुढील प्रकारची कामे करावी लागत असत.

- कमाविसदाराच्या कामकाजाकडे लक्ष ठेवणे.
- मामलेदाराच्या कामकाजाकडे लक्ष ठेवणे.
- प्रांतातील सैन्य व्यवस्थेकडे लक्ष ठेवणे.
- प्रांतातील आरमराकडे लक्ष ठेवणे.

दरखदार हे सरकारी नोरकीतील अधिकारी असत. दिवाण, मुजुमदार, फडणीस, दप्तरदार, पोतनीस, पोतदार, सभासद, चिटणीस यांचीच नियुक्ती जास्त प्रमाणात या पदावर करण्यात येत असे. आपाआपल्या हुद्यानुसार ते संबधीथ विभागातील पाहणी करत असत व कागदपत्रांची पहाणी करुन प्रांताच्या कारभारातील सत्य-असत्यतेचा पडताळ करत असत. त्यामुळे या पदाला महत्त्व आले होते.

७.१२ पाटील व कुलकर्णी

मराठ्यांच्या ग्राम प्रशासनातील पाटील व कुलकर्णी हे दोन महत्त्वपूर्ण अधिकारी होते. १७ व्या शतकात खेडी ही स्वयंपूर्ण असल्याने या प्रशासनाला महत्त्व प्राप्त झाले होते.

पाटील :

ग्राम प्रशासनातिल पाटील हा गावाचा मुख्य सरकारी अधिकारी होता. त्यास या काळात ग्राम गोपाळ, गाव पाटील, मोकादम ही इतर नावे होती. तो गोतसभेचा प्रमुख असे. पाटलाला पुढील प्रकारची कामे करावी लागत असत.

- ग्रामातील लावणी – संचणी – उगवणीची प्रमुख कामे पहाणे.
- ग्रामसभेच्या सर्व बैठकांचे संचलन करणे.
- ग्रामातील न्याय निवाडा करणे.
- ग्रामात शांतता व सुव्यवस्थता प्रस्थापित करणे.
- ग्रामाचा सारा निश्चित करणे.
- ग्रामाचा सारा वसूल करणे.

munotes.in

कुलकर्णी :

ग्रामातील दुसरा महत्त्वपूर्ण अधिकारी म्हणजे कुलकर्णी. मात्र तो पाटलापेक्षा दुय्यम दर्जाचा मुलकी अधिकारी होता. तो पाटलास मदतनीस म्हणून कम पहात असे. त्याला पुढील प्रकारची कामे करावी लागत असत.

- ग्रामातील सर्व प्रकारच्या जमीनीच्या नोंदी ठेवणे.
- प्रत्येक व्यक्तींच्या नावावर असणाऱ्या जमीनीच्या महसूलाचा जमाखर्च ठेवणे.
- ग्रामाच्या लावणी-संचणीकडे लक्ष देणे.
- ग्रामाच्या जमीन महसूल जमा करण्यांच्या कामी पाटलाला मदत करणे.

आपली प्रगती तपासा

१. मराठ्यांच्या अष्टप्रधान मंडळाचे स्वरुप जाणून घ्या.

७.१३ सारांश

मराठ्यांच्या प्रशासन व्यवस्थेचा अभ्यास करताना सर्व प्रथम प्रशासन व्यवस्थेचे केंद्रिय, प्रातीय असे दोन महत्त्वपूर्ण भाग जाणून घेतले. या दोन भागातून आपण प्रशासनातील हुद्दे व अधिकारी या बाबतची माहिती पाहिली.

मराठ्यांच्या प्रशासनातील राजपद हे सर्व श्रेष्ठ पद कसे आहे, या पदाचे महत्त्व काय आहे. या पदाच्या जबाबदाऱ्या काय आहेत, या राजपदावर कोणत्या व्यक्तीने अधिराज्य गाजवले. व या पदाचे प्रशासनातील स्थान काय आहे. आदीबाबत माहिती पाहिली.

मराठ्यांच्या प्रशासनातील श्रेष्ठ मंत्रिमंडळ म्हणुन अष्टप्रधान मंडळाकडे पाहिले जाते. अष्टप्रधान मंडळातील मुख्य प्रधान, अमात्य, सेनापती, सचिव, मंत्री, पंडितराव, सुमंत, न्यायाधीश, याचे स्थान, महत्त्व व कामगिरी आदिबाबतची माहिती पाहिली.

सचिव हा प्रशासनातील मंत्रीमंडळाच्या तोडीचा अधिकारी आहे व त्याचे प्रशासनातील स्थान व कामगिरी महत्त्वाची आहे या बाबतची माहिती या पदावर काम करणाऱ्या व्यक्तींच्या कार्यातून पाहिली.

आठरा कारखाने व बारा मंहल हे सुद्धा मराठ्यांच्या प्रशासनाच्या सोयीच्या दृष्टीने कसे निर्माण करण्यात आले होते याची माहिती आपण नाव व प्रकारासह पाहिली.

प्रांत व जिल्हे हे प्रांतिक प्रशासनाचे अविभाज्य घटक कसे होते व या विभागावर काम करणाऱ्या अदिकाऱ्यांचा दर्जा काय होता व त्यांची कामगिरी काय होती आदिबाबतची माहिती पाहिली.

कमाविसदार, मामलेदार, पाटील, कुलकर्णी या प्रांतीय व ग्राम अधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्या व कामे याची माहितीही आपण शेवटच्या टप्प्यात त्यांच्या कार्यप्रणालीसह मांडली.

munotes.in

एकंदरीत या सर्व परिस्थितीचा विचार जर केला तर मराठ्यांने शुन्यातून साम्राज्य उभे केले होते. या साम्राज्याला त्यांनी टिकविण्यासाठी वाढविण्यासाठी व उभारी देण्यासाठी निर्माण केलेली प्रशासन व्यवस्था ही सुयोग्य होती.

७.१४ प्रश्न

१. शिवाजी महाराजांच्या मुलकी शासन व्यवस्थेच्या ठळक वैशिष्ट्यांची चर्चा करा.

२. शिवाजी महाराजांच्या मुलकी शासन व्यवस्थेच्या विविधांगाची चर्चा करा.

३. मराठ्यांच्या अष्टप्रधान मंडळ पद्धतीचे वर्णन करा. अष्टप्रधान मंडळाची प्रमुख वैशिष्ट्ये कोणती ?

७.१५ संदर्भ

१. वा. सी. बेंद्रे – श्री छत्रपती शिवाजी महाराज (उत्तरार्ध)

२. गो. स. सरदेसाई - पेशवे दप्तरातून निवडलेली कागदपत्रे.

३. डॉ. जयसिंगराव पवार – मराठी सत्तेचा उदय

४. डॉ. सोमनाथ रोडे – मराठ्यांच्या इतिहास

५. गायकवाड, सरदेसाई, थोरात, हनमाने – मराठेकालीन संस्था व विचार

६. प्रा. बी. एस. सावंत, प्रा. जाधव - 'मराठ्यांचा प्रशासकीय सामाजिक व आर्थिक इतिहास'

❖❖❖❖

munotes.in

८

मराठ्यांचे प्रशासन : लष्करी व न्यायिक प्रशासन

घटक रचना:

८.० उद्दिष्ट्ये

८.१ प्रस्तावना

८.२ मराठ्यांचे सैन्य विभाग

८.३ मराठ्यांच्या सैन्य व्यवस्थेतील इतर घटकांची माहिती

८.४ मराठ्यांच्या सैन्यव्यवस्थेतील सुधारणा

८.५ मराठ्यांचे किल्ले

८.६ मराठ्यांचे किल्ले प्रशासन

८.७ मराठ्यांच्या किल्ले दुरुस्ती वरील खर्च

८.८ मराठ्यांची आरमार व्यवस्था

८.९ केंद्रिय न्यायव्यवस्था

८.१० प्रांतिय न्यायव्यवस्था

८.११ स्थानिक न्यायसंस्था

८.१२ कायदे, पुरावे, न्यायपद्धती, दिव्य यासंबधी माहिती.

८.१३ गुन्हे व शिक्षा

८.१४ मराठ्यांच्या न्यायदान व्यवस्थेची वैशिष्ट्ये

८.१५ सारांश

८.१६ प्रश्न

८.१७ संदर्भ

८.० उद्दिष्ट्ये

- मराठ्यांच्या लष्करी विभागांची माहिती जाणून घेणे.
- मराठ्यांच्या लष्करी व्यवस्थेतील सुधारणा जाणून घेणे.
- मराठ्यांच्या आरमार व्यवस्थेची माहिती जाणून घेणे.
- मराठ्यांच्या केंद्रिय न्यायव्यवस्थेची माहिती जाणून घेणे.

munotes.in

- मराठ्यांच्या प्रांतीय न्यायव्यवस्थेची माहिती जाणून घेणे.
- मराठ्यांच्या न्यायदानाची वैशिष्ट्ये समजून घेणे.

८.१ प्रस्तावना

मराठ्यांच्या प्रशासन व्यवस्थेतील प्रशासकीय दृष्टीकोनातून महत्त्वपूर्ण ठरलेला दुसरा महत्त्वपूर्ण घटक म्हणजे लष्कर म्हणून या घटकाचे गांभीर्य लक्षात घेऊन शिवाजी महाराजांनी या घटकाचे प्रशासकीय दृष्टीकोनातून व्यवस्थापन करण्याच्या निर्णय घेतला यातून मराठ्यांच्या लष्करी प्रशासनाचा उगम झाला. शिवाजी महाराजानंतरही पुढे या प्रशासनाचा विकास होत गेला. मात्र पुढे या प्रशासनाची ध्येय, धोरणे बदलल्याने हे प्रशासन कमजोर बनले.

मराठ्यांच्या लष्करी प्रशासनाचा विचार करता हे प्रशासन खऱ्या अर्थाने तिन भागामध्ये विभागल्याचे दिसून येते हे तिन विभाग म्हणजे सैन्य विभाग, किल्ले विभाग व आरमार विभाग. या तिन्ही विभागाचे प्रशासकीय व्यवस्थापन करत असताना शिवाजी महाराजांनी सैन्य व्यवस्थेत, किल्ले व्यवस्थापनात असणाऱ्या चूकीच्या पद्धतीचा त्याग केला.

"मुलकी शासन व्यवस्था व लष्करी शासन व्यवस्था ही राज्याच्या रथाची दोन चाके आहेत. यापैकी एक जरी नसेल तर तो रथ निकामी होतो. सैन्यावाचून राज्य, धन व पराक्रम यांना काही अर्थ उरत नाही" असे आर्य ऋषी शुक्राचार्य यांनी फार प्राचीन काळी प्रतिपादन केले आहे. शिवाजी महाराजांनी या तत्त्वाला अनुसरुनच आपल्या लष्कराची उभारणी केली.

शिवाजी महाराजांच्या उदयामुळे मराठ्यांच्या लष्करी संघटनेत नवे पर्व सुरु झाले. शिवाजी महाराजांकडे आपल्या लष्कर विषयक निश्चित कल्पना होत्या. लष्करी सुधारणे विषयी निश्चित योजना होत्या. त्याच्याकडे लष्कर विषयक दृष्टीकोन होता व त्यांचे लष्कर विषयक विचार भूतकाळातील अनुभवावर आधारलेले होते. म्हणूनच त्यांने आपले लष्कर निर्माण करताना मनसबदार सरदारांचा विचार केला नाही. सरजामशाही लष्करी पद्धतीचा त्याग केला.

मराठ्यांच्या न्यायव्यवस्थेच्या प्रशासनाचा आरंभ शिवाजी महाराजांच्या राजवटीपासून झाला. शिवाजी महाराजांनी आपल्या कारकिर्दीची सुरवात अदिलशाही जहागिरदाराचा मुलगा म्हणून केली. म्हणून त्यांनी सुखातील आपल्या न्यायव्यवस्थेमध्ये मुस्लिम राजवटीतील कायदेकानून व पद्धतीचा अवलंब केला. म्हणूनच या बाबत डॉ. व्ही. टी. गुणे म्हणतात, "सर्व मुस्लिम न्यायालयीन संस्था मराठे काळात थोड्याफार फरकाने अस्तित्त्वात असल्याच्या दिसतात." सन १६५० पासून शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीला विशिष्ट वजन प्राप्त झाल्या नंतर व स्वराज्यातील प्रदेशात वाढ झाल्या नंतर व स्वराज्याला शांतता लाभल्यानंतर शिवाजी महाराजांनी जुन्या धर्मग्रंथावर आधारित अशी न्यायव्यवस्था आपल्या स्वराज्याला लागून केली.

या न्यायव्यवस्थेच्या प्रशासनात आपण शिवकाळ व पेशवेकाळातील केंद्रिय न्यायव्यवस्था, प्रांतीय न्यायव्यवस्था, स्थानिक न्यायव्यवस्था, कायदे, पुरावे, न्यायपद्धती, दिव्य, गुन्हे, शिक्षा व मराठ्यांच्या न्यायदान पद्धतीची वैशिष्टे आदी न्यायव्यवस्थेशी संबधीत सर्व घटकांची सविस्तर माहिती पहाणार आहोत.

८.२ मराठ्यांचे सैन्य विभाग

मराठ्यांने आपल्या लष्करी प्रशासनासाठी तिन विभाग निर्माण केले होते. या तिन विभागा पैकी एक महत्त्वपूर्ण विभाग म्हणून सैन्य विभागाकडे पाहिले जाते. या सैन्य विभागाच्या प्रशासकीय व्यवस्थानामध्ये आपण मराठ्यांचे शरीररक्षक दल, मराठ्यांचे पायदल, मराठ्यांचे घोडदल, मराठ्यांचे हत्तीदल, मराठ्यांचे उंटदल या बाबतची माहिती पहाणार आहोत.

१. राजाचे शरीरसंरक्षक दल :

मराठ्यांच्या लष्करी प्रशासनाचा अभ्यास करत असताना सर्व प्रथम आपणास शिवकाळाचा विचार करावा लागेल. या प्रशासनाच्या अभ्यासाचा आरंभ आपण शिवाजी महाराजांच्या शरीरसंरक्षक दलापासून करणार आहोत. शिवाजी महाराजाने शुन्यातून हिंदवी स्वराज्य निर्माण केले होते. हे स्वराज्य निर्माण करत असताना त्यांचे जीवन अत्यंत व्यस्त बनले होते. अशाच परिस्थितीत शिवाजी महाराजांनी स्वतःच्या सुरक्षिततेसाठी खास शरीरसंरक्षक दलाची निर्मिती केली होती.

शिवाजी महाराजांच्या शरीरसंरक्षक दलामध्ये अतिशूर, लढवय्ये, एकनिष्ठ आणि हुशार सैनिकांचा समावेश केला जात असे. हे सैनिक राजमर्जीतील व विश्वासातले असत. या सैनिकांसाठी कठोर शिस्त असे. या शरीरसंरक्षक दलामध्ये बंदुकधारी, भालेकरी, हलके हत्यार धारक व तोफखाना घाट सैनिकांचा समावेश असे.

शरीर संरक्षक दलाकडे राजसभा, राज निवासस्थान येथील सर्व प्रकारची व्यवस्था याचे रक्षण करण्याची जबाबदारी असे. राजाच्या विरुद्ध कोठे कट केले जात आहेत काय, कोण द्रोह करत आहे काय, या बाबतचा तपास घेणे व या बाबत माहिती मिळविणे व अशा प्रकारची परिस्थिती निर्माण झाली असेल तर तिचे निवारण करणे ही कामे या दलाला करावी लागत असत.

शिवाजी महाराजांच्या अंगरक्षक दलातील सैन्याची संख्या दोन हजार होती. महाराज या अंगरक्षक दलातील सैन्याना जास्त पगार देत होते. तसेच या दलातील कोणत्याही सैन्याने खास कामगिरी केली तर त्यांना सोन्याची कडी, कंठा, हार बक्षीस म्हणून दिला जात असे.

२. पायदळ :

मराठ्यांच्या लष्करी प्रशासनातील पायदळ हा महत्त्वपूर्ण विभाग होता. महाराष्ट्रातील पर्वतमय प्रदेशात घोडदळापेक्षा पायदळ जास्त उपयोगी पडू शकेल हे शिवाजी महाराजांना माहित होते. तसेच किल्ले व ठाणे यांच्या संरक्षणासाठी ही पायदळाची गरज आहे याचीही कल्पना शिवाजी महाराजांना होती. पायदळातील बहुतेक सैन्यांची भरती मावळे व हेटकरी समाजातून जास्त होत असे. खुद्द महाराज ही भरती करत असत.

मराठ्यांच्या पायदळाची रचना पुढील प्रमाणे असे :

१) १० सैनिक - १ नाईक

२) ५ नाईक - १ हवालदार

३) ३ हवालदारांवर - १ जुमलेदार

४) ७ ते ८ जुमलेदारांवर - सेनापती

९१ कलमी बखरीमध्ये मराठ्यांच्या पायदळाची संख्या २ लाख होती असे नमुद केले आहे. मात्र इतकी संख्या असेलच असे खात्रीलायक सांगता येत नाही.

पेशवाईत पायदळात मराठ्यांच्या जास्त भरणा होता. पायदळातील सैनिकांची संख्या २५००० हजारा पर्यंत होती. मराठा सैन्या व्यतिरिक्त पेशव्याच्या पायदळात रोहिले, पठाण, शीख, गारदी, सिद्दी या परकीय सैनिकांचा भरणाही असे. मात्र या परदेशी सैनिकांवर पेशव्यांचा म्हणावा तितकासा वचक नसे.

३. घोडदळ :

मराठ्यांच्या लष्करी प्रशासनातील पायदळा बरोबरच घोडदळ हा एक महत्त्वाचा विभाग होता शिवकाळात जे घोडदळ प्रचलित होते त्या घोडदळाचे दोन प्रकार होते.

१) बारगीर (पागा)

२) शिलेदार

१) बारगीर : बारगीर म्हणजे सरकारचे घोडेस्वार. या घोडेस्वाराना सरकारी घोडा व हत्यार मिळते असे.

२) शिलेदार : शिलेदार म्हणजे स्वत:चे घोडे व स्वत:चे हत्यार असणारा मात्र सरकारी चाकरी करणारा घोडेस्वार.

शिवाजी महाराजांच्या घोडदळात बारागीरांची संख्या अधिक होती. शिलेदारांना महाराजांनी जास्त प्रोत्साहन दिले नाही.

शिवकाळात घोडदळाची रचना पुढील प्रमाणे होती.

१) २५ घोडेस्वारांवर - १ हवालदार

२) ५ हवालदारांवर - १ जुमलेदार

३) १० जुमलेदारांवर - १ हजारी

४) ५ हजारींवर - १ पंचहजारी

५) सर्व पंच हजारींवर- सेनापती

घोडदलातील रचना विचारात घेतल्या नंतर या अधिकाऱ्यांना वेतन किती दिल जात होते याची माहिती खाली नमुद करण्यात आली आहे.

हुद्दा	**वेतन**
१) घोडस्वार	- २ ते ५ होन (दरमाह)
२) हवालदार	- १० होन (दरमाह)
३) जुमलेदार	- ५०० होन व पालखी (सालिना)

munotes.in

४) पंचहजारी - २००० होन (सालिना)

५) सेनापती - १००००० होन (सालिना)

या अधिकाऱ्यांना मदतीसाठी मदतनीस असत. या ठिकाणी अधिकारी व मदतनीसांची देत आहोत.

१) घोडेस्वारास – एक पखालजी व एक नालबंद

२) हजारीस – एक मुजुमदार, एक कारभारी व एक जमेनिस

३) पंचहजारी – बाकेनिसाचे कारकून व जासूद

घोडदळातील सैन्याना प्रशिक्षण हा शिवाजी महाराजांच्या घोडदळाच्या वैशिष्ट्याचा खास भाग बनला होता. पावसाळ्यात युद्ध मोहिमा बंद असत परिणामी चार महिने सैन्य लढाई विना जर राहिले तर त्यांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होऊ शकतो याची जाणीव महाराजांना होती. त्यामुळे लष्करी छावण्यात या काळात घोडदळातील सैन्याना प्रशिक्षण देण्याचे काम चालू असे. ॲबे कॅर या फ्रेंच प्रवाशाने आपल्या प्रवास वर्णनपर ग्रंथात या प्रशिक्षणाचा खास गौरव केला आहे.

शिवकाळा प्रमाणेच पेशवेकाळात सुद्धा घोडदळ प्रचलित होते. पेशव्यांच्या घोडदळातही बारागीर व शिलेदार होते. बारागीराना महिन्याला ४ ते ५ रुपया पासून ८ ते १० रुपया पर्यंत वेतन मिळत असे. शिलेदारांना महिन्याला २० ते ३० रुपये पगार मिळत असे. शिलेदारांमध्ये 'एकांडे शिलेदार' हा लहानसा वर्ग होता. या शिलेदारांना वार्षिक २५०, ३००, ४०० ते ७००-८०० रुपयापासून २००० रुपया पर्यंत वार्षिक पगार दिला जात होता एकाडे शिलेदार आघाडीवर असत यांना बढती मिळविण्याची संधी असे. त्याचा ते फायदा घेत असत व पागे व पथके बनवत असत.

४. हत्तीदळ :

मराठ्यांच्या लष्करी प्रशासनातील हत्तीदल हा एक घटक होता. मात्र या प्रशासनातील पायदळ व घोडदळाला जेवढे महत्त्व होते तेवढे महत्त्व हत्तीदलाला नव्हते. असे जरी असले तरी या दलाचा उपयोग लष्करी व्यवस्थापनासाठी होत असे. मोठ मोठ्या तोफा ओढण्यासाठी हत्तींचा उपयोग केला जात असे. तसेच हत्ती असणे हे या काळात ऐश्वर्याचे लक्षण मानले जात होते. सभासद सांगतात की महाराजांच्या कारकिर्दीच्या अखेरीस लष्करातील हत्तींची संख्या १२६० इतकी होती. चिटणीस बखरकाराच्या म्हणण्यानुसार शिवाजी महाराजांच्या लष्करी हत्तींची संख्या १५०० होती.

५. उंटदळ :

मराठ्यांच्या लष्करी प्रशासनात उंटदळ हा एक विभाग होता. उंटदळाचा उपयोग लष्करातील सामानसुमान व लहानतोफा वाहून नेण्याकरिता व मोठ्या तोफा वाहून नेण्याकरिता केला जात असे. चिटणीस बखरकार म्हणतात शिवाजी महाराजांकडे १ हजार उंट होते. महाराजांच्या उंटदळातील उंट हे शत्रुच्या लष्करातीलच पकडलेले होते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे जेव्हा अफजलखानाच्या सैन्यांचा पराभव झाला मराठ्यांना १२०० उंट मिळाले होते. यावरुनच असे दिसून येते की हे दळ या प्रशासनात प्रचलित होते.

मराठ्यांच्या सैन्य विभागांची माहिती पहात असतांना आपण महाराजांचे शरीररक्षक दळ, पायदळ, घोडदळ, हत्तीदळ, उंटदळ या विभागांची माहिती पाहिली. या दळापैकी पायदळ, घोडदळ व महाराजांचे शरीररक्षकदळ महत्त्वाचे आहेत. या दलाचा लष्करी कार्यांत प्रत्यक्ष सहभाग मोठ्या प्रमाणात होता. मात्र हत्तीदल व उंटदळ हे लष्करी कार्याच्या मदतीस उपयुक्त होत.

८.३ मराठ्यांच्या सैन्यव्यवस्थेतील इतर घटकांची माहिती

मराठ्यांच्या सैन्यव्यवस्थेतील इतर घटकांमध्ये आपण मराठ्यांच्या हेरखात्या विषयी, मराठ्यांच्या लष्करी शस्त्रास्त्रांविषयी, मराठ्यांच्या लष्करी छावण्या विषयी, मराठा लष्कराच्या युद्धतंत्रा विषयी माहिती पहाणार आहोत. ही माहिती पुढे नमुद करण्यात आली आहे.

१. हेर खाते :

मराठ्यांच्या लष्करी विभागाचा हा अत्यंत महत्त्वाचा भाग होता. शिवाजी महाराजांनी आपल्या राजवटीत स्वतंत्र हेरखाते निर्माण केले होते. शिवाजी महाराजांच्या हेराचे जाळे लष्कर, आरमार, छावण्या, किल्ले, सरकारी खाती व शत्रु प्रदेशात पसरले होते. बहिरजी नाईक हे शिवाजी महाराजांच्या हेरखात्याचे प्रमुख होते. शिवाजी महाराजांचे हेर हे त्यांना अत्यंत विश्वसनीय बातम्या देत होते. असे फ्रेंच गव्हर्नर मार्टिन यांनी सांगीतले आहे. डॉ. बाळकृष्ण म्हणतात, "राज्यातील हेर व्यवस्था ही राज्यकारभाराचा कणा होय". कौटिल्याने हेराला 'गूढ' पुरुष व राजाचे नयन असे म्हटले हे. मराठ्याना हेरखात्याचा साम्राज्य प्रशासनासाठी व लष्करी प्रशासनासाठी मोठ्या प्रमाणात उपयोग झाला.

२. लष्करातील शस्त्रास्त्रे :

मराठ्यांच्या लष्करी विभागाशी संबधीत हा घटक आहे. मराठ्यांनी आपल्या लष्करी मोहिमांसाठी व युद्धांसाठी जी शस्त्रास्त्रे वापरली आहेत व त्यांचे वर्णन व संदर्भ आले आहेत. त्यावरुन या विभागातील शस्त्रास्त्रांची माहिती उपलब्ध झाली आहे. अशा शस्त्रास्त्रांची नावे पुढील प्रमाणे आहेत. १) तलवार, २) कट्यार, ३) जमदाडा, ४) पट्टे, ५) भाले, ६) बांक, ७) विचवे, ८) सैत्य, ९) टांकण्या, १०) तिकमाना, ११) बंदुकी, १२) बखतरे, १३) टोप, १४) दुपट्टा, १५) चिलखत, १६) पाखरा, १७) ताज, १८) हुके १९) दारुगोळा, २०) बाण. शिवाजी महाराजांनी काही शस्त्रास्त्रे ही इंग्रज, पोर्तुगीज व फ्रेंचाकडून मिळवीली. उल्लेख अनेक कागद पत्रात सापडले आहेत. वर पाहिलेल्या शस्त्रांचा वेगवेगळ्या लढायांसाठी मराठ्यांने वापर केला होता हे ही पुराव्यांच्या आधारे सिद्ध झाले आहे. परिणामी लष्करी विभागाशी संबध असल्याने या घटकाला महत्त्व आहे.

३. लष्करी छावण्या :

युद्ध मोहिमानंतर निघाल्या नंतर मराठ्यांना लष्करी छावण्या निर्माण कराव्या लागत होत्या. मराठ्यांच्या लष्करी छावण्यात जास्त सामानसुमान नसे. बिन लढावू लोक नसत. तोफखाना नसे. त्यामुळे छावण्यातून लष्करी हालचालीना वेग येत असे. या लष्करी छावण्या बाबत फ्रेंच गव्हर्नर मार्टीन म्हणतो, "शिवाजी महाराजांच्या लष्करी तळात स्त्रिया, मोठे तंबू व दिखावूपणा याचा पूर्ण अभाव होता. त्यांच्या छावणीत फक्त दोन छोटे तंबू असत. त्या दोन तंबूपैकीत एक स्वतःसाठी वापरत असत तर दुसरा मंत्र्यासाठी असे". डॉ. फ्रायर हा युरोपीय प्रवासी म्हणतो,

"शिवाजी महाराजांच्या सैन्याना हालअपेष्टांची सवय झाली होती. प्रवासात होणाऱ्या उपासमारीला ते सरावलेले होते. ते सुखासीन बनले नव्हते. त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या साहसी आक्रमणाला ते अधिक लायक असत". मराठ्यांच्या छावण्यांची रचना, छावण्यांची ठिकाणे, छावण्याची व्यवस्था या मध्ये नियोजन होते. परिणामी इतर साम्राज्यातील छावण्यापेक्षा मराठ्यांच्या छावण्या चांगल्या होत्या.

४. युद्धतंत्र :

मराठ्यांचे गनिमी कावा हे एक महत्त्वपूर्ण युद्धतंत्र होते. या गनिमी कावा युद्धतंत्रामुळे मराठ्यांच्या वाट्याला मोठे यश आले होते. परिणामी हे तंत्र मराठा लष्कराचे खास वैशिष्टे बनले होते. शिवाजी महाराजांच्या उदयाच्या आरंभी मुसलमान, पोर्तुगीज, सिद्दी, इंग्रज असे अनेक शत्रू होते. या सर्वांबरोबर एकदम लढणे अशक्य. म्हणूनच शिवाजी महाराजांनी गनिनी युद्धतंत्राचा वापर केला. शत्रुसैन्यात फुट पाडणे, शत्रुवरचढ होत असेल तर माघार घेणे, अचानकपणे हल्ला करुन शत्रुपक्षाचा फडशा पाडणे, शत्रू सावध होण्यापूर्वीच पळून जाणे, शत्रूंची ठाणी अचानकपणे उध्वस्त करणे, शत्रूला सळोकी पळो करुन सोडणे ही त्यांच्या गनिमी काव्याची वैशिष्टे आहेत. ही सर्व वैशिष्ट्य शिवाजी महाराजांच्या सैन्यानी आत्मसात केली होती. या युद्धपद्धतीच्या माध्यमातून थोड्या साधनसामुग्रीनिशी शत्रुबरोबर लढा देता येत असे. त्यामुळे मराठ्यांच्या सैन्य व्यवस्थेचा हा घटक एक महत्त्वपूर्ण भाग बनला होता.

८.४ मराठ्यांच्या सैन्यव्यवस्थेतील सुधारणा

मराठ्यांचे साम्राज्य नव्याने उदयास आले होते. ते टिकवावयाचे होते. वाढवावयाचे होते. हे सर्व केवळ कार्यक्षम लष्करी व्यवस्थेने शक्य होऊ शकत होते. म्हणूनच शिवाजी महाराजानी आपल्या लष्कर व्यवस्थेत बदलत्या परिस्थितीनुसार सुधारणात्मक बदल केले. ते पुढील प्रमाणे आहेत.

१. सरंजामशाही सैन्य नष्ट केले :

मध्ययुगीन राजवटीत सरंजामशाही सैन्यव्यवस्था प्रचलित होती. या सरंजामदाराना जहागिरी दिली जात असे या मोबदल्यात हे सरंजामदार आपल्या पदरी फौजा ठेवत असत व युद्ध प्रसंगी राजाच्या बाजूने लढत असत. या लोकांच्या हातात स्वत:चे सैन्य असल्याने पुढे हे लोक स्वतंत्र वागत असत व राज सत्ते विरुद्ध बंड करत असत. शिवाजी महाराजांना ही पद्धती चूकीची वाटली. म्हणूनच त्यांना असे वाटत होते की राज्य सुयोग्यपद्धतीने चालवावयाचे असेल तर राज्यातील जमीनीचे तुकडे होता कामा नये. म्हणूनच जहागिरदाराना दिलेल्या जमीन परत घेणे गरजेचे आहे. म्हणूनच त्यांनी जहागिरदारी पद्धती बंद केली व स्वत:च्या नियंत्रणाखाली उभी राहणारी सैन्य व्यवस्था निर्माण केली. या सैन्य व्यवस्थेला रोख पगार सुरु केले. पराक्रम करणाऱ्या सैन्याना पदव्या देणे, धन दौलत देणे हे प्रकार सुरु केले. त्यांचा गुण गौरव करण्यास सुरुवात केली. व सरजामशाही सैन्यव्यवस्थेता पूर्ण बिमोड केला.

२. वेतन :

सरंजामशाही पद्धतीमध्ये सैन्याना नियमित वेतन मिळत नसे. परिणामी हे सैन्य लुटालूट करत असत. मात्र या चूकीच्या पद्धतीला बंद करण्यासाठी शिवाजी महाराजांनी नियमित वेतन देण्यास सुरुवात केली. हे वेतन भरपूर होते. सैन्याचे वेतन त्याच्या भरती प्रसंगी निश्चित करण्याची चांगली प्रथा सुरु केली. पगाराची शाश्वती असल्याने शिवाजी महाराजांना सैन्यपुरवढा कधी कमी

पडला नाही. या बाबत डॉ. सेन म्हणतात, "Shivaji give them on this account a good salary and with such punctuality that on the appearance of the New Moon each one received what had been promised at the time of enlistment". तत्कालीन इतर सत्तांच्या तुलनेने शिवाजी आपल्या लष्करास नियमित व भरपूर वेतन देत असल्याने लोक महाराजांच्या पदरी लष्करी सेवा करण्यास उत्सुक होते. परिणामी महाराजांना प्रामाणिक, निष्ठावंत शूर सैन्यांची निवड करता आली.

३. सैनिकांना बढत्या व बक्षिसे :

शिवाजी महाराजांनी सैनिकांना नियमित व रोख वेतन देण्याची प्रथा सुरु केली होती. त्यापुढे ही जावून जे सैन्य विशेष कामगिरी करतील अशा सैन्यासाठी नियमित वेतनाबरोबरच बक्षीसे देण्याची प्रथा सुरु केली. तसेच अशी कामगिरी करणाऱ्या सैन्यांना तत्काळ बढती देण्याचे काम ही सुरु केले. शिवाजी महाराजांचे त्यांच्या सैन्यांवर प्रेम होते. बक्षिस, बढती, पारितोषिक या बाबत ते निष्पक्षपाती होते.

अफजलखान वधानंतर दरबार भरवून शिवाजी महाराजांनी अनेक सैनिकांचा केलेला सत्कार, कान्होजी जेथेना खड्ग प्रमाणाचा दिलेला मान, कावजी कुबळकर व वाघोजी तुपे एक हजार तुकडीचे दिलेले अधिकार, मकाजी अनंतराव व व्यंकोजी दत्तो यांना पंचहजारीची मिळालेली संधी, वरसोजी भोसलेला मिळालेला सेनासुभा किताब, मोरोपंताना मिळालेले पेशवेपद, नेताजी पालकर, प्रतापराव गुजर, हंबीरराव मोहिते, यांना मिळालेले सेनापती पद ही वरील घटकाची उत्तम उदाहरणे आहेत.

४. दिखावूपणा, चैन, विलास यांचा अभाव :

शिवाजी महाराजांनी मराठ्यांच्या सैन्य व्यवस्थेत सुधारणा करत असतांना दिखावूपणा, चैन, विलास या बाबी सैन्य व्यवस्थेतून दूर केल्या. लष्करात चालणाऱ्या मद्यपान, गोणी, नाच, विलासीपणा या बाबी त्यांनी सैन्य व्यवस्थेपासून दूर केल्या. या उलट मुस्लिम सैन्य विलासी होते, ऐषआरामी होते, दारु, स्त्रीयांमध्ये गुरफटले होते. त्यांच्या गरजा अमर्याद होत्या. त्या मुळेच ते अकार्यक्षम बनत चालले होते. मात्र शिवाजी महाराजांनी या गोष्टीला फाटा देवून स्वतःच्या साध्या व कष्टमय जीवनाचा आदर्श ठेवला. परिणामी शिवाजी महाराजांचे सैन्य या गोष्टीपासून अलिप्त राहिले. याचा फायदा सैन्यव्यवस्थे बरोबरच मराठा साम्राज्याला झाला.

५. लष्कराचा मुलकी राज्यकारभारात हस्तक्षेप ठेवला नाही :

मराठा साम्राज्यातील प्रशासनात मुलकी व लष्करी असे दोन स्वतंत्र विभाग शिवाजी महाराजांनी निर्माण केले होते. असे स्वतंत्र विभाग इस्लाम राजवटीत नव्हते. प्रशासनावर लष्करी व्यवस्थेचा प्रभाव होता. मग लष्कर विभाग प्रशासनावर प्रमाण पाहून आपणास हव्या तशा पद्धतीने राज्यकारभार करुन पैसा मिळवत असे. व ऐषोआरामी जीवन जगत असे. मात्र मराठ्यांच्या प्रशासनात वर सांगितल्या प्रमाणे हे विभाग स्वतंत्र असल्याने प्रशासनात गैर प्रकार घडत नव्हते. दिवाणी पद्धतीने प्रशासन चालत असल्याने या प्रशासनात लष्करी प्रशासनाला हस्तक्षेप करण्याची संधी नव्हती. परिणामी मराठ्यांच्या राज्याला लष्करी स्वरुप प्राप्त झाले नाही.

muniotes.in

६. शस्त्रास्त्र पुरविण्याबाबत केलेले प्रयत्न :

मराठ्याने आपले साम्राज्य वाढवत असताना सैन्यांना शस्त्रास्त्रे पुरविण्यास सुरुवात केली होती. शस्त्रास्त्रे कार्यक्षम असावीत यासाठीही जातीने लक्ष घातले होते. याही पुढे जावून त्यांनी शस्त्रास्त्रे निर्मितीचे कारखाने काढले होते. पाश्चिमात्य युद्ध तंत्रज्ञान आत्मसात करण्याचा त्यांनी नेटाने प्रयत्न केला. इंग्रज, फ्रेंच, पोर्तुगीज यांच्याकडून शस्त्रास्त्रे मिळविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले होते. वरील सर्व माहितीवरुन शिवाजी महाराजांनी वरिल घटका बाबत सुधारणा करण्याचे प्रयत्न केले होते असे दिसून येते.

७. शरीर रक्षक दळाची निर्मिती :

मराठ्यांच्या लष्करी प्रशासनातील ही एक महत्त्वाची सुधारणा मानली जाते या सुधारणेचा आरंभ शिवाजी महाराजांनी केला. त्यांनी आपल्या सुरक्षिततेसाठी खास शरीररक्षक दलाची निर्मिती केली. राजसभा, राजा, राज परिवार, राज दरबार, आदी संरक्षणाची जबाबदारी या दलाकडे असे. शुर, विश्वासू व कार्यक्षम सैन्यांची निवड या दलामध्ये केली जात असे याचा फायदा मराठ्यांना झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. महाराजांच्या हा शरीररक्षक दलाचा निर्णय स्वरक्षणाच्या दृष्टीने व साम्राज्य रक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरला.

८. अधिकाऱ्यांच्या श्रेण्या बनविल्या :

मराठ्यांने आपल्या सैन्य व्यवस्थेत सुधारणा करत असताना जे अधिकारी नेमले होते त्या अधिकाऱ्यांच्या श्रेण्या बनविल्या होत्या. नाईक-हवालदारापासून सरनोबतापर्यंत निरनिराळे अधिकारी नेमले. त्यामुळेच सैन्यात शिस्त निर्माण झाली. सैन्य प्रभावी ठरले.

९. सैन्यात सर्व जातीच्या लोकांना संधी :

मराठ्यांनी आपल्या सैन्य व्यवस्थेत एकाच जातीच्या सैन्यांची मक्तेदारी न ठेवता सर्व जातीच्या लोकांना सैन्यव्यवस्थेत संधी दिली. पायदळातील सैन्यात मावळे, हेटकरी, घोडदळात मराठे, अष्ट प्रधान मंडळात सात ब्राम्हण जातीय, होते तसेच काही अधिकारी हे इस्लाम जातीचे होते मराठ्यांनी जात, पात, धर्म यांचा विचार न करता सैन्य व्यवस्थेची उभारणी केली होती. थोडक्यात सर्व जातीयांना लष्कर व्यवस्थेत समान संधी हा शिवाजी महाराजांच्या या व्यवस्थेबाबतचा सुधारणावादी दृष्टीकोनच होता.

१०. हेरांचे जाळे :

हेर खात्याची निर्मिती ही मराठ्यांच्या लष्कर व्यवस्थेतील महत्त्वाची सुधारणा मानली जाते. या खात्यामुळे साम्राज्यातर्गंत व साम्राज्य बाह्य परिस्थितीची माहिती मराठ्यांना सहज माहित होवू लागली. म्हणूनच शिवाजी महाराजांनी आपल्या साम्राज्यात हेरांचे जाळे पसरवले होते. विश्वासू, शूर, व बुद्धीमान लोकांची या खात्या मध्ये निवड केली जात होती. हे लोक अत्यंत विश्वसनिय माहिती गुप्त स्वरुपात महाराजांना देत असत.

११. राष्ट्रीय सैन्यांची निर्मिती :

मराठा सत्तेचा उदय म्हणजे शिवाजी महाराजांनी परकीय, परधर्मीय मुसलमान यांच्या विरुद्ध पुकारलेला बंडाचा झेंडा. हा बंडाचा झेंडा फडकवत असताना त्यांनी लोकांच्या मनात स्वदेश,

स्वभाषा, स्वधर्म याबाबत जागृती निर्माण केली. या जोरावरच त्यांनी जे सैन्य उभे केले होते. त्या सैन्यामध्ये राष्ट्रीय भावना निर्माण केली. म्हणजेच खऱ्यार्थाने त्यांना राष्ट्रीय सैन्यांची निर्मिती केली. राष्ट्रभक्तीचा आदर्श शिवाजी महाराजांनी आपला सहकाऱ्यांसमोर, लष्करासमोर ठेवला. यामुळेच त्यांना राष्ट्रीय स्वरुपाची फौज उभारता आली.

१२. सेनापतीच्या मदतीला मुलकी अधिकारी नेमल :

मराठ्यांच्या सेनेत हे लष्करातील प्रमुख पद होते. राजा नंतर लष्करावर या सेनापतीचा अधिकार असे. सेनापतीच्या हाताखाली वाकनिस नावाचा अधिकारी नेमला जात असे. सैन्यांचा वृत्तांत लिहिण्याचे काम या अधिकाऱ्याकडे असे त्यामुळे मराठ्यांच्या सैन्यांच्या हालचालींचा वृत्तांत मराठ्यांच्या छत्रपतीना आपोआपच मिळत असे. सेनापतीच्या मदतीस कार्यवाह हा दुसरा अधिकारी असे तो लष्करांची अधिकृत दैनंदिनी लिहित असे. व ती नियमितपणे वरिष्ठ अधिकाऱ्याकडून तपासून घेण्याची जबाबदारी त्याच्यावर असे.

१३. गनिमी युद्ध तंत्राचा वापर :

मराठ्यांने शुन्यातून स्वराज्य उभे केले होते. आरंभी त्यांच्याकडे कमी सैन्य होते. म्हणूनच त्यांनी समोरासमोरच्या युद्धाचा त्याग करुन गनिमी युद्धाचा अवलंब केला होता. डोंगराळ प्रदेश, दुर्गम किल्ले, शिवाजी महाराजांचे रणकौशल्य, मुत्सद्दीपणा यामुळे या युद्ध तंत्राला स्वतंत्र अस्तित्व निर्माण झाले होते. महाराजांचा हा युद्धनितीबाबतचा दृष्टीकोनही सुधारणावादी होता.

मुस्लिम सैन्य व्यवस्थेतील दोष हेरुन मराठ्यांनी आपल्या सैन्य व्यवस्थेत सुधारणा घडवून आणल्या. सैन्य प्रशिक्षण, नियमित वेतन, बढती, बक्षिसे, शरीर रक्षक दलाची निर्मिती, अधिकारी, त्यांच्या श्रेण्या, हेरखात्याची निर्मिती, मुलकी व लष्करी व्यवस्थेच्या अधिकारांचे विभाजन, व राष्ट्रप्रेम, राष्ट्रभाव, राष्ट्रऐक्य या घटकांना नजरेसमोर ठेवून या घटकांमध्ये अमुलाग्र बदल करुन या व्यवस्थेत त्यांनी सुधारणा घडवून आणल्याचे वरिल माहितीच्या आधारे स्पष्ट झाले आहे.

८.५ मराठ्यांचे किल्ले

मराठ्यांच्या लष्करी व्यस्थेतील एक महत्त्वपूर्ण घटक म्हणजे किल्ले. किल्ले होते म्हणूनच मराठ्यांना हिंदवी स्वराज्य स्थापन करणे सेपे गेले. अनेक वेळा या किल्ल्यांनी मराठ्यांच्या जीवीताचे व अब्रूचे संरक्षण केले. मराठ्यांच्या इतिहास, मराठ्यांचे श्रेष्ठत्त्व, मराठ्यांचे वैभव, मराठ्यांचे पराक्रम. या किल्ल्याच्या कुशीत गुंफला गेला होता. भारतीय युद्धशास्त्राच्या दृष्टीकोनातून मध्ययुगीन राजवटीत या किल्ल्यांना महत्त्व होते. गड-किल्ल्यांचे महत्त्व विषद करतांना रामचंद्रपंत अमात्याने असे म्हटले आहे, "गड कोट हेच खरे राज्य आहे, गड कोट म्हणजेच खजिना आहे, गड कोट म्हणजेच सैन्यांचे बळ आहे, गड कोट म्हणजेच राजलक्ष्मी आहे, गड कोट म्हणजेच आपले प्राण रक्षण आहे" या वरुन या कालखंडात किल्ल्यांना किती महत्त्व होते हे दिसून येते.

१. किल्ल्यांची संख्या :

मराठ्यांची किल्ल्यांच्या संख्येबाबत वेगवेगळ्या विचारवंतामध्ये आपणास मतभेद दिसतात. संख्येबाबत ही तफावत कशी आहे ते आपण या ठिकाणी मांडत आहोत. कृष्णाजी अनंत सभासद

यांनी मराठ्यांच्या किल्ल्यांची संख्या २४० होती असे सांगितले आहे. म. रा. चिटणीस यांनी मराठ्यांच्या किल्ल्यांची संख्या ३१७ होती असे सांगितले आहे. मराठ्यांच्या ताब्यात असणारे हे किल्ले मराठ्यांनी काही अंशी शत्रुकडून घेतले होते. काही नव्याने निर्माण केले होते. तर काही तह – वाटाघाटीतून मिळविलेले होते. चित्रगुप्ताने आपल्या बखरीत किल्ल्यांची संख्या ३६१ सांगितली आहे. मराठ्यांच्या कालखंडात जे किल्ले होते त्या किल्ल्यांचे पाच भागात विभाजन केले होते.

१. घाटमाथ्यावरील किल्ले

२. देशावरील किल्ले

३. कोकणातील किल्ले

४. कर्नाटकातील किल्ले

५. सागरी किल्ले किंवा दुर्ग

मराठ्यांच्या राजवटीत शिवाजी महाराजांकडे जे किल्ले होते. त्या संदर्भात सेन असे म्हणतात, "शिवाजीच्या स्वराज्यातील अवघड व उंच डोंगरापैकी कोणताही डोंगर शिल्लक नव्हता, की ज्या ठिकाणी शिवाजीचा किल्ला नव्हता. स्वराज्यातील प्रत्येक तालूका एखाद्या किल्ल्याशी सलग्न होते" अशा रीतीने संपूर्ण स्वराज्य किल्ल्यांनी वेढलेले असे.

८.६ मराठ्यांचे किल्ले प्रशासन

मराठ्यांने आपल्या किल्ले प्रशासनाची जबाबदारी कोणत्याही एका व्यक्तीवर दिली नव्हती. भेदनीतीचा वापर करत तीन व्यक्तींवर संयुक्त जबाबदारी दिली होती. या तीन्ही अधिकाऱ्यांना समान दर्जा देण्यात आला होता. समान जबाबदारी देण्यात आली होती. हवालदार हा किल्ल्यावरील सैन्य व्यवस्थेचा प्रमुख असे, तो मराठा जातीचा असे. सबनिसाकडे किल्ल्याच्या अर्थव्यवस्थेची जबाबदारी असे तर कारखानीसकडे किल्ल्याच्या धान्य पुरवठ्यांची जबाबदारी असे.

१. हवालदार :

हवालदार म्हणजे किल्ल्याचा जीव. किल्ल्याच्या रक्षणाची जबाबदारी त्याच्याकडे असे. किल्ल्यावरील लष्करावर व सभोवतालच्या प्रजेवर त्याची सत्ता असे. तो जातीने मराठा असे. किल्ल्याच्या किल्ल्या त्याच्याकडे असत. सायंकाळी किल्ल्याचे दरवाजे व्यवस्थीत बंद करणे, कुलपे लावणे व दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत कोणत्याही परिस्थितीत न उघडणे ही त्याची खास जबाबदारी असे.

२. सबनिस :

सबनिस हा मुलकी जमाखर्चाचा व्यवहार पहात असे. तो जातीने ब्राम्हण असे किल्ल्यावरील लोकांची हजेरी ठेवण्याचे महत्त्वपूर्ण काम त्याला कराव लागत असे. खर्चा बाबतचे हुकूमनामे सबनिसाच्या नावानेच सुटत असत. मात्र असे जरी असले तरी त्यास हवालदाराची मान्यता द्यावी लागत असे. तसेच कारखानिसच्या समतीचीही गरज लागत असे. रोख पैसा सबनिसाच्या

ताब्यात असे. त्यावर हवालदाराचा सील असे. दैनिक खर्च या तीन अधिकाऱ्यांच्या समतीनेच ठरवला जात असे.

३. कारखानीस :

किल्ल्याच्या प्रत्येक व्यवहारात कारखानीसचा सहभाग असे. या शिवाय धान्यपुरवठा, दारुगोळा, डागडुजी, शस्त्रास्त्रे याची साठे निर्मिती या बाबतची जबाबदारी कारखाननिसकडे असे. कारखानीस हा प्रभू जातीतील असे.

किल्ल्यांवर फितूरी होवू नये म्हणून मराठ्यांनी दक्षता घेतल्या होत्या. या दक्षता पुढीलप्रमाणे आहेत.

किल्ल्याची जबाबदारी संयुक्तरित्या तीन अधिकाऱ्यांवर दिली होती. तसेच एकमेकांच्या सहकार्याने काम करावे लागेल असे कामाचे विभाजनही केले होते परिणामी एकमेकांचा एकमेकांवर वचक रहात होता.

किल्ल्यावरील अधिकाऱ्यांच्या ठरावीक काळानंतर बदल्या होत असत. त्यामुळे कोणत्याही अधिकाऱ्याला किल्ल्यांवर कोणालाही वरचढ होता येत नसे.

तिन्ही अधिकारी वेगळ्या जातीचे होते, मराठा, ब्राम्हण व प्रभू परिणामी परस्पर सहकार्य असले तरी तेढ हे राहते असत.

परिणामी या नितीतून किल्ल्याच्या व्यवस्थापनाचे काम हे उत्तम होत असे.

४. किल्ल्यावरील इतर अधिकारी व सैन्य :

किल्ल्यावरील हवालदार, सबनीस, कारखानीस या तिन अधिकाऱ्यांव्यतिरिक्त सरनौबत व तट सरनौबत हे इतर दोन अधिकारीही असत. या अधिकाऱ्यांची संख्या किल्ल्याच्या आकारावर अवलंबून असे. किल्ला आकाराने जर मोठा असेल तर एकापेक्षा अधिक तट सरनौबत हे अधिकारी असत. त्याच्याकडे किल्ल्यांच्या तटबंदीचे संरक्षण करण्याचे काम असे. तटसरनौबताच्या कामावर देखरेख करण्याचे काम सरनौबताकडे असे.

किल्ल्यातील सैन्यांची संख्या किल्ल्याचा आकार, महत्त्व व परिस्थिती यावर अवलंबून असे. सर्वसाधारणपणे किल्ल्यावर ४०० ते ५०० इतके सैन्य ठेवले जात असे. साधारणतः ९ सैनिकांवर १ नाईक, ३ नाईकावर १ जमादार आणि सर्व जमादारांवर १ हवालदार असे या सैन्यांचे संघटन केलेले असे.

५. सैन्यांच्या नेमणूकीच्या पद्धती :

किल्ल्यांवर निवडक सैनिकांचा समावेश असे. परिणामी हे सैन्य निवडतांना पारखून घेतले जात असत. या सैन्यांची निवड शिवाजी महाराज स्वतः करत असत. निवड होत असतांना सैन्यांना स्वतःच्या निष्ठेबद्दल व विश्वासाबद्दल कोणतातरी जामीन द्यावा लागत असे. हा जामीन कसा असावा या बाबत बखरकार म्हणतात, "हा जामीन साधारणतः शिवाजी महाराजांच्या खाजगी नोकर मंडळीतील भरती होणाऱ्या सैनिकातून द्यावा लागत होता."

mmotes.in

६. किल्ल्यावरील अधिकाऱ्यांचे व सैन्यांचे वेतन :

किल्ल्यावरील अधिकारी व सैन्य यांच्या वेतनाबाबत म्हणावे तितकेसे पुरावे उपलब्ध नाहीत. बखरकारही या बाबत फारसी माहिती देत नाहीत. परंतू समकालीन कागदपत्रावरुन काही थोडीफार माहिती उपलब्ध होते त्या माहितीच्या आधारे या ठिकाणी वेतन स्पष्ट करण्यात आले आहे.

हवालदारास - वार्षिक १२५ ते १५० होन

सरनौबतास - वार्षिक १०० होन

मुजुमदारास - वार्षिक ३५ होन

तटसरनौबतास - वार्षिक १२ होन

सैनिकाना - वार्षिक ९ होन

कारकूनास - महिन्याला ३ होन

वेतना व्यतिरिक्त प्रत्येक अधिकाऱ्याला त्याच्या दर्जानुसार आणि कामाच्या महत्त्वानुसार जादा पालखी भत्ता, मशाल भत्ता, वैयक्तीक नोकर, मोठा छत्री व हुजरे या सुविधा मिळत असत.

७. किल्ल्यावर वापरली जाणारी शस्त्रास्त्रे :

मराठ्यांच्या कालखंडात किल्ल्यांवर युद्धासाठी तलवार, भाले, तिरकामठे, धनुष्यबाण, साध्या बंदुका, तोड्याच्या (ठासणीच्या) बंदुका ही हत्यारे वापरली जात होती. तोफअ, तोफगोळे, बंदुका व दारुगोळ्याचा वापर होत असे मात्र या बाबत म्हणावी तितकीशी परिस्थिती चांगली नव्हती.

८. किल्ल्यावरील धान्यसाठा व खास निधी :

मराठ्यांच्या किल्ल्यांवर धान्य साठविण्यासाठी अंबारखाने बांधलेले असत. पाच-सहाशे सैनिकाना गडावरील धान्य वर्ष दोन वर्ष सहज पुरु शकत असे. तसेच प्रत्येक किल्ल्यासाठी शिवाजी महाराजांनी खास निधी उपलब्ध करुन दिला होता. या निधीची रक्कम १ लाख २५ हजार होन होती. मात्र हा निधी जर आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली तरच खर्च करावा असे राजाचे खास आदेश होते. जेव्हा गडावरील निधी अभावी पन्हाळा सिद्दी जोहरला द्यावा लागला होता. त्या पासून महाराजाने बोध घेवून अशा प्रकारचा निधी गडानसाठी उपलब्ध करुन दिला होता.

९. पायथ्याचा बंदोबस्त :

किल्ल्यावरील प्रशासना बरोबरच मराठ्यांनी किल्ल्याच्या पायथ्याच्या बंदोबस्ताला महत्त्व दिले होते. किल्ल्याच्या पायथ्याच्या सभोवतालच्या प्रदेशाचे रक्षण करण्याची जबाबदारी शिवाजी महाराजांनी रामोशी, भिल्ल, महार, मांग या जमातींकडे दिली होती. शत्रुंबाबत बातमी आणण्याचे काम या जमातीकडे सोपविले होते. जर परिस्थिती गंभीर असेल तर हे लोक प्रत्यक्ष हवालदाराकडे पहारेकऱ्याच्या मार्फत बातमी पोहचवत असत. इंग्रज कॅप्टन मॅकिनटॉश म्हणतो,

muntes.in

"किल्ल्याचे पहारेकरी म्हणून रामोसांची नेमणूक करणारा शिवाजी हा पहिला सार्वभौम राजा होय. या लोकांनीही आपले कर्तव्य प्रामाणिकपणे व काळजीपूर्वक पार पाडले".

८.७ मराठ्यांच्या किल्ले दुरुस्तीवरील खर्च:

मराठ्यांच्या स्वराज्याचे आधारस्तंभ किल्ले होते. म्हणून मराठ्यांने किल्ल्यांच्या व्यवस्थापनाला महत्त्व दिले होते. महाराजांनी किल्ल्यांच्या डागडुजीवर प्रचंड खर्च केल्याचे पुरावे उपलब्ध आहेत. सन १६७१ मध्ये त्यांनी किल्ल्यांच्या डागडुजीसाठी १.७५,००० होन रक्कम बाजूला काढून ठेवली होती. यावरुन महाराज किल्ल्याची दक्षता किती घेत होत हे स्पष्ट होते. किल्ल्यांच्या पुनर्रबांधणीचे दुसरे महत्त्वपूर्ण उदाहरण म्हणजे माळवण जवळील समुद्रातील सिंधुदुर्ग हा महत्त्वाचा किल्ला. महाराजांनी खडकाळ बेटावर या किल्ल्याची उभारणी केली. या किल्ल्याच्या बांधकामासाठी महाराजांनी पोर्तुगीज तज्ञांची मदत घेतली. या किल्ल्याच्या पुनर्रबाधणीसाठी १ कोटी होन खर्च आला. या व्यतिरिक्त किल्ल्यांच्या पुनर्रबांधणीसाठी, डागडुजीसाठी मजुरांना, कारागीरांना, तंत्रज्ञाना भरपूर वेतन द्यावे लागत असे. त्याचाही समावेश या प्रकारच्या खर्चामध्ये होत असे. साम्राज्यातील किल्ल्यांची प्रसंगानुरुप डागडुजी ही करावी लागत असे ही प्रक्रिया अखंड सुरु होती. परिणामी या बाबीनवर प्रत्येक वर्षी मराठ्यांना खर्च हा करावा लागत असे.

८.८ मराठ्यांची आरमार व्यवस्था

मराठ्यांच्या लष्करी प्रशासनाचा तिसरा महत्त्वपूर्ण घटक म्हणजे आरमार. मराठ्यांच्या आरमाराची स्थापना शिवाजी महाराजांनी केली. या बाबत डॉ. सेन म्हणतात, Shivaji may be described as the father of the Indian navy" शिवाजी महाराजांनी उभारलेले आरमार हे हे त्यांच्या दूरदृष्टीचे व मुत्सद्दीपणाचे उत्तम उदाहरण होय. मध्ययुगीन भारतात कोणत्याही सत्ताधिशाने आरमार उभारण्याचा प्रयत्न केला नाही. हिंदूस्थानाच्या दोन्ही बाजूने पसरलेल्या अफाट सागरावर युरोपीयनांची व सिद्दीची सत्ता चालत होती. त्यांच्या संमतीशिवाय कोणाच्याही जहाजांना सागरावर संचार करण्याचे स्वातंत्र्य नव्हते. तसेच पश्चिम किनाऱ्यावरील सिद्दी वारंवार शिवाजी महाराजांच्या प्रदेशात लुटमार करत होता. सरहद्दीचा बंदोबस्त करणे हे राज्यप्रमुखाचे काम असल्याने सुरतेपासून कारवारपर्यंतची किनारपट्टी ताब्यात घेणे, सिद्दीचा बंदोबस्त करणे आणि युरोपियनाना शह देणे या उद्देशाच्या पूर्ततेसाठी शिवाजी महाराजांनी मराठ्यांच्या आरमार दळाची उभारणी केली.

१. जहाजांचा आकार :

मराठ्यांच्या साम्राज्यातील शिवकाळातील जहाजांचा आकार युरोपियनांच्या जहाजांच्या तुलनेने लहान होता. शिवाजी महाराजांच्या आरमारातील सर्वात मोठा जहाज 'गुरावा' होता. त्याचे वजन २०० ते ३०० टन असे. जहाजे लहान आकाराची असावीत. कारण मोठ्या आकाराची जहाजे वाऱ्याविना निरुपयोगी ठरतात असे रामचंद्रपंत अमात्य यांनी म्हटले होते. मराठ्यांच्या जहाजांचा आकार लहान असल्याचे आणखी एक कारण म्हणजे मोठी जहाजे बांधण्यासाठी जे तंत्रज्ञान लागत होते ते मराठ्यांजवळ नव्हते.

२. मराठ्यांच्या जहाजांचे प्रकार :

मराठ्यांच्या आरमारामध्ये वेगवेगळ्या प्रकारची जहाजे होती, गुरावा, गलबत, मचवा, शिवार, तरांडी, पगार, दुवार, गॅलिव्हॅटस्, तारु, होडी ही या जहाजाची नावे आहेत.

३. आरमार दलाची रचना :

मराठ्यांच्या आरमार दलाची रचनेबाबत फारशी माहिती उपलब्ध नाही. मात्र रामचंद्र अमात्य यांनी त्यांच्या संघटनेचे वर्णन करताना लिहिले आहे की ५ गुराब १५ गलबते मिळूण एक सुभा बनत असे. प्रत्येक सुभ्यावर एक अधिकारी नेमलेला असे. अशा सर्व सुभ्याचा मिळून दोन मोठी आरमार दले निर्माण केलेली असत. प्रत्येक दलावर एक आरमार प्रमुख नेमला जात असे. या दोन आरमार प्रमुखांसाठी माय नाईक व दर्यासारंग अशी दोन पदे निर्माण करण्यात आली होती.

४. आरमारातील अधिकारी व सैन्य :

आरमारात मायनाईक, दर्यासांरग म्हणून व्यकंटजी सारंजजी व दर्यासांरग म्हणून दौलतखान काम पहात असे. मायनाईक हे पद हिंदू भंडारी जातीकडे असे. तर दर्यासांरग हे पद मुस्लिमांकडे असे.

शिवाजी महाराजांच्या आरमारातील कोकणपट्टीवरील कोळी, भंडारी, मलबारी, सनगर, आंग्रे या लोकांना खलाशी म्हणून घेतले जात असे. समुद्रावरील त्यांचा धाडशीपणा, काटकपणा व अनुभव याचा फायदा घेवून शिवाजी महाराजांनी आपले आरमार बळकट केले.

शिवाजी महाराजांनी आपल्या आरमारात परकियांना नोकऱ्या दिल्या होत्या किंवा नाही याबाबत मतभेद आहेत. परंत्तु काही पोर्तुगीज कारागिर शिवाजी महाराजांच्या आरमारात कामाला होते. अशी माहिती मिळते. १६५९ मध्ये ३०० परकीयांना शिवाजी महाराजांच्या आरमारातून नोकऱ्या सोडाव्या लागल्या होत्या. हे नोकरी करणारे पोर्तुगीज असावेत असा तर्क काढला जातो.

५. मराठ्यांच्या व्यापारी नौका :

मराठ्यांनी युध्दनौकांबरोबरच काही व्यापारी नौकाही बांधल्या होत्या. या व्यापारी नौका जरी असल्या तरी कधी कधी युद्ध प्रसंगी यांचा वापर युद्धासाठी केला जात असे. व्यापारी नौकात मचवा, शिवार, तरांडी, पगार यांचा समावेश होता. मचवा म्हणजे मोठी चौकोनी एक शिडी असलेली बोट. तिचे वजन १ ते १।। टन असे. १०० टनापर्यंत क्षमता असलेल्या तरांडी व पगार या बोटी सुद्धा मराठ्यांच्या आरमारात होत्या. मात्र युरोपियन व्यापाऱ्यांच्या तुलनेने मराठ्यांच्या व्यापारी नौका ह्या लहान होत्या.

६. मराठ्यांच्या आरमारातील जहाजांची संख्या :

मराठ्यांच्या आरमारात किती जहाजे होती या बाबत मतभेद आहेत. मात्र वेगवेगळ्या संदर्भांच्या आधारे या जहाजांच्या आकडेवारीच्या अंदाज येतो – इ.स. १६५९ मध्ये शिवाजी महाराजाने कल्याण, भिवंडी व पेण जिंकल्यावर २० जहाजे बांधल्याचा उल्लेख मिळतो. चौल प्रांतांचा पोर्तुगीज कॅप्टन सांगतो १९६४ मध्ये शिवाजी महाराजांनी ५० जहाजे बांधली. ऑर्म हा पाश्चात्य लेखक म्हणतो की "सन १६७५ मध्ये शिवाजीच्या जहाजांची संख्या ५७ होती. त्यात १५ गुराब व ४२ गलबते होती. यावर भरपूर सैन्य होते. डॉ. फ्रायरने त्यांच्या खरेपाटणच्या प्रवासात

शिवाजी जवळ ३०० छोट्या नौका होत्या असे म्हटले आहे. सर जदूनाथ सरकार यांनी शिवाजी महाराजांकडे १६० युद्ध नौका होत्या असे म्हटले आहे. सभासद बखरकार म्हणतो," शिवाजी महाराजांच्या दोन आरमारी तुकड्या व ४०० युद्ध नौका होत्या". चित्रगुप्ताच्या बखरीत शिवाजी महाराजांच्या युद्ध नौकांची संख्या ६४० दिली आहे. वरिल सर्व तज्ञांची मते व संखेचा विचार केला तर मराठ्यांच्या आरमाराबाबत एकमत आढळून येत नाही.

७. आरमार बांधणी व आरमार किल्ले :

मराठ्यांच्या आरमार बांधणीची सुरुवात शिवाजी महाराजांनी भिवंडी प्रदेश जिंकल्यापासून झाली. कोकण किनार पट्टी वरील कल्याण, भिवंडी, पनवेल, राजापूर, देवगड, मालवण अशा अनेक बंदरात शिवाजी महाराजांचे जहाज बांधणीचे व जहाज दुरुस्तीचे उद्योग चालू होते. जहाज बांधणीसाठी आवश्यक असणारे सागाचे लाकुड मुबलक प्रमाणात कोकणातील जंगलात उपलब्ध होते. तसेच स्थानिक कारागिरही उपलब्ध होते. काही पोर्तुगीज कारागिरही शिवाजी महाराजांनी आपल्या पदरी ठेवल्याची माहिती उपलब्ध आहे.

आरमार संरक्षणाच्या दृष्टीकोनात शिवाजी महाराजांनी विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, रत्नागिरी, सिंधूदुर्ग, इत्यादी ठिकाणी किल्ले बांधले. सिद्दीच्या आक्रमनाला पायबंद घालण्यासाठी शिवाजी महाराजांनी राजापूरच्या खाडीवर पद्मदुर्ग हा किल्ला बांधला तर मुंबईतील इंग्रजावर वचक निर्माण होण्यासाठी मुंबई लगतच्या खांदेरी या बेटावर तटबंदी करुन तेथे आरमारी तळ उभे केले.

८. मराठ्यांची नाविक युद्ध पद्धती :

मराठयांची नाविक युद्ध पद्धती विशिष्ट प्रकारची होती. जर शत्रुच्या आरमाराबरोबर गाठ पडली तर सर्वानी एकत्र यावे व शत्रुचे सामर्थ्य मोठे असेल व शत्रु जर जेरीस येत नसेल तर शत्रुशी सरळ सामना न करता हळूहळू जलदुर्गांचा आश्रय घ्यावा. आपल्या जहाजांची खराबी होवू नये म्हणून दक्षता घ्यावी. शत्रु जरी शरण आला तरी त्याच्यावर एकाएकी विश्वास न ठेवता त्याच्याबरोबर दूरुन बोलणी करावी.

आरमार छावणी करावयाची असल्यास तुफान होण्या अगोदर आढ पंधरा दिवासापूर्वी करावी. प्रतिवर्षी नव्या बंदरात छावणी करावी. बंदराच्या जवळ सागरी किल्ला असावा. तसेच सर्व आरमार एकाच ठिकाणी ठेवू नये. ठिकठिकाणी छावण्या करुन ठेवाव्यात. जे सामान लागेल ते मुख्य अधिकाऱ्याकडून मागून घ्यावे. आरमारासाठी लागणारे सामान आपल्या राज्यात मिळत नसेल तर ते परमुलखातून आणावे.

९. मराठ्यांच्या आरमाराचे कार्य :

मराठ्यांच्या आरमाराच्या कार्याबाबत इतिहासकारात व विचारवंतात मतभेद आहेत. डॉ. सेन यांचे म्हणने असे आहे की, "सिद्दीचे भांडण करण्यापलिकडे शिवाजी महाराजांच्या आरमारानी काही मिळविले नाही." सेन यांचे म्हणने योग्य नाही कारण पोर्तुगीज कागदपत्रावरुन इ.स. १६५७ मध्ये शिवाजी महाराजाने सागरावर वर्चस्व गाजविणाऱ्या पोर्तगीजांवर वचक बसवून समुद्र संचाराचा आपला स्वतंत्र अधिकार प्रस्तापित केला होता. १६६० मध्ये आरमाराच्या जोरावरच विजापूरच्या सुलतानाचा पराभव करुन राजापूर, दाभोळ इत्यादी महत्त्वाची बंदरे् घेतली होती. सुरत बखरीतील कागदपत्रावरुन जून १६६४ मध्ये शिवाजी महाराजांनी आपली ६० जहाजे पाठवून वसनूस प्रांत लुटली. १६७० मध्ये शिवाजी महाराजांचे नाविक सामर्थ्य इतके वाढले होते की मुंबईच्या खाडीत आपल्या १६० युद्धनौका उभ्या करुन मुंबईकर इंग्रजांच्या मनात दहशत

उभी केली होती. सन १६७५ मध्ये कारवार व वेंगुर्ला जिंकला. जीवनाच्या अंतिम टप्प्यात महाराजांनी खांदेरीवर विजयी पताका झलकावून इंग्रजांचा ध्वज मोडून काढला. सिद्दीच्या दंडाराजापूरी सारख्या महत्त्वाच्या ठिकाणांचे महत्त्व कमी करुन महाराजांनी जंजिऱ्याशी शेवटपर्यंत धडक दिली.

८.९ केंद्रिय न्यायव्यवस्था

मराठ्यांच्या केंद्रिय न्यायव्यवस्थेत राजा, राजमंडळ, हुजूर, मजलिस व गोमजलिस किंवा गोतसभा या न्यायालयीन संख्या न्यायदानाचे कार्य करत होत्या. या न्यायलयीन संस्थांची माहिती पुढील प्रमाणे आहे.

१. राजा :

मराठ्यांच्या न्यायव्यवस्थेचा सर्वोच्य प्रमुख राजा असे. हिंदू धर्मशास्त्रानुसार राजा हाच न्यायखात्याचा प्रमुख असे. राजाला न्यायव्यवस्थेमध्ये मदत करण्यासाठी राजमंडळ असे. या राजमंडळात अष्टप्रधान मंडळ, खाजगी सचिव व त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या दुय्यम मुतालिक यांचा समावेश असे. काही प्रसंगी विद्वान लोकांचा समावेश राजमंडळात केला जात असे. राजमंडळातील सर्व सभासदांची निवड करण्याचा अधिकार राजाला होता. हे सर्व सभासद राजास जबाबदार असत. जो पर्यंत राजाची मर्जी असे तो पर्यंत हे लोक राजमंडळात रहात असत. केंद्रिय न्यायव्यवस्थेमध्ये राजा व्यतिरिक्त न्यायाधीश व पंडितराव हे दोन्ही मंत्री स्वतंत्रपणे न्यायदानाचे काम करत होते.

२. न्यायाधीश व पंडितराव :

मराठ्यांच्या केंद्रिय न्यायव्यवस्थेतील राजाच्या खालोखालचे अधिकारी म्हणजे न्यायाधीश व पंडितराव होय. या दोन्ही अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याचा अधिकार राजाला असे. या लोकांनी प्रचलीत कायद्यांना अनुसरुन व धर्मशास्त्राला अनुसरुन न्याय द्यावा असे त्यांच्यावर बंधन असे. तसेच या न्यायाधीशांनी दिलेल्या निकालांवर राजाची संमतीदर्शक सही असावी असे बंधन होते या न्यायाधीशांच्या अधिकार कक्षा राज्यातील सर्व खटल्यावर चालत असत.

केंद्रिय न्यायाधीशांच्या जोडीला पंडीतराव हा दुसरा न्यायाधीश असे. त्यांच्याकडे फक्त धार्मिक खटले असत. देवस्थानाला दिलेल्या इनामाबद्दल जर काही खटले उपस्थित झाले तर ते खटले पंडितराव धर्मशास्त्राच्या आधारे चालवित असे. स्वत: शिवाजी महाराजांनी आपल्या राजवटीत न्यायाधीश व पंडीतरावांना काही खटले चालविण्यास दिल्याची उदाहरणे आहेत.

शिवाजी महाराजांनी आपल्या राजवटीत या पदावर काम करणाऱ्या व्यक्ती प्रामाणिक, हुशार, बुद्धीमान, हिंदू कायद्याचे व रुढीचे ज्ञान असणाऱ्या निवडल्या म्हणूनच त्यांनी नि:पक्षपातीपणे काम केले. परमानंद म्हणतात, "शिवाजी महाराजांनी आपल्या राजवटीत न्यायाधीशांची कदर केली. त्यांना ते वार्षिक ३००० होन पगार देत होते".

३. राजमंडळ किंवा राजसभा :

मराठ्यांनी आपल्या राजवटीत न्यायव्यवस्थेचा व्यवस्थापनासाठी राजमंडळ किंवा राजसभा निर्माण केली होती. या राजमंडळात राजा, राजाचे मंत्री, उच्च अधिकारी, (सुभेदार, हवालदार,

मुजुमदार, सरनोबत) असत या व्यतिरिक्त या मंडळात देशमुख, देशपांडे, पाटील, कुलकर्णी, शेटे, महाजन या अधिकाऱ्यांचाही समावेश असे.

राजमंडळातील सभासदाने न्यायालय भरल्यानंतर राजाला संबधीत खटल्याची माहिती देणे व न्यायाच्या बाबतीत राजाला सल्ला देणे बंधनकारक असे. तसेच राजाने निकाल दिल्या नंतर जी राजमुद्रा तयार होत असे त्या राजमुद्रेवर सही करणे ही बंधनकारक असे.

वतनाचे वारस ठरविणे, वतनासंबधीची भांडणे सोडविणे, खरेदी-विक्रीच्या गैर प्रकाराची भांडणे सोडविणे आदीकामे राममंडळ करत असे. खटल्या प्रसंगी राजमंडळात फक्त संबधीत प्रांताचे सुभेदार, विद्वान ब्राम्हण, मुजुमदार, देशमुख, देशकुलकर्णी व शेटे यांना बोलविले जात असे.

गावराजमंडळ, महालराजमंडळ, परगणा राजमंडळ, व सुभाराजमंडळ अशा चढत्या श्रेणीने या राजमंडळाचे काम चालत असे. चढत्या श्रेणीतील सर्वोच्य स्थानावर सुभा असे. परिणामी या ठिकाणी सुभेदार न्यायदानाचे काम करत असे. परंतू त्यांने दिलेल्या निकालावर राजाची सही झाल्याशिवाय सुभेदारानी दिलेला निकाल अंतिम समजला जात नसे. सुभा मजलिसाचे काम कसब्याच्या ठिकाणी चालत असे.

४. ब्राम्हसभा किंवा धर्मसभा :

मराठ्यांच्या राजवटीतील शिवकाळातील ब्राम्हसभा ही विद्वान ब्राम्हणांची सभा होती. ब्राम्हसभेची बैठक कोल्हापूर, पैठण, पंढरपूर या ठिकाणी भरत असे. ब्राम्हसभेपुढे सर्वसाधारणपणे सामाजिक व धार्मिक स्वरुपाचे खटले चालविले जात असत. या खटल्यामध्ये पुजाऱ्यांच्या मंदिरा बाबतच्या हक्का संबधीचे खटले, धर्माधिकाऱ्यांच्या वतनासंबधीचे खटले, जाती-जातीतील भांडणाचे खटले, हिंदू-मुस्लिम भांडणाचे खटले या खटल्यांचा समावेश असे. ब्राम्हसभेच्या न्यायविषयक बैठकीला गोतसभेच सभासद हजर असत. अशा वेळी ब्राम्हसभेच्या निर्णयाला गोतसभेकडून मान्यता मिळत असे. धार्मिक खटल्यासंबधी निर्णय देणारी ब्राम्हसभा ही शिवकाळातील एक महत्त्वपूर्ण संस्था होती.

दोन जातीमधील भांडण जेव्हा ब्राम्हसभे पुढे येत असे तेव्हा निकाल प्रसंगी ब्राम्हणसभा या जातीतील प्रमुख लोकांना बोलवत असे. तसेच त्यांच्या विनंतीवरुन ते सांगतिल त्या अधिकाऱ्यांना बोलावत असे

५. गोतमजलीस :

मराठ्यांच्या कालखंडातील केंद्रिय न्यायव्यवस्थेतील गोमजलीस ही दिवाणी स्वरुपाची खटले चालवणारी न्यायसंस्था होती. गोतमजलीसमध्ये देशमुख, तक्षीमदार, सरखोत नाईक, शेटे, पाटील, देशक, तेली, कुंभार, परीट, महार हे सभासद असत. देशमुख कुटुंबातील वतनासंबधीच्या भांडणाचे निकाल देण्याचे मुख्य काम गोतमजलीसचे असे. कवचीत प्रसंगी राजा, सुभेदार, राजकुटुंबातील व्यक्ती किंवा हवालदार गोतमजलीस सभेचे काम चालवून निकाल देत असत. गोतमजलीसचा निकाल देत असताना खटल्याच्या संबधीत अशी कागदपत्रे व पुरावे तपासले जात असत.

सन १६६७ मध्ये बाबाजी देशमुख व मालोजी पतंगराव यांच्या देशमुखी वतनासंबधीचा निकाल देतांना शिवाजी महाराजांच्या मातोश्री जिजाबाई यांनी गोमजलीसची सभा बोलावून निकाल दिल्याचा ऐतिहासिक संदर्भ मिळतो.

शिवाजी महाराजांपासून शाहू महाराजां पर्यंत मराठा कालखंडात ही केंद्रिय न्यायव्यवस्था प्रचलीत होती. पेशव्याच्या कारकिर्दीमध्येही थोड्याफार बदलासह या प्रशासन व्यवस्थेची कार्य अमलबजावणी सुरु होती.

८.१० प्रांतिय न्यायव्यवस्था

मराठ्याच्या न्यायालयीन व्यवस्थापनाचा महत्त्वपूर्ण भाग म्हणजे केंद्रिय न्यायव्यवस्थापन होय. केंद्रिय न्याय व्यवस्थापना बरोबरच न्यायव्यवस्थेचे विकेंद्रिकरण व्हावे या उद्देशाने मराठ्यांने प्रांतिय न्यायव्यवस्थाही सुरु ठेवली होती. मराठ्यांची प्रांतिय प्रशासन व्यवस्था समजून घेत असताना आपल्याला प्रांतिय मंत्री, सुभा मजलीस, परगणा गोतमजलीस, तर्फ किंवा ठाणा मजलीस, ग्राम मजलीस या सर्व घटकांचा विचार करावा लागेल.

१. मत्र्यांचे विभाग :

हा मराठ्यांच्या स्थानिक प्रशासनाच्या महत्त्वाचा भाग होता. मराठ्यांचे स्थानिक प्रशासन दोन भागात विभागले होते. त्यातील एक भाग हा मंत्र्यांच्या ताब्यात होता. मंत्र्यांच्या ताब्यात हा जो भाग होता तो सुसंघटीत होता. या भागावर मंत्र्यांचे पूर्ण नियंत्रण असे. या भागाचे कामकाज हे मंत्री पहात असत. मात्र मंत्री विभागामार्फत जे कामकाज पाहिले जात असे त्या बाबत फारशी माहिती उपलब्ध नाही.

प्रांतीय व्यवस्थापनाचा जो दुसरा भाग होता तो इतस्तः पसरला होता. या विभागावर सुभेदाराचे नियंत्रण असे. दुसऱ्या भागावर जरी सुभेदाराचे नियंत्रण असले तरी सुभेदार मंत्र्यांना कामात मदत करत असे. त्याच बरोबर महत्त्वपूर्ण असणाऱ्या न्यायदानाच्या कामातही मदत करत असे.

२. सुभा मजलीस :

सुभा मजलीस ही मराठा कालखंडातील प्रांतीय प्रशासनाचा दुसरा महत्त्वपूर्ण भाग होता. मराठ्यांच्या कालखंडातील महत्त्वपूर्ण न्यायसंस्था म्हणजे सुभा मजलीस होय. सुभेदार हा सुभा मजलीसाचा प्रमुख असे. राजाचा प्रतिनिधी म्हणून तो सुभामजलीसामध्ये न्यायदानाचे काम करत असे. वतनासंबधीचे खटले चालविणे हे सुभेदाराचे मुख्य काम असे. अशा प्रकारचे खटले चालविण्यासाठी सुभेदार स्थानिक गोतसभा, हवालदार व परगण्याचे देशमुख यांची मदत घेत असे. वतनाची परवानगी घेताना, वतनाची खरेदी-विक्री करताना दोन्ही पक्षांना सुभेदाराच्या सह्या घ्याव्या लागत असत. जमीनी महसूलाचे दावे निकालात काढण्याचे काम सुभेदाराला करावे लागत असे.

प्रशासकीय कामाबरोबरच सुभेदाराला सुभामजलीसामध्ये न्यायदानाचे काम करावे लागत असे. तसेच दिलेल्या निकालाची अमलबजावणीही त्यालाच करावी लागत असे. लोकांच्या तक्रारी ऐकून न्यायनिवाडा करणे हे सुभेदाराचे काम असे. सुभेदाराला फौजदारी गुन्हे राजाकडे पाठवावे लागत असत. मात्र प्रांतातील दिवाणी व फौजदारी अशा दोन्ही स्वरुपाच्या प्रकरणावर सुभेदाराला देखरेख ठेवावी लागत असे.

३. परगण्या गोतमजलीस :

मराठ्यांच्या प्रांतीय प्रशासनातील सुभा मजलीस ही सर्वोच्या न्यायसंस्था होती. सुभा मजलीस प्रमाणे प्रांतीय पातळीवर न्यायदानाचे काम करणारी आणखी एक न्यायसंस्था प्रचलित होती. ती

संस्था म्हणजे परगणा गोतमजलीस होय. परगणा गोतमजलीसमध्ये देशमुख हा प्रमुख म्हणून काम पहात होता. राजाचा प्रतिनिधी म्हणून तो परगणा गोतमजलीसमध्ये न्यायदानाचे काम पहात होता. परगणा गोतमजलीसमध्ये देशमुख, देशपांडे बरोबर देसाई सरदेसाई, आणि गावपातळीवर पाटील, कुलकर्णी, शेटे, महाजन व चौगुला हे अधिकारी असत.

परगणा गोतमजलीसचा प्रमुख म्हणून देशमुखाला दिवाणी व फौजदारी अशा दोन्ही प्रकारचे खटले चालवावे लागत असत. या दोन महत्त्वपूर्ण खटल्या व्यतिरिक्त जमीन महसूलाच्या वसूली संबधीच्या तक्रारी सोडविणे, परगण्यातील मोकादमाविरुद्ध रयतेकडून आलेल्या तक्रारींची चौकशी करणे व त्या तक्रारी निकालात काढणे, परगण्यातील वतनासंबधीच्या तक्रारी ऐकून घेणे व गोतमजलीसच्या मदतीने त्यांच्या निकाल देणे ही कामे देशमुखाला करावी लागत होती.

वतनाची अदलाबदल व वतनावरील हक्क या संबधीच्या तक्रारींचा निकाल देताना देशमुख संबधीत गावातील प्रमुख रहिवाशांना साक्षीदार म्हणून बोलावत असे. साक्षीदारांच्या तक्रारदाराच्या तक्रारीचे स्वरुप सांगत असे. कागदपत्राचे पुरावे तयार करत असे व उपस्थितांचे सल्ले व सूचना विचारात घेवूनच निर्णय देत असे. जर पाटील कुलकर्ण्याच्या वतनासंबधीचा खटला असेल तर अशा प्रसंगी देशमुख परगणा गोतमजलीसच्या सर्व सभासदांना बोलवित असे. या सभासदा व्यतिरिक्त संबधीत गावाच्या प्रतिष्ठीत गावकऱ्यांना साक्षीदार म्हणून बोलवित असे.

देशमुखाला गोतमजलीसने निवाडापत्र तयार केल्यानंतर निवाडापत्रावर सही करावी लागत असे. देशमुख मुतालिकामार्फत वादी व प्रतिवादी यांच्याकडून न्यायालयीन शुल्क वसूल करीत असे. त्याला परगणा गोतमजलीसने दिलेल्या निकालासंबधीच्या अहवाल राजाला सादर करावा लागत असे. जर त्यास वाटले की एखाद्या खटल्या संबधीचा निर्णय ग्रामगोतसभेमार्फत लागावा तर तो अशा खटल्या संबधीची सर्व कागदपत्रे तयार करुन तो ग्रामगोतसभेकडे पाठवित असे. खुनासारख्या गुन्ह्याच्या संदर्भातील खटल्यात सरकारचा प्रतिनिधी व गोतमजलीसचा प्रमुख या नात्याने देशमुखाला महत्त्वाची भुमिका पार पाडावी लागत असे.

४. तर्फ किंवा ठाणा मजलीस :

मराठ्यांच्या प्रांतीय न्यायव्यवस्थेतील तर्फ किंवा ठाणा मजलीस हा एक महत्त्वपूर्ण असा न्यायव्यवस्थेशी संबंधीत असा भाग होता. तर्फ किंवा ठाणा मजलीसमध्ये हवालदार व ठाणा गोतसभा असे दोन भाग होते. हवालदार हा निश्चित स्वरुपाच्या पगारावर काम करणारा अधिकारी असला तरी त्याला मजलीसच्या साहय्याने न्यायदानाचे काम करावे लागत असे.

हवालदार हा ठाणा मजलीसचा प्रमुख असल्याने त्याला ठाणा मजलीसच्या कामावर देखरेख ठेवणे, गावांच्या सरहद्दीसंबधीचे तंटे मिटविणे, इनाम वतनासंबधीच्या तक्रारी दूर करणे, ही कामे करावी लागत होती. तालुका किंवा ठाणा मजलीसची सभा बोलावून त्याला या सभेच्या सल्ल्याने न्यायदानाचे काम करावे लागत असे. हवालदाराला या कालखंडात बरेच न्यायालयीन अधिकार प्राप्त झाले होते. तालुक्यात शांतता निर्माण करणे, तालुक्यातील शांतता व सुव्यवस्था बिघडविणाऱ्यांना शिक्षा करणे, कैद्यांवर नजर ठेवणे, तुरुंगाच्या व्यवस्थेवर देखरेख ठेवणे, ठाणा मजलीसने गुन्हेगारांना केलेला दंड वसूल करणे, थकबाकीदारांना शिक्षा करणे इत्यादी न्यायालयीन कामे हवालदाराला करावी लागत होती.

जेव्हा परगणा मजलीससमोर एखादा खटला उभा रहात असे त्यावेळी हवालदार पंच म्हणून त्याच्या विभागातील गुन्ह्याच्या ठिकाणाला भेट देवून स्वतः चौकशी करत असे. व चौकशी अहवाल परगणा मजलीस प्रमुख सुभेदार याला सादर करत असे. एखाद्या घटनेच्या ज्यावेळी

पंचनामा होत असे त्यावेळी हवालदार सरकारच्या वतीने पंच म्हणून तेथे हजर रहात असे. वादी व प्रतिवादी कडून जाब-जबाब होत असताना सरकारी साक्षीदार म्हणून हवालदाराची उपस्थिती आवश्यक मानली जात असे. वरिल अधिकारी व मदतनीसांच्या माध्यमातून तर्फ किंवा ठाणा मजलीसचे कामकाज चालत असे.

५. ग्राम मजलीस :

मराठ्यांच्या न्यायप्रशासनातील सर्वात कनिष्ठ न्यायव्यवस्था म्हणजे ग्राममजलीस होय. ग्राम मजलीसमध्ये मुकादम, चौगुला व मुजुमदार हे या न्यायप्रशासनात महत्त्वाची भूमिका निभावत असत.

मराठ्यांच्या कालखंडात गावाचा मुख्य मुकादम अथवा पाटील असे. यांच्याकडेच मुलकी व न्यायालयीन असे दोन्ही अधिकार असत. न्यायालयीन विभागातील मुकादमाचे अधिकार व्यापक होते. गावातील गोतसभेच्या तो अध्यक्ष होता. गावातील लोकांच्या वतनासंबधीच्या तक्रारी तो गोतसभेच्या माध्यमातून सोडविण्यासाठी प्रयत्न करत असे. तो गावाच्या सरहद्दीसंबधीछे प्रश्नही ग्रामसभेच्या साहाय्याने सोडविण्यासाठी प्रयत्न करत असे.

मुकादमा प्रमाणेच चौगुला हा सुद्धा ग्राममजलीमधील एक महत्त्वपूर्ण घटक होता. ग्राममजलीस खटल्याचे कामकाज चालविताना गावाचा चौगुला म्हणून त्यास हजर रहावे लागत असे. तसेच निकालपत्र तयार झाल्यानंतर त्यास त्या निकालपत्रावर सही करावी लागत असे.

चौगुल्याप्रमाणेच मुजुमदार हा सुद्धा ग्राममजलीसमधील एक महत्त्वपूर्ण घटक होता. मुजुदारालासुद्धा चौगुल्या प्रमाणेच खटला सुरु असताना हजर रहाण्याचा व निकालपत्रांवर सह्या करण्याचा अधिकार होता.

८.११ स्थानिक न्यायसंस्था :

मध्ययुगीन कालखंडाचा जर विचार केला तर आपणास असे दिसून येते की काही संस्था एकाच वेळी न्यायदानाचे व प्रशासनाचे काम करताना आपणास दिसतात. काही संस्था या पूर्वापार चालत आलेल्या असत. त्यांची कामे व अधिकार परंपरेने मान्य केलेले असत. या काळात न्यायव्यवस्था व जमीनधारणाव्यवस्थेचा एकमेकाबरोबर जवळचा संबध आला होता. जमीनदार हे संबधीत प्रदेशातील महत्त्वपूर्ण व्यक्ती असल्याने त्यांच्याकडेच न्यायालयीन व प्रशासकीय अधिकार असत. जमीनदारीच्या पद्धतीमध्ये आपल्याला तीन प्रकार दिसून येतात १) वतनदारी २) थळकरी किंवा मिराशी ३) उपरी या पद्धतीमध्ये सुद्धा स्थानिक न्यायसंस्था प्रचलीत झाल्या होत्या.

१. वतनदारी पद्धत :

'वतन' हा शब्द अरेबिक भाषेतून मराठीत आला आहे. वतन या शब्दाचा अर्थ देश किंवा राहण्याचे ठिकाण असा आहे. मुस्लिम संपर्कामुळे मराठ्यांमध्ये वतनदारी पद्धत सुरु झाली. मराठ्यांच्या कालखंडामध्ये जे वतनदार होते त्या वतनदारामध्ये देशमुख, देशपांडे, मुकादम, कुलकर्णी आणि जोशी यांचा समावेश होता. या वतनदाराना आपल्या वेगवेगळ्या कार्यप्रकाशनुसार हक्क व अधिकार होते. हे अधिकारी आपल्या ताब्यात असणाऱ्या प्रदेशात न्यायालयीन व प्रशासकीय कामे करत असत. हे सर्वच वतनदार सामान्य लोकांमधून निर्माण झालेले असल्याने यांना फार किंमत होती. परगण्यातील वतनदार किंवा त्यांचे अधिकारी तसेच

तर्फ कसबा व खेडेगावातील गोत या सर्वांना मिळून 'देशक' असे म्हणत. हे देशकच वतनदारीच्या बाबतीत न्यायनिवाड करत असत. म्हणूनच वतनदारी पद्धतीमध्ये न्यायव्यवस्था अस्तित्त्वात असल्याचे दिसते. मराठा राजवटीमध्ये ही पद्धत सुरु होती. या पद्धतीमध्ये फारसा बदल झाला नाही.

२. थळकरी अथवा मिराशी पद्धत :

थळकरी हा शब्द संस्कृतमधल्या 'स्थळ' या शब्दापासून आला हे. स्थळ म्हणजे एखादी वैशिष्ट्येपूर्ण जागा किंवा जमीन होय. स्थळकरी अथवा मिराशी या व्यक्ती साधारणत: समाजातील अशा गटातील असत की ज्या गटाने एखादे गाव लागवडीखाली आणत असताना अनेक प्रकारचे प्रयत्न करुन त्या गावाच्या उत्पन्नात भर घातलेली असे. काही वेळा हे लोक स्वत: जमीनी लागवडीखाली आणीत किंवा बाहेरुन आपल्या विश्वासातील माणसे गावात आणून त्यांच्यामार्फत जमीनीची लागवड करत असत. अर्थातच अशा लोकांना थळकरी असे म्हटले जात असे. व त्यांच्याकडे त्या गावाबद्दलचे मिराशीचे हक्क स्वाभाविकच प्राप्त होत असत. मुस्लमानपूर्व काळापासून ही पद्धत अस्तित्त्वात होती. त्यावेळी त्याला थळकरी असे म्हणत. मुस्लमांनी अमलामध्ये या पद्धतीचा उल्लेख मिराशी या अरेबिक शब्दाने होवू लागला. मिराशी म्हणजे वंशपरंपरेने चालत आलेला हक्क होय. विशेषत: दक्षिणेमध्ये मिराशीचा हक्क संबधीत जमीनदारीमध्ये सर्वश्रेष्ठ मानत असत. मिराशी या शब्दाचा शिवचरित्रसाहित्यामध्ये नमुद केल्या प्रमाणे विधायक स्वरुपाची, कायमची व वंशपरंपरेने चालणारी अशी जमीनदारी पद्धत होय. काही वेळेला हे मिरासदार इतर वतनदाराकडून वेगवेगळ्या प्रकारचे शुल्क वसूल करीत असत. मिराशी ही पद्धत जमीनदारीप्रमाणेच न्यायव्यवस्थेचा एक भाग होती ही गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे.

३. उपरी पद्धत :

उपरी म्हणजे एखाद्या गावात कामासाठी बाहेरुन आलेली माणसे होत. त्यांना कसण्यासाठी अल्प मदतीने जमिनी देत असत. अशा जमिनी देण्याच्या कागदपत्रांना कौलनामा असे म्हणत. उपरी लोकांना दिलेले कौलनामे हे नोकरीच्या स्वरुपाचे असत. खेडेगावात मिरासदाराला ज्या प्रमाणे मानाची वागणूक मिळत असे त्या प्रमाणे उपरीला मानाची वागणूक मिळत नसे. उलट उपरीला मिरासदाराच्या मर्जीवरच अवलंबून राहावे लागत असे. कालांतराने या उपरीचे मिरासदारांमध्ये रुपांतर झाले. असे हे उपरी इतर मिरासदारांचे घरभाऊ किंवा बापभाऊ झाले असे समजत असत. अशा प्रकारे वरील प्रकारचे हे तीन वतनदार असत. या तिन्ही प्रकारच्या वतनदाराना तर्फ, कसबा या ठिकाणी स्वत:च्या कक्षेमध्ये सर्व प्रकारचे स्थानिक प्रश्न, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, प्रशासकीय व न्यायालयीन अधिकार असत. त्यांच्याच जोडीला असणारी व पूर्वापार चालत आलेली एक सभा म्हणजे गोतसभा होय. ही गोतसभा स्थानिक न्यायसंस्थेच्या बाबतीत अत्यंत महत्त्वाची कामगिरी बजावत असे. अशा या वतनदारीपद्धतीतूनच स्थानिक न्यायव्यवस्थेचा पाया घातला गेला होता. डॉ. गुणे म्हणतात, "वतनाचा कायदा किंवा मिराशीचा कायदा हाच त्याकाळातील जमीनीच्या बाबतीत एक सार्वजनिक कायदा म्हणुन ओळखला जात असे."

४. गोतसभा :

मराठ्यांच्या कालखंडातील गोतसभा मराठ्यांच्या न्यायव्यवस्थेचा महत्त्वाचा अंश मानला जात होता. गोतसभेला शाहू महाराजांच्या कारकिर्दीत महत्त्व प्राप्त झाले होते. मराठ्यांच्या

न्यायव्यवस्थेचे खास वैशिष्ट्ये म्हणून गोतसभेकडे पाहिले जाते. या कालखंडात गोतसभेचे एकूण तीन प्रकार प्रचलित होते.

१. परगणा गोतसभा

२. तर्फ, कसबा किंवा पेठ गोतसभा

३. खेडेगावची गोतसभा

१) परगणा गोतसभा :

परगण्यातील एक वतनदार न्यायसंस्था म्हणून परगणा गोतसभेकडे पाहिले जाते. या सभेत देशमुख, देशपांडे शेटे, महाजन, मोकादम, पाटील, नायकवडी, मिरासदार, व रयत यांचा समावेश होत असे. परगणा गोतसभेचा मुख्य अधिकारी म्हणजे देशमुख, त्यास देशपांडे साहाय्य करत असे. हे अधिकारी परगण्याचे आर्थिक, न्यायालयीन व सार्वजनिक शांततेचे प्रश्न हाताळत असत. हे अधिकारी परगण्यातील रयतेचे प्रतिनिधी म्हणून काम पहात असत. काही वेळा दिवाण हा परगणा मजलिसाच्या मार्फत अनेक प्रश्नांचा निकाल लावत असे.

२) तर्फ, कसबा किंवा पेठ गोतसभा :

या गोतसभेमध्ये सर्व देशक म्हणजे देशमुख, देशपांडे, शेटे, महाजन, नायकवडी, पाटील, कुलकर्णी व चौगुला यांचा समावेश होत असे. पेठ गोतसभेचा दिवाण कसबा मजलिसाच्या मार्फत न्यायालयीन काम पहात असे. कसबा म्हणजे व्यापाराचे ठिकाण. त्यालाच पेठ असे सुद्धा म्हणत. कसब्याचे सोयीसाठी दोन भाग पाडलेले असत. त्यापैकी पहिल्यास मंजुरी व दुसऱ्यास मोहतर्फ म्हणत. या गोतसभेमध्ये असणारी सर्व माणसे निवाडापत्रावर आपापल्या खुणा करत असत. या खुना पुढील प्रमाणे आहेत.

नावे	**त्यांच्या सहायक शेटे**	**खुणा**
महाजन	-	तराजू
सोनार	-	ऐरण
शिंपी	-	कात्री
ठाकूर	-	कट्यार
आवटी	-	माप
माळी	-	मोठी कात्री
जिनगर	-	करवत
नायकवडी	-	दंडूका

कसब्यातील व्यापारपेठेचे संरक्षण करण्याचे काम शेठेंकडे असे. या शेठेला मदत करण्याचे काम इतर बलुतेदार करत असत. या बलुतेदारांना खून असे म्हणत. अशा रीतीने ही पेठ गोतसभा न्यायविषयक काम करत असे.

३) खेडेगावातील गोतसभा :

ग्रामगोतसभा ही गोतसभेमधील सर्वात पहिली पायरी आहे. या सभेत गावातील सर्व वतनदार, बारा बलुतेदार व उपरे व अलुतेदारांचा समावेश असे. गावातील वतनदारांपैकी सर्वात प्रमुख म्हणजे मुकादम व पाटील होय. त्याच्या मदतीस कुलकर्णी व चौगुले असत. थळकरी किंवा मिरासदार, बारा बलुतेदार च इतर प्रजा हे सर्व एकत्र बसून प्रशासकीय व न्यायदानविषयक कामे करीत असत. कर गोळा करणे, लोकांचे संरक्षण करणे व गावात निर्माण होणाऱ्या खटल्यांचा निकाल लावणे ही यांची कामे असत. गोतसभेने दिलेला निर्णय राजाला सुद्धा बदलता येत नसे. एखाद्या निवाडापत्रावर सर्व उपस्थित अधिकाऱ्यांनी आपले शिक्के उमटविले म्हणजे तो न्याय पक्का झाला असे समजत. बलुतेदारांची संमत चिन्हे अशा निवाडा पत्रावर पुढील प्रमाणे –

नावे		खूणा
सुतार	-	पातळी
चांभार	-	आरी
णहार	-	विळा व दोर
कुंभार	-	चाकू
न्हावी	-	आरसा
भट	-	सही
मुलाणा	-	सुरा

वरील प्रकारचे सहा-शिक्के निवाडापत्रावर झाले की या सभेचा न्यायनिवाडा झाला असे समजण्यात येई. गोतसभेमध्ये संबधित अधिकाऱ्यांना विशेषत: परगणा गोतसभेच्या बाबतीत अव्वल किंवा अस्सल आणि फेरतपासणीचे अधिकार होते. पेठ गोतसभा व ग्रामगोतसभा यांना फक्त अस्सल न्यायनिवाड्याचे अधिकार असत.

५. ब्रह्मसभा :

ब्रह्मसभा म्हणजे विद्वान ब्राह्मणांची सभा होय. अशी सभा नाशिक, पैठण, पुणतांबे, कऱ्हाड, कोल्हापूर, महाबळेश्वर, वाई, आणि पंढरपूर अशा तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणीच असे. या सभेमध्ये फक्त स्थानिक वैदिक पंडित, मीमांसक, ज्योतिषी व पुराणिक यांचा समावेश असे. या सर्वांना धर्मशास्त्र चोगले आवगत असे. म्हणूनच सरकार या कामासाठी अशा लोकांची नियुक्ती करत असे. ब्राह्मसभेचा प्रमुखाला धर्माधिकारी म्हणत. धर्माधिकाऱ्याला सरकारातून धर्माधिकारीपणाचे वतन मिळत असे. ही ब्रह्मसभा आचार, विचार, व्यवहार यांचा विचार करुन प्रायश्चित सांगत असे. ब्रह्मसभेच्या न्यायदानविषयक कार्याबद्दल डॉ. गुणे म्हणतात की ही सभा ज्या वेळी तिला एखाद्या बाबतीत मजलिस किंवा सरकारी अधिकारी सल्ला विचारीत असत त्याच वेळी काम करत असे. इतर वेळेस या सभेच अस्तित्त्व लोकांना दिलासा देणारे असे. यामधील सभासद हे तज्ञ, नि:स्पृह असल्यामुळे त्यांच्यावर सर्वांचा विश्वास असे. ब्रह्मसभा आपल्या निवाड्याचे समर्थन करत असताना संस्कृत कायदेसंहितेतील संदर्भ देत असे. त्यामुळे स्वाभाविकच ब्रह्मसभेच्या निवाड्याबद्दल कोणाच्याही मनात संशय राहत नसे.

mumotes.in

६. जातिसभा :

जातिसभेच्या रचनेबाबत निश्चित स्वरुपाची माहिती मिळत नाही. परंतू नावावरुन असे दिसते की प्रत्येक जातीची स्वतंत्र सभा असून तीच्यामध्ये त्याच जातीतील माणसे एकत्र येत असत. या सभेत फक्त स्वत:ची जातीबंधने व्यवस्थीतपणे पाळली जातात किंवा नाही हे पाहिले जात असे. तर एखाद्या व्यक्तीने जातीबाह्य कृत्य केले तर तिला योग्य ती शिक्षा करण्याचे काम ही जातीसभा करीत असे. जर एखादे प्रकरण जातिसभेमध्ये संपले नाही तर ते प्रकरण ब्राह्मसभेकडे पाठविले जात असे व या प्रकरणाचा निकाल ब्राह्मसभेच्या माध्यमातून ग्राह्य धरला जात असे.

गोतसभा ही सर्व प्रकारच्या दिवाणी स्वरुपाच्या खटल्यांचा निकाल करत असे. ब्रह्मसभा, व जातिसभा या मुख्यत्वेकरुन धार्मिक, सामाजिक व वैयक्तीक स्वरुपाच्या खटल्यांचा निकाल करीत असत. अगदी क्कचित प्रसंगी ब्रह्मसभेच्या विरुद्ध हुजूर मजलिसकडे खटला पाठवीत असत. अन्यथा ब्रह्मसभा हीच पूर्वापार चालत आलेली अंतिम अशी न्यायसंस्था होती.

८.१२ कायदे, पुरावे, न्यायपद्धती, दिव्य या संबधी माहिती

मराठ्यांच्या केंद्रिय, प्रांतिय व स्थानिक न्यायसंस्थांची माहिती पाहिल्यानंतर आपल्याला या कालखंडात प्रत्यक्ष न्याय कसा दिला जात होता याची माहिती करुन घेणे आवश्यक आहे. न्यायदान करत असतांना पुढील प्रमुख बाबींचा विचार केला जात होता.

१. धर्म आणि व्यवहार :

मराठा कालखंडातील न्यायव्यवस्थेत न्यायदान करत असतांना धर्म आणि व्यवहार या दोन बाबींना महत्त्व दिले जात होते. धर्म याचा अर्थ हिंदू धार्मिक ग्रंथ व पुराणे, श्रृती व स्मृती यांच्यामध्ये दिलेला धर्म होय. आणि व्यवहार म्हणजे प्रचलित पद्धत पाहून सद्विवेकबुद्धीच्या जोरावर करावयाचा निर्णय होय. मध्ययुगीन कालखंडात मुस्लिम राजकर्ते जास्त प्रमाणात मुस्लिम कायद्यांकडे लक्ष देवू लागले. परिणामी हळूहळू हिंदू कायद्यांना कायदेव्यवस्थेत प्रवेश करण्याची संधी मिळाली. पुढे कायदेव्यवस्थेत हिंदू कायद्यांना महत्त्व प्राप्त झाले. व बदलत्या परिस्थितीचा फायदा घेवून ही कायदेव्यवस्था न्यायदानाच्या बाबतीत प्रभावशाली बनली.

२. कायद्याचा उगम :

पवित्र धर्म ग्रंथातूनच मराठ्यांच्या कालखंडातील कायद्याचा उगम झाला. धार्मिक ग्रंथातील श्रृती, स्मृती तसेच काही विद्वान लोकांनी लिहिलेल्या कायदेविषयक ग्रंथांचा यात समावेश आहे. ज्या वेळेला धार्मिक ग्रंथाचा न्यायनिवाड्याचा संबध येत असे तेव्हा बहुतेक विद्वान ब्राह्मणांच्या नेतृत्त्वाखालीच या खटल्याचा विचार होत असे. विज्ञानेश्वराचा मीनाक्षर, व्यवहार मुख्य, दानकमळाकर या ग्रंथाचा वापर या कामासाठी केला जात होता. पेशवेराजवटीत 'व्यवहारमुख्य' या ग्रंथाचा उपयोगही कायद्याच्या अमलबजावणीसाठी व न्यायदानासाठी केला जात होता. 'यातिनिर्णय' या ग्रंथाचा उपयोग जातीसंबधी केलेल्या विविध कायद्यांच्या माहितीसाठी होत होता. एकंदरीत या सर्व संदर्भग्रंथातून या कालखंडातील कायद्यांचा उगम झाला आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

३. रुढी व परंपरा :

मराठा कालखंडात लिखित कायदे अतिशय कमी प्रमाणात अस्तित्त्वात होते. कायद्यामध्ये एकसंघता नव्हती अथवा कायद्याच्या बाबतीत एकसंघता आणणारे कोणतेही ग्रंथ नव्हते. म्हणूनच या कालखंडात रुढी व परंपरांवर आधारीत न्यायदान चालत असे. जाती-जातीतील संघर्ष, धार्मिक संघर्ष हे रुढी परंपराच्या निकषाला अनुसरुन सोडविले जात असत.

४. दिवाणी स्वरुपाचे काही वैशिष्ट्यपूर्ण नियम :

मराठ्यांच्या कालखंडात कायद्यांच्या बाबतीत जरी लिखित स्वरुपाचे नियम नसले तरी काही नितिनियम समाजाने पाळावेत अशा प्रकारची अपेक्षा असे. लग्नविधी, मालमत्तेसंबधी व वारसा संबधी काही नियम सांगितले आहेत ते पुढील प्रमाणे आहेत.

१) लग्नविधी :

लग्नविधी हा सार्वजनिक झाल्याशिवाय या लग्नाला अधिकृत दर्जा प्राप्त होत नसे. नाते संबधात लग्नास बंदी होती. उदा. कोणत्याही व्यक्तीस आपली मुलगी आपल्या भाच्याला म्हणजे (बहिणीच्या मुलाला) देता येणार नाही. गांधर्व विवाहाला अनुकूल मत नव्हते. परंतू पैशाच विवाह मात्र पूर्ण शिष्टसंमत नव्हता. या प्रकारचे दिवाणी नियम तत्कालीन कालखंडात प्रचलित होते.

२) मालमत्तेसंबधी :

मिनाक्षरामध्ये मालमत्तेसंबधी काही नियम नमुद करण्यात आले आहेत. या मध्ये असे नमुद करण्यात आलेल्या काही गोष्टी अशा आहेत, एखाद्या व्यक्तीने स्वत:च्या कष्टाने जर मालमत्ता मिळविली असेल तर आपल्या भावाना त्यामध्ये वाटा देण्याची गरज नाही. परंतू ती जर मालमत्ता जर वडीलोपार्जित असेल तर सर्व भावना या मालमत्तेत समान हिस्सा देणे बंधनकारक आहे. एखाद्या व्यक्तीस औरस संतती असेल तर त्या संततीस संपत्तीचा हक्क मिळत असे मात्र अनौरस संततीला संपत्तीचा हक्क मिळत नसे.

३)दत्तकविधानासंबधी :

एखाद्या स्त्रिला पतीनिधनानंतर स्वगोत्रातील एखादा मुलगा दत्तक घेता येत असे. मात्र हा मुलगा त्यांच्याच गोत्रातील असणे बंधनकारक असे. हे दत्तकविधान मात्र गोतसभेत मंजूर करुन घ्यावे लागत असे. गोतसभेच्या निर्णयानंतर सरकारातून दत्तकविधानाची सनद मिळत असे. मुलीना दत्तक घेण्याच्या प्रथा प्रचलित नव्हत्या.

४) वारसाहक्क विषयक कायदा :

वारसा हक्काबाबत दिवाणी स्वरुपाचे नियम प्रचलित होते. पतीनिधनानंतर एखाद्या स्त्रीला आपल्या पतीच्या मालमत्तेवर वारसाहक्क सांगता येत असे. एखाद्या व्यक्तीने पहिल्या बायकोचा काहीही दोष नसतांना दुसरा विवाह केला तर पहिल्या बायकोला पतीकडून पोडगी मिळविण्याचा हक्क असे. एखाद्या कुटुंबातील विधवा स्त्रीला तिच्या सासऱ्याकडून वारसा हक्काने खर्च मिळण्याचा अधिकार असे. एखादी मराठा जातीतील स्त्री मरण पावली तर तिची सर्व मालमत्ता तिच्या नवऱ्याच्या बहिणीच्या मुलाला द्यावी. एखादी परदेशी व्यक्ती मरण पावली तर तिची सर्व मालमत्ता त्या व्यक्तीच्या गुरुला द्यावी.

munotes.in

५. मजलिसचे कार्य :

मध्ययुगीन कालखंडातील मराठा राजवटीत कोणत्याही ठिकाणी आपल्याला योग्य अशा ठिकाणी मजलिस भरविण्याचा हक्क होता. या साठी सर्वसाधारणपणे कोणतीही तक्रार पहिल्यांदा तर्फच्या हवालदारापुढे किंवा परगण्याच्या प्रमुखाकडे आणला पाहिजे असा रिवाज होता. एकदा अशी ही तक्रार हवालदाराकडे आली की मग तो या तक्रारीबद्दल ब्रह्मसभा व जातिसभा यांच्याशी याबद्दलच चर्चा करीत असे. त्यानंतर ही तक्रार कोणत्या सभेच्या अधिकारकक्षमध्ये येते हे ठरवून मग त्या संबधीत सभेकडे ती तक्रार सोपवीत असत. एकंदरीत असे दिसून येते की तक्रारीचा निकाल हा ज्या ठिकाणी घटना घडली असेल त्याच ठिकाणी लावण्याकडे कल असे. एकदा खटला कोणत्या सभेपुढे चालवायचा हे निश्चित झाले म्हणजे तकरीर तयार करत असे. तकरीर (करीन) खटल्याची सर्व वस्तुस्थिती संपूर्णपणे लिहिलेली असे. एकदा तकरीर तयार केली की मग तो देशमुखाकडे पाठविला जात असे. देशमुख त्यावर विचार करुन मजलिसला पाचारण करत असे. मजलिस बोलाविल्यानंतर त्या मजलिसमध्ये पुढील प्रमाणे कामकाज चालत असे.

१) मजलिसची जागा :

मजलिस ही बहुधा गावाच्या वडाच्या किंवा पिंपळाच्या पारावर भरत असे. कधी कधी ही मजलिस देशमुखाच्या घरी किंवा एखाद्या देवळात भरत असे.

२) मजलिसचे कामकाज :

मजलिसचा जो मुख्य असे त्याला 'सभानायक' असे म्हटले जात होते. परगण्याच्या ठिकाणी जर मजलिस झाली तर देशमुख हा सभानायक असे. खेडेगावात जर सभा झाली तर मुकादम (पाटील) हा सभानायक असे. जर सभा कसब्याच्या ठिकाणी झाली तर शेटे हा सभानायक असे. मजलिस प्रसंगी शास्त्राधार व इतर परंपरा याचे ज्ञान असणारी इतर तज्ञ मंडळी एकत्र येत असे. अशा मंडळीना परीक्षक किंवा प्रासनिक किंवा महाप्रासनिक मायेवत असे म्हणत.

३) खटला ऐकण्याची पद्धत :

सर्व प्रथम करील्यामध्ये लिहिलेली तक्रार मजलिसपुठे वाचून दाखविली जाते. त्यामधील घटना घडण्यासाठी झालेल्या सर्व कारणांची चर्चा केली जाते. त्यानंतर आरोपीला सरकारी अधिकाऱ्याकडून बोलावणे पाठवतात. त्यांच्याकडून खटल्याबद्दल 'मासला' म्हणजे खटल्याची फी घेतली जाते. आरोपी मजलिसपुढे हजर झाल्यानंतर त्याला सर्व खटला समजावून देत असत व स्वत:चा बचाव करण्याची संधी देत असत. जर आरोपीने गुन्हा कबुल केला तर मजलिसाचे निर्णय कायमचा समजून आरोपीकडून राजीनामा लिहून घेत असत. या राजीनाम्यावर एक किंवा दोन साक्षीदारांच्या सह्या असत. किंवा चिन्हे असत. क्कचित प्रसंगी आरोपीला वर्तणूक जामीन द्यावा लागत असे. अशा पद्धतीने मजलिसचा निकाल कायम झाल्यानंतर त्या निवाडापत्राची एक प्रत तयार केली जात असे. अशारीतीने सर्व कामकाज तयार झाल्यावर मजदर तयार करीत व त्या मजहरवर हजर असणाऱ्या सर्व वतनदाराना आपली चिन्हे उमटवावी लागत होती. सर्वसाधारणपणे मजलिसच्या बाहेर खटले जावू नयेत याची दक्षता घेतली जात होती.

mumotes.in

४) महजर कोणी लिहावी :

खटला संपल्यानंतर महजर लिहावा लागत असे महजर कोणी लिहावी याबद्दल विशिष्ट अशी पद्धत दिसून येते. परगणा मजलिसाची मजहर देशकुलकर्णी किंवा देशापांडेने लिहावी. कसबा मजलिस महाजनाने लिहावी व ग्राम मजलिस महजर कुलकर्ण्याने लिहावी.

महजर ही साधारणत: कागदावर लिहित असत. महजरची लांबी ५ फुटापासून २० फुटापर्यंत असे व रुंदी ४" ते ६" असे. यासाठी कागदांचे अनेक भाग एकमेकांना जोडलेले असत. महजरच्या मागच्या भागाला शिक्के उमटविलेले असत. महजर लिहिण्यासाठी काळयाशाईचा वापर केला जात असे. मजहरच्या सुरुवातीच्या व शेवटच्या काही ओळी देशपांडे किंवा कुलकर्णी यांच्या स्वत:च्या अक्षरातल्या असत.

५) महजरची अमलबजावणी :

महजर तयार झाल्यानंतर तिची अमलबजावणी करण्याचे काम त्या मजलिसला हजर असणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांचे असे. तो अधिकारी आपल्या हाताखालील अधिकाऱ्यांना महजर संबधी लेखी सूचना पाठवीत असे. असा पद्धतीने खटल्याची अमलबजावणी केली जात असे.

६) फेरतपासणीची पद्धत :

मजलिसच्या माध्यमातून खटला चालवत असतांना संबधीत अधिकारी दोन्ही पक्षांचे जास्तीत जास्त समाधान करण्याचा प्रयत्न करीत असत. तथापी जर एखाद्या बाजूने मजलिसबद्दल तक्रार आली तर मजलिसची जागा बदलली जात असे. व संबधीत अधिकारी दोन्ही पक्षांचा हेतू जाणून घेत सत. व वेगळ्या जागेत निकाल दिला जात असे. या निकालाला थळपत्र असे म्हटले जात असे. थळपत्र प्राप्त झाल्यानंतर मजलिस महजर तयार करीत असे.

७) मजलिसचे शुल्क :

मजलिसमध्ये खटले चालविण्यास किती शुल्क द्यावे याबाबत निश्चित स्वरुपाचे नियम नव्हते. दिवाणी किंवा सरकारी अधिकारी हा दोन्ही पक्षाकडून शुल्क घेत असे. एखाद्या खटल्यात जर पक्षकाराचा मोठअ विजय झाला तर तो पक्षकार हारकी शिवाय 'शेरणी' या नावाने जादा शुल्क रक्कम या नात्याने सरकारात भरत असे. या शेरणीला 'खुषी शेरणी' असे म्हणत.

सर्वसामान्यपणे सरकारी अधिकारीसुद्धा विजयी पक्षाकडूनसुद्धा त्याच्या आर्थिक परिस्थितीनुसार शेरणीची रक्कम वसूल करत असत. शेरणीची रक्कम जमा झाल्यावर 'खुर्दखत' किवा 'वतनपत्र' बहाल केले जात असे. याच वतनपत्राला यादी वतनपत्र असे म्हटले जाते. खटल्याच्या निकाला नंतर मजलिसच्या सर्व सभासदाना सुग्रास भोजन व बहुमुल्य वस्तू भेट दिल्या जात असत.

८) इतर काही बाबी :

एखाद्या वेळेस मालमत्तेचा प्रश्न उपस्थित झाला तर हे सर्व प्रकरण मजलिसाकडे सुपूर्द केले जात असे. व मजलिससुद्धा यामध्ये निर्णय देता आला नाही तर त्यावर सरकारचे नियंत्रण बसवत असे. काही खटल्यात एखाद्या व्यक्तीकडून धोका आहे असे वाटल्यास त्याला कोठडीत बंद करीत असे. काही वेळेला मजलिसास वारंवार सुचना देवूनही पक्षकार हजर राहिला नाही तर त्याच्या गैरहजेरीत निर्णय दिला जात असे.

६. पंचायतीचे कार्य :

मराठ्यांच्या राजवटीचा पेशवाईच्या कालखंडात न्यायव्यवस्थेमधील मजलिसचे महत्त्व कमी झाले व त्या ऐवजी पंचायतीचे महत्त्व वाढले. बहुतेककरुन एखादा खटला उपस्थित झाल्यानंतर पहिल्यांदा कमाविसदार किंवा सुभेदार यांच्याकडे सुपूर्द केला जात असे. कमाविसदार किंवा सुभेदार यांच्याकडे हे खटले आल्यानंतर हे अधिकारी आपल्या दुय्यम अधिकाऱ्याकडे संबधित खटल्याची चौकशी करत असत. जर अशा खटल्यात धार्मिक प्रश्न समाविष्ट असतील तर तो खटला ब्राह्मणसभेकडे सोपविला जात असे व इतर बाबतीतील खटले पंचायत सभेकडेच सोपविले जात असत.

१) पंचायतीच्या कामकाजाची पद्धती :

मजलिसच्या कामकाज पद्धती प्रमाणेच पंचायतीच्या कामकाजाची पद्धती होती. फक्त पंचायतीच्या निकालास सारांश असे म्हणत. त्यानंतर हा सारांश वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठविला जात असे. व तो अधिकारी स्वत: त्यावर निर्णय देवून निवाडा पत्र देत असे.

२) निवाडापत्राचा नमुना :

मजलिसमध्ये ज्या प्रमाणे निवाडापत्रासाठी महजर तयार केला जात असे तशाच प्रकारचा निवाडापत्र पंचायतीच्या निवाड्यासाठी केला जात होता. या निवाडापत्रावर निवाडा देणाऱ्या अधिकाऱ्याची सही असे. शिक्का असे. निवाडापत्राच्या शेवटी दोन्ही पक्षाच्या तक्रारी असत. निवाडापत्राच्या जोडीला दोन्ही पक्षाचे पुरावे, साक्षीदारांच्या साक्षी पंचाचे निर्णय, पंचायतीने घेतलेली फी ही सर्व माहिती देवून फडणिस स्वत: सही करत असे. फडणिसाच्या कागदपत्रावर मुजुमदाराचा संमतीदर्शक सही-शिक्का असे. डॉ. गुणे म्हणतात, पंचायतीचा हा निवाडा हा अधिकृत असा सरकारी निकाल असे. त्या नंतर हा निवाडापत्र राजाकडे सहीसाठी पाठवला जात असे. राजाची सही झाल्यानंत निवाडापत्र अंतिम झाला असे समजले जात असे.

३) फेरतपासणीची पद्धत :

पंचायतीने दिलेल्या निर्णयावर जर एखादा पक्षकार असंतुष्ट असेल तर त्याला खुद्द पेशव्याकडे फेरतपासणीसाठी अर्ज करण्याची परवानगी असे. मग पेशवे या प्रकरणात लक्ष घालून पूर्वीच्या पंचायतीबद्दल सर्व माहिती करुन घेत असत व जरुर भासल्यास मुख्य न्यायाधिशाच्या सल्ल्याने नवी पंचायत निर्माण करत असत. अशा रीतीने प्रत्येक व्यक्तीला न्यायदानाच्या बाबतीत विश्वास निर्माण होईल अशीच पद्धती होती.

४) पंचायतीचे शुल्क :

पंचायतीच्या शुल्काबाबत निश्चित अशी माहिती उपलब्ध नाही. पूर्वी प्रमाणेच विजयी पक्षाने भरलेल्या शुल्काला हारकी किंवा शेरणी असे म्हणत. पराभूत पक्षकाराने गुन्हेगारी या नावाने शुल्क द्यावे. ज्यावेळी एखाद्या वतनाचा मोठा खटला असे तेव्हा हारकी किंवा गुन्हेगारी या दोन्ही रक्कमा हप्त्याने भराव्यात अशी पद्धत असे. जो पर्यंत ही रक्कम पूर्ण भरली जात नसे तो पर्यंत निवाडापत्र जाहिर केले जात नसे. साधारणत: पंचायतीच्या सभासदाना कोणतेही शुल्क देत नसत. फक्त विजयी पक्ष पंचाना शेला किंवा पागोटे देत असे.

५) इतर काही बाबी :

वतनासंबधीचे खटले १०० वर्षाच्या आत केव्हाही दाखल करता येत असत. त्याच्या हिश्श्यांची रक्कम रोख किंवा धान्याच्या स्वरुपात दिली जात असे.

मजलिसप्रमाणे वारंवार सुचना देवून जर पक्षकार गैरहजर राहिला तर त्याच्या गैरहजेरीत निर्णय दिला जात असे व या निर्णयाचा सारांश लिहून तो अंतिम निकाल म्हणून जाहिर केला जात असे.

७. पुरावा, दिव्य व इतर तत्संबधी बाबी :

या अगोदरच्या भागात आपण न्यायदानाच्या कामातील मजलिस व पंचायत न्यायदानाचे काम कोणत्या पद्धतीने करत होते याची माहिती पाहिली. आता आपणास न्यायदान करीत असताना एखादा खटला शाबीत करण्यासाठी कोणत्या प्रकारच्या पुराव्यांचा वापर करावा लागत असे याची माहिती पहावयाची आहे.

१) कागदपत्रीय पुरावे :

जी कागदपत्रे एका विशिष्ट पद्धतीनुसार लिहिलेली असत तसेच ज्या कागदपत्रावर सही-शिक्का असे अशा प्रकारच्या कागदपत्रांचा उपयोग अस्सल पुराव्यासाठी केला जात असे. अस्सल कागदपत्रे ज्या घटनेशी, घटकाशी संबधीत असत ती घटना अथवा घटक योग्य आहे की अयोग्य आहे हे सहज स्पष्ट करत असत म्हणूनच या कालखंडात कागदपत्रीय पुरावे ग्राह्य धरले जात असत.

२) भोगवटा :

काही वेळा एखाद्या व्यक्तीला एखादे वतन सरकार दरबारातून मिळालेले असते. परंतू प्रत्यक्ष वहिवाट करणाऱ्याला अशा वतनाची माहिती नसल्यामुळे तो जाणीवपूर्वक त्या वतनाचा उपभोग घेत असे. अशा स्थितीत जर ज्याला वतन मिळालेले आहे. अशा व्यक्तीने जर खटला दाखल केला तर भोगवटा पाहून या प्रकारचा निकाल दिला जात असे.

३) साक्षी :

जेव्हा पुराव्यासाठी कागदपत्रे उपलब्ध होत नसत तेव्हा साक्षी महत्त्वाच्या मानल्या जात असत. साक्ष देणाऱ्यांना गोहीदार किंवा साक्षीदार असे म्हटले जात असे. साक्षीदार हे गावाच्या पांढरीमध्ये राहणारे असले पाहिजे अशी अपेक्षा असे. त्यामुळे गावातील मुकादम, कुलकर्णी, बलुतेदार हे साक्षीदार होवू शकत होते. पंचायतीमार्फत पत्र पाठवून साक्षीदारांना बोलाविले जात असे. साक्षीदारांना घेवून येण्यो काम नायकवडी करत असे. साक्षीदार गावाच्या देवळासमोर सर्वाच्या समक्ष साक्ष देत असे. साक्षीदाराला शपथ घेवून साक्ष द्यावी लागत असे. डॉ. गुणे याबाबत म्हणतात, "त्या काळातील सर्वसामान्य जनता ही पापभिरु व धार्मिक प्रवृत्तीची होती. अशा स्थितीत खोटी साक्ष क्कचितच दिली जात असावी. एका ठिकाणी नमुद केल्याप्रमाणे खोटी साक्ष दिल्यानंतर तो साक्षीदार लगेच मरण पावला".

८. दिव्य :

मध्ययुगीन कालखंडात मराठ्यांच्या राजवटीत साक्षी पुराव्यांच्या जोडीलाच दिव्य या प्रकारालासुद्धा महत्त्व दिले होते. एखाद्या खटल्याचे काम जेव्हा साक्षीपुराव्याने साध्य करत येत

नसे तेव्हा दिव्य करण्याकडे लोकांचा कल असे. सर्वसाधारणपणे जेव्हा एखाद्या मजलिसला दैवी पुराव्याची आवश्यकता भासे तेव्हा मजलिस या पद्धतीचा उपयोग करत असे. या पद्धतीमध्ये सर्वप्रथम मजलिस दिव्य करणाऱ्या व्यक्तीला पत्र पाठवत असे. या पत्रात दिव्य करण्याचा उद्देश, ठिकाण या बाबतची माहिती असे. उद्देशाला अनुसरुन मग ती व्यक्ती मजलिसच्या उद्देशाला अनुसरुन त्या ठिकाणी दिव्य करत असे. दिव्य केल्यानंतर तेथील अधिकारी त्या व्यक्तीला 'थळपत्र' देत असत . या कालखंडात दिव्याचे पुढील प्रकार प्रचलित होते.

अ) अग्निदिव्य :

१) खा दिव्य :

मराठा राजवटीत हा दिव्य प्रचलित होता. शंकराच्या देवळासमोर शनिवार ते मंगळवार या काळात केला जात असे. ज्या व्यक्तीने गुन्हा केला आहे अशा व्यक्तीला हा दिव्य करावा लागत असे.

सर्व प्रथम अशा व्यक्तीचे हात लिंबू आणि साबणाने स्वच्छ केले जात असत. नंतर स्वच्छ हातावर खुणा असतील तर त्यांच्या नोंदी ठेवल्या जात असत. नंतर त्याचे हात एका कपड्याने गुंडाळले जात असत. व त्यावर मोहोर केली जात असे. हे दिव्य शनिवारी केले असेल तर रविवारी लगेचच एका भांड्यात तेल व तुप याचे मिश्रण करुन ते तापवित असत. पक्षकार नंतर नदीच्या पात्रात जावून शपथ घेत असे. शपथ घेवून झाल्यानंतर मंदिराभोवती सात फेऱ्या मारत असे व नंतर सर्वांच्या समक्ष उकळत्या भांड्यातील लोखंडाचा तुकडा हाताने काढत असत. अशा स्थितीत ज्या व्यक्तीने गुन्हा केलेला असेल त्या व्यक्तीच्या हाताची पुन्हा तपासणी करत असत. जर त्या व्यक्तीच्या हातावर नव्या काही खुणा ठरल्या तर त्या व्यक्तीला गुन्हेगार ठरवत. जर नव्या खुणा दिसल्या नाही तर तो व्यक्तीला निर्दोष ठरवले जात असे. व त्या व्यक्तीला निर्दोष असल्यो थळपत्र देण्यात येत असे.

२) अग्निदिव्य :

मराठा कालखंडामध्ये खा दिव्य पद्धती प्रमाणेच अग्निदिव्य पद्धत प्रचलित होती. मराठी कागदपत्रात अग्निदिव्य पद्धत प्रचलित होती याची माहिती सांगणारा एकच कागद उपलब्ध आहे. अग्निदिव्यामध्ये लोखंडाचा तप्तगोळा हातात घेवून सात प्रदक्षिणा मंदिराभोवती घालाव्या लागत असत. त्यानंतर त्याच्या हाताला कापड बांधत असत. व त्यावर सरकारी अधिकाऱ्यांची मोहोर उमटवत असत, व तिसऱ्या दिवशी कापड सोडत असत. खा दिव्यामध्ये ज्या प्रमाणे सत्य असत्यता नंतर पडताळून पाहिली जात असे.

३) एरणी दिव्य :

हे दिव्य दोन गावांच्या सरहद्द तंट्यासाठी वापरले जात असे. अग्निदिव्य व एरणी दिव्य यांच्यामध्ये काहीही फरक नव्हता.

ब) दैवी दिव्य :

१) क्रिया दिव्य :

क्रिया दिव्य म्हणजे नदीची क्रिया अशा संज्ञेने ओळखली जात असे. नदीची क्रिया ही वतनदार व मिरासदार यांच्या समवेत केली जात असे. दोन शेजारील गावाचे वतनदार व मिरासदार एकत्र येवून त्यांच्या देखत संबधीत पक्षकार नदीच्या पाण्यात उतरत असत व नदीचे पवित्र पाणी हातात घेवून सत्य सांगत असत. अशा स्थितीत गुन्हेगार नदीचे पाणी हातात घेवून गुन्हा कबूल करीत असत, हे दिव्य बऱ्याच वेळा वतनदारीचे प्रश्न निकालात काढण्यासाठी केले जात असत.

२) वांतीची क्रिया :

वांतीची क्रिया हा दैवी दिव्याचा दुसरा प्रकार आहे. या दिव्यामध्ये संबधीत पक्षकार एकत्र येवून हे दिव्य करत असत. हे दिव्य श्रावण शुद्ध अष्टमीपासून श्रावण वद्य अष्टमीपर्यंत केले जात असे. या पंधरा दिवसाच्या काळात संबधीत लोक सतत दिवा लावत असत. या १५ दिवसात ज्या पद्धतीने दिव्याची ज्योत पाजळली जात असे त्यावरुन गुन्हेगार ठरविला जात असे. १७५४ मध्ये अशा प्रकारचे एक दिव्य केल्याचे उदाहरण दिसून येते. भिसे बंधूच्यामध्ये निर्माण झालेल्या तंट्याचा निर्णय वातीच्या क्रियेने लावण्यात आला होता.

३) इतर क्रिया :

वर उल्लेख केलेल्या क्रिया शिवाय पुढील क्रियाही अस्तित्त्वात होत्या.

I. हिंदूधर्म क्रिया

II. उष्ण दूध व उकळता तांदूळ यांची क्रिया.

III. नवखंडाची क्रिया.

IV. भाकरी, फुले व अंगारा अर्पण करण्याची क्रिया.

क) सत्य व बेलभंडार :

मराठ्यांच्या कालखंडातील बेलभंडाराची क्रिया ही एक अतिशय सोपी व विश्वसनीय क्रिया होती. या क्रियेचा समावेश दिव्य पद्धतीमध्ये करण्यात आला होता. बेलाचे पाने ही हिंदूच्या दृष्टीने अत्यंत पवित्र मानली जातात. भंडार सुद्धा पवित्र मानला जात असे. एखाद्या खटल्यात शंकराच्या पिंडीवरील बेल उचलल्यानंतर काही काळापर्यंत त्या व्यक्तीला काही दगा फटका झाला नाही तर ती व्यक्ती निर्दोष समजली जात असे. बेलभंडार हा इतका पवित्र मानला जात असे की, कोणत्याही गुन्हेगाराचे ते उचलण्याचे धाडस होत नसे.

ड) शपथ :

मराठ्यांच्या कालखंडात ज्या प्रमाणे बेलभंडार उचलण्याच्या क्रियेला महत्त्व होते. तितकेच महत्त्व शपथक्रियेला होते. तेव्हा शपथाचे दोन प्रकार प्रचलित होते.

१. हिंदू लोक हातात तुळशीची पाने घेवून शपथ घेत असत.

२. हिंदू लोक ज्ञानेश्वरी हातात घेवून त मुसलमान लोक कुराणावर हात ठेवून शपथ घेत असत.

८.१३ गुन्हे व शिक्षा

मराठा कालखंडात अस्तित्त्वात असणाऱ्या न्यायपद्धतीची माहिती पाहिल्यानंतर न्यायपद्धतीमध्ये शिक्षा कोणत्या प्रकारच्या होत्या याची माहिती आता आपण पाहणार आहोत. मराठा कालखंडात शिक्षचे अनेक प्रकार होते. गुन्हेगाराला शिक्षा देण्याचे काम या कालखंडात राजा व त्याच्या हाताखाली काम करणारे सुभेदार व सरदार करत असत. या कालखंडात दिवाणी दंड (राजदंड), देवदंड (ब्रह्मदंड) व जातीदंड (गोतदंड) हे शिक्षचे प्रकार प्रचलित होते.

१) दिवाणदंड :

डॉ. गुणे यांच्या मते शिवकाळात दिवाणदंड किंवा राजदंड कोणत्या पद्धतीने दिला जात असे या बाबतची माहिती मिळत नाही. शिवकाळात राजदंडाचे काम शिवाजी महाराज स्वतः करीत असत. शिवाजी महाराजांच्या राजवटीत शिक्षेचे स्वरुप अतिशय कडक असे. गुन्हा सिद्ध झाल्यानंतर हातपाय तोडणे नाक-कान कापणे अशा पद्धतीच्या शिक्षा दिल्या जात होत्या. शिवकाळातील ही परिस्थिती शाहू महाराजांच्या राजवटीपर्यंत टिकली. १७५० ते १८१८ या काळात राजदंड देण्याचे काम स्वतः पेशवे त्यांचे सरदार व इतर नागपूरकरांसारखे काही सरदार करत असत.

२) देवदंड :

देवदंड देणे म्हणजे प्रायश्चित देणे. प्रायश्चित देण्याचे काम विद्वान ब्राह्मणांकडे असे. प्रत्येक खटल्यातील गुन्ह्याचे स्वरुप पाहून धर्मशास्त्रानुसार दंड दिला जात असे. या कामी काही प्रसंगी राजा, ब्रह्मसभा, जातिसभा यांची मदत घेतली जात असे.

३) जातिदंड :

जातिसभा ही एक महत्त्वाची संघटना होती. जातिमध्ये एखाद्या व्यक्तीने जातिबाह्य कृत्य केले तर त्या व्यक्तिला शिक्षा केली जात असे. त्याला जातिदंड असे म्हटले जाते. एखाद्या व्यक्तीने आपल्या जातीत अपकृत्य केले तर त्या व्यक्तीला जातिदंड म्हणून जातितून बाहेर काढले जात असे.

८.१४ मराठ्यांच्या न्यायदानाची वैशिष्ट्ये

मराठ्यांच्या न्यायव्यवस्थेचा विचार करत असताना आपण मराठ्यांच्या केंद्रिय, प्रांतीय, स्थानिक न्यायव्यवस्थेची माहिती पाहिली. कायदे, पुरावे, न्यायपद्धती, दिव्य यासंबंधीची माहिती पाहिली याही पुढे जावून गुन्हे व शिक्षा या बाबतचे निर्णय कसे घेतले जात होते याचाही अभ्यास केला. या सर्व गोष्टीमध्ये काही खास वैशिष्ट्ये दिसतात ती वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत.

१. साधे सोपे स्वरुप :

मराठ्यांची न्यायव्यवस्था ही अतिशय साधी, सोपी व सुटसुटीत होती. सुत्रबद्ध कायदे अस्तित्वात नव्हते. खटले चालविण्याची पद्धत ही अतिशय अनौपचाारिक होती. न्यायदानासाठी जास्त प्रमाणात धर्मग्रंथाचा आधार घेतला जात होता. तसेच रुढी, चालिरीती, परंपरेचा आधार घेतला जात होता. गुन्ह्याच्या स्वरुपात दिवाणी व फौजदारी असे दोन प्रकार दिसतात. या

न्यायव्यवस्थेमध्ये दिवाणी खटल्यांबद्दलचा दृष्टीकोन सौम्य असलेला दिसतो. ही प्रकरणे विकोपाला न नेता समझोत्याने जास्त प्रमाणात सोडविण्यासाठी प्रयत्न केले जात असत.

२. सत्ता विभाजनाचा सिद्धांत अज्ञात :

मराठ्यांना आपल्या राजवटीत सुप्रसिद्ध सत्ता विभाजनाचा सिद्धांत ज्ञान नव्हता. कायदेमंडळ हा प्रकार तर अस्तित्त्वातच नव्हता. कार्यकारी मंडळ व न्यायदान मंडळ यांच्यामध्ये कामाची व अधिकारांची विभागणी व्हायला पाहिजे हे तत्त्वसुद्धा अज्ञात होते. कार्यकारी व न्यायदान ही दोन्ही पदे बऱ्याचअंशी एकाच व्यक्तीच्या हातात असत त्यामुळे सत्ता विभाजनाचा सिद्धांत या न्याय व्यवस्थेत आढळत नाही.

३. पंचायत पद्धत :

मराठ्यांच्या न्यायदान व्यवस्थेचे पंचायत पद्धत हे ही एक महत्त्वाचे वैशिष्ट्ये मानले जाते दिवाणी स्वरुपाचे सर्व खटले चालविण्याचे काम पंचायत करीत असे पंचायतीचे अधिकार अधिक विस्तृत असत. पंचायतीमध्ये समाजातील प्रतिष्ठित लोकांचा समावेश असे. पंचायतीमध्ये जो निर्णय घेतला जाई. त्यावर अंतिम अधिकार सरकारचा असे. पंचायतीमध्ये लोकशाहीकरणे व प्रबळ केंद्रसत्ता यांचे मिश्रण दिसून येते.

४. दाद मागण्याची सवलत :

मराठ्यांच्या न्यायव्यवस्थेत जर एखाद्या व्यक्तीवर अन्याय होत असेल तर त्या व्यक्तीला अन्या होत असेल तर त्या व्यक्तीला दाद मागण्याी संधी असे. जर पंचायत अन्यायकारक असेल तर संबधीत व्यक्तीला पुन्हा दाद मागण्याची संधी असे. इतकेच नव्हे तर खुद्द पेशव्यांकडे फेरतपासणीसाठी अर्ज करण्याची परवानगी असे.

५. पुरावा :

मराठ्यांच्या न्यायव्यवस्थेचा पुरावा हा आधारस्तंभ होता. पुराव्याशिवाय कोणतीही गोष्ट सिद्ध होवू शकत नाही ही गोष्ट गृहित धरुन अनेक प्रकारच्या पुराव्याना प्रोत्सहान दिले जात होते. समाजातील सर्व थरातील लोकांना पुराव्याच्या क्षेत्रात समान संधी व समान दर्जा असल्याचे दिसून येते. कागदपत्री पुरावा, साक्षी पुरावा, दिव्य आधार हे पुरावे या कालखंडात गृहित धरले जात होते. याचा वापर न्यायदानाच्या कामकाजासाठी केला जात होता.

६. गुन्ह्याचे स्वरुप :

मराठ्यांच्या न्यायव्यवस्थेत न्यायदान करण्यासाठी गुन्ह्यांचे स्वरुप लक्षात घेतले जात होते. सर्वसाधारणपणे गुन्ह्यांचे वर्गिकरण दिवाणी व फौजदारी अशा दोन भागात करण्यात आले होते. फौजदारी गुन्ह्यांचे प्रमाण कमी असे कारण शिक्षा या कडक असत. स्वत: रियासतकार सरदेसाई म्हणतात मराठेशाहीत गुन्ह्यांचे प्रमाण कमी दिसते.

७. गुन्हेगारांच्या मिळकतीवर आधारित दंड :

कोणत्याही न्यायव्यवस्थेत गुन्ह्यांसाठी होणाऱ्या शिक्षेच स्वरुप एकच असते. मात्र मराठ्यांच्या न्यायव्यवस्थेमध्ये या बाबत अपवाद होता. गुन्हा करणाऱ्या गुन्हेगाराच्या मिळकतीवर त्याला दंड केला जात होता. डॉ. सेन म्हणतात, मराठ्यांना एक गोष्ट जाणवलेली दिसते की माणसाला

जीवनातून उठविण्यासाठी शिक्षा नसते तर माणसाची चूक सुधारण्यासाठी शिक्षा असते. यावरुन हा मुद्दा मराठ्यांच्या न्यायव्यवस्थेतील एक महत्त्वपूर्ण घटक ठरला.

८. जादूटोणा व चेटूक :

मराठा कालखंडात जादूटोणा व चेटूक यांच्यावर विश्वास होता. हे समाजाच्या अपरिपक्वतेचे लक्षण मानले जात होते. समाजात असणाऱ्या चेटक्यांच्याबद्दल एकंदर भीतीची भावना दिसून येते. जर एखादी व्यक्ती जादूटोणा करते आहे असे समजले तर त्या व्यक्तीला कठोर शासन करुन शिक्षा केली जात असे.

९. व्यभिचार :

मराठा कालखंडात व्यभिचार मोठा गुन्हा मानला जात होता. एखादी व्यभिचारी आहे असे सिद्ध झाले तर त्या स्त्रिला एखाद्या किल्ल्यांत गुलाम म्हणून राहावे लागत असे. इतकेच नव्हे तर किल्ला किंवा इतर मोठ्या इमारती बांधण्यासाठी प्रत्यक्ष काम करावे लागत असे. ज्या प्रमाणे व्यभिचारी स्त्रियांना कठोर शासन केले जात असे त्याच प्रमाणे व्यभिचारी पुरुषांनाही कठोर शासन केले जात असे.

आपली प्रगती तपासा

१. मराठ्यांच्या सैन्य विभागांची माहिती जाणून घ्या.

२. मराठ्यांच्या किल्ले प्रशासनाबाबतची माहिती जाणून घ्या.

३. मराठ्यांच्या आरमार व्यवस्थेबाबतची माहिती जाणून घ्या.

४. मराठ्यांच्या प्रांतिय न्यायव्यवस्थेची माहिती जाणून घ्या.

८.१५ सारांश

मराठ्यांच्या लष्करी व्यवस्थापनाचा पाया शिवाजी महाराजांनी घातला. लष्करी व्यवस्थापनातील अनिष्ठ रुढी, प्रथा, परंपरा, कार्यप्रणाली त्यांनी काढून टाकली. मात्र त्यांच्या मृत्युनंतर या व्यवस्थापनात सतत बदल होत गेले पेशवाईच्या उत्तरार्धात तर मराठ्यांचे लष्करी व्यवस्थापन परावलंबी बनले. परिणामी या दुष्परिणामाचा फटका शिवाजी महाराजांनी उभ्या केलेल्या मराठा साम्राज्याला बसला. शिवाजी महाराजांच्या लष्करी व्यवस्थापनाचा वारस जर पुढे मराठ्यांने चालू ठेवला असता तर कदाचित असे घडले नसते.

मराठ्यांच्या न्यायव्यवस्थेचा अभ्यास करत असताना या न्यायव्यवस्थेचा सर्वोच्य अधिकारी राजा होता हे आपण जाणून घेतले आहे. केंद्रिय न्यायव्यवस्थेत राजा बरोबर राजमंडळ, ब्राह्मणसभा, गोतमजलीस, हे केंद्रिय न्यायव्यवस्थेचे अविभाज्य घटक कसे बनले होते व त्यांची कार्यप्रणाली कशी होती याचा अभ्यास केला.

थोडक्यात मराठा सत्तेच्या उगमापासून ते शेवटापर्यंत मराठ्यांच्या न्यायव्यवस्थेत बदलत्या परिस्थितीनुसार बदल होत गेले. असे जरी असले तरी या कालखंडातील न्यायव्यवस्थेचे स्वतंत्र अस्तित्त्व मात्र कायम टिकून राहिले आहे.

munotes.in

८.१६ प्रश्न

१. मराठ्यांच्या लष्करी प्रशासनाची माहिती सांगा.

२. मराठ्यांच्या न्यायव्यवस्थेतील केंद्रिय न्यायव्यवस्थेची माहिती स्पष्ट करा.

३. मराठ्यांच्या प्रांतिय न्यायव्यवस्थेचा आढावा घ्या.

४. मराठ्यांच्या न्यायदान व्यवस्थेची वैशिष्ट्ये सांगा.

८.१७ संदर्भ

१. वा. सी. बेंद्रे – श्री छत्रपती शिवाजी महाराज (उत्तरार्ध)

२. गो. स. सरदेसाई - पेशवे दप्तरातून निवडलेली कागदपत्रे.

३. डॉ. जयसिंगराव पवार – मराठी सत्तेचा उदय

४. डॉ. सोमनाथ रोडे – मराठ्यांच्या इतिहास

५. गायकवाड, सरदेसाई, थोरात, हनमाने – मराठेकालीन संस्था व विचार

६. प्रा. बी. एस. सावंत, प्रा. जाधव - 'मराठ्यांचा प्रशासकीय सामाजिक व आर्थिक इतिहास'

❖❖❖❖

munotes.in

९

मराठ्यांचे प्रशासन:जमीन महसूल

घटक रचना:

९.० उद्दिष्ट्ये

९.१ प्रस्तावना

९.२ जमीन महसूल

९.३ महसूल आकारणीची तत्वे

९.४ महसूल आकारण्याच्या पद्धती

९.५ मराठ्यांच्या उत्पन्नाची इतर साधने

९.६ सारांश

९.७ प्रश्न

९.८ संदर्भ

९.० उद्दिष्ट्ये

- शिवकाळातील जमीन महसूल पद्धती समजून घेणे.
- पेशव्याच्या राजवटीतील जमीन महसूल पद्धती समजून घेणे.
- शिवकाळ व पेशवेकाळातील जमीन महसूल आकरणीची तत्वे समजून घेणे.
- शिवकाळ व पेशवेकाळातील महसूल आकारण्याच्या पद्धती समजून घेणे.
- मराठ्यांच्या काळातील चौथाई व सरदेशमुखी पद्धती समजून घेणे.
- मराठ्यांच्या काळातील वेगवेगळे महसूल विभाग जाणून घेणे
- मराठ्यांच्या काळातील इतर कर प्रणालीचा अभ्यास करणे.
- मराठ्यांच्या कालखंडातील महसूल विभागातील अधिकाऱ्यांची कामगिरी जाणून घेणे.
- मराठ्यांच्या उत्पन्नाच्या साधनांचा संक्षिप्त आढावा घेणे.

munotes.in

९.१ प्रस्तावना

मराठ्यांचा प्रशासन व्यवस्थेतील आर्थिक विभागाशी संबंधीत असणारा घटक म्हणून जमीन महसूल विभागाकडे पाहिले जो. या घटकात आपण मराठ्यांच्या जमीन महसूल पद्धतीची व मराठ्यांच्या उत्पन्नांच्या इतर साधनांची माहिती पाहणार आहोत. या साधनाचा अभ्यास करत असताना आपणास प्रामुख्याने 'शिवकाळ' व 'पेशवेकाळ' या दोन कालखंडाचा विचार करावा लागेल. मराठ्यांच्या उत्पन्नांच्या साधनातील महत्त्वपूर्ण साधन म्हणून महसूल विभागातील जमीन महसूल विभागाकडे पाहिले जाते. या साधनाव्यतिरिक्त चौथाई, सरदेशमुखी, प्रत्यक्ष कर, अप्रत्यक्षकर ही सुद्धा मराठ्यांच्या उत्पन्नांची इतर साधने होती. मराठ्यांच्या उत्पन्नांची साधनाची निर्मिती करत असताना शिवाजी महाराजानी अत्यंत विचारपूर्वक ही साधने निर्माण केली आहेत असे डॉ. बाळकृष्ण यांनी म्हटले आहे. या बाबत त्यांचे म्हणणे असे आहे "शिवाजी महाराजांनी विजयनगर, निजामशाही, आदिलशाही व मोगलशाही या चार साम्राज्यातील जमीन महसूल व कर आकारणी पद्धतीचा मिलाफ करुन या चारही साम्राज्यातील कर आकरणीतील चांगले गुण आपल्या साम्राज्यातील उत्पन्नांच्या साधनांसाठी ठेवून घेतले व वाईट गुण दुर केले." अशा या मराठ्यांच्या उत्पन्नांच्या साधनांची माहिती आपण या प्रकरणात घेणार आहोत.

९.२ जमीन महसूल

जमीन महसूल हे मराठ्यांच्या उत्पन्नांचे मुख्य साधन होते या साधनाचा विचार करत असताना आपल्याला मराठ्यांच्या कालखंडातील शिवकाळातील व पेशवे काळातील महसूल पद्धती समजून घेणे गरजेचे आहे. सर्व प्रथम आपण शिवकाळातील जमीन महसूल पद्धती अभ्यासणार आहोत व त्या नंतर पेशव्याच्या जमीन महसूल पद्धतीचा विचार करणार आहोत.

१. शिवकाळातील जमीन महसूल :

मध्ययुगीन महाराष्ट्राच्या मुख्य व्यवसाय शेती असल्या कारणे शिवकाळात जमीन महसूल पद्धतीला विशेष महत्व प्राप्त झाल्याचे दिसून येते. शिवकाळात जमीन महसूल हाच महसूलाचा मुख्य आधारस्तंभ होता. शिवकाळात महसूल वसुलीसाठी दोन भाग निर्माण करण्यात आले होते. ते दोन भाग म्हणजे 'स्वराज्य' व 'मोगलाई' स्वराज्य याचा अर्थ शिवाजी महाराजांच्या ताब्यातील प्रदेश तर मोगलाई म्हणजे परकीयांच्या ताब्यात राहून शिवाजी महाराजांना खडणी देणारा प्रदेश. शिवकाळात स्वराज्यातील महसूलाची तीन वेळा मोजमापणी करण्यात आली व पूर्वीच्या सोई-गैरसोई लक्षात घेऊन त्यांच्यामध्ये सुधारणा करण्यात आल्या. शिवकाळातील जमीन महसूल पद्धतीमध्ये एकसुत्रीपणा आणण्यासाठी आरंभी दादाजी कोंडदेव व नंतर मोरोपंत पिंगळे व आण्णाजी दत्तो यांनी महत्वपूर्ण प्रयत्न केले. शिवकाळातील जमीन महसूल पद्धती जाणून घेण्यासाठी आपणास या तीन्ही व्यक्तीची या बाबतची कामगिरी जाणून घेणे आवश्यक आहे.

अ) महसूल सुधारणेचा पहिला टप्पा : शिवकाळात जमीन महसूल पद्धतीत सुधारणा घडवून आणण्याची पहिली जबाबदारी दादाजी कोंडदेवांवर दिली होती. त्यांनी पहिल्या टप्यात या पद्धतीमध्ये सुधारणा करण्यासाठी मलिकंबरच्या जमीन महसूल तत्व प्रणालीचा आदर्श आपल्या नजरेसमोर ठेवला व जमीन महसूल पद्धतीमध्ये सुधारणा करण्यासाठी स्वराज्यातील सर्व जमीनीची मोजणी केली व महसूल दर आकरणीस सुरुवात केली. तसेच नव्याने लागवडीखाली आणलेल्या जमीनीवर प्रत्येक वर्षाला बदल करण्याची प्रक्रिया अवलंबीली त्याचे स्वरुप असे होते.

- पहिल्या वर्षी एका बिघ्याला १ रुपया
- दुसऱ्या वर्षी एका बिघ्याला ३ रुपये
- तिसऱ्या वर्षी एका बिघ्याला ६ रुपये
- चौथ्या वर्षी एका बिघ्याला ९ रुपये
- पाचव्या वर्षी एका बिघ्याला १० रुपये
- सहाव्या वर्षी एका बिघ्याला २० रुपये

या सुधारणे व्यतिरिक्त दादोजी कोंडदेवाने जमीनदारी पद्धतीमध्ये योग्य त्या सुधारणा करुन अनेक जमीनी लागवडीखाली आणल्या व स्वराज्याचा महसूल वाढवला. याही पुढे जावून त्यांनी स्वराज्यात रयतवारी पद्धत सुरु केली.

ब) महसूल सुधारणेचा दुसरा टप्पा : शिवकाळात जमीन महसूल पद्धतीत सुधारणा घडवून आणण्याची दुसरी जबाबदारी मोरोपंत पिंगळ्याना देण्यात आली होती. त्यांनी जमीन महसूलात सुधारणा करुन ही जमीन महसूल पद्धती लोकाभिमुख करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांनी केलेल्या जमीन महसूल पद्धतीतील सुधारणाबाबत कागद पत्रे मोठ्या प्रमाणात उपलब्ध नाहित.

क) महसूल सुधारणेचा तिसरा टप्पा : शिवकाळात जमीन महसूल पद्धतीत सुधारणा घडवून आणण्याची तिसरी जबाबदारी अण्णाजी दत्तोनवर देण्यात आली होती. या बाबतची माहिती सभासदाच्या बखरीत उपलब्ध आहे. शिवकाळात आण्णाजी दत्तोने स्वराज्याची पाहणी करुन स्वत:ची अशी महसूल पद्धती जारी केली ही पद्धती विकसित करताना त्यांनी पुढील गोष्टींचा अवलंब केला होता.

- स्वराज्यातील लागवडीखाली असणाऱ्या प्रत्येक गावातील जमीनींची यादी तयार केली.
- स्वराज्यातील लागवडीखाली असणाऱ्या गावातील जमीनीची पहिली, दुसरी, तिसरी व चौथी अशी प्रत लावली.
- स्वराज्यातील लागवडीखाली असणाऱ्या व नसणाऱ्या जमीनीचा ठावठिकाणा लावला.
- स्वराज्यातील जमीनीमधून येणाऱ्या प्रत्येक पीकांची यादी तयार केली.
- स्वराज्यातील जमीनीची बिघ्यानुसार माहिती उपलब्ध केली.
- स्वराज्यातील जमीनीमध्ये कोणती पीके घेतली तर पीकामध्ये वाढ होईल याची माहिती सरकारला कळविली.
- स्वराज्यातील जादा पीक वाढीसाठी लागणारा पैसा व मंजूरी याची माहिती सरकारला दिली
- संभाव्य उत्पन्नाचा आराखडा खेड्यातील लोकांकडून स्वत:कडे मागून घेतला.

अण्णाजी दत्तोच्या महसूल पद्धतीनुसार समाजातील प्रतिष्ठित लोकांच्यावर विश्वास टाकल्याने सर्व सामान्य लोकांच्या मनातील भीती व गोंधळ नष्ट झाला, व रयतेला सुख मिळाले. म्हणूनच या सुधारणेला People Setilement असे म्हणतात.

२. पेशवेकाळाती महसूलपद्धती :

शिवकाळाप्रमाणेच पेशवेकाळात जमीन महसूल हीच राज्याच्या उत्पन्नाची मुख्य बाब होती. या बाबत वा कृ. भावे म्हणतात सरकारी वसुलीच्या पुष्कळ बाबी पेशवेकाळात असल्या तरी जमीन महसूल ही मुख्य बाब समजली जात होती. पेशव्यांच्या जमीन महसूलाबाबत डॉ. सेन यांनी सुद्धा गौखोद्वागार काढले आहेत. ते म्हणतात 'पेशव्याच्या जमीन महसूल पद्धतीचे मुख्य सुत्र म्हणजे करदात्यांची भरभराट व्हावी हे होते' पेशवेकाळात जमीन महसूलापासून येणारे उत्पन्न हे सर्वात जास्त होते. पेशवेकाळात जमीन महसूलासाठी भागानुसार वर्गवारी करण्यात आली होती.

पेशव्यांच्या जमीन महसूलात शाहु महाराजांच्या मृत्युनंतर सुधारणा घडून आल्याचे दिसून येते. बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब यांनी सर्वप्रथम पेशव्यांच्या जमीन महसूल पद्धतीमध्ये लक्ष घालून जमीन महसूल पद्धतीतील उणीवा दूर केल्या व पेशव्यांची जमीन महसूल पद्धती सुव्यवस्थीत अवस्थेत आणली. नानासाहेबानंतर नाना फडणीसाने आपल्या कारकिर्दीत पेशव्यांची जमीन महसूल पद्धती रुळावर आणली. पुढे त्यांनी या पद्धतीला सुयोग्य पद्धतीने पुर्णत्वाला नेले. मात्र शिवकाळात ज्या प्रमाणे महसूल पद्धतीच्या सुधारणेचे टप्पे आढळतात असे टप्पे पेशवेकाळात आढळत नाहीत. डयुक ऑफ वेलिंग्टन महाराष्ट्रात बराच काळ होता. त्यांनी पेशव्यांच्या जमीन महसूल पद्धती विषयी बरीच माहिती सांगितली आहे. या माहितीत मराठ्यांच्या शेती व्यवस्थेची माहिती आहे. कॅप्टन विल्यम गार्डन यांनी पेशव्यांच्या पुणे दरबाराला भेट दिली होती. तो पेशव्यांच्या जमीन महसूल धोरणा बाबत बोलतो बाजीरावाचे राज्य आजपर्यंत मी पाहिलेल्या इतर कोणत्याही राज्यापेक्षा संपन्न व सुपीक आहे त्यांच्या राज्यात लोकसंख्या चांगली आहे त्यांच्या लोकांना चांगल्या सुखसोयी आहेत व ही परिस्थिती अतिशय भरभराटीची आहे.

९.३ महसूल आकारणीची तत्वे

मराठ्यांच्या महसूल आकारणीचा तत्वांचा विचार करताना आपणास शिवकाळ व पेशवेकाळ या दोन्ही कालखंडाचा विचार करावा लागेल या दोन्ही कालखंडातील महसूल आकारणीची तत्वे कशी आहेत हे या ठिकाणी आपण समजून घेणार आहोत. सर्व प्रथम शिवकाळातील जमीन महसूलाची तत्व व नंतर पेशवे काळातील तत्व अशी या घटकाची रचना असणार आहे.

१. शिवकाळातील जमीन महसूल आकारणीची तत्वे :

शिवकाळात जमीन महसूल हे उत्पन्नाचे मुख्य साधन असल्या कारणे शिवाजी महाराजानी आपल्या प्रतिनिधीद्वारे जमीन महसूलाची तत्वे निश्चित केली होती. जमीन महसूलाची तत्वे निश्चित करताना जमीनीची पाहणी, मोजणी व वर्गवारी करण्यात आली होती ही तत्वे अशी होती.

- शिवकाळात जमीनीच्या प्रतवारीनुसार जमीन महसूल आकारण्यात येत असे.
- शिवकाळात पडीक जमीनी जमीन महसूल आकारणीपासून वगळण्यात आल्या होत्या.
- शिवकाळात जंगली जमीनी जमीन महसूल आकारणीतून वगळण्यात आल्या होत्या.

- शिवकाळात वजावट जमीनी जमीन महसूलातून वगळण्यात आल्या होत्या.
- एकूण उत्पन्नाच्या ३३% जमीन महसूल कर आकारण्यात येत असे नंतर त्यात बदल होवून ४०% पर्यंत हे प्रमाण गेले.
- शिवकाळात जमीन महसूल धान्य व रोख रक्कम स्वरुपात वसूल करण्यात येत होता.
- शिवकाळात जमीन महसूल आकारणीसाठी बिधा हे परिणाम निश्चित करण्यात आले होते.
- शिवकाळात जमीन महसूल आकारणीसाठी जी रोख रक्कम निश्चित केली होती ती नगदी पिकांच्या बाबतीत होती. उदा. ऊस, चिंच इत्यादी.

२. पेशवेकाळातील जमीन महसूल आकारणीची तत्वे:

शिवकाळा प्रमाणेच पेशवेकाळात जमीन महसूल हे उत्पन्नाचे मुख्य साधन होते. शिवकाळा प्रमाणेच पेशवेकाळात सुद्धा जमीन महसूल आकारणीसाठी तत्व निश्चित करण्यात आली होती. पेशवेकाळातिल जमीन महसूल आकारणीच्या तत्वांची माहिती आपणास पेशवेकाळातील अधिकाऱ्यांनी दिलेल्या सूचनातून मिळते. खालिल माहिती पेशवेकाळातील जमीन महसूल आकारणीची तत्वे स्पष्ट करते.

- पेशवेकाळात जमीनीच्या प्रतवारीनुसार जमीन महसूल आकारण्यात येत असे (सरस, मध्यम, कनिष्ठ)
- पेशवेकाळात जमीनीच्या प्रत्यक्ष पाहणी करुन महसूल आकारला जात असे.
- पेशवेकाळात जमीनीची मोजणी करुन महसूल आकारला जात असे.
- पेशवेकाळात जमीनीतून कोणत्या पद्धतीचे पिक घेतले जात आहे ह्या पद्धतीला अनुसरुन महसूल आकारण्यात येत असे (जिराईत, बागाईत)
- पेशवेकाळात वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत जमीन महसूल निश्चित केले जात असे.
- पेशवेकाळात शत्रुने पिकांची नासधुस केली अथवा अतिपावसाने शेतीचे नुकसान झाले अथवा दुष्काळाने शेतीचे नुकसान झाले तर अशा शेतकऱ्यांच्या जमीनीवर त्या काळात जमीन महसूल आकारण्यात येत नसे.
- पेशवेकाळात एखाद्या शेतकऱ्यास जमीन महसूल भरत येत नसेल अथवा त्याची जमीन विकण्या येवढी परिस्थिती आली असेल अथवा त्याचावर जमीन गहाण टाकण्याची आपत्ती आली असेल अशा शेतकऱ्याला अशा प्रकारच्या संकटातून वाचवण्यासाठी त्याला जमीन महसूलात सुट देण्यात येत असे जो पर्यंत त्याची परिस्थिती स्थिरावत नाही तो पर्यंत त्याच्या जमीनीवर जमीन महसूल आकारला जात नसे.
- पेशवेकाळातील अधिकाऱ्याने आपल्या साम्राज्यातील रयतेकडून वाजवीपेक्षा जास्त महसूल आकारु नये.

mynotes.in

- पेशवेकाळात जर अधिकारी बेमुर्वतखोरपणे वागत असतील तर त्यांच्यावर कारवाई करुन जमीन महसूल वसूलीचे अधिकार त्यांच्याकडून काढून घेण्यात यावेत.

९.४ महसूल आकारण्याच्या पद्धती

मराठ्यांच्या जमीन महसूल आकारण्याच्या पद्धतींचा विचार करताना आपणास शिवकाळ व पेशवेकाळ या दोन्ही कालखंडांचा विचार करावा लागेल. सर्व प्रथम आपण या ठिकाणी शिवकाळातील महसूल आकारण्याच्या पद्धतीचा विचार करु व नंतर पेशवेकाळातील जमीन महसूल आकारण्याची पद्धत पाहू.

१. शिवकाळातील जमीन महसूल आकारण्याची पद्धत:

अ) शिवकाळात जमीन महसूल आकारण्याच्या दोन पद्धती प्रचलित होत्या.

१) पिकनिहाय सारा

१. नगदी पिकांवरील सारा

२. इतर पिकांवरील सारा.

२) जमीनीच्या प्रतवारीनुसार सारा.

१) पिकनिहाय सारा : शिवकाळात पिकनिहाय सारा वसूल करण्याची पद्धती प्रचलीत होती. पिकनिहाय सारा वसूल करताना सारा वसूलीसाठी एकूण जमीनीतून घेतल्या जाणाऱ्या पिकांचे दोन भागात विभाजन करण्यात आले होते हे दोन भाग म्हणजे नगदी पिके व इतर पिके होय. या ठिकाणी आपण या पिकांवर कोणत्या पद्धतीने सारा आकारला जात होता याची आपण माहिती स्पष्ट करणार आहोत.

१. **नगदी पिकांवरील सारा :** शिवकाळात प्रामुख्याने ऊस, सुंठ, चिंच, भाजीपाला ही पिके नगदी पिके मानली जात होती. या पिकांवर कोणत्या पद्धतीने सारा आकारला जात होता याचे विवरण आपण या ठिकाणी पाहू

- ऊस : शिवकाळात ऊसावर सारा आकारत असतांना सर्व प्रथम ऊसाचे पिक कोणत्या पद्धतीने घेतले जात आहे याचा विचार केला जात होता. तेव्हाच्या काळात ऊसाचे पिक पाणस्थळ व मोटस्थळ अशा दोन पद्धतीने घेतले जात होते. पाणस्थळ ऊसाला प्रत्येक बिघ्यास २½ होन सारा आकारला जात असे त मोटस्थळ ऊसाला प्रत्येक बिघ्यास २ होन सारा आकारला जात असे. पाणस्थळ जमीनीतील ऊसाला सारा जास्त आकारला जात होता त्याचे कारण असे होते की या जमीनीला कालव्याद्वारे जो पाणीपुरवठा केला जात होता ते कालवे सरकारी मालकीचे होते. तर मोटस्थळ जमीनीला जो पाणीपुरवठा होत असे तो खाजगी विहिरीच्या माध्यमातून या खाजगी विहिरी त्यांच्या स्वत:च्या मालकीच्या असल्याने त्यांना ½ होन सारा कमी असे.

- सुंठ : शिवकाळात सुंठ हे नगदी पिक मानले जात होते. सुंठीसाठी सुंद्धा पानस्थळ व मोटस्थळ असे दोन भाग पाडण्यात आले होते. पाणस्थळल्या सुंठीस प्रत्येक बिघ्याला ३ होन तर मोटस्थळच्या सुंठीस प्रत्येक बिघ्यास २ होन सारा आकारला जात असे.

mundes.in

- चिंच : शिवकाळात सुंठीला ज्या प्रमाणे सारा आकारला जात होता. तशाच पद्धतीचा सारा चिंचेलासुद्धा आकारला जात होता. चिंचेच्या पाणस्थळ पिकावर ३ होन तर मोटस्थळ पिकावर २ होन सारा आकारला जात होता.

- भाजीपाला : शिवकाळात कांदे, वांगी, रताळी ही पिके मोठ्या प्रमाणात घेतली जात होती. या पिकांवर सारा आकारताना सुद्धा पाणस्थळ व मोटस्थळ असे पिकांचे दोन भाग पाडण्यात आले होते. या पिकांवरील सारा आकारताना पाणस्थळ पिकांवर दोन होन सारा आकारला जात असे तर मोटस्थळ पिकांवर १½ होन सारा आकारला जात असे.

२. इतर पिकांवरील सारा : शिवकाळात इतर पिकांच्या बाबतीत साऱ्याचे वेगवेगळे दर होते. इतर पिकांमध्ये तांदळाचे जास्त प्रमाणात उत्पादन घेतले जात असे. म्हणूनच या पिकांवर घेतल्या जाणाऱ्या साऱ्याचा या ठिकाणी आपण स्वतंत्र विचार करणे आवश्यक आहे.

- तांदूळ : शिवकाळात तांदळावर वेगवेगळ्या भागात वेगवेगळा सारा आकारला जात होता. सकस जमीनीतून येणाऱ्या तांदूळातून प्रत्येक बिघ्याला १० मण, मध्यम दर्जाच्या जमीनीतून येणाऱ्या तांदळातून बिघ्याला ८ मण सारा आकारला जात होता. कनिष्ठ व टाकाऊ जमीनीपासून कोणताही सारा वसूल केला जात नव्हता. मेजर नार्विसन यांने आपल्या "कोकणच्या इतिहासात" तांदळाच्या जमीनीचे १२ प्रकार सांगून शिवाजी महाराज आपल्या काळात जमीनीच्या प्रकाराला अनुसरुन सारा वसुल करत होते असे म्हटले आहे.

२) जमीनीच्या प्रतवारीनुसार सारा : शिवकाळात ज्या प्रमाणे पिकनिहाय सारा वसूल करण्याची पद्धती होती तशीच जमीनीच्या प्रतवारीनुसार सुध्दा सारा वसूल करण्याची पद्धती सुरु होती असे दिसून येते. जमीनीची प्रतवारी साधारणत: काळी, शेरा, वाजट, थिकनती अशा चार भागात करण्यात आली होती. या ठिकाणी आपण जमीनीच्या प्रतवारीनुसार सारा किंती वसूल केला जात होता हे पाहणार आहोत.

- काळी जमीन : काळ्या जमीनीला साधारणत: प्रत्येक बिघ्यास २ मण सारा आकारला जात असे.

- शेरा जमीन : शेरा जमीनीला प्रत्येक चावराला (२० बिघे =१ चावर) १२ खंडी (२० मण = १ खंडी) सारा आकारला जात असे.

- वाजट जमीन : वाजट जमीनीला प्रत्येक बिघ्याला १¼ मण सारा आकारला जात असे.

- थिकनती जमीन : काही लोकांना त्यांच्या विशिष्ट कार्याबद्दल जमीन बहाल केली जात असे अशा जमीनीला थिकनती जमीन असे म्हटले जाते. अशा जमीनीवर प्रत्येक बिघ्याला प्रत्येक चावराला ८ खंडी सारा आकारला जात असे.

शिवकाळात सारा आकारणी ही नियम प्रणालीला अनुसरुन केली जात होती. जास्त प्रमाणात सारा हा धान्य स्वरुपात वसूल केला जात होता. सारा वसूलीसाठी रोखे रक्कमेचा आग्रह दिसत नाही. शिवकाळात जमीनीची प्रत, जमीनीला मिळणारे पाणी व जमीनीतून घेतल्या जाणाऱ्या पिकाला अनुसरुन सारा वसूल केला जात होता.

ब) पेशवेकाळातील जमीन महसूल आकारण्याची पद्धत : शिवकाळा प्रमाणे पेशवे काळात सुद्धा जमीन महसूल आकारण्याची पद्धती प्रचलीत होती. जमीन महसूल आकारणीसाठी पेशव्याने जमीनीची प्रत्यक्ष पाहणी करुन जमीनीची वर्गवारी केली होती. जमीनीच्या वर्गवारीचे सरस, मध्यम व कनिष्ठ असे तीन भाग होते. या तीन महत्वपूर्ण भागा व्यतिरिक्त काळी जमीन, डोंगराळ जमीन, बागाईत, जिराईत, मोटस्थळ, पाटस्थळ, आमराई असे इतर भागसुद्धा करण्यात आले होते. पेशवेकाळात सारा धान्याच्या स्वरुपात व रोख रक्कमेच्या स्वरुपात वसूल केला जात होता. पेशवेकाळात जमीन महसूल आकारणी पुढील प्रकारांना अनुसरुन केली जात होती.

१. **जमीनीच्या प्रकाराला अनुसरुन :** पेशवेकाळात जमीनीच्या प्रकाराला अनुसरुन महसूल आकारणी केली जात होती. साधारणत: जमीनीचे सरस, मध्यम व कनिष्ठ असे तीन प्रकार करण्यात आले होते. या प्रकाराला अनुसरुन पुढील पद्धतीने सारा वसूल केला जात होता.

	जमीनीचा प्रकार		सारा
१)	सरस जमीन	-	३¼ मण सारा
२)	मध्यम जमीन	-	२½ मण सारा
३)	कनिष्ठ जमीन	-	१⅓ मण सारा

२. **जिराईत जमीनीला अनसरुन :** जिराईत जमीनी लागवडीखाली आल्या नंतर पेशवेकाळात या पद्धतीच्या जमीनीवर सारा आकारला जात असे या साऱ्याचे प्रमाण असे असे.

काळी जमीन	प्रत्येक बिघ्याला दर		
	रु.	आ.	पै
१ वर्ष	०	४	०
२ वर्ष	०	८	०
३ वर्ष	१	०	०
४ वर्ष	१	८	०
५ वर्ष	२	०	०

३. **डोंगराळ जमीनीला अनुसरुन :** डोंगराळ जमीन लागवडीखाली आल्या नंतर पेशवेकाळात या पद्धतीच्या जमीनीवर सारा आकारला जात असे या साऱ्याचे प्रमाण असे असे.

munotes.in

डोंगराळ जमीन	प्रत्येक बिघ्याला दर		
	रु.	आ.	पै
१ वर्ष	०	२	०
२ वर्ष	०	४	०
३ वर्ष	०	८	०
४ वर्ष	०	१२	०
५ वर्ष	१	०	०

४. बागाईत जमीनीला अनुसरुन : पेशवेकाळात बागाईत जमीनीचे सोयीसाठी पाटस्थळ व मोटस्थळ असे दोन प्रकार पाडण्यात आले होते. ज्या जमीनी पूर्वीपासून बागाईत लागवडीखाली आहेत. त्या जमीनीतील ऊस व इतर पिकांवर प्रत्येक बिघ्याला १० रुपये सारा आकारला जात असे.ज्या पडीक जमीनी होत्या त्या जमीनींचे दोन भागात विभाजन करुन पुढील प्रमाणे कर आकारणी केली जात होती.

१) पाटस्थळ बागाईत जमीनीचे दर:

वर्ष	प्रत्येक बिघ्याला दर
१ वर्ष	५ रु
२ वर्ष	६ रु
३ वर्ष	७ रु
४ वर्ष	८ रु
५ वर्ष	१० रु

२) मोटस्थळ बागाईत जमीनीचे दर

वर्ष	प्रत्येक बिघ्याला दर
१ वर्ष	१ रु
२ वर्ष	२ रु
३ वर्ष	३ रु
४ वर्ष	४ रु
५ वर्ष	५ रु

munotes.in

५. **पिकाला अनुसरुन :** पेशवेकाळात पिकाला अनुसरुन सुद्धा सारा वसूल केला जात होता. याची माहिती आपणास १७४०-४१ मध्ये बाजीराव पेशव्याने हवेलीच्या अधिकाऱ्याना दिलेल्या आदेशातून मिळते. साधारणत: या आदेशामध्ये असे स्पष्टीकरण आहे.

- भाताच्या जमीनीला प्रत्येक बिघ्याला १० मण सारा वसूल करावा.
- ऊसाच्या जमीनीला प्रत्येक बिघ्याला ५ रुपये सारा वसूल करावा.
- भाजीपाला ज्या जमीनीतून घेतला जातो अशा जमीनीतील भाजीपाल्याच्या पिकाला प्रत्येक बिघ्याला २ रुपये सारा आकारावा.
- उन्हाळी पिकांच्या जमीनीला प्रत्येक बिघ्याला १½ रुपये सारा आकारावा.

६. **नारळ व इतर झाडांना अनुसरुन :** पेशवेकाळात नारळ व इतर झाडांच्या लागवडीत प्रोत्साहन देण्यात आले होते. डॉ. सेन यांनी असे म्हटले आहे की नारळांच्या झाडांची लागवड पेशव्यांना फायदेशीर होती. पेशव्याने या झाडांच्या लागवडीसाठी विशेष प्रोत्साहन दिले होते.

नारळाच्या लागवडीनंतर १८ ते २० वर्ष या झाडाला सारा नसे नंतर प्रत्येक झाडाला वर्षाला ४ आणे सारा घेतला जात असे.

सुपारीच्या झाडाला १५ वर्ष सारा नसे नंतर प्रत्येक झाडाला १ आणे सारा घेतला जात असे.

अशा रीतीने पेशवेकाळात जमीन महसूल आकारण्याची पद्धती प्रचलीत होती. जमीनीचा प्रकार, प्रतवारी, पिकपद्धती याला अनुसरुन जमीन महसूल आकारण्याची पद्धती प्रचलीत होती.

९.५ मराठ्यांच्या उत्पन्नाची इतर साधने

जमीन महसूल हे मराठ्यांच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन होते. या साधना व्यतिरिक्त चौथाई व सरदेशमुखींच्या माध्यमातून सुद्धा मराठ्यांना उत्पन्न मिळत असे या उत्पन्नाच्या साधना व्यतिरिक्त मराठ्यांना ज्या इतर मार्गाच्या माध्यमातून उत्पन्न मिळत होते. त्या माध्यमांचा या ठिकाणी आपण आढावा घेणार आहोत. या घटकात आपण मराठ्यांच्या कारकिर्दीतील शिवकाळ व पेशवेकाळात मराठ्यांच्या उत्पन्नांची इतर साधने अभ्यासणार आहोत.

१. शिवकाळातील उत्पन्नाची इतर साधने :

शिवकाळ व पेशवेकाळातील जमीन महसूलाची माहिती पाहिल्या नंतर आता आपण या ठिकाणी शिवकाळ व पेशवेकाळातील उत्पन्नाच्या इतर साधनाचा आढावा घेणार आहोत. शिवकाळातील उत्पन्नाच्या इतर साधनाचे डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनी तिन भागात विभाजन केले आहे.

अ) प्रत्यक्षकर

ब) अप्रत्यक्त्तेकर

क) संकीर्णकर

अ) प्रत्यक्ष कर : शिवकाळात प्रत्यक्ष कर हा मराठ्यांच्या उत्पन्नाच्या साधनाचा एक मार्ग होता. या करावर मराठ्यांच्या या कालखंडात जास्त भर दिला जात होता. हा कर वैयक्तीक उत्पन्नावर, विविध व्यवसायांवर व मालमत्तांवर लादला जात होता. खेड्यातील वतनी अधिकाऱ्यांकडून व परगण्यातील अधिकाऱ्यांकडून हा कर वसूल केला जात होता. अशा कराना इनामपट्टी, मिरासपट्टी, देशमुखापट्टी, किवा सरदेशमुखीपट्टी असे संबोधले जाई. मात्र हे कर नियमितपणे वसूल केले जात होते किंवा नाही याबाबत खात्रीलायक माहिती नाही.

१. **इनामपट्टी :** इनामपट्टी हा प्रत्यक्ष कर खेडेगावातील इनामदाराकडून वसूल केला जात होता. खेडेगावातील इनामदाराला काही जमीन सारा मुक्त दिलेली असे. त्या मोबदल्यात त्याच्याकडून हा कर वसूल केला जात असे मात्र या करातून गोसावी व मठाधिपती यांना वगळण्यात आले होते. या दोघांनाही इनामी जमीनी दिल्या जात असत. मात्र त्यांच्या कडून हा कर वसूल केला जत नसे.

२. **इनामती खंडणी :** इनामत खंडणी हा प्रत्यक्ष कर नव्याने निर्माण करण्यात आलेल्या इनामदाराकडून वसूल केला जात होता. हा कर त्यांच्यावर ठराविक कालाकरिता आकारला जात होता. ज्या इनामदाराना नव्याने सरकारकडून जमीन मिळत असे त्यांच्याकडून हा कर वसूल केला जात होता. परंतु काही कागदपत्रात इनामत खंडणी स्वराज्याच्या काही भागात परगण्यातील वर्तनी अधिकाऱ्याकडून नियमितपणे वसूल केली जात असे. असा उल्लेख सापडतो.

३. **मिरासपट्टी :** मिरासपट्टी हा प्रत्यक्ष कर मिरासदाराकडून वसूल केला जात होता. या करास मिरासद्वारपट्टी असेही म्हटले जात असे. मिरासदार म्हणजे खेडेगावातील जमीनीचे मालक असत. त्याना जो मिरासदारीतून फायदा होत असे. त्या फायद्यातून त्यांच्याकडून काही उत्पन्नाचा भाग कर रुपाने वसुल केला जात होता.

   देशमुख, देशकुलकर्णी, पाटील व कुलकर्णी हे खेडेगावातील जमीनीचे मालक असल्याने त्यांच्याकडून ही मिरासपट्टी वसूल केली जात होती. मिरासपट्टीचे दर ठरले होते. देशमुखाकडून ३६६ होन, देशकुलकर्ण्याकडून १३४ होन, ३९ गावच्या पाटलाकडून २५० होन, कुलकर्ण्याकडून २०० होन, चौगुलेकडून १४ होन, शेर-महाजन यांचे कडून ३० होन याप्रमाणे मिरासपट्टी वसूल केली जात होती.

४. **व्यवसाय कर:** शिवकाळात व्यवसाय कर हा प्रत्यक्ष कराचा एक प्रकार होता. हा कर व्यक्तीच्या व्यवसायावर आकारला जात होता. हा कर वस्तू व रोख रक्कम अशा दोन्ही स्वरुपात वसूल केला जात होता. या कराचे वेगवेगळ्या प्रकारात वर्गिकरण करण्यात आले होते.

१) **सराफी किंवा सराफपट्टी :** सोन्या - चांदीच्या व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीवर जो प्रत्यक्षकर लावला जात होता त्या कराला सराफी किंवा सराफपट्टी कर असे म्हटले जात होते.

२) **धनगरपट्टी :** शिवकाळात धनगरलोक जो व्यवसाय करत होते त्या व्यवसायावर जो कर लावला जात होता त्या कराला धनगरपट्टी असे म्हटले जात होते. मेढ्यांच्या लोकरीपासून पासोडी, गोधडी तयार करुन या वस्तू विकण्याचा हे लोक व्यवसाय करत होते यांना या व्यवसायाबद्दल हा कर द्यावा लागत होता.

३) **माग टका :** शिवकाळात साळी, कोष्टी, मोमीन या विणकाम करणाऱ्या लोकांवर जो कर लादला जात होता. या कराला माग टका असे म्हटले जाते. हा माग टका रोख रक्कमेच्या अथवा वस्तूच्या रुपाने वसूल केला जात होता. या कराची रोख रक्कमेच्या दर ¼ टका असे. तर वस्तूरुपाने या कराच्या मोबदल्यात साडी, धोतर किंवा पटका कर म्हणून स्विकारण्यात येत असे.

१) **पायपोसी** : शिवकाळात चर्मकाराकडून जो व्यवसाय कर आकारला जात होता. त्या कराला पायपोसी कर असे म्हटले जात होते. प्रत्येक चर्मकाराला हा कर दर वर्षी द्यावा लागत होता. पाटील कुलकर्णी यांना कर रुपाने हा व्यवसाय करणाऱ्या लोकांना एक चप्पल जोड द्यावे लागत असे.

२) **तेलपट्टी** : शिवकाळात तेल्याकडून जो व्यवसाय कर आकारला जात होता त्या कराला तेलपट्टी असे म्हटले जाते. प्रत्येक वर्षी प्रत्येक घाण्यामागे तेल्याला १½ शेर तेल कर रुपाने द्यावा लागत होता.

३) **कारागिरांवरील कर :** शिवकाळात परीट, सुतार, शिंपी, न्हावी, सोनार, लोहार, गुरव, तराळ, चांभार, कुंभार, मांग, कोळी या कारागिरांवर जो कर लादला जात होता. या कराला कारागिरांवरील कर असे म्हटले जाते. प्रत्येक कारागिराला प्रत्येक वर्षी पावटक्का कर द्यावा लागत असे.

४) **मोहतरफा :** शिवकाळात जो व्यापाऱ्यांकडून जो कर वसूल केला जात होता त्या कराला मोहतरफा कर असे म्हटले जाते. मात्र या बाबत ब्रिटिश अधिकारी आर. एन. गुडाईन यांचे मत असे आहे की हा कर खेडेगावातील किराणा भुसार व्यापारी, कापड दुकानदार, फळ विक्रते, भाजी विक्रते, खाटिक, बेकरीवाले यांच्याकडून वसूल केला जात होता. या कराचे स्वरुप परवाना फी सारखे होते.

५) **हेजिब पट्टी :** शिवकाळात गावकऱ्यांनी गावाच्या कामाकरिता सरकारदरबारी कामकाजासाठी जो प्रतिनिधी नेमलेला असे त्याला हेजिब म्हणत असत. त्याच्या खर्चासाठी लागणारी रक्कम गावकऱ्यांकडून गोळा केली जात असे त्यास हेजिबपट्टी असे म्हटले जात असे.

६) **वेठबिगारी :** वेठबिगारी म्हणजे सक्तीची सेवा होय. बाजारभावापेक्षा कमी दरात कुशल किंवा अकुशल कामगाराच्याकडून काम करुन घेण्याची ही पद्धती होती. वंशपरंपरागत अधिकाऱ्यांचा लोकांच्याकडून वेठबिगारी करुन घेणे हा एक विशेष हक्क होता.

ब) अप्रत्यक्ष कर : शिवकाळात व्यापार व व्यवसाय प्रणालीशी संबधीत असणाऱ्या घटकांवर जो कर लावला जात होता त्या कराचा समावेश अप्रत्यक्ष करामध्ये करण्यात आला होता. या अप्रत्यक्ष करप्रणालीची माहिती पुढील प्रमाणे स्पष्ट करण्यात आली आहे.

१) **जकात कर:** शिवकाळात एक महत्वपूर्ण अप्रत्यक्ष कर म्हणून जकात कराकडे पाहिले जाते. जकात कर हा परदेशातून स्वराज्यात येणाऱ्या व स्वराज्यातून बाहेर जाणाऱ्या मालावर बसविला जात असे. शिवकाळात चौल, दाभोळ, वेंगुर्ला, राजापूर, रत्नागिरी ही आयात - निर्यातीची प्रमुख बंदरे होती. शेजारच्या पोर्तुगीज व मुस्लीम प्रदेशांच्या महाराष्ट्राबरोबर

शिवकाळात व्यापारी संबध येत असे. या प्रदेशातून येणाऱ्या व त्या प्रदेशात जाणाऱ्या मालावरही जकात आकारला जात होता.

शिवकाळातील जकात कराचे स्वरुप काय होते तसेच त्याचे प्रमाण काय होते या बाबत फारशी माहिती उपलब्ध नाही. मात्र राजापूर वखारीतील पिटर मुंडी यांने परदेशातून स्वराज्यात येणाऱ्या इंग्रजी मालावर २½ जकात वसूल केली जात होती असे लिहून ठेवले आहे. डॉ. फ्रायर, बर्नियर व मनुची या परकिय प्रवाशाने शिवाजी महाराजांच्या जकात अधिकाऱ्याबद्दल आपल्या प्रवासवृत्तांतात अनेक प्रकारच्या तक्रारी केल्याचे दिसून येते. यावरुनच शिवकाळात परकियांकडून जास्त प्रमाणात कर वसूल केला जात असे असे वाटते.

२) **वानगी :** शिवकाळात स्वराज्यातील व्यापारांना काही वेळेला नियमित करापेक्षा जास्त कर वस्तुच्या किंवा धान्याच्या स्वरुपाने द्यावा लागत असे त्याला 'वानगी' असे म्हटले जाई वानगीचे प्रमाण एका गोणीला ¼ इतके असे.

३) **उरीदलाली :** उरी म्हणजे शिल्लक माल व दलाली म्हणजे जकात बंदराच्या शहरात वजन केलेल्या मालावर हा कर बसविला जात असे. थोडक्यात एखाद्या वजन केलेल्या मालावर जो कर आकारला जातो त्या करास उरीदलाली कर असे म्हटले जाते.

४) **कापडावरील जकात :** शिवकाळात कापडावर वेगवेगळ्या प्रकारची जकात आकारली जात होती सीता (पांढरे कापड), पाटव (रंगीत कापड) ताप्ता (रंगीत रेश्मी कापड) खारा मुसदार (रेश्मी कापडाचे प्रकार) या सर्व कापडावर प्रत्येक वाराला वेगवेगळ्या दराने जकात कर आकारला जात होता. उदा. सीती कापड ५ रुळे, पाटव ½ रुका , ताप्ता ६ रुके. गृहउद्योगातून जर कापड तयार झालेला असेल तर नाममात्र कर आकारला जात असे.

५) **सिंगोटी कर :** शिवकाळात बाजारात खरेदी - विक्रीसाठी जी जनावरे आणली जात होती त्यांच्यावर जो कर लादला जात होता त्या कराला सिंगोटी कर असे म्हटले जाते. या कराचे प्रमाण असे होते.

प्रत्येक म्हशीला ६ रुके

बैल प्रत्येक रुपयास ३ रुके

रेडे प्रत्येक रुपयास ३ रुके

गाय प्रत्येक रुपयास ३ रुके

घोड्यांच्या खरेदीवर 'तेजी' किंवा 'ताजी' कर

कराचे प्रमाण २½ टक्के.

उंटाच्या खरेदीवर उंटपट्टी हा कर

६) **गुलामांच्या खरेदी विक्रीवरील कर :** शिवकाळात गुलामांच्या खरेदी - विक्रीवर अप्रत्यक्ष कर आकारला जात होता. त्याचे प्रमाण ५ लारी इतके होते. (लारी म्हणजे पश्चिम किनाऱ्यावरील वापरात प्रचलीत असणारे इराणी नाणे)

munotes.in

७) मिठावरील कर : मिठावरील कर हा शिवकाळातील महत्वाचा कर मानला जात होता. समुद्रकिनारी ज्या ठिकाणी मीठ तयार होत असे तेथील मिठावर हा कर आकारला जात असे. त्याचे प्रमाण दर मणाला १२ रुके इतके होते.

क) संकीर्ण कर : शिवकाळात ज्या प्रमाणे प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष कर प्रणाली अस्तित्वात होती त्याच प्रमाणे राज्याच्या उत्पन्नासाठी अकस्मित कर सद्धा वसूल केले जात होते. या करांचा समावेश इतर करामध्ये करण्यात आला आहे. हे कर नियमित वसूल केले जात नसत. हे कर पुढील प्रमाणे आहेत.

१) सादिलवारपट्टी : "ज्या करामध्ये इनामदारपट्टी, मिरासपट्टी, मोहतर्फा, लग्नटका, इमरातपट्टी एकत्र वसूल केली जाते त्या कराला सादिलवारपट्टी असे म्हटले जाते." ही एक संकल्पना असून याचे समर्थन डॉ. आळतेकरानी केले आहे. मात्र या संकल्पनेवर डॉ. अ. रा. कुलकर्णीने आक्षेप घेत ही संकल्पना नसून हा नियमित कर नाही असे म्हटले आहे.

२) खर्चापट्टी : अकस्मित होणाऱ्या खर्चासाठी जो कर वसूल केला जात होता. त्याला खर्चापट्टी असे म्हटले जाते. खर्चापट्टी कर हा खेडेगावाशी संबधीत होता. गावाच्या सार्वजनिक खर्चासाठी तो वसूल केला जात होता. या खर्चास "गावखर्च" असेही म्हटले जाते.

३) वराडटका किंवा लग्न टका : जो कर लग्न किंवा लग्नाच्या वरातीवर बसविला जात होता त्या कराला वराडटका किंवा लग्नटका कर असे म्हटले जात होते या कराचे प्रमाण पाव रुपया इतके होते. डॉ. सेन यांचे म्हणणे असे आहे की संकल्पना अस्पष्ट आहे.

४) तुटपट्टी किंवा नुकसानपट्टी : धान्य, तुप तेल रुपाने जमा केलेला कर सरकार जमा होत असताना पडून, वितळून जे नुकसान होत होते ते भरुन काढण्यासाठी जो कर आकारला जात होता त्या कराला तुटपट्टी किंवा नुकसानपट्टी असे म्हटले जाते थोडक्यात तुट भरुन काढण्यासाठी हा कर बसविला जात होता. असे डॉ. बाळकृष्ण यांचे म्हणणे आहे.

५) नाडीटोकरा : नदीमध्ये वाहतुकीसाठी उपयोगात आणत असलेल्या लहानशा बोटीवर जो कर लादला जात असे त्याला नाडी टोकरा कर असे म्हटले जाते. टोकरा म्हणजे छोटीशी बोट होय हा कर 'हशील अमल' या अधिकाऱ्यामार्फत वसूल केला जात होता.

६) गडी तंबाखू : शिवकाळात तंबाखू विक्रीसाठी जो परवाना सरकारकडून दिला जात असे त्या परवान्यावर हा कर आकारला जात असे. तंबाखू उत्पादक व विक्रेते यांच्यावर हा कर आकारला जात होता.

७) अबकारी कर: शिवकाळात मादक पदार्थ सेवनावर बंदी होती. मात्र या बाबत निश्चित पुरावे उपलब्ध नाहीत मात्र ज्या ज्या ठिकाणी ग्रामीण भागात दारु गाळण्याचे कारखाने होते त्यांच्यावर हा अबकारी कर लादला जात होता. डॉ. बाळकृष्ण यांच्या मते "शिवकाळात अबकारीकरापासून येणारे उत्पन्न अतिशय कमी होते."

८) न्यायालयीन शुल्क : शिवकाळात न्यायदानाच्या कामासाठी गोतसभा होती या गोतसभेच्या कामकाजासाठी आरोपी व फिर्यादी अशा दोन्हीकडून जो कर वसूल केला जात असे त्याला न्यायालयीन शुल्क असे म्हटले जाते. फौजदारी स्वरुपाच्या न्यायदानाचा खर्च ५०% घेतला जात असे. जिंकलेल्या पक्षाला जी रक्कम द्यावी लागत असे त्याला 'हारकी' असे

म्हणत व पराभूत पक्षाकडून जी रक्कम घेतली जात असे त्याला 'गुन्हेगारी' असे म्हटले जात असे.

९) **जंगलापासून मिळणारे उत्पन्न :** शिवकाळात जंगलातील झाडे, औषधी मुळ्या, मसाल्याचे पदार्थ तोडण्यासाठी जंगल संबधीत अधिकाऱ्यांची परवानगी घ्यावी लागत असे या परवानगीसाठी जो कर आकारला जात असे तो शिवकाळातील जंगलापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा भाग बनला होता. याही पुढे जावून जनावरे चरण्यासाठी जे लोक जंगलाचा वापर करत होते त्यांच्याकडून 'वनचराई' कर घेला जात होता. या सर्व कराचा समावेश जंगलापासून मिळणाऱ्या उत्पन्नात होत होता.

१०) **टांकसाळीपासून मिळणारे उत्पन्न :** टांकसाळ म्हणजे नाणी पाडणे. शिवकाळात नाणी पाडण्याचे काम सरकारमार्फत होत असे. असे जरी असले तरी काही श्रिमंत सोनाराना विशिष्ट मोबदल्यात हे काम दिले जात होते. त्यांच्याकडून मिळणारा मोबदला हा शिवकाळातील उत्पन्नाचा एक भाग बनला होता.

११) **मच्छीमारीपासून मिळणारे उत्पन्न :** शिवकाळात स्वराज्यामध्ये जो समुद्रकिनारा होता त्याच्यावर मच्छीमारी करण्याचा कोळ्यांना पूर्ण हक्क असे परंतु त्यांना मिळणाऱ्या एकुण उत्पन्नापैकी काही रक्कम सरकारला द्यावी लागत होती ही रक्कम शिवकाळातील उत्पन्नाचा एक भाग बनली होती.

१२) **खाणीपासून मिळणारे उत्पन्न :** शिवकाळात काही ठिकाणी खनिज संपत्तीच्या खाणी होत्या. या खाणीतून जे उत्पन्न मिळत होते त्या उत्पन्नातून काही भाग सरकारला द्यावा लागत होता ही रक्कम शिवकाळातील उत्पन्नाचा एक भाग बनली होती.

१३) **वारसा विषयक कर :** शिवकाळात धर्मशास्त्र्याप्रमाणे राजा हा सर्वमालमत्तेचा वारस असे. मात्र साम्राज्यात एखाद्या व्यक्तीला जर वारस नसेल तर त्या व्यक्तीची मालमत्ता सरकारजमा होत असे. ही होणारी रक्कम शिवकाळात उत्पन्नाचा एक भाग बनली होती.

१४) **जप्ती :** शिवकाळात स्वराज्याशी निष्ठावान नसणाऱ्या वतनदारांची वतने जप्त करुन ती सरकारजमा केली जात होती. या व्यतिरिक्त जे वतनदार निपुत्रिक असत ते आपले वतन वाचविण्यासाठी दत्तक घेत असत या दत्तक वारसाचे पुनरुज्जीवन केले जात असे वतनाचे पुनरुज्जीवन करत असताना सरकारला जी रक्कम मिळत असे त्यास 'हारकी' किंवा 'शेरणी' असे म्हटले जात असे. हा शिवकाळातील उत्पन्नाचा एक भाग होता.

१५) **जहाजफुटी :** नैसर्गिक संकटाने किंवा शत्रुच्या हल्याने समुद्रात जहाज फुटत असत युरोपीयन लोक जेव्हा फुटकी जहाजे समुद्रकिनाऱ्याला आणत तेव्हा त्यांच्याकडून शिवाजी महाराजांचे अधिकारी जहाज फुटीचा हिसा वसूल करत. हा शिवकाळातील उत्पन्नाचा एक होता.

१६) **स्थानिक खर्चासाठी गावकऱ्याकडून वसूल करण्यात येणारे कर :** शिवकाळात गावांच्या खर्चासाठी वेगवेगळे कर गावकऱ्यांकडून वसूल केले जात असत. हे कर पुढील प्रमाणे आहेत.

munotes.in

१) **उल्कापट्टी :** "उल्कापट्टी म्हणजे सरकारी अधिकाऱ्यांना गावाकडून मिळणारा सिधा होय" सरकारी अधिकारी जेव्हा गाव दौऱ्यावर येत असत तेव्हा गावकऱ्यांकडून धान्याच्या किंवा वस्तूच्या रुपाने उल्कापट्टी वसूल करत असत.

२) **जंगमपट्टी :** "लिंगायत समाजाच्या धर्मगुरुच्या खर्चासाठी लिंगायत समाजकडून जो कर वसूल केला जात असे त्याला लिंगायतपट्टी असे म्हटले जाते त्याला जंगमपट्टी असेही म्हटले जाते."

३) **दसरापट्टी :** दसरा सण साजरा करण्यासाठी जो सार्वजनिक खर्च होत असे तो खर्च दसरापट्टी म्हणून गावकऱ्याकडून वसूल केला जात असे. दसरापट्टी म्हणून काही वेळा वतनदार गावकऱ्यांकडून बकरे व कोंबड्याही घेत असत.

४) **मेजवानीपट्टी :** सरकारी अधिकारी किंवा साधूसंत जेव्हा गावोगाव फिरत असतात तेव्हा त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था गावकऱ्यांना करावी लागत असे. या मेजवानीच्या खर्चासाठी जो कर आकारला जात होता त्यास मेजवानीपट्टी असे म्हटले जाते.

५) **तोरणभेटी :** तोरणभेटी म्हणजे राजकर्ता किंवा एखादा मोठा पाहुणा एखाद्या गावाच्या भेटीसाठी येत असेल तर त्याचे कमानी उभारुन सजावट करुन स्वागत करणे होय. या सजावट व कमानी उभारण्यासाठी येणार जो खर्च असतो तो गावकऱ्यांकडून वसूल केला जातो. त्याला तोरणभेटी असे म्हटले जाते.

६) **ठाणेपट्टी :** ठाणे म्हणजे ठिकाण होय. मग हे ठिकाण लष्करी ठाणे असो, पोलिस ठाणे असो अथवा थांबण्याचे ठिकाण असो. यासाठी लागणारा खर्च भरुन काढण्यासाठी ठाणेपट्टी वसूल केली जात असे. हा कर त्या ठिकाणच्या गावकऱ्यांकडून वसूल केला जात असे.

७) **मोहिमपट्टी :** मोहिमपट्टी हा शिवकाळातील वसूल करण्यात येणारा प्रासंगिक कर होता. शिवकाळात दोन प्रकारच्या मोहिमा हाती घेतल्या जात होत्या. एक आक्रमक तर दुसरी संरक्षक या दोन्ही मोहिमांसाठी बराचसा खर्च येत होता. हा खर्च गावकऱ्यांकडून वसूल केला जात होता.

८) **मुस्लिम कर :** मुस्लिम कर मुस्लिम आमदानीपासून चालत आलेला होता. शिवकाळात त्यात फारसा बदल झाला नाही ईद-शुभेरात, बकराई, हुमायुनपट्टी, कोंबडी-पट्टी, ऊरुसपट्टी, भूत-पारोशीईपट्टी व शिलेपट्टी हे त्याकाळातील कर होय. शिवकाळात हे कर वसूल केले जात होते. या बाबत कागदपत्र उपलब्ध नाही. मात्र ते मुस्लिम आमदानीपासून चालत आले आहे हे निश्चित आहे.

९) **युद्धातील लूट व रात्रप्रदेशातील लुटमार :** शिवकाळ हा युद्धाच्या धामधूमीचा काळ. शिवछत्रपतीना विजयाच्या यशाने साथ दिली होती. जावळी विजय, अफजलखान वध, सुरतेची लुट अशा लुटीतून शिवाजी महाराजाना प्रचंड उत्पन्न मिळाले. हे उत्पन्न शिवाजी महाराजानी सरकारी खजिन्यात जमा केले.

इंग्रजाची राजापूर व हुबळी वखार लुटून शिवाजी महाराजानी प्रंचड संपत्ती मिळविली, मोगलांची जुन्नर, अहमदनगर, सुरत ही शहरे लुटून तसेच कर्नाटकचा प्रदेश जिंकून

प्रंचड संपत्ती मिळविली होती. हा पैसा सुद्धा शिवाजी महाराजांनी सरकारी खजिन्यात जमा केला.

२. पेशवेकाळातील उत्पन्नाची इतर साधने

शिवकाळाप्रमाणे पेशवेकाळात सुद्धा जमीन महसूल हे उत्पन्नाचे मुख्य साधन होते. या व्यतिरिक्त चौथाई व सरदेशमुखीच्या माध्यमातून सुद्धा पेशव्याच्या उत्पन्नात भर पडत होती. मात्र शिवकाळातील चौथाई व सरदेशमुखी व पेशवेकाळातील चौथाई व सरदेशमुखी यात आपणास फरक जाणवतो. तशाच प्रकारचा फरक आपणास पेशवेकाळात उत्पन्नाच्या इतर साधनातही जाणवतो. या ठिकाणी आपण पेशवेकाळातील उत्पन्नाची इतर साधने जाणून घेणार आहोत.

१) जादा महसूल : पेशवेकाळातील इतर उत्पन्नाच्या साधनांचा विचार करत असताना या काळात जो जादा महसूल वसूल केला जात होता त्याचा सर्व प्रथम विचार होणे आवश्यक आहे. पेशवेकाळात जो जादा महसूल जमा केला जात होता त्यात पुढील करांचा समावेश आहे.

- धूक पट्टी : पेशवेकाळात देशमुख किंवा देशपांडे यांच्या जमीनीवर एक वर्ष काम करणाऱ्यांवर हा कर आकारला जात असे. त्यांना हा कर सरकारला द्यावा लागत असे.

- हक्क चौथी : पेशवेकाळात हा बसविलेला एकंदरीत सारा होता. या साऱ्याचे प्रमाण ¼ इतके होते.

- महार महिली : पेशवेकाळात महारांना इनाम दिलेल्या जमीनीवर हा कर आकारला जात असे.

- मिरास पट्टी : पेशवेकाळात प्रत्येक तीन वर्षातून मिरासदाराकडून कर घेतला जात होता. त्यास मिरासपट्टी असे म्हटले जाते.

- इनाम तिजाई : पेशवेकाळात इनामदारांच्या मालकीच्या जमीनीवर ⅓ कर आकारला जात असे या कराला इनाम तिजाई असे म्हटले जाते.

- इनाम पट्टी : पेशवेकाळात आणीबाणीव्या काळात क्वचित प्रसंगी इनामदारांकडून जो कर वसूल केला जात होता त्यास इनामपट्टी असे म्हटले जाते.

- विहीर हुंडा : पेशवेकाळात जर शासकीय विहिरीचा वापर शेतकऱ्यांनी आपला शेतीसाठी करुन घेतला तर शेतकऱ्यांवर जो जादा कर आकारला जात होता त्या करास विहीरहुंडा असे म्हटले जात होते.

- घरपट्टी : पेशवेकाळात रयतेकडून निवास व्यवस्थेसाठी जो कर आकारला जात होता त्या करास घरपट्टी असे म्हटले जाते. हा कर ब्राह्मण व सरकारी अधिकारी यांच्याकडून सुद्धा वसूल केला जात होता.

- बात छापणी : पेशवेकाळात जे लोक व्यवहारात वजन-मापाचा वापर करत होते. त्यांच्या तपासणी साठी लागणारा खर्च या लोकांना सरकारात भरावा लागत होता. या करांना बात छापणी असे म्हटले जाते.

munotes.in

- तग पट्टी : पेशवेकाळात मोठ्या वस्तू मोजण्यासाठी जी साधने वापरली जात होती. त्या साधनांवर जो कर आकारला जात होता. त्या कराला तग पट्टी असे म्हटले जाते.

- लगीन टका : पेशवेकाळात खेडेगावात होणाऱ्या विवाहावर जो कर बसविला जात होता त्यास लगीन टका असे म्हटले जाते.

- पाटदाम : पेशवेकाळात एखाद्या विधवेने जर पुनर्रविवाह केला तर तीला सरकारला जो कर द्यावा लागत होता त्यास पाटदाम असे म्हटले जात असे.

- म्हैसपट्टी : पेशवेकाळात गावातल्या प्रत्येक म्हैशीवर प्रत्येक म्हैस मालकाला प्रतिवर्षी एक रुपया कर सरकारला द्यावा लागत असे त्या कराला म्हैसपट्टी असे म्हटले जात असे.

- बकरापट्टी : पेशवेकाळात गावातील प्रत्येक मेंढ्यावर जो कर बसविला जात होता त्या करास बकरापट्टी असे म्हटले जाते.

- फडमाशा : पेशवेकाळात जे लोक कर भरु शकत नव्हते त्यांनी सेवेच्या मोबदल्यात त्या कराची भरपाई करणे या प्रक्रियेला फडमाश असे म्हटले जात होते.

हे सर्व कर गावाच्या बाबतीत पाटील वसूल करत असे. व या प्रकारचे कर शहरी भागात एखादा अधिकारी वसूल करत असे. हे कर पेशवेकाळातील इतर उत्पन्नाच्या स्वरुपात शासकीय तिजोरीत जमा होत असत.

या करा व्यतिरिक्त काही अनियमित कर सरकारला मिळत असत ते कर पुढील प्रमाणे आहे.

- वनचराई: पेशवेकाळात सरकारी कुरणावर जनावरे चरवल्याबद्दल जनावरांच्या मालकांकडून जो कर घेतला जात असे त्या कराला वनचराई कर असे म्हटले जाते.

- गवत कापणी : पेशवेकाळात सरकारी जमीनीवरील गवत कापणाऱ्याकडून जो कर आकारला जात होता त्या कराला गवत कापणी कर असे म्हटले जाते.

- देवस्थान दुभी : पेशवेकाळात गावातील जी देवस्थाने होती त्यांना तेल द्यावा लागत असे त्या साठी जो गावकऱ्यांवर कर आकरला जात होता त्यास देवस्थान दुभी कर असे म्हटले जाते.

- खूर बुजवारी : पेशवेकाळात नदीकाठच्या कलिंगडाच्या मळ्यावर जो कर आकारला जात होता त्या करास खूर बुजवारी असे म्हटले जाते.

- वतन जप्ती : पेशवेकाळात एखाद्या वतनदाराचे वतन जप्त केले जात असे त्याची मालमत्ता सरकारजमा केली जात असे.

- कोतवाली : पेशवेकाळात गावरक्षणासाठी जी व्यवस्था असे या व्यवस्थेसाठी नागरी मुलखात कर द्यावा लागत होता. त्या कुराला कोतवाली असे म्हटले जाते.

२) टांकसाळीपासून मिळणारे उत्पन्न : पेशवेकाळात टांकसळीपासून मिळणारे उत्पन्न ही एक सरकारी उत्पन्नाची महत्वपूर्ण बाब मानली जात होती. पेशवेकाळात ३८ प्रकारची सोन्याची व १२७ प्रकारची चांदीची नाणी प्रचलीत होती. नाणी पाडण्याचे काम सरकारमार्फत चालत असे.

तसेच खाजगी लोकांनाही नाणी पाडण्याचे परवाने दिले जात असत त्या बाबत त्यांच्याकडून परवाना फी वसूल केली जात असे.

जर टांकसळीच्या मालकाने एक हजार नाणी पाडली तर त्यातील ६ नाणी त्यांने सरकार जमा करावी. जर त्यांनी एक हजार मोहरा पाडल्या तर कर म्हणून १ मोहर सरकार जमा करावी. ग. ह. खरे आपल्या "Some Coins of the Peshwas" या लेखात म्हणतात काही वेळा व्यापारी तत्वावर चालविलेल्या टांकसळीवर १००० नाण्यावर ७ नाणी कर म्हणून वसूल केली जात असत. या सात नाण्यापैकी ६ नाणी सरकारला व १ नाणे टांकसळीच्या व्यवस्थापकाला दिला जात असे. या तीन वर्षात पहिल्या वर्षी ५० रु, दुसऱ्या वर्षी ७५ रु व तिसऱ्या वर्षी १०० रु टांकसळ मालकाला सरकारात भरावे लागत असत.

३) खाणीपासून मिळणारे उत्पन्न : पेशवेकाळात जे खाजगीरित्या जे खाण उद्योग चालवित होते त्यांच्यावर सरकारकडून देखरेखीसाठी प्रतिनिधी नेमला जात होता व प्रतिनिधीने दिलेल्या माहितीनुसार खाणमालकाकडून कर रुपाने काही रक्कम वसूल केली जात असे. खाण उद्योगावर कर बसवून तो वसूल करण्याचे काम त्या त्या विभागातील कमाविसदार करत होते. चंदेरी व बुंदेलखंडात अशा खाणी असल्याचा व बुंदेलखंडात गोविंद बल्लाल हा पेशव्याचा प्रतिनिधी तिच्यावर देखरेख करीत असल्याचा संदर्भ मिळतो.

४) जंगलापासून मिळणारे उत्पन्न : पेशवेकाळात जंगलापासून मिळणारे उत्पन्न ही पेशव्याच्या उत्पन्नाची एक महत्वपूर्ण बाब होती. जंगलातील झाडे, सरपण, कोळसा, मध, कुरणातला गवत या गोष्टीपासून पेशव्यांना बरेच उत्पन्न मिळत होते. जंगल विषयक उत्पन्न प्राप्तीचे घटक पुढे सांगण्यात आले आहेत.

- जंगलातील झाडे तोडण्यासाठी सरकारची परवानगी घ्यावी लागत होती त्यासाठी सरकारला काही रक्कम कर रुपाने द्यावी लागत होती.
- जंगलातील मधाच्या पोळयावरही कर आकारला जात होता.
- वा. कृ. भावे यांच्या मते जंगलापासून सरकारला आरमारासाठी लाकूड उपलब्ध होत होता.
- मामलेदाराने आपल्या ताब्यात असणाऱ्या जंगलातील १५ लाख गवताचे भारे दरवर्षी सरकारजमा करावे.
- मामले दारनी दरवर्षी १६०० खंडी जळावू लाकूड व १५० खंडी कोळसा सरकारात जमा करावा.
- जळावू लाकडाचा व्यवसाय करणाऱ्यांकडून प्रत्येक बैलगाडीला ४ आणे या प्रमाणे कर वसूल करावा.
- कुरणामध्ये गवत चारणाऱ्या गुराख्यापासून योग्य त्या प्रमाणात कर घ्यावा.

५) खंडणी : पेशवेकाळात सरंजामदार व संस्थानिक यांच्याकडून मिळणारी खंडणी हे इतर उत्पन्नाचे एक महत्वपूर्ण साधन होते. उत्तर व दक्षिण भारतातील राजेरजवाडे, संस्थानिक, जहागिरदार व नायक यांच्याकडून मराठे नेहमीच खंडणी वसूल करत. पेशव्याची जी रोजनिशी

होती. या रोजनिशीच्या संदर्भावरुन असे दिसते की, पेशव्यानी उत्तरेतील सुरजमल जाट यांच्याकडून ३० लाख रुपये, रायदुर्ग, तरिपकिरे या संस्थानिकांकडून प्रत्येकी १ लाख ५ हजार रुपये. हैदरअलीकडून ४ लाख रुपये वसूल केले होते.

६) नजराना : पेशवेकाळात काही खास प्रसंगी पेशवे, सरदार, तसेच मोठ मोठ्या अधिकाऱ्यांना प्रजा व मांडलीक राजाकडून भेट व नजराने मिळत असत ही रक्कम बरीच मोठी असे ही रक्कम सरकारजमा केली जात असे. या व्यतिरिक्त दोन शत्रुपक्षामधील भांडण सरकारने मिटवल्यास सरकार विजयीपक्षाकडून नजराणा घेत असे ही रक्कमसुद्धा बरीच मोठी असे.

७) दंड व न्यायालयीन शुल्क : पेशवेकाळात खोटी वजन-मापे वापरणाऱ्या व्यापाऱ्यांवर दंड आकारला जात असे. तसेच खोटी नाणी तयार करणाऱ्या टांकसळ मालकावर सुद्धा दंड आकारला जात असे. तसेच जकात नाक्यावरुन एखादा जकात चूकवून गेला तर त्याच्यावर सुद्धा दंड आकारला जात असे. जुगाराचा धंदा करणाऱ्याना जो परवाना दिला जात असे त्यांच्याकडूनसुद्धा परवाना शुल्क घेतला जात असे ही सर्व साधने पेशवेकाळात दंडातून उत्पन्न मिळवून देणारी होती.

न्यायसंस्थेकडूनसुद्धा दंडातून जास्त प्रमाणात उत्पन्न मिळत होते. गुन्हेगारांवर आकारला जाणारा दंड, भेसळ करणाऱ्यांवर आकारला जाणारा दंड, बंदी असूनही परकीय व्यापाऱ्यांकडून माल घेतला तर त्यावर आकारला जाणारा दंड, सावकार व कर्जदार यांच्या भांडणाला मिटविण्यासाठी दोहोंवर आकारला जाणारा दंड ही दंडातून उत्पन्न मिळवून देणारी साधने होती.

८) बेवारस मालमत्ता : पेशवेकाळात बेवारस मालमत्त जप्त केली जात होती. एखादी व्यक्ती, वतनदार अथवा अधिकारी जर निपुत्रिक असेल व अक्समात त्याचा मृत्यु झाला असेल अशा प्रसंगी त्याची मालमत्ता सरकार जमा केली जात असे. नारायणराव पेशव्याच्या मृत्युनंतरसुद्धा त्यांची मालमत्ता सरकारजमा करण्यात आली होती. पेशवेकाळात गंभीर गुन्हा करणाऱ्या व्यक्तीची तसेच पेशवेसत्तेच्या विरोधात बंड करणाऱ्या व्यक्तीची मालमत्तासुद्धा सरकारजमा केली जात असे.

९) युद्धात मिळालेली लूट : पेशवेकाळात मराठी साम्राज्य दक्षिणेपासून उत्तरेपर्यंत पसरले होते. अनेक युद्धात मराठ्यांनी विजय मिळवीला होता. शत्रुचा पराभव केल्यानंतर मिळालेली लूट ही मराठ्यांच्या उत्पन्नाचे एक महत्वपूर्ण साधन बनले होते. या लुटीत त्यांना भांडी, दागिने, शस्त्रास्त्रे, सोने, रोकड, घोडे, हत्ती, बैल, उंट इत्यादी वस्तू व प्राणी मिळत होते. युद्धात मिळालेली ही लुट सरकारजमा होत होती.

१०) गुप्तधन : पेशवेकाळात जर एखाद्या व्यक्तीला पुरलेले धन सापडले तर ताबडतोब पेशवे सरकार अशा प्रकारची चौकशी करत असे. खेड्यातील एखाद्या जागेच उत्खनन करण्यासाठी सरकारची परवानगी घेतली नसेल त्याच्यावर दंड आकारला जात असे व सापडलेल्या धनापैकी निम्मेधन सरकार जमा केले जात असे.

११) व्यापारी कर : पेशवेकाळात शिवकाळाप्रमाणेच वेगवेगळ्या प्रकारचे व्यापारी कर आकारले जात होते. या ठिकाणी आपण पेशव्याच्या व्यापारी करांची माहिती पाहणार आहोत.

- **जकात कर:** पेशवेकाळात व्यापारी लोकांच्या खरेदी-विक्रीवर जो कर आकारला जात होता त्या कराला जकात कर असे म्हटले जाते. हा कर त्या काळात आयात-निर्यात मालवरही आकारला जात असे. पेशवे काळात जकातीचे पुढील प्रमाणे प्रकार होते.

  १) **थळभरीत कर :** पेशवेकाळात माल खरेदी करतांना ज्या ठिकाणी माल भरला जात होता त्या मालावर आकारण्यात येणाऱ्या कराला थळभरीत कर असे म्हटले जाते.

  २) **थळमोड कर :** पेशवेकाळात ज्या ठिकाणी माल विकला जात होता त्या विकल्या जाणाऱ्या मालावर ज्या ठिकाणी कर आकरला जात होता. त्या कराला थळमोड कर असे म्हटले जाते.

  पेशवेकाळात किराणामाल डोक्यावरुन वाहुन नेत असताना १।। आणा कर, घोड्यावरुन माल नेत असताना १ आणा, बैलगाडीतून वाहतूक करत असताना ९ आणे या प्रमाणे जकात आकारला जात होता.

  ३) **हाशिलकर :** पेशवेकाळात एका प्रांतातून दुसऱ्या प्रांतात किंवा एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात मालाची ने आण करताना जो जकात कर आकारला जात होता त्या जकात कराला हाशिलकर असे म्हटले जात होते. सामान्यपणे बाजारात विक्रीसाठी जो माल आणला जात होता. त्या मालावर जो कर आकारला जात होता त्यालासुद्धा हाशिलकर असे म्हटले जात होते.

  ४) **छापाकर :** पेशवेकाळात व्यापारासाठी बाहेरुन आलेल्या कापडावर सरकारी शिक्का मारुन द्यावा लागत असे. त्यासाठी जो कर घेतला जात असे त्याला छापा कर असे म्हटले जात असे. हा कर कापडाच्या किंमतीच्या ५% घेतला जात असे. मात्र कापड स्थानिक असेल तर त्यावर प्रत्येक ताग्याला २ रु ८ आणे या प्रमाणे छापा कर आकारला जात असे.

  ५) **शिंगशिंगोटी :** शिवकाळा प्रमाणेच पेशवेकाळात जनावरांच्या खरेदी-विक्रीवर जो कर आकारला जात असे त्या कराला शिंग-शिंगोटी कर असे म्हटले जाते.

  ६) **रहदारी जकात :** पेशवेकाळात राजमार्गावरुन होणाऱ्या वाहतूकीवर सरहद्द बदलताना जो कर आकारण्यात येत असे त्या करास सरहद्द कर असे म्हटले जाते. असे सेन यांनी म्हटले आहे. या कराचे दर प्रत्येक सुभ्यात वेगवेगळे असत. हा कर वसूल करताना एका सुभ्यातून दुसऱ्या सुभ्यात येणाऱ्या मालाची तपासणी केली जात असे. पुढे या कर वसूली पद्धतीत सुधारणा करण्यात आली. बाळाजी बाजीराव पेशव्यांच्या कारकिर्दीत हा कर मिराज व बऱ्हाणपूर या एकाच मार्गावर वसूल करण्यात येऊ लागला.

ब) अबकारी कर : पेशवेकाळातील दुसरा महत्वपूर्ण व्यापारी कर म्हणजे अबकारी कर होय. पेशवेकाळात दारु व तंबाखूवर हा कर आकारला जात होता. पेशवेकाळात नारळाच्या झाडापासून किंवा कोकोच्या झाडापासून दारु काढली जात होती. या प्रत्येक झाडांवर १ रुपया कर आकारला जात होता. खाजगी लोक दारु गाळण्याचे काम करत होते. त्यांच्यावर ठरावीक रक्कम कर म्हणून आकारली जात होती. मात्र दारु पिणे निशिध मानले जात असल्याने पेशव्यानी या व्यवसायाला प्रोत्साहन दिले नाही असे डॉ. सेन यांचे म्हणने आहे.

दारु बरोबरच अबकारी कराचे दुसरे साधन म्हणून तंबाखूकडे पाहिले जाते. तंबाखू विक्रीसाठी सरकारी परवाना लागत असे त्यासाठी विक्रेत्याला परवानगी फी म्हणून सरकारला काही रक्कम द्यावी लागत होती.

क) मोहतर्फा किंवा व्यवसाय कर : पेशवेकाळात व्यापारी, कारागीर व दुकानदार यांच्यावर जो कर आकारला जात होता त्या कराला मोहतर्फा किंवा व्यवसाय कर असे म्हटले जाते. मोहतर्फा हा शब्द मराठी कागदपत्रात वारंवार आला आहे. पेशव्याच्या रोजनिशीचे संक्षिप्त स्पष्टीकरण करणारे संपादक ग. चि. वाड यांनी मोहतर्फा म्हणजे व्यापारी वर्गावर आकारला जाणारा कर होय.

बाळाजी बाजीरावाने सन १७४२-४३ मध्ये रेवदंडा प्रांताच्या अधिकाऱ्याला पाठविलेल्या पत्रात मोहतर्फा कर कोणत्या दराने आकारावा या संबधीच्या सूचना केला होत्या.

- कोळ्यांच्या मिळकतीनुसार प्रतिवर्षी २ रु, ५ रु, ८ रु कर आकारावा.
- दुकानदाराच्या मिळकतीनुसार प्रतिवर्षी ५ रु, ६ रु, ७ रु कर आकारावा.
- कुंभाराने दरवर्षी प्रत्येक चाकामागे ३ रु व त्याच्या विक्रीच्या प्रत्येक दुकानामागे ३ रु द्यावेत.
- लोहाराने प्रतिवर्षी मिळकतीमागे ४ रु द्यावेत.
- चर्मकाराने प्रतिवर्षी ४ रु, ५ रु, ६ रु द्यावेत.
- तेल्याने त्याच्या मिळकतीनुसार प्रतिवर्षी ५ रु, ६ रु, ७ रुपये द्यावेत.
- बुरुड प्रत्येक कुटुंबाकडून ३ रुपये कर द्यावा.

ड) उद्योगानवरील कर : पेशवेकाळात वेगवेगळ्या उद्योगांवर वेगवेगळ्या प्रकारचे कर आकारले जात होते. या कराना औद्योगिक कर असे म्हटले जात होते. पेशवेकाळात, मिठ, तेलनिर्मिती, गुळनिर्मिती, मच्छ व्यवसाय इत्यादी अनेक उद्योगांवर कर आकारला जात होता.

- मीठ कर : पेशवेकाळात प्रत्येक मिठागरावर १ टक्का किंवा खंडीला २ रु १० आणे कर आकारला जात असे.
- तेलघाणा : पेशवेकाळात प्रत्येक तेलघाण्यावर ५ ते ७ रुपये कर आकारला जात होता.
- गुऱ्हाळे : पेशवेकाळात ऊसापासून गुळ तयार करण्यासाठी गुऱ्हाळे असत. प्रत्येक गुऱ्हाळामागे प्रत्येक वर्षाला १ ढेप कर आकारला जात असे.
- मच्छव्यवसाय : पेशवेकाळात मराठा राज्यात मासेमारी व्यवसाय चालत असे. मासेमारीसाठी वापरल्या जाणाऱ्या प्रत्येक तळ्या मागे ४ ते ५ रुपयापर्यंत कर आकारला जात असे.

सर्व करापासून सरकारला मिळणारे उत्पन्न :

सर्व करापासून मराठ्यांना किती उत्पन्न मिळत होते या बाबत विविधता आहे. डॉ. आर. डी. चोकसी यांनी आपल्या "The Period of Transition" या ग्रंथात असे म्हटले आहे की १८१८ च्या आलेल्या राजवटीप्रमाणेच मराठ्यांची महसूल पद्धती चांगली होती. लॉर्ड व्हॅलेंशिया तेव्हाचे सरकारचे उत्पन्न ७१,६४,७२४ रुपये इतके देतो. ग्रँट डफनेही तेव्हाचे उत्पन्न सहा

कोटी होते असे म्हटले आहे. मात्र हे आकडे विश्वसनीय वाटत नाहीत. एल्फीन्स्टनने वेगवेगळ्या ठिकाणी आपल माणसे पाठवून माहिती गोळा केली होती या माहितीच्या आधारे त्यांनी मराठ्यांचे एकदरीत उत्पन्न ९६,७१,७३५ रुपये इतके होते असे म्हटले आहे.

आपली प्रगती तपासा

१) शिवकाळातील जमीन महसूल पद्धती जाणून घ्या.

२) पेशवेकाळातील जमीन महसूल पद्धती जाणून घ्या.

३) शिवकाळातील जमीन महसूल आकारणीची तत्वे जाणून घ्या.

४) पेशवेकाळातील जमीन महसूल आकारणीचे तत्व जाणून घ्या.

५) शिवकाळातील उत्पन्नाची इतर साधने समजून घ्या.

६) पेशवेकाळातील उत्पन्नाची इतर साधने समजून घ्या.

९.६ सारांश

मराठ्यांच्या उत्पन्नाच्या साधनांचा विचार करत असताना सर्व प्रथम आपणास जमीन महसूलास आग्रस्थान द्यावे लागेल. कारण मराठ्यांच्या शिवकाळ व पेशवेकाळातील कारकिर्दीचा जर विचार केला तर या दोन्ही कारकिर्दीमध्ये जमीन महसूल हीच उत्पन्नाची मुख्य बाब होती. जमीन महसूला व्यतिरिक्त चौथाई व सरदेशमुखीच्या माध्यमातून सुद्धा मराठ्यांना उत्पन्न मिळत असे. मात्र शिवकाळातील चौथाई व सरदेशमुखी व पेशवेकाळातील चौथाई व सरदेशमुखी यात आपणास बराच फरक जाणवतो. पेशवेकाळात वाढलेल्या साम्राज्यविस्तारामुळे मराठ्यांचा चौथाई व सरदेशमुखीमध्ये आपणास वाढ झाल्याची आढळून येते. या तिन महत्वपूर्ण उत्पन्नांच्या साधना व्यतिरिक्त मराठ्यांच्या उत्पन्नाची आपण इतर साधनेही पाहिली आहेत. या साधनांचा विचार करता शिवकाळात मराठ्यांना इतर उत्पन्न मिळवून देणारी प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष व संकिर्ण कर प्रणाली होती हे आपण पाहिले आहे. तर पेशवेकाळात जादा महसूल, व्यवसाय महसूल, दंड महसूल, जप्ती महसूल, लूट या कर प्रणालीचाही अभ्यास केला आहे. या सर्व महसूल प्रशासनाने मराठा साम्राज्याची महसूल व्यवस्थेची घडी सुव्यवस्थीत झाली होती हे आपण नाकारु शकत नाही.

९.७ प्रश्न

१) मराठ्यांचा महसूल व्यवस्थेचा विकासाचा आढावा घ्या.

२) मराठ्यांचा महसूल आकारणीची तत्वे सांगुन महसूल पद्धतीच्या प्रकारांची माहिती सांगा.

३) मराठ्यांच्या शिवकाळातील उत्पन्नाच्या इतर साधनांची माहिती सांगा.

४) मराठ्यांच्या पेशवेकाळातील उत्पन्नाच्या इतर साधनांची माहिती सांगा.

९.८ संदर्भ

१) शिवकालीन महाराष्ट्र - डॉ. अ. रा. कुलकर्णी

२) शिवराज्य व शिवकाळ - वा. कृ. भावे

३) पेशवेकालीन महाराष्ट्र - वा. कृ. भावे

४) शिवाजी व शिवकाळ - ज. मा. पवार

५) मराठेकालीन राज्यवस्था - रा. ना. जोशी

६) मराठेकालीन संस्था व विचार - गायकवाड, थोरात, सरदेसाई, ह. माने.

७) मराठ्यांच्या प्रशासकीय, सामाजिक व आर्थिक इतिहास प्रा. बी. एस. सावंत प्रा. जाधव

❖❖❖❖

munotes.in

१०

मराठ्यांचे प्रशासन : वतनदारी पध्दत

घटक रचना:

१०.० उद्दिष्ट्ये

१०.१ प्रस्तावना

१०.२ वतन आणि वतनदारी

१०.३ वतनदारी जमिनीचे प्रकार

१०.४ वतनी वा इनामी जमिनीची निर्मिती आणि जप्ती

१०.५ वतनी जमिनींची विक्री, खरेदी, गहाण आणि दान

१०.६ मिरासदार आणि उपारीस

१०.७ वतनदारांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या

१०.८ वतनाचे महत्त्व

१०.९ वतनदारी व्यवस्था आणि आज्ञापत्र

१०.१० कॅप्टन ग्रॅट डफ आणि वतनदारी व्यवस्था

१०.११ वतनदारी व्यवस्थेत होत गेलेले बदल

१०.१२ वतनदारी व्यवस्था आणि मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध

१०.१३ जमिनीचे विभाजन

१०.१४ जमिनीचे स्वरूप

१०.१५ मराठा काळातील कास्तकार किंवा शेतकरी

१०.१६ शेतकरी वर्गाची पुर्न:स्थापना

१०.१७ शेतीसाठी उत्तेजन

१०.१८ शेतकी उत्पादन

१०.१९ सिंचन

१०.२० उद्याने आणि जंगले

१०.२१ वसाहतीकरण

१०.२२ सारांश

१०.२३ प्रश्न

१०.२४ संदर्भ

munotes.in

१०.०.उद्दिष्ट्ये

- वतन आणि वतनदारी व्यवस्था समजून घेणे.
- वतनदारी जमिनीच्या विविध प्रकारांचे अकलन होणे.
- वतनाचे महत्त्व सर्वांगाने समजून घेणे.
- मराठा अधिपत्याखाली झालेली वतनदारी व्यवस्थेची वाटचाल सर्वांगाने समजून घेणे.
- मराठ्याच्या स्वातंत्र्य युद्धा दरम्यान वतनदारी व्यवस्थेची स्थितीची माहिती होणे.
- शेती व्यवसायास उत्तेजन देण्यासंदर्भात मराठा राज्यकर्त्यांचे धोरण समजून घेणे.
- मराठा काळातील उद्याने जंगले आणि वसताहतीकरण समजून घेणे.

१०.१ प्रस्तावना

मराठा काळातील जमिन हेच उत्पन्नाचे प्रमुख साधन होते. ते इतर कोणत्याही साधनापेक्षा महत्त्वाचे समजले जात असे आणि त्यास वतन म्हणत असत. वतन म्हणजे स्वत:ची राहण्याची जागा आणि तिथे असलेली स्वत:च्या ताब्यातील जमीन ज्याच्याकडे मालकीची जमीन असेल त्याला त्याच्या अभिमान असे आणि त्याला त्याच्या मालकीच्या जमिनीमुळे वतनदार म्हणून ओळखले जात असे. मराठा जे जमीन मालक असत, त्यांच्या जमिनी टिकविण्यासाठी सर्वस्वपणाला लावीत असत कारण असणे म्हणजे वतन असणे अशी भावना होती. मराठा इतिहास जमिनीच्या मालकी हक्कासाठी अशा सत्वपरीक्षा आणि विवादांनी भरलेला आहे. या जमिन वा वतनास इनाम असेही म्हटले जाई ज्यांची मालकी वंश परपरेने म्हणजे मुलाकडे जात असे. जर का मुलगा वा वासरदार नसेल तर वारसदार जमिनीवर हक्कांसाठी दावे, प्रतिदावे करीत असत. असे अनेक पुरावे आहेत की असे वतन वा इनाम सरकार आदेशानुसार जिवंत असणाऱ्या वारसदारांमध्ये विभागून देण्यात येत असे.

मराठा काळामध्ये लोकांचा मुख्य व्यवसाय जमिन हाच होता. मराठ्यांच्या आर्थिक स्थितीचा तो मुलाधार होता. त्यावेळेस व्यापार व दळणवळण थोड्याफार प्रमाणात आस्तित्वात असला तरी शेती ही चिरस्थायी होती कारण लोकांना लागणाऱ्या अन्ना व्यतिरिक्त शेतीमध्ये उत्पन्न होणाऱ्या उत्पादनांचाच व्यापार व दळणवळणात उपयोग केला असे. म्हणूनच शेतकरी किंवा शेती कसणारे जमिनीला भूमाता म्हणत असत. हे लक्षण घेतले पाहिजे की त्यावेळेस जमिनी संदर्भातील खाजगी मालमत्तेचे तत्व मान्य केले गेलेले होते. जमिनीची होणारी खरेदी-विक्री गहाण ठेवणे आणि दान करणे आणि कसणारे व राजा दरम्यान महसूल संदर्भात थेट सोडवणूक याद्वारे हे सिद्ध होते की कसणाऱ्यांना मराठा काळात जमिनीवर मालकी हक्क असायचा. खाजगी मालमत्तेला मान्यता असली तरी कसण्यासाठी वाट्याला आलेल्या जमिनीनुसार सर्वजण त्या त्या प्रमाणात शेतकी उत्पादन काढीत असत.

१०.२ वतन आणि वतनदारी

मध्ययुगीन काळापर्यंत भारतात आणि जगाच्या इतर देशात राजा हाच त्याच्या राज्यातल्या सर्व जमिनीचा मालक असे. परंतु जमीन कसण्यासाठी ती कसणाऱ्यांच्या हाती दिली गेली. हळूहळू त्यांनी ती ताब्यात घेतली आणि तेच त्या जमिनीचे मालक म्हणून ओळखले जाऊ लागले. शेवटी राजाने, सुरवातीपासून जमीन कसत असणाऱ्यांना त्या जमिनी देऊन टाकल्या. अश्या रीतीने मजूरांचे मालक असलेले मिरासदार उदयाय आले आणि मराठा आधिपत्याखाली बहुतांश गाव

जमीन अश्या शेतमजूर मालक असलेल्यांच्या ताब्यात गेली. उर्वरित जमिन सरकारच्या ताब्यात असल्याने ती उपरीस किंवा कळे किंवा शेतकऱ्यांना महसूल प्राप्तीसाठी सरकारद्वारा ठरवून देण्यात आली. अश्यारीतिने गावजमीनीची १) खालीसती, २) इनामती अशा वर्गवारी करण्यात आली.

१) गाव जमीन : गाव जमीन ही सर्वसाधारण १) निवासी जमीन (गावठाण), २) शेतजमीन, ३) पडीक जमीन अश्या भागात विभागलेली असे. गावातील लोक निवासी जागेत रहात असत परंतु संपूर्ण जागा ते राहण्यासाठी वापरीत नसत. या जमिनीचा काही भाग ते गावामध्ये नवीन येणाऱ्यांना राखून ठेवली जात असे. सुपीक जमीन शेतीसाठी पिकांच्या लागवडीसाठी वापरली जात असे. पडीक जमीन ही १) गायरान, २) सामाजिक जमीन भागात विभागली असे; सामाजिक जमीन ही गावकऱ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम, खेळ आणि बाजारपेठ या सामाजिक कार्यासाठी वापरली जात असे. प्रत्येक गावाने आपल्या गावातील अधिकाधिक पडीक जमीन लागवडीखाली आणून राजाला द्यावयाचा महसूल वाढवावा असे सरकारचे सततचे आदेश असत. साहजिकच शेतमजूरांचे मालक असलेली मिरासदार आणि गावात नव्याने मजूरीसाठी आलेले शेतमजूर म्हणजे उपारीस यांना अधिकाधिक पडीक जमीन लागवडीखाली आणणे, त्याचे उत्पादन वाढवणे आणि राजाच्या महसूलात भर टाकण्यासाठी उत्तेजन दिले जात असे.

२) खालीसती जमीन : याचा अर्थ या जमिनीचा महसूल थेट राजाच्या खजिन्यात जमा होत असे. तो देखील सरकारी यंत्रणेद्वारे वसूल केला जात असे.

३) इनामती जमिन वा वतनदारी जमीन : ही जमीन म्हणजे राजा किंवा सरकारद्वारा इनामदार वा वतनदारांना वाटण्यात आलेली जमीन. या इमानदारांना वा वतनदारांना सरकारकडून वा राजाकडून मिळणाऱ्या रोख रकमेच्या ऐवजी या जमिनीवरील महसूल गोळा करण्याची परवानगी असे. त्यामुळेच जमिनीला इनामती किंवा वतनदारी जमिन म्हणत असत. थोडक्यात कर्तव्य भावनेने चिरस्थायी ठेवलेली जमीन म्हणजे वतन वा वतनदारी जमीन वा इनामाती जमीन. प्रत्येक गावामध्ये देशमुख, देश कुलकर्णी, मुकादम, कुलकर्णी, पडेवार अनेक वतनदार, इनामदार आणि अनेक सैन्य अधिकारी असत. हे अधिकारी परंपरागत इनामदार वा वतनदार असत ज्यांच्याकडे मराठा अधिपत्याखाली २० टक्के जमीन असे. हे वतनदार, इनामदार वा जागिरदार त्यांच्या स्वत:च्या यंत्रणेद्वारे महसूल गोळा करीत असले तरी शेती पिकविणाऱ्यांना त्यांच्या हक्कापासून वंचित करीत नसत. हे शेती पिकविणारे गावातील खालिस्ती जमिनीवर शेती पिकविणारे आणि इतर शेती पिकविणारेनुसार जमिन महसूल दाने असत. हा गोळा केलेला संपूर्ण जमिन महसूल स्वत:कडून ठेवून घ्यायचा का त्यातील काही भाग राजाला वा इतर कारणांसाठी द्यायचा हे सर्वस्वी या इनामदार वा वतनदार वा जागिरदारांवर अवलंबून असे.

१०.३ वतनदारी जमिनीचे प्रकार

राजा वा सरकारकडून अनेक व्यक्तिगत व अव्यक्तिगत प्रकारच्या जमिनी राजा वा सरकारकडून अनुदानित दिल्या गेल्या ज्यातून वतनदारी वा इनामदारी व्यवस्था आस्तित्वात आली. ह्या वतनदारी वा इनामी अनुदानाबाबतीत थोडक्यात खालीलप्रमाणे सांगता येईल.

१) धार्मिक अनुदाने वा वतने : धार्मिक मंडळे वा संस्थांना दिली जाणारी ही अव्यक्तिगत अनुदाने वा वतने असत. या धार्मिक संस्थांना दिलेल्या जमिनीत लागवड करण्यासाठी शेतीकाम करणारे नोकरीला ठेवलेले असत आणि या संस्था चालविण्यासाठी वा त्या संस्थासाठी होणारा

खर्च भरून काढण्यासाठी जमीन महसूल वापरता येत असे. या अनुदाना, वतनांना वा इनामांना देवस्थान इनामे वा वतने देखील म्हणत असत, ही वतने १) मंदिर, २) मशीद, ३) मठ, ४) समाधी, ५) वर्षासनास दिली जात. ही वतने वा इनामे खाली विस्ताराने चर्चा केली आहेत.

१. मंदिर : मंदिरातील पूजा-अर्चा किंवा धार्मिक विधी पार पाडण्यासाठी मराठ्यांनी मंदिरांना वतने वा अनुदाने दिली. जसे छत्रपती शिवाजी महाराजांनी आळंदी येथे ज्ञानेश्वरांचे मंदिरास जमिनीचा एक तुकडा वतन वा इनाम म्हणून दिला. पेशव्यांच्या काळात हे वतन वा इनामास मान्यताच केवळ दिली गेली नाही तर त्याच मंदिरासाठी नवीन इनाम देखील मंजूर करण्यात आले.

२. मशीद : सभासद बखर लिहितात की छत्रपती शिवाजी महाराजांनी केवळ मंदिरांनाच नव्हे तर मशिदींनासुद्धा त्यांचा रोजचा खर्च भागविता यावा वा त्यांच्या धार्मिक कार्याकरिता लागणारा पैसा उपलब्ध व्हावा याकरिता जमिनी अनुदानित केल्या आणि भत्ते मंजूर केले. इंदापूर येथील मशिदीची देखभाल करण्यासाठी इंदापूरच्या काझीस शिवाजी महाराजांनी तीन एकर जमीन मंजूर केली. भाबाडे येथील मशिदीचा खिदमतगार असलेल्या अबद्दलास मलिक अंबरद्वारा दिल्या गेलेले वतन देखील शिवाजी महाराजांनी कायम ठेवले. अशा रीतीने मराठा सत्तेच्या शेवटच्या काळात देखील ही वतने चालूच राहिली.

३. मठ : मंदिर आणि मशिदीप्रमाणे विविध ठिकाणच्या मठांना देखील मराठ्यांनी वतने दिली होती. शिवाजी महाराजांनी त्यांचे गुरु रामदासांना चाफळ येथील त्यांच्या मठाच्या देखभालीसाठी वतन व इनाम मंजूर केली होती. त्यांनी पाटघर येथील मौनिबाबाना देखील त्यांच्या तेथील मठाच्या देखभालीसाठी काही वतने इनाम मंजूर केली. निभा येथील स्वामी सदानंतचा मठ आणि चिंचवड येथील मोरया गोसावीचा मठ यांना देखील भरपूर अनुदाने वा वतने मिळत असे.

४. समाधी : या काळात अनेक संत होते ज्यांनी त्यांच्या धार्मिक व अध्यात्मिक प्रवचनाद्वारे लोकांचे लक्ष वेधून घेतले होते. अशा संताना त्यांच्या समाधीच्या देखभालीसाठी मरणोत्तर काही वतन वा अनुदान दिले जात असे. उदा. सासवड येथील सोपानदेवांच्या समाधीला वतन मिळाले आहे.

५. वर्षासनास : मराठा अधिपत्याखाली धार्मिक सेवा पार पाडण्यासाठी हे एक धार्मिक वतन वा इनाम होते. त्याला वर्षासनास म्हणत. असे म्हटले जाते की देवाची पूजाविधी करण्यासाठी ब्राह्मणास तीस बिघा जमीन अनुदान करण्यात आली होती. अश्याच रीतीने जेजुरीच्या गोसावींना त्याच्या स्थानिक देवाच्या पूजाविधीसाठी १२ बिघा जमीन वतन म्हणून मिळाली असेही म्हटले जाते की ही वर्षासने खजिन्यातून वा महालातून गोळा होणाऱ्या महसूलातून वर्षातून एकदा या धर्तीवर दिली जात. या संदर्भात आज्ञापत्र म्हणता की धर्मासारख्या शाश्वत पुण्याचे काम चालू रहाणे जमिनीच्या रूपात वतन वा इनाम दिले जात असे. देवाचे ठिकाण असल्याने मंदिरांना गाव जमिनी मंजूर केली जात असे. एवढेच नाही तर जिथे पूजाअर्चा, दानधर्म, तीर्थयात्रा व अन्नदान यासारखे उपक्रम होत असत असे संताचे आश्रम, समाधीस्थळे यांना देखील सरकारकडून वतनांची गरज भासे आणि त्यानुसार त्यांना तीव्रतेने मंजूर केली जात.

२) अग्रहारा वतन वा इनाम : मराठा काळात मंजूर केले जाणारे हे अजून एक प्रकारचे वतन वा इनाम असे. विल्सन यानी त्यांच्या स्पष्टीकरण कोशात अग्रहारा वतनाची अशी व्याख्या केली आहे की, जे गाव अथवा गावचा भाग ब्राह्मणांद्वारे त्यांच्या शिक्षणाच्या कालावधीपर्यंत व्यापलेला

असेल वा विशेष अनुदानांतर्गत भाडेमुक्त रीतीने वा कमी दराने कर देऊन ताब्यात घेतला असेल त्या गावास वा भागास अग्रहारा वतन वा इनाम म्हटले जाते.

अग्रहारा वतन वा इनाम हे सर्वसाधारपणे ब्राह्मणांना त्यांच्या शिक्षणाच्या वा अध्ययनाच्या कालावधीतील उदर निर्वाहासाठी मंजूर केले जात असे. या इनामी वा वतनी जमिनीला संपूर्ण कर मागणी दिलेली असे वा अत्यंत कमी कर आकारणी केली जाते. ज्या अग्रहारा जमिनींना करातून संपूर्ण सूट दिली जात असे अश्या जमिनींना सर्व अग्रहारा जमिनी म्हटले जात असे. शिवापूर व तुळापूर ही गावे अग्रहारा गावे होती म्हणजे या गावातील सर्व जमिनी वेगवेगळ्या ब्राह्मणांना त्यांच्या अध्ययनासाठी अग्रहारा वतन म्हणून दिल्या होत्या. अशा अनेक घटना आहेत ज्यात शिवाजी महाराजांनी संपूर्ण गावे पुण्यातील ब्राह्मणांना अग्रहारा वतन म्हणून दिलेली होती.

३) सनदी व गाव जिसबत इनामी व वतनी जमिनी : या काळात मंजूर केल्या गेलेल्या वतनी वा इनामी जमीनींचे वर्गीकरण १) सनदी इनामी जमिनी वा वतने, २) सांप्रदायिक इनाम वा वतन

१. सनदी वतन : या वतनात, वतनासंदर्भातील सनद (अधिकार) राजाकडून किंवा सत्ताधाऱ्याकडून वतनदार दिले जात असे. या वतनात, वतनाचे स्वरूप म्हणजे सरकारी कर आकारणीतून मुक्त, अखंड किंवा काही ठराविक कालावधीसाठी, जर काही भाग सरकारच्या दाव्यानुसार राखीव जसे अर्धा, एक तृतीयांश, एक चतुर्थांश, असे नमूद केलेले असे. त्यामुळे अशा वतनास निमाई वतन, तिजाई वतन आणि चौथाई वतन म्हणत असत. राजा किंवा सत्ताधारी त्याला जे कधी वाटेल त्यावेळेस राजेशाही फर्मान काढून असे वतन निर्माण करत असे किंवा अधिकृत करीत असे.

२. सांप्रदायिक इनाम वा वतन : हे वतन कुठल्याही लिखित स्वरूपातले वा फर्मान काढून अधिकृत केलेले नसे. हे वतन तोंडी असे आणि ते सनदी वतना इतकेच महत्त्व राखून होते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्या ज्या वेळेस गरज पडली त्या वेळेस परिस्थितीनुरूप अशी वतने निर्माण केली आणि विविध वतनदारांना भाडे मुक्त जमिनी मंजूर केल्या. उदा. शिवाजी महाराज, बाळाजी आवाजी, त्याच्या चिटणीसांना त्यांच्या निष्टेबद्दल कानद खोऱ्याचे बाळाची देशमुख यांना त्यांच्या सहाय्याबद्दल रामचंद्र निकट यांना त्यांच्या मौल्यवान सेवेबद्दल सबनीसी वतन दिले होते. अश्याच रीतीने राजानी त्यांचे निष्ठावान सेवक बाकाजी फर्जंद यांना अनेक गावांची पाटीलकी वतन दिले होते.

४) दूध-भात आणि साडी-चोळी वतन : ज्याप्रमाणे राजा त्याच्या निष्णवान सेवक व अधिकाऱ्यांना राजाची आणि राज्यातील जनतेची चांगली सेवा केल्याबद्दल वतने देत असे; त्याचप्रमाणे राजाने त्यांच्या निष्ठावान सेवकांच्या मुलींना ज्यांनी राज्याची सुरक्षितता आणि बचावासाठी अतुलनीय शौर्य दाखविले त्यांना देखील काही वतने देत असे. अश्या वतनांना दूध-भात वतन किंवा साडी-चोळी वतन म्हणत असत. उदा. जिजाबाईंनी एका कुलकर्ण्याच्या बायकोला आणि मुलीला ज्यांनी राजासाठी निष्ठापूर्ण आणि महत्त्वाच्या सेवा बजावल्या होत्या त्यांना एक cavar जमीन भेट दिली. जिजाबाई त्यांच्यावर एवढ्या खूष होत्या की त्यांनी ती जमीन कायमचे वतन म्हणून देऊन टाकली. अश्याच रीतीने जिजाबाईंनी सूर्य ग्रहणाच्या वेळी दरबारातील अनेक सेवकांना, भोसले घराण्याचे कौटुंबिक पूजारी राजोपाध्ये यांना व गावाच्या पहारेकऱ्याला एक cavar जमीन वतन म्हणून दिली. आज्ञापत्रामध्ये विश्वासू सेवकांच्या बायकांना आणि मुलींना दिल्या जाणाऱ्या वतनांना काकण-चोळी वतन म्हटल्याचा संदर्भ आहे.

५) कारागिरांना दिलेली वतने : प्रत्येक गावातील कारागिरांना काही जमीन ही वतन म्हणून दिलेली असे ज्यावर त्यांना महसूल वा कर द्यावा लागत नसे. सर्वसाधारणत: या कारागिरांना वतन म्हणून दिलेली जमीन ही पडीक जमीन असे. या वतनाला तिकनाती बेगारी असे म्हणत याचा अर्थ गावाला विशिष्ट सेवा काहीही मोबदला न घेता पुरविणाऱ्या माणसांना दिले जाणारे वतन. कारागिर हे वतन गहाण ठेवू शकत परंतु विकू शकत नसत आणि लोकांना विशिष्ट सेवा पुरविल्यास अक्षम ठरले तरी ते वतन बाळगू शकत असत. विल्सन यांनी त्याच्या स्पष्टीकरण कोशात अशा वतनांना वतन-मावळ म्हटलेले आहे कारण अशी वतने देशावर अथवा घाटमाथ्याऐवजी मावळ परिसरातच दिली गेली आहे. या वतनांना देहांगी वतने देखील म्हणत. कारण ती कोकर, संगीतकार, नर्तक आणि राज्य तसेच गावातील लोकांची सेवा देत असताना ज्यांनी अत्यंत मोठा त्याग केला अश्या कुटुंबियांना देण्यात येत असत. ही वतने गाव निसबात इनामात समाविष्ट केली जात आणि गाव जमिनीच्या बाहेर दिली जात. ही इनामे भाडे मुक्त असल्याने, गावकऱ्यांना राजाला वा सरकारला महसूल देताना तोटा होत असे. मराठा काळात दिले जाणारे हे ही एक वतन होते.

तात्विकदृष्ट्या राजा हाच राज्यातील सर्व जमिनीचा मालक असे. कोणतीही जमीन कुठल्याही आवश्यक नोंदीशिवाय कधीही त्याला परत करावी लागे. परंतु व्यवहारात असे परत देणे कधी घडले नाही अपवाद फक्त जर का वतनदार वा जमिन ताबेदाराचा अचानक मृत्यू झाला तर. वतनदार वा जमीन ताबेदारास मूल नसेल तर तो मुलगा दत्तक घेऊन सरकारची वा राजाची मर्जी असेपर्यंत वतनाचा लाभ घेऊ शकत असे. जेव्हा कधी वतनाची वा इनामाची जमिन पडून राहते वा स्पष्टपणे दाखवता येत नाही, ते वतन राजाकडे परत जात असे. अशी जमीन दुसऱ्याला तेव्हाच दिली जाई जेव्हा तो त्यावरील त्याचा हक्क शाबीत करू शक असे. त्यापूर्वी सर्व पुरावे बारकाईने तपासले जात असत. असे म्हटले जाते की असे करण्यामागे सर्व उपलब्ध जमिन कसली जावी व त्यातून जास्तत जास्त उत्पन्न मिळावे असा हेतू असे.

१०.४ वतनी वा इनामी जमिनीची निर्मिती आणि जप्ती

राजा किंवा गाव योग्य व्यक्तींना वतने वा इनाम मंजूर करीत असे आणि ज्या कार्यासाठी किंवा कर्तव्याच्या पूर्तीसाठी ती वतने दिली जात, ती कार्ये न झाल्यास वतने खंडीत केली जाई छत्रपती शिवाजी महाराजांनी अशा अनेक वतनदारांची वतने व इनामे जप्त केली होती जसे १) पुण्याच्या देशमुख कुलकर्णी वतन मुघलांशी सोबत केली या कारणाने जप्त करण्यात आले. २) मुठे खोऱ्यातील देशमुख व देशमुख कुलकर्णी वतने आणि रोहिडखोरचे देशमुख वतन देखील गौरवर्तनाच्या कारणावरून जप्त करण्यात आले. ३) रांजे येथील पाटील वतन त्याच्या गैरवर्तन आणि राज्याच्या महसूलात तूट केल्याच्या कारणांवरून राजांद्वारे जप्त करण्यात आले. अश्या रीतीने वतने जप्त करताना सरकारने यापूर्वी या जमीनधारकांना त्या वतनी जमिनीवरील त्यांच्या हक्कापोटी दिलेल्या आगाऊ रकमेचा देखील विचार केला जात असे.

ज्या प्रकरणात वतन खंडीत करून राजाला परत केले जात असे. त्यात प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्याला देखील केले जात नसे. अश्याच रीतीने जेव्हा राज्यात नवीन प्रदेशांची भर पडत असे, प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्याचे जीवन अस्थिर होत नसे. भीतीपोटी जर जुने कसणारे पळून गेले असतील तर नवीन कसणाऱ्यांना कामावर ठेवण्यास राजा स्वत: गाव अधिकाऱ्यांना आदेश देत असे. जमिनीचा प्रत्येक तुकडा कसला गेला पाहिजे यासाठी राजा गाव अधिकाऱ्यांना आदेश देत असे.

१०.५ वतनी जमिनींची विक्री, खरेदी, गहाण आणि दान

वतनदार व इनामी जमिनी ताबेदारांना तसेच इतर कसणाऱ्यांना जमिनीची हक्क नोंद व त्यावरील महसूल विकण्याची वा देऊन टाकण्याची परवानगी असे. त्या जमिनी तारण ठेवून त्यांवर कर्ज घेण्याची देखील मुबा त्यांना असे. गाव अधिकारी जमिन महसूल गोळा करण्याचा त्यांचा हक्क गावकऱ्यांच्या संमतीने विकू शकत असे. जमीन महसूल गोळा करण्यासाठी जे अधिकारी नेमले जात ते गावकऱ्यांना मान्य असत. वतनदार वा इनामधारक ज्यावेळेस त्याला पैश्याची गरज भासेल त्यावेळेस त्याची जमीन संपूर्णपणे विकू शकत असे काही वेळेस त्या वतनदाराने सरकारकडून घेतलेले रकमेसाठी पाटलांस त्या वतनाची हमी घ्यावी लागत असे. तत्वत: जरी वतनी जमीन मुक्तपणे खरेदी वा विक्री केली जाऊ शकली असली तरी प्रत्यक्षात ते खूप जिकीरीचे काम असे आणि त्यात अनेक अडथळे असत. त्यामुळे वतनी जमिनीसाठी खरेदीदार मिळत नाहीत. जेव्हा एखादा गाव कर्मचारी त्याचे वतन विकतो त्यावेळेस त्या वतनाशी जोडून असलेले त्याचे अधिकार व कर्तव्य देखील ते वतन खरेदी करणाऱ्याच्या नावे हस्तांतरीत केली जात असत. वतनाची खरेदी, विक्री वा भेट देण्याची क्रिया कायदेशीर वैध करण्यासाठी, लेखी करारनामा करावा लागत असे आणि त्याच दस्तऐवजावर गाव समाजाच्या प्रमुख व्यक्तीच्या साक्षी नोंदवाव्या लागत असत. वास्तविक पहाता सरकारकडून वतनी जमिनीचे हस्तांतरण, विक्री व खरेदीस अनुकूलता दर्शविली जात नाही जेणे करून त्या नंतर काही अडचणी निर्माण होऊ नयेत आणि वतन वा इनामांचे मोल अबाधित रहावे. शिवाजीचे न्यायाधीश प्रल्हाद निराजी यांनी सांगून ठेवले आहे की, कुणीही आपले वतन खरेदी व विक्री करू नये आणि जो कुणी असे करेल त्यास शिक्षा केली जाईल वा दंड ठोठावला जाईल. या आदेशामुळे वतन हे एक वेळोवेळी खरेदी वा विक्री केले गेलेली क्रयवस्तू बनण्यास रोखले गेले.

१०.६ मिरासदार आणि उपारीस

मराठ्यांच्या अधिपत्याखाली कोणत्याही गावात दोन प्रकारचे जमीनधारक असत १) मिरासदार, २) उपारीस

१) मिरासदार : हे अश्या प्रकारचे जमीदधारक होते ज्यांच्या ते अनेक काळ करत असलेल्या जमिनीवर वंश परंपरागत व मालकी हक्क असे. हे मिसरासदार सरकारला ठराविक भाडे देऊन जमिनीवरील मालकी कायम करीत असत. जोपर्यंत ते सरकारला ठराविक रक्कम देत असत तोपर्यंत ते त्यांच्या जमिनीचे पूर्णपणे मालक असत. प्राचीन काळी असे समजले जात असे की सर्व जमीन ही मिराशी जमीन आहे. हे मिरासदार सरकारला काही कर देत असते. कधी मिरासदारांकडून हा कर दिला गेला नाही तरी सरकार त्यांच्या जमिनी ताब्यात घेत नसे. एखाद्या मिासदाराला कर भरता आला नाही तरी तो कर सरकारला भरून देण्याची जबाबदारी इतर मिरासदारांनी उचलली पाहिजे अशी धारणा त्यावेळी असे. एखादा मिरासदार कधी गावातून पळून गेला असेल तर सरकार ती जमीन दुसऱ्या कुणास ठराविक शर्ती व अटींवर देत असे. कोणीही मिरासदार काही संकट वा अडचण असल्याशिवाय स्वत:हून पळून जात नाही; अशावेळी त्या मिरासदाराची अडचण दूर करणे वा त्यास योग्य वागणूक मिळेल याची जबाबदारी पाटलाने उचलली पाहिजे. जो मिरासदार त्याची जमीन सोडून पळून गेला असेल त्यास परागंदा मिरासदार म्हणत असत. अशा मिरासदाराने सरकारला लेखीपत्राद्वारे आपला जमिनीवरील हक्क सोडणे आवश्यक असते जेणे करून सरकारला दुसऱ्या कसणाऱ्याला देऊन अधिक महसूल मिळू शकेल.

२) उपारीस : असे म्हटले जाते की जी जमीन मिरासी नसते, त्यास उपारी म्हटले जाते. या जमिनीचा काही हिस्सा राखीव ठेवून सरकारसाठी कसला जातो. हा जमिनीचा हिस्सा स्थातीन करापासून मुक्त असता उर्वरीत उपारी जमीन ही गावातील अधिकारी, कुलकर्णी आणि पाटील याद्वारे नवीन येणाऱ्यांना भाड्याने दिली जाते. पाटील आणि कुलकर्ण्यांनी अधिकाधिक जमीन लागवडीखाली आणणे अपेक्षित असल्याने ते नेहमी नवीन नवीन लोकांना गावात येऊन रहाण्यास पाठपुरावा करीत आणि त्यांच्याऐवजी उलपब्ध जमीन वर लागवड करून गावातील उत्पादन वाढवीत. गावातील अशा नवीन जमीनधारकांना उपरीज जमीनधारक म्हणत असत. हेच उपारी जमीनधारक राजांना ठराविक रक्कम भेट, नजराणा देऊन काही वर्षांनी मिरासदार बनत असत. यासाठी कोणतीही विशेष बोलणी नाही तर जमीन नोंदी कार्यालयातील नोंदवहीमध्ये आवश्यक ती फी लागत असे.

१०.७ वतनदारांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या

वतन म्हणजे एखाद्याचा स्वत:चा देश. ज्याचा अर्थ मराठा अधिपत्याखाली विशिष्ट कर्तव्यासाठी ठराविक पद धारण केलेल्या व्यक्तीला राज्याकडून दिले जाणारे अनुदान असा होता. जोपर्यंत राज्याला तत्पर सेवा मिळत असत आणि वतनदार राजाशी व गावाशी निष्ठा राखून असत. तोपर्यंत वतनाचे अनुदान चालू रहात असे. काही वेळेस, वतनदारांना ते गावास देत असलेल्या सेवांबद्दल रोख रक्कम दिली जात असे. वतनदारास ती त्याच्या कामाचा अधिकार व देणे वाटत असे. हे अधिकार आणि देणे सरकारकडून ठरवले जात असे आणि तसे वतनदाराच्या वतन पत्रावर नोंद केले जात असे. वतनदार हा राज्याचा व गावाचा कायमस्वरूपी अधिकारी असल्याने सरकारे बदलली तरी त्याचे स्थान बदलत नसे. हेच कारण आहे की जेव्हा छत्रपती शिवाजींनी मुस्लिम प्रदेश स्वत:च्या राज्याशी जोडला तेव्हा तेथील अनेक वातनदार जे मुघलांच्या अधिपत्याखाली काम करीत होते तेच कायम ठेवण्यात आले. वतनदारांना मराठा अधिपत्याखाली खालील कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागत.

१. वतनदारांच्या अधिकार क्षेत्रातील गावांमध्ये केली गेलेली महसूल कर आकारणी जमा करणे हे वतनदाराचे प्रमुख काम असे.

२. वसाहतीकरणाचे सुव्यवस्थित धोरण हती घेणे आणि अधिकाधिक पडीक जमीन लागवडीखाली आणणे वतनदाराचे काम असे.

३. वतनदाराचे अजून एक काम म्हणजे गावातील फुटकळ स्थानिक तंटे जात पंचायती म्हणजे गोरसभेच्या मदतीने मिटविणे.

४. सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमात वतनदारस पुढाकार घ्यावा लागत असे. त्याला अ) गावजत्रा, ब) सार्वजनिक कार्यक्रम, क) धार्मिक समारंभ, ड) विविध खेळ, इ) लोक मनोरंजनाचे कार्यक्रम संघटीत करावे लागत असे.

५. वतनदाराचे सर्वात प्रमुख काम म्हणजे त्याचे वतन असलेल्या गावात कायदा व सुव्यवस्था राखणे कारण त्याच्या वतनात काही गोंधळ झाल्यास उच्च अधिकाऱ्याला जबाबदारी असे.

१०.८ वतनाचे महत्त्व

मराठा काळात वतन असण्याचे खूप महत्त्व असे. त्याचा सारांश खालीलप्रमाणे –

१. वतनाचा उपयोग राजकीय कारकीर्द घडविण्यासाठीचे साधन म्हणून केला जात असे. कोणत्याही वतनदाराला त्याच्या वतनाच्या आधारे कारकीर्द यशस्वी करणे शक्य होई. त्याचा संबंध नेहमी वरची श्रेणी धारण केलेल्या लोकांशी येत असल्याने, त्याच्या राजाची कृपादृष्टी प्राप्त करणे आणि स्वत:ची कारकीर्द घडविणे त्यास शक्य होई.

२. वतन हे उदरनिर्वाहाचे सर्वात महत्त्वाचे साधन असे ते उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत होते.

३. ते स्वाभिमानाचे आणि सन्मानाचे प्रतीक होते. ती एक लोभ मिळविणारी संस्था होती आणि समाजातील तंट्यामागील मूळ कारण बनली. वतनातून असे दावे-प्रतिदावे वर आले आणि त्यातून एकमेकांविरूद्ध दीर्घ आणि अवाजवी खटले निर्माण झाले. यातून वतन परिसरात होण्याऱ्या वैमनस्य, कटकारस्थाने, हिंसात्मक झाली आणि शेवटी त्याचे पर्यवसान खूनामध्ये झाले.

४. वतन हा महान सन्मान समाजला जाई आणि त्याला इतका उच्चपदस्थ समजला जाई की वतनदार सरकारमधील अधिकारी म्हणून बढती मिळाली तरी वतनदार म्हणून राहणेच पसंत करीत. उदा. बाळाजी आवजी प्रभूंना शिवाजी महाराजांनी त्यांच्या अष्टप्रधान मंडळात नवीन पद देऊ केले तरी त्यांनी ते नाकारून पारंपारिक चिटणीसाचे वतन ठेवणेच पसंत केले. खुद्द छत्रपती शिवजींना देखील वतनदार म्हणवून घ्यायला आवडत असे. १६७२ मध्ये शिवाजींनी त्यांच्या सरदारांना कोकणातील त्यांच्या नावे असलेल्या वतनी जमिनींचा वेगळा हिशोब नोंदवण्यास आणि त्यांच्या वतनात करणाऱ्यांचे संरक्षण शत्रूंपासून करण्यासाठी त्याचा विनियोग करण्याचे आदेश दिले.

५. मराठ्यांच्या विकेंद्रीत प्रशासनातील शेवटचे एकक या अर्थाने वतनाकडे पाहिले जात असे. पाटील, कुलकर्णी, देशपांडे, देशमुख, चौगुले यासारखे वतनदार गावपातळीवर काम करीत असताना स्थानिक प्रश्न त्याच जागी तत्परतेने सांडवीत असत आणि मराठा प्रशासन कार्यक्षम व लोकाभिमुख बनवण्यास हातभार लावीत असत. जर्विस यांनी त्यांच्या कोकणाच्या सांख्यिकी सर्वेक्षणात नमूद केल्या गेलेल्या वतनदारी व्यवस्थेमुळे मराठा अधिपत्याखाली प्रशासकीय स्थिरता निर्माण झाली आणि आर्थिक भरभराटीला चालना मिळाली. याच व्यवस्थेमुळे अनेक संकट येऊनदेखील मराठे दीर्घकाळ टिकून राहू शकले.

१०.९ वतनदारी व्यवस्था आणि आज्ञापत्र

मराठा प्रशासनातील सुपरिचित मुत्सद्दी रामचंद्रपंत अमात्य यांनी मराठा काळातील या वतनदारी व्यवस्थेबद्दल विस्तृत चर्चा केली आहे. अमात्य यांनी त्यांच्या आज्ञापत्रात म्हटले आहे की, गावाच्या प्रशासकीय कारभारात वंशपरंपरागत अधिकार असलेले पाटील, देशपांडे, देशमुख, कुलकर्णी अशांना वतनदार म्हटले जात असे. ते राज्याच्या प्रशासकीय कारभारातील शेवटचे दुवे असले तरी मराठा प्रशासनात कित्येक पटीने जास्त असे त्यांचे स्वतंत्र योगदान असे. त्या अर्थी त्यांच्याशिवाय प्रशासन सुरळीत चालू राहू शकले नसते. अमात्य पुढे म्हणतात की, वतनदार कधीच त्यांना मिळालेल्या जमीन वा वतनामध्ये समाधानी नसत. ते ना कधी राजाशी एकनिष्ठ असत आणि ना ही ते एकमेकांवर वा इतरांवर कुरघोडी करण्यापासून अलिप्त रहात. ते नेहमी

स्वत:साठी नवीन प्रदेश बळकावून इतरांपेक्षा बलवान होण्याचा प्रयत्न करीत असत आणि बलवान झाल्यानंतर जबरदस्तीने इतर लोकांचा प्रदेश ताब्यात ठेवीत असत. या त्यांच्या कृत्यामुळे इतर लोकांच्या प्रदेशात लूटमार आणि संपूर्ण परिसरात अस्थिरता वाढली. परिणामी शत्रूंकडून होणाऱ्या हल्ल्यातून आपल्या मालमत्ता वाचविण्यासाठी हल्लेखोरांना पैसे देऊन तह करीत असत. अमात्य म्हणतात, बऱ्याच वेळेला हे वतनदार राज्याची काही गुपिते शत्रूंना पुरवीत आणि त्यातून राज्याला धोका निर्माण होत असे. त्यासाठी रामचंद्र अमात्यांनी राजाला या वतनदारांपासून सावध राहण्याचा इशारा दिला आणि या वतनदारांना काबूत ठेवण्यासाठी व भविष्यातील धोका टाळण्यासाठी खालीलप्रमाणे पाऊले उचलण्यास सूचविले.

१. अमात्यांनी राजाला सुचविले की एखाद्या बेशिस्त वतनदाराला शिक्षा म्हणून त्याचे वतनच राखून ठेवण्याची टोकाची कारवाई टाळावी व दुसरीकडे कोणाही वतनदाराला इतके असाधारण कृती व संचारस्वातंत्र्य देऊ नये की, वतनदार असण्याची त्याची नैसर्गिक उर्मी प्रगट होत राहील. त्यामुळे राज्याचे धोरण ठरविताना राजाने असे दोन टोकाचे शेवट टाळले पाहिजेत.

२. अशा परिस्थितीत, राजाने सलोखा आणि शिक्षा असे दुहेरी धोरण अवलंबिले पाहिजे. राजाने याकडे लक्ष दिले पाहिजे की वतनदारांचे कर्तव्य पार पाडीत असताना लोकांवर आपली सत्ता वापरून गैरफायदा तर घेत नाही ना? वतनपत्रात समाविष्ट नसलेले अधिकार वतनदारांना वापरू न देण्याची खबरदारी राजाने घेतली पाहिजे.

३. राजा आणि केंद्रीय सरकारद्वारे दिले गेलेले आदेश पाळणे आणि त्याची योग्यरित्या आणि मनापासून अंमलबजावणी करणे यासाठी वतनदारांना बद्ध केले पाहिजे.

४. वतनदारांना त्यांच्या वतनामध्ये मोठाली घरे बांधण्यास व किल्ले बांधण्यास राजाने परवानगी देऊ नये तसेच आपल्या वतनाचा गैरफायदा घेण्यापासून त्यांना परावृत्त करावे.

५. अवज्ञा करणाऱ्या, शिरजोर आणि बेबंद वतनदारांच्या बाबतीत अमात्य सुचवितात की राजाने त्यांच्यांवर अवघड कामगिरी सोपवावी. जर ते ती कामगिरी यशस्वी पार पडू शकले तर राजाच्या वैभवात व ताकदीत भर पडेल आणि जर ते अयशस्वी झाले तर राजाने त्यांना शिक्षा करावी आणि त्यांच्यावर कडक बंधने घालावीत.

६. राजाने वतनदारांस आपापसात भांडण्यासाठी वाव देऊ नये. त्यांना शेती करणारे आणि राजा या दोहोंना फायदेशीर ठरतील असे सरकारचे विविध उपक्रम हाती घेण्यासाठी प्रवृत्त करावे व त्यासाठी उत्तेजन द्यावे. जर ते त्यांच्या पारंपारिक मर्यादा किंवा त्यांच्या वतनपत्रातील नोंद केलेल्या तरतुदीचे उल्लंघन करताना आढळले तर अशा वतनदारांकडून त्यांची वतने काढून घेऊन त्यांना घरी बसवावे.

७. अमात्य पुढे असा सल्ला देतात की राजाने त्याच्या वतनदारांकडून नियमितपणे खंडणी वसूल केली पाहिजे आणि प्रत्येक बाबतीत वक्तशीरपणाची सवय लावली पाहिजे. अमात्य चांगल्या, प्रामाणिक आणि शिस्तप्रिय वतनदारांची तुलना झेंडूच्या फुलांशी करतात जी सुगंध पसरवतात आणि परिसर सुगंधित करून सोडतना. त्यामुळे राजाने त्याच्या सरकारचे दीर्घकालीन आणि व्यापक हित लक्षात घेऊन अशा सक्षम आणि बुद्धिमान वतनदारांना सोबत ठेवले पाहिजे.

mynotes.in

१०.१० कॅप्टन ग्रॅट डफ आणि वतनदारी व्यवस्था

सातारा येथील ब्रिटिशांचा राजकीय हेर असलेला कॅप्टन ग्रॅट डफ याने मराठा काळात प्रचलित असलेल्या वतनदारी व्यवस्थेबद्दल काही उल्लेख केले आहेत. कॅप्टन ग्रॅटने १७ ऑगस्ट १८१९ रोजी बॉम्बे प्रेसिडन्सीचे गव्हर्नर माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन यांना पत्र लिहिले. ज्यात त्याने असे नमूद केले की मराठा अधिपत्याखाली असलेले देशमुख आणि देशपांडे ही मंडळी स्वत:ला जमीनदार समजतात तर पाटील आणि कुलकर्णी राजाकडून मिळालेल्या इनाम वा वतनामुळे स्वत:ला वतनदार समजतात. मराठा अधिपत्याखाली दिली गेलेली सर्व वतने वंशपरंपरागत बनली. त्यातून ती एका व्यवस्थेत रुपांतरीत झाली आणि म्हणून त्यास वतनदारी व्यवस्था म्हटली जाते. ते वतन कितीही छोटे वा मोठे असले वा ते कोणत्याही कारणाने दिलेले असो कोणताही वतनदार वा त्याचे वारसदार ते वतन विकू इच्छित नसत. त्यांना स्वत:ला वतनदार म्हणवून घेण्यात प्रौढी वाटत असे आणि ज्यावेळेस एखाद्या कारणाने त्यांना स्वत:हून किंवा सरकारच्या मान्यतेने ते वतन विकावे लागत असे त्यावेळेस त्यांना फार दु:ख होई. हे वतन विकताना पुढील पिढी किंवा सर्वात जवळच्या शेजाऱ्याचा विचार केला जात असे तसेच विकत घेणाऱ्याला त्याच्याकडे वतन हस्तांतरीत होताना देहंगापट्टी, राजाला द्यावयाचा एक अप्रिय कर द्यावा लागे.

१०.११ वतनदारी व्यवस्थेत होत गेलेले बदल

मराठा काळात अस्तित्वात असलेली वतनदारी व्यवस्था ही त्या काळात उगम पावलेली नसून काळानुरूप अनेक बदल होत गेलेली म्हणजेच काळानुरूप आकार धारण केलेली, उदय होत गेलेली होती.

छत्रपती शिवाजी महाजांच्या आगमनापूर्वी मध्ययुगीन काळात वतनदारी व्यवस्था पाळली जात होती. ते महान राजे नागरी संस्थाची उभारणी करणारे निर्माते तसेच महाराष्ट्राचे वास्तववादी राज्यकर्ते होते. त्यासाठी त्यांनी त्यांच्या प्रदेशात मध्यमयुगीन काळापासून चालत आलेल्या वतनदारी व्यवस्थेत अनेक बदल करण्याचे प्रयत्न केले. त्यांना माहित झाले की त्यांच्या आधीच्या राज्यकर्त्यांच्या अधिपत्याखालील काळात शेती कसणारे वतनदारांना राजापेक्षा अधिक मान देत असत. वतनदारच महसूल गोळा करत असल्याने ते जमा झालेल्या महसूलातील अत्यंत कमी वाटा सरकारी तिजोरीत भरीत आणि बाकीचा महसूल स्वत:साठी ठेवून घेत असत. वतनदार हे जमीन कसणाऱ्यांच्या सर्वात जवळ संपर्कात शहात आणि नियमानुसार आकारणीपेक्षा अधिक महसूल गोळा करीत असत. यामुळे ते अधिक प्रभावाशाली बनून स्वत:च्या मर्जीनुसार वागू लागले आणि राजाचे आदेश धुडकाऊन लावण्याची सवय त्यांनी अंगिकारली. साहजिकच अश्या वतनदारांनी त्यांचे स्वत:चे सैन्य बनविले आणि आपतकाळात स्वत:चे संरक्षण करण्यसाठी त्यांनी किल्ल्याप्रमाणे स्वत:ची घरे बांधली.

नंतरच्या काळात छत्रपती शिवाजी महाराजांनी रामचंद्रपंत अमात्यांनी त्यांच्या आज्ञपत्रात नमूद केलेले अनेक उपाय हाती घेतले. शिवाजी महाराजांनी वतनदारांनी केलेल्या तटबंदी उध्वस्त केल्या. विविध किल्ल्यांवर स्वत:चे लोक नेमले व वतनदारांचे अधिकार बऱ्याच अंशी कमी करून राज्यातील सामान्य माणसांप्रमाणे किंवा कसणाऱ्या लोकांप्रमाणे वागण्यास भाग पाडले. त्यांनी वतनदारांची बेकायदेशीररीत्या जमा केलेली मालमत्ता जप्त केली आणि गाव, परगणा आणि प्रांत पातळीवर काम करणाऱ्या वतनदार आदि इतर सरदारांचे अधिकार व भत्ते नेमून दिले. शिवाजी महाराजांनी विविध समवी नवीन वतने जरी निर्माण केली तरी त्यांचा शेती कसणाऱ्या लोकांवरचा

प्रभाव प्रमाणाबाहेर वाढू दिला नाही आणि वतनदारांवर कडक नियंत्रण ठेवले. अश्या रीतीने त्यांनी स्वत:ला कडक शिस्तीचा भोक्ता आणि कार्यक्षम प्रशासक म्हणून सिद्ध केले. रानडे यांनी त्यांची तुलना नेपोलियन बोनापार्टशी केली होती.

शिवाजीने त्याच्या सैनिकांना रोख रकमा देणे सुरू केले आणि राज्यात गुणवत्तापूर्ण सेवा देणाऱ्यांचा रोख रकमांची बक्षिसे देऊन सत्कार केला. यातून त्यांची वतनदारांवर आणि पर्यायाने प्रशासनावर संपूर्ण पकड निर्माण झाली. याच कारणांमुळे औरंगजेबाच्या बालाढ्य सैन्याशी २७ वर्षापेक्षा जास्त काळ संघर्ष करूनही मराठा स्वराज्य जग धरून राहिले.

१०.१२ वतनदारी व्यवस्था आणि मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध

औरंगजेबाच्या आक्रमणापासून मराठा स्वराज्याच्या संरक्षणाकरिता विविध प्रकारच्या लोकांना त्यांचे सामर्थ्य पणाला लावण्याची प्रेरणा देण्यासाठी छत्रपती राजारामांनी स्वराज्यात मराठा सैन्यात पराक्रम गाजविणाऱ्या मराठा सरदारांना वतने बहाल करण्यास सुरवात केली. या वतने बहाल करण्याच्या धोरणामुळे, तरुण व धाडसी तरुणांचा एक गट तयार झाला ज्याने स्वराज्याच्या रक्षणासाठी सर्व काही करण्याची तयारी केली. परंतु या वतने बहाल करण्याच्या प्रक्रियेत छत्रपती शिवाजी महाराजांचे सावधपणे पावले उचलण्याचे धोरण पाळले गेले नाही ज्यामुळे केंद्रीय सत्ता टप्प्याटप्प्याने कमजोर झली. जेव्हा तरुण व शूर सरदारांनी शाहू राजाच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र्यपणे काम करण्यास सुरवात केली, केंद्रीय सत्ता अधिकच कमजोर झाली. शाहू राजांनी त्यांची आरंभीची काही वर्षे मोगल कैदेत व्यतीत केली असल्यामुळे त्यांना कोणतेही राजकीय व मुत्सद्देगिरीचे शिक्षण व प्रशिक्षण मिळू शकले नाही जे प्रशासन चालविण्याकरिता अत्यावश्यक होते. शाहूंना राजा होण्यासाठीचे आवश्यक शिक्षण मिळू शकले नाही तरी त्यांना माणसांची चांगली पारख करता येत असे. त्यांनी बालाजी विश्वनाथ आणि इतरांसारखी बुद्धिमान आणि सक्षम माणसे त्यांच्या प्रशासनात निवडली ज्यांनी काळानुरूप त्यांची हुशारी व बुद्धिमत्तेची चुणुक दाखवून दिली. त्यातून बास्तवदर्शी पेशवा आणि कायदेशीर राजा दोन गटात सत्ता आणि जबाबदारी विभागली गेली. वास्तवदर्शी पेशव्यांनी सर्व अधिकार स्वत:च्या हातात एकवटले आणि प्रशासकीय केंद्र व मराठा साम्राज्याची बळ या रूपात आपली राजधानी पुण्याला हलविली तर कायदेशीर राजा मराठ साम्राज्याचा केवळ नामधारी प्रमुख बनला आणि साताऱ्यातच राहिला. दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या काळात अनेक नवीन वतनदार आणि सरदार उदयास आले ज्यांनी मराठा साम्राज्याच्या सीमा हिंदूस्थानच्या विविध टोकांपर्यंत विस्तारल्या ज्यातून केंद्रीय सत्ता पुन्हा क्षीण झाली आणि मराठा साम्राज्य एका संघराज्यात रूपांतरीत झाला. यातून अंतर्गत कटकटी आणि १८०२ डिसेंबरमध्ये कुप्रसिद्ध करार निर्माण झाला. अशा रीतीने कालानुरूप बदलत गेलेल्या वतनदारी पद्धतीमुळे मराठ्यांचे केंद्रीय सरकार क्षीण झाले आणि १८१८ मध्ये त्याचे पतन झाले.

१०.१३ जमिनीचे विभाजन

मराठा अधिपत्याखाली लोकांनी जमिनीचा उपयोग कसा केलाय आधारावर जमिनीचे विविध वर्गीकरण झाले.

१) कसण्यासाठी कायम जमीनधारकाला दिली गेलेली जमीन, २) घरगुती जमीन, ३) जंगल जमीन, ४) पडीक जमीन

कसण्या योग्य जमीन: १) बागयती, २) जिरायती या दोन भागात विभागली गेली. जिरायती भाग पुन्हा १) सुपीक २) कमी करू असलेली, ३) साधारण, ४) खडकाळ, ५) दलदलीची, ६) क्षारयुक्त इत्यादी भागात विभागली गेली. तर बागायती जमीन, १) पाटस्थल आणि २) मोठास्थळ भागात विभागली गेली. प्राचीन काळात देखील जमिनीचे वर्गीकरण केले गेले होते. महान मुत्सद्धी आणि राजकीय तत्वचिंतक असलेल्या अर्थचाणक्य वा विष्णुगुप्त बा. कौटिल्य यांनी अर्थशास्त्र लिहिले व जमिनीचे विभाजन, फुलाचे उद्यान, फळांचे उद्यान, भाज्यांचे उद्यान, ओलिताची शेती, वियांसाठी मुळे पेरून काढली जाणाऱ्या पिकांचे शेत ज्यास मालवापती म्हणत आणि जंगलाचे विभाजन खेळाचे जंगल, लाकडाचे जंगल आणि हत्तीचे जंगल अशा अनेक वर्गात केले.

कौटिल्याने वाढविलेल्या पिकातील उत्पादन किंवा सीता आणि राजाला महसूल म्हणून द्यायचे शेतकी उत्पादन म्हणजे भागा अशी स्पष्ट विभागणी केली होती. मराठ्यांनी मुस्लिमांच्या स्त्रोताची जमिनी संदर्भात काही महत्त्वाची वैशिष्ट्ये स्वीकारली. त्यांनी भारतातील जुन्या हिंदू व्यवस्थेतील जमिनीबाबतची अनेक मौल्यवान वैशिष्ट्ये देखील अंगिकारली. हेघडण्यामागे मुस्लिम पूर्व प्रशासनामध्ये कार करीत असणारे देशमुख, देशपांडे यांसारख्या वतनदारांचे वंशपरंपरागत वतने मराठा काळतही कायम राहिली हे कारण होते. साहजिकच मराठा काळात असलेली जमीन व्यवस्था ही आधीच्या काळात असणाऱ्या चांगल्या-वाईट व्यवस्थांची गोळाबेरीज होती. गावातील पडीक जमीन, जंगल जमीन किंवा सरकारच्या ताब्यात असलेल्या जमिनी व्यतिरिक्त असलेल्या गावातील बहुतांश जमिनीस थालस वा इस्टेट म्हणत असत. जे लोक अशी जमीन कसत असत त्यांना थलवाहिक म्हणत असत. परंतु नंतरच्या काळात या थलबाईकांना मिरासदार म्हणजे वंशपरंपरागत मालमत्ता हक्कानुसार जमीन ठेवून असलेले लोक म्हटले जात असे. थालस किंवा इस्टेटस हे उपविभागात विभागले होते. या उपविभागाचे प्रमुख हे मिरासदारांचे जवळचे नातेवाईक किंवा विविध व्यक्ती असत ज्यांना मिारसदारांचा जथा म्हटले जाई. हा जथा ताब्यात ठेवून असलेल्या मालमत्ता हक्कानुसार जमिनीचे महसूल, कर वा इतर काही देणे असल्यास त्यास संयुक्तपणे जबाबदार असे. या मिरासदारांच्या जथ्थ्याचा प्रत्येक सभासद त्याच्या वाट्याची जमीन कसत असे वा त्याला वाटल्यास जमिनीचा काही भाग अधिक उत्पादनासाठी इतर कुणालाही खंडाने देऊ शकत असे परंतु एकत्रितपणे महसूल देण्यासाठी जथ्थ्याचा प्रत्येक सभासद जबाबदार असे. संपूर्ण महसूल अदा झाला पाहिजे. यासाठी अशी संयुक्त महसूल आकारणीची व्यवस्था केलेली असे. एखादा जथा महसूल देऊ न शकला तरी जथाचे इतर सभासदांना संपूर्ण महसूल द्यावा लागत असे.

विविध जथ्थामध्ये जमीन विभागली गेलेली असली तरी जमीनीचा अजुन एक भाग असे त्याला इनामी जमीन वा वतनी जमीन म्हटले जाई. ही इनामे किंवा वतने राजा किंवा सरकार मार्फत अनेक लोकांना वा संस्थांना मंजूर केली जात असत. अशा जमीनधाकांमध्ये धार्मिक संस्था, मंदिरे, मशीदी, समाध्या, वर्षासने, कारागिर व गावातील अधिकारी असत जो नंतर वंश परंपरागत वतनदार बनत. मराठा अधिपत्याखाली जमिनीचे विभाजन अश्या प्रकारचे होते.

१०.१४ जमिनीचे स्वरूप

मराठा राजवटीच्या दोन विभागातील जमिनीचे स्वरूप एक दुसऱ्यापासून वेगळे होते. १. देश आणि २. कोकण

१. देश : देशाकडे जागोजागी वेगवेगळी जमीन असे आणि ती खालील प्रकारची होती.

३.२ क्षार जमीन. बहुतांश खडकाळ सापळ्यानी बनलेली आणि या विभागातील जमिनीचा मोठा हिस्सा व्यापलेली.

३.३ लालसर जमीन

३.४ फिकट काळी

३.५ फिकट तपकीरी

३.६ काळी व फिकट तपकीरी दख्खन पठारावर आढळणारी

३.७ लाल जमीन डोंगरी भागात आढळणारी

३.८ सुपीक गाळाची मातीयुक्त जमीन किंवा मलाई जमीन, जी वेगवेगळ्या नदीच्या काठाने आढळते आणि मलाइ जमीन म्हणून ओळखली जाते.

२. कोकण विभाग : देशाच्या तुलनेत या प्रदेशातील जमीन सुपीक नव्हती. या प्रदेशात आढळणारी जमीन खालील प्रकारची होती.

३. लालसर तपकिरी : अश्या प्रकारची जमीन डोंगर-उतारावर आणि काही मैदानी भागात आढळत असे. खडक दुभंगण्यातून ही जमीन तयार होते.

४. काळी जमीन : अभावानेच आढळते पण ठाणे जिल्ह्यातच आढळते.

५. गाळाची जमीन : कुलाबा जिल्ह्यात आढळते.

६. सुपीक गाळाची जमीन : नदीच्या काठांनी आढळते.

७. नापीक जमीन : सर्वत्र आढळते, वरकस जमीन म्हणून ओळखली जाते. ही जमीन दोन प्रकारात विभागली जाते. १) भालवटकस, २) डोंगरी वरकस

मालवरकस जमीन ही कोकणातील मैदानी भागात आढळते असे ती कसण्यासाठी नांगर वापरला जात असे. त्याला औत जमीन देखील म्हटले जात असे आणि लागवडीसाठी रोपटे लावले जात असे. डोंगरीवरकस जमीन जी डोंगरउतारावर आढळत असे ती फक्त हाताने श्रम करून कसली जात असे.

८. खारपट किंवा क्षारयुक्त जमीन : या जमिनीत वेगवेळ्या प्रमाणात क्षार असते जी समुद्र किनाऱ्याच्या खाडीच्या बाजूला आढळते आणि उद्यानपिकांसाठी अत्यंत सुपीक व लागवडीयोग्य असते. मराठा काळात जमिनीची सुपीकता वाढविण्यासाठी आणि कर सुधारण्यासाठी गुरांचे शेण बहुतांशरीत्या वापरले जात असे. जमिनीची सुपीकता वाढविण्यासाठी ती जमीन काही वर्षे न करता तशीच ठेवून दिली जात असे किंवा अशा जमिनींवर मेढ्याचा मुक्काम ठेवला जात असे जेणे करून मेंढ्यांच्या लेंड्या मातीत मिसळून मातीची सुपीकता वाढत असे. जमीनीची सुपीकता वाढविण्याच्या पद्धतीमध्ये पाळीपाळीने पिके घेणे ही एक शास्त्रीय पद्धत होती जी जगात सर्वत्र वापरली जाते.

muvotes.in

१०.१५ मराठा काळातील कास्तकार किंवा शेतकरी

मराठा काळातील उपलब्ध नोंदीनुसार त्या काळातील कास्तकार वा शेतकऱ्यांना कुणबी, मुजेरी, रया किंवा कुळवाडी म्हटले जात असे. कुणबी शब्द हा कुलंबी किंवा कुटुंबिका शब्दापासून आलेला आहे म्हणजे शेतकरी किंवा शेतीव्यवसायातील व्यक्ती किंवा दुसऱ्या शब्दात सांगायचे तर शेतकरी ज्याने शेतीचे काम हाती घेतले असा. सर्वसाधारणत: कसणारा माणूस मराठा वर्गातील असे जो वर्ग त्या काळात प्रत्येक गावात बहुसंख्येने असे. या कसणाऱ्या लोकांची सामान्य परिस्थिती अत्यंत वाईट व हलाखीची असे.

मराठा छत्राखाली कसणाऱ्यांच्या वा शेतकऱ्यांच्या मागासलेपणाची कारणे :

शेतकऱ्यांच्या हलाखीच्या परिस्थितीला परिस्थिती आणि इतर काही कारणे जबाबदार होती. त्यापैकी काही महत्त्वाचे घटक खालील प्रमाणे-

१) अनिश्चित आणि अवेळी येणारा पाऊस

२) सततच्या लढाया

३) जमिनीचा निकृष्ट कस

४) कर्ज सोयींचा अभाव

५) खते व जंतुनाशकांचा अभाव

६) भरमसाठ कर आकारणी

७) मागास व जुनी शेती साधने आणि शेतीचे तंत्र

८) शेतकरी वा कसणाऱ्यांचा सर्वसाधारण मागासलेपणा

९) लागवडीसाठी अपुरी जमीन उपलब्ध

हे सर्व घटक विस्तृतपणे खाली स्पष्ट केले आहेत.

१) लागवडीसाठी अपुरी जमीन उपलब्ध : लोकसंख्येच्या गरजेनुसार, आवश्यक असलेली लागवडी योग्य जमीन कोणत्याही गावात उपलब्ध नसल्याने परिणामी कमी उत्पादन आणि दरडोई कमी उत्पन्न होत असे. उदा. वाई तालुक्यातील मेनोली गावात लागवडयोग्य एकूण जमीन १२० बिघा. ज्यामध्ये उत्तम कस असलेली जमीन फक्त ३२ बिघा होती म्हटजे गावाने कापलेल्या एकूण जमिनीच्या केवळ १६ टक्के होती. इतर साधना अभवी कुटुंबातील सर्वजण नांगरणी, पेरणी पासून कापणीपर्यंत शेतीच्या कसण्यासाठी आवश्यक अशा सर्व कामामध्ये जुंपून घेतली जात. लागवडीखाली असलेली एकूण जमीनच तुटपुंजी असल्याने अतिशय कठीण परिश्रम घेतल्यानंतरही शेतकऱ्यांची कुटुंब जेमतेम आपला उदरनिर्वाह चालवू शकत असे. पुरेश्या मनुष्यबळासाठी पुरेश्या जमिनीचा अभाव अशी ही परिस्थिती मराठा सत्तेच्या काळात होती. यामुळेच अधिकाधिक पडीक जमीन लागवडीखाली आणण्याचे आदेश दिलेले होते.

munotes.in

२) लागवडीची जुनी साधने आणि तंत्रे : या काळात जुन्या, कालबाह्य अवजारांद्वारे शेती कसली जात असे. जमिनीची मशागत करण्याची पद्धत देखील जुनाट व प्राचीन होती. साहजिकच शेती कसणे पुरेशा प्रमाणात होत नसे. चांगल्या मशागती अभावी, जमीनीची सुपीकता वाढत नसे आणि शेती उत्पादन ही पुरेसे होत नसे. वास्तविक पाहता मराठा छत्राखाली ट्रॅक्टर, पेरणी, मळणी आणि कापणी यंत्रे वगैरे अवजारे व साधने सुधारली होत. शेतीतील उत्पादन देखील वाढून शेतकरी वर्ग श्रीमंत बनू शकला असता. परंतु असे झाले नाही शेतकरी वा कसणाऱ्यांनी बैलजोडीच्या सहाय्याने शेतीची मशागत करणे चालू ठेवले आणि जुन्याच नांगरावट व तंत्रावर अवलंबून राहिले.

याहूनही अधिक म्हणजे शेतकऱ्यांना अजून एका समस्येला तोंड द्यावे लागत नसे आणि ती समस्या म्हणजे गुरेढोरे पळविणाऱ्यांची शेतकऱ्यांसाठी त्यांचे बैल हे त्यांची संपत्ती असे आणि हे ओळखूनच ह्या गुरे पळविणाऱ्यांनी सरहद्दीवरच्या गावामध्ये वा मराठा राज्याच्या सीमेवरती त्यांना लक्ष्य केलं. छत्रपती शिवाजी महाराजांनी याची खबरदारी घेतली होती आणि आपल्या अधिकाऱ्यांना आदेश दिले होते की त्यांना सरहद्दीवर पहारा ठेवावा आणि गुरे पळविणाऱ्यांना हुसकाऊन लावणे व सापडल्यास कडक शिक्षा करावी. ग्रामीण अर्थव्यवस्था वाचविण्यासाठी शिवाजी महाराजांनी शेतकऱ्यांना एक सदृढ बैलजोडी खरेदी करण्यासाठी पैसे आगाऊ देणे सुरू केले. ही रक्कम नंतर कसणाऱ्यांकडून सुलभ हप्त्यात वसूल केली जात असे. असे म्हटले जाते की शेतकऱ्यांची संपत्ती ही त्याच्याकडे असलेल्या नांगरांच्या संख्येवरून ओळखली जात असे. नांगराच्या संख्येवरून त्याच्याकडे किती बैलजोड्या असाव्यात आणि त्यावरून किती एकर जमीन त्यांच्या मालकीची असेल याचा अंदाज लावून त्याची श्रीमंती गणली जात असे. मराठा छत्राखाली शेती करणाऱ्यांची स्थिती अशी होती.

३) कर्जसुविधांचा अभाव : मराठा छत्राखालील आर्थिक जीवन सुस्थिर होते कारण देवाण घेवाण (वस्तूविनिमय) पद्धत कार्यरत होती आणि ती अतिशय व्यवस्थित चालू होती. शेती कसणाऱ्याला शेती करण्यासाठी जी काही शेतकी साधने, अवजारे लागत उदा. पेरणीसाठी नांगर, तिफण (कोयता), (छोट्या रोपांसाठी आवश्यक अवजार), खुरपे (तण काढण्यासाठी लागणारे अवजार) व इतर ती सर्व अवजारे स्थानिक कारगिरांकडून बनविली व दुरुस्त केली जात. आवश्यक असलेले चांगल्या प्रतीचे बियाणे मागील वर्षी आलेल्या चांगल्या उत्पादनातून निवडले जात आणि पेरण्यासाठी वर्षभर साठवून ठेवले जात असे. परंतु बऱ्याचदा पिके वाया गेल्याने किंवा इतर अडचणीमुळे शेतकऱ्याला खुल्या बाजारातून बियाणे विकत घ्यावे लागत असे. छत्रपती शिवाजी महाराज महान दृष्टिकोन असलेले राजे असल्याने त्यांनी अशा गरजू शेतकऱ्यांना आवश्यक असलेले बियाणे खरेदीसाठी आगाऊ कर्ज देण्याचे आदेश त्यांच्या अधिकाऱ्यांना दिले होते. बहुतेक सर्वांनाच अश्या प्रकारे प्रत्येक वेळी कोणत्या तरी सबबीखाली असे कर्ज मिळणे नशीबात नसे. असे कमनशीबी शेतकरी खाजगी सावकारांची दारे ठोठावीत, जे त्यांची सर्वात जास्त लुबाडणूक करीत असत. हे खाजगी सावकार १ वर्षासाठी हे कर्ज जवळपास दुप्पट दराने देत असत. हे स्थानिक सावकार ज्या शेट किंवा महाजन म्हणून ओळखले जात ते शेतकऱ्यांना दिलेल्या कर्जाइतकी व्याजाची रक्कम आकारून व्याजासहित कर्ज वसूल करील. या परिस्थितीमुळे आर्थिक स्त्रोतावर परिणाम घेऊन शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती मराठा छत्राखाली अधिकच खालावली गेली होती.

४) पावसाची अनिश्चितता: शेतकऱ्यांना भेडसावणारी अजून एक समस्या म्हणजे अनिश्चित आणि समान प्रमाणात पडणारा पाऊस, पाऊस इतका बेभरवशाचा असे की शेकतऱ्याला नेहमी मोसमी हवामानाच्या आशेवर अवलंबून रहावे लागत असे. याचा अर्थ बहुतांश वेळा पाऊसच येत

नसे वा अतिरिक्त पाऊस होई किंवा अत्यंत तुरळक पाऊस होऊन जाई, ज्यामुळे बहुतेकदा देशात दुष्काळ पडत असे.

पेरणीच्या काळात पाऊस किती महत्त्वाचा असतो हे तुकारामांनी स्पष्ट लिहून ठेवले आहे. ते म्हणतात, पेरण्या चालू असताना कुणाची मयत झाली तरी शेतकरी ते प्रेत झाडाच्या पानांनी झाकून ठेवतो आणि त्या दिवसाची पेरणी चालू ठेवतो आणि पेरण्या संपल्यानंतरच मृतदेहावर अंतिम संस्कार केले जातात. त्यामुळे से म्हटले जाते की, शेती पूर्णतः पावसावर अवलंबून असल्याने शेतीतून येणाऱ्या उत्पादनाचा शेतकऱ्याला भरवसा नसतो. म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्वत्र पाणी बंधारे, धरणे आणि तळी बांधण्याची तरतूद केली.

असे म्हटले जाते की, मराठ्यांचा प्रदेश हा दक्षिण-पश्चिम मोसमी पट्ट्यात येत असल्याने, बेभरवशाचा पावसामुळे बहुतेक वेळ अवर्षण आणि दुष्काळाच्या संकटात सापडतो. अशा वेळी उत्पन्नाचे इतर काही साधन नसल्यामुळे लोकांना जगण्यासाठी अधिक चांगल्या ठिकाणी स्थलांतरीत व्हावे लागत असे. या पाणीटंचाईवर मात करण्यासाठी सरकारने शेतकऱ्यांना सिंचनाची कामे हाती घेण्यासाठी उत्तेजन दिले जेणे करून ते आपले शेती उत्पादन वाढवू शकतील आणि टंचाईच्या काळात अधिक धान्य साठवू शकतील. ह्या सगळ्या प्रयत्नांद्वारे राजा त्याच्या राज्यातील जनतेची काळजी घेत असे. या प्रयत्नामुळेच राजा आणि शेतकऱ्या दरम्यान एक नैसर्गिक नाते निर्माण होत असे आणि यातून राज्यात चिरंतन विकासाला गती मिळत असे.

५) उभ्या तयार पिकाचे संरक्षण : शेतकऱ्यांसाठी ही देखील एक अनेक काळापासूनची समस्या आहे. तयार आणि उभ्या पिकांना अनेक धोके संभवतात कारण ती कापणीसाठी पूर्ण तयार झालेली असतात आणि उपभोगासाठी घरी आणावयाची असतात. अश्या वेळी ह्या पिकांना १) चोरांपासून, २) पक्ष्यांपासून, ३) प्राण्यांपासून, ४) घुशींपासून आणि खारीपासून तसेच कीडींपासून चोरीपासून आणि प्राण्यांपासून पिकाचे संरक्षण करण्यासाठी शेतकऱ्याला कुंपण घालावे लागते ज्यासाठी पैसा आवश्यक असे. पक्ष्यांपासून रक्षण करण्यासाठी पक्ष्यांना गोफणीच्या दगडाने भिरकाऊन लावण्यासाठी गोफण चालविण्यास माणून कामाला ठेवावा लागत असे. तसेच जनावरांना आणि पक्ष्यांना भीती दाखविण्यासाठी शेतात बुजगावणं उभ करावं लागत असे ज्यासाठी एखाद्या काठीवर मडनं ठेवून त्याला कपडे नेसवावे लागत असे. कुरतडणारे प्राणी अख्खं शेत फस्त करून टाकत असल्यामुळे शेतकऱ्याला त्याच्या वर्षभर केलेल्या श्रमाचे फळ डोळ्यादेखत वाया जात असे. मराठा काळात शेतकऱ्यांना भेडसावणारा हा सर्वात मोठा प्रश्न होता.

६) सततच्या लढाया : या काळात, सतत होत असणाऱ्या लढाया देखील शेतकऱ्यांसाठी समस्या बनल्या, हा काळ असुरक्षित होता, दर दोन दिवसांनी लढाया होत, प्रत्येकजण युद्धभूमीवरच प्रश्न सोडवू पहात होता ज्यामुळे शेकतरी सर्वात अधिक वैतागलेले असत. सैन्य जेव्हाा लढाईसाठी एका गावातून दुसऱ्या गावात जात असे तेव्हा ते गावकऱ्यांकडून धान्य, चारा, कपडे याची मागणी करत असत. जेव्हा सैन्याच्या चकमकी घडत असत शेतकऱ्यांना त्यांचे काम अर्ध्यावर टाकून सुरक्षित जागी अनेक दिवसांसाठी पळून जावे लागत असे. या घडामोडींमुळे त्यांच्या जीवनावर विपरीत परिणाम होत असे. या व्यतिरिक्त ज्या वेळेस सैन्य एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यास निघत असे, त्यावेळेस त्यांना मिळेल त्या वस्तू ते जबरदस्तीने लुटून नेत असत. त्यांचे घोडे शेतातील तयार झालेली उभी पिके चरत असत वा पायाखाली तुडवून त्याचा नाश करीत असत. साहजिकच शेकऱ्यांच्या दु:खात भरच पडत असे. छत्रपती शिवाजी महाराजांना हे जाणवले की, गरीब शेतकऱ्यांना नाहकच हा नुकसानदायक त्रास भोगावा

लागतोय. त्यांनी आपल्या सैन्याधिकाऱ्यांना आदेश दिला की कोणत्याही अधिकाऱ्यांने शेतकऱ्यांकडून अतिरिक्त मागणी करू नये आणि त्यांना त्रास देऊ नये. परंतु पेशव्यांचा काळात याकडे नीट लक्ष दिले गेले नाही. मुलुखगिरीच्या नावाखाली लढाई दरम्यान अपरिमित त्रास भोगावा लागला आणि परिणामी लोकांची आर्थिक स्थिती बिकट झाली. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या प्रदेशात लढाया करण्याचे टाळून त्या शत्रूच्या प्रदेशातच केल्या तरी तेखील प्रत्येक वेळी हे शक्य नसल्याने आणि बऱ्याचदा शिवाजी महाराजांना त्यांच्या भूप्रदेशातील त्यांच्या मोठ्या शत्रूंविरूद्धच लढावे लागले. त्यामुळेच दक्षिण कोकण, पन्हाळा, कुडाळ, सावंतवाडी, पुना, सासवड, चाकण, वाई, जावळी, कल्याण आणि भिवंडी ही ठिकाणे वारंवार होणाऱ्या लढायांच्या रणभूमी बनली. स्वातंत्र्ययुद्धावेळी, संपूर्ण स्वराज्यच धोक्यात होते. मुगल सैन्यांनी नागरिकांना आणि शेतकऱ्यांवर अन्वनित अत्याचार केले आणि त्यांचे आयुष्याची दुर्दशा केली. शत्रू सैन्यानो सर्व काही जाळून टाकले, लोकांवर अशी दहशत निर्माण केली त्यामुळे सर्व शेतकरी व लोक सुरक्षित ठिकाणी आसरा शोधण्यासाठी जाऊ लागले. अशा रीतीने सुरक्षित ठिकाणी आसरा शोधण्यासाठी जाऊ लागले. अशा रीतीने सततच्या लढायांनी शेतकऱ्यांच्या जीवनाची दुर्दशा केली.

१०.१६ शेतकरी वर्गाची पुर्न:स्थापना

शेतकऱ्यांच्या जीवनात येणारे हे बिकट प्रसंग ओळखून मराठा सरकारने शेतकऱ्यांचे जीवन पुन:स्थापित आणि सुस्थिर करण्याच्यादृष्टीने आवश्यक ती सर्व पाऊले उचलली. सरकारला वा राजाला शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेची पूर्ण कल्पना होती. इतकेच नव्हे तर शेतकऱ्यांवरच सर्व समाज जीवन अवलंबून आहे हे ओळखून सरकारने गावे सोडून जाण्यापासून शेतकऱ्यांना रोखले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात सर्व गाव अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या होत्या की त्यांनी संकटग्रस्त काळात शेतकऱ्याला शक्य होईल तेवढी सर्व मदत करावी, अधिकाधिक जमीन लागवडीखाली आणावी आणि शेतीतील उत्पादन अशाप्रकारे वाढवावे जेणे करून शेतकऱ्यांवर कोणतीही बिकट परिस्थिती ओढवणार नाही. वंश परंपरेने गाव अधिकारी असणारे पाटील व कुलकर्णी यांच्या अधिकार क्षेत्रात येणाऱ्या गावात जर शेतकऱ्यांना अशा प्रकारे काही त्रासास सामोरे जावे लागले तर त्यांना जबाबदार धरले जाई. या अधिकाऱ्यांनी शेकतऱ्यांसाठी अनुकुल परिस्थिती निर्माण करावी आणि आपातकालीन परिस्थितीत पेरण्या व कापणीच्या वेळी त्यांना संरक्षण पुरवावे अशाही सूचना त्यांना दिलेल्या असत कारण याच काळात बहुतांशा चोऱ्या होत असत आणि धान्याची पूर्ण नासाडीचीही शक्यता असे. त्यामुळे शेतकऱ्यांचे जीवन बिकट होत असे. असे म्हटले जाते की अश्या वेळी शेतकऱ्यांकडून चोरांचा जीव जरी गेला तरी सरकार शेकतऱ्याला दोषी समजत नसे. उलटपक्षी चोराचा मृतदेह सार्वजनिक ठिकाणी लोकांना देत असे जेणे करून चोरी करून शेकतऱ्यांना त्रास देणाऱ्यांचे काय हाल होतात हे दाखवून लोकांच्या मनात भीती निर्माण केली जात असे. अशा रीतीने सरकार शेतकऱ्यांचे कल्याण साधण्यासाठी जमेल तसे प्रयत्न करत असे आणि प्रत्येक बाबतीत त्यांना संरक्षण पुरवित असे.

१०.१७ शेतीसाठी उत्तेजन

मराठा छत्राखाली प्रत्येक राज्यकर्त्याने शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला आणि शेतील प्रत्येक अरेषापासून संरक्षण देण्यासाठी मदत केली.

मराठा राज्यकर्त्यांनी शेतीस उत्तेजन देण्यासाठी खालील उपाय हाती घेतले.

१) नवीन गावे आणि बाजारापेठा वसविणे.

२) इतर विविध भागातील कारणांना शोधून त्यांना आपल्या भागाशी परिचय करून येथेच राहण्यास भाग पाडणे जेणे करून शेतकऱ्यांना आपला माल व इतर वस्तूंची देवाणघेवाण त्यांच्याशी करता येऊ शकेल आणि ते ठिकाण गजबलेले राहील.

३) शेजारील राज्यातील कारागिरांचा शोध घेऊन त्यांना चांगल्या सोयी सवलतीचे आमिष दाखवून आपल्या राज्यात आमंत्रित करण्यासाठी त्यांनी अधिकाऱ्यांना सांगितले आणि त्या कारागिरांना त्यांच्या कारागिरीच्या वस्तू व कलाकुसरीची साधने नव्याने स्थापन झालेल्या बाजारात विकण्यास भाग पाडणे.

४) मराठ्यांच्या राज्यात शेती कसणाऱ्यांचा तुटवडा असल्यामुळे अधिकारी नव्या मजुरांचा शोधात इतर गावामध्ये जात आणि त्यांना आपल्या गावात येऊन शेती करून पैसा कमविण्यासाठी मन वळवीत आणि त्यातून गावात संपत्ती व समृद्धी निर्माण होत असे व पर्यायाने राजाच्या महसूलात वाढ होत असे.

५) सरकारने सर्व शेतकऱ्यांना मग ते नवीन असो वा जुने मिरासदार असो वा उपारीस नापीक जमिनीवर शेती व्यवसायास परवानगी दिली हे शेतीसाठी दिले गेलेले सर्वात मोठे उत्तेजन होते. ज्याने हे काम हाती घेतले, त्याला अनेक सवलती दिल्या गेल्या तशा :

६) १. ज्याने संपूर्ण खडकाळ जमीन लागवडीखाली आणली आणि त्यावर सुपीक मातीचा थर वसवला, नवीन तयार केलेल्या जमिनीच्या सीमा आणि बांध घातले, त्या कसणाऱ्याला नवीन जमीनीपैकी अर्धी जमीन इनाम आणि उर्वरित अर्धी जमीन वीस वर्षासाठी भाडेमुक्त दराने आणि त्या पुढील पाच वर्षासाठी नाममात्र भाडे आकारून दिली जात असे. नंतर २५ वर्षानंतर त्याच कसणाऱ्यांकडून जमिनीचे पूर्ण भाडे आकारणी होत असे.

२. जो कसणारा वा शेतकरी किनारपट्टीची जमीन लागवडयोग्य बनवतो त्यास त्या जमिनीचा १/४ जमिन इनाम आणि उर्वरित जमीन त्याच कसणाऱ्याकडे भाडेमुक्त दराने तोपर्यंत ठेवली जाते जोपर्यंत त्या जमिनीवर त्याच्याकरवी केला गेलेला संपूर्ण खर्च वसूल होत नाही. त्यानंतर काही काळ अजून भाडेमुक्त दरानेच त्या कसणाऱ्याला ती जमीन बक्षिसी रूपात ठेवली जाते. पूर्ण किंमत वसूल झाल्यानंतर, सुधारीत जमिनीवर भाडे आकारणी केली जाते.

३. सरकारने स्वत: कसणारे आणि शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी सिंचन सुविधा बांधल्या.

४. अशी मोहीम हाती घेणे शक्य नसल्यास, सरकार खाजगी उद्योजकांना अशी कामे हाती घेण्यास प्रेरीत करीत असे आणि सिंचन सुविधा निर्माण करण्यासाठी आगाऊ रक्कम अनुदान देत असे.

५. दुष्काळ, टंचाई वा आपत्तीग्रस्ताच्या काळात मराठा सरकारने कधीही शेतकऱ्यांकडून केल्या जाणाऱ्या बैल खरेदीवर वा म्हैस खरेदी करण्यावर शुल्क आकरले नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी असे धोरण तयार केले ज्यानुसार या नव्या शेती कसणाऱ्यांना कसण्यासाठी आवश्यक असलेले दैनंदिन गरज आणि साधने पुरविली जातील. उदा. चांगली बैलजोडी, धान्य आणि बी-बियाणे खरेदीसाठी पैसे. या नव्या शेकऱ्यांना आगाऊ

दिलेले पैसे तीन-चार वर्षाच्या काळात शेतकऱ्याला ओझे होणार नाही अशा बेताने काही त्यामध्ये राजाकडून वसूल केला जात असे. पेशव्यांनी देखील शिवाजी महाराजांचे हे धोरण जोरदारपणे अवलंबले. यातच भर म्हणजे १७७४ साली महादेव नाना शेट यांना उद्देशून लिहिलेला एक दस्तऐवज दर्शवितो की महादेव अमोड येथील मामलेदार असतांना पेशव्यांनी त्यांना अधिकाधिक पडीक जमीन लागवडीखाली आणण्याची सूचना केली आणि हे काम तत्परतेने करावे त्यासाठी त्यांना शेतकऱ्यांना कर्ज वा तगाईची रक्कम आगाऊ देण्याची परवानगी दिली. अश्या रीतीने मराठा सरकार आपल्या महसूलात वाढ करू शकतो. दक्षिण पश्चिमी मोसमी हवामान क्रियाशील असे आणि संपूर्ण महाराष्ट्रभर ते व्यापलेले असे. मराठा काळात घेतली जाणारी मुख्य पिके म्हणजे जवारी, बाजरी, नाचणी, तांदूळ, उडीद, मूग, तूर आणि काही डाळी. हा दक्षिण-पश्चिम हवामान बेभरवशाचे असणे तरी, बहुतांश शेतीची कामे याच मोसमात केली जात असत. त्यामुळे पुरेशा उत्पादनाची खात्री नसे. रबी मोसम सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात सुरू होत असे ज्यावेळेस गहू, ज्वारी, हरभरा आणि हिवाळ्यातील अनेक धान्य घेतली जात असत. खरीप आणि रब्बी मोसमाशिवाय जेव्हा कुठे बारमाही पाणी उपलब्ध असेल तेथे सतत काही ना काही पिके घेतली जात असत. साहजिकच, ज्या शेतकऱ्याकडे विहीर, धरण, तलाव किंवा पाणीसाठा असे तो ऊस, फळे, भाज्या, हळद, कांदा, लसूण, तंबाखू, इतर भाज्या आणि सर्व नगदी पिके अशी दीर्घकाळ आणि त्वरित पैसा मिळवून देणारी पिके घेऊ शकत असे. परंतु अश्या पिकांना सिंचनयुक्त जमीन आणि इतर संबंधित सुविधा आवश्यक असत ज्या मराठा काळातील काही भागात उपलब्ध नव्हत्या. वास्तविक पहाता त्या भागातील लोकांच्या गरजानुसार शेतकी उत्पादन ठरत असे. जमिनीतील उत्पादने आणि शेतकऱ्याच्या गरजा यातून औद्योगिक संघटन आणि त्यानुसार व्यावसायिक गावात स्थानिक होत असत. अशा रीतीने, सर्व व्यवसायिक, उद्योग आणि सरकारी उपक्रमांवर रोख लोक आणि शेती यांच्या गरजांच्या पूर्ती करणे असे.

१०.१८ शेतकी उत्पादन

मराठा काळात गाव पंचायत अत्यंत शक्तिशाली आणि कार्यरत असे म्हणजे ते एक स्वयंपूर्ण एककच असे. गावातील दैनंदिन व्यवहाराचे नियमन गावपंचायत करीत असे. गावातील लोक ते जे पिकवीत असत तेच वापरीत असत किंवा गावात जे पिकत असे तेच त्यांच्या वाट्याला येत असे. गावातील उत्पादन दोन घटकांवर अवलंबून असे. १) गावातील जमिनीची प्रत, २) गावाला उपलब्ध असलेले पाणी. या उपलब्ध पाण्यानुसार पिकांचे दोन मोसम होते, १) खरीप, २) रब्बी. खरीप पिकांची सुरवात मोसमी पावसाळ्यात मुख्यतः जून-जुलैच्या महिन्यात होत असे कारण या काळातच फक्त मिरची, ऊस, तंबाखू आणि कापूस ही नगदी पिके असत. या पिकांचे खास वैशिष्ट्य म्हणजे मिरची ही फक्त देशावरच्या भागात उत्पादित होत असे. ज्या ठिकाणी सिंचनाच्या सोयी होत्या त्या ठिकाणी वर्षात दोन पिके घेतली जात असत नाहीतर संपूर्ण वर्षात एकच पीक घेतले जाई.

१. शेतकी उत्पादने : मराठा छत्राखाली शेतकी उत्पादनांची वर्गवारी पाच प्रकारात होते. १) खाद्य धान्य, २) डाळी, ३) तेलबिया, ४) नगदी पिके, ५) इतर पिके. णराठा प्रदेशातील कोकण भागात तांदूळ आणि नागली ही मुख्य पिके घेतली जातात. या पिकांव्यतिरिक्त वरई, हरभरा, तूर, मूग, काळा हरभरा हे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होत असत. काही उत्पादने ठराविक भागात अतिशय लोकप्रिय असत. उदा. Sun Lerp जे मुख्यतः कोळ्यांचे दोरे आणि जावे बनविण्यासाठी वापरले जाते.

मराठ्यांच्या देशावरच्या भागात ज्वारी, बाजरी आणि कापूस मोठ्या प्रमाणात पिकविला जात असे. या व्यतिरिक्त Nagli, Sava आणि Paddy देखील पिकविला जात असे. Paddy हे पावसाळ्यात तर गहू हे दुसऱ्या मोसमात घेतले जाते. इतर पिकात, हरभरा, तूर, मूग, वाटाणा, बिन्स, तेलबिया, भुईमूग आणि सूर्यफूल ही नेहमीची पिके या भागात होत असत.

१०.१९ सिंचन

छत्रपती शिवाजी महाराजांनी शेतकऱ्यांनी स्वत: त्यांच्या जमिनीसाठी पाण्याची व्यवस्था करण्यास उत्तेजन दिले मग ते विहीर खणणे असो वा पाणी साठा करणे असतो. उत्पादन सुधारण्यासाठी आणि राजाचा महसूल वाढण्यासाठी शेतीसाठी सिंचन हाच एक उपाय होता. मराठा छत्राखालील बहुतांश जमीन ही मान्सून पावसांवर अवलंबून असल्याने आणि ते पाऊस बेभरवश्याचा अनिश्चित असल्याने जमिनीचे मोठ्या प्रमाणावर सिंचन करणे आवश्यक बनले होते. मान्सूनच्या पावसावर अवलंबून असलेल्या शेतीला जिरायती तर सिंचन व्यवस्था असलेल्या शेतीला बागायती म्हटले जात असे. बागायती शेतीसाठी घरपोच वा कालव्याचे पाणी वापरले जात असल्याने अशा जमिनीला पाणस्थळ जमीन म्हटले जात असे. या प्रकारचे सिंचन शक्य होते कारण नदीच्या जवळ धरणे वा कालवे बांधणे सुसाह्य असे आणि गावातील बहुतेक सर्वजण अशा सर्वासाठी उपयोगी ठरणाऱ्या धरणाच्या बांधकामासाठी सहभाग घेत असत. इतर दुसरीकडे विहीर खणणे अतिशय महागडे काम असे आणि प्रत्येक शेतकऱ्याला ते परवडणे शक्य नसे. एव्हढेच नाही तरी खणलेल्या विहीरीला पाणी लागेलच याची शाश्वतीही नसे. तरीदेखील तर एखाद्याच्या विहीरीला पाणी लागेल तर त्या जमिनीला मोटास्थळ जमीन म्हणत असत. परंतु असे सिंचन मर्यादित असे. त्यामुळे सरकारने नेहमी सर्व लोकांना वापरता येईल यासाठी धरणे किंवा कालवे बांधले आणि त्याचा खर्च दिर्घकाळ लोकांकडून कर गोळा करून भागविला. काही ठिकाणी राजानेसुद्धा अशा धरणाच्या आणि कालव्याच्या दुरुस्तीसाठी पैसे दिले. अशा रीतीने मराठ्यासाठी सिंचन हा एकच मार्ग होता ज्यायोगे लोकांची समृद्धी होईल आणि सरकारचा महसूल दामदुप्पटीने वाढेल.

१०.२० उद्याने आणि जंगले

मराठा छत्राखालील शेतकऱ्यांनी केवळ जिरायती जमीनच कसली नाही तर जिथे जिथे शक्य होईल तिथे बागादेखील पिकविल्या. कोकणात समुद्रकिनाऱ्यालागतची जमीन बागांच्या लागवडीसाठी अत्यंत अनुकुल होती. तश्याच रीतीने देशावरच्या भागात नदीकाठची जमीन अत्यंत सुपीक असे व जास्त उत्पादन निघत असे. कोकण भागातील बागामध्ये आंबा, नारळ, काजू, अननस, फणस, रताळी आणि विविध प्रकारच्या भाज्या पिकत असे तर देशांवरच्या बागांमध्ये द्राक्षे, विड्याची पाने, रताळी, अंजीर आणि भाज्या पिकविल्या जात असत. वास्तविक पाहता बागकामासाठी सततचे लक्ष आणि काम केले तरच जास्तीत जास्त उत्पादन मिळू शकते. त्यामुळे लोक चांगल्या उत्पन्नासाठी बागा पिकवीत असत ते नगदी पीक असे. मराठा छत्राखाली असलेली जमीन अनेक जंगलानी व्यापलेली होती. सह्याद्रीच्या पर्वतरांगांचा पश्चिम घाट मोठाल्या जंगलपट्ट्यांनी व्यापलेला होता. तर दुसरीकडे कल्याण, भिवंडी, शहापूर भोवतालचा परिसर देखील जंगलानी वेढलेला होता. या जंगपट्ट्यामध्ये अशी अनेक महत्त्वाचे वृक्ष होते ज्या वृक्षांची लाकडे कल्याण, भिवंडी आणि कोकणातील बंदरामधील वेगवेगळ्या प्रकारची जहाजे बनविण्यासाठी वापरली जात असत. जंगलामधील झाडांपैकी आंबा, नाना, हेडू, कळब, आसन इबावी, जांभूळ, शिसे, Kirja, pata, Alva हिरडा, Manha या झाडांचा उपयोग लाकडांसाठी होत असे. या भागातील शेतीसाठी देखील लाकडाचा उपयोग करीत असत. आंब्याचे लाकूड

शेतीची अवजारे बनविण्यासाठी उत्तम असे तर सागवानाचे लाकूड इमारतीचे बांधकाम, गवंडीकाम आणि किल्ल्यांसाठी वापरले जात असे. लाकडे आणि इंधनांशिवाय जंगलात मेण, मध, लाख अशी महत्त्वाची उत्पादने सापडतात. कधी झाडांची पाने बीडी, टोपल्या, पत्रावळी, द्रोण आणि इतर उपयोगी वस्तूंसाठी वापरली जात असत.

१०.२१ वसाहतीकरण

शहाजीच्या जहांगिरीत पुणे, सुपा, नगर आणि हवेली चा समावेश होता. ही नापीक जमीन होती आणि त्यात जंगली लांडगे, पशु तसेच दरोडेखोरांचा वास असे. साहजिकच कोणी येथे वसाहत करून राहण्यास तयार झाले नाही. या जहागिरीचे व्यवस्थापन असलेले दादाजी कोंडदेव यांच्यावर यासर्व भागाचे वसाहतीकरण करण्याची जबाबदारी आली. त्यांनी स्थानिक लोक म्हणजे मावळ्यांची मदत घेतली. हा भाग दरोडेखोर, पशू आणि लांडग्यापासून मुक्त केला यासाठी दादोजी कोंडदेवानी त्यांना दादोजी कोंडदेवानी भरघोस बक्षिसी दिल्या. मोठ्या प्रयत्नानंतर, दादोजींनी पेण आणि बाजारपेठा या भागात वसवल्या आणि व्यापाऱ्यांना कारगिरांना येऊन राहण्यास प्रोत्साहन दिले. अशा रीतीने दादोजींनी ही जहागिरी मराठ्यांचा समृद्ध भाग म्हणून विकसित केली.

आपली प्रगती तपासा

१. अग्रहारा वतन म्हणजे काय ?

२. सनदी आणि गाव निसबत जमीन संदर्भात थोडक्यात सांगा ?

३. कारागिरांना दिले जाणारी वतने कोणती ते सांगा ?

४. वतने का निर्माण केली गेली आणि जप्ती केली गेली ?

५. वतनदारांची मुख्य कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या कोणत्या असत ?

६. कोकण भागातील जमिनीचे विविध प्रकार स्पष्ट करा.

७. मराठ्यांच्या देशावरच्या भागातील जमिनीच्या विविध प्रकारांनी चर्चा करा.

८. मराठा छत्राखाली असलेल्या शेतकी उत्पादनव्यवस्थेची चर्चा करा ?

९. सिंचन म्हणजे काय ? मराठा छत्राखाली जमिनीचे सिंचन कशा प्रकारे करण्यात आले ?

१०.२२ सारांश:

मराठा अधिपत्याखाली जमीन हे वतन म्हणून ओळखले जात असे. ही जमीन वतन मिळविण्यासाठी आणि ते टिकविण्यासाठी कोणतेही दिव्य करायला तयार असत. जमीन ही निवासाकरिता शेती कसण्यासाठी आणि सांस्कृतिक कार्यक्रमासाठी वापरली जात असे. वास्तविक पहाता मध्ययुगीन काळापर्यंत भारतात आणि जगात राजा हाच जमिनीचा सार्वभौम मालक असे. परंतु जमीन कसली जावी या उद्देशासाठी ती कसणाऱ्यांच्या हाती सोपविण्यात आली जे नंतर कसण्याच्या कामासाठी त्या जमिनीचे मालक म्हणून ओळखले जाऊ लागले. अशा रीतीने खालीसती जमीन व इनामी वतन किंवा वतनी जमिनीचा महसूल आमदार किंवा वतनदारांकडून रोख पैश्याच्या बदल्यात स्वत:साठी वापरला जात असे.

mumotes.in

वतनदारास त्याचा अधिकार पदानुसार अनेक कर्तव्ये पार पाडावी लागत असे आणि अनेक जबाबदाऱ्या उचलाव्या लागत असे. जसे अधिक उत्पादन काढण्यासाठी वसाहती पाडण्याचे धोरण स्वीकारणे, जमीन महसूल गोळा करणे, क्षुल्लक वाद-विवाद मिटविणे, उत्सव, सार्वजनिक कार्यक्रम, धार्मिक समारंभ, लोक मनोरंजन आणि विविध खेळ आयोजित करणे. कायदा व सुव्यवस्था राखणे, वतनदाराचे सर्वात महत्त्वाचे कर्तव्य व जबाबदारी असे वतन असणे हे वतनदारासाठी फार महत्त्वाची बाब असे कारण त्या आधारेच तो आपली राजकीय कारकीर्द घडवू शकत असे. ते त्याच्या उत्पन्नाचा स्त्रोत असे त्याची सन्माननिय बाब असे. खुद्द आणि नंतरच्या काळात रामचंद्र अमात्यांनी त्यांच्या आज्ञापत्रात सुचविल्याप्रमाणे आणि नमूद केलेल्याप्रमाणे अनेक उपाय अंगिकारणे. मोघलांच्या विरोधात चालू असलेल्या मराठा स्वातंत्र्ययुद्धाच्या काळात छत्रपती राजारामांनी तरुण आणि धाडसी मराठा सरदारांना वतने बहाल करण्यास सुरवात केली, ज्यांनी राजाला साथ दिली आणि मोघलांविरूद्ध हिंमतीने लढाई केली परंतु या वतने बहाल करण्यामुळे केंद्रीय सरकार मोठ्या प्रमाणात क्षीण झाले आणि मराठा साम्राज्य संघराज्य रूपात परिवर्तीत झाले त्यातून शेवटी १८१८ साली मराठा सत्ता संपुष्टात आली.

१०.२३ प्रश्न

१. मराठा काळातील वतनदारी व्यवस्थेच्या स्वरूपाचे परीक्षण करा.

२. वतन व्यवस्थाबद्दल तुमचे आकलन लिहा. वतनदारीचे वेगवेगळ्या जबाबदाऱ्या व कर्तव्ये काय होती ?

३. वतनदारी व्यवस्थेचे महत्त्व सांगा. मराठा छत्राखाली वतनदारी व्यवस्थेत कोणते विविध बदल करण्यात आले ?

४. मराठा छत्राखालील जमीन व्यवस्तेच्या स्वरूपाची चर्चा करा.

५. मराठा छत्राखालील शेतकऱ्यांची परिस्थितीचे वर्णन करा.

१०.२४ संदर्भ

१. डॉ. बाळकृष्ण, शिवाजी द ग्रेट व्हॉल्यूम IV

२. सी. व्ही. वैद्य, शिवाजी द फाऊंडर ऑफ मराठी स्वराज्य

३. ए. आर. कुलकणी, महाराष्ट्र इन द एज ऑफ शिवाजी

४. माऊंटबुअर्ट एलफिन्स्टन, ए रिपोर्ट ॲ द हेरिटेरीज कॉल्कर्ड फ्रॉर द पेशवा.

५. अत्रे टी. एन. - गावगाडा

६. कुलकर्णी ए. आर.- महाराष्ट्र इन द एज ऑफ शिवाजी

७. मोवालड - फ्रॉम अकबर टू औरंबजेब

८. सेन एस. एन. - ॲडमिनिस्ट्रटिक सिस्टीम ऑफ द मराठाज.

❖❖❖❖

११

आर्थिक आणि सांस्कृतिक विकास : उद्योगधंदे

घटक रचना:

११.० उद्दिष्ट्ये

११.१ प्रस्तावना

११.२ मराठ्यांच्या नियंत्रणाखाली असणाऱ्या उद्योगांची सामान्य वैशिष्ट्ये

११.३ मराठा कालखंडातील मुख्य उद्योग

११.४ मराठा कालखंडातील धातु उद्योग

११.५ मराठा कालखंडातील जहाजबांधणी उद्योग

११.६ मराठ्यांच्या कालखंडातील इतर उद्योग

११.७ मराठा कालखंडातील औद्योगिक व व्यापारी केंद्रे :

११.८ सारांश

११.९ प्रश्न

११.१० संदर्भ

११.० उद्दिष्ट्ये

- मराठ्यांच्या नियंत्रणाखालील उद्योगांची माहिती जाणून घेण.
- मराठ्यांच्या नियंत्रणाखालील उद्योगांची सामान्य वैशिष्टे जाणून घेणे
- मराठ्यांच्या नियंत्रणाखालील कापड उद्योगाची माहिती जाणून घेणे.
- मराठ्यांच्या नियंत्रणाखालील इतर उद्योगांची माहिती जाणून घेणे.
- मराठ्यांच्या नियंत्रणाखालील ग्रामीण उद्योगांची माहिती जाणून घेणे.
- मराठ्यांच्या नियंत्रणाखालील उद्योगांच्या विकासाची माहिती जाणून घेणे.
- मराठ्यांच्या उद्योग उत्पादन प्रक्रियेंची माहिती जाणून घेणे.

munotes.in

११.१प्रस्तावना

मध्ययुगीन महाराष्ट्रातील मराठ्यांच्या उद्योगधंद्यांची माहिती पहात असताना आपणास खेडे व शहरीभागात विकसीत झालेल्या उद्योगांची माहिती जाणून घ्यावी लागेल. सर्वसाधारण जर विचार केला तर या कालखंडात कापड उद्योग, धातुउद्योग, जहाज बांधणी उद्योग, या मोठ्या उद्योगांचा विकास झाल्याचे दिसून येते. त्याच बरोबर लाकूड उद्योग, हस्तीदंत उद्योग, चर्म उद्योग, दोरखंड उद्योग, गुळ उद्योग, साखर उद्योग, तेल उद्योग, मासेमारी उद्योग, मीठ उद्योग, दारु उद्योग, कागद उद्योग या इतर लहान उद्योगांचा विकास झाल्याचे दिसून येते.

या उद्योगांपैकी काही उद्योग मराठ्यांच्या नियंत्रणाखाली चालत होते. तर काही उद्योग हे वैयक्तीक मालकीने चालत होते. मात्र हे उद्योग मराठ्यांच्या साम्राज्यात असल्या कारणे या उद्योगांवर मराठ्यांचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष नियंत्रण असे.

मराठा साम्राज्यांची अर्थव्यवस्था ही शेतीशी निगडीत होती. शेती हा मराठ्यांच्या अर्थव्यवस्थेचा पाया होता. म्हणूनच आरंभी उद्योगांचा संबध जास्त प्रमाणात खेड्यांबरोबर आला. मात्र शहरी भागातही उद्योगांचा विकास झाला होता. या कालखंडात खेडे व शहरामधली उद्योगांमध्ये समन्वय होता. सुरवातील प्राथमिक अवस्थेत गरजेनुसार लहान स्वरुपात जे उद्योग चालत होते त्यावर बारा बलुतेदार व बारा आलुतेदारांचा प्रभाव जाणवतो, बारा बलुतेदारांमध्ये सुतार, लोहार, चांभार, महार, मांग, कुंभार, नाव्ही, धोबी, गुरव, जोशी, मोट अथवा शाहिर, व मुलांनी यांचा समावेश होता हे लोक गरजेनुसार सेवा पुरवत असत. तर आलुतेदारमध्ये सोनार, जंगम, शिंपी, कोळी, तराळ, माळी, उवरी, गोसावी, घडशी, रामोशी, तेळी, तांबोळी, गोंधळी यांचा समावेश होत असे. यांची सेवा घेतलीच पाहिजे असे बंधन नव्हते मात्र यांच्या कार्याचा संबध जास्त उद्योग - व्यवसायाशी संबधीत होता. परिणामी हेच लोक पुढे उद्योग कार्यप्रणाली - बरोबर आकर्षीत झाले. मराठा राज कर्त्यांचा उद्योगाबाबतेचा सकारात्मक दृष्टीकोन, खाजगी उद्योजकांचा दृष्टीकोन व उपलब्ध मुबलक कामगार पुरवठा या मुळे मराठा कालखंडात उद्योगांची निर्मिती झाली. त्याच बरोबर या उद्योगांचा विकासही झाला.

११.२मराठ्यांच्या नियंत्रणाखाली असणाऱ्या उद्योगांची सामान्य वैशिष्ट्ये

१) **हस्तकला:** हस्तकला हे मराठ्यांच्या उद्योगाचे एक सामान्य वैशिष्ट्ये आहे. मराठ्यांच्या कालखंडातील हस्तकला उद्योग हे लहान उद्योग होते. शेतीतून निघणाऱ्या उत्पादनावर हा उद्योग अवलंबून असल्या कारणे या उद्योगाचा शेती हा पाया होता. या उद्योगाला आर्थिक स्वरुप असल्याने या उद्योगाच्या माध्यमातून खेड्यातील लोकांच्या वाट्याला समृद्ध जीवन प्राप्त झाले होते. या उद्योगाच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या वस्तू या वेगवेगळ्या प्रकारच्या असल्याने एका उत्पादकाला दुसऱ्या उत्पादकाच्या उत्पादनावर अवलंबून रहावे लागत असे. परिणामी अदला बदलीच्या माध्यमातून वस्तूचे विनीमय होत होते. या उद्योगात काम करणारे कलावंत तसेच हस्तोध्यजक मराठा सत्तेच्या नियंत्रणात सुरक्षीत होत.

२) **गाव-औद्योगिक संघटनाचा पाया:** मराठ्यांच्या कालखंडात गाव हे औद्योगिक संघटनाचे केंद्र बनल्याने, पाया बनल्याने मराठ्यांच्या उद्योगाचे हे एक सामान्य वैशिष्टे बनले आहे. मराठ्यांच्या नियंत्रणाखाली जरी उद्योग असले तरी या उद्योगांचया निर्मिती प्रक्रियेतील मुख्य युनीट गाव अथवा खेड्यात होता. कारण जे कलावंत होते ते खेड्यात अथवा गावात कलात्मक वस्तु बनवत होते. बनवलेल्या वस्तु ते गावात अथवा खेड्यात विकत होते. जर त्यांनी केलेल

उत्पादन संपले नाही तर ते आपले उत्पादन बाजारात आणत असत. कसबा हे मोठे मार्केट असे ते आठवड्यातून एकदा भरत असे. अशा बाजारात अनेक हस्तकला उत्पादक येत असत व आपल्या वस्तू विकत असत, वा माहितीवरुन असे स्पष्ट होते की गाव हा औद्योगिक संघटनाचा पाया आहे. गावातील कलावंत, कला वस्तुंचे होणारे गावातील उत्पादन, कलात्मक वस्तुंचे गावात होणारे आदान-प्रदान, गावातील बाजारपेठ, गावातील विक्रेते, गावातील खरेदीकर्ते या सर्व बाबींचा विचार करता गाव हा औद्योगिक संघटनाचा पाया आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. म्हणूनच हा घटक मराठ्यांच्या उद्योगांच्या सामान्य वैशिष्ट्याचा एक भाग बनला आहे.

३) जात आणि व्यवसाय यांचे सहसंबध: मराठा कालखंडात जात आणि व्यवसाय यांचे सह संबंध दिसत असल्याकारणाने हा घटक मराठ्यांच्या उद्योगाचे सामान्य वैशिष्टे बनला आहे. सर्वसाधारण जर विचार केला तर या कालखंडात आपणास जो व्यवसाय केला जात होता तो जातीला अनुसरुन केला जात होता असे आढळते. बारा बलुतेदार, बारा आलुतेदार हे या कालखंडात आपल्या जातीयोग्य व्यवसाय करत होते असे दिसून येते. या व्यवसायामध्ये गुंतलेले लोक सुरक्षीत होते. त्यांचे व्यवसाय सुरक्षीत होते. त्यांना समाज व शासनाकडून सहकार्य होत असे. जाती नुसार परंपरागत पद्धतीने या लोकांचे व्यवसाय टिकून होते. म्हणजेच या कालखंडात जातीनुसार व्यवसाय सुरु होते. असे स्पष्ट होते.

४) कुटुंब व्यवसाय प्रशिक्षणाचे केंद्र: मराठ्यांच्या कालखंडातील उद्योग हे परंपरागत पद्धतीने केले जात होते. परिणामी जी कुटुंबे या कालखंडात उद्योगात गुंतली होती. त्यांना अपेक्षित असणारे उत्पन्न या उद्योगांच्या माध्यमातून मिळत होते. या उद्योगात गुंतलेल्या कुटुंबातील मुख्य व्यक्तीना याच कुटुंबातील लहान मुले, मोठी मुले, स्त्रीया, कुटुंबातील मोठी माणसे यांची मदत मिळत असे. हे लोक सुरुवातीला या उद्योगातून उत्पादन कसे घेतले जात आहे याची कुतुहलाने पाहणी करत असत व नंतर उत्सुकता निर्माण झाल्यानंतर उत्पादन प्रक्रियेत प्रत्यक्ष भाग घेत असत. म्हणजेच उद्योगांची पार्श्वभूमी, पुरक परिस्थिती व प्रत्यक्ष उद्योग पहाण्याची संधी व प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष कार्यप्रणालीचा अनुभव या सेवा सुविधांमुळे त्यांना प्रशिक्षणाचा अनुभव घेता येत होता. म्हणूनच हा घटक मराठ्यांच्या उद्योगाचा एक अविभाज्य घटक बनला होता.

५) मागणी आणि पुरवठा: मराठा कालखंडात जे उद्योग होते ते विद्युत शक्तीवर चालणारे नव्हते म्हणजेच जे उद्योगातून उत्पादन घेतले जात होते. ते हस्तकलेच्या माध्यमातून घेतले जात होते. त्यामुळे गरज आहे तेवढेच उत्पादन घेतले जात होते. म्हणजेच हे उत्पादन मर्यादीत स्वरुपाचे होते. जे उद्योगाच्या माध्यमातून उत्पादन करत होते ते हस्तउद्योजक मागणी आणि पुरवठा यांचे संतुलन राहिल अशाच पद्धतीचे उत्पादन करत होते. या तत्वाला अनुसरुनच व्यापार सुरु ठेवला होता. म्हणून मागणी आणि पुरवठा यांचे संतुलन हे मराठ्यांच्या मूलभूत उद्योगाचे सामान्य वैशिष्ट्ये ठरले.

६) कायम वेशभूषा: मराठा कालखंडातील कापड उद्योगाशी संबधीत हा घटक आहे. या कालखंडात लोकांकडून जी कापडासाठी मागणी होत होती ती सातत्याने एकाच स्वरुपाच्या, एकाच कापड प्रकाराच्या आवडीनुसार होत होती या त्यांच्या कापड आवडीत, अथवा कापडापासून बनवलेल्या वेशभूषेत सहजासहजी बदल होत नव्हता परिणामी मागणीमध्ये न होणारा बदल तसेच उत्पादनामध्ये न होणारा बदल या व्यवसायाच्या ठळक बाबी स्पष्ट करत होता. म्हणूनच हा घटक या कालखंडातील उद्योगांच्या वैशिष्ट्यांचा एक भाग बनला.

७) विणकराचे स्थलांतर: मराठा कालखंडात कापड उद्योगाला मोठ्याप्रमाण महत्त्व होते. परिणामी कापड उद्योगासाठी काम करणारे जे कलांवत अथवा कामगार होते त्यांना या उद्योगासाठी काम करण्यासाठी मोठ्या प्रमाणात मागणी होती. मराठा कालखंडातील सरकार अशा लोकांना स्थलांतराची परवानगी देत असे. तसेच या लोकांच्या राहण्याची व्यवस्था करत असे, त्यांना वेतन देण्याची व्यवस्था करत असे. त्यांना घरभाड्यासाठी सवलत देत असे तसेच अनामत आर्थिक सहकार्य करत असे व त्यांना सुरक्षा देत असे. परिणामी या व्यवसायासाठी व उद्योगांसाठी स्थलांतर करणाऱ्या कारागीरांची संख्या जास्त असे व गरजेनुसार हे लोक स्थलांतर करत असत म्हणूनच हा घटक या उद्योगांच्या वैशिष्ट्याचा एक भाग बनला होता.

८) सरकारच्या व्यापाऱ्यांना सवलती: मराठा, कालखंडात सरकार वेगवेगळ्या प्रसंगी व्यापाऱ्यांना मदत करत असे. जर व्यापाऱ्यांचा माल आग लागून खराब झाला असेल अथवा नष्ट झाला असेल तेव्हा, व्यापाऱ्यांचा माल वातावरणामुळे खराब झाला असेल तेव्हा, अशा कठीण प्रसंगी या लोकांना मराठा सरकार मदत करत असे.

९) काही उद्योंगावर सकरारचे नियंत्रण: मराठा कालखंडात काही महत्त्वाच्या उद्योगांवर सरकारचे नियंत्रण होते. विशेष करुन पेशवेकाळात अशा उद्योगांवर सरकारचे नियंत्रण असल्याचे जानवते. ज्या विशेष उद्योगांवर सरकारचे नियंत्रण होते त्या उद्योगांमध्ये हिरे उद्योग, मीठ उद्योग, दारु उद्योग, तंबाधू उद्योग, सुगंधी पान उद्योग या उद्योगांचा समावेश होता. या उद्योगांसाठी सरकारतर्फे उद्योग करणाऱ्यांना परवाने दिले जात होत व या उद्योगांवर नियंत्रण ठेवण्यासाठी वेगवेगळे अधिकारी नियुक्त केले जात होते व या अधिकाऱ्याद्वारे या उद्योगांवर देखरेख ठेवून नियंत्रण ठेवण्याचे काम सरकारमार्फत केले जात होते.

११.३मराठा कालखंडातील मुख्य उद्योग

मराठा कालखंडात जे उद्योग होते ते मराठ्यांच्या नियंत्रणाखाली होते. मात्र या उद्योगांचे स्वरुप पूर्वी लहान होते. गरजे नुसार या उद्योगांची निर्मिती व विकास झाल्याचे आढळते. आज जसे मोठे उद्योग आपणास दिसतात तसे उद्योगाचे स्वरुप त्या कालखंडात आढळत नाही. मराठ्यांच्या कालखंडात जे उद्योग प्रचलीत होते त्या उद्योगांची वर्गवारी पुढील प्रमाणे करण्यात आली होती.

अ) कापड उद्योग: मराठा कालखंडातील मुख्य उद्योग म्हणून कापड उद्योगाकडे पाहिले जाते. हा उद्योग संपूर्ण मराठा साम्राज्यात लोकप्रिय उद्योग होता. या उद्योगाचे वर्गिकरण मराठा कालखंडात तीन भागात करण्यात आले होते. हे तीन भाग पुढील प्रमाणे आहेत.

१. सुती कापड उद्योग

२. रेशमी कापड उद्योग

३. लोकरी कापड उद्योग

१. सुती कापड उद्योग: मराठा कालखंडातील सुती कापड उद्योग हा महत्त्वपूर्ण उद्योग मानला जात होता. हा मराठ्यांच्या कालखंडातील अतिशय लोकप्रिय उद्योग होता. विणकरांचे कौशल्य तसेच या उद्योगाला होणारे विणकरांचे सहकार्य या मुळे हा उद्योग विकसीत झाला होता. हा उद्योग मराठा कालखंडात सोलापूर या ठिकाणी मोठ्या प्रमाणात विकसीत झाला होता. सोलापूर हे या उद्योगाचे केंद्र बनले होते.

सोलापूरमध्ये या उद्योगाचा विकास होण्याचे दुसरे महत्वपूर्ण कारण म्हणजे या उद्योगासाठी या ठिकाणी उपलब्ध असणारा कच्चा माल होय. विणकरांची उपलब्धता, कच्चामालाचा पुरवठा तसेच कच्च्या मालावर प्रक्रिया करुन पक्का माल बनविण्यासाठी लागणारी यंत्र सामुर्ग्री, व उत्पादन कौशल्य तंत्र या सर्व गोष्टीमुळे या उद्योगाचा या ठिकाणी विकास झाला होता.

सोलापूर व्यतिरिक्त चंदनवाडा व नागपूर या ठिकाणीसूद्धा कापड उद्योग विकसीत झाला होता. या ठिकाणी सुती कापड उद्योगातील धोती व सारी सुंदरपद्धतीने बनवली जात होती.

सुती कापड उद्योगाचे आणखी एक मुख्य केंद्र होते ते केंद्र म्हणजे पुणे होय. हे केंद्र पेशव्याच्या पुणे येथील राजधानीच्या ठिकाणी होते. या उद्योगातून या ठिकाणच्या लोकांना उत्तम प्रकारे सुती कापड या ठिकाणच्या लोकांना पुरवले जात होते कारण या ठिकाणच्या कापडाचे उत्तम उत्पादन होत असे. हा व्यवसाय या ठिकाणी प्रगतीपथावर पोहचला होता. परिणामी या उद्योगातून निर्माण होणारे उत्पादन इतरत्र पुरविण्याची परवानगी पेशव्यानी या उद्योगात गुंतलेल्या व्यावसायिकांना दिली होती. म्हणूनच हे केंद्रसुद्धा या कालखंडात प्रसिद्धिला आले होते. नावारुपाला आले होते.

२) रेशमी कापड उद्योग: मराठा कालखंडातील कापड उद्योगाशी संबधीथ असणारा दुसरा महत्वपूर्ण उद्योग म्हणजे रेशमी कापड उद्योग होय. मराठा कालखंडात नाशिक, यवला या ठिकाणी या उद्योगाचा विकास झाला होता. पुण्यामध्ये या उद्योगाचा सुरवातिला विकास झाला नव्हता. मात्र पेशव्यांच्या राजवटीत पुण्यात या उद्योगाचा विकास झाला. रघुजी नाईक यांने नाशिक येथे, आंग्रे यांनी चौल येथे, या उद्योगाला प्रोत्साहन दिले. त्यामुळे नाशिक बरोबर चौल हे सुद्धा या कापड उद्योगाचे केंद्र बनले.

या व्यतिरिक्त रेशमी कापड उद्योग निर्मितीमध्ये अत्यंत महत्वपूर्ण जे केंद्र प्रचलीत होते ते केंद्र म्हणजे पैठण. रेशमी साडी उत्पादनामध्ये तेव्हा पैठण हे नावारुपाला आले होते. पैठणची तेव्हा पितांबरी प्रसिद्ध होती.

रेशमी कापड उत्पादन प्रक्रियेत जालनाचाही सहभाग होता. मात्र या कापड उत्पादनात जसा पैठण प्रसिद्ध होता तसा जालना प्रसिद्ध नव्हता.

या उद्योगासाठी लागणारा कच्चा माल हा कर्नाटकमधून उपलब्ध होत असे. तसेच बंगाल मधून सुद्धा कच्चा माल आणला जात असे. आंतरराष्ट्रीय स्तरावर चिन व प्यारीस मधून या उद्योगासाठी कच्चा माल उपलब्ध केला जात असे.

१८ व्या शतकात मुंबई ब्रिटिशांच्या नियंत्रणाखाली होती. त्यांनी या उद्योगाशी संबधीत उत्पादन व व्यापार विकसीत केला. परिणामी मुंबईच्या नेतृत्वाखाली पुढे सुतीकापड उद्योग, रेशमी कापड उद्योग व लोकरी कापडी उद्योगाचा विकास झाला.

३) लोकरी कापड उद्योग: मराठ्यांच्या कापड उद्योगाशी संबधीत असणारा तिसरा महत्वपूर्ण उद्योग म्हणजे लोकरी कापड उद्योग होय. मराठा कालखंडात या कापड उद्योगाची केंद्रे ही सातारा, श्रीवाल, ईदांपूर, हवेली, दाभोळ, चिपळून, कराड व जुन्नर या ठिकाणी होती. या उद्योगास कच्चा माल म्हणून प्राण्याचे कातडे व मऊ केस म्हणजे लोकर वापरली जात असे. या उद्योगास जास्त प्रमाणात मेढ्यांच्या लोकरीचा वापर कच्चा माल म्हणून केला जात होता. लोकर उत्पादनाचे काम धनगर करत असल्याने ज्या ठिकाणी या उत्पादकांचे प्रमाण जास्त आहे त्या ठिकाणी या लोकर कापड उद्योगांची निर्मिती आपणास झाल्याचे दिसून येते. या उद्योगाच्या

माध्यमातून निर्माण होणारे महत्वपूर्ण उत्पादन म्हणजे घोंगडे होय. या घोंगड्याला कंबळ असे त्या परिसराच्या भाषेत म्हटले जात असे.

मेंढपाळ करणारे धनगर लोक या उद्योगात गुंतले होते व त्यांनी या उद्योगाच्या विकास प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेतला होता. ते या उद्योगाच्या माध्यमातून जास्त प्रमाणात घोंगड्याचे उत्पादन करत असत.

मराठा कालखंडातील एक मुख्य व महत्वपूर्ण उद्योग म्हणून कापड उद्योगाकडे पाहिले जात होते. कापड उद्योगाच्या माध्यमातून त्या कालखंडात पुरुषांसाठी धोतर, रुंद तुमानी, पायजामे, अंगरखे, शाली, लांब झगे, लांब कोटे, पागोटी, पगड्या या सारखी शिरोभुषणे व बाहेरील वस्त्रे बनवीली जात होती तर स्त्रियांसाठी साड्या, सकलात (तलम लोकरी वस्त्रे) शरीराच्या वरच्या भागासाठी वस्त्रे, दुपट्टे, शाली, पायजमे आदि कपडे बनवलेजात होते. फेटे, रुमाल, पागोटे, टोप्या, पासोड्या या वस्तुंची निर्मितासुद्धा या कालखंडात कापडापासून केली जात होती. या कालखंडात या उद्योगासाठी आवश्यक असणारा कच्चा माल, कुशल कामगार, उत्पादन प्रक्रिये तंत्र, उत्पादनास आवश्यक असणारे पुरक घटक, हक्काच्या बाजारपेठा, मागणी पुरवठयांचे संतुलन व राजाश्रय या सर्व गोष्टीमुळे या उद्योगांचा या कालखंडात विकास झाला.

४) रंगकाम उद्योग: मराठा कालखंडातील रंगकाम उद्योग हा कापडउद्योगाशी संबधीत असणारा उद्योग आहे. या उद्योगाचे सह-संबध आल्याने या उद्योगाला मराठ्यांच्या कालखंडात महत्व प्राप्त झाले होते. विशेष करुन पेशवेकाळात या उद्योगाचा विकास मोठ्या प्रमाणात झाला होता. १७६५-६६ च्या पेशव्यांच्या कालखंडातील नोंदीत असे म्हटले आहे की पुण्यातील रंगकाम उद्योग हा इतर ठिकाणच्या रंगकाम उद्योगापेक्षा प्रगतीपथावर आहे. म्हणूनच त्या कालखंडात पुणे ही रंगकाम उद्योगाची राजधानी आहे असे म्हटले जाते. तेव्हाच्या कालखंडात शेटे हे रंगकाम व्यवसायाचे प्रमुख होते. ते तेव्हा ठराविक किमंतीला कपड्यांना रंग देवून कपडे बाजारात आणत असत. या कालखंडात जो रंगकाम उद्योग विकसीत झाला होता. या उद्योगाचे विभाग किती होते, या मध्ये कामगारांचे विभाग किती होते, कामगारांना पगार किती दिला जात होता, तसेच रंग केलेल्या कपड्यांच्या किंमती किती होत्या, रंग कामासाठी कोणते रंग वापरले जात होते याची माहिती उपलब्ध नाही. मात्र राजव्यवहार कोषामध्ये इतर वस्तुंच्या रंगकामाची माहिती थोड्याफार प्रमाणात उपलब्ध आहे. मात्र असे जरी असले तरी मराठ्यांच्या कालखंडात हा व्यवसाय प्रचलीत होता व या व्यवसायाचा या कालखंडात विकास झाला होता हे नाकारता येणार नाही.

आपण मराठ्यांच्या नियंत्रणाखाली असणाऱ्या कापडउद्योगाच्या सुती कापडउद्योग, रेशमी कापडउद्योग व लोकरी कापडउद्योग या उद्योगांची माहिती पाहिली हे सर्वच उद्योग त्या कालखंडात विकसीत अवस्थेला होते. याचे मुख्य कारण या उद्योगाचा असणारा मानवाच्या जीवनावश्यक गरजे बरोबरचा संबंध परिणामी व्यावहारीक दृष्टीकोनातून या गोष्टीचा विकास हा अपेक्षित होत व तो झाला. यास गरज, पुरवठा, राजाश्रय, बाजारपेठअ व इतर गोष्टीचे सहकार्य तितकेच उपयुक्त व जबाबदार ठरले.

११.४मराठा कालखंडातील धातु उद्योग

मराठा कालखंडातील दुसरा महत्वपूर्ण उद्योग म्हणून धातु उद्योगाकडे पाहिले जाते दैनंदिन गरजा, व्यावसायिक गरजा व लष्करी गरजेच्या अनुशंगाने या व्यवसायाचा विकास झाल्याचे आढळून येते. चैनिच्या गरजा भागविण्याच्या प्रेरणेतून सुद्धा या उद्योगांचा विकास झाल्याने दिसून

येते. मराठ्यांच्या कालखंडात जे उद्योग विकसीत झाले होते या उद्योगाचे पुढील प्रमाणे वर्गिकरण करण्यात आले होते.

१. लोखंड उद्योग

२. ब्रांझ व तांबे उद्योग

३. सोने व चांदी उद्योग

४. दारुगोळा उद्योग

या धातु उद्योगांचा आपण या उद्योगांच्या अनुषंगाने आढावा घेणार आहोत.

१. लोखंड उद्योग: लोखंड उद्योग हा मराठ्यांच्या कालखंडातील अत्यंत महत्वपूर्ण असा उद्योग होता. या उद्योगाच्या उत्पादनातून मानवास अत्यंत उपयुक्त वस्तुंची निर्मिती होत असल्याने या उद्योगास महत्व प्राप्त झाले होते. या उत्पादनातून निर्माण होणाऱ्या वस्तू मानवाच्या दैनंदिन गरजा भागवू शकत होत्या. शेतकऱ्यासाठी आवश्यक असणाऱ्या शेतीच्या अवजार निर्मितीच्या गरजा भागवू शकत होत्या. मराठ्यांच्या युद्ध साहित्य निर्मितीच्या गरजा भागवू शकत होत्या. युद्ध साहित्याचा जर विचार केला तर तलवार, भाले, कट्यार ही युद्ध साहित्य लोखंडापासून त्या काळात मोठ्या प्रमाणात बनविली जात होती. सुरुवातीला या उद्योगाची सुरुवात करणारे शुद्धीकरणात्मक पद्धतीने वस्तु बनवून निर्यात करत होते. शिवढोण येथे उत्तम बंदूका बनविण्याच्या कारखाना मराठ्यांच्या कालखंडात होता. या ठिकाणी आधुनिक पद्धतीची शस्त्रास्त्रे ही निर्माण केली जात होती.

लोखंडउद्योगातून शस्त्रास्त्रान व्यतिरिक्त इतर वस्तूंची निर्मिती केली जात होती. या मध्ये शेतीसाठी लागणारी औजारे, बैलगाड्यांसाठी, रथासाठी लागणारी साहित्य, घरगुती उपयोगासाठी लागणारी साहित्य याचीसुद्धा निर्मिती केली जात होती.

२) ब्रांझ व तांबे उद्योग : मराठा कालखंडातील ब्रांझ व तांबे उद्योग हा महत्वपूर्ण उद्योग मानला जात होता. या उद्योगात स्थानिक लोकांचा सहभाग होता. ब्रांझकाम करणारे व तांबे काम करणारे तांबट असे हे लोक होते. त्यांचे उद्योग वेगवेगळ्या खेड्यांमध्ये पसरले होते. दैनंदिन जीवनात जीवन उपयोगी ज्या वस्तु आवश्यक असत त्या वस्तु हे लोक मराठा कालखंडातील लोकांना पुरवत होते. याही पेक्षा महत्वाचे म्हणजे मराठा कालखंडातील जे सरदार होते ते ब्रांझ व तांबे या धातूपासून बनविलेल्या किंमती वस्तू विकत घेत होते प्रा. गाडगील यांनी या बाबत सामाजिक व आर्थिक माहिती मिळविण्यासाठी सर्वेक्षण केले. त्यांनी या सर्वेच्या माध्यमातून असे स्पष्ट केले की मराठ्यांच्या या कालखंडात असंख्य लोक ब्रांझ व तांब्यापासून बनविलेल्या वस्तू वापरत होते. पेशवेकालखंडात पेशव्यांनी सुद्धा या व्यवसायाला विकसीत अवस्था निर्माण व्हावी म्हणून महत्वपूर्ण मदत केली. मराठा कालखंडातील ब्रांझ उद्योगाच्या प्रसिद्ध कारखाना कल्याण येथे होता. एकंदरीत, जीवन उपयोगी वस्तु व शोभीवंत वस्तु या उद्योगांच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहचत असल्याने या वस्तूना मोठ्या प्रमाणात मागणी होती. परिणामी या कालखंडात या उद्योगाची स्थिती उत्तम होती.

३) सोन व चांदी उद्योग: मराठ्यांच्या कालखंडातील सोने -चांदी उद्योग खेड्यामध्ये विकसीत झाला होता. मात्र पेशव्यांच्या कालखंडात हा उद्योग शहरी भागात विकसीत झाल्याचे दिसते. सोन-चांदी उद्योगामध्ये काम करणारे जे कारगीर होते ते जास्त प्रमाणात संगमनेरला रहात होते

असे पारसनिस यांनी सांगितले आहे. मात्र १८ व्या शतकात ते पुणे शहरात स्थलांतरित झाले. कारण त्यांना वार्षिक उत्पन्न फक्त ५० ते २०० रुपयांपर्यंत मिळत असे. या उत्पन्नात त्यांचा जेमतेम प्रपंच चालत असे.

मात्र हे लोक पुण्याला आल्यानंतर पेशव्यांच्या नियंत्रणाखाली उद्योग चालवू लागले. त्या मुळे हा उद्योग प्रसिद्धीला आला. मराठ्यांच्या उत्कर्षाच्या कालखंडात या उद्योगाचा प्रंचड प्रमाणात विकास झाला. डेकनच्या पश्चिम भागात हा उद्योग नावारुपास आला.

मराठा कालखंडात सोन-चांदी धातुपासुन ज्या वस्तु बनविल्या जात होत्या याची यादी १९७१-७२ च्या कागदपत्रात आहे. या यादीमध्ये या कालखंडात स्त्रि-पुरुषांसाठी जे दागीने बनविले जात असत त्यांची नावे आहेत चैन, कडा, अंगठी, हार, नथनी, बाळी, माळ, कमरपट्टा, बांगड्या अशा नावांचा या यादीत समावेश आहे. या नावाव्यतिरिक्त या काळात प्रसिद्ध असणारा दागीना म्हणजे मंगळसूत्र या दागीन्याचे उत्पादनही या काळात मोठ्या प्रमाणात होत होते.

भावे याचे म्हणणे असे आहे की, "या उद्योगासाठी काम करणाऱ्या कारागिराने आपले कौशल्य टिकवून ठेवल्यामुळे हे लोक या उद्योगासाठी उत्तम अलंकार वेगवेगळ्या प्रतिकात्मक आकारांचा वापर करुन बनवत होते. त्यांच्या या कौशल्यामुळेच या उद्योगाची भरभराट झाली."

सोन-चांदी उद्योगाच्या माध्यमातून केवळ अलंकार बनविले जात होते असे नव्हे तर या उद्योगाच्या माध्यमातून वेगवेगळ्या देव-देवतांच्या सोन्या-चांदीच्या मूर्तीही बनविल्या जात होत्या. आनंदवली येथे रघुनाथराव पेशव्यांची पत्नी आनंदीबाई हिने पार्वती, गणपती, शारदा व इतर देवता या धातुपासून कलावंताकडून बनवून घेतल्या होत्या याची माहिती उपलब्ध होते. या मूर्ती त्यांच्या कौटुंबीक कार्यातील उत्तम प्रकल्प होता असे मानले जाते.

अलंकार व मुर्ती या दोन महत्वपूर्ण वस्तुंच्या निर्मिती व्यतिरिक्त या उद्योगात गुंतलेले लोक सोन-चांदी या धातुपासून निरनिराळ्या प्राणी-पक्षाची चित्रे सुद्धा या धातुपासून बनवू लागले होते.

पेशवेकाळात या व्यवसायाला राजाश्रय मिळाल्याने या व्यवसायाची भरभराट झाली. त्यांना मिळालेल्या सवलती, त्यांच्यावर लादला जाणारा अत्याल्प कर, व त्यांच्या मालाला असणारी मागणी तसेच त्यांना मिळणारे या व्यवसायातून उत्पन्न या सर्व बाबी त्यांच्या फायद्याच्या ठरल्या म्हणूनच या कालखंडात या उद्योगालाला चांगले दिवस लाभले.

४) दारुगोळा उद्योग: मराठा कालखंडातील अत्यंत महत्वपूर्ण उद्योग म्हणजे दारुगोळा उद्योग होय असे मोरलॅंडने म्हटले आहे. मराठ्यांनी या उद्योगाची निर्मिती आपल्या साम्राज्याच्या संरक्षणाच्या गरजेतून केली होती. या कारखान्यातून मराठा साम्राज्याला लागणाऱ्या शस्त्रास्त्रांची, दारुगोळ्यासाठी लागणाऱ्या स्फोटकांची, वेगवेगळ्या प्रकारच्या शस्त्राशस्त्रांच्या आकाराची, रसायन सामुग्रीची निर्मिती केली जात होती.

मराठ्यांच्या सुरुवातीच्या कालखंडाचा जर विचार केला तर दारुगोळ्यासाठी मराठ्यांना युरोपीयनांवर अवलंबून रहावे लागत होते. अनेक प्रसंगी छत्रपती शाहु महाराजांनी ब्रिटिशांच्या मुंबई गव्हरनर जनरर्ल बरोबर या बाबत संपर्क केल्याची माहिती आहे. काही माहितीत कान्होजी आंग्रे यांनी सुद्धा मुंबईच्या त्या काळातील गव्हरनरांना शस्त्रास्त्रे, दारुगोळा याची मागणी केल्याची स्पष्टीकरणे आहेत. म्हणूनच या काळात कॅप्टन विल्यम यांनी पेशव्यांच्या सानिध्यात भेट घेवून या बाबतच्या प्रशिक्षणास आपण मदत करण्याची इच्छा दर्शवीली यातूनच पुण्यात या प्रकारचा कारखाना सुरु झाला. याचा फायदा पुढे मराठ्यांना मोठया प्रमाणात झाला.

पुण्यात इतर अशा प्रकारचे कारखाने नंतर निर्माण झाले. नंतर अशा प्रकारचे कारखाने आंबेगाव, जुन्नर, नागोठणे, कल्याण आणि पुरंदर या ठिकाणी झाले. माधवराव पेशव्यांच्या कालखंडात या उद्योगाचा मोठ्या प्रमाणात विकास झाला. या प्रकारच्या कारखान्यामध्ये अनेक लोक काम करत होते. मात्र याना मासिक अथवा वार्षिक वेतन किती होते याच्या नोंदी नाहीत. मात्र स्त्री कामगार होत्या त्यांना त्यांच्या जास्त कामाबद्दल एक रुपया जास्त दिला जात होता याच्या नोंदी आहेत.

नंतरच्या कालखंडात बंदूका आणि रॉकेट निर्मितीचे कारखाने निर्माण झाले. भागलकोट, व जैनाबाद या ठिकाणच्या कारखान्याना या काळात महत्व आले होते. या कारखान्यांसाठी लागणारा कथील, शिशे व कथील मिश्रीत धातु तसेच लोखंड हा कच्चामाल मुंबईतून आणला जात असे. अशाच प्रकारच्या रॉकेट निर्मितीच्या कारखाना नाशिकमध्ये बाळा खांडेराव यांच्या देखरेखेखाली सुरु झाला होता. या कारखान्यातून प्रत्येक महिन्याला शंभर रॉकेट निर्माण केले जात होते. प्रत्येक रॉकेटची किंमत पाच रुपये होती. मराठ्यांनी या रॉकेटच्या उपयोग युद्धामध्ये केला होता याच्या नोंदी उपलब्ध आहेत.

मराठयांच्या कालखंडातील हा उद्योग सार्वजनिक गरजेपेक्षा साम्राज्य सरंक्षण गरजेच्या दृष्टीकोनातून सुरु झाला होता. सुरुवातीला परकीयांवर अवलंबून राहणे नंतर या उद्योगाच्या आरंभाने स्वतंत्र दारुगोळा निर्मितीच्या अवस्थेतून जाणे व नंतर या उद्योगाला पूर्णत्वाचे स्वरुप प्राप्त होणे असा या उद्योगाचा विकास झाला, मुंबई, पुणे, नाशिक, भागलकोट, जैनाबाद, आंबेगाव, जुन्नर, नागोठणे, कल्याण व पुरंदर या ठिकाणी या उद्योगाचा विकास ही या उद्योगाच्या विकासाची ठिकाणे या उद्योगाचे अस्तित्व व पुरावे सांगतात. संरक्षणात्मक दृष्टीकोन हा या उद्योगाचा उद्देशात्मक भाग म्हणूनच या उद्योगाला त्या कालखंडात महत्व होते.

११.५मराठा कालखंडातील जहाजबांधणी उद्योग

मराठा कालखंडातील एक मोठा शहरी उद्योग म्हणून जहाज बांधणी उद्योगाकडे पाहिले जाते. शिवाजी महाराजांच्या राजवटीत या उद्योगाची सुरुवात झाली. शिवाजी महाराजांनी जेव्हा कल्याण - भिवंडी हा प्रदेश जिंकला तेव्हा पासून त्यांनी या उद्योगाची सुरुवात केली. नंतर त्यांनी या उद्योगाचा विकास व्हावा म्हणून कोकण किनाऱ्यावरील कल्याण-भिवंडी, पनवेल, राजापूर, देवगड, मालवण अशा अनेक बंदरात जहाज बांधणी उद्योग व जहाज दुरुस्ती उद्योग सुरु केले.

जहाज बांधणीसाठी आवश्यक असणारा कच्चा माल म्हणजे सागवाण लाकूड हा लाकूड तेव्हा कोकणात मुबलक प्रमाणात उपलब्ध होता. याचा फायदा शिवाजी महाराजांनी या उद्योगासाठी करुन घेतला. या उद्योगासाठी कारागीरांची गरज होती. शिवाजी महाराजांनी या उद्योगासाठी स्थानिक कारागिरांना संधी दिली. परिणामी या उद्योगासाठी मोठ्या प्रमाणात कारागीर उपलब्ध झाले. काही महत्वाच्या कारगीरांची गरज होती. परिणामी या कामी शिवाजी महाराजांनी पोर्तुगीज कारागीरांना संधी देवून ही गरज भागविली. पोर्तुगीज कारागीर शिवाजी महाराजांच्या पदरी होते याची माहिती उपलब्ध आहे.

एस. एन. सेन यांनी असे मत व्यक्त केले आहे की, शिवाजी महराजांनी आपल्या कारकिर्दीत वेगवेगळ्या प्रकारचे चारशे जहाजे आपल्या सभोवताली आरमार संरक्षणासाठी उभी केली होती.

आगसकर यांनीही असे म्हटले आहे की, पेशवेकाळात कल्याण, भिंवडी ही जहाज उद्योगाची मुख्य केंद्र होती. ठाणे, अलिबाग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग व मालवण ही केंद्र सुद्धा त्या काळात प्रचलीत होती व नावारुपाला आली होती. मराठ्यांनी जहाज बांधणी उद्योगात नावलौकिक

मिळविले होते. मराठ्यांच्या जहाजबांधणी उद्योगाच्या यशाचे श्रेय त्यांनी या उद्योगासाठी अवलंबीलेल्या कौशल्याला जाते. मुंबई येथील पारशी लोकांनीही या उद्योगात भाव कमावला होता. आपटे यांचे म्हणने असे आहे, की मराठा कालखंडात पारसी व वाडीया कुटुंबीयांनी जहाज बांधणी उद्योगात सर्वोच्य प्रगती केली होती. पोतदार यांचे म्हणने असे आहे की या उद्योगात पारसी लोकांचा जास्त सहभाग होता. ते सुरतहून मुंबईला आले होते. या लोकानी मराठ्यांच्या नेतृत्वाने या उद्योगाला उत्कर्षाची दिशा दिली.

मराठ्यांच्या कोकण किनारपट्टी साम्राज्यांच्या संरक्षणाच्या दृष्टीकोनातून या उद्योगाचा विकास होणे गरजेचे होते. शिवाजी महाराजांनी या उद्योगाचा खऱ्या अर्थाने आरंभ केला त्याचा फायदा पुढे मराठा कालखंडातील इतर सत्ताधीशांना झाला. साम्राज्य संरक्षणाच्या दृष्टीने या उद्योगाला महत्त्व होते. म्हणूनच या कालखंडात या उद्योगाला चालना मिळाली. राजकर्त्यांचा दृष्टीकोन कारागीरांचे कौशल्य व या उद्योगाला मिळालेला राजाश्रय यामुळे हा उद्योग प्रतिष्ठीत ठरला.

११.६मराठ्यांच्या कालखंडातील इतर उद्योग

मराठा कालखंडात कापडउद्योग हा प्रमुख उद्योग मानला जात होता. कापडउद्योगा व्यतिरिक्त या कालखंडात नावारुपाला आलेले उद्योग म्हणजे धातु उद्योग व जहाज उद्योग होय. या दोन उद्योगा व्यतिरिक्त या कालखंडात इतर उद्योगांचासुद्धा विकास झाला होता. या इतर उद्योगाबद्दलची माहिती या ठिकाणी नमुद करण्यात आली आहे.

१) लाकूडकाम उद्योग: हा उद्योग मराठ्यांच्या कालखंडातील इतर उद्योगांपैकी एक उद्योग होता. घरकामासाठी लागणारा लाकूड, वहानांसाठी लागणारा लाकूड, कोरीवकामासाठी लागणारा लाकूड या उद्योगाच्या मदतीने पुरवीला जात असे. इमारतीसाठी लाकडाची गरज लागत असे मात्र या बाबत पुरावे उपलब्ध नाहीत. मात्र घरे बांधण्यासाठी लाकूड हे निश्चित लागत होते हे सत्य आहे. त्यामुळेच या कामासाठी लागणाऱ्या लाकडाची गरज स्थानिक उद्योगामार्फत भागवीली जात असे. सर्वसाधारण या कालखंडात इमारतीसाठी लागणारे लाकूड वसईमध्ये तयार होत असे. या उद्योगामध्ये घरासाठी लागणाऱ्या लांब तुळ्या, खांब, छपरांच्या वाश्यासाठी लांब सरसोट, जाड तुकडे, माळवदासाठी कड्या तयार केल्या जात होत्या. कल्याण, भिवंडी व जव्हार या ठिकाणी सुद्धा या उद्योगासाठी लागणारा लाकूड उपलब्ध होत होता. शनीवार वाड्यासाठी वापरलेला लाकूड हे या उद्योगाचे लाकूड वापराचे उत्तम उदाहरण आहे. शिंदे, होळकर, घोरपडे यांनी सुद्धा आपल्या या उद्योगातून वस्तु वापरल्याची माहिती आहे. या उद्योगातून जहाज बांधणीसाठी सुद्धा लाकूड पुरवला जात होता. तसेच नित्योपयोगी घरगुती वापरासाठी या लाकूड उद्योगापासून वस्तु तयार केल्या जात होत्या.

२) सिंगापासून वस्तु बनविण्याचा उद्योग: हा मराठ्यांच्या कालखंडातील एक वेगळ्या प्रकारचा उद्योग होता. वेगवेगळ्या प्राण्यांच्या सिंगापासून या उद्योगाच्या माध्यमातून वस्तु बनविल्या जात होत्या. या प्रकारच्या वस्तु बनविण्यासाठी या कालखंडात मालवण, राजापूर, विजयदुर्ग ही ठिकाणे प्रसिद्ध होती. या उद्योगातून जास्त प्रमाणात कलात्मक नित्योपयोगी वस्तु बनविल्या जात होत्या. फण्या, कप, वेगवेगळ्या प्रतिकात्मक प्रतिमा, दौत स्टॅन्ड, खोके, सापाचे आकार, प्राण्यांचे आकार या प्रकारच्या वस्तुंचा समावेश या वस्तुमध्ये असे. मराठा कालखंडात या उद्योगाला महत्व प्राप्त झाले होते.

३) हस्तीदंत उद्योग: मराठ्यांच्या कालखंडात आनखीन एक विकसीत झालेला उद्योग म्हणजे हस्तीदंत उद्योग होय. हा उद्योग सर्वप्रथम पुण्यात स्थापन झाला व विकसीत झाला. अदितराव पालकर यांनी हा उद्योग स्थापन केला होता. या उद्योगाला तेव्हा या कालखंडात प्रसिद्धी मिळाली. म्हणून आबाजी आवा यांनी पुण्यात या प्रकारचा दुसरा उद्योग सुरु केला. या उद्योगाला लागणारा कच्चा माल मुंबईतून आणला जात होता. मात्र या बाबतची माहिती उपलब्ध नाही. तसेच या उद्योगामध्ये किती लोक काम करत होते याची माहितीसुद्धा उपलब्ध नाही.

४) चर्म उद्योग: मराठा कालखंडातील हा एक परंपरागत उद्योग होता. त्या कालखंडातील चर्मकार व्यक्तीगत पातळीवर या उद्योगात गुंतले होते असे जरी असले तरी या उद्योगावर मराठा सत्ताधिशांचे नियंत्रण होते. त्याकालखंडातील हा उद्योग हस्तोधोत्रामध्ये मोडत होता. या उद्योगातून बुट, चप्पल, चांबड्याच्या पिशव्या निर्माण केल्या जात होत्या. तसेच या उद्योगातून चांबड्याच्या वेगवेगळ्या प्रकारच्या वस्तु बनविल्या जात होत्या. या उद्योगातून बनविलेल्या वस्तुंना मागणी मोठ्या प्रमाणात असल्याने या उद्योगाला त्या कालखंडात प्रसिद्धी मिळाली होती.

५) दोरखंड उद्योग: मराठा कालखंडातील शेतीशी संबधीत हा जोडउद्योग होता. खेडयामधील विशिष्ट जमात या उद्योगामध्ये गुंतली होती. शेतीस पुरक वस्तु या उद्योगाच्या माध्यमातून निर्माण केल्या जात होत्या. घोडे, बैल यांना नियंत्रणात ठेवण्यासाठी तसेच इतर प्राण्यांना बांधण्यासाठी आवश्यक असणाऱ्या दोरखंडाची निर्मिती या उद्योगातून केली जात होती. या उद्योगासाठी आवश्यक असणारा कच्चा माल ताग, अंबाडी व नारळांच्या झाडापासून मिळवीला जात होता. गरजेनुसार वस्तु बनवीने व आवश्यक असेल तेवढेच उत्पादन घेणे हे या उद्योगाचे सुत्र होते. या उद्योगावर सुद्धा मराठा सत्ताधीशांचे नियंत्रण होते. इतर उद्योगांप्रमाणे या उद्योगावर सुद्धा शासकीय कर आकारला जात होता.

६) गुळ उद्योग: मराठा कालखंडातील एक शेती व्यवसायाशी संबधीत असणारा ग्रामीण उद्योग म्हणून गुळ उद्योगाकडे पाहिले जात होते. ऊस हा या उद्योगासाठी कच्चा माल असे. त्या कालखंडात देशावर पश्चिम महाराष्ट्रात या उद्योगाचा मोठ्या प्रमाणात विकास झाला होता. सांगली, कोल्हापूर, सातारा, पुणे, सोलापूर व अहमदनगर ही ठिकाणे या कालखंडात या उद्योगासाठी नावारुपाल आली होती. या उद्योगाचे उत्पादन सर्वसामान्य लोकांच्या नित्योपयोगी वापराचे असल्याने या उद्योगाला महत्व प्राप्त झाले होते. इतर उद्योगाप्रमाणे या उद्योगावर सुद्धा शासकीय कर आकारला जात होता.

७) तेल गिरण्या: मराठा कालखंडातील जीवन उपयोग वस्तुंचे उत्पादन करणारा हा एक महत्वपूर्ण उद्योग होता. या उत्पादनात गुंतलेल्या लोकांना तेली असे म्हटले जात होते. हे लोक भुईमुग, तीळ, नारळ, सुर्यफुल या पासून तेल उत्पादन करत होते. मराठ्यांच्या कालखंडात तेल उत्पादनासाठी सोलापूर, बारशी, जुन्नर आणि पुणे ही ठिकाणे प्रसिद्ध होती. मराठा कालखंडातील शिवकाळ व पेशवेकाळात या तेल गिरणी उद्योगाचा विकास झाला होता या कालखंडात या उद्योगाला राजाश्रय होता. तेल उद्योगाचे जे विभाग होते त्या विभागाना प्रतिवर्षी शासनाला पाच ते सात रुपये कर भरावा लागत होता. या कालखंडात तेल उत्पादनासाठी आवश्यक असणाऱ्या कच्च्या मालाची उपलब्धता अनेक प्रकारची असल्याने वेगवेगळ्या प्रकारच्या तेलाची निर्मिती केली जात होती. तेल उद्योगासाठी मशीन व बैल यांचा वापर केला जात असे मशीन लाकडी असे. उत्पादनासाठी मेहनत व श्रम करावे लागत असत.

८) मासेमारी : हा मराठा कालखंडातील कोळी लोकांचा जुना व परंपरागत उद्योग होता. मात्र महाराष्ट्रातील या उद्योगाचे स्वरुप किरकोळ होते. मुख्यत्वेकरुन महाराष्ट्रातील कोकण विभागात या उद्योगाची भरभराट झाली होती. या कालखंडात भिवंडी, कसबा मच्छीमारीसाठी प्रसिद्ध होता. या कसब्यात मच्छीमारीसाठी सात तळी निर्माण करण्यात आली होती. त्या कालखंडात कल्याण, रोहे, अष्टमी, पेण, पनवेल, नागोठणे ही बंदरे मच्छीमारीसाठी प्रसिद्ध होती. या ठिकाणी ताजे मासे उपलब्ध होत असत. या व्यतिरिक्त या ठिकाणी सुके मासे प्रक्रिया करुन बनविले जात असत. तसेच हे मासे महाराष्ट्रात सर्वत्र विक्रीसाठी पाठविले जात असत. या उद्योगाचा मुख्य उद्देश मासे मिळविणे व या माशांची विक्री करुन आर्थिक लाभ मिळविणे हा होता. मासे मिळविण्यासाठी या कालखंडात कोळी लोक गळ व जाळे यांचा वापर करत असत. तसेच मच्छीमारी ही तळे व समुद्रामध्ये करत असत. जहाज, मचवे, होडी, बोटी या साधनांचा वापर मच्छीमारी करण्यासाठी करत होते.

९) मीठ उद्योग: मराठा कालखंडात मीठ उद्योगाचा विकास कोकणात झाला होता. ठाणे व तेव्हाच्या कुलाबा व आताच्या रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात मिठाचे उत्पादन घेतले जात होते. पेण, पनवेल, नागोठणे, रेवदंडा व ठाणे ही मीठ उत्पादनांची प्रमुख केंद्रे होती. शिवकालखंडात मीठ उद्योग हा या ठिकाणच्या लोकांचा दुय्यम धंदा होता. शेतीतून मिळणाऱ्या उत्पादनाचे काम थांबल्या नंतर हे लोक मिठाच्या उद्योगकडे वळत असत "English records on Shivaji" मधील संदर्भानुसार शिवकाळात तळ कोकणातून देशाच्या सर्व भागात मीठाच्या व्यापार चालत असे. तसेच या कालखंडात परदेशातसुद्धा मीठ निर्यात केला जात असे.

या कालखंडात पोर्तुगीज प्रदेशातून येणारे मीठ हे या व्यावसायिकांना त्रासदायक ठरत होते. या मीठा बरोबर या प्रेशातील स्थानिक व्यावसायिकांना स्पर्धा करावी लागत होती. या कडे शिवाजी महाराजांनी तेव्हा जातीने लक्ष घालून पोर्तुगीज भागातून येणाऱ्या मीठावर जबरदस्त कर आकारण्यास सुरुवात केली. याचा फायदा दुहेरी स्वरुपाचा झाला. एक म्हणजे स्थानिक मिठ उद्योग वाचला व दुसरा म्हणजे परकीय मिठ आयातीला आळा बसला. त्यामुळे या कालखंडातील मीठ उद्योग तर स्थिर झालाच पण त्या पेक्षा महत्वाचे म्हणजे या उद्योगाचा विकास होण्यास पुरक वातावरणही निर्माण झाले.

पेशवेकालखंडात मिठ उद्योग व मिठाचे उत्पादन सुरुच होते. कोकणातील पेण, पनवेल, नागोठणे, रेवदंडा तसेच ठाणे ही मीठ उत्पादन केंद्रे सुरुच होती पेशवेकाळात चौक प्रांतातील नागोठणे तर्फे येथील मीठागरावर १% या प्रमाणे कर घेण्याचे आदेश पेशव्याने दिल्याचा संदर्भ आहे. आप्टी प्रांतातील घोडाबंदर तर्फे मधील भायंदर नावाच्या खेड्यातील मीठाचे उत्पादन कृष्णाजी रघुनाथ याला ५ वर्ष मुदतीसाठू मक्तेदारीने दिल्याचा संदर्भ आहे. या मोबदल्यात त्यांनी सरकारला सातशे खंडी मिठ देण्याचे ठरले होते. वसई प्रांतातील माहिम परगण्यातील वेळावे नावाच्या खेड्यातील मीठाचे उत्पादन करण्याचा अधिकार दादाजी अण्णाजी खोत याला तीन वर्षाच्या मुदतीसाठी १९५० रुपयाच्या मक्तेदारीने देण्यात आला होता. १७४६ मध्ये साष्टी प्रांताच्या सुभेदाराच्या परवानगीने नवी मिठागरे सुरु केली. या मिठागरांना धुळ्या, नवखार, अगकळी, सातोतान अशी नावे देण्यात आली. अशा पद्धतीने पेशवेकाळात ठराविक काळासाठी मालकी अथवा मक्तेदारी देऊन या उद्योगाच्या विकासासाठी पुरक वातावरण निर्माण करण्यात आले. परिणामी या कालखंडात या उद्योगाचा विकास होण्यास मदत झाली. पेशवेकाळातील संदर्भ माहिती आजही उपलब्ध आहे.

१०) मद्य उद्योग: मद्य उद्योग हा मराठ्यांचा कालखंडातील जुना उद्योग होता. हा उद्योग तेव्हा मराठ्यांच्या शासनाच्या अनुमतीने सुरु केला जात असे. या उद्योगात भंडारी व कोळी लोकांच्या जास्त सहभाग असे. ऊस, द्राक्ष, नारळ, गुळ या पासून हे मद्य बनविले जात होते. या उद्योगाला परवाना जरी असला तरी या उद्योगावर वेगळा कर आकारला जात होता. प्रतिवर्षी प्रत्येक विभागावर एक रुपया कर आकारला जात होता. मात्र या उद्योगाबाबत लिखीत स्वरुपात जास्त प्रमाणात माहिती उपलब्ध नाही.

११) कागद उद्योग: मराठा कालखंडातील कागद उद्योग हा एक महत्वपूर्ण उद्योग होता. कागद बनविण्यासाठी कच्चा माल म्हणून बांबुच्या लगद्याच्या वापर केला जात होता. मात्र या लगद्यापासून बनविलेला कागद हा पिवळसर असे. जर पांढऱ्या कागदाची गरज लागली तर तो मोगली प्रदेशातून आयात करावा लागत असे. मराठ्यांच्या कालखंडात जुन्नर, औरंगाबाद व इतर ठिकाणी कागदाचे उत्पादन करणारी केंद्रे होती. पुढे जुन्नर येथील केंद्रांचे पुण्यात स्थलांतर करण्यात आले. मराठा कालखंडातील या उद्योगाचे स्वरुप लघु उद्योग व कुटीरोद्योग स्वरुपाचे होते.

१२) साखर उद्योग: साखर उद्योग हा मराठ्यांच्या कालखंडातील नावारुपाल आलेला उद्योग होता. साखर उद्योगासाठी ऊसाचा वापर कच्चामाल म्हणून करण्यात येत असे. साखरेचे उत्पादन या कालखंडात पश्चिम महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात घेतले जात होते. सांगली, सातारा, कोल्हापुर ही त्या काळातील प्रमुख साखर उद्योग केंद्रे होती. त्याच बरोबर सोलापूर, अहमदनगर, पुणे या ठिकाणी सुद्धा साखरेचे उत्पादन घेतले जात होते. त्या काळात साखरेचे तीन प्रकार होते. पांढरी साखर, खडी साखर व तपकिरी किंवा पिवळी साखर. या पैकी पांढरी साखर या काळात श्रीमंत लोक वापरत असत तर गरीब लोक साखरे ऐवजी गुळाचा वापर करत असत. दैनंदिन जीवनात या उत्पादनाचा वापर नित्योपयोग होत असल्याने या उत्पादनाला चांगली मागणी होती परिणामी या उद्योगाचा या काळात विकास झाला होता.

१३) काच उद्योग: काच उद्योग हा महाराष्ट्रातील परंपरागत उद्योग होता. हिंदुस्थानामध्ये सुद्धा हा उद्योग पुरातन काळापासून सुरु होता. मराठा कालखंडात हा उद्योग प्रचलीत होता. याची साक्ष काचेपासून बनविलेल्या बांगड्या देतात. या कालखंडात विविध प्रकारच्या बांगड्या बनल्या जात होत्या. पुणे, सासवड, व जालना या ठिकाणी बांगड्या बनविण्याची केंद्रे होती. या उद्योगात कासार जातसमुहाचा सहभाग जास्त प्रमाणात होता. बांगड्या व्यतिरिक्त काचेपासून आरसे बनविण्याचे उद्योग सुरु होते. परंतु पेशव्याच्या उत्तरार्धाच्या कालखंडात या उद्योगाला उतरती कळा लागली कारण खुद्द पेशव्याने काचेची पंचरंगी भिंगे, मुंबई, गोवा येथील बंदरातून विकत घेतल्याचे संदर्भ आहेत, असे जरी असले तरी या कालखंडात हा उद्योग प्रचलीत होता हे सत्य आहे.

१४) कुलुप उद्योग: मराठा कालखंडात कुलूप उद्योग प्रचलीत होता. मात्र या उद्योगाच्या माध्यमातून जी कुलूपे तयार केली जात होती त्यांचे आकार ओबडधोबड होते. परिणामी अशा कुलूपांना शाही राजवटीत कमी मागणी होती. उलट मराठ्यांच्या पेशवे कालखंडात पेशव्यानी सुबक व मजबूत कुलूपे इंग्रजाकडून घेतल्याचा उल्लेख पेशवे दप्तरात आढळतो. असे जरी असले तरी या कालखंडात लोखंड, पोलाद, तांबे या धातुपासून कुलूपे बनविली जात होती. संरक्षणाच्या दृष्टीकोनातून या उत्पादनामध्ये उपयुक्तता असल्याने हा उद्योग या कालखंडात सुरु होता. मात्र या उद्योगाचे स्वरुप हे लहान होते तसेच या उद्योगामध्ये सहभागी होणाऱ्या लोकांचे प्रमाणही कमी

होते. मराठा कालखंडात वेगवेगळ्या प्रदेशात गरजेनुसार या उद्योगाचा विकास झाला होता. मात्र या बाबत लिखित स्वरुपात माहिती उपलब्ध नाही.

१५) ग्रामीण उद्योग: मराठा कालखंडातील ग्रामीण उद्योगांचा विचार करत असताना या कालखंडातील ग्रामीण लोकांचा मुख्य उद्योग शेती हा होता. या उद्योगाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील खेडी स्वयंपूर्ण झाली होती. परिणामी शेतीला या कालखंडात महत्व होते. या शेतीच्या अनुषंगाने खेड्यात अनेक उद्योग चालत असत. खेड्यात रोजच्या गरजा भागविणारे कारगीर असत. हे कारगीर गावात रहावेत, त्यांनी गाव सोडून जावू नये. म्हणून त्यांच्या रोजी रोटीची काळजी गावकरी व शासन घेत असे. या कारागीराना सरकारकडून जमीनी काही वेळा सरकारकडून देण्यात येत असत.

परमानंदाने शिवकाळातील कारागीर व त्यांच्या उद्योगांची माहिती आपल्या ग्रंथात दिली आहे. त्या ग्रंथातील माहितीच्या आधारे १७ व्या शतकातील खेड्यातील उद्योग धंद्यांची कल्पना येत परमानंदाने उल्लेख केल्याप्रमाणे शिवकाळात खेड्यात सोनार, लोहार, तांब्याची भांडी तयार करणारे तांबट, सुतार, चांभार, कुंभार, विणकरी तिरकामठे बनविणारे, दोरखंडे वळणारे मांग, तेली, घोंगडी विणणारे धनगर कळकाच्या बांबुपासून वस्तु तयार करणारे बुरुड किंवा कोमती, शिंपी, न्हावी, परीट, माळी, कोळी, गंवडी, रंगारी असे नाना उद्योग करणारे कारागीर कारागीरी करुन आपली उपजिविका भागवत होते.

याशिवाय काही धंदेवाईक, गायक, क्वदक, पखवाजवादक, पवेकरी, टाळकरी, विणकर आपापल्या कलेवर पोट भरत होते. तांबोळी पाने-सुपारी विकण्याचा धंदा करत असत. दारु काढणारे व विकणारे, बांगड्यांचा धंदा करणारे कासार, मुर्ती तयार करणारे मूर्तीकार असे हे असंख्य लोक आपली उपजिवीक भागविण्यासाठी खेड्यात उद्योग करत होते. हस्त व्यवसाय करुन पोट भरत होते. यातील कुशल कारागिर आपण बनविलेल्या वस्तु आठवडा बाजारात विकायला आणत होते. खेड्यातील हे उद्योग जातीवर आधारीत असत. जातीचा उद्योग सोडून सहजासहजी दुसऱ्या जातीचा उद्योग करत नव्हते. त्यामुळेच प्रत्येक जातीच्या उद्योगाला सुरक्षीतता लाभली होती. गावात या लोकांना मुबलक उत्पन्न मिळत असल्याने हे लोक आपल्या धंद्यामध्ये समाधानी होते. या सर्व धंद्यापैकी सोनारांचा धंदा तेजीत चालत होता १७ व्या शतकात सोनार श्रीमंत बनले होते असे परमांनदांचे म्हणणे आहे. या कालखंडात ते सुंदर, सुबक व निरनिराळ्या कला कुसरीचे दागिने ते बनवत होते. फ्रेंच प्रवासी बर्निअर यानी सोनारांच्या या कलाकुसरीचे कौतूक केले आहे.

खेड्यातील हे हस्त उद्योग शिवकाळ व पेशवेकाळात अविरत सुरु होते. मात्र १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात या उद्योगाना पर्याय निर्माण झाल्याने व परकीयांच्या स्पर्धेत हे उद्योग न टिकल्याने या उद्योगाचा हळूहळू ऱ्हास झाल्याचे दिसते.

आपली प्रगती तपासा :

१) मराठा कालखंडातिल उद्योगांचे स्वरुप समजून घ्या.

२) मराठा कालखंडातील कापडउद्योगाचे स्वरुप जाणून घ्या.

३) मराठा कालखंडातील रंगकाम व्यवसायाची माहिती जाणून घ्या.

४) मराठा कालखंडातील लोखंड व्यवसायाची माहिती जाणून घ्या.

५) मराठा कालखंडातील ब्रांझ व तांबे उद्योगाची माहिती जाणून घ्या.

६) मराठा कालखंडातील सोने व चांदी उद्योगाची माहिती जाणून घ्या.

७) मराठा कालखंडातील जहाज बांधणी उद्योगाची माहिती जाणून घ्या.

८) मराठा कालखंडातील इतर उद्योगांची माहिती जाणून घ्या.

९) मराठा कालखंडातील ग्रामीण उद्योगांची माहिती जाणून घ्या.

१०) मराठा कालखंडातील गरजेतून निर्माण झालेले राज उद्योग कोणते ते जाणून घ्या.

११.७ मराठा कालखंडातील औद्योगिक व व्यापारी केंद्रे :

मराठा कालखंडातील औद्योगिक व व्यापारी केंद्रांचा विचार करत असतांना आपण 'शिवकाळ' व 'पेशवेकाळातील' औद्योगिक व व्यापारी केंद्रांचा विचार करणार आहोत. सर्वप्रथम आपण शिवकाळातील औद्योगिक व व्यापारी केंद्रांची माहिती जाणून घेऊ व तद्नंतर पेशवेकाळातील औद्योगिक व व्यापारी केंद्रांचा विचार करु.

११.७.१ शिवकाळातील औद्योगिक व व्यापारी केंद्रे :

शिवकाळातील औद्योगिक व व्यापारी केंद्राचे दोन भागामध्ये विभाजन किनाऱ्यावरील औद्योगिक व व्यापारी केंद्रे तर दुसरा भाग म्हणजे अंतर्गत व्यापारी केंद्रे या दोन्ही भागांची सर्वप्रथम आपण सविस्तर माहिती पाहणार आहोत.

अ) समुद्र किनाऱ्यावरील औद्योगिक व व्यापारी केंद्रे :

मध्ययुगीन कालखंडात मराठ्यांनी महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर आपले साम्राज्य प्रस्थापित केले होते. पण मराठ्यांच्या सत्तेपूर्वी महाराष्ट्र मुस्लिमांच्या वर्चस्वाखाली होता. मुस्लिमांचे वर्चस्व नष्ट करुन मराठ्यांने जेव्हा महाराष्ट्र आपल्या ताब्यात घेतला त्या काळात महाराष्ट्राचा अविभाज्य भाग म्हणून ओळखला जाणारा कोकण प्रादेशिक व्यापाराच्या दृष्टीकोनातून भरभराटीला आला होता. इंग्लिश फॅक्टरी रेकॉर्डच्या नोंदीमध्ये या काळातील कोकणातील चौळ, दाभोळ, कल्याण, भिवंडी, वेंगुर्ला, पेण, डहाणू, तारापूर, केळवा-माहिम, आगाशी, वसई, वांद्रा, माहिम, नागोठणे, श्रीवर्धन, जैतपूर आणि खारीपाटण या बंदरांची नावे आहेत. या पैकी आगासी, वसई, वांद्रा, माहिम व श्रीवर्धन ही बंदरे शिवाजी महाराजांच्या ताब्यात नव्हती. अशी ही व्यापारी बंदरे पुढील प्रमाणे आहेत.

१) चौल :

मराठा कालखंडातील शिवाजी महाराजांच्या ताब्यात असणारे चौल हे बंदर एक महत्त्वपूर्ण बंदर असून हे बंदर व्यापारीदृष्ट्या भरभराटीला आले होते. हे बंदर तत्कालीन कुलाबा जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यात येत होते. या बंदरात डिसेंबर ते मार्च या महिन्यात अत्यंत जलद व्यापार होत होता. या बंदरात मलबार येथून जहाजे येत असत. या जहाजातून मसाले, सुपारी, नारळ, औषधे, ताडगुळ, मेण, पारा, हिंगुळ, तांबे आणले जात असे येथून ही जहाजे खंबायतला व गुजरातला कापड, गहू, धान्य, तलम, मलमल नेत असत, काही प्रमाणात सुती कापडही नेत असत. काही व्यापारी येथून विणलेले कापड व मलमल अश्वस्थानाला नेत असत. इराणमध्येही या प्रकारचा काही माल नेला जात असे.

चौल या बंदराला डॉ. फ्रायर या इंग्रज प्रवाशाने सन १६७२ ते १६७५ या दरम्यान भेट दिली होती. तो चौल बंदराचे वर्णन करताना म्हणतो की दक्षिणेकडून येणाऱ्या मालाची ही एक उत्कृष्ट बाजारपेठ होती. मात्र शिवाजी महाराज व मोगल यांच्यामधील संघर्षाने या वसाहतीची पूर्णपणे वाताहत झाली होती. तथापि, इंग्लंड फॅक्टरी रेकॉर्डच्या संदर्भानुसार असे दिसते की सन १६७४ च्या दरम्यान काही अपघाताने अचानक लागलेल्या आगीमुळे जवळजवळ ३००० घेर जळून भस्मसात झाल्याने चौलमधील रहिवासी व व्यापारी यांनी मुंबई बंदरात आश्रय घेतला होता.

२) दाभोळ :

मराठा कालखंडातील मराठ्यांच्या ताब्यात असणारे दुसरे महत्त्वपूर्ण बंदर म्हणजे दाभोळ होय. हे बंदर वसिष्ठी नदीच्या मुखाच्या उत्तर किनाऱ्यावर वसलेले होते. मध्ययुगीन कालखंडात व्यापारी दृष्टीकोनातून भरभराटीला आलेले हे बंदर होते. या बंदराचे पूर्व आफ्रिका, अरबस्थान व इराण या देशांबरोबर व्यापारी संबंध होते. दाभोळ बंदराला मक्का, एडन येथून येणारी अनेक जहाजे भेट देत असत. तसेच खंबायत, दीव व मलबार येथूनही तांबे, पारा व हिंगुळाचा लाल रंग यांनी भरलेली जहाजे येत असत. या वस्तू देशांतर्गत भागामध्ये विक्री व वितरणासाठी पाठविण्यात येत असत. देशांतर्गत भागामधून बरेचसे कापड, गहू, धान्य व डाळी या वस्तू नदीवाटे बंदरात येत असत. व तेथून पुढे विविध देशांना निर्यात केल्या जात असत.

"English Record on Shivaji" या विल्यम फॉस्टर लिखित संदर्भानुसार १६६२ मध्ये दाभोळ बंदर शिवाजी महाराजांच्या अंमलाखाली आले. आणि शिवाजी महाराजांची व्यापारी जहाजे दाभोळ ते मुंबई दरम्यानच्या सागरामध्ये व्यापाराच्या निमित्ताने संचार करु लागली. दाभोळहून ईस्ट इंडिया कंपनीला मिरे, लाख आणि सुरतेपेक्षा कमी भावात जाडेभरडे कापड या वस्तू विकल्या जात असत. दाभोळचा मलबार हा खंबायत बरोबर सुद्धा व्यापार चालत असे.

३) कल्याण :

मराठा कालखंडातील मराठ्यांच्या ताब्यात असणारे १७ व्या शतकातील आणखीन एक महत्त्वपूर्ण बंदर म्हणजे कल्याण बंदर होय. हे बंदर अत्यंत महत्त्वपूर्ण होतं असा संदर्भ, "English Record on Shivaji" च्या पा. नं. २७७ मध्ये आहे. या बंदरात हिंदुस्थानच्या सर्व भागातून, तसेच गोवळकोंडा, व कोरमंडळे या प्रदेशातून व्यापारी माल येत असे. डॉ. फ्रायर हा इंग्रजी प्रवासी म्हणतो की, मुंबईमार्गे शिवाजीसारख्या बंडखोराच्या प्रदेशात प्रवेश करण्याचे कल्याण हे प्रवेशद्वार होते.

४) भिवंडी :

कल्याणप्रमाणेच भिवंडी हे सुद्धा मराठ्यांच्या ताब्यात असणारे १७ व्या शतकातील महत्त्वपूर्ण बंदर होते. हे बंदर कल्याण बंदरालाच लागून होते. या बंदरात विणकाम उद्योग जोरात चालत असे. "English Factory Records" मधील संदर्भानुसार, मुंबईकर इंग्रजांनी भिवंडी येथील विणकरांना मुंबईला आपला उद्योग आणण्याची विनंती केली होती. मात्र भिवंडी येथील विणकरांची यास विरोध केला होता. मात्र विणलेले भरपूर कापड पुरविण्याचे त्यांनी इंग्रजांना आश्वासन दिले होते.

"English Record on Shivaji" या ग्रंथातील संदर्भानुसार कल्याण व भिवंडीच्या परिसरात जहाजांना व इमारतींना लागणारे लाकूड मोठ्या प्रमाणात मिळत असे. इंग्रज लोकांनी या लाकडाला 'ओक' असे नाव दिले होते. मुंबईकर इंग्रजांना जहाजबांधणीकरिता लाकडाची मोठ्या प्रमाणात गरज भासत असे. अशी लाकडे स्वस्तात याठिकाणी मिळत असत तसेच कल्याण-भिवंडी शिवाय अशी लाकडे कोठेही मिळत नसत. तोफा वाहून नेण्यासाठीही इंग्रजांना अशा प्रकारच्या लाकडाची गरज भासत असे. मात्र या प्रदेशांमधील मालकी संबंधात मोगल व मराठे यांच्यात सतत संघर्ष सुरु होता. त्यामुळे इंग्रजांना अशा प्रकारची लाकडे मिळवितांना अनेक अडचणी निर्माण होत होत्या.

सन १६७० मध्ये मराठ्यांने मोगलांकडून कल्याण व भिवंडी जिंकून घेऊन १६७० च्या दरम्यान आपला पूर्ण अमल बसविला कल्याण भिवंडीच्या परिसरातील लाकडाची भरपूर उपलब्धता पाहून शिवाजी महाराजांनी तेथे जहाज बांधणीचा उद्योग सुरु केला. सभासद बखरकार म्हणतो की, कल्याण भिवंडी येथे शिवाजी महाराज गुराबा, गलबत, सिबार, तरांडे, तारु व पगार अशी सहा प्रकारची जहाजे बांधत असत. शिवाजी महाराजांनी आरमार बांधणीचे महत्त्व लक्षात घेऊन अशा प्रकारचा उद्योग कल्याण-भिवंडी परिसरात सुरु केला होता.

५) राजापूर :

मराठा कालखंडातील राजापूर हे रत्नागिरी जिल्ह्यातील एक महत्त्वपूर्ण बंदर होते, या काळात या बंदराला व्यापारी दृष्टीकोनातून महत्त्व प्राप्त झाले होते. सन १६६० मध्ये हेन्री रिव्हिंगस्टन यांच्या नेतृत्त्वाखाली इंग्रजांनी विजापूरच्या अदिलशाहीच्या परवानगीने इंग्रजांनी राजापूर येथे आपली वखार स्थापन केली. १६८८ च्या दरम्यान फ्रेंचानीही तेथे वखार उभारली. शिवाजी महाराजांनी या दोन्ही परकीय व्यापाऱ्यांना तेथे व्यापार करण्याचे स्वातंत्र्य दिले होते. फ्रेंच व्यापारी तेथे लोखंड व शिसे यांचा व्यापार करीत असत. याशिवाय राजापूर येथे मूरलोक, हिंदू व इतर परकीय लोकही व्यापाराच्या निमित्ताने येऊन राहिले होते.

राजापूर बंदरातून मिरे, वेलदोडे, सुती कापड, सोरा व सुती धागा, मीठ, कागद यांचा व्यापार चालत असे. फ्रेंच प्रवासी अबेकॅर म्हणतो की, "राजापूरमध्ये असे अनेक श्रीमंत व्यापारी होते की ज्यांची मालवाहु जहाजे तांबडा समुद्र व इराण (पर्शिया) मधील वसरा या ठिकाणी जात असे तसेच या बंदरातून सर्व हिंदूस्थानात मालाचा पुरवठा होत असे."

मराठा कालखंडात जेव्हा राजापूर शिवाजी महाराजांच्या ताब्यात आले त्यावेळी शिवाजी महाराजांनी तेथील इंग्रजांची वखार लुटली. या वखारीच्या भरपाईबद्दलची बोलणी अनेक दिवस चालली होती. परंतू शिवाजी महाराजांनी इंग्रजांना दाद दिली नाही. संभाजी महाराजांनीही त्यांच्या कारकिर्दीत इंग्रजांना नुकसान भरपाई दिली नाही. शेवटी १६८२ मध्ये इंग्रजांनी राजापूर येथील आपली वखार बंद केली.

६) वेंगुर्ला :

मराठा कालखंडातील भरभराटीला आलेले कोकणातील आणखीन एक बंदर म्हणजे वेंगुर्ला होय. वेंगुर्ल्यात उचांची वखार होती. सन १६६० च्या दरम्यान येथे वटाव्हिया, जपान, सिलोन, इराण व अरबस्थानातून येणारी जहाजे या बंदराला भेट देत असत.

७) इतर शहरे व बंदरे :

मराठा कालखंडातील चौल, दाभोळ, कल्याण, भिवंडी, राजापूर, वेंगुर्ला या बंदर व शहराव्यतिरिक्त इतरही काही नावारुपाला आलेली शहरे व बंदरे होती यात महाड, कोल्हापूर, आष्टे, चिपळूण, केळशी, पेठा, नागोठणे, यांचा समावेश होतो. "English Factory Records" मधील संदर्भानुसार मुंबईकर इंग्रजाना येथील माल सुरतपेक्षा स्वस्त व सोईस्कर वाटत असे.

ब) पेशवेकाळातील औद्योगिक व व्यापारी केंद्र :

शिवकाळाप्रमाणेच पेशवेकाळातही औद्योगिक व व्यापारी केंद्राचा विकास झाला होता. मराठा कालखंडात सागरी व जमीनमार्गे चालणारा व्यापार, निरनिराळ्या ठिकाणी भरभराटीला आलेले उद्योग, जलमार्ग व खुष्कीच्या मार्गाचे जाळे यामुळे व मराठा सरकारमुळे तसेच सरकारच्या विशेष प्रयत्नामुळे शहरांची, बंदरांची व गावांची वाढ झाली होती. अशा औद्योगिक व व्यापारी केंद्रांचे उल्लेख मराठी कागदपत्रामध्ये, परदेशी प्रवाशांच्या वृत्तांतामध्ये व भारतातील परकीय सत्तांच्या कागदपत्रामध्ये सापडतात.

शिवकाळा प्रमाणेच पेशवेकाळातही चौल, दाभोळ, कल्याण, भिवंडी, राजापूर, कोळसी, विजयदुर्ग, सिंधूदुर्ग ही कोकण किनाऱ्यावरील महत्त्वाची बंदरे होती. ही बंदरे व्यापार व उद्योगाकरीता प्रसिद्ध होती. पेशवेकाळात या बंदरामधुन रेशमी कापड, अफू, निळ, सुती कापड, मिरे, धान्य, लाख इत्यादी वस्तू निर्यात होत असत. या बंदरातून मराठ्यांचा परदेशाशी व्यापार चालत असे.

मराठा कालखंडात युरोपीय लोकांमार्फत साखर, मसाले व सुका मेवा चीन, अफगाणिस्तान, इराण येथून आयात केला जात असे. कोकण किनाऱ्यावर वरील मोठ्या बंदराशिवाय नागोठणा, मालाड, चिपळूण, रत्नागिरी वेंगुर्ला, मालवण, बेलापूर, जंबूसार, वलसार, पेठा, पनवेल, कोलंबे इत्यादी लहान बंदरेही होती. या बंदरातून आयात निर्यात व्यापार चालत असे. या बंदरातून उतरविलेल्या वस्तू देशांतर्गत भागात दूर अंतरावर निरनिराळ्या बाजारपेठांमध्ये नेल्या जात असत. लमाणी लोकांचे काफिले बैलावरुन या वस्तू वाहून नेत असत.

मेणबत्या, गुलाबपाणी, रंगीत काच, आरसे आणि इतर चैनीच्या वस्तू मुंबई, दमण आणि इतर बंदरामध्ये इंग्रज, पोर्तुगीज अथवा डच लोकांकडून पेशवे खरेदी करत असत. घड्याळ, चष्मे, कॅमेरे, होकायंत्र, कुलपे, कागद, चहा व घोडागाड्या या वस्तू लहान प्रमाणात पेशवे व काही विशिष्ट लोक (श्रीमंत) आयात करीत असत. त्याच प्रमाणे चहाची भांडी, साबण, बंदूकीची दारु, शिसे व कापड या वस्तूही परदेशातून आयात केल्या जात असत. व हा सर्व व्यापार वरील कोकण किनाऱ्यावरील बंदरातून चालत असे.

पोर्तूगीजांकडून वसई व साष्टी घेतल्या नंतर पेशव्यांनी ही बंदरे विकसित करण्याचा प्रयत्न केला. "पेशवा रोजनिशी" मधील संदर्भानुसार सन १७४४ मध्ये दोन शेणवी व्यापारी विठोजी कृष्णा कामत व पुंडलीक कृष्णा कामत यांना त्यांची पाच जहाजे घेवून वसई प्रातांच्या अधिकाऱ्याला पेशव्यांनी या जहाजातून व्यापारासाठी नेल्या जाणाऱ्या मालावरील जकात करात थोडी माफी देण्याचा आदेश देण्यात आला होता. त्याच प्रमाणे पुंडलीक कृष्णा कामत याचा पालखी व मानाची वस्त्रे देवून गौरव करण्यात आला होता. तसेच त्याच्या राहण्याची व गोदामासाठी व्यवस्था करण्यात आली होती. वसई व साष्टी येथे स्थायीक होवून दुकाने

उघडणाऱ्या तीन व्यापाऱ्यांना राहण्यासाठी घरे देण्यात आली होती. तसेच त्यांच्या वस्तूंवरील जकात करास अर्धी माफी देण्यात आली होती.

क) मराठा कालखंडातील शिवकाळातील अंतर्गत व्यापारी केंद्र :

मराठा कालखंडात जी शहरीकरणाची प्रक्रिया विकसीत झाली त्यास हा घटक प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या जबाबदार होता. नागरीकरणासाठी उद्योग-व्यापार व बाजारपेठा यांचे अस्तित्व व भरभराट महत्त्वाची असते. शिवकाळात या प्रक्रीयेच्या मोठ्या प्रमाणात विकास झाल्याने नागरीकरणाची प्रक्रिया सोपी झाली.

१) आठवडा बाजार :

मराठा कालखंडातील शिवकाळात विविध गावात व पेठात आठवडा बाजार भरत असे. हा बाजार म्हणजे एक प्रकारचा व्यापारी केंद्रच असे. मराठा कालखंडात आठवड्यातून एक वेळा किंवा दोन वेळा असा बाजार भरत असे. आसपासचे लोक अशा बाजारात आपला माल विकण्यासाठी आणीत असत. अशा लोकांत शेतकरी, लहान लहान व्यापारी बाहेरुन आपला माल आणीत असत. तसेच स्थानिक व्यापारीही आपला माल अशा बाजारात आणीत असत. अशा बाजारात विविध प्रकारचे धान्य, कपडे, बेकरीतील पदार्थ, फळे व भाजीपाला, नारळ, किराणामाल अशा विविध वस्तूंची विक्री होत असे. हा आठवडा बाजार त्या परिसरातील लोकांच्या विविध गरजा भागवत असे.

२) कसबा किंवा पेठा :

मराठा कालखंडात कसबा किंवा पेठा या शिवकाळातील आकाराने मोठे असलेले व्यापारी केंद्र होते. पेठेला अनेक कायमस्वरुपी दुकाने असत. यात तेलाची विक्री करणारे व तेल गाळणारे तेली, पादत्राणे तयार करणारे चांभार कापडाचे व्यापार, कापड तयार करणारे विणकर, कापड शिवणारे शिंपी, दारु गाळणारे व विकणारे कलाल यांचा समावेश असे.

पेठांतील व्यापारावर नियंत्रण ठेवणारा एक अधिकारी वर्ग होता. यात शेठे या अधिकाऱ्याचा समावेश होतो. तर पेठेच्या विकासाची जबाबदारी पाटलावर असे. शेठेच्या कामगिरीबद्दल त्याला करमुक्त जमीन इनाम दिली जात असे.

मराठा कालखंडातील शिवकाळात नवीन व्यापारी पेठा बसविण्याकरीता सरकारकडून प्रोत्सहान दिले जात असे. काही वेळा नवीन पेठा बनविण्यासाठी एखाद्या व्यक्तीला सरकारकडून सनदही दिली जात असे. शिवचरित्र साहित्य (खंड ६ प. क्र. ९१९) मधील संदर्भानुसार पाणाण, जिजापुरा, मलपुरा, खेळपुरा, विठापुरा, अशा अनेक पेठा बनविल्याचा संदर्भ मिळतो.

पेठा बसविल्यानंतर काही काळात त्या पेठेत बाहेरच्या नवीन व्यापाऱ्यांना आपला धंदा करण्याची परवानगी देवून पेठांचा विकास करण्याचा प्रयत्न शिवकाळात झाल्याचा दिसतो. मात्र अशा वेळी जुन्या व्यापाऱ्यांची व नव्या व्यापाऱ्यांची वेगळी नोंद ठेवली जात असे. "शिवचरित्र खंड ५ पा. क्र. ९१९" मधील पत्रात इंदापूर पेठेतील अशा जुन्या व नव्या नोंदी आढळतात. त्या नुसार तीन सराफ, एक सोनार, पाच तेली आणि दोन शिंपी हे जुने व्यापारी होते. त्यात नव्याने पाच सराफ, दोन सोनार व नऊ तेली यांची भर पडल्याचा संदभू मिळतो.

मराठा कालखंडात शिवाजी महाराजांने नवीन पेठांच्या विकासासाठी विशेष लक्ष दिल्याची उदाहरणे आहेत. तसेच पेठांच्या शांततेसाठी व सुरक्षिततेसाठी प्रयत्न केल्याचे समजते. पेठांमध्ये चोरी होवू नये, दरोडे पडू नयेत, शत्रुचे हल्ले होवू नयेत, पेठांमधील व्यापाऱ्यांना संरक्षण मिळावे यासाठी त्यांचे प्रशासन सतत दक्ष असे. पेठांचा व्यापार भरभराटीस यावा म्हणून शिवाजी महाराजांनी व्यापाऱ्यांना अनेक सवलतीही दिल्या होत्या.

ड) मराठा कालखंडातील पेशवेकाळातील अंतर्गत व्यापारी केंद्र :

मराठा कालखंडातील पेशवेकाळात महाराष्ट्रात निरनिराळ्या शहरात व्यापारी व औद्योगिक केंद्र वाढली होती. या केंद्रांची वाढ ही विविध कारणामुळे झाली होती. उदा. पुणे, सातारा, कोल्हापूर ही शहरे राजधानीची शहरे असल्यामुळे ही शहरे व्यापारी व औद्योगिक दृष्टीकोनातून नावारुपाला आली होती. कायगावटोके, नाशिक, पैठण, पंढरपूर यांची तिर्थक्षेत्र म्हणून वाढ झाली होती. तर येवला, सोलापूर, नागपूर ही शहरे औद्योगिक क्षेत्र म्हणून वाढली होती. जुन्नर व नंदुरबार यांची मोक्यांची जागा म्हणून मोठी वाढ झाली आणि वन्हाणपूर व मोरजी यांची महामार्गावर वसलेली शहरे म्हणून वाढ झाली. काही शहरे अनेक महत्वपूर्ण बाबींमुळे प्रसिद्धीला आली होती. याचे उत्तम उदा. म्हणजे कोल्हापूर शहर होय. राजधाणीचे शहर, तिर्थक्षेत्रीय शहर, व्यापारी केंद्र म्हणून या काळात कोल्हापूर प्रसिद्ध होते. पैठण हे सुद्धा औद्योगिक व तिर्थक्षेत्रीय शहर म्हणून प्रसिद्ध होते. या शहरांच्या वाढीस तत्कालीन राजकीय, धार्मिक व औद्योगिक हेतू जबाबदार ठरला. या कालखंडातील प्रत्येक शहर हे एक बाजारपेठ असल्यामुळे व्यापार व उद्योग यांना उत्तेजन मिळाले. सरकारने व्यापाऱ्यांना आणि लोकांना नवी उपनगरे बसविण्यासाठी पेठा व बाजार उभारण्यासाठी अथवा जुन्या धंद्यांच्या नुतनीकरणासाठी कौल दिल्याची अनेक उदाहरणे आहेत.

१) आठवडा बाजार :

मराठा कालखंडातील पेशवेकाळात प्रत्येक शहर हे एक आठवडा बाजार असे. काही महत्त्वाच्या शहरांमध्ये एकदा अथवा दोनदा बाजार भरत असे. तेथे शेतकरी व लहान व्यापारी त्याचा माल ओझेवाहु बैल अथवा बैलगाड्यांच्या माध्यमातून वाहून आणित व वस्तूंची देवघेव करीत असत. तसेच याच बैलगाड्यातून त्यांना आवश्यक असणारा माल परत नेत असते. परंतू हा स्थानिक व्यापार होता. व तो लहान प्रमाणावर चालविला जात होता. शेतकरी साधारणतः थांबून रहायला तयार नसत. ते जसे पिकवत असत तसेच ते विकत असत.

२) शहरे व पेठा :

मराठा कालखंडातील पेशवे काळात शहरांच्या मोठ्या प्रमाणात विकास झाला होता. प्रत्येक शहर एक प्रकारची बाजारपेठ असे. पेशव्याने आपल्या राजप्रणालीमध्ये आर्थिक बाबीना महत्व दिल्याने व्यापार व बाजार यांचा विकास झाला होता. याचे उत्तम उदाहरण म्हणजे पुणे येथील बाजारपेठा होय. पुण्या व्यतिरिक्त पेशव्यांनी इतर ठिकाणीही आपल्या कारकिर्दीत व्यापारी पेठा वसविल्या होत्या. या पेठांची माहिती खाली नमुद करण्यात आली आहे.

पुणे :

पुणे हे ज्या प्रमाणे पेशव्यांच्या राजाधानीचे ठिकाण होते. त्याच प्रमाणे ते पेठांचे केंद्रस्थान होते. पुण्यात गणेश पेठ, गंजपेठ, मुसाफरजंग पेठ, शुक्रवार पेठ, शनिवार पेठ, मंगळवार पेठ, बुधवार पेठ, नागेश पेठ, नवी पेठ, नवपुरा पेठ, भवानी पेठ, हनमंत पेठ, शिवपुरी पेठ, धोरपडी पेठ, नरसिंह पेठ, आणि मस्तानी पेठ अशा अनेक पेठा होत्या.

बाळाजी बाजीरावाच्या कारकिर्दीत मलकापूर पेठ वसविण्यात आली होती. ही पेठ नंतर एका बंडात उद्ध्वस्त झाली.

पुण्यातील बुधवार पेठ ही एक प्रसिद्ध पेठ होती. या पेठेत अनेक कारागिर होते. उदा. गवळी, पायखट, कोळशाची वखार चालविणारे, चुना तयार करणारे, काड्याच्या पेट्या बनविणारे, दारु गाळणारे, लाकूड विकणारे, लोहार हे लोक राहत होते. या पेठेतून अनेक वस्तूंची आयात-निर्यात होत होती. १७४५ मध्ये बुधवार पेठेचा कौल रामाजी नाईक व बालाजी नाईक भिडे यांना २५०० रुपयासाठी देण्यात आला होता.

पहिल्या बाजीराव पेशव्यांच्या सूचनेवरुन हरशेट व सोमशेट वीरकर या व्यापाऱ्यांनी पुण्यात शुक्रवारपेठ ही नवी व्यापारीपेठ वसविली होती. सन १७४९ मध्ये त्यांच्या विनंतीवरुन नानासोहबांनी त्यांना शेटेपणाचे वतन दिले होते.

अनेक वेळा प्रतिष्ठीत वजनदार व्यापारी पेठ चालू करत असत. किंवा गावामध्ये व्यापारी उपनगरे चालू करत असत. या पेठाचे प्रमुख होण्यासाठी म्हणजे शेटेपण मिळविण्यासाठी कायदेशीर परवानगी घ्यावी लागत असे. काही वेळा सरकार काही व्यक्तींना नवीन व्यापारी नगरी वसविण्यास सांगत असे. काही वेळा सरकार ओसाड जमीनीवर नव्याने नगर वसविण्यास सांगत असे. अशा नवीन नगर वसविणाऱ्यांना शेठेपणाबरोबरच इतर नवीन अधिकारही मिळत असत.

सन १७६८ मध्ये महादजी विश्वनाथ लिमये याला भवानी पेठ नावाने एक नवे व्यापारी उपनगर वसविण्याची परवानगी देण्यात आली होती. शेटे, महाजन, वाणी, उदमी व रयत यांना सात वर्षासाठी करामध्ये माफी देवून सात वर्षा कौल देण्यात आला होता.

अशा प्रकारे पेशव्यांच्या धोरणामुळे पुण्यातील उद्योग,व्यापार, कारखाने वाढले. पेठांची वाढ व विकास झाला. त्यामुळे नागरीकरणाची प्रक्रिया विकसित झाली.

इतर ठिकाणी असणाऱ्या पेठा :

पेशव्यांनी ज्या प्रमाणे पुण्यात पेठा वसविण्यास मदत केली होती. तशाच प्रकारची मदत इतर ठिकाणी पेठा वसविण्यासाठी सुद्धा केली होती. या पेठांमध्ये नाशिक, धारवड, नायगाव, अहमदनगर, देवगिरी, पैठण, चंदेरी येथील पेठांचा समावेश आहे. या पेठांमधून देशांतर्गत व देशबाह्य व्यापार चालत होता. या पेठांमुळे सुद्धा नागरिकरणाच्या प्रक्रियेस वेग आला.

३) टांकसाळ केंद्रे :

पेशव्यांने कांही ठिकाणी टांकसाळ केंद्रे सुरु केली होती. ही केंद्रे पुढे औद्योगिक व व्यापारी केंद्रे म्हणून उदयाला आली. काही टांकसाळी या खाजगी सावकारांना मक्ल्यांनी दिल्या होत्या. अशा टांकसाळी पेशवेकाळात नाशिक, चिंचवड, चांदवड, तळेगाव दाभाडे, पुणे, धारवड, वसई, दौलताबाद, रहिमतपूर, मलकापूर, नागोठणे इत्यादी ठिकाणी होत्या. या उद्योगाच्या निर्मितीमुळे लोहार, सोनार, धणकरी, भातेकरी यांचा धंदा जोरात चालत असे. टांकसाळीसाठी लोखंड, शिसे, कोळसा, खार, चिंच हा कच्चा माल लागत असे. यांचाही व्यापार या शहरात भरभराटीस आला होता. अशश टांकसाळीमधून सोने, रुपे, तांबे, दागिने, घागरी, हंडे, भांडी यांचा व्यापार जोरदार चालत असे.

४) कापड केंद्र :

पेशवेकाळात काही ठिकाणी कापड केंद्र विकसित झाली होती. ही केंद्र कापड पेठा म्हणून ओळखल्या जात होत्या. पैठण, चंदेरी, नागपूर, सोलापूर, चांदवड, जालना या ठिकाणी विकसित झाली होती. त्यामुळे या ठिकाणीही शहरीकरणाची प्रक्रिया विकसित झाली होती.

पैठण, चंदेरी येथे कापड विषयक अनेक पेठा प्रसिद्ध होत्या. या पेठांमध्ये पासोडी, धोतर, पैठण्या व पितांबर यांची निर्मिती केली जात होती.

नागपूर, सोलापूर, चांदवड येथे धोतरजोड्या, चादरी, पासोड्या यांची निर्मिती केली जात होती.

माहेश्वर, बंबायत, धनवड येथे लुगडी व पासोड्या तयार केल्या जात होत्या.

बऱ्हाणपूर, सासवड, गंगासागर, बागलकोट येथे चिटाचे उत्कृष्ट कापड तयार केले जात होते.

जालना हे सुती व रेश्मी कापडाच्या उत्पादनासाठी व व्यापारासाठी उत्कृष्ट केंद्र म्हणून प्रसिद्ध होते.

कापड हे जीवनावश्यक गरज भागविणारे महत्त्वपूर्ण साधन असल्याने कापडाला मोठ्या प्रमाणात मागणी होती. परिणामी कापड उद्योग-व्यापार-पेठा यांचा मोठ्या प्रमाणात विकास झाला. या विकासामुळेच शहरीकरणाच्या विकासाला गती मिळून शहरीकरणाची प्रक्रिया सुलभ झाली.

११.८ सारांश

मराठ्यांच्या कालखंडातील आर्थिक कार्यप्रणालीशी संबधीत असणारा घटक म्हणजे उद्योग. मराठ्यांच्या नियंत्रणाखाली तेव्हा शिवकाळात व पेशवेकाळात वेगवेगळ्या प्रकारचे उद्योग विकसीत झाले होते. लघु उद्योग हा या कालखंडातील उद्योगाच्या आरंभीच्या स्वरुपाच्या भाग होता. नंतर या कालखंडात मोठे उद्योगसुद्धा निर्माण झाले.

कृषी प्रधान अर्थव्यवस्थेचे स्वरुप व खेड्यातील उत्तम कारागीरता यामुळे उद्योगांचा पाय खेडगावातून मजबूत होत गेला. उत्तम उत्पादन, उत्पादीत मालाला हक्काचे ग्राहक व हक्काच्या बाजारपेठा या मुळे उद्योगांच्या विकासाला व उत्कर्षाला या कालखंडात चालना मिळाली. याही पेक्षा महत्वाचे म्हणजे राज्यकर्त्यांची सहानुभूती व वरदहस्त या मुळे या उद्योगाना आवश्यक असणारे राजकीय पाठबळही मिळाले. पुढे या उद्योगांना शहरांच्या केंद्रस्थानी आपले अस्तित्व निर्माण करत आले. परिणामी उद्योगांच्या ग्रामीण व शहरी विकासास उत्तम प्रतिसाद मिळू लागला.

या कालखंडात झालेला सुती कापडउद्योगाचा विकास, रेशमी कापडउद्योगाचा विकास, लोकर कापडउद्योगाचा विकास, रंगकाम उद्योगाचा विकास, ही कापड व्यवसायाच्या प्रगतीची उत्तम उदाहरणे आहेत. जीवनावश्यक गरज भागवणारा हा उद्योग असल्याने या उद्योगाला अल्पावधीतच महत्व प्राप्त झाले होते.

धातू उद्योग हा या कालखंडातील अत्यंत महत्वपूर्ण उद्योग या कालखंडात लोखंड, ब्रांझ, तांबे, सोने, चांदी या धातु उद्योगांचा विकास झाला होता. दारुगोळा उद्योग हा पण याच घटकाशी संबधीत असणारा उद्योग या पैकी काही उद्योग शासकीय गरजा भागवीणारे होते तर काही समुहाच्या गरजा भागविणारे होते.

munotes.in

आरमाराची गरज लक्षात घेवून मराठयांने आपल्या कालखंडात जहाजबांधणी उद्योग निर्माण केले होते. या उद्योगाचा शिवकाळ व पेशवेकाळात मोठ्या प्रमाणात विकास झाला.

मराठ्यांच्या कालखंडात जे इतर उद्योग निर्माण झाले होते व ते विकसीत झाले होते त्यामध्ये लाकूडउद्योग, सिंगापासून बनविल्या जाणाऱ्या वस्तूंचे उद्योग, हस्तीदंत उद्योग, चर्म उद्योग, दोरखंडउद्योग, गुळ उद्योग, तेल उद्योग, मासेमारी उद्योग, मीठ उद्योग, मद्य उद्योग, कागद उद्योग, साखर उद्योग, काच उद्योग, कुलूप उद्योग, ग्रामीण उद्योग या उद्योगांचा समावेश आहे या उद्योगाने मराठा कालखंडातील खेडी व शहर समृद्ध बनवीली होती तसेच शासनाच्या आर्थिक तिजोरीतही भर टाकली होती. याही पुढे जावून या उद्योगाने मराठ्यांची राजकीय, आर्थिक व सामाजिक परिस्थिती सुधारली.

११.९ प्रश्न

१) मराठ्यांच्या कालखंडातील उद्योगांची सामान्य वैशिष्ट अचूक स्पष्ट करा.

२) मराठ्यांच्या कालखंडातील कापडउद्योगांचा सविस्तर आढावा घ्या.

३) मराठ्यांच्या धातु उद्योगा संबधीची माहिती सांगा.

४) मराठ्यांच्या जहाजबांधणी उद्योगावर निबंध लिहा.

५) मराठ्यांच्या कालखंडातील इतर उद्योगांची सविस्तर माहिती लिहा.

६) मराठ्यांच्या नियंत्रणाखालील ग्रामीण उद्योगांची माहिती जाणून घ्या.

७) मराठ्यांच्या कालखंडातील प्रचलीत उद्योगांची संक्षिप्त माहिती लिहा.

११.१० संदर्भ

१) पेशवाईच्या सावलीत - मा. गो. चापेकर.

२) पेशवे कालीन महाराष्ट्र - वा. कृ. भावे.

३) शिवकालीन पत्र सार संग्रह खंड - २

४) History of Maratha Navy & Marchantship - Apate

५) Early History of the Bombay Docks and ship building, - Potdar Commemoration volume.

❖❖❖❖

munotes.in

१२

आर्थिक आणि सांस्कृतिक विकास : व्यापार व वाणिज्य

घटक रचना:

१२.० उद्दिष्ट्ये

१२.१ प्रस्तावना

१२.२ व्यापारी वस्तू

१२.३ बाजारपेठा

१२.४ वहातूक व दळणवळण

१२.५ वाहतूक व दळणवळणाची साधने

१२.६ उद्योग आणि व्यापाराची सुरक्षा

१२.७ जलमार्ग वहातूक व दळणवळण

१२.८ उद्योग आणि व्यापारातील समस्या

१२.९ पारपत्र

१२.१० घाटातील वाहतूक व दळणवळण

१२.११ सारांश

१२.१२ प्रश्न

१२.१३ संदर्भ

१२.०उद्दिष्ट्ये

- मराठा कालखंडातील उद्योग आणि व्यापारांतर्गत समाविष्ट असणाऱ्या वेगवेगळ्या वस्तूंचा आढावा घेणे.
- मराठा सत्तांतार्गत असणाऱ्या शेठे-महाजन पदाविषयी व बाजारपेठांच्या विकासाविषयी माहिती जाणून घेणे.
- मराठा सत्तांतर्गत बाजारपेठांच्या संरक्षणाविषयी योजल्या जाणाऱ्या उपायांची माहिती जाणून घेणे.

munotes.in

- मराठा सत्तांतर्गत असणाऱ्या राजमार्गांची व दळणवळणाच्या साधनांची माहिती जाणून घेणे.
- वाहातूक आणि दळणवळणाच्या साधनाचे स्वरुप समजून घेणे.
- उद्योग आणि व्यापाराच्या सुरक्षीतता साधनाबद्दल जाणून घेणे.
- मराठा सत्ता कालखंडातील उद्योग आणि व्यापाराच्या समस्या जाणून घेणे.
- मराठा कालखंडात लागणाऱ्या पारपत्र, परवाना पद्धतीची माहिती जाणून घेणे.
- घाटमार्ग वाहतूक व दळणवळणाची माहिती जाणून घेणे.

१२.१ प्रस्तावना

मराठा कालखंडातील उद्योगाची माहिती पाहिल्यानंतर उद्योगसमहाशी संबधीत जो व्यापार घटक आहे त्या वापार घटकाची माहिती आपण या घटकात पहाणार आहोत. मराठ्यांच्या व्यापाराची माहिती पहात असतातना या कालखंडात व्यापारासाठी कोणत्या वस्तू उपयोगात आणल्या जात होत्या, वस्तू विक्रीसाठी कोणत्या बाजारपेठा उपलब्ध होत्या, वहातूक व दळणवळणाचे मार्ग कोणते होते, दळणवळणासाठी कोणत्या साधनांचा वापर केला जात होता, जलमार्गाचा वापर कसा व का केला जात होता, उद्योग व व्यापारातील समस्या काय होत्या, उद्योग व्यापारांना परवाने कसे दिले जात होते घाट मार्गातून वहातूक कशी केली जात होती या सर्व बाबींचा विचार करावा लागणार आहे.

मराठा कालखंडा अगोदर तेराव्या शतकापासून सतराव्या शतकाच्या आंरभापर्यंत यादवांचा काळ वगळता महाराष्ट्र परकीय सत्तांच्या वर्चस्वाखाली होता. परिणामी या काळात महाराष्ट्रास व्यापार विकास पुरक वातावरण नव्हते. उलट महाराष्ट्र या काळात परकीय सत्तांच्या वर्चस्वाखाली भरडला जात होता. या राजकीय कारणा व्यतिरिक्त भौगोलिक परिस्थिती सुद्धा व्यापार विकासात अडथळा निर्माण करुन बसली होती. डोंगराळ प्रदेश, खडकाळ व निकृष्ट जमीन जलवाहतूकीतील अडथळे ही ती भौगोलीक परिस्थिती होती. या राजकीय व भौगोलिक परिस्थितीमुळे या काळात महाराष्ट्राचा व्यापारी विकास झाला नव्हता.

मराठा कालखंडात उद्योग व व्यापार क्षेत्रात मराठी लोकांना त्यांच्या स्वतःच्या नव्या जाणीवा करुन देणारा, त्यांना विविध क्षेत्रात नव्या वाटा दाखविणारा मुलगामी क्रांतीकारक बदल जाणवला हा बदल शिवकाळात शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्य स्थापनेमुळे शक्य झाला. परिणामी स्वराज्यात उद्योग व व्यापाराच्या नव्या संधी प्राप्त झाल्या परिणामी शिवकाळात उद्योग व्यापाराचा विकास झाला.

शिवकाळा प्रमाणेच पेशवेकाळातसुद्धा मराठ्यांच्या उद्योग व्यापाराचा विकास झाला होता. कारण पेशव्यांने सुद्धा या बाबीकडे व्यावसायिक दृष्टीकोनातून पाहिले होते एकंदरीत हा शासनाच्या उत्पन्नाशी निगडीत भाग असल्याने दोन्ही कालखंडात या बाबीला सुयोग्य दिशा दिली गेल्याचे स्पष्ट होते.

१२.२व्यापारी वस्तू

मराठा कालखंडात जी व्यापारी केंद्र विकसीत झाली होती या व्यापारी केंद्रात वेगवेगळ्या वस्तु विक्रीसाठी येत असत. या वस्तू व व्यापारीकेंद्र यांची माहिती मराठ्यांच्या संदर्भ कागद पत्रात उपलब्ध आहे. तसेच प्रत्येक मालावर जी जकात आकारली जात होती त्याचे दरही या माहिती संदर्भात आहेत. मराठा कालखंडातील व्यापारी वस्तूबाबत माहिती जाणून घेत असताना आपणास शिवकाळ व पेशवेकाळ अशा दोन कालखंडातील व्यापारी वस्तुंची माहिती जाणून घ्यावी लागेल. सर्व प्रथम आपण शिवकाळातील व्यापारी वस्तूंची माहिती जाणून घेवू व तद्नंतर पेशवेकाळातील व्यापारी वस्तूंची माहिती जाणून घेवू.

१. शिवकाळातील व्यापारी वस्तू: मराठ्यांच्या शिवकाळात ज्या व्यापारी वस्तू प्रचलीत होत्या त्याचे स्वरुप पुढील प्रमाणे आहे.

- **अन्नधान्य व अन्नपदार्थ:** शिवकाळात ज्या अन्नधान्याशी संबधीत जे घटक होते त्यात गहु, दाळी, मसूर, तांदूळ, मका, नाचणी, तीळ, द्विदल धान्य, घेवडा काळे हरभरे इत्यादीचा समावेश होता. तांदळात रायभोग तांदूळ, महावार तांदूळ, लाल तांदूळ, महावार तांदूळ असे प्रकार होते. अन्नधान्याबरोबर काही अन्नपदार्थ बाजारात विक्रीसाठी असत या अन्नपदार्थामध्ये गुळ, ककवी, मध, साखर या अन्नपदार्थाचा समावेश असे. या सर्व वस्तूंचा संबध जीवनावश्यक गरजेबरोबर असल्याने या वस्तूंचा व्यापार या कालखंडात मोठ्या प्रमाणात होत असे. या वस्तुंचा बाजारात पुरवठाही मोठ्याप्रमाणात होत असे.

- **मसाल्याचे पदार्थ:** शिवकाळात जे मसाल्याचे पदार्थ व्यापारासाठी आणले जात होते त्या मध्ये लवंग, काळी मिरी, तांबडी मिरी, दालचिनी, मायफळ, जायपत्र, वेलदोडे, कांदे, सुंठ, आले, लसून, हळद, मिरची, आक्रोड, खोबरे या मसाल्याच्या पदार्थाचा समावेश असे या काळात या पदार्थांचा वापर मोठ्या प्रमाणात होत होता. परिणामी या पदार्थांना मागणी जास्त प्रमाणात होती.

- **सुगंधी पदार्थ:** शिवकाळात जे सुगंधी पदार्थ व्यापारासाठी आणले जात होते ह्या मध्ये केशर, कापूर, चंदन, व गोपीचंद या सुगंधी पदार्थाचा समावेश होता. सुगंधी पदार्थ हे जास्त प्रमाणात या काळात धार्मिक विधीसाठी वापरले जात होते.

- **सुगंधी तेल:** शिवकाळात जे सुगंधी तेल विक्रीसाठी असत त्या तेलांमध्ये चमेली, मोगरा, चंपा या तेलांचा समावेश होता. हे तेल सौंदर्यप्रसाधनासाठी वापरले जात होते.

- **कापड व कपडे:** शिवकाळात कापड व कपडे विक्रीसाठी असत. सुती, रेशमी, लोकरी कापड यांचा समावेश जास्त प्रमाणात होतो. या व्यतिरिक्त मुक्तेश्वर कापड, तकता, चिटाचे कापड, किनखाप, महाबन, मुंगी-पाटना सोनेरी भरतकाम केलेले कापड यांचाही समावेश या दोहो प्रकारामध्ये होता. कद, पिंताबर शेला पुर्ताकळी, अष्टपुतळी, घाटी साड्या, धोतर, धोतरसाड्या, पासोड्या यांचा समावेश सुद्धा या प्रकारामध्ये होत होता. कपडे व कापड ही एक जीवनावश्यक गरज असल्याने हा व्यापार तेव्हा उत्कर्षाला पोहचला होता.

- **फळे:** शिवकाळात कलिंगड, नारळ, काजू बदाम, केळी, आंबे, संत्री, मोसंबी, लिंबू आदी फळे व्यापारासाठी बाजारपेठेत आणली जात होती. सुयोग्य आहारासाठी ही फळे उपयुक्त असल्याने यांना बाजारपेठेत मागणी मोठ्या प्रमाणात होती.

- **इतर खाद्यपदार्थ:** शिवकाळात जे इतर खाद्यपदार्थ विक्रीसाठी आणले जात होते. त्यामध्ये भाजीपाला, दुध, मासे आदी पदार्थाचा समावेश होता. हे पदार्थ बाजारात गरजेनुसार विक्रीसाठी येत असत. हे पदार्थ नाशंवत असल्येने यांचा पुरवठा बाजारपेठेला मर्यादीत स्वरुपात होत असे. मागणीनुसार या मालाच्या विक्रीचा विचार होत असे.

- **इतर संकिर्ण वस्तू:** (किरकोळ वस्तू): शिवकाळात ज्या इतर किरकोळ वस्तू विक्रीसाठी बाजारात उपलब्ध असत त्यात चपला, लहान बूट, कंगवे, सूप, लाकडी पेट्या, साबन, कंदिल, दोर, कागद, थाळ्या, पलंग या वस्तूचा समावेश असे.

- **प्राणी:** शिवकाळात प्राणी विक्रीसाठी बाजार उपलब्ध असत. लष्करी दृष्टीकोनातून व मानवी जीवन उपयुक्त गरजा भागविण्याच्या दृष्टीकोनातून उपयुक्त असणाऱ्या प्राण्यांची या बाजारात विक्री केली जात असे विक्रीसाठी जे प्राणी बाजारात आणले जात असत त्यात घोडे, बैल, म्हशी, मेंढ्या या प्राण्यांचा समावेश असे.

- **गुलाम:** शिवकाळात स्त्री-पुरुष गुलामांची खरेदी-विक्री होत असे. मात्र या बाबत निश्चित संदर्भ माहिती उपलब्ध नाही. मात्र मध्ययुगीन राजवट काळात ही प्रथा प्रचलीत होती. म्हणूनच या बाबत आपण ठामपणे मत मांडू शकत नाही.

२. पेशवेकालीन व्यापारी वस्तू:

मराठ्यांच्या पेशवेकाळात ज्या व्यापारी वस्तू प्रचलीत होत्या त्यो स्वरुप पुढील प्रमाणे होते.

- **अन्नपदार्थ:** पेशवेकाळात जे अन्नपदार्थ प्रचलीत होते त्यामध्ये तांदूळ, गहु, ज्वारी, बाजरी, डाळी, मासे, मिरच्या, सुरण, दुध, गुलकंद, साखर, नारळ, गुळ, मिठ, तेल आणि तुप या वस्तू आणि पदार्थांचा समावेश होता.

- **फळे:** पेशवेकाळात केळी, खजूर, बदाम, आंबे आणि सुपारी ही फळे बाजारात खरेदी-विक्रीसाठी उपलब्ध असत.

- **मसाल्याचे पदार्थ:** पेशवेकाळात जे मसाल्याचे पदार्थ बाजारात खरेदी-विक्रीसाठी असत त्यामध्ये हळद, हिंग, आले, सुंठ, मिरे वेलदोडे यांचा समावेश होता.

- **धातू:** पेशवेकाळात तांबे, जस्त, शिशे या धातु खरेदी-विक्रीसाठी बाजारात उपलब्ध असत.

- **कापड:** पेशवेकाळात कापड बाजारात कापडाची खरेदी-विक्री होत असे धोतरजोड्या, पासोड्या, सुती कापड, रंगीत कापड, मलमल साड्या, किनखाप मलमल व कद या विविध प्रकारच्या कापडांचा व कपड्यांचा यामध्ये समावेश असे.

mmotes.in

- **प्राणी:** प्राण्यांमध्ये लष्करीदृष्ट्या उपयुक्त व मानवी जीवनास उपयुक्त असणाऱ्या प्राण्यांची खरेदी-विक्री केली जात असे. घोडे, बैल, उंट, म्हशी या प्राण्याचा समावेश यामध्ये असे.

- **चैनिच्या वस्तू:** पेशवेकाळात श्रीमंत लोकांकडुन चैनिच्या वस्तूना जास्त मागणी येत असे. चैनिच्या वस्तूमध्ये घड्याळ, दुर्बिण, हस्तीदंत, कंगवे, रंगीत काचा फर्निचर आणि सौंदर्यप्रसाधने यांचा समावेश होता.

- **इतर वस्तू :** पेशवेकाळात ज्या इतर वस्तू बाजारात विक्रीसाठी असत त्या मध्ये फर्निचर, लाकडी कंगवे, बूट, मातीच्या वस्तू, तंबाखू यांचा समावेश होता.

१२.३बाजारपेठा

मराठा कालखंडात मालाच्या खरेदी-विक्रीसाठी बाजारपेठा प्रचलीत होत्या. या बाजारपेठा या का काळात ग्रामीण व शहरी अशा दोन्ही भागात प्रचलीत होत्या. या बाजारपेठातून देशांतर्गत व देशबाह्य व्यापार चालत असे. शिवकाळ व पेशवेकाळ असा दोन्ही कालखंडात बाजारपेठ ही संकल्पना प्रचलीत होती. या दोन्ही कालखंडातील राजकर्त्यांनी बाजारपेठांच्या निर्मिती पासून विकासकार्यापर्यंत प्रयत्न केल्याचे उपलब्ध माहितीवरुन दिसून येते. सर्व-प्रथम शिवकाळातील बाजारपेठांची माहिती जाणून घेवू व नंतर पेशवेकाळातील बाजारपेठांची माहिती जाणून घेवू.

१. शिवकाळातील बाजारपेठा:

शिवकाळात बाजारपेठा ही व्यापाराची मुख्य केंद्र होती. या काळात विविध गावामध्ये व शहरांमध्ये बाजारपेठा अस्तित्त्वात होत्या. या बाजारपेठामध्ये आठवड्याला एकदा बाजार भरत असे. काही बाजारपेठात आठवड्याला दोनदा बाजार भरत असे. या बाजारात त्या गावातील लोक वेगवेगळ्या प्रकारचे धान्य, कडधान्य, भाजीपाला विकायला आणत असत. यात किराणा व भुसारा मालाचा समावेश असे. या बाजारपेठांमध्ये ग्राहकांना त्यांच्या मागणीनुसार गरजेनुसार माल पुरवला जात असे. काही ठिकाणी मालाची अदलाबदल केली जात असे. मात्र या बाबतीत व्यापार करणाऱ्यांमध्ये समन्वय असे. त्या काळात ग्रामीण व शहरी लोकांच्या गरजा व चैन भागविण्यासाठी या बाजारपेठा उपयुक्त ठरत असत.

१) कसवा किंवा पेठा: शिवकाळात कसबा किंवा पेठा ही व्यापारी केंद्र अस्तित्त्वात होती. या कसबा अथवा पेठेत कायम स्वरुपी दुकाने असत. व्यापारी तत्त्वावर ही दुकाने विक्रेत्यांना दिली जात असत. बाहेरच्या विक्रेत्यांनाही भाडे तत्त्वावर या प्रकारची दुकाने दिली जात असत. या पेठांचे स्वरुप कायम असल्याकारणे या पेठाना या काळात स्वतंत्र अस्तित्व निर्माण झाले होते. या पेठांना विकसीत अवस्था प्राप्त व्हावी म्हणून शिवकाळात सतत प्रयत्न झाल्याचे दिसून येतात. याचे उत्तम उदाहरण म्हणजे शिवकाळात पाषाण, जिजापुरा, मलपुरा, खेळपुरा तसेच पिठापूर येथे निर्माण करण्यात आलेल्या नवीन पेठा होय.

२) शेठे - महाजन: शिवकाळात ज्या पेठा निर्माण करण्यात आल्या होत्या त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी शेठ व महाजन हे अधिकारी नियुक्त केले जात होते. हे अधिकारी कार्यक्षम अनुभवसंपन्न असल्याकारणे या पदावर वंशपरंपरागत पद्धतीने त्यांच्यानंतर त्यांच्याच कुटुंबातील लोकांची नियुक्ती केली जात होती. शेठे महाजनांवर सरकारचे नियंत्रण असे. ते सरकारचे प्रतिनिधी म्हणून पेठांचा कारभार पहात असत. त्यांना नवीन पेठा बसविणे, जुन्या पेठात

व्यापारांना आपली दुकाने थाटण्याची परवानगी देणे, पेठाच्या कारभारावर नियंत्रण ठेवणे, पेठांचा हिशेब ठेवणे, नवीन पेठांच्या निर्मितीसाठी प्रयत्न करणे, ही कामे करावी लागत असत. थोडक्यात शेठे-महाजनांवर पेठांच्या निर्मितीपासून विकासापर्यंतची संपूर्ण जबाबदारी असे. त्यामुळे शिवकाळात या पदाला महत्त्व होते.

३) बाजारपेठांचे संरक्षण: शिवकाळात खरेदी-विक्रीचे मुख्य ठिकाण बाजारपेठा समजल्या जात असत या बाजारपेठामध्ये व्यापारी-विक्रीते- खरेदी करणारे लोक व्यापार बाजार जेव्हा भरत असे तेव्हा एकत्र येत असत. आर्थिक उलाढाल ही या बाजारामध्ये होत असल्या कारणे बाजाराला धोका उद्‌भवत असे. अशा प्रसंगी या प्रकारच्या बाजारपेठांचे संरक्षण करण्याची आवश्यकता भासत असे.

स्वत: व्यापार करणारे व्यापारी स्व-संरक्षण कसे करता येइल याची वैयक्तीक जबाबदारी सांभाळत असत. मात्र याही पुढे जावून प्रशासनाची जबाबदारी म्हणून शेठे-महाजनसुद्धा बाजारपेठांच्या नियंत्रणाचे काम पहात होते. ते सुद्धा बाजारपेठांच्या संरक्षणासाठी नियोजन करत होते तशा प्रकारची प्रशासकीय यंत्रणा उभी करत होते.

शिवाजी महाराजांनी आपल्या कारकिर्दीत बाजारपेठांचे नुकसान होवू नये म्हणून संरक्षणात्मक दक्षता घेतल्याची उदाहरणे आहेत. याही पुढे जावून परकीय व्यापाऱ्यांच्या वर्चस्वाला पायबंद घालून मराठा साम्राज्यातील व्यापाऱ्यांचे संरक्षण केल्याची उदाहरणेही आहेत. परिणामी बाजारपेठांचे संरक्षण होण्यास मदत झाली.

२. पेशवेकाळातील वाजारपेठा :

शिवकाळातील बाजारपेठांची माहिती पाहिल्या नंतर पेशवेकाळातील बाजारपेठांची माहिती समजून घेणार आहोत. शिवकाळा प्रमाणेच पेशवेकाळात सुद्धा गावो-गाव बाजारपेठा अस्तित्त्वात होत्या. या बाजारपेठात किराणा-भुसारा माल विक्रीस असे. या व्यतिरिक्त बार बलुतेदार तसेच आलुतेदार यांनी बनविलेल्या वस्तूही बाजारात विक्रीसाठी असत.

१८ व्या शतकातील महाराष्ट्राचा जर विचार केला तर महाराष्ट्राला आर्थिक व व्यावसायिक परिस्थिती अनुकुल होती. त्यामुळेच पेशवेकाळात अनेक शहरी बाजारपेठांचा उदय-विकास व उत्कर्ष झाला. त्यामुळेच पुणे, सातारा, सोलापूर, बार्शी, वसई, कोल्हापूर, पैठण, येवण, जुन्नर, नंदुरबार, बऱ्हाणपूर इत्यादी शहरामध्ये बाजारपेठांचा विकास झाला होता असे दिसते. या काळात ही सर्व शहरे बाजारपेठा असल्याने व्यापार व उद्योगांना या शहरामध्ये उत्तेजन मिळाले या काळात सरकारने सुद्धा व्यापाऱ्यांना, उद्योजकांना व लोकांना नवी उपनगरे किंवा पेठा बसविण्यासाठी व बाजार उभारण्यासाठी तसेच जुन्या बाजारांचे नुतनीकरण करण्यासाठी समंती दर्शविल्याने या काळात बाजारपेठांचा विकास झाल्याने दिसून येत.

१२.४वहातूक व दळणवळण

मराठा कालखंडातील वाहतूक व दळणवळण मार्गाचा विचार करता आपणास प्रामुख्याने दोन मार्गाने वहातूक होत असल्याचे दिसून येते. या दोन मार्गा पैकी पहिला मार्ग जमीनीमार्ग वहातुक तर दुसरा मार्ग जल वाहतुक मराठ्यांच्या कालखंडात जे वहातूकीचे मार्ग होते ते पुण्यापासून सर्वदुर पसरले होते. ही सर्व वाहतुक राजमार्गान होत असे. या मार्गाची माहिती आपण प्रस्तुत घटकांत पहाणार आहोत.

- मराठा कालखंडातील जो पहिला राजमार्ग होता तो राजमार्ग म्हणजे पुणे ते आगरा हा मार्ग. हा मार्ग अत्यंत उपयुक्त होता. या मार्गातील औरंगाबाद, अजंठा, बऱ्हाणपूर, सिरोंज, नारावर, ग्व्हालेर, दाबलपूर ही महत्वपूर्ण ठिकाणे होती. या राजमार्गाला महत्त्व होते. मराठ्यांच्या राजवटीत मराठ्यांना हा वहातूकमार्ग अत्यंत फायदेशीर होता. व्यापार व व्यवसायाच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त होता.

- मराठा कालखंडातील दुसरा महत्त्वपूर्ण मार्ग म्हणजे मुंबई ते पनवेल. हा मार्ग अत्यंत उपयुक्त होता. या मार्गावरील कल्याण, बदलापूर, दहिवडी व तळेगाव ही महत्त्वपूर्ण ठिकाणे होती. व्यापाराच्या दृष्टीने हा मार्ग सरळ व सुरक्षीत होता.

- मराठा कालखंडातील तिसरा महत्त्वपूर्ण मार्ग म्हणजे पुणे ते श्रीरंगपट्टम होय. हा सर्वात लांब मार्ग समजला जात होता. या मार्गातील महत्त्वपूर्ण ठिकाणे म्हणजे पंढरपूर, विजापूर, जत, भागलकोट अंजी, हरिहर, चित्रदुर्गश्री, आणि नायनगल होय.

- मराठा कालखंडातील चौथा महत्वपूर्ण मार्ग म्हणजे पुणा-बंगलोर मार्ग या मार्गावरील महत्त्वपूर्ण ठिकाणे म्हणजे सुपे, बारामती, तुळजापुर, उदगीर, भालकी, बिदर व गोवळकोंडा होय.

- मराठा कालखंडातील पाचवा मार्ग म्हणजे पुणे ते कोकण होय. हा मार्ग कोकणात असणाऱ्या अनेक टेकड्या व पर्वतामुळे अनेक उपविभागांमध्ये विभागला होता. असे जरी असले तरी हे उपविभाग मुख्य मार्गाला जोडले होते. असे जरी असले तरी वहातूक व दळणवळणाच्या दृष्टीने या मार्गालाही महत्त्व होते.

- मराठा कालखंडातील सहावा मार्ग म्हणजे पुणे ते नाशिक होय. हा मार्ग अतिशय प्रसिद्ध होता. कारण या मार्गावर भोगपूर, खेड, चाकन भोसरी, बऱ्हामपुरी ही महत्त्वपूर्ण केंद्र होती.

- मराठा कालखंडातील सातवा महत्त्वपूर्ण मार्ग म्हणजे पुणे ते कोल्हापूर होय. कोल्हापूरच्या प्रसिद्ध बाजारामुळे व परंपरागत व्यवसायामुळे या मार्गाला महत्त्व प्राप्त झाले होते. वाळवे, पुसवळी ही या मार्गातील महत्त्वाची ठिकाणे होती.

- मराठा कालखंडातील आठवा मार्ग म्हणजे पुणे पंढरपूर होय. या मार्गावरील मांडवे, तेहूर, पाटसे, सांगवी व अकलुज ही महत्त्वपूर्ण केंद्र होती. या केंद्रामुळे या मार्गाला महत्त्व आले होते.

- मराठा कालखंडातील नववा महत्त्वपूर्ण मार्ग म्हणजे पुणे ते सातारा होय. सासवड, शनीवारवाडा, पुणे, जेजूरी, दहिगोंड, महौती ही या मार्गावरील महत्त्वाची ठिकाणे. राजधानीशी संबधीत असल्याने या मार्गाला महत्त्व प्राप्त झाले होते.

- मराठा कालखंडातील पुणे ते औरगांबाद हा एक दहावा महत्त्वपूर्ण मार्ग प्रचलीत होता. कोरेगाव, रांजनगाव, घोडनाडी, जतगाव, अहमदनगर, ही या मार्गावरील महत्वाची केंद्र होती. हा महामार्ग अत्यंत उपयुक्त असा महामार्ग होता. या मार्गातून अन्नपदार्थाची वहातूक मोठ्या प्रमाणात होत असे. व्यवसाय-व्यापाराच्या दृष्टीने हा मार्ग महत्त्वाचा ठरला होता.

mumotes.in

- मराठा कालखंडातील पुणे नागपूर हा अकरावा मार्ग औरंगाबाद, दहाडी, जाफराबाद, बाळापूर, आणि अलजापूर केंद्राना जोडणारा होता.

- मराठा कालखंडातील पुणे ते धारुर हा बारावा महत्त्वपूर्ण मार्ग होता. या मार्गावरील थेऊर, वाळवी, अडळगांव, भोसगाव, सांगवी, घानोरा, बारसी, पाणगाव, पेडगाव, बिड आणि कागे ही महत्त्वपूर्ण केंद्र होती. हा मार्ग आजच्या मराठवाडयाशी जोडणारा होता.

- मराठा कालखंडातील पुणे सोलापूर हा तेरावा महत्त्वपूर्ण मार्ग होता. सोलापूर हा कापड व्यापार केंद्र असल्याने या मार्गाला महत्त्व होते. अर्लीकांचन, बेलसर, जेजुरी, पंढरपुर, भानहोळगाव व जुन्नर ही या मार्गावरील प्रमुख केंद्र होती.

- मराठा कालखंडातील इतर मार्गातिल पुणे वगळता कल्याण औरगांबाद हा एक मार्ग प्रचलीत होता. कल्याण, मुरबाड, उंबरपाडा, तळोली मालसेज, पिंपळगाव व जुन्नर ही मार्गावरील महत्त्वपूर्ण केंद्र होती.

पुणे, सातारा, कोल्हापूर व कोकण यांना जोडणारे रस्ते पचलीत होते.

सर्वसाधारण वाहातुक व दळणवळण या घटकाची माहिती पहात असताना आपल्याला असे दिसून येते की पुणे हा वहातूकीचा व दळणवळणाचा केंद्रबिंदू होता. व पुण्याहुन राज्य व केंद्रसत्तेशी संबधीत असणारे मार्ग जोडले होत. परिणामी सर्व बाजूच्या मार्गाचा संबध पुण्याबरोबर येत होता. एकंदरीत मराठा कालखंडातील वहातूकीचे मार्ग आपण पाहिले आहेत. मात्र हे वाहतूकीचे मार्ग आधुनिक कालखंडाप्रमाणे प्रचलीत असणाऱ्या रस्त्यांसारखे नव्हते. रस्ते ओबडधोबड होते. त्यामुळे वहातूकीस उशीर होत होता. असे जरी असले तरी वरील प्रमुख केंद्राचा संबध व्यापारनिमित्त येत असल्याने या वहातूक मार्गाचा फायदा या व्यापारी केंद्राना होत होता. त्यामुळे या कालखंडातील वाहतूक व दळणवळण व्यवस्थेचा विकास होण्यास मदत झाली होती.

१२.५वाहतूक व दळणवळणाची साधने

मराठ्यांच्या कालखंडात वहातूकीसाठी वेगवेगळया साधनांचा वापर केला जात असे. या साधनांमध्ये प्रामुख्याने बैल, गाढव, म्हैस, उंट बैलगाडया, पालख्या, डोली व होड्या या साधनांचा समावेश होता. तर काही ठिकाणी वेळ प्रसंगी स्त्री-पुरुषांद्वारे डोक्यावरुन मालाची वहातुक केली जात होती. मराठ्यांच्या वहातूकीच्या साधनांचा अभ्यास करत असताना आपणास शिवकाळातील वहातूकीची साधने व पेशवेकाळातील वहातूकीची साधने अशा दोन कालखंडातील वहातूकीच्या साधनांचा विचार करावा लागेल. सर्वप्रथम आपण शिवकाळातील वहातूकीच्या साधनांचा विचार करु व तद्नंतर पेशवेकाळातील वहातुकीचा साधनांचा अभ्यास करु.

१) शिवकाळातील वहातूकीची साधने:

शिवकाळातील वहातूकीच्या साधनांचा विचार करता आपणास बैल, गाढव, म्हैस, उंट, बैलगाड्या पालख्या, डोली, होड्या ही वहातूकीची साधने होती असे दिसते. काही ठिकाणी स्त्री-पुरुष डोक्यावरुन वहातूक केल्याचे आढळून आले आहे.

- **प्राणी:** शिवकाळात वहातूकीसाठी ज्या प्राण्याचा वापर केला जात होता. त्या पैकी वहातूकीसाठी सर्वात जास्त वापर हा बैलाचा केला जात होता. सर्वसाधारण घाटमार्गातून जर जड मालाची वहातूक करायची असेल तर अशा प्रकारच्या मालवाहतूकीसाठी बैलाचा वापर केला जात असे. धान्य अथवा सामान भरलेली पोती बैलावर लादून व्यापाऱ्यांचा तांडा एका ठिकाणाहुन दुसऱ्या ठिकाणी जात असे. प्रत्येक बैलाच्या पाठीवर ३०० ते ३५० पौंड वजनाचा माल वाहुन नेला जात असे. बैलाचा वहातूकीसाठी वापर केला जात होता याची माहिती डॉ. फ्रायर या प्रवाशांनी आपल्या प्रवास वर्णनात लिहून ठेवली आहे. त्याचे म्हणने असे आहे की नाना घाटातून प्रवास करताना मी मीठाची वहातूक करणारे तीनशे बैल पाहिले आहेत. या वरुन या काळात वहातूकीचे साधन म्हणून बैलाचा वापर केला जात होता हे सिद्ध होते. बैला व्यतिरिक्त वहातुकीसाठी इतर प्राण्यांचा सुद्धा उपयोग केला जात होता. या प्राण्यांमध्ये घोडा, गाढव, म्हैस व उंट या प्राण्यांचा समावेश होता. पन्हाळ्यावरुन ३० तोफा वाहुन नेण्यासाठी म्हशींचा वापर केल्याची माहिती उपलब्ध आहे. तुकाराम महाराजांच्या साहित्यात माल वाहुन नेण्यासाठी उंटाचा वापर केला जात होता असा उल्लेख आहे.

- **बैलगाड्या :** शिवकाळात वहातूकीसाठी बैलगाड्यांचा वापर केला जात असे. जड मालाची वहातूक असेल तेव्हा जास्त प्रमाणात बैलगाड्या वापरल्या जात असत.

- **होड्या:** या वहातूक साधनाचा वापर जास्त प्रमाणात कोकणात केला जात होता. कोकणातील तांदूळ, नागली, मीठ आणि इतर मालाच्या वहातूकीसाठी होड्यांचा उपयोग केला जात होता. एका बंदरातून दुसऱ्या बंदरात माल घेवून जाण्यासाठी होड्यांचा वापर केला जात असे. हे वहातूकीचे साधन त्या काळात स्वस्त होते.

- **पालखी:** हे शिवकाळातील प्रवासी वहातूकीचे महत्वपूर्ण साधन होते. श्रीमंत व्यक्ती या प्रवास साधनाचा जास्त प्रमाणात वापर करत होते. म्हणूनच पालखी हे श्रीमंताच्या वहातूकीचे एक साधन मानले जात होते. पालखीद्वारे प्रवासी वहातूक त्या काळात धोक्याची असे. म्हणूनच पालखीच्या सोबत अंगरक्षक असत ही वहातूक प्रतिष्ठीतांसाठी असल्याने त्यांच्या दृष्टीने ही वहातूक महत्वाची मानली जात होती.

  एकंदरीत शिवकाळातील वहातूकीच्या साधनांचा विचार करता ही साधने परंपरागत होती. तटपुंजी होती. म्हणून या बाबत अंबेकर हा फ्रेंच प्रवासी म्हणतो महाराष्ट्रात शिवकाळात समुद्रमार्गी अथवा जमीनीवरुन प्रवास करणे ही अतिशय कठीण बाब होती. बैल, घोडे, म्हैशी, उंट, होडी, या प्राण्यांकडे असणाऱ्या गतीवरुन ही वहातूक मंदगतीने होत होती असे ही स्पष्ट होते. असे जरी असले तरी वाहतूकीची साधने म्हणून या प्राण्यांना महत्त्व होते असे दिसून येते.

- **मानव:** प्राण्याव्यतिरिक्त काही ठिकाणी मालाच्या वहातूकीसाठी मानवाचा वापर सुद्धा केला जात होता असे दिसते. स्त्री-पुरुषांचा वापर डोक्यावरुन माल वाहून नेण्यासाठी केला जात होता. या वहातूक करणाऱ्यांना शिवकाळात ओझेकरी बेगर असे म्हटले जात होते. यावरुन मानवी श्रमशक्तीचा सुद्धा वहातूकीसाठी वापर केला जात होता हे सिद्ध होते.

२) पेशवेकाळातील वहातूकीची साधने:

शिवकाळाप्रमाणेच पेशवेकाळात सुद्धा वहातूकीच्या साधनांचा वापर केला जात होता. बैल, घोडे, उंट, तडी आणि म्हशी तसेच बैलगाड्या व मानवी श्रमशक्ती शिवकाळा प्रमाणेच वापरली जात होती. मात्र जलवहातूकीसाठी वापरल्या जाणाऱ्या साधनामध्ये बदल झाल्याचे जाणवते. होडी ऐवजी नावा, जहाजे, गॅलीवॅट तरुस, तराडे आणि गुराब या निरनिराळ्या जहाजांचा वापर होवू लागला होता. जलवाहतूकीची जी साधने होती त्यांचा वापर कोकणात मोठ्याप्रमाणात केला जात होता.

मराठ्यांच्या वहातूकीच्या साधनांची माहिती पाहिल्यानंतर जरी ही वहातूकीची साधने आपल्याला परंपरागत पद्धतीची व जुन्या नमुण्याची अथवा कार्यक्षमतेची असली तरी त्या कालखंडाच्या गरजेला अनुरुप व पुरक होती. रस्त्यांचे वेडे वाकडे व उंच-खोल स्वरुप जर लक्षात घेतले तर ही साधने त्या दृष्टीने पुरक होती हे आपण नाकारु शकत नाही. शिवकाळातील साधने व पेशवेकाळातील वहातूक साधने ही रस्ते वहातूकीसाठी सारखीच होती. मात्र जलवहातूकीच्या साधनात शिवकाळा पेक्षा पेशवेकाळातील वहातूक साधनात आपणास वाढ झाल्याचे दिसून येते. परिणामी शिवकाळापेक्षा ही जलवहातूकीच्या साधनात वाढ झाल्याचे आपण नाकारु शकत नाही.

१२.६उद्योग आणि व्यापाराची सुरक्षा

मराठा कालखंडात मराठ्यांचे सरकार उद्योग व व्यापाराच्या सुरक्षकडे लक्ष देत असे. वहातूक व दळणवळणाचे उपयुक्त मार्ग म्हणजे रस्ते या रस्त्यांकडे तसेच रस्त्यांच्या सुरक्षीततेकडे जास्त लक्ष दिल्याचे आपणास दिसून येते. याची काही उदाहरणे आहेत ती पुढे नमुद करण्यात आली आहेत.

- एस. एन. सेन यांचे म्हणने असे आहे की मराठा सरकारने १७८३-८४ मध्ये शिवनेरीच्या मामलेदाराला शिवनेरी ते मालसेज हा मार्ग सतत दुरुस्त करत रहा असा आदेश दिला होता. या वरुनच या कालखंडात वहातूक सुरक्षीततेकडे व रस्ते दुरुस्तीकडे लक्ष दिले जात असे असे दिसून येते.

- भावे यांचे म्हणने असे आहे की मराठा कालखंडात उद्योग व व्यापार सुरक्षीततेसाठी प्रयत्न केले जात होते. याही पुढे जावून पेशवा नानासाहेब यांनी आपल्या कारकर्दित ज्या ज्या ठिकाणाहून रस्ते वहातूक होते अशा रस्त्यांच्या दुतर्फी झाडे लावण्याचे आदेश दिले होते. यावरुनच त्यांचा हा एक वेगळ्या प्रकारचा वहातूक सुरक्षीततेचा दृष्टीकोन होता असे जाणवते.

- मराठा कालखंडात व्यापार व उद्योगांच्या सुरक्षीततेसाठी जे वेगवेगळे मार्ग अवलंबीले जात होते. त्यामध्ये जे व्यापार व व्यवसाय करणारे तसेच व्यापारा निमित्त मालांची वहातूक करणारे लोक होते. अशा लोकांसाठी धर्मशाळा बांधण्यात आल्या होत्या. या धर्मशाळांमध्ये त्यांचा माल सुरक्षीत राहु शकेल तसेच त्यांची रहाण्याची व्यवस्था सुरक्षीत होवू शकेल अशी व्यवस्था करण्यात आली होती. याही पुढे जावून व्यापाराच्या निमित्तान प्रवास करणाऱ्या प्रवाशांना पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी म्हणून रस्तेवहातूकीच्या ठराविक अंतरावर गरजेनुसार पिण्याच्या पाण्याच्या विहिरी निर्माण करण्यात आल्या होत्या. यातून निवास,

munotes.in

सुरक्षीतता व तहाण या व्यापारी वर्गाच्या गरजा भागत होत्या. यातूनच व्यापारी वर्गाच्या सुरक्षीततेसाठी प्रयत्न केले जात होत असे दिसून येत.

- मराठा कालखंडात व्यापाऱ्यांना रस्ते वहातूक करत असताना बैलगाड्या व हमाल पुरवत असे मात्र याचा मोबदला अशा प्रकारची सेवा ज्यांना दिली जात असे त्यांच्याकडून या लोकांना द्यावा लागत असे. परिणामी या लोकांना तर रोजगार उपलब्ध तर होत असे पण त्याही पेक्षा महत्त्वाचे म्हणजे व्यापाऱ्यांनाही सेवा पुरवीली जात असे. त्याचा फायदा व्यापाऱ्यांनाही होवून त्यांचा माल सुरक्षीत जागी पोहचत असे.

- डॉ. होवे यांचे म्हणने असे आहे की मराठा कालखंडातील प्रशासनाने महत्त्वपूर्ण राजमार्गाच्या ठिकाणी तपासणी नाक्यांची निर्मिती केली होती. या तपासणी नाक्यांवर सुरक्षा रक्षक नियुक्त करुन सेवेसाठी ठेवले होते. त्यांच्याकडे संपूर्ण सुरक्षीततेची जबाबदारी नव्हती. मात्र ते ज्या ठिकाणी असत त्या ठिकाणच्या सुरक्षीततेचे काम त्यांना करावे लागत असे.

उद्योग आणि व्यापार सुरक्षीततेबाबत सेन, भावे व होवे या तीन महत्त्वपूर्ण व्यक्तींची विचारात्मक विधाने आपण जानून घेतली आहेत सेन यांच्या म्हणण्यातून रस्ते दुरुस्तीबद्दल प्रयत्न होत होते असे दिसत, भावे यांच्या म्हणण्यातून व्यापार रस्ते सुरक्षीतते बरोबरच रस्त्यांच्या दुतर्फी झाडे लावणे या उदात जाणीवेची माहिती मिळते. याही पुढे जावून होवे यांच्या म्हणण्यातून तपासणी नाके व सुरक्षारक्षक याची मदत यांची माहिती मिळते. यातूनच या कालखंडात उद्योग व व्यापार यांच्या सुरक्षीततेसाठी प्रयत्न केले जात होते असे दिसून येते. धर्मशाळांची निवासासाठीची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची पिण्यासाठीची उपलब्धता, रस्ते वहातूकीसाठीची हमाल व बैल गाडयांची मदत या सर्व सेवात्मक जाणीवा व सुरक्षीतेचे प्रयत्न हे सर्व चित्र मराठा कालखंडातील उद्योग व व्यापार सुरक्षीतता चित्र स्पष्ट करण्यास मदत करतात.

१२.७ जलमार्ग वहातूक व दळणवळण

मराठा कालखंडातील वहातूक व्यवस्थेचा विचार करत असताना सर्वप्रथम आपण रस्ते वाहतूकीचा विचार केला. या वहातूकीचा विचार करत असतांना वहातूकीच्या मार्गाबरोबरच वहातूकीची साधनेही अभ्यासली. या वहातूकीनंतर आता आपण मराठा कालखंडातील जलमार्ग वहातूकीचा विचार करत आहोत.

मराठा कालखंडात कृष्णा व गोदावरी नदीच्या २०० मैल व्यापत प्रदेशातून जलवाहतूक केली जात होती. गोदावरी नदी नाशिक, अहमदनगर, औरगांबाद व नांदेड जिल्ह्यातून वाहते. या मार्गातून या कालखंडात जलवाहतूक केली जात असे. या शिवाय भीमा व निरा या नद्यांमधूनही वहातूक केली जात होती. मराठा कालखंडात कृष्णा, गोदावरी, भीमा व तिरा या नद्यांमधून होणाऱ्या वहातूकीमूळे मराठ्यांच्या आर्थिक विकासाला चालना मिळाली होती.

इग्लीश फॅक्टरी रेकॉर्डनुसार शिवकाळात पेण व कुलाबा जिल्हयातील आंबा व नागोठणा या नद्यामधून व्यापारी मालाची वहातूक होत असे. मुंबईतील इंग्रज व्यापारी व शिवाजी महाराजांच्या राजवटीतील अधिकारी या नद्यामधून मालाची वहातूक करुन व्यापार करत असत.

मराठ्यांच्या शिवकाळातील वहालूकीचा विचार करता कृष्णा, गोदावरी, भीमा, निरा, अंबा व नागोठणे ही जलवहातुकीची प्रमुख ठिकाणे ठरली होती. वस्तु व मानवी वहातुक या जलवाहतूकीच्या माध्यमातून केली जात असे. शिवाजी महाराजांनी आपल्या कारकिर्दीत व्यापार

उत्तेजनासाठी व मनुष्य वहातूकीसाठी नदीमार्ग वहातूक व जलमार्ग वहातूकीस उत्तेजन दिल्याचे दिसून येते त्याच बरोबर ही वहातूक व्यवस्था टिकून रहावी या साठी प्रयत्न केल्याचे समजते.

शिवकाळा प्रमाणेच पेशवेकाळातसुद्धा नदीमार्गे व सागरमार्गे जलवाहतूक केली जात होती. महाराष्ट्रात कृष्णा, भीमा गोदावरी या नद्यातून ही वहातूक केली जात होती. वहातूकीसाठी बोटीच्या वापर केला जात होता. दाभोळ, चौल या बंदरात माल घेऊन जाण्यासाठी पश्चिम घाटातील नद्यांचा वापर केला जात होता. कुलाबा जिल्ह्यातील पेण, नागोठणे व आंबा नदीतून नौकानयन होत असे. त्याच बरोबर या ठिकाणच्या नद्यामधून जहाजे व लहान नावा सुद्धा नेल्या जात असत.

पेशवेकाळात या व्यतिरिक्त ज्या ठिकाणी नावेतून वहातूक चालत होती त्या ठिकाणामध्ये माहिम परगण्यातील दांतिवारे, या ठिकाणच्या समावेश आहे. जामगांवकर्डे परगण्यातील सिन्नर मांडवे खाडीवरील उंदेरी तालुका घोडाबंदर ठाणे, भोगपूर नाशिक, राहुरी, संगमेश्वर, बेलापुर, देपूर इत्यादी ठिकाणातून नावेतून वहातूक चालत असे. १७५५ मध्ये पेशव्यांनी कमाविसदारांना १०० ते १२५ प्रवासी नेता येतील अशा भक्कम नावा तयार करण्याचे आदेश दिले होते. गोदावरी, प्रवरा, घोडनदी, भीमा, कृष्णा या नद्यांचा वापर पेशवेकाळात जलवाहतूकीसाठी केला जात होता.

पेशवे काळात सागरी वहातूकीला महत्त्व आले होते. चौल, दाभोळ, कल्याण, भिवंडी, राजापूर, कोळसी, विजयदुर्ग, सिंधूदुर्ग या महत्वाच्या दुव्यांना जोडण्यासाठी या वहातूक व्यवस्थेचा उपयोग होवू लागला होता.

रस्तेवहातूकीपेक्षा जलवहातूक स्वस्त होती. परिणामी या वहातूकीच्या माध्यमातून शिवकाळ व पेशवेकाळात मालाची ने आण करण्यासाठी म्हणजे आयात निर्यात करण्यासाठी या वहातूकीचा वापर जास्त प्रमाणात होवू लागला होता. जलवहातूकीचे मार्ग व जलवहातूकीसाठी आवश्यक असणारी नाव, गॅलीवॅट, तरुस, तराडे, गुराबा, ही साधने तसेच मोठ मोठी प्रवास वहातूकीची जहाजे या मुळे मराठ्यांच्या कालखंडात जलवहातूकीचा विकास झाला होता असे दिसून येते.

होवे यांचे म्हणणे असे आहे की मराठ्यांच्या कालखंडात ज्या बोटी वापरल्या जात होत्या त्यांची क्षमता १०० ते १२५ माणसे वाहुन नेण्याची होती. या बोटी नागोठणे, पेण, बानकोट, माहिम या ठिकाणात माणसे व मालाची अंतर्गत व बाह्य वहातूक करण्यासाठी सज्ज असत.

१२.८उद्योग आणि व्यापारातील समस्या

मराठा कालखंडातील शिवकाळ व पेशवेकाळ या कालखंडात उद्योग आणि व्यापार यांचा जरी उगम व विकास झाला असला तरी या बाबत काही समस्या होत्या याचा विचार होणे आवश्यक आहे. मराठा कालखंडात उद्योग व व्यापार या बाबत समस्या निर्माण करणारे अनेक घटक होते या घटकामुळे उद्योग व व्यापारावर जे परिणाम घडून आले, मराठ्यांच्या कालखंडातील उद्योग व्यापारांचे नुकसान झाले ते कधीही भरुन निघणारे नव्हते. म्हणूनच आपण या ठिकाणी मराठ्यांच्या उद्योग व व्यापारात समस्या निर्माण करणाऱ्या घटकांची माहिती पाहणार आहोत. हे घटक खालील प्रमाणे आहेत.

- **अचानक होणारे हल्ले:** मराठा कालखंडात कधी कधी मराठ साम्राज्यावर तर कधी कधी मराठ्यांच्या व्यापारी केंद्रावर अचानक शत्रुंचे हल्ले होत असत. अशा हल्ल्यांच्या प्रसंगी शत्रु या व्यापारी केंद्रातून प्रचंड महत्वपूर्ण वस्तूंची लुटालूट करत असत. याही पुढे जावून ते

व्यापारकेंद्रातील मालाची नासधुसही करत असत. परिणामी त्यांच्या या वृत्ती-प्रवृत्तीमुळे मराठा राजवटीतील व्यापाराचे, व्यापारांचे तसेच उद्योगांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असे. या घटना अनेक वेळा घडत असत. म्हणूनच ही व्यापार व उद्योगांची एक समस्या बनली होती. या माध्यमातून होणारे नुकसान हे सर्वात जास्त असल्याने ही एक या घटकाची गंभीर स्वरुपाची समस्या होती.

- **चोरी:** मराठा कालखंडात व्यापार व उद्योगांना संरक्षण होते. मात्र वाहतूक व दळणवळणाच्या साधनांचा विचार करता ही साधने म्हणावी तितकेशी विकसित झाली नव्हती. रस्ते वहातूक दुर्गम भागातून होत असताना व्यापाऱ्याच्या मालाच्या चोऱ्या झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. म्हणजेच चोऱ्या करणाऱ्या चोरांचा, लुटारुनचा या व्यापाऱ्यांना व उद्योगाना उपद्रव होत होता हे आपण नाकारु शकत नाही. परिणामी यातून या लोकांचे नुकसान होत होते. म्हणुनच ही व्यापार व उद्योगाची समस्या होती.

- **युद्ध:** मराठा कालखंडात होणारी यद्ध ही सुद्धा व्यापार व उद्योगाची समस्या बनली होती. शिवकाळात या समस्येला उग्र रुप नव्हते. मात्र पेशवेकाळात या समस्येने उग्र रुप धारण केले होते. १७७४-७५, १७७८-७९ व १७८०-८१ या कालखंडात ॲग्लो मराठा ही युद्ध झाली. या युद्धात मराठ्यांच्या उद्योगांचे व व्यापाराचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अरब, पोर्तुगीज यांने सुद्धा मराठ्यांच्या कालखंडातील उद्योग व व्यापारांचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले. म्हणुनच सततची होणारी युद्ध ही सुद्धा एक समस्या होवून बसली होती.

- **चाचेगीरी:** समुद्रावर चालणारी चाचेगीरी ही सद्धा मराठा कालखंडातील व्यापाराच्या बाबत समस्या होवून बसली होती. या चाचेगीरीमुळे मराठा कालखंडातील व्यापाऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत होते हे नुकसान मोठ्या प्रमाणात होत असल्याने ते सहजासहजी भरुन निघत नव्हते. म्हणूनच मराठा कालखंडातील व्यापाराची एक समस्या होवून बसली होती.

- **नैसर्गिक आपत्ती:** मराठा कालखंडात जो व्यापार व उद्योग प्रचलित होता याला जर नैसर्गिक आपत्तीचा फटका बसला तर त्यामध्ये व्यापार व उद्योगांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत होते. मराठ्यांचे साम्राज्य जास्त प्रमाणात महाराष्ट्रात पसरले होते. महाराष्ट्राच्या प्राकृतीक रचनेचा व हवामानाचा जर विचार केला तर अशा प्रसंगाना या घटकाला वारंवार सामोरे जावे लागत होते. ही समस्या जरी मानव निर्मित नसली तरी यातून होणारे नुकसान टाळता येण्यासारखे नव्हते. म्हणूनच ही मराठ्यांच्या व्यापार व उद्योगांची समस्या होवून बसली होती.

- **दरोडे:** मराठ्यांच्या कालखंडात व्यापारासाठी व्यापारीपेठा निर्माण करण्यात आल्या होत्या. या पेठा त्या काळात मालाच्या दृष्टीने संपन्न व परिपूर्ण असत. या पेठातून मोठ्याप्रमाणात मालाची खरेदी-विक्री होत असे. मात्र दरोडे खोरांनी अशा व्यापारी केंद्राना लुटल्याची अनके उदाहरणे व संदर्भ आहेत. म्हणूनच ही एक या घटकाची समस्या मानली जाते.

- **परकीय माल:** मराठा कालखंडात परकीय व्यापारी मसाल्याचे पदार्थ व्यापारी पेठांमध्ये आणत असत. त्यांचा वरचष्मा या मालांच्या बाबतीत असे. मात्र त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी परकीय आयात मालावर शिवाजी महाराजांनी जास्त जकात लादण्यास सुरुवात

केली होती. मात्र शिवकाळानंतर ही परिस्थिती बदलल्याने पुढे परकीय माल ही मराठ्यांच्या व्यापाराची समस्या होवून बसली. परकीय माला बरोबर स्पर्धा करणे मराठा कालखंडातील व्यापाऱ्यांना अवघड होवून बसले. म्हणूनच ही एक या घटकाची समस्या होवून बसली.

कार हा फ्रेंच प्रवासी भारतात आला होता तो १६७२ ते १६७४ मध्ये डेक्कनमध्ये होता त्याने असे सांगितले आहे की मराठ्यांच्या काळातील रस्ते वहातूक व जल वहातूक ही वेगवेगठ्या प्रकारची असून ती अतिशय खतरनाक व कठीण आहे. मराठ्यांच्या जलवाहतूकीच्या प्रवासाच्या खर्चाचे स्वरुप कायम आहे मात्र रस्ते वहातूक खर्चामध्ये परिसर व बदलत्या परिस्थितीनुसार बदल झाल्याचे दिसून येते.

त्राव्हीरनिअर याने कोकण भागात प्रवास केला रस्ते व जलवाहतूकीच्या माध्यमातून प्रवास केला त्याने वेगवेगळ्या साधनांचा वापर केला. त्यानेही या बाबत वेगवेगळ्या दरांचा उल्लेख केला आहे.

फॅक्ट्री रेकॉर्डसमध्येही असे सांगितले आहे की मराठ्यांच्या कालखंडातील मार्ग व मार्गाना जोडणारे मार्ग हे असुरक्षीत होते.

या सर्व प्रवाशांनी वहातूक मार्ग व त्याचे स्वरुप स्पष्ट केल्याने आपणास असे जाणवते की या सर्व बाबींचा मराठ्यांच्या व्यापारावर परिणाम होणे साहजिकच आहे. म्हणूनच ही मते सुद्धा मराठ्यांच्या व्यापारामध्ये उद्योगामध्ये समस्या होत्या हे सांगातात. त्यांच्या सांगण्यामध्ये अचूकता आहे असेच दिसते.

मराठ्यांच्या उद्योग आणि व्यापारातील समस्यांचा विचार करत असताना आपणास असे जाणवते की अचानक होणारे हल्ले हे मोठ्या प्रमाणात नुकसान करत होते. चोरी, चाचेगीरी, युद्ध, नैसर्गिक आपत्ती या माध्यमातूनही त्यांचे तसे नुकसान होत होते. असे दिसते. तसेच परकिय मालाबरोबरची स्पर्धा करत असताना होणाऱ्या नुकसानालाही त्यांना सामोरे जावे लागत होते. तसेच वहातूकीचे अडथळे, वहातूकीचे वाढीव दर, मदतनीसाचे दर या सर्व खर्चीक बाबी व नुकसान करणाऱ्या बाबी मराठ्यांच्या व्यापार व उद्योगाच्या समस्या होवून बसल्या होत्या.

१२.९पारपत्र

मराठा कालखंडात पारपत्र ही महत्त्वाची समजली जात होती. मराठ्यांच्या कालखंडात पारपत्र हे त्यांच्या उत्पनाचेही एक साधन होते. पारपत्राची आयडिया मराठ्यांनी पोर्तुगीजापासून घेतली होती. पारपत्र खरेदी करणाऱ्यासाठी व वापरणाऱ्यासाठी त्या कालखंडात नियम करण्यात आले होते. त्या नियमांचे खरेदी करणाऱ्यांना व उपयोग करणाऱ्यांना पालन करावे लागत होते. पारपत्र ही प्रवास करणे, व्यापार करणे, खरेदी करणे, ठराविक काळासाठी वास्तव्य करणे या उद्देशाला अनुसरुन दिली जात होती. या उद्देशाला अनुसरुन तो व्यक्ती याचा वापर करतो किंवा नाही हे सुद्धा पाहिले जात असे.

पारपत्राला ठराविक मुदत दिलेली असे. मुदत संपल्या नंतर पारपत्र रद्द केले जाते असे व नव्याने पारपत्र दिले जात असे. डेक्कन व चौल या ठिकाणी याची व्यवस्था करण्यात आली होती. पारपत्र खरेदी करणाऱ्यांना मुक्त वास्तव्याचा आनंद घेता येत असे त्याच बरोबर बंदरे व किल्ले या ठिकाणी प्रवेश करणे व बाहेर पडणे या कामी पारपत्राचा चांगला उपयोग होत असे. पारपत्र नसणाऱ्या परक्या व्यक्तीना मुक्त संचार मराठ्यांच्या साम्राज्यात करता येत नव्हता तसेच बंदर व किल्ले या ठिकाणीही प्रवेश करता येत नव्हता. अशा जर व्यक्ती अथवा इसम अडथळे तर

त्यांच्यावर कडक कारवाई शिवकाळात केली जात होती. म्हणून या काळात विनापारपत्र कोणीही हिंडणे अथवा फिरण्याचे धाडस करत नव्हता. या पारपत्रा बाबत मराठ्यांची जी कार्यालय होती त्या मध्ये चौल, राजापूर, कल्याण व संगमेश्वर या ठिकाणांचा समावेश होता.

मराठा कालखंडात पारपत्राचे अनेक फायदे मराठ्यांना झाले आहेत. पहिला फायदा म्हणजे पारपत्राच्या परवानगीने मराठ्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होण्यास मदत झाली. दुसरा फायदा म्हणजे आपल्या साम्राज्यात कोणती परकीय व्यक्ती आली आहे. याची माहिती मिळते. तिसरा फायदा म्हणजे ती व्यक्ती कोणत्या उद्देश्याने आली आहे. याचीही माहिती स्पष्ट होत. चौथा फायदा म्हणजे त्या व्यक्तीने खरेदी, विक्री, व्यापार, प्रवास हा कोणताही उद्देश समोर ठेवला तरी आर्थिक दृष्टीने सत्ताधाऱ्यानाच फायदा होता या सर्व गोष्टीचा विचार करता मराठा कालखंडातील शिवकाळ व पेशवेकाळातील ही पारपत्र योजना त्यांच्या साम्राज्याच्याच्या आर्थिक दृष्टीकोनातून व संरक्षणात्मक दृष्टीकोनातून तसेच आंतरराष्ट्रीय सह संबधात्मक दृष्टीकोनातून उपयुक्त होती हे आपण नाकारु शकत नाही

१२.१० घाटातील वाहतूक व दळणवळण

मराठा कालखंडातील रस्तेवहातूक, जलवहातूकीचा विचार केल्यानंतर या ठिकाणी आपण घाटातील वहातूकीचा विचार करणार आहोत. घाटातील वहातूकीचा विचार करत असताना शिवकाळातील घाटातील वहातूक कशी होती व पेशवेकाळातील तीचे स्वरुप कसे होते याची माहिती जाणून घेणार आहोत.

१. शिवकाळातील घाटातील वहातूक व दळणवळण:

महाराष्ट्रातील पठार, पश्चीम, वायव्य व उत्तर या बाजूला विध्यं व सातफडा पर्वत यामुळे पुर्वी कोकण व देश यांचा मार्ग पुर्णपणे बंद झाला होता. पर्वतरांगातून पलीकडे जाण्याचे मार्ग काढणे गरजेचे होते. कोकण व देश यांच्यातील अंतर्गत बाह्य व्यापाराचा विकास होणे आवश्यक होते. यातूनच घाटातील मार्ग व वहातूकीचा विकास झाला.

तत्कालीन पुराव्यांच्या आधारे आपणास पर्वतांच्या रांगातील घाटमार्गाच्या जाळ्याची माहिती मिळते. या काळात घाटमार्गातून पुढील प्रमाणे वहातूक होत होती.

- जुन्नर व कोकण यांना जोडणारा पिंपरी घाट
- मुंबई व पुणे यांना जोडणारा खंडाळा घाट.
- रत्नागिरी व कोल्हापूर यांना जोडणारा पारघाट आंबाघाट, फोंडाघाट, अंबोलीघाट.
- जुन्नर व मुरबाडा यांना जोडणारा नानेघाट

हे सर्व घाट व्यापारासाठी व वहातूकीसाठी वापरले जात होते. या घाटमार्गाची माहिती उपलब्ध असल्याने शिवकाळात घाट मार्ग हे उपलब्ध होते. हे सिद्ध होते.

शिवकाळात घाटमार्गे जी वहातूक होत असे त्या वहातूकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच प्रवाशांच्या सरंक्षणासाठी व वहातूक कराची वसूली करण्यासाठी घाट चौक्या किंवा जकात नाके उभे केलेले असत. या चौक्यांवर घाटपांडे नावाचे अधिकारी असत.

घाटपांडे नावाच्या अधिकाऱ्यांना खालील प्रकारची कामे करावी लागत असत.

- रस्त्यांची देखभाल करणे
- वहातूकीची योग्य व्यवस्था लावणे
- रस्त्यांवर गस्ती ठेवणे
- मदतीनीसांच्या मदतीने जकात वसूल करणे.

घाटपांडे हे पद वंशपरंपरागत मिळत असे त्याच्या मदतीला पथकी, डांगी, पानसरे, मोधवी व मेटकरी हे अधिकारी असत या अधिकाऱ्यांची कामे अशी असत.

पथकी - व्यापारी मालाचे वजन करणे.

पानसरे - वरिल कामामध्ये पथकीला मदत करणे.

मेटकरी - शिपाई म्हणून काम (घाटमार्गातील व्यापाऱ्यांन्या काफिल्याना संरक्षण)

शिपाई हे एका चौकीपासून दुसऱ्या चौकीपर्यंत काफिल्यांना संरक्षण देत होते.

शिवचरित्राच्या संदर्भानुसार पथकी हा अधिकारी जकातीचे दर ठरवून जकात वसूल करत होता. वहानाचा प्रकार, व्यापारी मालाचा प्रकार व व्यापारी मालाचे वजन याला अनुसरुन जकार कर वसूल केला जात होता. जो जकात वसूल केला जात असे त्याचा दरमहा हिशेब घाटपांडेला दिला जात असे. रक्कम जमा करत असताना हे अधिकारी आपला हिस्सा काढून घेत होते.

जकात चूकवून जाणाऱ्या व्यापाऱ्याकडून बाजारपेठेपर्यत पोहचून हे लोक जकात वसूल करत होते. वरिल सर्व माहितीवरुन शिवकाळातील घाटातील वहातूक व दळणवळणाचे चित्र स्पष्ट होते.

२. पेशवेकाळातील घाटातील वहातूक व दळणवळण:

शिवकाळाप्रमाणेच पेशवेकाळात सुद्धा घाट मार्गे वहातूक व व्यापार होत होता. पेशवेकाळात घाट मार्गाचे दोन भागात विभाजन केले होते

- घाटमार्गाचा वरचा भाग
- घाटमार्गाचा खालचा भाग

पेशवेकाळात प्रचलीत असणारे घाट मार्ग असे होते.

१) आंबाघाट २) आंबेनाली किंवा रडतोडीचा घाट ३) आंबोली किंवा पारपोली घाट

४) उंबर्डे ५) कलेथाने ६) कुंभर्ली ७) कमठा ८) तोरण

९) नाने घाट १०) फोंडा घाट ११) भीमा शंकर १२) रंगणा १३) सालपा

घाटमार्गा व्यतिरिक्त विध्यांच्या रांगामध्ये खालील प्रकारचे डोंगर भागातील घाट रस्ते होते.

१) अजंठा २) इवाटाबारी ३) गणेश ४) गोवताला ५) चांदेरी ६) पिंपळगांव ७) बालाघाट ८) राजापूर ९) खेतबारी १०) लरसिंग ११) सोमटना

काटी बोरी, आकारआनी, छत्री, धुलीबारी, सुकलदेवी, व सिंदवा हे डोंगराळ भागातील रस्ते होते. घाटातील रस्ते हे खिंडीतून, डोंगरदऱ्यातून व खेड्याजवळून जात होते.

घाटमार्गातून होणाऱ्या व्यापारास या काळात संरक्षण देण्यासाठी व कराची वसूली करण्यासाठी घाटातील रस्त्यावर ठिकठिकाणी जकात नाकी असत घाटपांडे या कामासाठी अधिकारी असे त्याच्या मदतीस मोधकी, पानसडे, पथकदार, बिडवई, गुजर आणि गुमास्ते हे अधिकारी व शिपाई असत.

घाटमार्गातील रस्ते सुव्यवस्थित ठेवणे हे काम मोथवी नावाच्या अधिकाऱ्याला करावे लागत असे. एका चौकी पासून दुसऱ्या चौकीपर्यंत संरक्षण देणे हे या पथकाचे काम असे. बिडवई नावाचा अधिकारी घाटमार्गातून ये जा करणाऱ्या फिरत्या व्यापाऱ्यांच्या नोंदी ठेवत असे. गुमास्ते मुतालिक हे अधिकारी कारकून म्हणून काम करत होते. प्रवाशांना संरक्षण देणे व कर जमा करणे अशी दोन कामे चौक्यांना करावी लागत असत वहानाचा प्रकार व मालाचे वजन यावर जकात कर अवलंबून असे. निरनिरळ्या प्रांतात कमाविसदार हेच जकात अधिकारी असत. हे सरकारचे अधिकारी असत.

घाटमार्गातील वहातूक खडतर होती. मात्र असे असुनही घाट मार्ग, घाटमार्गाच्या कामासाठी नेमलेले अधिकारी, त्यांच्या माध्यमातून निर्माण करण्यात आलेली सुरक्षा व्यवस्था, कर वसूलीची पद्धती, या माध्यमातून मिळणारे उत्पन्न व वहातूकीची सुनियोजित व्यवस्था या सर्व बाबीमुळे या वहातूकीला या काळात महत्व होते. त्या पेक्षाही महत्त्वाचे म्हणजे या वहातूक व्यवस्थेने कोकण व घाटमाथा हा व्यापारी दृष्टीकोनातून जोडला गेला होता. त्यामुळे या दोन्ही भागातील व्यापारी संबध वाढले होते.

आपली प्रगती तपासा

१) मराठा कालखंडातील व्यापारी वस्तूंची माहिती जाणून घ्या.

२) मराठा कालखंडातील दळणवळणाचे मार्ग जाणून घ्या.

३) मराठा कालखंडातील वहातूकीची साधने जाणून घ्या.

४) मराठ्यांच्या उद्योग व व्यापाराच्या समस्या जाणून घ्या.

५) मराठ्यांच्या कालखंडातील जलमार्गाची माहिती जाणून घ्या.

६) मराठा कालखंडातील पारपत्र पद्धतीची माहिती जाणून घ्या.

७) मराठा कालखंडातील घाटमार्ग वहातूकीची व दळणवळणाची माहिती जाणून घ्या.

१२.११ सारांश

मराठा कालखंडातील व्यापार हा उत्तम होता व्यापाराचे स्वरुप साधे सोपे व सरळ होते. विक्री, बदल, व अदलाबदल या माध्यमातून ही क्रिया पूर्ण केली जात होती. व्यापारीसुद्धा या कामात चांगली सेवा देत होते. व्यापारी एक मेकामध्ये समन्वय ठेवत होते. सामाजिक आर्थिक समन्वयसुद्धा व्यापारी प्रक्रियेच्या माध्यमातून साधला जात असे.

मराठ्यांच्या कालखंडात ज्या प्रमाणे व्यापार प्रक्रियेतील खरेदी-विक्रीस जसे महत्व होते तसेच बाजारातील वस्तूंना महत्व होते. अन्न पदार्थ, मसाल्याचे पदार्थ, सुगंधी पदार्थ, कपडे, फळे, भाज्या, इतर खाद्यपदार्थ, सकिर्ण वस्तू, गुलाम या वस्तू गरजेनुसार मागणीनुसार बाजारात विक्रीसाठी असत.

मराठ्यांच्या कालखंडात वरील माल विक्रीसाठी बाजारपेठत उपलब्ध होत्या. ग्रामीण बाजारपेठा व शहरी बाजारपेठा असे बाजारपेठांचे प्रकार असत. एक दिवसीय बाजार किंवा आठवडा बाजार असे बाजार प्रकार प्रचलित होते. मोठ्या बाजारांना कसबा किंवा पेठ म्हटले जात असे. शेठे-महाजन हे अधिकारी व त्यांची बाजारपेठांच संरक्षण ही बाजारपेठेची जबाबदारी या मुळे ही संकल्पना त्या काळात सुयोग्य बनली होती.

मराठा कालखंडातील शिवकाळातील व पेशवेकाळातील वहातूक व दळणवळणासाठी जे रस्ते वहातूकीचे मार्ग होते ते त्याकाळात नावारुपाला आले होते. पुणे-आगरा मार्ग, मुंबई-पनवेल मार्ग, पुणे-श्रीरंगपट्टम मार्ग, पुणे-बंगलोर मार्ग, पुणे-कोकणमार्ग, पुणे-नाशिक मार्ग, पुणे-कोल्हापूर मार्ग, पुणे-पंढरपूर मार्ग, पुणे-सातारा मार्ग, पुणे-औरगांबाद मार्ग, पुणे नागपूर मार्ग, पुणे धारुर मार्ग, पुणे-सोलापूर मार्ग या सर्व मार्गामुळे रस्ते वहातूकींचा विकास झाला होता.

मराठ्यांच्या कालखंडातील वहातूकीची जी साधने होती त्या मध्ये बैल, म्हशी, उंट, बैलगाड्या होड्या, नाव, मचवे, बोटी, पालख्या, मानवी श्रमशक्ती या सर्व साधनांचा समावेश होता. या सर्व साधनांचा माध्यमातून वहातूकीच्या साधनांचे नियमनन होत होते.

मराठ्यांच्या कालखंडात उद्योग व्यापार सुरक्षीततेची दक्षता घेतली जात होती. रस्ते दुरुस्ती, दुतर्फी झाडे, धर्मशाळा, विहीरी या सुविधा सुरक्षीततेच्या दुष्टीनेच व्यापार प्रक्रियेसाठी उपलब्ध करुन दिल्या होत्या.

मराठा कालखंडातील जलमार्ग त्या कालखंडात अत्यंत उपयुक्त होते नदी मार्गे वहातूक, सागरी वहातूक, माल-साधनसामुग्रीची वहातूक, मानवी वहातूक, नद्या-खाड्यातील वहातूक, सागरी वहातूक अशा या अवस्थेतून ही वहातूक व्यवस्था उत्तम प्रकारे सुरु होती.

मराठ्यांच्या कालखंडातील व्यापाऱ्याला समस्या होत्या, अचानक हल्ले, व्यापाऱ्यांच्या मालाची होणारी चोरी, चाचेगीरी, युद्ध, आपत्ती या माध्यमातून या कालखंडातील व्यापाऱ्यांना समस्या उद्‌भवत होत्या. त्या सोडविण्याचे प्रयत्न सुरु होते.

परवाना घेण्यासाठी पारपत्र पद्धती प्रचलीत होती. उत्पन्नाचे साधन, परवानगीचे साधन, म्हणून या पारपत्राला महत्व होते. पारपत्रामुळे उत्पन्ना बरोबरच कोण येतो. किती दिवस राहतो, कोठून येतो, कोणत्या कामा निमित्त येतो याची माहिती या पारपत्राच्या माध्यमातून समजण्यास मदत होते.

घाटातील वहातूकीचा विचार करता घाटमार्ग त्यांच्या व्यवस्थापनासाठी नियुक्त केलेले अधिकारी, कर वसुलीची पद्धती, व्यापार सुरक्षीतेच्या जबाबदारी बाबतची माहिती व वाहतूक व्यवस्थेतून मिळणारे उत्पन्न या सर्व बाबी जाणून घेतल्या आहेत. घाटवहातुकीमुळे कोकण व घाटमाथा जोडला गेला. या व्यतिरिक्त इतर अनेक घाटसुद्धा जोडल्यांची माहिती आपण स्पष्ट केला आहे.

muotesin

१२.१२ प्रश्न

१) मराठा कालखंडातील वेगवेगळ्या व्यापारी वस्तूची माहिती स्पष्ट करा ?

२) मराठा कालखंडातील वहातूक व दळणवळणाच्या मार्गांचा आढावा घ्या ?

३) मराठ्यांच्या वहातूक व दळणवळण साधनांचा आढावा घ्या ?

४) मराठ्यांच्या जलवहातूक व्यवस्थेची माहिती लिहा ?

५) मराठ्यांच्या उद्योग व व्यापारविषयक समस्यांची माहिती नमुद करा ?

६) मराठ्यांच्या घाटातील वहातूक व दळणवळणावर निंबध लिहा ?

१२.१३ संदर्भ

१) पेशवेकालीन महाराष्ट्र - वा. कृ. भावे.

२) पेशवाईच्या सवलती - ना. गो. चापेकर

३) शिवाजी द ग्रेट - डॉ. बाळकृष्ण

४) Tours for scientific and Economic Research made in Kathewar, Gujarath & Kokan - Dr. Hore

५) A Collection of Treaties, Engagement & Sanads - C. V. Alichision.

६) Angrekalin Patravyavanar - Alaskar S. V.

७) Sprengel's History of the Marathas, to translation by - Prof. R. N. Chapekar.

munotes.in

❖❖❖❖

१३

आर्थिक आणि सांस्कृतिक विकास : चलन आणि बँकिग व्यवस्था

घटक रचना:

१३.० उद्दिष्ट्ये

१३.१ प्रस्तावना

१३.२ मराठ्यांच्या चलन व्यवस्थेबाबतचे ऐतिहासिक संदर्भ

१३.३ मराठ्यांच्या चलनातील सोन्याची नाणी

१३.४ मराठ्यांच्या चलनातील चांदीची नाणी

१३.५ मराठ्यांची अनेक धातू मिश्रीत नाणी

१३.६ मराठ्यांच्या चलनातील तांब्याची नाणी

१३.७ मराठा कालखंडात चलन व्यवस्थेत सुधारणा होण्यासाठी करण्यात आलेले प्रयत्न

१३.८ मराठा कालखंडातील बँकिंग व्यवस्थेचे स्वरुप व कर्ज मिळविण्याची प्रक्रिया

१३.९ मराठा कालखंडातील कर्ज मिळविण्याचे उद्देश

१३.१० मराठा कालखंडातील कर्जावरील व्याजाचे दर

१३.११ मराठा कालखंडातील सरकारी कर्ज पद्धती

१३.१२ मराठा कालखंडातील वसुली पद्धती

१३.१३ पेशवे कालखंडातील बँकिंग व्यवस्था

१३.१४ सारांश

१३.१५ प्रश्न

१३.१६ संदर्भ

१३.० उद्दिष्ट्ये

- मराठ्यांच्या चलन व्यवस्थेची ऐतिहासिक पार्श्वभूमी जाणून घेणे.
- मराठ्यांच्या चलन व्यवस्थेतील सोन्याच्या नाण्याविषयीची माहिती जाणून घेणे.
- मराठ्यांच्या चलन व्यवस्थेतील चांदीच्या नाण्यांची माहिती जाणून घेणे.
- मराठ्यांच्या चलन व्यवस्थेतील धातूमिश्रीत नाण्यांची माहिती जाणून घेणे.

mumotes.in

- मराठ्यांच्या चलन व्यवस्थेतील तांब्याच्या नाण्यांची माहिती जाणून घेणे.
- मराठ्यांच्या चलन व्यवस्थेत झालेल्या सुधारणांची माहिती जाणून घेणे.
- मराठ्यांच्या कालखंडातील बँकिंग व्यवस्थेचे स्वरुप जाणून घेणे.
- मराठा कालखंडातील कर्ज मिळविण्याच्या प्रक्रियेची माहिती जाणून घेणे.
- मराठा कालखंडातील कर्ज मिळविण्या पाठीमागचे उद्देश जाणून घेणे.
- मराठा कालखंडातील कर्जावर आकारल्या जाणाऱ्या व्याजदराची माहिती जाणून घेणे.
- मराठा कालखंडातील कर्ज प्रकारची माहिती जाणून घेणे.
- मराठा कालखंडातील वरात पद्धतीची माहिती जाणून घेणे.
- पेशवे कालखंडातील बँकिंग व्यवस्थेची माहिती जाणून घेणे.

१३.१ प्रस्तावना

मराठ्यांनी आपल्या साम्राज्य व्यवस्थापनामध्ये ज्या प्रमाणे मुलकी, लष्करी व न्याय व्यवस्थापनाला महत्त्व दिले होते तशाच प्रकारचे महत्त्व त्यांनी 'चलन' व 'बँकिंग' व्यवस्थापनालाही दिले होते. 'चलन' व 'बँकिंग' ही दोन्ही माध्यमे आर्थिक विनिमयाशी संबधीत आहेत. मराठ्यांनी या माध्यमांचा वापर महसूल, कर प्रणाली, आयात, निर्यात, वेतन, प्रशासकीय व लष्करी खर्च, इनामे, बक्षिसे, व्यापार, उद्योग, दळणवळण यांच्या व्यवस्थापनासाठी करुन घेतला.

या प्रकरणात आपण मराठ्यांनी आपल्या साम्राज्य व्यवस्थापनातील आर्थिक प्रक्रियेशी संबधीत जी चलन व्यवस्था निर्माण केली होती व जी बँकिंग व्यवस्था निर्माण केली होती त्याची माहिती पहाणार आहोत. मराठ्यांची चलन व्यवस्था पहात असतांना आपण या चलन व्यवस्थेत मराठा कालखंडात प्रचलीत असणारी सोन्याची नाणी, चांदीची नाणी, मिश्रीत धातुची नाणी, तांब्याची नाणी, मराठ्यांच्या चलन व्यवस्थेत झालेल्या सुधारणा, आदी घटकांची माहिती पहाणार आहोत. तर बँकिंग व्यवस्थेची माहिती पहात असतांना बँकिंग व्यवस्थेचे स्वरुप, कर्ज मिळविण्याची प्रक्रिया, कर्ज मिळविण्या पाठीमागचा उद्देश, कर्जावरील आकारले जाणारे दर, कर्जांचे प्रकार, वरात पद्धत व पेशवे कालखंडातील बँकिंग व्यवस्था आदिबाबतची माहिती पहाणार आहोत.

१३.२ मराठ्यांच्या चलन व्यवस्थेबाबतचे ऐतिहासिक संदर्भ

मराठा कालखंडातील चलन व्यवस्थेची माहिती पहात असताना आपणास शिवकाल व पेशवेकाल या दोन्ही कालखंडाचा विचार करावा लागेल. या पैकी शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीचा जर विचार केला तर त्यांची कारकिर्द वादळी व धामधुमीची होती. त्यांना आपल्या कारकिर्दीत चलनव्यवस्थेसाठी स्वतंत्र नाणी निर्माण करण्यासाठी वेळ नव्हता. तरीही त्यांनी सन १६७४ मध्ये आपल्या राज्याभिषेक प्रसंगी व नंतर स्वत:ची नाणी पाडल्याची माहिती पुराव्यासह स्पष्ट झाली आहे.

मराठा कालखंडातील नाण्याविषयीची माहिती आपणास मराठी भाषेतील कागदपत्रात फार दुर्मिळ असलेली आढळते. मात्र 'सभासदाची बखर' व 'चित्रगुप्तांची बखर' या दोन प्रमुख ग्रंथातील उल्लेखावरुन आपणास असे दिसून येते की शिवाजी महाराजांच्या खजिन्यात २१ प्रकारची नाणी प्रचलित होती. या बखरीमध्ये शिवाजी महाराजांच्या कालखंडातील 'होन' या नाण्याच्या प्रकारची माहिती खालील प्रमाणे दिली हे. शिवराई होन, अच्युतराई होन, रामचंद्राई होन, कावेरीपाक होन, गुप्ती होन, सतलाई होन, धारवादी होन, आदवानी होन, ताडपत्री होन, निशाणी होन, सणगरी होन, गडमल होन, एलोरी होन, वेल्लोरी होन, शैलागुरी होन, पादशाही होन, इब्राहीम होन, पुतळी होन, गंबर होन, मोहर होन. या शिवाय जी लहान नाणी प्रचलित होती त्यांची नावे लारी, रुपया, अचऋी, टका, टिपाल, त्रिरुका, रुका, पैसा, दाम, आडका, चवल, दुवल, जितल, पल, बेल किंवा ब्याळ अशी होती.

शिवाजी महाराजांनी आपल्या हिंदू आदर्शांना व परंपराना नजरे समोर ठेवून मूळ प्रमाणभूत नाणे म्हणून विजयनगरच्या होन नाण्याच्या स्विकार केला व स्वतः 'शिवराई' हे सोन्याचे नाणे विजयनगरच्या सोन्याच्या नाण्याच्या धर्तीवर पाडून घेतले. मात्र शिवाजी महाराजांनी पाडून घेतलेली होन ही नाणी व्यापारी वर्ग व जनता यांच्या एकंदरीत मागणीच्या दृष्टीने पुरेशी नव्हती. त्यामुळेच महाराष्र्टत या कालखंडात इतर नाणी चलनात, आलेली आढळून येतात.

मराठ्यांच्या कालखंडात शिवराई होन वगळता बाकी सर्व प्रकारची नाणी महाराष्र्ट बाहेरुन आलेली होती. मात्र ती मराठ्यांच्या चलनात प्रचलित होती. या पैकी काही नाणी ही मोगल, विजापूर, गोवळकोंडा, पोर्तुगीज व इंग्रजांच्या प्रदेशातून आली होती. तर काही नाणी ही विजयनगरच्या कारकिर्दीतील जूनी नाणी होती.

मराठा कालखंडात कोणतेही एक नाणे प्रमाणभूत नव्हते. नाण्याची बाजारी किंमत ही त्या नाण्यामध्ये कोणती धातू वापरली यावरुन ठरत असे साधारणपणे जुनी नाणी ही नवीन नाण्यापेक्षा जास्त किमंतीची मानली जात असत. या नाण्यांचा खरेखोटेपणा तपासण्याचे काम पोतदार करत असत. "सावकाराकडून व जनतेकडून आलेली नाणी तपासण्याचे काम सराफ करीत असत," असे युरोपीयन प्रवासी ट्रॅव्हरनिअरचे म्हणने आहे. थिवेनॉट व अबेकॅर म्हणतो, " लोकसुद्धा नाण्याची परीक्षा घेतल्याशिवाय नाणी स्विकारत नसत. नाणी प्रथम अग्नीत टाकत असत. व जर ते जसेच्या तसे पांढरे निघाले तरच त्याचा स्वीकार केला जात असे. एकंदरीत वरील सर्व माहितीवरुन मराठा कालखंडात नाणे निर्मितीची प्रेरणा कोणापासून घेतली गेली. पुढे स्वतंत्र नाणे निर्मिती कशी झाली. इतर नाणेप्रणाली कशी प्रचलीत होती. साम्राज्य बाह्य नाण्यांचा चलन विनीमयासाठी कसा वापर केला जात असे या सर्व बाबींची माहिती आपण या चलन व्यवस्थेच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीमध्ये जाणून घेतली."

१३.३ मराठ्यांच्या चलनातील सोन्याची नाणी

मराठा कालखंडात प्रचलित असणाऱ्या सोन्यांच्या नाण्याची माहिती सभासद बखरीत, समकालीन कागदपत्रात, परकीय प्रवाशांच्या प्रवास वृत्तांत व फॅक्टरी रेकॉर्डमध्ये आहेत. शिवकाळात गंबर होन, मोहर, पुतळी, राणगरी होन, शिवराई होन, पादशाही होन, देवराई होन, अच्युतराई होन, सतलामी होन, इब्राहिम होन, दिपकी गुप्ती, धाखाडी, कावेरी पाक चांदवाडी होन, वेंगुर्ला, आदवानी, देवनहळी, व्यंकटराई, त्रिशुकी, ताडपत्री, फणाम काक्रम ही नाणी प्रचलित होती.

१) गंबर होन :

शिवकाळात गंबर होन हे नाणे मुंबईत प्रचलित होते. डॉ. सेन यांनी या नाण्याच्या उल्लेख गब्बर असा केला आहे. या नाण्याची किंमत त्या काळात ३ रुपये १२ आणे ६ पैसे इतकी होती.

२) मोहर होन :

मोहर होन शिवकाळातील सोन्याचा रुपया होता. या रुपयाचा उपयोग राजाला भेट देण्यासाठी केला जात होता. या एका होनची किंमत १३ रुपये इतकी होती.

३) पुतळी होन :

पुतळी होन हे वर्तुळाकृती सोन्याचे बनवलेले असे. या पुतळी होनचा उपयोग पैशाच्या नाण्यापेक्षा दागिन्यासाठी अधिक उपयोग केला जात असे. या काळात एका पुतळी होनची किंमत ४ रुपये होती.

४) देवराई, अच्युतराई व रामचंद्रराई होन :

ही नाणी जरी मराठा कालखंडात प्रचलित असली तरी या नाण्याची निर्मिती अनुक्रमे विजयनगरचे राजे देवराई, अच्युतराई व रामचंद्रराई यांनी केली होती. त्याची घडण विजयनगरच्या 'वराह' नाण्याशी मिळती जुळती होती.

५) टांकसाळीच्या नावाने ओळखली जाणारी नाणी :

शिवकाळात जी टांकसाळीच्या नावाने नाणी ओळखली जात होती त्या नाण्यात कावेरीपाक, गुत्ती, धारवाडी, आद्यानी गडमल सणगरी, चांदवडी, वेल्लोरी, रामनाथपुरी, शेलगुटी इत्यादी नाण्याचा समावेश होतो.

६) गुत्ती व शेलगुटी होन :

गुत्ती व शेलगोटी होन हे गोवळकोंडयाच्या कुतुबशहाने आपल्या कारकिर्दीत निर्माण केले होते. हे नाण्य मराठयांच्या कालखंडात प्रचलित होते.

७) ताडपत्री :

ताडपत्री हे नाणे ताडपत्री या तालुक्याच्या नावावरुन निर्माण करण्यात आले होते

८) काटेरी होन :

काटेरी होन हे म्हैसूर राज्यातून आलेले नाणे आहे. यालाच पॅगोडा असे म्हटले जाते.

९) गोडा :

पॅगोडा हे मूळचे हिंदू नाणे आहे. त्यालाच वराह असेही म्हटले जाते. ही नाणी परकीय स्थानिक राजकर्त्यांच्या परवानगीने आपआपल्या वखारींच्या टांकसळीत पाडून घेत ासत. अशा प्रकारची नाणी या राजांच्या नाण्याशी मिळती जूळती असत. तरीपण त्यांच्या घडणावळीतील सफाईदारपणामुळे सुबकतेमुळे व काही वेळा त्यांच्या विशिष्ट खुणामुळे वेगळी म्हणून ओळखता

munotes.in

येत असत. अशी ही नाणी म्हणजे "अशमोला", "सणगरी", "टिपकी" व "वेंगुर्ला" होन होती. एक सणगरी होन म्हणजे चार रुपये किंमतीचे नाणे होत असे.

बॉ. फ्रायरने असे म्हटले आहे की, "अशमोल या नाण्याची किंमत 'सणगरी होन' या नाण्यांच्या किंमती पेक्षा शेकडा एक ट्क्याने कमी होती".

टॅव्हेरनिअर हा युरोरपिय प्रवासी म्हणतो, "पॅगोडा होन हे नाणे सोन्याचे असून त्याचा आकार करंगळीवरील नखा एवढा असे, ही नाणी इंग्रज व डच व्यापारी तेथील राजाच्या परवानगीने पाडित असत. डच पॅगोडा होनपेक्षा जास्त असे. यावारुन असे दिसते की पॅगोडा व होन ही एकाच किमंतीची नाणी असली पाहिजेत. होन हा शब्द होन्नू शब्दाचा अपभ्रंश आहे तर पॅगोडा हे दक्षिणेतील मंदिराची प्रतिकृती होती तीच मंदिरांची प्रतिकृती घेवून युरोपियनांनी स्वत:ची नाणी पाडली होती."

१०) शिवराई होन :

शिवराई होन हे शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले स्वत:चे नाणे होते. शिवराई हे नाव शिवाजी महाराजांच्या नावाशी निगडीत आहे. सभासद म्हणतात, "शिवाजी महाराजांच्या मृत्यु प्रसंगी त्यांच्या खजिन्यात ४ लाख शिवराई नाणी होते". शिवराई होन हे ४२.१२ ग्रेन वजनाचे होते. या नाण्याच्या मुख्य बाजूस 'शी राजा शिव' असे शब्द छापलेले ासत व मागील बाजूस 'छत्रपती' असे लिहिलेले असे. डॉ. डी. व्ही. काळे यांनी आपल्या शोध निबंधात शिवराई होन बद्दल अशी माहिती लिहिली आहे की, "मी स्वत: या नाण्यांचे परिक्षण केल्यानंतर असे दिसून येते की ही नाणी आकाराने गोल आहेत. त्याचा व्यास १.३२ से.मी. व त्यांचे वजन दोन मासे ७ गुंजा किंवा ४२.१२ ग्रेन होते". "शिवराई होन" नाण्याचा ठसा उमटवलेली एक तांब्याची प्लेट "इंग्लिश रेकॉर्ड ऑन शिवाजी" या ग्रंथात छापली आहे.

११) पादशाही होन :

पादशाही होन मराठ्यांच्या कालखंडात प्रचलित होते. हे नाणे विजापूरच्या राजकर्त्याने पाडले असावे असा अंदाज आहे. हे नाणे औरंगजेबाच्या दक्षिणेवरील स्वारी दरम्यान व तद्नंतरही सुरु होते.

१२) महमदशाही होन :

मराठ्यांच्या कालखंडात प्रचलित असणारे आणखी एक विजापुरी नाणे म्हणजे 'महमदशाही' होन होय. मात्र या नाण्याबाबत इटालियन प्रवासी मनुची म्हणतो, पादशाही होन हे स्वतंत्र नाणे नव्हते. ते महमदशाही होन असले पाहिजे.

या महमदशाही नाण्याचे वजन ५१.५ ग्रेन इतके होते. एका अदिलशाही फर्मानामध्ये महमदशाही नाण्यातील सोन्याची शुद्धता ही ८२.६९% इतकी असल्याचे दिसते. इतिहास संशोधक ग. ह. खरे म्हणतात की ४% सोन्याच्या शुद्धतेचा हा फरक पडला हे तो दुर्लक्षित केला पाहिजे. कारण आजच्यासारखी सोन्याची शुद्धता तपासण्याची पद्धती त्या काळात नव्हती.

१३) निशाणी होन :

मराठ्यांच्या कालखंडात प्रचलित असणारे आणखी एक नाणे म्हणजे निशाणी होन होय. आदिलशाही राजवटीत खाजगी व्यक्तीनी आपल्या स्वत:च्या टांकसळीत पाडलेल्या सोन्याच्या

नाण्याला 'निशाणी होन' असे नाव होते. निशाणी म्हणजे चिन्ह अशा नाण्यावर एखादे चिन्ह असे. बहुतेक राज्यांच्या परवानगीने सोनार लोकच अशी नाणी पाडत असत.

ग. ह. खेर या इतिहास संशोधकांनी सावंतवाडीच्या चिटणीस दप्तरात सापडलेल्या एका कागदपत्रात 'निशाणी होन' ची माहिती असल्याचे सांगितले आहे. वेंगुर्ला येथील टांकसळीत असे होन तयार होत असत. मनुची नावाचा इटालीयन प्रवासी म्हणतो. शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर औरंगजेबाने दक्षिणेवर स्वारी केली त्यावेळी मराठा प्रदेशात त्यांने वेगुर्ल्याच्या वाटेने प्रवेश केला. तेव्ह तेथील सरदेसाई नावाच्या माणसाने औरंगजेबाकडून निशाणी होन मिळविण्याचा परवाना मिळविला होता.

मराठ्यांच्या राजवट कालखंडात शिवकाळाप्रमाणेच पेशवेकाळात सुद्धा सोन्याची नाणी प्रचलित होती. नाण्याचा वापर चलनात होत हाता मात्र त्यांचे प्रमाण हे फार कमी होते.

१) मोहरा :

पेशवेकाळात मोहरा हे सर्वात श्रेष्ठ प्रतीचे सोन्याचे नाणे होते. हे नाणे अहमदाबादी, पुणेरी, औरंगबादी, जयनगरी, चिंचवड, अलमशाही, शेरशाही, बऱ्हाणपुरी, तळेगावी या नावाने ओळखले जात असे. मोहरा या नाण्याचे नाव बहुधा त्या ठिकाणच्या टांकसळीवरुन घेतले जात असावे. मोहराचे वजन पाडून तोळा, पावणे दोन मासे व एक गुंज इतके असे.

२) होन :

पेशवेकाळातील सोन्याचे आणखीन एक नाणे म्हणजे होन. मोहरा पेक्षा अधिक गावी हे नाणे पाडले जात असे. एलोरी, हैदरी, सनगिरी, धारवाडी, दुर्गी, सावनुरी, नागरपट्टणी, अच्युतराई, हरपनहळली, व्यंकटपती महमदशाही इत्यादी होन पेशवेकाळात प्रचलित होत.

१३.४ मराठ्यांच्या चलनातील चांदीची नाणी

मराठ्यांच्या कालखंडामध्ये ज्या प्रमाणे चलन व्यवस्थेत सोन्याची नाणी प्रचलित होती त्या प्रमाणेच चांदीची नाणीही प्रचलित होती. मात्र चांदीच्या नाण्याची माहिती पहात असताना आपणास एक गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे ती म्हणजे शिवकाळात चांदीची नाणी पाडली गेली नाहीत. ती इतर राज्यातून व परदेशी राजवटीतून पाडलेली होती व ती मराठ्यांच्या चलनव्यवस्थेत आलेली होती. शिवकाळात रुपया, लारी, वटका ही चांदीची नाणी अत्यंत लोकप्रिय झाली होती. या शिवाय अश्रफी, अब्बासी, रियाल, महमुदी ही नाणी सुद्धा प्रचलित होती तर पेशवेकाळात रहिमतपुरी, मलकापुरी चांदवड, चिंचवड, सुरती, इंग्लिश, बागलकोटी, महमदशाही, जुन्या पंचमेल, जुनी औरंगाबाद, अहमदाबादी, लातुरी नवी औरंगाबाद, गंजीकोट, अकार्ट, मिटे, मल्हारशाही हाली सिका, कौर-फरशी, चतरसिमी, साटोळी, त्रिशुली, गजापुरी, बावडी, भुंडे, मुंबई, भातवाडी, शाहु, शिक्का, वाई शिक्का, अकार्ट-फुलचरी, मोहरा, आमदशाही, महमदशाही, मुहर, अर्काट, गंजीकोट, जोगीनी वज्र आलमगिरी, जुबा शिवराई, मिरजी-मलकापुरी, निळकंठी, इटाव भडोची, कल्याण, चाल, दौलताबादी, डुकेरी, तळेगावी, पुणे-चलन, पुणे सिक्का, कल्याण-सिक्का जरी पटका इत्यादी नाणी प्रचलित होती. या सर्व नाण्याची सविस्तर माहिती खाली नमुद करण्यात आली आहे.

muquestion.in

१. शिवकाळातील चांदीची नाणी :

शिवाजी महाराजांनी आपल्या राजवटीत चांदीची नाणी पाडली नव्हती. मात्र त्यांच्या चलन व्यवस्थेत जी चांदीची नाणी आली होती ती इतर राज्यातून व परदेशातून आली होती. अशा या चांदीच्या नाण्यांची माहिती पुढील प्रमाणे आहे.

१) रुपया :

शिवकाळात चांदीचे जे रुपया हे नाणे होते ते १८० ग्रेन म्हणजे १ तोळा वजनाचे होते. या रुपयावर हिजरी सन लिहिलेला असे. या रुपयाचा खरेदी व विक्रीचा दर वेगळा असे उदा. अलमगिरी रुपयाचा खरेदी दर १६ तनका, ९ दाम असे सराफ लोक असा खरेदी-विक्रीचा धंदा करुन नफा मिळवत असत. शिवकाळात चांदीच्या रुपयाचे शहाजनी रुपया, चलनी रुपया, खजानी रुपया असे प्रकार होते.

२) अश्रफी :

शिवकाळात अश्रफी हे चांदीचे नाणे प्रचलित होते. 'अश्रफी' म्हणजे मूळच्या 'झेराफीन' नाण्याचा अपभ्रंश होय. या नाण्याची किमंत ३०० री इतकी अथवा १ रिलिंग ६ पेन्स इतकी होती.

३) अब्बासी :

शिवकाळात जे अब्बासी हे चांदीचे नाणे प्रचलित होते ते विदेशी नाणे होते. ते पर्शिया देशाचा राज्यकर्ता राहा अब्बास यांच्या नावावरुन पाडण्यात आले होते. अब्बासी या नाण्याची किमंत १६ पेन्स होती. डॉ. रायर थिवेनॉट म्हणतो हे नाणे सुरत शहरात मोठ्या प्रमाणात चलनात होते. त्याची किमंत १८ पेन्स होती.

४) महमुदी :

शिवकाळात जे महमुदी नाणे प्रचलित होते ते विजापूरच्या महमद अदिलशहाच्या नावाने पाडण्यात आले होते. थिवेनॉट, डॉ. फ्रायर व टॅव्हेरनिअर या युरोपियन प्रवाशांच्या लिखानात व दक्षिण भारताच्या 'Factory Records' मध्ये महमुदी या नाण्याचा उल्लेख आला आहे. थिवनॉट यांच्यामते महमुदी या नाण्याची किमंत रुपयाच्या २/५ इतकी होती.

५) लारी :

शिवकाळातील लारी हे चांदीचे जे नाणे प्रचलित होते त इराणच्या आखातातील 'लारी' या गावी पाडलेले होते. पुढे या प्रकारचे नाणे चांदीच्या उपलब्धतेमुळे भारतातील चौल, दाभोळ, भिवंडी येथेही पाडले जावू लागले. ज्या ठिकाणी ही नाणी पाडली जात असते त्या ठिकाणाच्या नावावरुन या नाण्याना नावे पडली आहेत. उदा. 'भिवंडी लारी,' 'बसरा लारी,' 'चौल लारी' इत्यादी. परदेशी प्रवाशानी आपल्या प्रवासवर्णनात या नाण्यांचे वर्णन केले आहे. शिवाजी महाराजांनी दाभोळ, चौल, भिवंडी ही गावे जिंकून घेतल्यानंतरही तेथील टांकसाळीतून हे नाणे पाडून घेणे चालूच ठेवले. लारी हे नाणे ६ पेन्स या किंमतीचे होते. या नाण्याचे वजन ७२ ग्रेन होते.

munotes.in

६) रियाल :

शिवकाळात रियाल हे चांदीचे नाणे प्रचलित होते. हे चांदीचे नाणे स्पॅनिश होते. या नाण्याच्या विनिमयाची किमंत दोन रुपये इतकी होती.

७) टका :

शिवकाळात प्रचलित असणारे टका हे चांदीचे नाणे अत्यंत महत्त्वपूर्ण होते. टका म्हणजे टक्का असे काही इतिहासकार म्हणतात. मात्र मराठा कागदपत्रामध्ये 'टका' हे चांदीचे नाणे असल्याचा व ते चलनात प्रचलित असल्याचा अनेक ठिकाणी संदर्भ मिळतो. "शिवचरित्र साहित्य" खंड ८ प. क्र. ८४ मधील संदर्भानुसार १२ टका मिळून १ होन वजन असे. काही कागदपत्रामध्ये टका या नाण्याची किमंत वेगवेगळी दिली आहे. यावरुन असे सिद्ध होते की 'टका' हे चांदीचे नाणे असावे ते हिशेबातील टक्का नसावे.

२. पेशवेकाळातील चांदीची नाणी :

शिवकाळाप्रमाणेच पेशवेकाळात सुद्धा चांदीची नाणी प्रचलित होती. समकालीन कागदपत्रात पेशवेकाळातील चांदीच्या नाण्यांची माहिती देण्यात आली आहे. या कालखंडात प्रचलित असणाऱ्या नाण्यांची संख्या ही जास्त प्रमाणात होती. म्हणूनच पेशवेकाळातील चांदीच्या नाण्याचे वर्गिकरण पुढील प्रमाणे करण्यात आले आहे.

१) टांकसळीच्या नावाने ओळखली जाणारी नाणी :

पेशवेकाळातील बहुसंख्य नाणी ही टांकसळीच्या नावाने ओळखली जात होती. या नाण्यामध्ये रहिमतपूरी, मलकापुरी, चांदवड, बागलकोटी, भडोची, दौलताबादी, तळेगाव या नाण्याचा समावेश आहे.

२) राज्यकर्त्यांच्या नावाने ओळखली जाणारी नाणी :

पेशवेकाळात निर्माण करण्यात आलेली काही नाणी ही राज्यकर्त्यांच्या नावाने ओळखली जात होती. या नाण्यामध्ये महमदशाही, शिवराई, मल्हारशाही, या नाण्याचा समावेश आहे.

३) चिन्हावरुन ओळखली जाणारी नाणी :

पेशवेकाळातील काही चांदीची नाणी चिन्हावरुन ओळखली जात होती. ही चिन्हे नाण्याच्या मुख्य बाजूवर उमटवली जात होती. चिन्हामधील जे त्रिशूला नाणे होते त्या नाण्यावर त्रिशूलाचे चिन्ह उमटवले जात असे 'फरशी' या नाण्याचा मुख्य बाजूस फरशी कुऱ्हाडीचे चिन्ह (परशू) असे. तुऱ्याच्या नाण्यावर 'पिसाचे' चिन्ह असे.

४) सरकारी चलन :

पेशवेकाळात चांदीची काही नाणी सरकारी चलन म्हणून जाहिर केली जात असत. सरकारी देणी स्विकारण्यासाठी या नाण्यांचा वापर केला जात असे. अशी ही नाणी सरकारी चलन म्हणून ओळखली जात असत. उदा. 'पोतेचाल' हे नाणे होय.

munotes.in

५) कोरीव नाणी :

पेशवेकाळातील काही नाण्यांना कोरीव नाणी असे संबोधले जात होते. या प्रकारच्या नाण्याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'छापीचांदव' हे नाणे होय. हे नाणे चांदवड येथील टांकसळीत पाडले जात होते. या नाण्यावर कोरीव काम केलेले असे. मात्र या नाण्याचा वारंवार वापर झाल्याने या नाण्यांवरील कोरीवकाम पुसट होत असे व तो निघूनही जात असे. मग अशा या नाण्यांची बाजारात कमी किमंत ठरत असे. मग या नाण्यांची बाजारात जूनी नाणी अशी गणना केली जात असे.

६) दोन दोन टांकसाळीच्या नावाने ओळखली जाणारी नाणी :

पेशवेकाळात काही चांदीची नाणी दोन दोन टांकसाळीच्या नावाने प्रचलित होती. उदा. अर्काट-फुलचारी, अर्काट-गंजीकोट, मिरजी मलकापुरी, ग्वाल्हेर-गंजीकोट अशा प्रकारची नाणी ब्रिटीशाने आपल्या टांकसाळीत पाडल्याची उदाहरणे आहेत. तर फ्रेंचानी पांडेचरीच्या टांकसळीत पाडल्याची उदाहरणे आहेत. ही नाणी उत्तम दर्जाची असल्याने पेशव्यानेही आपल्या धारवाड, नाशिक व चांदवड येथील टांकसाळीत या प्रकारची नाणी पाडल्याची माहिती कागदपत्राच्या माहितीच्या आधारे पुढे आली आहे.

७) शिक्का या नावाने ओळखली जाणारी नाणी :

पेशवेकाळात काही नाणी 'शिका' अथवा 'शिक्का' या नावाने ओळखली जात होती. या प्रकारच्या नाण्यात हाली शिक्का, शाहू शिक्का, वाई शिक्का, पुणे शिक्का, कल्याण शिक्का या नाण्यांचा समावेश होतो. सिक्का याचा अर्थ नवी नाणी अथवा अधिक किमंतीची नाणी असा लावला जात होता.

१३.५ मराठ्यांची अनेक धातू मिश्रीत नाणी

मराठा कालखंडातील अनेक धातूमिश्रीत नाण्यांचा विचार करत असताना आपणास शिवकाळाचा संदर्भ घ्यावा लागेल. सभासद बखरकारानी व युरोपियन प्रवाशानी आपल्या लिखानात कमी प्रतीच्या धातू मिश्रीत नाण्याचा उल्लेख केला आहे. या कमी प्रतीच्या धातू मिश्रीत नाण्यामध्ये 'फणम' किंवा 'क्रॅक्रम' हे सोन्याचे नाणे होते. हे जरी सोन्याचे नाणे असले तरी या नाण्यात इतर धातूच्या मिश्रनाचे प्रमाण जास्त होते. फणम या नाण्याचे वजन ५ ग्रेन असे. हे शिवकाळातील सर्वात लहान नाणे होते. या नाण्यावर छत्रपती हे जरी नाव कोरले असले तरी हे नाणे शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीत प्रचलित होते का या बाबत खात्रीलायक माहिती उपलब्ध नाही. मात्र तज्ञानी हे नाणे संभाजी व राजाराम महाराजांच्या कारकिर्दीत प्रचलित असावे असा दुजोरा दिला आहे. या मध्ये मनुची नावाच्या इटालीयन प्रवाशाच्या मताचा समावेश आहे.

अबेकॅर यांने एका फणमची किंमत ६ पेन्स दिली आहे. तसेच ३६ पवम = १ पॅगोडा किंवा होन होत असे. डॉ. फ्रायरने १ फणमची किंमत १४ रुपये दिली आहे. मात्र फ्रायरने दिलेली फणमची किंमत चूकीची वाटते. दाभाडे दफ्तरात फणम व कॅक्रम यांच्या किमंती पुढील प्रमाणे दिल्या आहेत.

१०० होन = १६० कॅक्रम

१ होन = १६ फणम

१ कॅक्रम = १० फणम

शिवकाळातील हे जरी सुवर्ण नाणे असले तरी इतर धातूंचे मिश्रन या नाण्यात असल्याने या नाण्याचा समावेश आपण धातूमिश्रीत नाण्यांमध्ये केला आहे. पेशवेकाळात या प्रकारची नाणी उपलब्ध होती किंवा नाही या बाबतीत खात्रीलायक माहिती उपलब्ध नाही.

१३.६ मराठ्यांच्या चलनातील तांब्याची नाणी

मराठ्यांच्या कालखंडात चलन व्यवस्थेत तांब्याची नाणी प्रचलित होती. मात्र ही नाणी आपणास शिवकाळात प्रचलित असल्याचे जाणवते. पेशवेकाळात ही नाणी प्रचलित नसावीत कारण या बाबतचे कोणत्याही प्रकारचे समकालीन पुरावे उपलब्ध नाहीत. शिवकाळात जी तांब्याची नाणी प्रचलित होती ती शिवराई, सजगणी, तिरुका, (जिरुका) रुका, पैसा, दाम, अडका, जितल या नावाने प्रचलित होती. शिवकाळात ॲबट या प्रवाशाने २५ हजार तांब्याची नाणी जमा करुन ती पारखली होती. फॅक्टरी रेकॉर्डच्या संदर्भानुसार असे दिसते की दक्षिण भारतात नाणी तयार करण्यासाठी तांब्याचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात असावा. या धातूचा पुरवठा बहुतेक इंग्रजाकडून जास्त प्रमाणात केला जात असे.

१. पैसा :

शिवकाळात पैसा हे चांदीचे नाणे वेगळ्या आकाराचे असे. त्याच्या एका बाजूला श्री राजा शिव छत्रपती असे लिहिलेले असे तर दुसऱ्या बाजूला फूल, तलवार, सुर्य, बाण, चंद्र, बेलाची पाने, ग्रह, तारे, राशी चक्र या पैकी एक चित्र कोरलेले असे. या नाण्यांपैकी १ तोळा वजन असलेली नाणी पैसा या नावाने ओळखली जात होती.

२.रुका :

शिवकाळात रुका नाव असलेले तांब्याचे नाणे प्रचलित होते. १/४ तोळा वजनाची जी तांब्यांची नाणी या कालखंडात प्रचलित होती. अशा नाण्याना रुका असे म्हटले जात होते.

३. शिवराई :

शिवकाळात सोने, चांदी या धातूचे जसे शिवराई नाणे प्रचलित होते तसेच तांबे या धातूपासून बनविलेले शिवराई हे नाणे सुद्धा प्रचलित होते. शिवकाळात ज्या तांब्याच्या नाण्याचे वजन ३/४ तोळा आहे अशा नाण्यांना 'शिवराई' नाणे असे म्हटले जात होते.

४. रुपया, आणा, आर्धा आणा, पैसा पै :

शिवकाळात चलनव्यवस्थेत तांब्याचा रुपया आणा, आर्धा आणा, पैसा, पै ही नाणी प्रचलित असावी असा अंदाज आहे. मात्र या बाबत निश्चित पुरावा नाही. या बाबत इटालीयन प्रवासी मनुची म्हणतो ही नाणी महाराष्ट्रात १६०८ च्या दरम्यान आली असावीत नंतर पुढे ती प्रचलित राहिली असावीत. इंग्रज कागदपत्रातही या नाण्यांचा उल्लेख सापडतो. परंतु शिवचरित्र, खंड, ११ प. क्र. ७४ मधील संदर्भानुसार रुपयाची आणा, आर्धा आणा, पैसा, पै. ही लहान नाणी महाराष्ट्रात शिवकाळात प्रचलित नव्हती. तर दुर्बळ व वेळ ही तांब्याची नाणी प्रचलित होती.

munotes.in

५. शिवराई पैसा :

शिवाजी महाराजांच्या प्रदेशात सर्वत्र प्रचलित असणारे तांब्याचे नाणे म्हणजे शिवराई पैसा होय. त्याचे वजन न्यायमूर्ती रानडे यांच्या मते १० मासे इतके होते. एका शिवराई पैशाची किंमत ६ रुपये इतकी होती. काही कागदपत्रात सजगणी या तांब्याच्या नाण्याची किमंत ६ रुपये असल्याचा उल्लेख आहे. यावरुन "सजगणी पैसा" हा "शिवराई पैसा" असावा असा अंदाज बांधला जातो.

६.छत्रपती पैसा व त्रिरुका पैसा :

शिवकाळातील तांब्याच्या पैशातील छत्रपती पैसा हा महत्त्वाचा पैसा मानला जातो. छत्रपती पैशालाच ढब्बू पैसा असे म्हटले जात होते. याचा आकार मोठा होता व वजन जास्त होते. म्हणूनच याला ठब्बू पैसा असे म्हटले जात होते.

त्रिरुका पैसा हा वजनाने व आकाराने छत्रपती पैशापेक्षा लहान होता. म्हणूनच या पैशाला त्रिरुका पैसा असे म्हटले जात होते.

७. जितल किंवा सितल :

शिवकाळातील जितल किंवा सितल हे तांब्याचे नाणे चलनात होते. या नाण्याची किंमत रुका नाण्या इतकीच होती. विल्सन या इंग्रज लेखकाच्या मते सितल नाणे म्हणजे आधुनिक काळातील १ पै होती.

८.बाझारुक्को :

शिवकाळातील बाझारुक्को हे तांब्याचे नाणे गोठ्यातून आलेले नाणे होते. हे नाणे ज्या प्रमाणे तांबे धातून पासून बनवीले जात होते. त्याच प्रमाणे या नाण्याना बनविण्यासाठी कथील व शिसे या धातूंचा वापरही केला जात होता. म्हणजेच हे नाणे समिश्र धातू पासून बनविले जात होते.

१३.७ मराठा कालखंडात चलन व्यवस्थेत सुधारणा होण्यासाठी करण्यात आलेले प्रयत्न

मराठा कालखंडात आर्थिक विनिमयाचे एक साधन म्हणून चलन व्यवस्था निर्माण करण्यात आली होती. चलन व्यवस्थेत मराठ्यांनी आपल्या राजवट कालखंडात सोन, चांदी, तांबे व इतर धातू मिश्रीत नाण्यांची निर्मिती केली होती. शिवकाळ ते पेशवेकाळ अशा प्रदिर्घ राजवटीत या चलन व्यवस्थेचा प्रवास झाला या व्यवस्थेत मराठ्यांनी ज्या काही सुधारणा करण्यासाठी प्रयत्न केले त्याची माहिती पुढील प्रमाणे आहे.

१. खाजगी व्यक्तीना नाणी पाडण्याचे परवाने दिले :

शिवकाळात म्हणावे तितकेसे प्रयत्न चलन व्यवस्थेतील सुधारणासाठी झाले नाही. मात्र पेशवेकाळात असे प्रयत्न झाल्याचे दिसून येतात. याचाच एक भाग म्हणजे खाजगी व्यक्तींना नाणी पाडण्यासाठी दिलेले परवाने होय. या सुधारणेतून मोठ्या प्रमाणात चलनी नाणी आणता आली मात्र ही नाणी हलक्या प्रतीची असल्याने पुढे पेशव्यांना या नाण्याचा दर्जा सुधारण्यासाठी प्रयत्न करावे लागले. यामुळे पुढे या नाण्याचा विनिमय दर व दर्जा वाढला.

munotes.in

२. नाण्यामध्ये धातू मिसळण्याची पद्धती सुरु केली :

चलन व्यवस्थेत नाण्यांचा सतत वापर होत होता, त्यामुळे नाण्याची झिज होत होती म्हणून पेशवाईच्या कालखंडात धातूच्या नाण्यांची झिज भरुन काढण्यासाठी धातू मिसळण्याची पद्धती सुरु केली. धातू मिसळल्याने त्या नाण्याचे वजन स्थिर झाले.

३. जुन्या नाण्यापासून नवीन नाणी पाडण्यास सुरुवात :

चलन व्यवस्थेत नाण्यांचा सतत होणारा वापर नाण्याची झिज व खराबी करणारा होता. म्हणूनच पेशव्यांनी अतिखराब झालेली नाणी नव्याने निर्माण करण्यासाठी सुरुवात केली जूनी नाणी पूर्णपणे वितळून त्या नाण्यापासून नवीन नाणे निर्माण करण्यास सुरुवात केली.

मराठा कालखंडात चलन व्यवस्थेत सुधारणा घडवून आणण्यासाठी जरी प्रयत्न सुरु झाले असले तरी खाजगी व्यक्तीना अधिक प्रमाणात नाणी पाडण्यासाठी देण्यात आलेल्या परवान्यामुळे कायदेशीर व बेकायदेशीर अशी दोन्ही प्रकारची नाणी व्यवहारात प्रचलीत झाली. त्यामुळे चलन व्यवस्थेत गोंधळ उडाला. अशुद्ध प्रतीची व कमी दर्जाची नाणी बाजारात आली. होन या नाण्याचा त्याग होवून रुपया चलन व्यवस्थेत मोठ्या प्रमाणात प्रचलित झाला. त्याचे दुषपरिणाम या व्यवस्थेवर झाले. पुढे पेशवाईच्या कालखंड नाणे पद्धतीच्या व चलन व्यवस्थेच्या अधोगतीचा कालखंड ठरला.

एकंदरीत चलन व्यवस्थेतील सुधारणांची माहिती पाहिल्यानंतर असे दिसून येते की त्यांनी सुरु केलेल्या सुधारणा योग्य होत्या. मात्र त्या सुधारणांची योग्य त्या पद्धतीने अमलबजावणी न झाल्याने या सुधारणा फसल्या गेल्या. शिवकाळात चलन व्यवस्थेवर योग्य ते नियंत्रण टिकले नाही. परिणामी त्याचा फटका या व्यवस्थेला बसला. असे जरी असले तरी त्या कालखंडात मराठ्यांनी हा जो प्रयत्न केला होता तो कौतुकास्पद होता.

१३.८ मराठा कालखंडातील बँकिंग व्यवस्थेचे स्वरुप व कर्ज मिळविण्याची प्रक्रिया

मराठा कालखंडातील बँकिग व्यवस्थेचा अभ्यास करत असताना सर्व प्रथम आपण एक गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे आणि ती गोष्ट म्हणजे आज ज्या आर्थिक व्यवस्थापनासाठी बँकिग व्यवस्था व शाखा प्रचलित आहेत तशा बँकिंग व्यवस्थेसाठी शाखा शिवकाळात प्रचलित नव्हत्या. मात्र या प्रकारची भुमिका निभावनारे, लोकांना कर्ज देणारे स्थानिक बँकर्स अथवा सावकार असत. शिवकाळाचा जर विचार केला तर या काळात हे काम शेटे, महाजन, देशकुलकर्णी, देशपांडे, देशमुख हे करत असत.

मराठा कालखंडातील बँकिग व्यवस्थापनाचे स्वरुप समजून घेत असताना सर्वप्रथम आपणास 'कर्जरोखा' ही संकल्पना समजून घ्यावी लागेल. 'कर्जरोखा' म्हणजे 'धनको' 'ऋणको' यांच्यातील लिखित स्वरुपाचा करार होय. कर्जरोख्याला 'कर्जखत', 'कर्ज कतबा', 'कर्ज पत' इत्यादी नावे होती.

जेव्हा कर्जाचा व्यवहार होत असे तेव्हा सर्वप्रथम दोन्ही पक्ष म्हणजे धनको व ऋणको ठरलेल्या गोष्टी एका कागदपत्रावर लिहून ठेवत असत. नंतर कर्ज रोख्यात कर्ज देणाऱ्या सावकाराचे नाव व कर्ज घेणाऱ्याचे नाव, कर्जाची मूळ रक्कम किंवा मुद्दल, व्याजाचा दर, कर्ज घेण्याचा उद्देश,

कर्जाची मुदत, मुदतीबाहेर जर रक्कम परत करता आली नाही तर वसूल करावयाच्या दंडाची रक्कम इत्यादी बारीक सारीक तपशील लिहिला जात असे.

मराठा कालखंडातील बँकिंग व्यवस्थेचे स्वरुप पहात असतांना सर्वप्रथम आपण कर्जरोखा ही संकल्पना समजून घेतली. या नंतर या व्यवस्थेसाठी आवश्यक असणाऱ्या जामीनदाराच्या भुमिकेला व महत्त्वाला समजून घेवू. ऋणको म्हणजे कर्ज घेणाऱ्या व्यक्तीला धनकोपासून घेतलेल्या कर्जाची परतफेड होण्याच्या दृष्टीने जामीनदार द्यावा लागत असे. धनको ऋणकोने जामीनदार दिल्या शिवाय कर्ज देत नव्हता. या वरुन या व्यवस्थेमध्ये जामीनदाराला महत्त्व होते असे दिसून येते. जामीनदार हा ऋणकोच्या विश्वासातला असे. या प्रक्रियेत जर ऋणकोने कर्जाची परतफेड केली नाही तर धनको म्हणजे सावकार जामीनदाराकडून ते व्याजासह वसूल करत असे. परिणामी जामीनदारसुद्धा विचार पूर्वक विचार करुनच ऋणकोला जामीनदार रहात असत.

मराठा कालखंडातील बँकिंग व्यवस्थेचे स्वरुप पहात असताना सर्व प्रथम आपण 'कर्जरोखा' ही संकल्पना पाहिली तद्नंतर या व्यवस्थापनातील जामीनदाराची माहिती पाहिली. या संकल्पनेतील साक्षीदार या तिसऱ्या घटकाचा आता आपण या माहितीत विचार करणार आहोत. 'कर्जरोखा' या प्रक्रियेमध्ये जेवढे महत्त्व जामीनदाराला होते तेवढेच महत्त्व साक्षीदारांना होते. कर्जा संबंधीच्या कोणत्याही व्यवहारावर किंवा कागदपत्रांवर साक्षीदारांच्या सह्या झाल्या शिवाय कर्जाबाबतचे व्यवहार पूर्ण होत नसत.

कर्जाची व्याप्ती व तारण ठेवलेली मालमत्ता यावर साक्षीदारांची संख्या अवलंबून असे. साक्षीदारांची संख्या ही कमीत कमी दोन व जास्तीत जास्त नऊ असे. जर कर्ज सामान्य प्रकारचे असेल तर अशा प्रकारच्या कर्जरोख्यांवर गावातील पाटील आणि कुलकर्णी किंवा इतर प्रतिष्ठित व्यक्ती साक्षीदार म्हणून सह्या करत असत जेव्हा साक्षीदाराचे प्रमाण जास्त असे तेव्हा देशमुख देश – कुलकर्णी, शेटे महाजन, नायक, वडी, जोशी, पाटील, पानसरे यांच्या सह्या घेतल्या जात असत.

या महत्त्वपूर्ण प्रक्रियेव्यतिरिक्त बँकिंग व्यवस्थेत कर्जदाराला सुद्धा कर्जरोख्यावर 'मी वत: होवून स्वखुषीने हे लिहून देत आहे' असा उल्लेख करावा लागत असे.

वरील सर्व बाबींची पूर्तता केल्यानंतर सर्व मताचा, विचाराचा व उद्देशांचा विचार करुन घनको ऋणकोला कर्जरोखा मंजूर करत असे व त्यास आवश्यक असणारी रक्कम देत असे. या प्रक्रियेत लिखित, मौखिक, व सहविचार-विनिमय या बाबींना महत्त्व देण्यात आले होते. परिणामी या प्रक्रियेला महत्त्व प्राप्त झाले होते.

१३.९ मराठा कालखंडातील कर्ज मिळविण्याचे उद्देश

मराठा कालखंडातील बँकिंग व्यवस्थेचे स्वरुप व कर्ज मिळविण्याची पद्धती समजून घेतल्या नंतर ज्या कारणासाठी ऋणको कर्ज घेत होते. त्या पाठीमागचा उद्देश या घटकात आपण जाणून घेणार आहोत.

१. कोर्टकचेरीचा खर्च भागविण्यासाठी :

मराठा कालखंडात खेडेगावात जमीन संदर्भात मोठ्या प्रमाणात वाद निर्माण होत असत. या वादाच्या दाव्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च होत असे. असा खर्च भागविणे सर्वसामान्य लोकांना

शक्य होत नसे. म्हणूनच हे लोक कोर्टकचेरीचा खर्च भागविण्यासाठी कर्ज घेत असत. सर्वसामान्य लोकांव्यतिरिक्त देशमुख, कुलकर्णी या लोकांनी सुद्धा या उद्देशाने कर्ज घेतल्याची अनेक उदाहरणे आहेत.

२.नैसर्गिक आपत्ती :

मराठा राजवट कालखंडात नैसर्गिक आपत्ती आल्याची अनेक उदाहरणे आपल्याला माहित आहेत. दुष्काळ, अवर्षण, अतिवृष्टी अशा कठीण प्रसंगी लोकांना आपली उपजिवीका भागविणे शक्य नसे. अशा कठिण प्रसंगी लोक सावकाराकडून कर्ज घेत असत.

३. खंडणी देण्यासाठी :

मराठा कालखंडात शत्रूच्या तावडीतून सुटका करुन घेण्यासाठी सुद्धा अनेक वेळा कर्ज घ्यावी लागली होती. या प्रकारातून घेतलेली उदाहरणे आहेत. "शिवचरित्र साहित्यामधील संदर्भानुसार असे दिसते की, सिद्दीखानाने (विजापुरी सरदार) राजापूरवर हल्ला करुन तेथील काही कुणबी कुटुंबातील सदस्यांना त्यांने पकडून ठेवले होते. व त्यांच्या सुटकेच्या मोबदल्यात खंडणीची मागणी केली. तेव्हा या कुणब्यांनी शेणवी नावाच्या सावकाराकडून सिद्दीखानला देण्यासाठी २०० रुपये व किरकोळ खर्चासाठी १० रुपये कर्ज घेतल्याचे उदाहरण लिखित स्वरुपात नमुद आहे."

एकंदरीत वरिल सर्व माहितीवरुन असे समजते की या कालखंडात खटल्यांच्या खर्चासाठी, नैसर्गिक आपत्तीवर मात करण्यासाठी तसेच खंडणी देण्यासाठी या काळात लोक कर्ज घेत होते.

१३.१० मराठा कालखंडातील कर्जावरील व्याजाचे दर

मराठा कालखंडातील कर्जावरील व्याजाचा दर अथवा कर्जावरील व्याज हा एक बँकिंग व्यवस्थापनाचा एक महत्त्वाचा भाग मानला जात होता. मराठा कालखंडात जी ऋणकोला कर्जे दिली जात होती ती 'अल्पमुदतीची' 'दिर्घमुदतीची' होती. सर्वसाधारणपणे अल्पमुदतीची कर्जे ही शेतकऱ्यांना दिली जात होती. शेतकरी सुगी संपल्यानंतर अशी कर्जे परत करत असत. जी दिर्घ मुदतीची कर्जे घेतली जात होती ती १ ते ५ वर्षासाठी घेतली जात असत.

मराठा कालखंडात कर्जावर दरमाहाप्रमाणे निश्चित केला जात होता. याचाच अर्थ असा होता की या कालखंडात व्याजदर हा दर महिन्याला आकारला जात होता. जर कर्ज रुपयात दिले असेल तर व्याजदरही रुपयातच आकारला जात असे. जर कर्ज होन मध्ये दिले असेल तर प्रत्येक होनला टका किंवा रुकामध्ये व्याज आकारला जात असे.

शिवकाळात तारणावर दिलेल्या व्याजाचा दर प्राचीन काळापेक्षा जास्त होता. शिवकाळात कर्ज घेणाऱ्याचे सामाजिक स्थान व आर्थिक परिस्थिती विचारात घेवून व्याजाचा दर आकारला जात असे. शिवकाळात व्याजाचा दर शेकडा $३७\frac{१}{२}\%$ होता. तर काही कर्ज प्रकरणात तो ६०% होता. याचे उत्तम उदाहरण म्हणजे "शिवचरिक्ष साहित्य" संदर्भ होय. हा संदर्भ असा आहे, "एका तेल्याने एका व्यक्तीला दरमहा दर होनला १ पल या प्रमाणे व्याज आकारल्याचे दिसते. याचाच अर्थ असा होतो की दरसाल दर व्याजाचा दर $३७\frac{१}{२}\%$ होता. बजाजी नाईक निंबाळकराने घेतलेल्या ६०,००० होनचा व्याजाचा दर त्याच्या कर्जरोख्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे दरसाल दर शेकडा ६०% म्हणजे दरसाल दर शेकडा ६० रुके इतका होता."

मराठा कालखंडात काही ठिकाणी घेतल्या जाणाऱ्या कर्जावर मुदतीचे बंधन नव्हते. अशा कर्जाच्या बाबतीत धनको सुरुवातीला जास्त व्याज आकारत असे. तदनंतर पुढील काही महिन्यासाठी तो व्याजाचा दर कमी करत असे. या पाठीमागचा धणकोचा उद्देश असा होता की नंतर व्याजदर कमी केल्याने ऋणको कर्ज लष्कर फेडणार नाही.

मराठा कालखंडात काही वेळा सावकार धान्य रुपात कर्ज देत होते. या कर्जाची मुदत ६ महिन्याची असे. मात्र अशा प्रकारच्या कर्जाची वसुली दुणेनी केली जात होती.

मराठा कालखंडात दिर्घ मुदतीच्या कर्जावर व्याजाचा दर जास्त असे. काही प्रकरणामध्ये सावकाराने दिर्घमुदतीचे कर्ज देवून ती सोईच्या हप्त्याने वसूल केल्याचे दिसते.

मराठा कालखंडात कर्जफेड करणे हे नैतिक कर्तव्य मानले जात असे. थकबाकीदाराला पुन्हा कर्ज मिळत नसे. मात्र दिलेल्या मुदतीत कर्ज फेडले नाही तर एका गोहत्येचे किंवा ब्रम्हहत्येचे पाप लागते अशी समजूत असल्याने लोक सहसा कर्जफेड चुकवत नसत.

१३.११ मराठा कालखंडातील सरकारी कर्ज पद्धती

मराठा कालखंडात ज्या प्रमाणे 'धनको' म्हणजे सावकाराकडून अल्प व दिर्घमुदतीने कर्ज पुरवठा होत असे तशाच प्रकारचा कर्जपुरवठा सरकारकडून शेतकऱ्यांना व उद्योगधंद्यांना होत असे. अशा प्रकारच्या कर्जपुरवठा शिवकाळात सुरु होता. मात्र याची फारशी माहिती उपलब्ध नाही. मात्र शिवकाळात शिवाजी महाराजांनी कोकणातील प्रभावलीच्या सुभेदाराला पाढविलेल्या एका पत्रात असे म्हटले आहे की शेतकऱ्यांना टंचाईच्या काळात शेतीची अवजारे, बी-बीयाणे, जनावरे खरेदी करण्याकरीता बिगर व्याजी कर्ज द्यावे. व त्यांच्याकडून त्यांच्या सवडीने हप्त्याहप्त्याने कर्ज परतफेड करुन घ्यावी. मुद्दलापेक्षा त्यांच्याकडून जास्त रक्कम घेवू नये.

सरकारी कर्ज पद्धती सुरु करत असताना शिवाजी महाराजांचा उदात हेतू होता. या हेतूला अनुसरुन शिवाजी महाराजांना शेतकऱ्यांची सावकारी पाशातून सुटका करावयाची होती. या संधीचा फायदा शेतकऱ्यांनी या काळात घेतला. या संधीचा फायदा काही उद्योगानाही झाला. मराठा कालखंडात सुरु करण्यात आलेली ही कर्जपद्धती अत्यंत उपयुक्त होती. मात्र या कर्जपद्धतीचे स्वरुप हे व्यापक नव्हते.

१३.१२ मराठा कालखंडातील वरात पद्धती

मराठा कालखंडातील वरात पद्धती ही या कालखंडात महत्त्वाची बँकिंग पद्धती मानली जात होती. म्हणून ही पद्धती या कालखंडातील बँकिंग पद्धतीचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये बनले होते. वरात म्हणजे सावकारी पेढीवर काढलेली हुंडी होय. शिवकाळात राज्यातील निरनिराळ्या सावकारी पेढ्यांवर हुंड्या काढल्या जात असत व या हुंड्यातूनच सर नौबत, मुजुमदार, कारकून व शरीर रक्षक दलाचे प्रमुख यांचे पगार केले जात असत.

सॅम्युअल ऑस्टिन हा इंग्रज व्यापारी म्हणतो शिवाजी महाराजांनी खरेदी केलेल्या ब्रिटीश मालाचे पैसे भागविण्याकरीता कल्याण-भिवंडी येथील पेढीवर वरात काढली होती. सॅम्युअल ऑस्टिनच्या पत्रव्यवहारावरुन असे दिसते की अशी हुंडी किंवा वरात वटण्यास दोन ते तीन वर्ष लागत असत.

१३.१३ पेशवे कालखंडातील बँकिंग व्यवस्था

मराठ्यांच्या बँकिंग व्यवस्थेचा आरंभ शिवकाळापासून झाला. पुढे या पद्धतीचा विकास होत गेला. पेशवे काळातही या पद्धतीचा महत्त्वपूर्ण विकास झाला. शिवकाळापेक्षा पेशवेकाळात व्यवसायांची चांगली वाढ झाली. पेढी व्यवहार करणाऱ्या पुष्कळ संस्था निर्माण झाल्या. त्यांच्या शाखा मराठ्यांच्या साम्राज्यात इतरत्र पसरल्या. त्यामुळे पेशवेकाळात पेढयांचे व्यवहार जास्त प्रमाणात विकसित झाले.

१. बँकिंग पद्धतीचा विकास :

मराठा साम्राज्यातील बँकिंग पद्धतीच्या विकासाची माहिती पहात असतांना आपण या ठिकाणी पेशव्यांच्या कारकिर्दीत या पद्धतीचा विकास झाला हे पहाणार आहोत. सर्वसाधारणपणे पहिल्या बाजीरावाच्या कारकिर्दीपासून मराठ्यांचे साम्राज्य झपाट्याने वाढू लागले. बाजीरावाने आपल्या राज्यकारभाराची राजधानी पुण्यत आणल्याने सावकारी व्यवसायही पुणे व आसपासच्या प्रदेशात वाढला. पेशवे व त्यांच्या लष्करांना मोहिमांसाठी व राज्यकारभारासाठी वारंवार पैशाची आवश्यकता भासू लागली. परिणामी राज्यकर्ते, युद्धकर्ते व व्यापारी यांचे संबध जवळचे आले.

राज्यकर्त्यांना राज्यविस्ताराच्या सावकारावर अवलंबून रहावे लागत होते. शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणाऱ्या खर्चासाठी सावकारावर अवलंबून रहावे लागत होते. तसेच व्यापाऱ्यांना व व्यावसायिकांना सुद्धा लागणाऱ्या पैशासाठी सावकारांवर अवलंबून रहावे लागत होते. परिणामी मराठा साम्राज्याने या बँकिंग पद्धतीचा विकास झाला.

मराठा कालखंडात बँकिंग अथवा पेढी व्यवहार करणारी अनेक घराणी उदयाला आली. उदा. दिक्षित, पटवर्धन, धारपुरे, जगताप, अनगळ, पाठक, तांबवेकर, नाईक व वैध.

या घराण्याचे हे व्यवसाय केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर महाराष्ट्राबाहेरही विकसित झाले होते. उदा. पुण्यातील दिक्षित पटवर्धनांच्या सावकारी पेढ्या व त्यांच्या हुंडीचे व्यवहार वाराणसी या उत्तर भारतातील शहराशी व शिवपट्टम या दक्षिण भारतातील शहरांशी चालत असल्याचे संदर्भ मिळतात. १७६० नंतर महाराष्ट्रीयन सावकारांचा व्यवहार कर्नाटक प्रांताशीही वाढू लागला. तुळशीबागवाल्यांच्या पेढीकडे १७६९ साली केवळ एक महिन्यात देशातील वेगवेगळ्या ठिकाणाहुन दीड लाख किमंतीच्या हुंड्या आल्या होत्या. त्यातील ५०,००० रुपयाची एक हुंडी सुतेच्या नागर लक्ष्मीदासच्या पेढीकडून आलेली होती.

या पेढ्यामधून केवळ सरकारी स्तरावरच कर्जाची देवाण-घेवाण होत होती असे नव्हे तर खाजगी स्तरावर सुद्धा कर्जाची देवाण-घेवाण होत असे. पेढ्यामार्फत रोखीने व उधारीने वस्तुच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार होवू लागले. परिणामी या पेढ्याचा व्यवसाय भरभराटीला आला होता. सरकारी व इतर दप्तरखान्यात उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन या बाबतची माहिती समजते.

२. पेढीचे रोजचे व्यवहार :

पेशवेकाळात पेढीचे रोजचे व्यवहार एका रोजकिर्दीमध्ये लिहिले जात असत. त्यामध्ये पैश्यांच्या देवाण-घेवाणाच्या नोंदी दोन वेगवेगळ्या खात्यांमध्ये केल्या जात असत. ही खाती म्हणजे पोते व परभारे होय. पोते म्हणजे ज्यात रोजच्या व्यवहाराची नोंद केली जाते ते खाते व परमारे खाते म्हणजे ज्यात सर्व देवघेवीच्या व्यवहाराची नोंद केली जात ते खाते. या पेढ्यांमधून वर्षभरातील उलाढाल मोठ्या प्रमाणात होत होती. सन १६६९ या वर्षी दिक्षित-पटवर्धनांच्या पेढीमध्ये रु.

३३,८७,३८१ आणि ३ पैसे एवढा भरणा झाला आहे. तर खातेदारांना दिलेल्या रकमांची बेरीज रुपये ३०,७७,९७ आणि ११ पैसे इतकी झाली आहे.

३. हिशोब खाती :

पेशवे कालखंडामध्ये गरजे नुसार पेढ्या वेगवेगळ्या प्रकारचे हिशेब ठेवत असत. नफा, तोटा, सूट, मनोंनी, सरदारांची वर्षासने, मसाले, भेट, बक्षिसे, न्यायालयीन दंड, इजार, मामलतीची मोकासा गावे, पेशवे, दुकानाचे भाडे, व्यक्तीगत किंवा खाजगी खर्च, किंमती वस्तुंची खरेदी संजायित या सदराखाली येणाऱ्या खर्चाच्या व नफा तोट्याच्या बाबींचे हिशेब ठेवले जात असत.

सर्वसाधारणपणे नफ्याच्या हिशेब खात्यात 'व्याज' बट्टा म्हणजे (नाण्यांच्या विनिमयाबद्दलचे अगर बदलून देण्याबद्दलचे कमिशन) व 'वटणावळ' म्हणजे (हुंड्या देवून रोख रक्कम अदा करण्याबद्दलचे कमिशन व इतर किरकोळ रक्कमा यांचा समावेश होत असे.

तसेच किंमती वस्तुंच्या खरेदी खात्यात मोती व हिरे यांच्या खरेदीबद्दलच्या रक्कमा तसेच पोवळी, मोहरा, पुतळ्या, सोन अगर चांदी यांच्या खरेदीच्या नोंदी असत.

संजयित खात्यामध्ये दुकानातून किंमत निश्चित न करता आणलेल्या वस्तुंच्या नोंदी असत. हा व्यवहार म्हणजे एक प्रकारे कर्जाऊ रक्कमे बद्दलचा अथवा उधारीच्या देण्यासंबधीचा हिशेब असे. तर पेशव्यांची खाती ही दीक्षित पटवर्धनांच्या पेढ्यांमध्ये असत. ही सर्व खाती म्हणजे फौजेबद्दलचे खाते, कर्जव्यवहारांचे खाते, मामलतीबद्दलचे खाते, कापड चोपडाविषयीची खाते, या प्रकारची खाती असत.

एकंदरीत जर आपण ही सर्व माहिती जाणून घेतली तर आपणास पेशवे कालखंडातील हिशेब खाती या प्रकारची माहिती समजण्यास मदत होते.

४. व्याजाचा दर :

शिवकाळाप्रमाणेच पेशवेकाळात सुद्धा व्याजावर आकारला जाणारा व्याजाचा दर भरमसाठ होता. पेशवेकाळात व्याजाचा दर हा दरसाल नव्हता तर दरमहा होता. हाद र दरमहा १% पासून ५% पर्यंत बदलत असे. म्हणजेच दरसाल दरशेकडा १२% पासून ६०% पर्यंत असे. वरिल व्याजाचा दर लक्षात घेता हाद र भरमसाठ होता.

काही ठिकाणी व्याज पैशाच्या रुपाने न घेता वस्तुच्या रुपाने घेतला जात असे. व्याजाची रक्कम थकल्यास साधारणपणे त्या रक्कमेच्या $\frac{१}{१२}$ इतकी रक्कम व्याज म्हणून दिली जात असे. काही प्रकरणात अशी सवलत देवून सुद्धा काही व्याजाची रक्कम येणे रहात असे, त्यावेळी ती रक्कम सूट म्हणून कमी करुन त्या कर्जदाराचे खाते बंद करुन टाकल्याचे आढळते.

जानोजी भोईटे या इसमाने आपला सावकार भास्कर बाबा वैध याला ५०० रुपयाचे कर्ज रोख लिहून देताना सदरहू रक्कम एका वर्षानंतर तिच्यावरील दर शेकडा दरमहा ३% म्हणजे दरसाल शेकडा ३६% व्याजासह परत देण्याचे कबुल केले होते.

एखाद्या कर्जदाराकडे कर्जाची परतफेड करण्यासाठी रोख रक्कम नसल्यास तो आपली एखादी स्थावर अथवा जंगम मिळकत सावकाराला कर्जापोटी देवून कर्जाच्या ओझ्यातून मोकळा होत असे.

८ ऑक्टोबर १७६८ रोजी झालेल्या एका नमुनेदार गहाण खतामध्ये 'ऋणको' शिवाजी नरहर सहस्त्रबुद्धे देशमुख यांनी 'धनको' रामाजी बल्लाल जोशी याला लिहून दिलेल्या पुढील तपशीलाची नोंद आढळते. त्यावरुन व्याजाच्या दरासंबधी अधिक माहिती मिळते. ८,६०० रु. चे कर्ज दरमहा दरशेकडा १% व्याज दराने घेण्यात आले होते. व्याज कसे परत करावयाचे या बद्दल अगर अंशत: व्याज परत करण्याबद्दल काहीच अट लिहिलेली नाही. कर्जाची परतफेड अर्काटी नाण्यामध्ये करावयाची होती. कर्ज ५ महिन्याच्या मुदतीसाठी घेतले होते. कर्जाचा दर दरमहा शेकडा १% ठरलेला होता. पण कर्ज व्याजासह वरील मुदतीत परत न केल्यास पुढे व्याजाचा दर दरमहा दरशेकडा २% पडणार होता. हा व्यवहार करीत असताना दोन साक्षीदार हजर होते. हे कर्ज २००० रुपयाचे दागिने, एक घर व ओंकारेश्वर मंदिराजवळ मोकळी जागा यांच्या तारणावर दिले होते.

वरिल सर्व माहिती व संदर्भ उदाहरणावरुन पेशवेकाळातील पेढ्यांच्या व्यवहारांवर व व्याजदरांच्या माहितीवर प्रकाश पडतो.

५. कर्जरोखा :

शिवकाळाप्रमाणेच पेशवेकाळात सुद्धा बँकिंग पद्धतीमध्ये कर्जरोखा लिहून देण्याी पद्धती प्रचलित होती. कर्ज घेताना ऋणको हा धनकोला कर्जरोखा लिहून देत असे. या कर्जरोख्यात कर्ज घेण्याचा उद्देश, कर्जाची रक्कम, कर्जावरील व्याज, कर्ज फेडण्याची मुदत, कर्ज तारणासंदर्भातील बाबी अथवा वस्तूंची माहिती या सर्वांचा समावेश असे. कर्जरोखा अथवा दस्तऐवज या काळात तीन प्रकारचे असत.

१) कर्जरोखा :

कर्जरोख्यात या पद्धतीमध्ये ऋणकोने धनकोला लिहून दिलेल्या साध्या चिठ्ठीचा समावेश असे. व्यवहार समक्ष झाला म्हणून या प्रकारच्या कर्जरोख्यावर साक्षीदारांच्या सह्या असत.

२) वादारोखा :

या प्रकारच्या कर्ज रोख्यात ऋणकोने धनकोला ठराविक हप्त्याने व ठराविक कालावधीत कर्जफेडीची हमी लिहून दिलेली असे. त्यामुळेच याला वादारोखा म्हणण्याची प्रथा सुरु झाली.

३) शरकत रोखा :

या प्रकारामध्ये ऋणको हा बहुधा शेतकरी असे व धनको म्हणजे सावकार असे. या दोहोत शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्ना बाबतचा करार असे. उत्पन्नाची अर्धी वाटणी करण्याबद्दलची लिखित माहिती या करारामध्ये असे.

२. पेशवे कालखंडातील बँकांची अथवा पेढ्यांची कामे :

पेशवे कालखंडात बँका अथवा पेढ्यांना जी कामे करावी लागत होती, त्याची माहिती खाली नमुद करण्यात आली हे.

१) हुंड्यांच्या रुपाने पैसा उपलब्ध करणे :

पेशवे कालखंडातील बँक अथवा पेढ्यांचे हे एक महत्त्वपूर्ण कम होते. पेशवेकाळात दर्शनी हुंडी, मुदत हुंडी, लहान हुंडी असे हुंड्याचे प्रकार प्रचलित होते. या काळात पेढ्या ह्या हुंड्यांच्या रुपाने पैशाची उपलब्धता करुन देत असत. मध्ययुगीन कालखंडातील हुंड्या या आजच्या युगातील 'डिमांड ड्राफ्ट' प्रमाणे होत्या. एखाद्या ग्राहकाकडून रोख रक्कम घेवून एखाद्या पेढीचा प्रतिनिधी दुसऱ्या शहरातील दुसऱ्या एखाद्या पेढीच्या प्रतिनिधीला सदरहु रक्कम सदरच्या ग्राहकाला त्या शहरात रोखीच्या रुपाने देण्याबद्दलची सूचना अशा हुंडीच्या रुपाने देत असे. हुंडीच्या व्यवहारामुळे पेशवेकाळात व्यापारात सुलभता आली. एखाद्या ठिकाणाहून दुसऱ्या एखाद्या ठिकाणी जी रोख रक्कम घेवून जात असताना जे धोके निर्माण होत असत. अथवा जी भिती वाटत होती ती नष्ट झाली. व्याजाची बाजारात पत निर्माण झाली. खरेदी-विक्रीचे व्यवहार सुरळीतपणे पार पडू लागले.

२) वरातच्या माध्यमातून सुलभता :

सरकारने काढलेल्या हुंड्यांना वरात असे म्हटले जाते. जेव्हा सरकारला सरकारी नोकर, व्यापारी, अथवा खाजगी व्यक्ती यांच्याकडून मोठ्या रक्कमांचे येणे वसूल करावयाचे असे तेव्हा अशा प्रकारच्या हुंड्या काढल्या जात असत. जास्त प्रमाणात कमाविसदारांना आगाऊ दिलेल्या रक्कमा म्हणजे रसद रक्कमा ज्या वेळी वसूल करुन घ्यावयाच्या असत तेव्हा अशा वरात (हुंड्या) काढल्या जात असत.

३) व्यापार उद्योगाकरिता भांडवलाची उभारणी :

पेशवेकाळातील पेढ्यांचा आणखी एक महत्त्वपूर्ण कामकाज म्हणजे आपल्या ग्राहकांना वेळप्रसंगी एखादा व्यापार अथवा उद्योग सुरु करण्यासाठी कर्ज देवून भांडवलाची उभारणी करणे होय. याचे उत्तम उदाहरण म्हणजे राघोबा दाखे यांचा अर्ज होय. त्यांनी कर्ज मिळण्यासाठी वैद्य बंधूच्या पेढीकडे २ डिसेंबर १७४० रोजी अर्ज केला होता. त्याची नोंद आहे.

"भा. इ. स. मंडळात दीक्षित-पटवर्धन या सावकार घराण्यातील सन १७५० ते १८३६ या काळातील ज्या हिशोबाच्या वह्या आहेत त्यातील संदर्भानुसार सावकाराकडून व्यापारी, शेतकरी, व्यावसायिक, कमाविसदार, सैन्यांचे अधिकारी यांना तसेच सरकारला मोठ्या प्रमाणात कर्जाच्या रक्कमा देण्यात आल्याचे दिसून येते."

४) सरकारला कर्जाचा पुरवठा :

पेशवेकाळातील पेढ्या म्हणजे सरकारला कर्ज पुरवठा करणाऱ्या आधुनिक बँकाच होत्या या पेढ्या सरकारला निरनिराळ्या कारणासाठी कर्जपुरवठा करत होत्या. पेशव्यांना युद्ध खर्च, युद्ध खंडणी, खरेदी, या कामासाठी मोठ्या प्रमाणात कर्जाची गरज भासत होती. अशा वेळेस पेशवे पेढ्यांकडून कर्ज घेत असत.

पेढीवाले सरकार बरोबर दोन प्रकारचे कर्ज व्यवहार करत असत. पहिल्या प्रकारात पेशव्यांकडून कोणत्याही प्रकारचे तारण अथवा हमी न घेता कर्ज दिले जाई. पेशव्यांनी फक्त कर्जाऊ घेतलेल्या रक्कमेबद्दलचा आणि ठरलेल्या व्याजदराबद्दलचा कर्जरोखा लिहून द्यावयाचा असे ठरलेले असे.

दुसरा प्रकार म्हणजे सरकारला मिळणाऱ्या महसूलाच्या तारणावर दरसाल दर शेकडा १२% प्रमाणे कर्जाऊ रक्कम दिली जात असे. या दुसऱ्या प्रकारच्या कर्जामध्ये पेढीवाले तारण असलेल्या महसूलापैकी काही महसूल स्वत:च वसूल करत असत. पेशवे सरकार त्यांच्या महसूल अधिकाऱ्यांना सावकाराच्या नावाने हुंड्या देत असत त्यात वसूल महसूल सावकाराला त्यांच्या कर्जापोटी जमा करण्याचे आदेश अधिकाऱ्यांना दिले जात असत. या प्रकारच्या कर्जाना मालमत्तेवरील कर्ज असेही म्हणतात.

आपली प्रगती तपासा

१. मराठ्यांच्या चलन व्यवस्थेबाबतची ऐतिहासिक पार्श्वभूमी जाणून घ्या.

२. मराठ्यांच्या चलन व्यवस्थेतील सोन्याच्या नाण्यांची माहिती जाणून घ्या.

३. मराठ्यांच्या चलन व्यवस्थेत ज्या सुधारणा घडून आल्या त्याची माहिती जाणुन घ्या.

४. मराठा कालखंडातील बँकिंग व्यवस्थेचे स्वरुप व कर्ज मिळविण्याची प्रक्रिया या बाबत माहिती जाणून घ्या.

१३.१४ सारांश

मराठा कालखंडातील चलन व्यवस्थेचा व बँकिंग व्यवस्थेचा अभ्यास करत असताना सर्व प्रथम आपण 'शिवकाळ' व 'पेशवेकाळ' या दोन कालखंडात 'चलन' व बँकिंग व्यवस्था कशी होती हे जाणून घेतले आहे.

सर्व प्रथम 'चलन' व 'बँकिंग' व्यवस्थेची माहिती कोणकोणत्या संदर्भ साधनामध्ये उपलब्ध आहे हे पाहिले साधारणत: ही माहिती आपणास सभासद बखर, चित्रगुप्ताची बखर, जमा-खर्चाच्या नोंद वह्या, कर्जरोख्याची कागदपत्रे या कागदपत्रात उपलब्ध आहे या अभ्यासाद्वारे समजले.

मराठा कालखंडात चलन व्यवस्थेत विनिमयाचे एक महत्त्वपूर्ण साधन म्हणून नाण्यांचा वापर केला जात होता. या कालखंडात वेगवेगळ्या प्रकारच्या धातूची नाणी प्रचलित होती. शिवकाळाचा जर विचार केला तर या काळात सोने, चांदी, तांबे व धातूमिश्रीत नाण्याचा वापर चलनात केला जात होता. पेशवेकाळात सुद्धा वरील धातून प्रकाराची नाणी प्रचलीत होती. मात्र सोन्याच्या नाण्याचे प्रमाण कमी होते. या पैकी काही नाणी हे मराठ्यांनी स्वत: निर्माण केली होती तर काही नाणी ही इतर प्रदेशातून अथवा विदेशातून चलनात आली होती. या धातू प्रकारातील दोन्ही कालखंडातील नाण्यांची नावे, आकार, वजन, दर या बाबतची सविस्तर माहिती आपण प्रत्येक संदर्भ घटकाला अनुसरुन पाहिली आहे.

मराठा कालखंडातील बँकिंग व्यवस्थेचे स्वरुप पहात असताना सर्वप्रथम आपण 'कर्जरोखा' ही संकल्पना समजून घेतली तंदनंतर कर्जरोखा तयार करत असताना 'ऋणको' व 'धनको' यांच्या मध्ये जो कर्जविषयक करार होत असे त्यामध्ये कर्ज का घेतो? कर्ज घेण्यापाठीमागचा उद्देश काय आहे? कर्जाची रक्कम किती आहे ? कर्जावरील व्याजदर कसा आहे? कर्जाची मुदत किती आहे? कर्जासाठी तारण काय ठेवण्यात आले आहे? कर्जासाठी जामीनदार कोण आहे? कर्जासाठी साक्षीदार किती आहेत? या बाबतची माहिती पाहिली.

मराठा कालखंडात जे कर्ज घेतले जात होते त्या कर्जावर व्याजदर काय होते याची माहिती पाहिली. मराठा कालखंडातील सरकारी कर्ज पद्धती, वरात पद्धती याची संदर्भ माहिती अभ्यासली. या व्यतिरिक्त पेशवेकालखंडामध्ये बँकिग व्यवस्थेमध्ये वाढ कशी झाली. या व्यवस्थापनाचा विकास कसा झाला याचा संमर्ग आढावा घेतला. या मध्ये पेढ्यांचा विकास, पेढ्यांचे व्यवहार, पेढ्यांची हिशेब खाती, पेढ्यांचे व्याजार दर, कर्ज रोखे पद्धती, व पेढ्यांचे कार्य याची माहिती पाहिली.

१३.१५ प्रश्न

१. मराठ्यांच्या चलन व्यवस्थेतील सोण्याच्या नाण्यांची माहिती लिहा.

२. मराठ्यांच्या चलन व्यवस्थेतील वेगवेगळ्या धातूच्या नाण्याची माहिती लिहा.

३. मराठ्यांच्या बँकिग व्यवस्थेबाबत सविस्तर चर्चा करा.

१३.१६ संदर्भ

१. डॉ. बाळकृष्ण – "Shivaji the great Vol. IVth"

२. ना. गो. चापेकर - "पेशवाईच्या सावलीत."

३. प्रा. बी. एस. सावंत- प्रा. जाधव - "मराठ्यांच्या प्रशासकीय सामाजिक व आर्थिक इतिहास"

४. शिवचरित्र साहित्य खंड १, २, ४, ५ पृष्ठ क्रमांक ५१, १३४, ३५२, ७२२, ९५१.

५. पेशवेकालीन सामाजिक व आर्थिक पत्रव्यवहार – पृष्ठ क्रमांक १०१

❖❖❖❖

munotes.in

१४

आर्थिक आणि सांस्कृतिक विकास: मराठा राज्याच्या खर्चाच्या बाबी

घटक रचना:

१४.० उद्दिष्ट्ये

१४.१ प्रस्तावना

१४.२ राज्यकर्त्यांवरील खर्च

१४.३ मुलकी प्रशासनावरील खर्च

१४.४ लष्करी प्रशासनावरील खर्च

१४.५ शेतीवरील खर्च

१४.६ व्यवसायावरील खर्च

१४.७ सारांश

१४.८ प्रश्न

१४.९ संदर्भ

१४.०उद्दिष्ट्ये

- मराठा राज्यकर्त्यांवरील होणारा खर्च जाणून घेणे.
- मराठा राज्यकर्त्यांच्या कुटुंबावर होणारा खर्च जाणून घेणे.
- शिवकाळातील मुलकी प्रशासनावर होणारा खर्च जाणून घेणे.
- पेशवेकाळातील मुलकी प्रशासनावर होणारा खर्च जाणून घेण.
- शिवकाळातील लष्करी प्रशासनावर होणारा खर्च जाणून घेणे.
- पेशवेकाळातील लष्करी प्रशासनावर होणारा खर्च जाणून घेणे.
- शिवकाळातील शेतीवर होणारा खर्च जाणून घेणे.
- पेशवेकाळातील शेतीवर होणारा खर्च जाणून घेणे.

muunotes.in

- शिवकाळातील व्यवसायावर होणारा खर्च जाणून घेणे.
- पेशवेकाळातील व्यवसायावर होणारा खर्च जाणून घेणे.
- पेशवेकाळातील लोकोपयोगी कामासाठी होणारा खर्च जाणून घेणे.
- पेशवेकाळातील धर्मादाय कामासाठी होणारा खर्च जाणून घेणे.

१४.१प्रस्तावना

मराठ्यांच्या उत्पन्नाच्या साधनांचा विचार केल्यानंतर या घटकात आपण मराठ्यांच्या प्रशासकीय खर्चाचा विचार करणार आहोत. छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठ्यांचे साम्राज्य नव्याने उभे केले. पुढे ते पेशव्यांच्या कारकिर्दीत वाढले. तद् नंतर लयास गेले. या साम्राज्याला स्थिर करण्यासाठी, कार्यक्षम बनविण्यासाठी व टिकविण्यासाठी मराठ्यांनी प्रशासन व्यवस्था निर्माण केली होती. मराठ्यांची प्रशासन व्यवस्था कार्यक्षम होती. आपण मागील घटकात मराठ्यांच्या जमीन महसूल व उत्पन्नाच्या इतर साधनांचा आढावा घेतला आहे.

या घटकात शिवकाळ व पेशवेकाळातील मराठ्यांच्या खर्चाच्या बाबींची माहिती पाहणार आहोत. या खर्चाच्या बाबींचा विचार करत असताना मराठ्यांच्या राजवट काळात राजकर्त्यांवर कशा पद्धतीने खर्च होत होता. त्यांच्या कुटुंबीयांवर कोणत्या पद्धतीचा खर्च होत होता. मुलकी सेवा सुविधांवर कोणता खर्च होत होता, लष्करी प्रशासनावर कोणता खर्च होत होता शेतीवर कोणता खर्च होत होता व्यवसायांवर कोणता खर्च होत होता याचा सविस्तर आढावा घेणारे आहोत. या आढाव्यामध्ये आपण शिवकालीन खर्चाच्या बाबी व पेशवेकालीन खर्चाच्या बाबी यांचे स्पष्टीकरण करणार आहोत.

१४.२राज्यकर्त्यांवरील खर्च

मराठयांच्या राज्यकर्त्यांच्या खर्चाची माहिती स्पष्ट करताना आपणास दोन कालखंडाचा विचार करावा लागेल. पहिला कालखंड शिवकाळ तर दुसरा कालखंड पेशवेकाळ सर्व प्रथम आपण शिवकाळातील राज्यकर्त्यांवरील खर्चाची माहिती स्पष्ट करणार आहोत.

१. शिवकाळातील राज्यकर्त्यांवरील खर्च :

शिवकाळातील खर्चातील राजावरील होणारा खर्च हा एक महत्वाचा खर्च होता. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीचा जर विचार केला तर त्यांचे जीवन अत्यंत साधे. मात्र या विधानाला पुष्टी देणारी कादगपत्रे अथवा पुरावे उपलब्ध नाहीत. तथापि त्यांच्या दोन राज्यभिषेकांचा अपवाद वगळता त्यांनी स्वत:वर वैयक्तीक असा खर्च जास्त प्रमाणात केल्याचे पुरावे आढळत नाहीत. शिवाजी महाराजानी मनमानी राज्यकारभार केला नाही. इतर राज्य कर्त्याप्रमाणे मनमानी खर्च केला नाही.

राजांवर होणाऱ्या खर्चाचा विचार करता मराठ्यांचा कारकिर्दीत राजकर्त्यांशी संबधीत पुढील घटकांवर सुध्दा खर्च केला जात होता. या खर्चाची माहिती पुढे नमुद करण्यात आली आहे.

१) राजकुटुंबाचा खर्च : शिवकाळात राजकर्त्यांच्या खर्चा बरोबरच राजकर्त्यांच्या कुटुंबाच्या खर्चाचा विचार होत असे. कुटुंबातील व्यक्ती, मग ते पत्नी, मुले कोणीही असो त्याचा खर्च राजखर्चाच्या माध्यमांतून केला जात असे. कुटुंबातील आनंदमय कार्यक्रमावर खर्च केला जात असे. शिवाजी महाराजांना ८ पत्नी असाव्यात तसे ८ मुले होती. त्यांच्या विवाहाचे कार्यक्रम त्यांच्या हयातीत झाले. मात्र त्यांनी या कार्यक्रमासाठी राजखर्चातून निधी खर्च केला या बाबत पुरावे उपलब्ध नाहीत.

२) राजधानीवरील खर्च : शिवकाळातील खर्चामध्ये हा खर्च सर्वात मोठा खर्च मानला जातो. शिवाजी महाराजांनी सुरक्षीततेच्या दृष्टीने रायगडावर राजधानी निर्माण केली होती. ही राजधानी त्यांनी सुंदर, सुशोभित बनविली होती. राजधानीवर सुखसोयी उपलब्ध करण्यासाठी त्यांनी प्रचंड खर्च केला होता. शिवाजी महाराजांनी रायगडावर रहाण्यासाठी घरे, राजवाडे, राहण्यासाठी स्वतंत्र महाल, लष्करी अधिकाऱ्यासाठी घरे, प्रधानांसाठी घरे, हस्तीखाना, तबेले, उष्टखाना, वस्तूभंडारे, धान्यकोठारे, रथ-पालख्या ठेवण्याकरीता बांधलेल्या इमारती तसेच निरनिराळे सज्जे, पाण्याचे घाट, तळे, निरनिराळ्या कारखान्याकरिता (प्रशासनाचे विभाग) बांधलेल्या इमारती असे प्रंचड बांधकाम केले होते. अशा प्रकारचे स्पष्टीकर बखरकार सभासदानी केले आहे. रायगड या राजधानीच्या बांधकामाचा खर्च राजावरील खर्चातच धरण्यात आला आहे.

३) कपडे : शिवकाळात राजपदाच्या कपड्यांना प्रतिष्ठा होती व या पदाची प्रतिष्ठा सांभाळण्यासाठी कपड्यांवर खूप मोठा खर्च केला जात असे. या कपड्यात किंमती कपड्यांचा समावेश होत असे. उदा. मुंगोपाटण कापड, सुवर्ण एम्ब्रॉयडरी केलेले कापड, दुपट्टा, रेशमीशाल, विनलेले रेशमी व लोकरी कपडे, कंबरपट्टा, गळपट्टा, किंमती पांढरे व रंगीत कपडे, विविध अंगरखे, झगे इत्यादी कपडे असत. हे कपडे देशाच्या विविध भागामधून व परदेशातून सुद्धा खरेदी केले जात असत. सभासद बरखरकारांनी असे म्हटले आहे की राजकर्त्यांच्या कपड्याची किंमत १ कोटी होन व ५० हजार निशानी होन (नजराना म्हणून आलेल्या कपड्यांची किंमत) इतकी असे यावरुनच या काळातील राजकर्त्यांच्या कपड्यांवर होणाऱ्या खर्चाचा अंदाज येतो.

४) अलंकार : शिवकाळात राजखर्चाशी संबधीत असणारा एक खर्च म्हणून अलंकाराकडे पाहिले जाते. शिवकाळात राजकर्त्यांनी जे अलंकार वापरले होते. ते अत्यंत किमंती होते. हिऱ्यामोत्यांचे कंठे, मौल्यवान खडे, नीलमणी, शिरपेच, चंद्रलेखा, शिसफूल, बाजूबंद, सुवर्णकंकण, मनगटी कडे या प्रकारचे ते अलंकार होते. युद्धातील लूट, नजराणे या स्वरुपातही शिवाजी महाराजांना दागिने उपलब्ध होत असत. नजराणे म्हणून उपलब्धता या बाबतची माहिती उपलब्ध आहे मात्र खरेदी अथवा लूट या बाबतची माहिती उपलब्ध नाही. मात्र शाही वैभवात या गोष्टी आवश्यक असल्याने या प्रकारच्या घटकावर खर्च होत होता हे निश्चित आहे.

५) राज्याभिषेकावरील खर्च : शिवकाळातील राजखर्चाशी संबधीत असणारा अत्यंत प्रतिष्ठेचा खर्च म्हणून राज्याभिषेकावरील होणाऱ्या खर्चाकडे पाहिले जाते. तेव्हांच्या काळात राज्यारोहण, सुवर्णतुला हे खास प्रसंग राजे लोकांसाठी असत. या प्रसंगाना धार्मिक व व्यावहारीक दृष्टीकोनातून प्रतिष्ठा होती. प्रजेवर छाप उमटविण्यासाठी इतरत्र दरारा निर्माण करण्यासाठी व राजपदाचा नावलौकीकासाठी अशा समारंभांचे आयोजन केले जात होते. शिवकाळात शिवाजी महाराजांनी १६७४ मध्ये स्वतःस राज्यभिषेक करुन घेतला. या प्रसंगी त्यानी मुक्तहस्ते व उदारपणे खर्च केला.

शिवकाळात राज्याभिषेक प्रसंगी प्रतापगडा वरील तुळजाभवानीच्या मुर्तीस १ मण वजनाची सुवर्णछत्री अर्पण केली. या छत्रीची तेव्हा किंमत ५० हजार रुपये होती. राज्याभिषेक प्रसंगी राजसिंहासन बनविले ते सोन्याचे होते. या सिंहासनाबाबत बखरकार सभासद म्हणतात हे सिंहासन ३२ मण वजनाच्या सोन्याचे होते. या सिंहासनास राजखजिन्यातील मौल्यवान रत्ने लावली होती. या सिंहासनाबाबत सर जदूनाथ सरकार म्हणतात हे सिंहासन ३२ मण सोन्याचे म्हणजे १४ लक्ष रुपये किंमतीचे होते. सिंहासनात लावलेल्या रत्नांची किंमत वेगळीच होती. राज्यभिषेक प्रसंगी शिवाजी महाराजांच्या मस्तकावर जे छत्र धरावयाचे होते ते छत्र जडावाचे व मोती लावलेल्या झालरीचे होते.

राज्याभिषेक प्रसंगी शिवाजी महाराजांनी अमाप दानधर्म केला. विद्वान, पंडित, ब्राह्मण, साधूसंत, राजदूत, अतिथी यांना मुक्तहस्ते दान केले. २४ हजार होण केवळ दक्षिणेवर खर्च केला. ७ जून रोजी सुरु झालेला दानधर्म पुढे १२ दिवस चालू राहिला.

राज्याभिषेकावर १ कोटी ४२ लाख रुपये खर्च झाला असा संदर्भ सभासद बखरीत आहे. तर जदूनाथ सरकार यांच्यामते राज्याभिषेकाचा खर्च १० लक्ष झाला होता.

६) गोरगरीबाना मदत : शिवकाळात राज्याभिषेकाच्या वेळी व इतर समारंभाच्या वेळी शिवाजी महाराज व त्यांच्या मातोश्री जिजाबाई यांची तुला केली जात होती. या तुलेकरीता वापरण्यात आलेली धातू, धान्य त्या काळातील रीतीरिवाजाप्रमाणे गोरगरीबांना वाटून टाकले जात होते. तसेच शिवाजी महाराज व त्यांच्या मातोश्री जिजाबाई नडलेल्या गरजू लोकांना मदत करीत असत. गुंजनमावळच्या देशमुखांच्या मुलीच्या लग्नाच्या वेळी जिजाबाईनी त्याला २५ होण रोख व ५०० माणसांना पुरेल एवढे धान्य दिल्याच्या संदर्भ मिळतो. ही मदत राजकोषातून केली जात होती. म्हणून याचा समावेश राजखर्चात करण्यात आला आहे.

७) धार्मिक कृत्यावरील खर्च : शिवकाळाचे निर्माते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मनाचा कल धार्मिक गोष्टीकडे असल्याने त्यांच्याकडून जो धार्मिक कृत्य होत असत त्याच्या राज तिजोरीतून बराच खर्च होत असे.

- हिंदू व मुस्लिम साधूसंताना देण्यात येणाऱ्या देणग्या : शिवकाळातील शिवाजी महाराजांचे नेतृत्व धर्म सहिष्णू होत. त्यांनी आपल्या कारकिर्दीत देणग्या अथवा सनदा देताना हिंदू - मुस्लिम असा भेदभाव मानला नाही. मुस्लिम साधूसंत व फकीर यांना शिवाजी महाराजांकडून निवार्ह भत्ता, दिवाबत्तीकरिता होणारा खर्च, व मशीदीची व्यवस्था ठेवण्यासाठीचा खर्च दिला जात असे.

  हिदूं साधूंत, महंत, पुजारी यानाही त्यांच्या धार्मिक कार्यासाठी लागणारा खर्च शिवाजी महाराजांकडून दिला जात असे. तसेच दैनंदिन खर्चही राजाकडून दिला जात असे.

  डी. व्ही. आपटे आपल्या "महाराष्ट्र इतिहास मंजिरी" या ग्रंथात म्हणतात रामदास स्वामीनच्या चाफळच्या मठाला शिवाजी महाराजानी भरपूर जमीन इनाम म्हणून दिली होती. त्यात ३५ गावातील ४१० बिघे जमीन व गावातील साऱ्याच्या रुपाने जमा होणारे १२१ खंडी धान्य विविध कार्याकरिता व उत्सवांकरीता दिले होते. पाटगा येथील संत मौनीबाबत यांनाही दररोज १००० माणसांना जेवू घालण्याइतके धान्य दिले जात असे. शिवाजी महाराजानी मंदिरातील लोकांना व यात्रेकरुना रहाण्यासाठी म्हणून बरीचशी जमीन दिली

होती. मोरया गोसावी कल्याणकारी या साधुलाही शिवाजी महाराजांनी बरीच देणगीरुपाने मदत केली होती. हा पण एक राजखर्चाचा भाग होता.

- वर्षासने : शिवाजी महाराजांकडून मंदिराच्या धार्मिक समारंभाना तसेच धार्मिक कृत्यांना वर्षाला ठराविक रक्कम दिली जात असे. मंदिरातील प्रार्थना, धार्मिक समारंभ, एकादशी, शिवरात्र, रामनवमी, नवरात्र यासाठी लागणारा खर्च शिवाजी महाराजाकडून मिळत असे. वेदामध्ये प्राविण्य असणाऱ्या ब्राह्मणांशी वर्षासने मिळत असत. अग्निहोत्री व विद्वान ब्राह्मणांना शिवाजी महाराजांकडून 'धर्मादाय' म्हणून काही ठराविक रक्कम मिळत असे. एकंदरीत हा खर्च सुद्धा राजकोषातून केला जात असे म्हणूनच हा एक राजखर्चाचा भाग होता.

- सतांची मंदिरे व समाधी यांना देण्यात येणाऱ्या देणग्या : शिवकाळात संतांची मंदिरे व समाध्या यांना अनेक देणग्या देण्यात आल्या होत्या. सासवडच्या सोपानदेवाच्या समाधीच्या दिवाबत्तीकरिता काही जमीन व पैसा दिल्याचा संदर्भ मिळतो. आळंदीयेथील ज्ञानेश्वराच्या मंदिराकरीता शिवाजी महाराजांनी जमीन दिली होती. हा खर्च सुद्धा राजखर्चाचा भाग मानला जातो.

- मंदिरे बांधण्याकरिता व दुरुस्तीकरिता होणारा खर्च : शिवकाळात राज तिजोरीतून मंदिरे बांधण्यासाठी व दुरुस्त करण्यासाठी खर्च झाला आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे "प्रतापगडावरील भवानी मातेचे बांधलेले मंदिर होय" कर्नाटकातील अनेक मंदिरांच्या दुरुस्तीसाठी शिवाजी महाराजानी देणग्या दिल्या. शिवाजी महाराजांनी गोठ्यातील 'सप्त कोटिश्वर' मंदिराची दुरुस्ती केल्याच्या उल्लेख डॉ. सेन यांनी पोतदार स्मरण या ग्रंथात केला आहे.

८) शिक्षणावरील खर्च : शिवकाळात शिक्षण व ज्ञान यावर राजकोषातून खर्च केला जात असे. शिवाजी महाराजांच्या अष्ट प्रधानातील पंडितराव या प्रधानकडे धार्मिक कार्याबरोबरच शिक्षण खाते होते. त्यांच्या नेतृत्वाने शिक्षणव्यवस्थेवर खर्च केला जात असे. धार्मिक शिक्षणाबरोबरच व्यव्हारीक शिक्षणाकडे लक्ष दिले जात असे. म्हणूनच हा घटक राजखर्चामध्ये नमुद करण्यात आला आहे.

९) विद्वानाना राजाश्रय : शिवकाळात विद्वानाना राजश्रय देण्यात आला होता. विद्वान व नामांकित पंडितांना पाचारण करुन त्यांना राजाश्रय देऊन त्यांचा खर्च राजकोषातून केला जात होता. वेद, शास्त्रे, ज्योतिष, यामध्ये पारंगत असणाऱ्या ब्राह्मणांसाठी राजाश्रय मिळत असे. शिवकाळात कृष्णा ज्योतिष, परमानंद, कवी भूषण इत्यादी अनेक विद्वान शिवाजी महाराजांच्या पदरी होते. या सर्व विद्वानांचा खर्च राजकोषातून केला जात असे.

२. पेशव्यांवरील होणर खर्च :

मराठ्यांची सत्ता विस्तारीत करण्याची महत्वपूर्ण भूमिका पेशव्यांनी निभावली होती. परिणामी त्यांच्या सभोवताली सत्तेचे केंद्रिकरण झाले होते. परिणामी त्यांच्यावर होणारा खर्च राज तिजोरितूनच केला जात होता. किंमती दागीने, हिरे, पोवळे, किंमती हार कंठे, बांगड्या या सारख्या चैनिच्या वस्तू व त्यावर होणारा खर्च राजतिजोरीतून केला जात होता. पेशवे त्यांचे कुटुंबीय व जवळचे नातेवाईक याच्या साठी हा खर्च केला जात असे.

१४.३मुलकी प्रशासनावरील खर्च

मराठ्यांच्या खर्चाचा विचार करता दुसरा राज्याच्या खर्चाचा भाग म्हणून मुलकी खर्चाकडे पाहिले जाते. कोणतेही शासन चालविण्यासाठी प्रशासन हे आवश्यक असते. मराठ्यांने आपल्या कारकिर्दीत प्रशासन निर्माण केले होते. या प्रशासनावर जो खर्च होत होता त्याचा आढावा या ठिकाणी आपण घेणार आहोत. सर्व प्रथम आपण मराठ्यांच्या शिवकाळातील मुलकी प्रशासनावर काय खर्च होत होता याची माहिती पाहणार आहोत त्या नंतर पेशव्यांच्या मुलकी प्रशासनाचा विचार करणार आहोत.

१. शिवकाळातील मुलकी प्रशासनावरील खर्च :

शिवकाळातील मुलकी प्रशासनावरील खर्चाचा विचार करत असताना आपणाला प्रशासन रचनेतील केंद्रिय, प्रांतिक प्रशासनावर होणाऱ्या खर्चाचा विचार करावा लागेल.

- केंद्रिय प्रशासनावरील खर्च : शिवकाळात राजाला सल्ला देण्यासाठी केंद्रिय प्रशासन निर्माण करण्यात आले होते. अष्टप्रधान मंडळ म्हणून प्रचलित होते. पेशवा, अमात्य, सेनापती, सचिव, मंत्री, पंडितराव, सुमंत न्यायाधीश यांचा समावेश अष्टप्रधान मंडळात असे. या अष्टप्रधान मंडळातील व्यक्तींना त्यांच्या पदानुसार व कामगिरीनुसार वेतन दिले जात असे. या लोकांच्या वेतनावरील होणारा खर्च ही शिवकाळातील मुलकी प्रशासन खर्चाशी संबधीत आहे.

  सर्व साधारण या लोकांवर वेतनानुसार होणारा खर्च अशा पद्धतीचा होता.

  पेशवा - १५००० होन

  मुजुमदार - १२००० होन

  इतर मंत्री प्रत्येकी १०००० होन

या अष्टप्रधान मंडळा व्यतिरिक्त केंद्रिय प्रशासनात मुख्य सचिव किंवा चिटणीस हा अधिकार कार्यरत होता. त्याला वर्षाला पगार ६००० इतका होता अशी माहिती चिटणीसांच्या बखरीत आहे. तसेच फडणीसाला वर्षाला २००० पगार होता ही माहितीसुद्धा आहे. या व्यतिरिक्त पोतनिस, पोतदार आणि इतर यांच्याकडेही महत्वाची खाती होती. यांना किती पगार होता याचा उल्लेख चिटणीस बखरीत नाही. मात्र या सर्वांना १०० ते ५०० होन पगार असावा असे चिटणीस बखरकार म्हणतो.

अष्टप्रधान मंडळाच्या नियंत्रणाखाली १८ कारखाने व १२ महाल असत. त्यांच्या प्रत्येक खात्यावर तीन अधिकारी असत हवालदार, जमादार व हिशेबनिस हे तीन अधिकारी असत. मात्र या अधिकाऱ्यांना वेतन किती होते याची माहिती मिळत नाही. या शिवाय केंद्रिय प्रशासनात इतर लहान सहान अधिकारी होते व त्यांना मदत करणारे कारकून होते या सर्वांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे वेतन दिले जात होते. या सर्व मंत्री व अधिकाऱ्यांच्या वेतनाचा खर्च केंद्रिय प्रशासनातून केला जात होता.

- प्रांतिक प्रशासनावरील खर्च : शिवकाळात प्रशासनाच्या सोयीसाठी प्रांतिक प्रशासन निर्माण करण्यात आले होते. शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात तेव्हा कोकणपट्टी, देश व कर्नाटक

munotes.in

मोहिमेत जिंकलेला प्रदेश या भागांचा समावेश होता. शिवकाळात चौदा प्रांत होते असे मत मल्हारराव रामराव चिटणीस यांनी व्यक्त केले आहे. तर रानडे यानीही यात थोडाफार फरक करुन चौदा भाग प्रचलीत होते असे स्पष्ट केले आहे.

प्रांत मावळ, प्रांत वाई - सातारा - कराड, प्रांत पन्हाळअ, प्रांत दक्षिण कोकण, प्रांत ठाणा, प्रांत त्रिंबक, प्रांत बागलाण, प्रांत वनगड, प्रांत बिदनूर, प्रांत कोल्हापूर, प्रांत श्रीरंगपट्टन, प्रांत कर्नाटक, प्रांत वेलोरे, प्रांत तंजावर अले प्रांताचे विवरण करण्यात आले होते.

प्रांताची विभागावर रचना केली होती.

प्रांत (सरकार सुभा)	-	सुभेदार
परगणा (मामला, तालुका)	-	मामलेदार
महाल (तरफ, तपे, कर्यात)	-	महालकरी
गाव (कसबा, मौजे व मजरे)	-	मोकादम

सुभेदार हा प्रांताचा मुख्य अधिकारी असे. त्याच्या मदतीला दिवाण, मजुमदार, फडणीस, सबनीस, कारखानीस, चिटणीस, जमादार व पोतणीस हे आठ अधिकारी असत. प्रांताच्या आठही अधिकाऱ्यांवरील खर्च राज्याच्या तिजोरीतून केला जात असे.

चिटणीसाच्या बखरीत या अधिकाऱ्यांवर होणाऱ्या खर्चाचे विवरण नमुद करण्यात आले आहे. सर्व साधारण सुभेदाराला वार्षिक ४०० होन मुजुमदाराला वार्षिक १२५ होन, हवालदाराला महिन्याला ३ ते ५ होन पगार दिला जात असे. हा सर्व वेतनखर्च राज्याच्या तिजोरीतूनच केला जात असे. म्हणूनच हा भाग प्रशासकीय खर्चाचा एक भाग समजला जात होता.

शिवकाळातील प्रांतीय प्रशासनाचा शेवटचा भाग म्हणजे गाव. गावाच्या प्रशासनासाठी देशमुख, देशपांडे, पाटील, कुळकर्णी, शेट - महाजन, चौगुला हे अधिकारी असत. मात्र शिवकाळात खेडेगाच्या प्रशासनासाठी जास्त खर्च केला जात नव्हता. अधिकाऱ्यांना पगारा ऐवजी जमीनी शेतसारा मुक्त दिल्या जात असत. तसेच या अधिकाऱ्यांना गावातील लोकांकडून काही वस्तू व सेवा फुकट मिळत असत. ज्या ठिकाणी गावात कुळकर्णी नसे त्या ठिकाणी कारकून नेमला जात असे त्याला वर्षाला १२ लारी पगार म्हणून दिला जात असे. तसेच त्याला किरकोळ खर्चासाठी ४ लारी मिळत असत. कारकूनाचा पगार मात्र सरकारकडून मिळत असे.

या माहितीच्या आधारे आपण शिवकाळातील मुलकी प्रशासनावर कोण - कोणत्या पद्धतीने खर्च होत होता याची माहिती आणून घेतली आहे. एकंदरीत या माहितीच्या विचार केला तर शिवकाळात केंद्रिय प्रशासनावर आपणास जास्त प्रमाणात खर्च होत होता असे दिसते. त्याच्या खालोखाल प्रांतिय प्रशासनावर जास्त खर्च होत होता असे जाणवते. मात्र प्रांतिय प्रशासनातील शेवटच्या घटक समजल्या जाणाऱ्या गाव या घटकावर कमी खर्च होत होता असे स्पष्ट होते. एकंदरीत ही सर्व माहिती आपण केंद्रिय प्रशासन, प्रांतिय प्रशासन व त्या प्रशासनामध्ये कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांच्या प्रतिष्ठेनुसार, संखेनुसार व कार्यपद्धतीनुसार सादर केली आहे. या माहितीच्या स्पष्टीकरणासाठी काही विद्वानांची मतेही विचारात घेतली आहेत.

२. पेशवेकाळातील मुलकी प्रशासनावरील खर्च :

ज्या प्रमाणे शिवकाळात मुलकी प्रशासनावर खर्च केला जात असे तशाच प्रकारचा खर्च पेशवेकाळात सुद्धा केला जात होता. या ठिकाणी आपण पेशवेकाळात मुलकी प्रशासनावर कोणत्या प्रकारे खर्च होत होता याची माहिती स्पष्ट करणार आहोत.

शाहु महाराजांच्या कारकिर्दीपासून साधारणत: या खर्चाला परवानगी होती असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. सर्व प्रथम आपण पेशवेकाळातील केंद्रिय प्रशासनावर किती व कसा खर्च होत होता हे पाहणार आहोत. नंतर प्रांतिय प्रशासनावरील खर्चाचा विचार करणार आहोत.

अ) केंद्रिय प्रशासनावरील खर्च : पेशव्यांच्या केंद्रिय प्रशासनात अष्टप्रधानमंडळ प्रचलीत होते. तसेच अष्टप्रधान मंडळाशी संबधीत विविध खाती प्रचलीत होती. या अष्टप्रधान मंडळावरील खर्च व विविध खात्यावरील जो खर्च केला जात होता त्या खर्चाला केंद्रिय प्रशासनावरील खर्च असे म्हटले जाते.

पेशवेकाळात प्रधानाला १३००० रुपये, आमात्याला १२००० रुपये, सचिवाला १००० रुपये, मंत्री १००० रुपये, सुमंत १००० रुपये, न्यायाधिश १०००० रुपये, सेनापती ९००० रुपये, प्रतिनिधी १५००० रुपये, पंतराज्याध्याय १००० रुपये, इतके वेतन दिले जात होते. या महत्वाच्या पदावरील व्यक्तीना जसे वेतन देण्याची प्रथा प्रचलीत होती तसेच इतर हुद्यावर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना सुद्धा वेतन दिले जात होते.

इतर राज्यकर्त्याप्रमाणे पेशवेकाळात सुद्धा केंद्रिय प्रशासनावरील पीलखाना (हत्तीखाना), शिकारखाना, उष्टखाना, पागा, तोफखाना, नगारखाना, रत्नशाळा, इमारत विभाग या विभागावर काम करणाऱ्या अधिकाऱ्यावर व या विभागाशी संबधीत कामकाजावर खर्च केला जात होता. परंतू हा खर्च किती होता व कसा केला जात होता या संबधीची माहिती उपलब्ध नाही.

ब) प्रांतिक प्रशासनावरील खर्च : शिवकाळा प्रमाणेच पेशवेकाळात सुद्धा प्रांतिक प्रशासनावर खर्च केला जात होता. पेशवेकाळात प्रशासनाचा सोयीसाठी प्रांताची रचना करण्यात आली होती. प्रांताची रचना शिवकाळा प्रमाणेच होती. प्रांताचा जो अधिकारी असे त्याला सुभेदार समजले जात असे. सुभेदाराला किती वेतन होते या बाबत पुरावा नाही. मात्र इतर अधिकाऱ्यांना जे वार्षिक वेतन दिले जात होते या बाबतची माहिती उपलब्ध आहे.

१) मामलतदारास वार्षिक २००० रु वेतन दिले जात होते.

२) कमाविसदारास वार्षिक ५०० रु वेतन दिले जात होते.

३) मुजुमदारास वार्षिक २५० रु वेतन दिले जात होते.

४) फडणीसास वार्षिक २०० रु वेतन दिले जात होते.

५) कारकुणास वार्षिक १५० रु वेतन दिले जात होते.

६) दप्तरदारास वार्षिक २०० रु वेतन दिले जात होते.

डॉ. सेन यांचे म्हणणे असे आहे की 'हुजूर दप्तर' या पुण्यातील सरकारी कचेरीतील अधिकारी व कारकून यांच्या पगाराचा भारही सरकारी तिजोरीवर होत होता.

या अधिकाऱ्याव्यतिरिक्त मराठा सरदारांकडे प्रांतात शातता व सुव्यवस्था राखण्याकरीता जे सैन्य ठेवले जात असे त्यांच्या खर्चासाठी त्या सरदाराला सरकारकडून जहागीरीशिवाय शिवाय रोख रक्कमेची सरंजामीही दिली जात होती. या सरंजामीवर होणाऱ्या खर्चाचे विवरण पुढील प्रमाणे आहे.

१) मल्हारराव होळकर - ९५ लाख रुपये

२) आनंदराव पवार - ४५ लाख रुपये

३) चिंतामण पांडुरंग पटवर्धन - ११ लाख रुपये

४) गंगाधर गोविंद पटवर्धन - ६½ लाख रुपये

५) प्रतिनिधी - १४ लाख रुपये

६) रास्ते - २१ लाख रुपये

७) थोरात - ११½ लाख रुपये

८) पुरंदरे - २ लाख रुपये

वरील सर्व माहितीच्या जर विचार केला तर पेशवेकाळात प्रांतीक अधिकाऱ्यांवर होणारा खर्च व सरंजामीवर होणारा खर्च जास्त होता असे दिसून येते. मात्र पेशवेकाळात मराठ्यांचे वाढलेले साम्राज्य टिकविण्याच्या दृष्टीने हे आवश्यक होते हे आपणास नाकारता येणार नाही. सर्वसाधारणपणे वेतन व सरंजामदारीची आकडेवारी ही या ठिकाणी उपलब्ध माहितीच्या आधारे मांडण्यात आल्याने हे वास्तविक स्वरुप आहे. यातून आपणास पेशव्यांच्या प्रांतिक खर्च समजण्यास मदत होते.

१४.४लष्करी प्रशासनावरील खर्च

मराठ्यांच्या लष्करी प्रशासनावरील खर्चाचा विचार करत असतांना आपणास शिवकाळ व पेशवेकाळ या दोन्ही कालखंडाचा विचार करावा लागेल. मराठ्यांने नव्याने साम्राज्य उभे केले होते, शाही राजवटी व परकीय सत्तांना शह देत टिकवीले होते. बदलत्या राजकीय परिस्थितीनुसार विस्तारीत केले होते या सर्व बाबींचे श्रेय मराठ्यांच्या लष्करांना द्यावे लागेल. म्हणूनच मराठ्यांच्या लष्कर व्यवस्थेवर होणाऱ्या खर्चाची माहिती आपण या ठिकाणी स्पष्ट करत आहोत.

सर्व प्रथम आपण मराठ्यांच्या शिवकाळातील लष्करी प्रशासनाची खर्चाची माहिती पाहणार आहोत नंतर पेशव्यांच्या लष्करी प्रशासनावरील खर्चाचे विवेचन करणार आहोत.

अ) शिवकाळातील लष्करी प्रशासनावरील खर्च :

शिवकाळात शिवाजी महाराजांकडे सैन्यबळ किती होते. या बाबत इतिहासकारात एकवाक्यता नाही. त्यामुळेच सभासद बखरीमध्ये नमुद केलेली सैन्यसंख्या बऱ्याच ठिकाणी ग्राह्य धरली

जाते. सभासद बखरीनुसार शिवाजी महाराजांची सैन्यसंख्या २,०८,२६० इतकी होती. या सैन्यसंख्येमध्ये घोडदळ, पायदळ व आरमार यांचा समावेश होता. पायदळात १ लाख मावळे, घोडदळात ६०,००० शिलेदार व ४५००० हजार बारगीर असे सैन्य संख्येचे विवरण होते.

चिटणीसांच्या बखरीत असे सांगितले आहे की शिवकाळात सेनापतीला वर्षाला १०००० होन पगार होता. लष्करातील इतर अधिकाऱ्यांना ४०० ते ५०० होन पगार होता. इतर लहान लहान अधिकाऱ्यांना वर्षाला १५ होन पासून २०० होनपर्यंत पगार होता.

शिवकाळातील लष्करी प्रशासनावरील खर्च पुढील घटकांना अनुसरुन केला जात होता ते घटक या ठिकाणी आपण स्पष्ट करत आहोत.

१) घोडदळावरील खर्च : शिवकाळातील जे घोडदळ निर्माण करण्यात आले होते त्या घोडदळाची माहिती सभासद बखरीत आहे. या बखरीमध्ये घोडदळामध्ये असणारे अधिकारी व शिपाई यांच्यावर होणाऱ्या वार्षिक वेतनावरील खर्चाचा संदर्भ उपलब्ध आहे. या संदर्भात त्याने असे स्पष्ट केले आहे.

पद		**वार्षिक वेतन**
सरनोबत	-	४ हजार ते ५ हजार होन
पंचहजारी	-	२ हजार होन
हजारी	-	१ हजार होन
जुमलेदार	-	५०० होन
हवालदार	-	१२५ होन
बारगीर	-	९ होन

या महत्वपूर्ण घोडदळातील अधिकाऱ्यांच्यावर वेतन रुपाने खर्च होणाऱ्या रक्कमांचे विवरण पाहिल्या नंतर याच अधिकाऱ्यांपैकी जुमलेदार, हजारी व पंचहजारी यांच्या हाताखाली काम करणाऱ्या अधिकाऱ्याला वार्षिक पगार पुढील प्रमाणे होता.

पद		**वार्षिक खर्च**
जुमलेदाराचा मुजुमदार	-	५०० होन
हजारीचा मुजुमदार	-	१०० ते १२५ होन
हजारीचा कारभारी	-	५०० होन
हजारीचा जमेनविर	-	५०० होन

या वेतनाच्या व्यतिरिक्त पंचहजारी व सरनोबत यांच्या हाताखाली अनेक मुलकी अधिकारी काम करत होते. मात्र त्यांच्या वेतनाविषयी माहिती उपलब्ध नाही. लष्करात प्रत्येक २५ सैन्याचा एक विभाग असे. या सैन्यांना पाणी वाहणारा एक पखालजी असे तसेच घोड्याला नाल मारणारा लोहार, कारकुन, बातमीदार, हेर, जासूद हे अधिकारी पंचहजारी व सरनोबत या विभागात

muhotes.in

असत मात्र या लोकांच्या वेतनासंबधी माहिती उपलब्ध नाही. घोडदळात वरच्या पदावर काम करणाऱ्या अधिकाऱ्याना इतरही सेवा - सुविधा उपलब्ध केलेल्या असत. त्याबाबतही माहिती उपलब्ध नाही.

घोडदळातील बारगीराला एक घोडा, शस्त्रे व कपडे मिळत असत, शिलेदाराला जरी स्वत:चा घोडा व शस्त्रे स्वत:ला खरेदी करावी लागत असली तरी या खर्चासाठी काही मानधन सरकारकडून मिळत असे. शिलेदाराचे संघटन, त्यावरील अधिकारी, त्यांचे वेतन तसेच शिपयांचे वेतन या संबंधीची पुरेशी माहिती उपलब्ध नाही मात्र या लोकांच्या वेतनासाठी सरकारी खर्च नाही. मात्र या लोकांच्या वेतनासाठी सरकारी खर्च असावा अंदाज काढला जातो. शिवकाळात घोडदळ हे प्रतिष्ठेचे दळ मानले जात असल्याने या दळावर होणारा सर्वच खर्च सरकारच्या तिजोरीतून होत असे.

२) पायदळावरील खर्च : शिवकाळात लष्करी प्रशासन खर्चाचा एक भाग म्हणून पायदळावर खर्च केला जात होता. शिवाजी महाराजांच्या पायदळात सरनोबत, सातहजारी, पंचहजारी, हजारी, जुमलेदार, हवालदार, नाईक असे लष्करी अधिकारी होते. तसेच सबनिसासारखे मुलकी अधिकारी होते. या अधिकाऱ्याना वेतन द्यावे लागत असे. सभासद बखरीतील संदर्भ माहितीनुसार या अधिकाऱ्यांना त्यांच्या पदानुसार पुढीलप्रमाणे वेतन दिले जात होते. हे वेतन वार्षिक वेतन होते.

पद		**वार्षिक वेतन**
पंचहजारी	-	२००० होन
हजारी	-	१००० होन
जुमलेदार	-	१०० होन
सबनिस	-	१०० ते १२५ होन

इतर अधिकाऱ्यांच्या वेतनाबाबत फारशी माहिती उपलब्ध होत नाही. मात्र त्यांना सुद्धा वेतन दिले जात असावे असा अंदाज मानला जातो.

३) शरीर संरक्षक दळावरील खर्च : शिवकाळात शिवाजी महाराजांची स्वसंरक्षणासाठी २००० शिपायांचे शरीरसंरक्षक दल निर्माण केले होते. या शरीरसंरक्षक दलाची विभागणी २० शिपायांचा एक गट ३० शिपायांचा एक गट ४० शिपायांचा एक गट, ६० शिपायांचा एक गट. अशा वेगवेगळ्या गटात केली होती. या सर्वाच्या वेतनाचा खर्च सरकारी तिजोरीतून केला जात होता. त्यांना मिळणारी शस्त्रास्त्रे, कपडे, यांचा खर्च सुद्धा शासकीय तिजोरीतून केला जात होता. प्रत्येक गटावर एक गटप्रमुख नेमला होता त्याचा खर्चही शासकीय तिजोरीतून केला जात होता.

४) नौदलावरील खर्च : शिवकाळात शिवाजी महाराजांनी स्वतंत्र आरमार निर्माण केले होते. शिवाजी महाराजांच्या आरमारात गुराब, तरांडी, गलबते, शिबाड, पगार अशी ४०० जहाजे होती. शिवाजी महाराजांनी जी आरमाराची रचना केली होती या बाबतची माहिती रामचंद्र पंत अमात्याच्या 'आज्ञापत्रात' आहे. शिवाजी महाराजांच्या आरमारात अनेक सुभे होते. सुभ्यांची मिळून शिवकाळात दोन मोठी आरमारदले निर्माण झाली होती. प्रत्येक दलावर एक आरमारप्रमुख, अशा दोन आरमार प्रमुखांसाठी मायनाईक व दर्यासारंग अशी दोन पदे निर्माण करण्यात आली होती. या आरमारात कोळी, भंडारी, मलबारी, ख्रिश्चन या जातीतिल लोक

खलाशी म्हणून काम करत होते. या सर्व अधिकाऱ्यांना शासकीय तिजोरीतून वेतन दिले जात होते. म्हणूनच हा मराठ्यांच्या प्रशासकीय खर्चाचा भाग मानला जातो. मात्र या लोकांना पगार किती होता याबाबतची माहिती उपलब्ध नाही.

या शिवाय जहाज बांधणीसाठी सरकारी तिजोरीतून खर्च केला जात होता. कोकण किनाऱ्यावरील कल्याण, भिवंडी, पनवेल, राजापूर, देवगड, मालवण अशा अनेक बंदरात शिवाजी महाराजांचे जहाज बांधणीचे उद्योग सुरु होते याचा सर्व खर्च शासकीय तिजोरीतून केला जात होता.

५) किल्ल्याचे प्रशासन बांधणी व दुरुस्तीवरील खर्च : शिवकाळात किल्लयांना अनन्यसाधारण महत्व होते. शिवकाळात शिवाजी महाराजांच्या किल्लयांची संख्या २४० होती. किल्लयांच्या प्रशासनासाठी या काळात निरनिराळै अधिकारी नियुक्त केले जात होते. किल्लयांचे अंतर्गत प्रशासन हवालदार, कारखानिस,सबनिस व सरनोबत यांच्या नियंत्रणाखाली चालत असे. या मुख्य अधिकाऱ्याशिवाय मुजुमदार, तटसरनोबत, कारकून व नोकर हे इतर अधिकारीही किल्लयांची व्यवस्था पहात असत. या अधिकाऱ्यांना वार्षिक वेतनावर जो खर्च होत असे त्याचे विवरण पुढे देण्यात आले आहे.

पद		**वार्षिक वेतन**
हवालदार	–	१२५ होन व २५ होन त्याच्या वैयक्तीक नोकरीसाठी
सरनोबत	-	१०० होन
सबनीस	-	१०० होन
मुजुमदार	-	३६ होन
कारकून	-	३६ होन
तटसरनोबत	-	१२ होन

या व्यवस्थापकीय अधिकाऱ्या व्यतिरिक्त प्रत्येक किल्लयांवर ४०० ते ५०० सैनिक असत तसेच नाईक व जमादार हे अधिकारी असत यांच्यावर खर्च होत होता. मात्र यांच्या वेतनाबाबत माहिती उपलब्ध नाही. मात्र शिपायांना वार्षिक ९ होन इतका वेतन मोबदला मिळत असे.

किल्लयांतील प्रत्येक अधिकाऱ्याला त्याच्या दर्जा प्रमाणे आणि कामाच्या महत्वाप्रमाणे जादा पालखी भत्ता, मशाल भत्ता, वैयक्तीक नोकर सेवा, मोठी छत्री व हुजरे इत्यादी सेवा सरकारमार्फत पुरविल्या जात होत्या. हा खर्चही शासकीय तिजोरीतून केला जात होता.

शिवकाळात शिवाजी महाराजांनी नवे किल्ले बांधणीसाठी व जुने किल्ले दुरुस्तीसाठी विशेष लक्ष पुरविले होते. शिवाजी महाराजांनी सिंधूदुर्ग, विजयदुर्ग, हे जलदुर्ग बांधले. जमीनीवरील व डोंगरी किल्लेही बांधले. अनेक किल्लयांची दुरुस्ती केली. प्रत्येक किल्लयांवर अनेक इमारती बांधल्या. किल्ले बाधणाऱ्या तंत्रज्ञाना, मजूराना कामगाराना भरपूर वेतन दिले.

एकंदरीत १६७२ मधील शिवाजी महाराजांच्या किल्लयांच्या बांधणीसाठीच्या खर्चाचा विचार केला तर किल्लयांच्या बांधणीसाठी १,७५,००० होन इतका खर्च झाला होता. किल्लयांवर इमारत बांधणीसाठी १,२५,००० इतका खर्च झाला होता.

muhotes.in

या खर्चा व्यतिरिक्त किल्लयांवरील अन्नधान्य साठा व दारुगोळ्यासाठी लागणाऱ्या खर्च सुद्धा लष्करी खर्चातून केला जात होता. या सर्व आकडेवारीवरुन व माहितीवरुन आपणास किल्ले प्रशासन तसेच बांधणी व दुरुस्ती खर्चाचा अंदाज येतो.

६) नरजाणे व बक्षिसांवरील खर्च : शिवकाळात काही सैनिक व अधिकाऱ्यांना नियमित पगारा व्यतिरिक्त नजराणे व बक्षिसे मिळत असत. आपल्या कामात प्राविण्य व विशेष पराक्रम गाजविणाऱ्याना अशा प्रकारचा मोबदला मिळत असे. या व्यतिरिक्त स्वराज्यासाठी ज्यानी रक्त सांडले, जे स्वराज्यासाठी धारातिर्थपडले त्यांच्या वारसानाही शिवाजी महाराज निवृत्ती वेतन, देणग्या व बक्षिसे देत होते. रणांगणात जखमी झालेल्या सैनिकांना त्यांच्या जखमांची तिव्रता पाहून १००,२००,५० किंवा २५ होन बक्षीस दिले जात होते. जे अधिकारी पराक्रम गाजवत होते त्या अधिकाऱ्यांच्या पराक्रमांची दख्खल घेवून त्यांना घोडे, हत्ती बक्षीस म्हणून दिले जात असत. काही अधिकाऱ्यांना बक्षिस म्हणून सोन्याची कडी, कानांतील रिंग, शिरकपेच अशी बक्षीसे दिली जात असत.

डॉ. सेन यांनी तर शिवाजी महाराजांनी आपल्या सैनिकांच्या गौरवपूर्ण कामगिरीवर दिल्या जाणाऱ्या बक्षिसा बाबत व नजराण्याबाबत उत्तम उदाहरण दिले आहे त्यांनी असे सांगितले आहे की काही चांगली कामगीरी करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या व सैनिकांच्या जमीनीवरील शेतसारा या कामगिरीमुळे माफ केला आहे. जे सैनिक रणांगणावर मृत्यु पावत अशा मरणपावणाऱ्या सैनिकाच्या जागी त्याच्या मुलाची नियुक्ती करत असत असे. स्पष्टीकरण सभासद बखरीत आहे. वरील सर्व माहितीवरुन असे स्पष्ट होते की या खर्चाबाबत शिवाजी महाराजांचा दृष्टीकोन न्याय होता. आदर, गौरव व जाणीवेतूनच हा खर्च महाराज करत होते. हा सर्व खर्च सरकारी तिजोरितून केला जात होता.

७) युद्ध मोहिमांवरील खर्च : शिवकाळात शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीत अनेक युद्धमोहिमा आखल्या गेल्या व त्या मोहिमांची प्रत्यक्ष अमलबजावणी केली गेली. या मोहिमांसाठी लागणाऱ्या शस्त्रास्त्रांवर, युद्धसाहित्यावर मराठ्यांना मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागला. परमानंद, जयराम पिंडे, व सभासद बखरीत याची माहिती उपलब्ध आहे. या समकालीन लेखकांनी शिवकाळात युद्ध मोहिमांसाठी कोणती शस्त्रास्त्रे वापरली जात होती याची यादी दिली आहे. या यादीला अनुसरुन शिवकाळात तलवार, भाले, बिचवे, बंदुका, तिरकामठा, तोफा, दारुगोळा, यातील काही शस्त्रास्त्रे महाराष्ट्र व आसपासच्या प्रदेशात तयार केली जात असत. काही शस्त्रास्त्रे युद्धाच्या लुटीत मिळत असत. तर तोफा, बंदूका व दारुगोळा पोर्तुगीज, इंग्रज, डच व फ्रेंच्याकडून विकत घेतला जात असे. शिवाजी महाराजांनी ८० बंदुका व २०० तोफगोळे फ्रेंच्याकडून विकत घेतले होते. असा उल्लेख सर जदुनाथ सरकार यांनी केला आहे. हा संदर्भ आपणास "Shivaji & His Times" या ग्रंथात भेटतो. या सर्व शस्त्रास्त्रांची माहिती पाहिल्यानंतर हे सर्व साहित्य युद्धमोहिमांसाठी आवश्यक होते हे दिसून येत परिणामी या साहित्याच्या खरेदीवर खर्च करावा लागत होता. हा सर्व खर्च राजतिजोरितून केला जात होता. म्हणूनच हा खर्च मराठ्यांच्या खर्चाची एक बाब बनली होती.

८) लष्करी छावण्यांवरील खर्च : शिवकाळात मराठ्यांना युद्धमोहिमांच्या निमित्ताने अनेक प्रसंगी लष्करी छावण्या उभाराव्या लागत असत. मात्र या छावण्या अतिशय साध्या असत. फ्रांन्सिस मार्टीन हा परकीय प्रवासी शिवाजी महाराजांच्या लष्करी छावणीत तीन दिवस राहिला होता. तो आपल्या आठवणींत म्हणतो "शिवाजी महाराजांच्या लष्करी छावणीत कोणत्याही प्रकारचा डामडौल नव्हता किंवा सैन्यांच्या हालचालीना अडथळा होईल असे सामानसुमान

नव्हते. शिवाजी महाराजांच्या लष्करी छावणीमध्ये फक्त दोन तंबू असत एक शिवाजी महाराजांसाठी तर दुसरा त्यांच्या मंत्र्यासाठी. शिवाजी महाराजांच्या छावण्यांमध्ये सैनिकांना त्यांच्या बायका किंवा दासी, नर्तकी आणण्यास परवानगी नव्हती. या वरुन छावणीच्या साधेपणाचे स्वरुप लक्षात येते. मराठ्यांच्या छावणीच्या खर्चाचे प्रमाण कमी होत असे दिसून येते."

ब) पेशवेकाळातील लष्करी प्रशासनावरील खर्च :

मराठ्यांच्या लष्करी प्रशासनावरील खर्चाचा विचार करतांना सर्व प्रथम शिवकाळातील लष्करी प्रशासनावर होणाऱ्या खर्चाचा आढावा घेतला. यानंतर आपण या घटकात पेशव्याच्या कारकिर्दीतील मराठ्यांच्या लष्करी प्रशासनावर कोणता खर्च होत होता. याचा आढावा घेणार आहोत.

१) घोडदळावरील खर्च : पेशवेकाळात मराठ्यांच्या लष्करात घोडदळ अस्तित्वात होते. पेशव्यांना जरी लष्करावरासाठी सरदारांवर अवलंबून रहावे लागत असले तरी त्यांना स्वसंरक्षणासाठी व मराठा साम्राज्याच्या रक्षणासाठी नेहमीच सशस्त्र सैन्य ठेवावेच लागत होते. तसेच पेशवे स्वत:चे वैयक्तीक सैन्यही बाळगत होते. या सैन्यांचा खर्च ही ते राज तिजोरितून करत होते.

पेशव्यांचे जे घोडदळ होते त्या घोडदळाचे तिन भाग होते. एक खासगीचा, दुसरा शिलेदारांचा तर तिसरा स्वयंसेवकांचा. या तिन्ही विभागांना मिळून 'हुजुरात' असे म्हटले जात असे. हुजुरात मध्ये पागा, कारगीर, कारकून, जासूद, पखाले, चांभार, शिंपी इत्यादी अधिकारी नोकर व कारागीर असत. या सर्वाना माहिन्याला ४ रुपयासासून १२ रुपयापर्यंत वेतन मिळत असे. पेशव्यांच्या 'हुजुरात' चा मासिक खर्च ८२९९ रुपये इतका होता.

पेशवेकाळात मराठा सरदारांच्याकडे जे घोडदळ होते त्यातील मुलकी अधिकाऱ्यांचे वेतनही सरकारी तिजोरितून दिले जात होते. त्यांच्या वार्षिक वेतनाचे विवरण पुढे दर्शविले आहे.

पद		**वार्षिक वेतन**
दिवाण	-	५००० रु
खासनीस	-	५००० रु
फडणीस	-	९५० रु
सबनिस	-	४०० रु
दप्तरदार	-	५०० रु
चिटणीस	-	४०० रु
पारसनिस	-	२५० रु
जमादार	-	३०० रु
पोतणीस	-	४०० रु

या सर्व विवरणावरुन आपणास पेशव्यांच्या घोडदळाचे स्वरुप व त्यावर होणाऱ्या राजतिजोरीतील खर्च समजण्यास मदत होते.

२) पायदळावरील खर्च : पेशवेकाळात मराठयांच्या सैन्यव्यवस्थेत पायदळातील सैन्य जास्त होते. पेशवेकाळात पायदळातील सैन्य हे देश व विदेशातील होते. विदेशी सैन्यांना देशी सैन्यापेक्षा जास्त पगार दिला जात असे. अरब, ॲबिसिनियन, पोर्तुगीज, शीख असे परकिय सैन्य असत. डॉ. सेन यांनी असे म्हटले आहे की पेशवेकाळात मराठ्यांच्या पायदळावर महिन्याला २६,२४२ रुपये इतका खर्च होत असे. पहिल्या माधवराव पेशव्यांच्या काळात मराठ्यांच्या पायदळाची संख्या २५,००० हजार इतकी होती. या शिवाय पेशव्यांना चोर व दरोडेखोरां पासून खेडेगावातील लोकांचे संरक्षण व्हावे म्हणून सैन्य ठेवावे लागत होते. त्यांना 'शिबंदी' असे म्हटले जात असे. या सर्वांचा खर्च राज तिजोरितून केला जात होता. म्हणूनच हा घटक खर्चाची एक बाब ठरला आहे.

३) नौदलावरील खर्च : पेशवेकाळात जो पर्यंत आंग्रे आरमाराचे प्रमुख होते तो पर्यंत आरमाराचा खर्च ते स्वत: करत होते मात्र सन १६५६ मध्ये पेशव्याने तुळाजी आंग्रेच्या आरमाराला इंग्रजांच्या मदतीने बुडवीले. नंतर पेशव्याने स्वतंत्र आरमार उभारले. विजयदुर्ग येथे नवी तटबंदी उभारुन पेशव्यानी ते आपल्या आरमाराचे प्रमुख ठाणे बनविले. नंतर पेशव्याने काही दिवसातच वसई येथे आरमाराचे दुसरे ठाणे बनविले.

पेशव्याच्या आरमारात सुभेदार व सेनापती असे दोन मुख्य अधिकारी होते. सुभेदार व सेनापतीच्या हाताखाली कारभारी व अमीन असे दोन अधिकारी होते. अमिनच्या हाताखाली फडणीस, कारखानीस, जमादार, हरमनीस इत्यादी अधिकारी असत. बाळाजी बाजीरावाच्या कारकिर्दीत सुभेदाराचा वार्षिक पगार ११८६ रुपये रोख व १६११ मण धान्य इतका होता, खलाशाला दरमहा ४।। ते ५ रु व जमादार, हशमनीस यांना दरमहा ७।। रु पगार मिळत असे. या खर्चाच्या विवरणावरुन असे दिसून येते की शिवकाळाप्रमाणे पेशवेकाळातसुद्धा राजतिजोरितून नौदलावर खर्च होत होता.

४) किल्लयांच्या प्रशासनावरील खर्च : पेशवेकाळात किल्लयांच्या प्रशासनावर खर्च केला जात होता. किल्लयांच्या प्रशासनासाठी किल्यावर हवालदार, सरनोबत, दरखदार, फडणीस, सबनीस हे उच्च अधिकारी असत. त्याच बरोबर त्यांच्या मदतीस कारकून, बंदुकधारी, मशालधारक झाडूवाले इत्यादी कनिष्ठ अधिकारी असत. पेशव्यांच्या रोजनिशीत किल्लयावरील अधिकाऱ्यांना जो वार्षिक पगार दिला जात होता त्याच्या नोंदी आहेत. या ठिकाणी हे वेतनाचे वितरण माहितीसाठी मांडत आहोत...

पद		वार्षिक वेतन
सबनिस	-	२०० रु
फडणीस	-	२०० रु
सुभेदार	-	२५० रु
हवालदार	-	१२५ रु
सरनोबत	-	१२५ रु
कारखानीस	-	१०० रु

तसेच किल्लयातील इतर नोकरांना ४ ते ५ रुपये प्रतिमहिना वेतन मिळत असे. या वेतनाच्या मोबदल्यात हे वरिष्ठ व कनिष्ठ अधिकारी किल्लयांच्या प्रशासनाचे कामकाज पहात होते. यांचा खर्च राज तिजोरितून केला जात होता.

५) युद्धमोहिमांवरील खर्च : पेशवेकाळात मराठी सत्तेचा विस्तार दक्षिणेतून उत्तरेत पोहचला होता. या साठी मराठ्यांना अनेक युद्धमोहिमा काढाव्या लागल्या या युद्धमोहिमांसाठी आवश्यक असणारी शस्त्रास्त्रे जी खरेदी केली जात होती ती सरकारी तिजोरितून खरेदी केली जात होती. युद्धमोहिमांसाठी जे घोडे खरेदी केले जात होते ते सुद्धा सरकारी तिजोरितून केले जात होते. उच्च, मध्यम व कनिष्ठ प्रतिचे १०० घोडे तेव्हा ४ लाख २०० रुपये किमंतीला मिळत होते. बुंदेलखंडातून पेशवे तेव्हा तोड्याच्या बंदुका खरेदी करत असत. या बंदुकीची किंमत तेव्हा ५ पासून ८ रुपया पर्यंत असत. बंदुकीची दारु व दारुगोळा पेशवे युरोपीयनाकडून खरेदी करत होते. हा सर्व खर्च तेव्हा मराठ्यांच्या राजतिजोरितून होत असे.

६) युद्ध नुकसान भरपाईवरील खर्च : पेशवेकाळात युद्ध नुकसान भरपाई खर्च राजतिजोरितून दिला जात असे. या खर्चाची उत्तम उदाहरणे अशी आहेत.

सन १७६५ मध्ये शंकराजी केशव या मराठी सरदाराने युद्धाच्या वेळी इंग्रजांच्या मालाची नासधुस केली होती तेव्हा इंग्रजांनी पेशव्याकडून ३१ हजार रुपये नुकसान भरपाई घेतली होती. सन १७६३ मध्ये निजामाने जेव्हा पुणे प्रांतावर स्वारी केली होती. तेव्हा त्याला युद्धखंडणी म्हणून १,२५,००० रु पेशव्याना द्यावे लागले होते. अशा प्रकारचा खर्च राजतिजोरितून केला जात असे.

७) मृत, जखमी सैनिक व अधिकाऱ्यांना दिली जाणारी भरपाई : पेशव्यानी आपल्या कालखंडात अनेक युद्ध मोहिमा हाती घेतल्या होत्या. या युद्धमोहिमांमध्ये अनेक सैनिक मरण पावत असत तर अनेक सैन्य जखमी होत असत. अशा लोकांवर राजतिजोरितून खर्च केला जात होता. मृतांच्या नातेवाईकांना जमीन इनाम दिली जात असे किंवा रोख रक्कम भरपाई म्हणून दिली जात असे. नानासाहेब पेशव्याच्या कारकिर्दीत आप्पाजी शितोळे मरण पावल्यानंतर त्याच्या मुलाला २२ मोहरांची दोन सोन्याची कडी घालण्याची आज्ञा भाऊसाहेबास झाली होती. सन १७५५ मध्ये कर्नाटकातील स्वारीत साखरे आडनावाचा मराठा ठार झाला होता. त्याला नागपूर विभागातील जुन्नर गाव इनाम देण्यात आला होता. पेशवेकाळात मृतांच्या बायकांना निवृत्ती वेतन दिले जात होते.

१४.५शेतीवरील खर्च

मराठ्यांच्या शेती व्यवसायावरील खर्चाचा विचार करता या घटकावरील खर्चाला मराठ्याने अधिक महत्व दिल्याचे समजते. कारण मराठ्यांना शेतीशी संबधीत असणारा जमीन महसूल मोठ्या प्रमाणात मिळत होता ही बाब साम्राज्याच्या उत्पन्नाची मुख्य बाब होती. म्हणूनच या बाबीसंदर्भात मराठ्याने खर्च करताना चांगल्या हेतूनेच खर्च केला असे जाणवते. या ठिकाणी आपण शिवकाळ व पेशवेकाळ या दोन्ही कालखंडामध्ये या घटकांवर कशा पद्धतीने खर्च होत होता याची माहिती पाहणार आहोत.

अ) शिवकाळातील शेतीवरील खर्च : शिवकाळात मुख्य उत्पन्नांचे साधन जमीन महसूल आहे याची जाणीव शिवाजी महाराजांना होती. म्हणूनच त्यांनी शेतीच्या विकासाच्या सुचना संबधीत अधिकाऱ्यांना दिल्या होत्या. या व्यतिरिक्त त्यांनी शेतकऱ्यांना सरकारकडून बैल, बी-बियाने व इतर औजारे खरेदी करण्याकरीता २ लाख लारी वाटावेत व त्यावर कसलाही व्याज आकारु नये अशा सूचना शिवाजी महाराजाने प्रभावळीच्या अधिकाऱ्यांना देण्यात आल्या होत्या.

सभासद बखरकार म्हणतात की, शिवाजी महाराजांनी आपल्या महसूल अधिकाऱ्यांना अशा सूचना केल्या होत्या की, नव्याने जमीनी लागवडीखाली आणणाऱ्या शेतकऱ्यांना सर्व प्रकारची मदत करावी, शेतकऱ्यांना फक्त बैल व औजारे खरेदी करण्याकरीताच मदत करु नये तर शेतकऱ्यांना सुगी संपून धान्य घरी येईपर्यंतच्या काळासाठी त्याच्या खर्चाकरीताही पैसा द्यावा.

शिवकाळात बागायत जमीनीसाठीही कालव्याच्या माध्यमातून पाणीपुरवठा केला जात होता. मात्र बागायत जमीनीवर थोडा जास्त सारा आकारला जात होता. म्हणजेच सरकार अप्रत्यक्षरीता या प्रकारची सुद्धा शेतकऱ्याना मदत करत होता. हा सर्व खर्च सरकारी तिजोरीतून केला जात होता.

ब) पेशवेकाळातील शेतीवरील खर्च : शिवकाळाप्रमाणे शेतकऱ्यांच्या विकासासाठी प्रयत्न केल्याचे दिसून येते. याची माहिती पेशवा रोजनिशी खंड ३ मध्ये उपलब्ध आहे. या मध्ये असे नमुद करण्यात आले आहे. सरकारकडून तगाईच्या रुपाने शेतकऱ्यांना त्यांच्या गरजा भागविण्याकरीता मोठमोठ्या रक्कमा कर्जाऊ दिल्या जात होत्या हे कर्ज हप्त्या हप्त्याने वसूल केले जात होते. पेशवा बाळाजी बाजीरावाच्या कारकिर्दीत बिजगड जिल्ह्यातील बाळकवाडा व जलालबाद येथील शेतकऱ्यांना दुष्काळाच्या काळात सरकारकडून तगाईच्या रुपाने रोख रक्कम व धान्याच्या स्वरुपात मदत करण्यात आली होती. पाल येथील शेतकऱ्यांची घरे आगीत भस्मसात झाली असता सरकारकडून तातडीने त्यांना १,००० रु रोख व १५ खंडी धान्य देण्यात आले होते. हा सर्व खर्च सरकारी तिजोरीतून केला जात होता. यावरुनच मराठ्यांच्या शेतीव्यवसायासाठी खर्च होत होता हे वरील माहितीवरुन स्पष्ट होते.

१४.६ व्यवसायावरील खर्च

मराठ्यांचा उद्योग वाढीमध्ये अधिकरस असल्याने या व्यवसायांवर होणारा खर्च होणार हे नाकारता येणार नाही. तत्कालीन कागदपत्रावरुन या खर्चाची माहिती उपलब्ध होते.

अ) शिवकालीन व्यवसायावरील खर्च :

शिवकाळात मिठ व्यवसाय सरकारच्या ताब्यात होता. शिवकाळात मिठाचा पुरवठा राज्यात व राज्यबाह्य होत होता. या साठी शिवाजी महाराजांनी वाहनांचा तांडा तयार केला होता. या व्यवसायातून सरकारी तिजोरित भर पडण्याऐवजी तुट निर्माण होत होती. मात्र जनकल्याणाचा विचार नजरेसमोर ठेवून सरकार या व्यवसायावर खर्च करत होता. जहाज बांधणी उद्योग, धान्य कोठारे, नाणे पाडण्याच्या टांकसळी हे सरकारी उद्योग राजाच्या तिजोरितून चालवले जात होते. या बाबत अ. रा. कुलकर्णी म्हणतात "सरकारी उद्योग हे नेहमी फायद्यासाठी चालवतात असे नाही तर या उद्योगातून लोकांचा फायदा कसा होईल व लोकांच्या सुखसोयीत वाढ कशी होईल या साठी चालवता. सामाजिक सुरक्षितता, सुव्यवस्था व लोकांचे राहणीमान सुधारण्याकरिता आर्थिक फायद्या तोट्याचा विचार न करता सरकारला हा खर्च करावा लागतो" परिणामी शिवकाळात हा खर्च जनहित लक्षात घेवूनच केला जात होता हे स्पष्ट होते.

ब) पेशवेकाळातील व्यवसायांवरील खर्च :

शिवकाळाप्रमाणेच पेशवेकाळातसुद्धा सरकारी तिजोरित जनहित लक्षात घेवून उद्योग चालवले जात होते. मात्र याची पुरेशी माहिती उपलब्ध नाही.

पेशवेकाळातील इतर खर्च

१) लोकापयोगी कामावरील खर्च : पेशवेकाळात तलाव बांधणे, रस्ते दुरुस्त करणे, विश्रांतीगृह बांधणे, या सारख्या लोकापयोगी कामासाठी खर्च केला जात होता. डॉ. एम. एस. गाटे यांनी आपल्या "Maratha Architecture" या ग्रंथात असे म्हटले आहे की "सातारा, कोथरुड, दिवेघाट, व कालज येथील तलाव स्वतः पेशव्यांनी सरकारी तिजोरीतून खर्च करुन बांधले होते." पुणे-सासवड रस्त्यावरील मस्तानी तलाव पहिल्या बाजीरावाने बांधला होता. बागलन तालुक्यातील धरणाचा शेतीच्या पाणीपुरवठ्याकरिता नादुरुस्तीमुळे बरेच दिवस उपयोग होत नव्हता तेव्हा या धरणाच्या दुरुस्तीकरीता पेशव्यांनी ५००० रुपये खर्च केला होता.

प्रवाशांच्या सोयीसाठी रस्त्यांच्या बाजूला विहिरी, रस्त्यांची दुरुस्ती, घाटमार्ग तयार करणे, राजमार्गतयार करणे, धर्मशाळा बांधणे, तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी इमारती बांधणे तसेच राजधानीच्या ठिकाणी वाडे व इमारती बांधणे या सर्व प्रकारच्या खर्च राजतिजोरितून केला जात होता.

२) धर्मादाय व भूतदयावरील खर्च :

- साधूसंत व मंदिरे यांना देणग्या : पेशवेकाळात साधूसंत व महंत यांच्या चरितार्थासाठी देणग्या दिल्याचे उल्लेख मराठी कागदपत्रात सापडतात देणग्या रोख रक्कम स्वरुपात व जमीनी देवून दिल्या जात होत्या. पेशव्यानी गांडगापूर येथील मठाला लोकांना मोफत जेवन घेता यावे म्हणून रोख रक्कम व धान्य दिले जात होते. नागपूर येथील बनेश्वर मंदिराला ४६ रुपये दिल्याच्या संदर्भ आहे. मुस्लीमांच्या मशीदानाही दिवाबत्ती खर्चा करीता जमीनी इनाम दिल्या जात असत.

- धार्मिक समारंभातील खर्च : पेशवेकाळात अपत्य जन्माला आले की या अपत्याचा जन्मोत्सव साखर किंवा मिठाई वाटून साजरा करत असत. या प्रसंगी नोकर-चाकरांना कपडे वाटने, ब्राह्मणांना खावू पिऊ घालून भिक्षा दिली जात असे हिंदू-मुस्लिम साधूसंताना संतुष्ट केले जात असे. हा सर्व खर्च सरकारी तिजोरितून केला जात असे. गणपती उत्सव व दसरा उत्सवाच्या खर्च अशाच पद्धतीने केला जात होता.

३) दक्षिणा : पेशवेकाळात धार्मिक कार्य करणाऱ्या ब्राह्मणांना सरकारी तिजोरितून दक्षिणी दिल्या जात होत्या. "एका वर्षाला पेशवे ३५, ३४, ३६७ रुपये खर्च दक्षिणेवर करत होते. " असे मत बी. जी. गोखले यांनी आपल्या "Poona in the eighteenth Century" या पुस्तकात केले आहे. पेशव्याच्या घरातील विवाह, श्राद्ध, अंत्यविधी या सारख्या घरगुती कार्यक्रमासाठी सुद्धा ब्राह्मणांना दक्षिणा वाटल्या जात होत्या. दक्षिणेची रक्कम १०० रुपये असे. हा दक्षिणेचा खर्च राजतिजोरितून केला जात होता.

४) वैद्यकीय मदत : पेशवेकाळात औषधे वाटप करुन गोर-गरीबांना वैद्यकीय मदत पुरवली जात होती. गोर गरीबांना औषधे पुरविण्यारा जो वैद्य असे त्याला सरकार पैसे देत असे याचे उत्तम उदाहरण म्हणजे संगमनेरच्या वैद्याला पेशव्यांनी २,००० रुपये दिल्याचा संदर्भ आहे.

५) गरीबांसाठी अन्नछत्रे : पेशवेकाळात जर दुष्काळ पडला तर गरीब लोकांच्या उपजिवीकेसाठी सरकारी खर्चातून मोफत जेवन दिले जात असे. त्यासाठी सरकारतर्फे अनेक ठिकाणी अन्नछत्रे उघडली जात असत. अशी अन्नछत्रे मठ किंवा सरकारी विश्रामगृहे या ठिकाणी सुरु केली जात असत हा सर्व खर्च सरकारी तिजोरितून केला जात होता.

६) राजाश्रयार्थ होणारा खर्च : पेशवेकाळात विद्वान, कवी, शिक्षक आणि कलावंत यांना राजाश्रय दिला जात होता. त्यांच्या चरितार्थसाठी सरकारी खजिन्यातून बरीच रक्कम खर्च केली जात होती.

वरील प्रमाणे पेशवेकाळात सामाजिक जाणीवेतून समाजासाठी खर्च केला जात होता. या खर्चापाठीमागे त्यांच उदात्त हेतू होता. परिणामी हे एक उत्तम राजप्रणाली कार्याचे हे एक महत्वपूर्ण उदाहरण होते.

आपली प्रगती तपासा

१) मराठ्यांच्या राजकीय खर्चाचे घटक समजून द्या.

२) मराठ्यांच्या मुलकी प्रशासन खर्चाचे घटक समजून द्या.

३) मराठ्यांच्या लष्करी प्रशासनावर होणाऱ्या खर्चाचे घटक समजून द्या.

४) मराठ्यांच्या शेतीवरील होणाऱ्या खर्चाचे घटक समजून द्या.

५) मराठ्यांच्या व्यवसायावरील होणाऱ्या खर्चाचे घटक समजून द्या.

६) मराठ्यांच्या खर्चाचे इतर घटक समजून द्या.

१४.७ सारांश :

मराठ्यांच्या प्रशासनातील खर्चाशी संबंधीत असणाऱ्या घटकांचा या प्रकरणात आपण विचार केला आहे. मागील प्रकरणात आपण मराठ्यांच्या उत्पन्नांची साधने पाहिली. या साधनाद्वारे मराठ्यांना जे उत्पन्न मिळत होते त्याचा मराठे खर्च कसा करत होते हे अभ्यासने आवश्यक होते. त्याला अनुसरुनच आपण मराठ्यांच्या खर्चाच्या बाबी जाणून घेतल्या आहेत.

मराठे राज्यकर्ते स्वत:साठी जो खर्च करत होते तो खर्च राजतिजोरितून करत होते. मात्र या खर्चाचे प्रमाण कमी होते. हे आपणांस मराठा कालखंड व पेशवेकालखंड या दोन्ही कालखंडातील राज्यकर्त्याने केलेल्या खर्चातून जाणवतो.

मराठ्यांच्या मुलकी प्रशासनावरील खर्चाचा जर विचार केला तर अष्ट प्रधान मंडळातील अधिकारी त्याच्या मदतीस असणारे अधिकारी व इतर सेवक यांच्यावर होणाऱ्या खर्चाचे प्रमाण थोडे जास्त होते.

मराठ्याने ज्या जोरावर आपले साम्राज्य उभे केले होते त्या लष्करी प्रशासनावर मराठ्यांचा खर्च जास्त प्रमाणात होत होता. सर्वात जास्त खर्च लष्करी प्रशासनावर होत होता असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. कारण या खर्चात अधिकाऱ्यांचे वेतन, लष्करी साहित्य खर्च, रसद खर्च,

mumotes.in

वहातुक खर्च, नुकसान भरपाई खर्च, इनाम खर्च, मोहिमांवरील खर्च, छावण्या उभारणीवरील अशा अनेक घटकांना अनुसरुन खर्च केला जात होता.

शेतीपासून जमीन महसूल रुपाने उत्पन्न सरकारला मिळत असल्याने मराठा कालखंडात शेती सुधारणेसाठी खर्च केला जात होता. मात्र त्याचे प्रमाण गरजेला अनुसरुन होते.

व्यापार उद्योगांसाठी होणारा खर्च हा तसा सरकारच्या फायद्याच्या नव्हता मात्र शासकिय भूमिकेचा एक महत्वपूर्ण भाग म्हणून असा खर्च करावा लागत होता.

लोक उपयोगी कार्य, धर्मादाय कार्य, दक्षिणा, वैद्यकीय मदत, अन्नछत्रे, राजाश्रय आदी माध्यमातून सुद्धा मराठ्यांनी आपल्या करकिर्दीत खर्च केल्याची माहिती उपलब्ध आहे.

१४.८ प्रश्न

१) मराठा कालखंडातील राजकर्त्यांवर होणाऱ्या खर्चाचा थोडक्यात आढावा द्या.

२) मराठा कालखंडातील लष्करी प्रशासनावर होणाऱ्या खर्चाची अचूक माहिती लिहा.

३) मराठा कालखंडातील मुलकी प्रशासनावर होणाऱ्या खर्चाची माहिती सांगा.

४) मराठा कालखंडातील शेतीवर व उद्योगांवर होणाऱ्या खर्चाची माहिती सांगा.

१४.९ संदर्भ

१) शिवकालीन महाराष्ट्र - डॉ. अ. रा. कुलकर्णी

२) शिवराज्य व शिवकाळ - वा. कृ. भावे.

३) पेशवेकालीन महाराष्ट्र - वा. कृ. भावे.

४) शिवाजी व शिवकाळ - ज. मा. पवार

५) मराठेकालीन राज्यव्यवस्था - रा. ना. जोशी

६) मराठेकालीन संस्था व विचार - गायकवाड, थोरात,सरदेसाई, हनमाने

७) मराठ्यांचा प्रशासकीय, सामाजिक आर्थिक इतिहास - प्रा.बी. एस. सांवत प्रा. जाधव

❖❖❖❖

munotes.in

१५

आर्थिक आणि सांस्कृतिक विकास : कला आणि शिल्पकला

घटक रचना:

१५.० उद्दिष्ट्ये

१५.१ प्रस्तावना

१५.२ मराठा कालखंडातील चित्रकला

१५.३ मराठा कालखंडातील संगीत कला

१५.४ मराठा कालखंडातील नागर शिल्पकला

१५.५ मराठा कालखंडातील लष्करी शिल्पकला

१५.६ मराठा कालखंडातील धार्मिक शिल्पकला

१५.७ मराठा कालखंडातील घाट, धर्मशाळा व कुंडा संदर्भातील शिल्पकला

१५.८ मराठा कालखंडातील छत्र्या व समाध्याच्या बाबतची शिल्पकला

१५.९ मराठा कालखंडातील प्रतिमांबाबतची शिल्पकला

१५.१० सारांश

१५.११ प्रश्न

१५.१२ संदर्भ

१५.०उद्दिष्ट्ये

- मराठा कालखंडातील चित्रकलेबाबतची माहिती जाणून घेणे.
- मराठा कालखंडातील संगीत कलेबाबतची माहिती जाणून घेणे.
- मराठा कालखंडातील नागर शिल्पकलेची माहिती जाणून घेणे.
- मराठा कालखंडातील लष्करी शिल्पकलेची माहिती जाणून घेणे.
- मराठा कालखंडातील धार्मिक शिल्पकलेची माहिती जाणून घेणे.

munotes.in

- मराठा कालखंडातील घाट, धर्मशाळा व कुंड या संदर्भात बनलेल्या शिल्पकलेची माहिती जाणून घेणे.
- मराठा कालखंडातील छत्र्या व समाध्या या संदर्भात बनलेल्या शिल्पकलेची माहिती जाणून घेणे.
- मराठा कालखंडातील प्रतिमासंदर्भात बनलेल्या शिल्पकलेची माहिती जाणून घेणे.

१५.१प्रस्तावना

मराठ्यांचा प्रशासकीय इतिहास समजून घेत असतांना मराठ्यांच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक दृष्टीकोनातून येणाऱ्या अनेक प्रशासकीय बाजू आपण या अभ्यासक्रमात समजून घेणार आहोत. मात्र या सर्व घटकांपेक्षा वेगळी असणारी बाजू म्हणजे मराठ्यांच्या कालखंडातील कला व शिल्पकला. या क्षेत्रात मराठ्यांनी कोणत्या प्रकारची प्रगती केली होती याचा आढावा आपण या प्रकरणात घेणार आहोत. मराठा कालखंडातील कला व स्थापत्यकला खऱ्या अर्थाने दुर्लक्षित राहिली आहे. या बाबतीत संशोधन होणे गरजेचे आहे. असे जर संशोधन झाले तर ही कला खऱ्या अर्थाने सर्वसामान्यांना समजू शकेल व या कलेला योग्य न्याय मिळेल.

या प्रकरणात आपण मराठा कालखंडातील चित्रकला, संगीत कला व शिल्पकलेतील नागरी कला, लष्करी कला, धार्मिक कला, घाट कला, धर्मशाळा कला, कुंड कला, छत्री कला, समाधी कला, प्रतिमा कला आदि कलांबाबतची माहिती पाहणार आहोत.

१५.२मराठा कालखंडातील चित्रकला

मराठा कालखंडातील कलांची माहिती जाणून घेत असतांना सर्वप्रथम आपण मराठा कालखंडातील चित्रकलेची माहिती जाणून घेऊ. मोगल कालखंडात अकबराच्या राजवटीत चित्रकलेला राजाश्रय मिळाला होता. मात्र औरंगजेबाच्या राजवटीत ही चित्रकला जवळजवळ संपुष्टात आली होती. मराठ्यांचे राज्य उत्तरेकडे वाढल्यानंतर मराठा सरदारांमध्ये चित्रकलेबाबत अस्था निर्माण झाली. प्रेम निर्माण झाले.

मराठा कालखंडातील चित्रकलेची माहिती जाणून घेत असतांना सर्व प्रथम आपणास पहिल्या माधवराव पेशव्यांचा कालखंडाचा विचार करावा लागेल. पहिल्या माधवरावानी नावाचा पगारी चित्रकार होता. त्यास दीड महिन्याला तीस रुपये पगार होता. तो पेशव्याच्या आज्ञेने वेगवेगळे चित्र चितारत असे.

मराठा कालखंडात चित्रकलेतील खरी क्रांती कॅमेऱ्यामुळे झाली. १७६५ मध्ये पूण्यात कॅमेरा आला असावा असा अंदाज वा. कृ. भावेचा आहे. माधवरावानंतर नाना फडणवीसाने दरबारी चितारी बाळगले होते. व या चिताऱ्यांनी ठिकठिकाणीच्या राजवाड्यातून चित्रे काढण्यास सुरुवात केली होती.

राजस्थानच्या भागवताचा सचित्र ग्रंथ एका चित्रकारानेच तयार केला होता. तो ग्रंथ पुढे नाना फडणवीसाने मिळविला. नाना फडणवीसाने दिल्ली-आगऱ्याहूनही चित्र मिळविण्याचा प्रयत्न केला होता.

सवाई माधवरावाच्या कारकीर्दीत इंग्रज वकील मॅलेट यांच्या पक्षाची तसबीर काढण्याचे काम एका चिताऱ्याने केले असा उल्लेख आहे. मराठा कालखंडात जेम्स मॅलेट बरोबर जेम्स वेल्स नावाचा चित्रकार पुण्यात आला होता. त्यांनी सवाई माधवराव, नाना फडणवीस, महादजी शिंदे, परशुरामभाऊ पटवर्धन यांची चित्रे काढली होती. जेम्स वेल्सने सवाई माधवरावाचे गणपती महालातील दरबारातील चित्र जेम्स वेल्सने तयार केले होते. सवाई माधवराव, नाना फडणवीस महादजी शिंदे यांचे एक सामुहिक चित्र ही त्यांने काढले होते.

जेम्स मॅलेटन सवाई माधवरावास शनिवारवाड्यात चित्रशाळा स्थापन करण्यास सांगून जेम्स वेल्सची त्यावर प्रमुख म्हणून नेमणूक करुन घेतली. जेम्स वेल्सच्या हाताखाली गंगाराम तांबट नावाचा एक चांगला चित्रकार तयार झाला. गंगाराम तांबटने वेरुळच्या लेण्याची चित्रे काढली.

मराठा कालखंडातील चित्रकलेची तुरळक प्रमाणात माहिती उपलब्ध आहे. पोट भरण्याचा एक उद्योग म्हणून या कलेकडे पाहिले जात होते. काही ठिकाणी शुभकार्य प्रसंगी भिंतीवर चित्र काढली जात होती. ही सर्व चित्र पौराणिक विषयांवर आधारित असत. मराठा कालखंडात मराठ्यांनी चित्रकलेत फारशी प्रगती केल्याचे दिसत नाही. मात्र ही कला मराठा कालखंडात अस्तित्त्वात होती हे वरील माहितीच्या आधारे स्पष्ट होते.

१५.३मराठा कालखंडातील संगीत कला

मराठा कालखंडातील संगीत कलेचा विचार करत असतांना सर्वप्रथम आपणास शाहू महाराजांच्या कारकीर्दीचा विचार करावा लागेल. कारण शाहू महाराजांचे बालपण मोगलांच्या दरबारातील रीतीरिवाज, चैनीच्या सवयी यांच्या बद्दल त्यांच्या मनामध्ये आकर्षण निर्माण झाले होते. त्या काळात त्यांनी गवई, भाट, नायकिणी यांचा संघ मनोरंजनासाठी जमविला होता. तसेच पेशव्यांना पाच-सात वेळा पत्र लिहून दिल्लीहून नायकिणी पाठविण्यास सांगितले होते.

मराठा कालखंडात उत्तर भारतातील सिरोज हे ठिकाण कलावंताच्या बद्दल प्रसिद्ध होते. तर कर्नाटकसुद्धा ललितकलेबद्दल प्रसिद्ध होते. सिरोजमधून तीस नायकिणी पाठवून दिल्या तर कर्नाटकातील नरगुंदच्या देसायने उत्तम जातीच्या दोन बायका व एक वीणा शाहूच्या दिमतीला पाठविली. परप्रांतातून नायकिणी आणण्यास पैसा खर्च होता म्हणून शाहू महाराजांनी महाराष्ट्रातच चांगल्या होतकरु मुली मिळवून त्यांना नृत्यकलेत तरबेज करण्यासाठी खंडोजी माणकर या अधिकाऱ्याची नियुक्ती केली.

शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर राजारामाच्या कारकीर्दीत दोन कलावंतांचे ताफे दरबारात असल्याचा उल्लेख आहे. शाहूच्या कारकीर्दीत पेशव्यांकडे मस्तानी सारख्या नर्तकीचे अस्तित्त्व होते. व ते किती प्रसिद्ध होते. याची माहिती आपल्याला आहे. नायकिणीच्या मदतीला गवई व साजिदे असत. पेशव्याच्या दरबारात पगारदार गवई, नायकिणी, नटवे व संगीतकार कायमचे ठेवलेले असत. त्यांच्या तालमीत माणसे तयार केली जात असत. विशेष प्रसंगी बाहेरुन गुणी कलावंतांना बोलवून त्यांना योग्य तो इनाम दिला जात असे. १७६१ च्या गणेशोत्सवात कलावतींणींना १०६ रु. दिले. गुरव १० होते. त्यांना जास्तीत जास्त बिदागी १० रुपये दिल्याचा उल्लेख आहे. १७६७ च्या गणेशोत्सवात हरिदास व कलावंतिणी यांना २३८२ रुपये दिल्याची माहिती आहे. रघुनाथराव यांना तर नायकिणीचे वेडच होते.

रघुनाथरावांच्या पदरी सहा नटवे होते. ते दशावतारीचा खेळ करुन दाखवत असत. नट व नाचे हे बहुरुप्याप्रमाणे वेगवेगळी सोंगे आणून नाटके करुन दाखवत असत.

नाना फडणवीसाने आपल्या वकीलामार्फत परप्रांतातील कलावंतांना मनोरंजनाच्या कार्यक्रमासाठी बोलावल्याचा उल्लेख आहे. नट व नट्या प्रमाणेच गवयांनासुद्धा भारी बिगादीच्या मोबदल्या परप्रांतातून बोलावत असत.

सवाई माधवरावांच्या कारकीर्दीत एक गुजराती गवई व व्यंकट तरसी या नावाची गायिका विशेष प्रसिद्ध होती.

करमणुकीचा एक प्रकार म्हणून दशावतारी हा खेळ खेळला जात असे. दशावतारीच्या या खेळास त्या काळात तमाशा हे नाव होते. दशावतारीमध्ये आधुनिक गद्य व पद्याची बीजे दिसतात. या दशावतारीमधील उणीव म्हणजे कथानकात एकसूत्रपणा नाही.

दुसऱ्या बाजीरावाच्या काळात गायन, वादन व नर्तन यांना अतिशय महत्त्व प्राप्त झाले होते. १८०८ मध्ये दुसऱ्या बाजीरावाने त्र्यंबक आत्माराम या गवयास १२९२ रुपये दिल्याचा उल्लेख आहे. दुसऱ्या बाजीरावाच्या पदरी देवीदास नावाचा सारंगीवाला दरमहा ८० रुपयावर नोकरी करत होता.

एकंदरीत या सर्व माहितीचा आढावा घेत असतांना असे दिसते की गायन-वादन व नर्तन या तीन घटकांना अनुसरून मराठा कालखंडातील संगीतकला विकसित होत होती. ही कला जिवंत ठेवण्यासाठी नट, भाट, गवई, नायकिणी प्रयत्न करत होते. तर शाहू महाराज, रघुनाथराव, नाना फडणवीस, सवाई माधवराव, दुसरा बाजीराव या शासनकर्त्यांनी या कलेस प्रोत्साहित करण्यासाठी प्रयत्न केले होते हे स्पष्ट होते.

मराठा कालखंडातील चित्रकला, संगीत कला जाणून घेतल्यानंतर या कालखंडात प्रगत अवस्थेला आलेली तिसरी कला आपण जाणून घेणार आहोत. ही तिसरी कला म्हणजे शिल्पकला होय. मराठा कालखंडात शिल्पकलेचा मोठ्या प्रमाणात विकास झाला आहे असे उपलब्ध माहितीवरुन दिसते. शिल्पकलेत नागर शिल्पकला, लष्करी शिल्पकला, धार्मिक शिल्पकला, घाट शिल्पकला, धर्मशाळा शिल्पकला, फुंडा शिल्पकला, छत्र्यांची शिल्पकला, समाध्यांची शिल्पकला, प्रतिमांची शिल्पकला असे शिल्पकलेचे वेगवेगळे प्रकार आढळतात. याठिकाणी या घटकांची माहिती आपण पहाणार आहोत.

१५.४मराठा कालखंडातील नागर शिल्पकला

मराठा कालखंडातील नागर शिल्पकलेचा अभ्यास करत असतांना आपणास या काळात नागरी रचनेशी संबंधीत असणारे घटक जाणून घ्यावे लागतील. तसेच या घटकांच्या माध्यमातून या कलेस कोणते अस्तित्त्व प्राप्त झाले आहे हे पहावे लागेल. सर्वसाधारणपणे नागरी रचनेशी नगर रचना, रस्ते, पूल, घरे, वाडे, राजवाडे, बागा, कारंजे, पाणी पुरवठ्यांच्या व्यवस्था, आरोग्याच्या सुविधा विहिरी हे घटक संबंधीत असत. या घटकांच्या बाबतीत या काळात शिल्पकलेचा विकास कसा झाला याची माहिती खाली नमूद करण्यात आली आहे.

१. नगर रचना :

मराठा कालखंडात नगररचनेच्या रचनेबाबत लिखित स्वरुपाची माहिती उपलब्ध नाही. मात्र मराठा कालखंडातील काही शहरे व त्यांची रचना पाहिली तर नगर रचनाकाराला नगर रचनेची काही सुत्रे माहित असावीत असे दिसते. रायगड, सातारा, पुणे, नाशिक इत्यादी शहरांच्या रचनेवरुन हे स्पष्ट होते. रायगड ही शिवाजी महाराजांची राजधानी शिवाजी महाराजांच्या

आझेवरुन आबाजी सोनदेवाने तेथे नगररचना केली. रायगड किल्ल्याचा तटबंदी, तीनशे दगडी इमारती, रंगमहाल, देवालये, तलाव, दगडी कमानी, अतिथीगृह, कार्यालये, दारुगोळा या सर्व घटकांची सुंदरता तत्कालीन नगर रचना सुंदर होती असे स्पष्ट करते.

रायगडाप्रमाणेच सातारा, नाशिक व पुणे येथील नगर रचनाही विकसित होती. नागरी वस्तीचे मुख्य ठिकाण, गावातील लोकांसाठी व गावाबाहेरील लोकांसाठी रहाण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था, पेठांची रचना, या सर्व रचनेमुळे शहरे रचनाबद्ध बनली होती. पेशवेकाळात पुणे, सातारा, टोके ही शहरे वाढून विकसित झाली होती.

सातारा हे शहर छत्रपतींच्या वास्तव्यामुळे प्रसिद्धीला आले होते. टोके हे शहर रघुनाथ रावांच्यामुळे धार्मिक क्षेत्र म्हणून प्रसिद्धीला आले होते. सिद्धेश्वर मंदिर हे या शहरातील अत्यंत महत्त्वपूर्ण असे वैशिष्ट्ये या शहरामध्ये दोन प्रमुख रस्ते उत्तर-दक्षिण व दोन रस्ते पूर्व-पश्चिम जातात. रस्त्यांची रुंदी जास्तीत जास्त ९ फुट इतकी होती. रस्ते दगडी आहेत. या शहरांचा विकास पेशवेकाळात झाला होता.

रघुनाथ पेशव्याने आनंदीबाईच्या नावाने 'आनंदवली' नावाचे शहर नाशिकजवळ वसविले होते. या शहराचा विकास फक्त रघुनाथ रावाच्या काळातच झाला होता.

मराठा कालखंडातील नगर रचनेची वैशिष्ट्ये लिखित स्वरुपात नाहीत मात्र ती व्यावहारिक स्वरुपात दिसतात. सर्वसाधारणपणे मराठ्यांच्या नगर रचनेत संरक्षण, पाणी पुरवठा, समाजव्यवस्था, आरोग्याच्या सुविधा आदि घटक दिसतात.

i) संरक्षण :

मराठा कालखंडात साम्राज्य संरक्षण व समाज संरक्षणाला महत्त्व देण्यात आले होते. या संरक्षण व्यवस्थेतूनच नगर रचना व निर्मिती केली जात होती. तटबंदी, शहरातील अरुंद रस्ते, घरा-घरामधील कमी अंतर, तटबंदी वरील पहारा या व्यवस्था कायमस्वरुपी दिसत होत्या. त्यामुळेच हा घटक या व्यवस्थेच्या वैशिष्ट्याचा भाग बनला होता.

ii) पाणी पुरवठा :

मराठ्यांच्या नगर रचनेचे दुसरे वैशिष्ट्ये म्हणजे पाणीपुरवठा होय. मराठा कालखंडात पाणी पुरवठा करण्यासाठी शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी एक तळे असे. अथवा शहराच्या बाहेरुन पाटाने पाणी आणण्याची व्यवस्था केली जात असे. शहरातील श्रीमंत लोक सरकारने प्रवृत्त केल्यानंतर मोठमोठे हौद बांधत असत.

iii) समाज व्यवस्था :

मराठ्यांच्या नगर रचनेचे तिसरे वैशिष्ट्ये म्हणजे समाज व्यवस्था. मराठ्यांच्या कालखंडात समाज व्यवस्थेत जातीव्यवस्थेला महत्त्व होते. त्यामुळे नगररचनेत प्रत्येक जातीला अनुसरुन पेठा बनविल्या जात असत. जाती प्रमाणेच व्यावसायिकांना सुद्धा व्यवसायानुसार पेठा बनवून दिल्या जात असत. अथवा व्यावसायिक स्वतंत्र पेठा बनवत असत.

iv) आरोग्याच्या सुविधा :

मराठ्यांच्या नगररचनेचे हे शेवटचे वैशिष्ट्ये आहे. या बाबतीत मराठ्यांनी खबरदारी घेऊन भूयारी गटारे तयार केली होती. त्याच बरोबर दगडी रस्ते तयार केले होते. नगर स्वच्छतेकडे लक्ष दिले जात होते. त्यामुळे हा घटक मराठ्यांच्या नगर रचनेच्या वैशिष्ट्याचा भाग बनला होता.

२. रस्ते व पूल :

मराठ्यांच्या नागरी शिल्पकलेतील दुसरा महत्त्वपूर्ण घटक म्हणजे रस्ते व पूल मराठा कालखंडातील रस्ते आधुनिक कालखंडातील रस्त्यांप्रमाणे जरी नसले तरी बैलगाड्या व्यवस्थितपणे जाऊ शकतील अशा पद्धतीचे होते. सवाई माधवरावांच्या कारकीर्दीतील कागदपत्रांवरुन मराठा कालखंडातील रस्त्यांची माहिती समजते. या काळात रस्ते सुत्रबद्ध होते, रहदारी व व्यापार यास अनुकूल होते, रस्त्यांची दुरुस्ती वारंवार केली जात होती. रस्ते दुरुस्तीसाठी येणारा खर्च स्थानिक अधिकारी संबंधीत जनतेकडून वसूल करत असत. सवाई माधवरावाने शिवनेरीच्या अधिकाऱ्याला मालसेजचा रस्ता ताबडतोब दुरुस्त करण्याबाबत कळविले होते. ब्रम्होंद्रस्वामीने संभाजी शिंदेकडून अंबोला घाट दुरुस्त करुन घेतल्याचा उल्लेख ब्रम्होद्रस्वामींच्या चरित्रात आहे. पहिल्या माधवरावाने मालसेजची खिंड दुरुस्ती करण्यासाठी १५०० रुपये मंजूर केल्याचा उल्लेख वाडा दप्तरामध्ये आहे.

पूलासंबंधी मात्र माहिती कमी आहे. काही ठिकाणी नदी पार करण्यासाठी लाकडी पूल बांधले जात असत. काही महत्त्वाच्या शहरात लाकडी पूल बांधत असत. पुण्यातील मुठा नदीवरील लाकडी पूल हे मध्ययुगीन पूलांच्या बाबतीतील एक महत्त्वपूर्ण उदाहरण दाखविता येईल. ब्रम्होंद्रस्वामीनी शाहू महाराजांच्यामार्फत नीरा नदीवर एक कमानी पूल बांधल्याचा उल्लेख आहे.

श्रीमंत लोकांच्या मार्फत रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावली जात असत. नानासाहेब पेशव्यांनी पुणे-पाषाण, पुणे-कात्रज, पुणे-आळंदी, पुणे-विठ्ठलवाडी, पुणे-येवूर या मार्गावर दुतर्फा झाडे लावण्याची योजना अंमलात आणली होती.

३. घरे, वाडे व राजवाडे :

मराठ्यांच्या नागरी शिल्पकलेतील तिसरा महत्त्वपूर्ण घटक म्हणजे घरे, वाडे व राजवाडे होय. मराठा कालखंड हा धामधुमीचा असल्याकारणे वाडे व घरे यांची नासधूस मोठ्या प्रमाणात होत असे. परिणामी घरे व वाडे यांचा समावेश शिल्पकलेत होतो. शिवकाळातील रायगड, पन्हाळा, प्रतापगड, शिवनेरी याठिकाणी घरांचे जे बांधकाम करण्यात आले होते हे विजापूरी शैलीचे होते.

पेशवेकाळात काही सरदारांनी आपले वाडे पुणे व सातारा याठिकाणी बांधले होते. अशाच प्रकारचे वाडे त्यांनी खेड्यांमध्येही बांधले होते. पेशवेकाळीन वाड्यांचे मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे बांधकामामध्ये लाकूडकाम जास्त व दगडकाम कमी असे.

पेशवेकाळातील वाड्याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे शिवापूर येथील देशपांड्यांचा वाडा होय. हा वाडा १५० फूट लांब १७० फूट रुंद अशा आकाराचा होता. या वाड्याचे प्रवेशद्वार लाकडी असून उत्तराभिमूख आहे. वाड्यात प्रवेश केल्यानंतर सुरुवातीलाच एक मोकळा चौकोन दिसून येतो. या सोप्याचे जो ते तीन फूट उंच असून जोत्यावर भक्कम खांबाच्या दोन दोन रांगा आहेत. सोप्यावर व्हरांडा असून आतल्या बाजूला खोल्या आहेत. व्हरांड्यातील खांब चौकोनी असून

munotes.in

त्याच्यावर नक्षी काढलेली ब्रॅकेट आहे. तळमजला व पहिला मजला यांच्यामध्ये लाकडी फळ्या मारुन कडी पाट केलेला आहे. कडीपाटावर फुलांची नक्षी काढलेली आहे. वाड्यामध्ये एक सुंदर देवघर आहे ते वाड्याच्या पूर्वेला आहे. वाड्याच्या भिंती अतिशय जाड असून खिडक्यांची संख्या कमी आहे. तळमजल्यावरुन पहिल्या मजल्यावर जाण्यासाठी पूर्वेला व पश्चिमेला जिना आहे. वाड्यामध्ये जो चौकोनी खांबाचा जो व्हरांडा आहे त्याच्यातून आत गेल्यावर चौकोनी सभामंडप आहे. सभामंडपाला लागून सदर आहे. सदर म्हणजे वाड्यातील सभागृह या सदरेवर पाना-फुलांची नक्षी काढलेले चौकोनी लाकडी खांब आहेत. भिंतीना विविध प्रकारचे कोनाडे असून त्यामध्ये चांगली नक्षी काढली आहे. त्याला कानोडी नक्षी असे म्हणतात. पहिल्या मजल्यावर तीन बाजूना भिंत असून पूर्वेकडे अनेक खोल्या आहेत. सदरेच्या मागच्या बाजूला एक समचतुष्कोनी दिवाणखाना असून त्यातील खांबावर जाळीदार नक्षीकाम केलेले आहे. दुसऱ्या मजल्यावर काही खोल्या व मोठे दिवाणखाने असून त्यांचा वापर खशजगी उपयोगाकरिता होत असे. वाड्याच्या खिडक्यांना लाकडी गज असून ते निम्या खिडक्यांपर्यंत आले आहेत. काळी भाजकी कौले छप्पर म्हणून वापरलेली आहेत.

मराठा कालखंडातील वाड्यांची रचनात्मक वैशिष्ट्ये :

मराठा कालखंडातील वाडे हे सर्वसाधारणपणे चौकोनी आकाराचे होते. अनेक चौकोनी आकार एकत्रित व संघटीत होऊन वाडा बनत असे. उदा. फडके वाडा हा सात चौकांचा तर शनिवारवाडा हा चार चौकांचा बनविला होता. चौकाच्या भोवती वेगवेगळे खांब उभे करुन त्यांच्यामध्ये सभामंडप व वेगवेगळ्या खोल्या असत. चौकातील मोकळ्या जागेचा उपयोग हा जरुरी प्रमाणे केला जात असे. चौकाला लागून असणाऱ्या व्हरांड्याचा उपयोग ऑफिस म्हणून केला जात असे. वाड्याच्या डाव्या कोपऱ्यात देवघर असे. वाड्याच्या समोरच्या बाजूस मालकाचे ऑफिस असे. इतर खोल्यांचा वापर खाजगी कामासाठी केला जात असे. वरीलप्रमाणे, साधारणत: वाड्याची रचना असे. वाड्यामध्ये सदर-दिवाणखाना, दरबार-दिवाणखाना, रंगमहाल, चित्रमहाल, व आरसेमहल असे सोयीनुसार कमी-जास्त दिवाणखाने किंवा महाल असत.

i) सदर दिवाणखाना :

सदर-दिवाणखाना म्हणजे वाड्यातील मुख्य सभास्थान होय. हा दिवाणखाना प्रवेशद्वारासमोर असे. या दिवाणखान्याच्या दोन्ही बाजूस जिने असत. अशा प्रकारचा सदर दवाखाना शिवापूरचे देशपांडे व तासगावचे पटवर्धन यांच्या वाड्यात पाहावयास मिळतो.

ii) दरबार हॉल :

दरबार हॉलची रचना सदर दिवाणखान्यासारखीच असे. मात्र याचा आकार सुंदर-दिवाणखान्यापेक्षा मोठा असे. दरबार हॉलच्या प्रवेशद्वारावर अतिशय उत्तम प्रकारचा चुन्याचा गिलावा केलेला असे व त्यावर चांगली नक्षी काढलेली असे. त्या काळातील लोक दरबार हॉलमध्ये नक्षीकाम करुन ऐश्वर्याचे प्रदर्शन करत होते. दरबार हॉलच्या काही ठिकाणी सिंह, हत्ती कोरलेले असत.

muniotes.in

iii) आरसेमहाल :

आरसेमहाल हे वाड्याच्या पहिल्या मजल्यावर असे. पहिल्या मजल्यावरील दिवाणखान्यातल्या भिंतीवर व छताला आरसे लावून हा महाल तयार केला जात असे. छत्रपतीच्या व सरदारांच्या वाड्यामध्ये या प्रकारचा महाल असे. सातारा येथील जलमंदिर व अदालत वाडा याठिकाणी अशा प्रकारचे आरसे महाल आहेत. तसेच तासगाव व कोयरुड येथे सुद्धा अशा प्रकारचे आरसे महाल आहेत. शनिवारवाड्यात पेशव्यांनी मोठा आरसेमहाल केला होता.

iv) रंगमहाल :

मराठा कालखंडातील रंगमहाल म्हणजे एक प्रकारचे वस्तुसंग्राहलय होय. या रंगमहालात संबंधीत घराण्यातील तसविरी लटकवून ठेवलेल्या असत. या घराण्यातील लोक जेव्हा मुलूखगिरीवर जात असत तेव्हा तेथील संग्रहालय वस्तू मिळवत असत व त्या रंगमहालात आणून ठेवत असत. तसेच ते समकालीन लोकांची चित्रे ही लावत असत. तसेच महाकाव्य व पुराणातील प्रसंगातील चित्रे रेखाटून ठेवत असत.

v) अस्मानी महाल :

अस्मानी महाल म्हणजे वाड्यातील सर्वात उंचावरील दिवानखाणा होय. काही ठिकाणी हा महाल चौथ्या किंवा पाचव्या मजल्यावर असे. या महालात बसल्यावर आसपासच्या प्रदेशावर नजर ठेवता येत असे. राजे लोक या महालाचा उपयोग विशेषत्वाने संध्याकाळची शोभा पहाण्यासाठी करत असत. तासगाव येथील पटवर्धनांचा वाडा, पुणे येथील रास्तेवाडा, जाधववाडा व शनिवारवाडा हे अशा प्रकारच्या अस्मानी महालाचे काही दाखले आहेत.

vi) बांधकाम :

दगड, विटा व चुन्याचा गारा यांचा वापर करुन वाड्याचे बांधकाम केले जात होते. वाडा बांधत असतांना सर्वप्रथम पाच ते सहा फूटाचे जोते बांधले जात असत, क्वचितच प्रसंगी हे जाते. दहा ते पंधरा फुटाचे असत. बांधकामासाठी दगड, विटा व चुन्याच्या गाराबरोबरच लाकडी तळईचा वापर बांधकामासाठी केला जात होता. बांधकामासाठी विटा गोळाकार करणे, विटांवर नक्षीकाम करणे या पद्धतीसुद्धा बांधकामामध्ये प्रचलित होत्या.

vii) खांब :

वाड्यांच्या बांधकामासाठी जास्त प्रमाणात लाकडाचा वापर केला जात होता. या कामासाठी ज्या लाकडी तळ्या होत्या. त्या दोन प्रकारच्या होत्या, त्यापैकी पहिला आकार चौकोनी तर दुसरा आकार सायप्रसचा असे. काही ठिकाणी गरज असेल त्याच आकाराच्या तळ्या वापरल्या जात असत.

viii) छप्पर :

घर आणि वाड्यांसाठी छप्पर दोन प्रकारचे असत. ज्याठिकाणी पावसाचे प्रमाण कमी आहे अशा ठिकाणी धाब्याची छप्परे असत, तर ज्याठिकाणी पावसाचे प्रमाण जास्त आहे. अशा ठिकाणी उतरत्या छप्पराची घरे असत. मोठ्या वाड्यांमध्ये तक्तपोशीवर कामट्या किंवा फळ्या वापरून

mynotes.in

त्यावर चुन्याच्या दोन किंवा तीन इंच जाडीचा थर देत असत. काही वेळेला विटा ठेवून त्यावर चूना परसत असत.

ix) सजावट :

वाड्यांच्या सजावटीसाठी नक्षीकाम केले जात होते. प्राण्याची, पक्षांची व फुलांची चित्रे नक्षी कामासाठी कोरली जात होती. असे काम विश्रामबागवाडा व सातारा येथील जुनावाडा येथे पहावयास मिळतो.

x) ब्रॅकेट :

भिंतीतून बाहेर आलेल्या लाकडी किंवा दगडी घोड्याना ब्रॅकेट असे म्हणतात. मराठा कालखंडातील वाडे सुशोभित करण्यासाठी अशा वाड्यांच्या ब्रॅकेटवर नक्षीकाम केले जात असे. डॉ. भाटे यांनी ब्रॅकेटचे हलके व भारी असे दोन प्रकार सांगितले आहेत. ब्रॅकेटवर कोरलेली नक्षी ही वाड्याच्या प्रांगणात सहजासहजी नजरेत भरत असे पिंपळाचे पान, दाक्षवेल, कमळ ब्रॅकेटवरील नक्षीत एकत्रित कोरले जात असत.

xi) खिडक्या :

घरे व वाड्याच्या खिडक्या या काळात लाकडी असत. खिडक्याचे गज सायप्रसच्या आकाराचे असत. खिडक्यांच्या दारावर बहुतेक ठिकाणी कमळ काढलेले असे.

xii) झुंबरे :

ज्या ठिकाणी दोन वासे एकत्र येत असत अशा ठिकाणी लाकडी झुंबरे लोंबती सोडत असत. झुंबरावर कमळ किंवा कमळाची कळी कोरत असत. क्वचित प्रसंगी झुंबराच्यावर फुलवलेल्या पिसाऱ्याचा मोर कोरत असत. टोके येथील लाकडी झुंबर याबाबत वैशिष्ट्यपूर्ण मानतात.

xiii) जाळीदार काम :

वाड्यातील दिवाणखान्यात सोयीसाठी जर दोन भाग करावयाचे असतील तर लाकडी तक्ता वापरत असत व या तक्त्यावर जाळीदार नक्षीकाम काम करण्याची पद्धती प्रचलीत होती. काही वेळा देवघर व दिवाणखाना यांच्यामध्ये अशा प्रकारचा तक्ता वापरत असत.

xiv) सन्दला किंवा चुन्याचा गिलावा :

मराठा कालखंडात वाडे सुशोभित करण्यासाठी चुन्याच्या गिलाव्याचा वापर करत असत. गिलावा दिल्यानंतर गिलाव्यामध्ये कमळाचे फुल कोरत असत. गिलाव्याच्या खालील भागावर पट्टा मारुन त्याखाली लंबाकृती नक्षी काढत असत.

xv) चित्रकला :

वाडा सुशोभित व्हावा म्हणून, वाड्याच्या दिवाणखान्यात किंवा चित्रमंदिरात वेगवेगळ्या प्रकारची चित्रे काढली जात होती. ही चित्रे पुराणे व महाकाव्यातील प्रसंगावर आधारित असत. चित्राचा आकार लहान असे. चित्रकलेमध्ये पाने-फुले-फळे-कमळाची कळी, मोर, पोपट यांचा समावेश असे. चित्र ही पांढऱ्या, किरमिजी किंवा तपकिरी रंगामध्ये काढली जात असत. आराखडा

munotes.in

तयार करण्यासाठी पिवळ्या रंगाचा वापर केला जात असे. चित्रकलेसाठी जास्त प्रमाणात किचकट डिझाईनचा वापर केला जात असे.

xvi) दर्शनी भाग :

मराठा कालखंडातील वाड्यांच्या दर्शनी भागामध्ये विविधता आढळते. काही ठिकाणी वाड्याचे जोते पाच ते दहा फूट उंच दगडी असत त्यावर विटांचे बांधकाम असे. काही ठिकाणी जोत्याची उंची पाच फूट असे. व त्यावर लाकूडकामाची सुरुवात केली जात असे. काही ठिकाणी जोत्यावर दगडाऐवजी लाकडी बांधकाम असे मध्यभागी चौक असून चौकाच्या पलीकडे चौकोनी खांब उभे केलेले असत. दर्शनी भागाच्या पहिल्या भागावर लाकडी गॅलरी असे. या गॅलरीमध्ये मेघडंबरी केलेली असे. गॅलरीवर केलेले छप्पर हे वैशिष्ट्यपूर्ण असे. या प्रकारच्या मेघडंबरीचे महत्त्वपूर्ण उदाहरण म्हणजे पुण्यातील विश्रामबागवाड्यातील मेघडंबरी होय.

४. बागा व कारंजी :

मराठ्यांच्या नागरी शिल्पकलेतील चौथा महत्त्वपूर्ण घटक म्हणजे बागा व कारंजी होय. मराठ्यांचा साम्राज्य विस्तार जसजसा वाढत गेला. तसतसा या कलेचा विकास होत गेला. मराठ्यांच्या वाड्यांच्या बाहेरच्या आवारात सर्वसाधारणपणे एक लहानसे तळे असे. या तळ्यात कारंजी बसविलेली असत. शनिवारवाड्यातील बाग व कारंजी, हिराबाग वाड्यातील नानासाहेब पेशव्यांनी बांधलेली उद्यानयुक्त बाग, पुणे येथे पेशव्यांनी बांधलेले जलमंदिर, पर्वती तळे ही या प्रकारच्या शिल्पकलेची उत्तम उदाहरणे मानली जातात. या बागांकडे व कारंज्याच्या निर्मितीकडे मराठ्यांनी नगर रचनेचा एक भाग म्हणून पाहिले होते.

५. पाणी पुरवठा :

मराठ्यांच्या नागरी शिल्पकलेतील पाचवा महत्त्वपूर्ण घटक म्हणजे पाणी पुरवठा व्यवस्था होय. मराठ्यांनी आपल्या राज्यात पाणीपुरवठ्यासाठी विहिरी खोदल्या, विहिरी बांधल्या, हौद बांधले, धरणे बांधून शहरांबरोबरच गावांनाही पाणीपुरवठ्याच्या व्यवस्था केल्या. मराठा कालखंडात मोठ्या शहरात बहुतेक ठिकाणी पाणी पुरवठ्यासाठी हौद किंवा तलाव खोदल्याचे दिसतात. पुण्यात सदाशिव हौद, पुष्करिणी हौद, नातू हौद, काळा हौद, बाहुली हौद इत्यादी हौद प्रसिद्ध होते.

भवानराव प्रतिनिधींनी साताऱ्याला बांधलेला मंगळवारात तलाव साताऱ्यात प्रसिद्ध होता. ब्रम्हेंद्रस्वामीनी धावडशी येथे बांधलेला तलाव या काळात प्रसिद्ध होता. जावडेकरांनी बांधलेला इंदापूर येथील तलाव सुद्धा या काळात प्रसिद्ध होता. तुकडोजी होळकराने जेजूरी येथे बांधलेला तलाव, दिवा घाटाजवळ पहिल्या बाजीरावाने बांधलेला मस्तानी तलाव, नागपूरातील शुक्रवार तलाव ही या काळातील पाणी पुरवठ्याशी संबंधीत असणारी शिल्पकलेची महत्त्वपूर्ण उदाहरणे होय.

हौद, तलावाप्रमाणेच या काळात नद्यांवर धरणे बांधून पिण्याच्या व शेतीच्या पाण्यासाठी व्यवस्था केल्याचे आढळते. नागपूरच्या भोसल्यानी अंबाझरी व तेलीनखरा या नावाने दोन धरणे बांधली होती. नानासाहेब पेशव्याने कात्रज येथे बंधारा बांधून पुणे शहराच्या पाण्याची व्यवस्था केली होती.

६. आरोग्याच्या सुविधा :

मराठ्यांच्या नागरी शिल्पकलेचा शेवटचा महत्त्वपूर्ण घटक म्हणजे आरोग्यविषयक सुविधा होय. मराठ्यांनी आरोग्यविषयक दृष्टीकोन नजरेसमोर ठेवून सांडपाण्याच्या व्यवस्थेसाठी भुयारी गटारे निर्माण केली होती. काही ठिकाणी दगडी चर बांधून त्यामधून सांडपाणी सोडत असत. गरजेनुसार लहान मोठ्या आकाराची गटारे बांधली जात असत.

१५.५मराठा कालखंडातील लष्करी शिल्पकला :

मराठ्यांच्या नागरी शिल्पकलेची माहिती पाहिल्यानंतर या घटकात आपण मराठ्यांच्या लष्करी शिल्पकलेची माहिती पाहणार आहोत. ही माहिती पाहत असतांना आपणास मराठ्यांच्या लष्करी संरक्षण व्यवस्थेशी संबंधीत असणाऱ्या गढी, नागरी संरक्षण, किल्ले या घटकांचा विचार करावा लागेल.

१. गढी :

मराठ्यांच्या लष्करी शिल्पकलेतील पहिला महत्त्वपूर्ण घटक म्हणजे गढी होय. गढी म्हणजे सरदारांना राहवयाचे संरक्षित ठिकाण होय. या काळात गढी हे सरदारांचे निवासस्थान असे. गढीच्या संरक्षणासाठी बाहेरच्या बाजूला उंच दगडी भिंत, काही वेळा विटांची तटबंदी, खंदक व भक्कम दरवाजे बांधलेले दिसतात.

मराठ्याने आपल्या राजवटीत अनेक गढ्या बांधल्या होत्या. अर्थात बहुसंख्य गढ्या या अठराव्या शतकात बांधल्या गेल्या. छत्रपती राजाराम महाराजांच्या कारकीर्दीपासून जहागिरदारी पद्धती वाढली व या कारणामुळे गढ्यांची संख्या वाढली. गड्यांचे उत्तम उदाहरण देत असतांना दरेकरांची दरेवाडीची गढी व देशपांड्यांची गढी या गढ्यांची उदाहरणे द्यावी लागतील. जाधववाडीची गढी, वाघोलीची गढी, तासगावची गढी व तळेगावची गढी या गढ्याही प्रसिद्ध आहेत.

सर्वसाधारणपणे गढ्यांच्या रचनेचा अभ्यास केला तर पुढील वैशिष्ट्ये दिसून येतात.

i) आराखडा :

सर्व गड्यांचा जर बारकाईने अभ्यास केला तर या गड्यांच्या बांधणीमध्ये विशिष्ट असा आराखडा दिसतो. बहुतेक गड्या या चौकोनी किंवा चतुष्कोनी आहेत. चौकोनी गढ्यांचा आकार लहान तर समचतुष्कोनी गढ्यांचा आकार मोठा आहे असे दिसते. सासवड, पुणे येथील गड्या चौकोनी आहेत तर कराड, रांझे, जाधववाडी येथील गड्या चतुष्कोनी आहेत.

ii) तटबंदी :

गडी शिल्पकलेत तटबंदीला महत्त्व होते. संपूर्ण गडी सभोवताली तटबंदी बांधली जात असे. गडीचा दर्शनी भाग दगडाने बनविला जात होता. गडीच्या तटबंदीची उंची साधारणत: २० फूट असे तर तटबंदीची रुंदी ५ ते ७ फूट असे. तटबंदीवर चुना टाकून पहाऱ्याला योग्य अशी जागा बनविली जात असे.

तटबंदीच्या बाबतीत जाधववाडीची गडी वैशिष्ट्यपूर्ण आहे. या गढीला संरक्षणाची खास व्यवस्था आहे. जाधववाडीपेक्षा सासवडची गडी तटबंदीच्या दृष्टीने वेगळी आहे. पुणे व दरेवाडी येथील गढ्या अष्टकोनी व काटकोनी आहेत. सासवड येथील पुरंदरगढी ही अशीच अभेद गढी आहे.

iii) प्रवेशद्वार :

गडी शिल्परचनेतील प्रवेशद्वार महत्त्वाचा होता. गड्यांना कमीत कमी दोन व जास्तीत जास्त पाच प्रवेशद्वार असत. गड्यांना सामान्यतः उत्तरेकडे एक दरवाजा असे. त्या दरवाजाला दिल्ली दरवाजा असे म्हणत. प्रवेशद्वाराचा जर विचार केला तर इतिहासप्रसिद्ध शनिवारवाड्याला पाच प्रवेशद्वार होते. तर तासगावच्या गढीला तीन प्रवेशद्वार होते. प्रवेशद्वार हे उंच, रुंद व टोकाला निमुळते असत. प्रवेशद्वाराचे दरवाजे ह लाकडी असत व त्या दरवाज्यावर लोखंडी अरकुचीदार खिळे ठोकलेले असत. प्रवेशद्वाराच्या आतील बाजूला लाकडी तक्तपोशी केलेली असे.

iv) पाणी पुरवठा :

किल्ल्याप्रमाणेच गढीचा संरक्षणाच्या दृष्टीने उपयोग होत होता. किल्ल्यांप्रमाणेच गढ्यांनासुद्धा शत्रुचा वेढा पडत असे. हा वेढा लवकर उठेल किंवा नाही याची खात्री नसे. म्हणूनच गढीतील लोकांना पाणीपुरवठा अव्याहत चालू राहण्यासाठी गढीच्या काही भागांमध्ये विहिरी खोदल्या जात असत. तर काही वेळा गढाच्या बाजूने पाटाचे पाणी नेले जात असे.

कराडच्या गढीत चांगली बांधलेली विहिर आहे. तर शनिवारवाड्याला कात्रजच्या घाटातून नळाद्वारे पाणी नेले जात होते.

२. नागरी संरक्षण व्यवस्था :

मराठ्यांच्या लष्करी शिल्पकलेतील दुसरा महत्त्वपूर्ण घटक म्हणजे नागरी संरक्षण व्यवस्था होय. प्राचीन कालखंडात ज्याप्रमाणे नागरी संरक्षणासाठी तटबंदी व्यवस्था होती. तशाच प्रकारची व्यवस्था मध्ययुगीन कालखंडामध्येही सुरु होती. मात्र ही तटबंदी प्राचीन काळात लाकूडरचनेने तयार केली जात होती तर मध्ययुगीन काळात ही रचना दगड, विटा व मातीच्या वापराने तयार केली जात होती. या नागरी संरक्षण तटबंदी व्यवस्थेबाबत डॉ. माटे म्हणतात, नागरी संरक्षण तटबंदीचा उपयोग शत्रुपासून संरक्षणासाठी तर होत होताच पण त्याही पेक्षा महत्त्वाचे म्हणजे दरोडेखोरांतूनही या तटबंदीमुळे संरक्षण होत होते.

नागरी संरक्षणासाठी जी तटबंदी निर्माण केलेली होती. तिचे स्वरुप मोठे असल्याने या तटबंदीच्या सभोवताली अनेक दरवाजे असत. दोन प्रवेशद्वारांना वेगवेगळी नावे असत. हत्ती दरवाजा, मल्हार दरवाजा, सती दरवाजा, शुक्रवार दरवाजा अशी ही नावे असत.

नागरी संरक्षणासाठी जी तटबंदी निर्माण केली जात असे. त्या तटबंदीच्या बाहेर संरक्षणासाठी खंदक खोदले असत हे खंदक अतिशय खोल असत.

३. किल्ले :

मराठ्यांच्या लष्करी शिल्पकलेतील तिसरा व अत्यंत महत्त्वपूर्ण घटक म्हणजे किल्ले होय. रामचंद्रपंत अमात्यांनी आज्ञापत्रात किल्ल्यांचा मोठ्या प्रमाणात उहापोह केला आहे. त्याने "किल्ले म्हणजे राज्याचे प्राण होय", असे म्हटले आहे. संरक्षणाच्या दृष्टीने ही महत्त्वपूर्ण वास्तू असल्याने या शिल्पकलेला महत्त्व प्राप्त झाले होते.

mumotes.in

i) स्थळ :

किल्ला बांधत असतांना मध्ययुगीन काळात स्थळांचा विचार केला जात होता. व्यापार, युद्धशास्त्र, राजमार्ग, संरक्षण या घटकांचा विचार करुन स्थळ निवडून किल्ले बांधले गेले. काही किल्ले जमिनीवर तर काही किल्ले नद्यांच्या मुखाजवळ बांधले आहेत.

राजमार्गावरील किल्ल्यामध्ये मनमाड ते अहमदनगर या मार्गावर बांधलेल्या अंकाई-टंकाई किल्ला, नाशिकजवळील जीवधन किल्ला, बोरघाटजवळ बांधलेला लोहगड-विसापूर किल्ला, दिवाघाटजवळ बांधलेला मल्हारगड व कोकण व देश यांच्या मोक्याच्या ठिकाणी बांधलेला रतनगड किल्ला इ. किल्ल्यांचा समावेश होतो.

शहर संरक्षणाच्या दृष्टीने बांधलेल्या किल्ल्यांमध्ये साताराचा अजिमतारा, चिपळूणचा गोवालकोट, कोल्हापूरचा पन्हाळा, पुण्याचा पुरंदर व जुन्नरचा शिवनेरी किल्ला यांचा समावेश या प्रकारच्या किल्ल्यामध्ये होतो.

सागरी संरक्षणाच्या दृष्टीने जे किल्ले बांधण्यात आले होते. विशिष्ठी नदीवरील अंजनवेल्या किल्ला, वैतरणा नदीवरील अर्नाळा किल्ला, संगमेश्वर नदीवरील जयगडचा किल्ला, वाघोठणा नदीवरील विजयदुर्ग किल्ला या किल्ल्याचा समावेश या प्रकारच्या किल्ल्यामध्ये होतो.

जमिनीवरील किल्ल्यामध्ये बहाद्दूरवाडीचा किल्ला, दोदवडचा किल्ला, मालेगावचा किल्ला या किल्ल्यांचा समावेश होतो.

ii) खंदक व सरळ उतरण :

मराठा कालखंडातील किल्ल्यांच्या बांधकामाचे दुसरे वैशिष्ट्ये म्हणजे खंदक व सरळ उतरण होय. किल्ल्यांना जरी तटबंदी असली तरी शत्रू दोर अथवा शिड्यांचा वापर करुन किल्ल्यांवर चढ शकत असे. त्यामुळे किल्ल्याच्या संरक्षण व्यवस्थेला धोका निर्माण होत असे हा धोका टाळण्यासाठीच किल्ल्याच्या बांधकाम रचनेत खंदक हा घटक आणला होता. हे खंदक रुंद व खोल असत. या खंदकात पाणी सोडले जात असे. किल्ल्याला बाहेरुन एक व आतून एक असे दोन खंदक असत. माधवरावानी बांधलेला बहाद्दूरवाडीचा किल्ला या पद्धतीच्या व्यवस्थेचा उत्तम नमूना आहे. याशिवाय दोदवड, चाकण, मालेगाव, नंदुरबार या ठिकाणचे किल्लेही अशाच प्रकारचे आहेत.

खंदका बरोबरच डोंगरी किल्ला बांधत असतांना एखाद्या बाजूला तरी खडी उतरण निर्माण केली जात असे. जर खडी उतरण नैसर्गिक असेल तर त्यात बदल केला जात नसे. कृत्रिम पद्धतीची खडी उतरण ४० ते ५० फूट उतरण होईल अशा पद्धतीने काम करुन किल्ल्याच्या संरक्षण व्यवस्थेत भर घालण्याचे काम केले जात असे.

iii) किल्ला प्रवेश मार्ग :

मराठा कालखंडातील किल्ल्याचे बांधकाम करत असतांना ज्याप्रमाणे स्थळ, खंदक व किल्ल्याच्या उतरणीला महत्त्व देण्यात आले होते. तशाच प्रकारचे महत्त्व किल्ल प्रवेश मार्गाला देण्यात आले होते. किल्ला प्रवेश मार्ग अतिशय लहान व दुर्गम असे. प्रवेशासाठी पायऱ्या बनविल्या जात असत. किल्ल्यांच्या प्रवेशाचे मार्ग अतिशय खडतर होते हे पुढील माहितीवरुन स्पष्ट होते.

mumotes.in

हडसर येथील किल्ल्यात प्रवेश करण्यासाठी ६८ यार्डाचा मार्ग चालून जावा लागत असे. जीवधनच्या किल्ल्यात प्रवेश करण्यासाठी ३०० पायऱ्या चढून जावे लागत असत. भिवंडी येथील किल्ल्यात प्रवेश करण्यासाठी २७ फूट उंचीची शिडी चढून जावे लागत असे. हरिश्चंद्रगड किल्ला चढण्यासाठी २०० फूट सरळ खिल्ले मारले होते. चढण नसे त्याठिकाणी किल्ल्यात प्रवेश करण्यासाठी भुयारी मार्ग काढण्यात आले होते. अशा भुयारी मार्गातून एकावेळी एकच व्यक्ती जावू शकेल अशा मार्गाची व्यवस्था करण्यात आली होती. या सर्व माहितीवरुन किल्ल्यांचे प्रवेशमार्ग अत्यंत दूर्गम व खडतर होते असे दिसून येते.

iv) तटबंदी :

किल्ला बांधकामातील तटबंदी हे एक महत्त्वपूर्ण स्वरुपाचे बांधकाम होते. संरक्षणात्मक दृष्टीकोन नजरेसमोर ठेवून हे बांधकाम केले जात असे. सर्वसाधारणपणे किल्ल्याचा जो पठारी भाग असे त्याच्या संरक्षणासाठी हे तटबंदीचे बांधकाम केले जात असे. काही ठिकाणी मुख्य तटबंदीच्या बांधकामाव्यतिरिक्त तटबंदीच्या आत समांतर अशी दुसरी एक तटबंदी बांधत असत. जयगड, मंडलगड या किल्ल्यामध्ये या प्रकारची तटबंदी दिसून येते. रायगडावर तटबंदीच्या तीन रांगा होत्या.

तटबंदीची उंची सामान्यत: २० फूट असे तटबंदीची रुंदी तळाला ८ ते १० फूट व टोकाला कमीत कमी ५ फूट असे. तटबंदी बांधत असतांना अभेद अशा एखाद्या खडकाचा वापर करीत असत. जर ते शक्य नसेल तर प्रचंड दगड चुन्यामध्ये एकत्र बांधून ते दगड लोखंडी पट्टीत गुंफीत असत.

v) दरवाजे :

मराठा कालखंडातील किल्ल्यांचे दरवाजे वैशिष्ट्यपूर्ण होते. शत्रूला सहजासहजी किल्ल्यात प्रवेश मिळू नये, किल्ल्याचे दार सहजासहजी किल्ल्यात प्रवेश मिळू नये, किल्ल्याचे दार सहजासहजी उघडू नये, शत्रूला समर्थपणे तोंड देता यावे ही उद्दिष्ट्ये नजरेसमोर ठेवून किल्ल्यांचे दरवाजे बनविले जात होते.

दरवाजे हे लाकडी असत. दरवाज्यावर टोकदार निमुळती कमान असे. दरवाज्याच्या संरक्षणासाठी लोखंडी अणकुचीदार खिळे दरवाज्यावर मारलेले असत. दरवाज्याच्या दोन्ही बाजूना बुरुज असे. दरवाज्याकडे येणारा मार्ग दगडातून खोदलेला असे किल्ल्याचे दरवाजे ठराविक अंतरावर ठेवलेले असत. दरवाज्यांचा आकार सोयीनुसार ठेवलेला असे. काही ठिकाणी जरुरीप्रमाणे यात बदल केला जात असे.

vi) पाणीपुरवठा :

किल्ल्याच्या अंतर्गत बांधकामातील एक उपयुक्त बांधकाम म्हणून या बांधकामाकडे पाहिले जाते. रामचंद्रपंत अमात्य यांनी या बांधकामाबाबत असे म्हटले आहे की, "ज्या ठिकाणी किल्ला बांधावयाचा आहे त्या ठिकाणी पुरेसे पाणी आहे किंवा नाही याची खात्री करुनच किल्ल्याचे बांधकाम करावे, पुरेसे पाणी असेल तर किल्ल्यामध्ये तलाव, हौद बांधण्यात विहिरी खोदाव्यात". या उपयुक्ततेला अनुसरुन वेगवेगळ्या प्रकारची बांधकामे किल्ल्यावर झाली आहेत.

muniotes.in

vii) निवासस्थाने :

किल्ल्याच्या बांधकामामध्ये निवासव्यवस्थेच्या बांधकामाचा समावेश असे किल्ल्यावर राजा, प्रशासकीय अधिकारी, शिबंदी रयत राहात असे. किल्ल्यातील सर्वात उंच भाग असे त्याला बालेकिल्ला असे म्हणत. याठिकाणी राजा रहात असे. प्रशासकीय अधिकाऱ्यासाठी स्वतंत्र ठिकाणी राहण्याची व्यवस्था केलेली असे. रयत किल्ल्याच्या एका भागात राहत असे. रामचंद्रपंत अमात्यानी आपल्या आज्ञापत्रात अशा सूचना दिल्या आहेत की राजाशिवाय इतर कोणाचीही इमारत चुन्याने बांधू नये. यावरुन किल्ल्यावर राहणाऱ्या वेगवेगळ्या प्रकारच्या लोकांची ठिकाणे व बांधकामरचना तसेच साधनसामुग्रीचा वापर निवास व्यवस्थेसाठी निश्चित झाला होता असे दिसते.

डॉ. माटे यांनी मराठ्यांच्या किल्ल्याच्या शिल्पकलेसंबंधी काही निष्कर्ष काढले आहेत.

१) मराठ्यांच्या किल्ल्यावर आज जे काही अवशेष दिसतात त्यावरुन या किल्ल्याचे बांधकाम करणाऱ्यांना लष्करी तंत्रशास्त्र चांगले अवगत होते असे दिसून येते.

२) मराठ्यांनी ज्या ठिकाणी किल्ले बांधलेले आहेत त्यावरुन त्यांना लष्करीदृष्ट्या व भौगोलिकदृष्ट्या महत्त्वाच्या केंद्रांची पूर्णपणे माहिती होती.

३) मराठ्यांनी जे किल्ले दुरुस्त केले ते पूर्वीपासूनच अस्तित्त्वात होते यावरुन असे दिसून येते की मराठ्यांनी ज्या सुधारणा केल्या त्या पूर्वी जे किल्ले अस्तित्त्वात होते त्याला अनुसरूनच केल्या. त्यामुळे मराठेपूर्वकालीन किल्ले व मराठे कालीन किल्ले यामध्ये फारसा फरक आढळत नाही.

४) महाराष्ट्रातील किल्ल्यांच्या बांधणीचा कालखंड ठरवत असतांना आपल्याला वाङःमयीन संदर्भसाधने व शिलालेखांवर विसंबूत राहावे लागते. याबाबत स्वतंत्र शैली कोणत्याही प्रकारे मदत करत नाही.

५) मराठ्यांनी किल्ल्यांच्या शिल्पकलेमध्ये कोणतीही नवीन भर घातली नाही.

१५.६मराठा कालखंडातील धार्मिक शिल्पकला

मराठा कालखंडातील धार्मिक शिल्पकलेचा विचार करत असताना आपणास या कालखंडातील देवालय, मंदिरे यांचा विचार करावा लागेल. या प्रकारच्या वास्तूंचे बांधकाम करण्यापाठीमागचा बांधकामकर्त्यांचा उद्देश पुण्यकर्म करणे हा होता.

१. देवालये :

मराठा कालखंडात जी काही धार्मिक शिल्पे निर्माण करण्यात आली होती. त्यामध्ये देवालयांचा समावेश आहे. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज धार्मिक प्रवृत्तीचे होते. त्यांनी आपल्या कारकीर्दीत विठ्ठलवाडी येथील विठ्ठलाचे व शिखर शिंगणापूर येथील शंभूमहादेवाचे देवालय अशी दोन देवालये बांधली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मातोश्री जिजाबाई यांनी पुण्याच्या कसबा पेठेतील गणेश मंदिर बांधले. येसूबाईने पुण्याजवळील पाषाण येथे शिवमंदिर बांधले. धनाजी जाधवाने सातारा जिल्ह्यातील पालीच्या खंडोबाच्या देवालयाची दुरुस्ती केली.

छत्रपती शाहू व पेशव्यांचे गुरु ब्रम्हेंद्रस्वामी यांनी काही देवालये बांधली चिपळूणचे परशुरामाचे देवालय, यवत येथील भुलेश्वराचे देवालय, धावडशाहीचा परशुराम व राजापूरी येथील गणपतीचे देवालय ही त्यांनी बांधलेली देवालये होय.

राणोजी शिंदेने १७३० मध्ये ज्योतिषाच्या डोंगरावर केदारेश्वराचे देवालय बांधले. पेशवा नानासाहेब यांच्या कारकीर्दीत मंदीर बांधकामाला पुन्हा चालना मिळाली. नानासाहेबाने पुण्याजवळ पर्वतीवर देवदेवेश्वराचे देवालय बांधले. तसेच नाशिकच्या त्र्यंबकेश्वराचे बांधले.

डॉ. माटे यांच्या मते, १७४० ते १८१५ या पंच्चाहत्तर वर्षाच्या काळात महाराष्ट्रात देवालयांच्या संख्येत प्रचंड प्रमाणात वाढ झाली. नाशिक, पंढरपूर, वाई, माहुली, जेजुरी, पाली या ठिकाणची बहुतेक सर्व देवालये याच काळात बांधली गेली.

पेशव्याना पुण्याबद्दल जास्त आकर्षण असल्याने त्यांनी अमृतेश्वर, तुळशीबाग व ओंकारेश्वर ही देवालये बांधली. शिंदे-होळकर यांनी जोतिबा व जेजूरी या तिर्थक्षेत्रांकडे लक्ष पुरविले.

अहिल्याबाई होळकर या साध्यीने संपूर्ण भारतभर ठिकठिकाणी देवालये बांधून आपल्यावरील नैतिक जबाबदारी पार पाडली. वाराणशी, रामेश्वर, नाशिक, माहेश्वर, पंढरपूर या ठिकाणी बांधलेली देवालये महत्त्वाची आहेत.

पटवर्धनानी सांगली व तासगाव येथे गणेशाची देवालये बांधली. प्रतिनिधीनी औद्य येथे यमाईचे देवालय बांधले, तसेच माहुले येथे काशी विश्वेश्वराचे देवालय बांधले. नाना फडणवीसाने बेलबागेची स्थापना केली व भीमा नदीच्या उगमस्थानी भीमाशंकराचे देवालय बांधले. हिंगणे यांनी नाशिक येथे नीळकंठेश्वराचे देवालय बांधले. रास्ते यांनी वाईला रामेश्वर, काशी विश्वेश्वर व माहेश्वराची देवालये बांधली.

मराठा कालखंडातील शिल्पकलेचा विचार करत असतांना आपणास महत्त्वपूर्ण काळातील यादवांच्या सत्तेचा विचार करावा लागेल. यादव राजवटीत हेमाद्री नावाचा एक श्रेष्ठ शिल्पशास्त्रज्ञ होऊन गेला. त्यांनी मंदिर-शिल्पाची स्वतःची अशी काही खास वैशिष्ट्य निर्माण केली होती. हेमाद्रपंताच्या मंदिरांना हेमाद्रपती मंदिरे असे म्हणतात.

२. मराठा कालखंडातील मंदिराचे प्रकार :

मराठा कालखंडात जी मंदिरे बांधण्यात आली त्या मंदिरावर यादवकाळाचा ठिकठिकाणी प्रभाव जाणवतो. मराठा कालखंडातील मंदिराचे 'अ', 'ब' व 'क' असे तीन प्रकार आहेत.

अ) 'अ' प्रकारची मंदिरे :

१) आराखडा :

'अ' प्रकारच्या मंदिराचे प्रवेशद्वार पूर्वेला आहे. गाभारा चौकोनी आहे. सर्वसाधारणपणे बांधकामाचा कल तिरकस आहे. मंदिराच्या भिंती कोणत्याही दिशेकडे सरळ नसून उत्तरपूर्व, दक्षिणपूर्व, दक्षिण पश्चिम व उत्तर पश्चिम असा साधारण बाहेरून तिरकस आकार दिसतो. या शिखरांचा आकार यादवकालाप्रमाणेच दिसतो. गाभारा अतिशय लहान असतो. 'अ' प्रकारच्या मंदिराच्या बाबतीत डॉ. माटे म्हणतात, मंडप हा बंदिस्त असो की उघडा असो त्याचा आकार चौकोनीच असतो.

२) खांब :

'अ' प्रकारच्या मंदिरासाठी विशिष्ट प्रकारचे खांब तयार केले जात असत. खांबाचा आकार जास्त प्रमाणात चौकोनी असे. खांबावर आकृत्या कोरलेल्या असत. काही ठिकाणच्या मंदिराचे खांब हे चौकोनी, अष्टकोनी किंवा काहीवेळा संपूर्ण गोल असत.

३) दरवाजे :

'अ' प्रकारच्या मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या चौकटीवर गणपतीचे चित्र कोरलेले असे. तशाच दरवाज्यावर विविध प्रकारच्या भूमितीतल्या विविध आकृत्या कोरलेल्या असत. मात्र यादवकलाप्रमाणे दरवाज्याच्या दोन्ही बाजूला द्वारपाल दिसत नाहीत.

४) तक्तपोशी :

'अ' प्रकारच्या मंदिराची तक्तपोशी घुमटाकार असे. हा घुमट अष्टकोनी असे. घुमटाच्या आतील बाजूस कमळ कोरलेले असे. अंतराळातील तक्तपोशी ही दगडी असून सपाट असे. मंडपातील तक्तपोशीही घुमटाकार होती.

५) शिखर :

'अ' प्रकारच्या मंदिराचे शिखर बांधीत असतांना प्रत्येक भिंतीच्या कोपऱ्यापासून भिंतीचा आकार तिरका वर नेवून त्यामध्ये दोन-तीन टप्पे करुन त्याच्यावर शिखर बांधत असत. यादवकालीन शिखराप्रमाणेच हे शिखर बांधत असत. यादवकालीन शिखराप्रमाणेच हे शिखर असे. शिखरावर निरनिराळ्या आकाराचे घुमट असत. घुमटांचा आकार काही वेळा लहान असे तर काही वेळा मोठा असे.

मराठेकालीन मंदिरामध्ये 'अ' प्रकारच्या काही मंदिरांची भर पडली आहे. त्या मंदिरांची नावे, ठिकाणी व सन खाली देण्यात आले आहेत.

मंदिराचे नाव	ठिकाण	सन
वटेश्वर	सासवड	१७३५
संगमेश्वर	सासवड	१७२५
केदारेश्वर	जोतिबाचा डोंगर	१७३०
काशी विश्वेश्वर	माहुली	१७३५
संगमेश्वर	माहुली	१७४०
भार्गवराम	धावडशी	१७४५
केदारेश्वर	जोतिबाचा डोंगर	१८०८
कणकेश्वर	कणकेश्वर डोंगर कुलाबा	-
विठ्ठल मंदिर	कोल्हापूर	-
शिव मंदिर	पन्हाला किल्ला	-

munotes.in

ब) 'ब' प्रकारची मंदिरे :

मराठा कालखंडातील 'ब' प्रकारच्या मंदिरशिल्पांवर 'गुजराथी' व 'राजस्थानी' पद्धतीच्या मंदिरशिल्पांचा प्रभाव जाणवतो. जैन मंदिराचा सुद्धा मंदिर कामावर प्रभाव जाणवतो. गुजराती व राजस्थानी पद्धतीला 'वेसरा शिल्प पद्धत' म्हणतात.

१) आराखडा :

'ब' प्रकारच्या मंदिरांचे तोंड उत्तरेला किंवा पूर्वेला आहे. मंदिराचा गाभारा आतून बाहेरून चौकोनी आहे. मंदिराचा अंतराळ हा समचतुष्कोनी आहे व मंडप हा चौकोनी आहे.

२) खांब :

'ब' प्रकारच्या मंदिरात गाभारा हा वरच्या बाजूला घुमटाकार असल्यामुळे गाभाऱ्यात खांब नाहीत. काही ठिकाणी मात्र समचतुष्कोनी खांब आहेत. मंडपाला एकूण बारा खांब असून त्यापैकी चार खांब हे चार कोपऱ्यात असून उरलेले आठ खांब विशिष्ठ अंतराने उभे केलेले आहेत. या खांबांवर पाना फुलांची नक्षी काढलेली आहे. काही ठिकाणी खांब गोलाकार, काही ठिकाणी अष्टकोनी आकाराचे तर खालपासून वरपर्यंत चौकोनी आहेत. क्वचित प्रसंगी खांबाच्या वरच्या बाजूला कंकणाकृती नक्षी काढलेली आहे.

३) दरवाजे :

'ब' प्रकारच्या मंदिराचे गाभारा व अंतराळ या दोन्ही ठिकाणचे दरवाजे अतिशय सुंदर असून दरवाज्याच्या चौकटीच्या वरच्या बाजूला मध्यभागी गणपतीचे असे तर दोन्ही बाजूला कीर्तीमुख कोरलेले असे. दरवाज्यावर वेगवेगळ्या प्रकारची नक्षी कोरलेली असे. काही दरवाज्यांच्या खालच्या भागात 'स्त्री' किंवा 'पुरुष' द्वारपाल म्हणून कोरलेले आहेत.

४) बांधकाम :

'ब' प्रकारच्या मंदिराचे बांधकाम कायम दगड आणि चुन्याने होत असे. बांधकामामध्ये दगडी कमानी बांधलेल्या दिसून येतात. काही ठिकाणी मुख्य मंदिराच्या बाहेर दगडी ब्रॅकेटस दिसतात.

५) तक्तपोशी :

'ब' प्रकारच्या मंदिराच्या गाभाऱ्याची तक्तपोशी घुमटाकार असून ती अष्टकोनी असल्याचे दिसते. त्यामध्ये मध्यभागी कमळ कोरल्याचे दिसते. तर अंतराळाची तक्तपोशी घुमटाकार असून त्यावर अनेक प्रकारची पाने-फुले नक्षीकामातून कोरलेली असत. काही ठिकाणी अप्सरा राधाकृष्ण यांची चित्रे कोरलेली असत. काही ठिकाणी कमळाची चित्रे कोरलेली असत.

६) सजावट :

'ब' प्रकारच्या मंदिरामध्ये मंदिराच्या दरवाज्यावर, भिंतीवर व शिखरावर वेगवेगळ्या प्रकारची नक्षी कोरुन मंदिराच्या सौंदर्यात भर घालण्याचा प्रयत्न केलेला असे.

munotes.in

७) शिखर :

'ब' प्रकारच्या मंदिराचे शिखर दगडी असे. दगडी शिखराच्या प्रत्येक कोपऱ्यावर मूर्ति कोरलेली असे. गाभाऱ्याप्रमाणेच अंतराळ व मंडप यावरसुद्धा दगडी शिखर असून त्यावर मूर्ती कोरलेल्या असत. या प्रकारातील मंडपाला दोन शिखरे असत. हे याचे सर्वात मोठे वैशिष्टे असे.

'ब' प्रकारच्या मंदिरात खालील प्रकारच्या मंदिराचा समावेश होतो. या मंदिरांची नावे, ठिकाणे व सन खाली दिले आहेत.

मंदिराचे नाव	ठिकाण	सन
रामेश्वर	नाशिक	१७४७
त्रिबकेश्वर	नाशिक	१७५०
सुंदरनारायण	नाशिक	१७५६
सिद्धेश्वर	टोके	१७६०
मोहिनीराज	नेवासे	१७६० ते १७७०
काळाराम	नाशिक	१७८२
भीमाशंकर	भीमाशंकर	१८०० च्या सुमारास
शिवमंदिर	प्रवश	-
शिवमंदिर	कायगाव	-
शिवमंदिर	चांगदेव	-

क) 'क' प्रकारची मंदिरे :

'अ' व 'ब' प्रकारची मंदिरे मराठा कालखंडात बांधली जात असतानाच महाराष्ट्रात मंदिर बांधण्याच्या पद्धतीत एक नवीन प्रकार उदयास आला. या मंदिर बांधकामाची सुरुवात १७२५ झाली. या प्रकारची मंदिरे आज महाराष्ट्रात असंख्य आहेत. या प्रकारच्या मंदिराना 'क' प्रकारची मंदिरे असे म्हणतात.

१) आराखडा :

'क' प्रकारच्या मंदिराचे तोंड उत्तरेला किंवा पूर्वेला असते. या मंदिरांचा गाभारा आतून बाहेरून चौकोनी आहे. भिंतीवर उभी चित्रे काढलेली असतात. चारी बाजूला प्रवेशद्वार असतात. अंतराळ भाग या प्रकारच्या मंदिरात आढळत नाही. गाभाऱ्यानंतर मंडप असतो. हा मंडप समचतुष्कोनी असतो. हा मंडप लाकडी असतो.

२) खांब :

'क' प्रकारच्या मंदिराचा गाभारा घुमटाकार असल्यामुळे त्यामध्ये खांब नसतात. सभा मंडपात तीन कमानी असतात. कमानी सहा खांबावर वसलेल्या असतात. सभामंडप हा समचतुष्कोनी असतो. या मंडपामध्ये दोन दोन खांबाच्या रांगा असतात. सभामंडपाचे खांब लष्करी असून ते सुद्धा तीन प्रकारचे असतात. १) सपाट २) सुरुच्या आकाराचे ३) खाचलेले.

३) तक्तपोशी :

'क' प्रकारच्या मंदिराचा गाभारा हा घुमटाकार असतो. तक्तपोशीला कमळाचे चित्र कोरलेले असे. मंडप हा लाकडी असून त्यावरील तक्तपोशी सपाट असून दोन्ही बाजूला पारव्याप्रमाणे

munotes.in

उतरती असत. सभामंडपाच्या तक्तपोशीवर व खांबावर पाना-फुलांची नक्षी काढलेली असते. ही नक्षी सतत चांगली दिसावी म्हणून पॉलिश केली जात असे. तक्तपोशीला लोखंडी हूक लावलेले असून त्या हुकाला काचेची झुंबरे व हुंड्या लटकवलेल्या असत. झुंबरामध्ये मेणबत्या लावण्याची सोय केलेली असे.

४) बांधकाम :

'क' प्रकारच्या मंदिराचे बांधकाम सामान्यत: दगडी, विटांचे व चुन्याच्या वापराने केलेले असे. ज्या ठिकाणी विटांचा वापर केला जात असे त्याठिकाणी चुन्याचा गिलावा करीत असत. या प्रकारामध्ये झालेला बदल असा की पूर्वी गाभारा किंवा सभामंडप हा फक्त चौकोनी असे मात्र अलिकडे या रचनेत बदल होऊन अलिकडे ही रचना अष्टकोनी किंवा त्यापेक्षासुद्धा जास्त अशा कोनामध्ये विभागलेली दिसते. अष्टकोनी रचना करण्यासाठी ठिकठिकाणी भिंतीतून दोन दगड बाहेर खेचून त्यावर कमानी टाकत असत. मराठेकालीन मंदिर शिल्पकलेचे एक खास वैशिष्ट्ये म्हणून आपल्याला एकमेकांत गुंतलेल्या कमानींचा उल्लेख करावा लागेल. वेगवेगळ्या कमानी एकमेकात गुंतल्यामुळे अमुलाग्र बदल होतो. या रचनेमुळे मंदिराना पाहिजे तसा आकार देता येतो. मंदिराच्या भिंती बहुधा चित्राने मढवलेल्या असत. गाभाऱ्यात फक्त तीन कोनाडे असणे हे या प्रकारचे वैशिष्ट्ये आहे.

५) दरवाजे :

'क' प्रकारातील मंदिराचे दरवाजे अतिशय साधे असतात. दरवाज्यांच्या चौकटीवर वरच्या बाजूला गणपतीचे चित्र असून दोन्ही बाजूला कीर्तीमुख कोरलेले असे. याशिवाय दरवाज्यावर कोणतीही सजावट नसे.

६) शिखर :

'क' प्रकारच्या मंदिरांच्या शिखरांचा अभ्यास केला तर यामध्ये आपणास अनेक प्रकार दिसतात. साधारणत: या शिखरांचा आकार घुमटाकार असून चारही बाजूना त्याच्या पारव्या उरलेल्या असत. शिखराच्या सर्वात उंच ठिकाणी टोकदार पाते असत. या शिखरांचे बांधकाम चुन्यामध्ये केलेले असे. काही ठिकाणी शिखरांवर नक्षी कोरलेली असे. काही ठिकाणी शिखराचा आकार कंदमुळासारखा असून चारी बाजूंना चार घुमट असत. काही ठिकाणी शिखर हे कंदमुळासारखे नसून ते भूगोलार्थासारखे पण अंतर्गोल असत. थोडक्यात मराठेकालीन शिखर व त्या शिखरांमध्ये झालेले बदल हे मराठा कालखंडातील शिल्पकलेच्या बदलाचे प्रतिक आहेत. या प्रकारातील मंदिराचे उत्तम उदाहरण म्हणजे पुण्याच्या ओकारेश्वराचे मंदिर होय.

'अ', 'ब' व 'क' या तिन्ही प्रकारच्या मंदिर शिल्पकलेची माहिती पाहिल्यानंतर आपणास असे दिसून येते की या कालखंडातील कलाकार, बांधकाम कलेत निष्णात नव्हते. मूर्ती विज्ञानाचा म्हणावा तितकासा विकास झाला नव्हता. काही ठिकाणी मूर्तीविज्ञानातील उणीवा भरुन काढण्याचे प्रयत्न झाल्याचे दिसून येते. सभामंडपाच्या रचनेत बदल झाल्याचे दिसून येतात. हा बदल मंदिर शिल्पांच्या दृष्टीने हिताचा ठरला. मंदिरामध्ये काढलेल्या नक्षींना पॉलिश करण्याच्या पद्धतीमुळे मंदिरांच्या सौंदर्यात भर पडली.

१५.७ मराठा कालखंडातील घाट, धर्मशाळा व कुंडासंदर्भातील शिल्पकला:

मराठा कालखंडातील घाट, धर्मशाळा व कुंड हे धार्मिक शिल्पकलेशी संबधीत घटक आहेत. मात्र या घटकांचा आपण या ठिकाणी स्वतंत्र विचार करणार आहोत. या तिन्ही शिल्पकलात्मक घटकांची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

१. घाट :

मराठा कालखंडात धार्मिक विधीसाठी प्रत्येक नदीवर एक घाट बांधला जात होता. परिणामी घाट हा मराठा कालखंडातील वास्तूकलेचा एक प्रकार बनला होता. या कालखंडात मराठा सरदारांनी व सरकारी अधिकाऱ्यांनी कर्तव्यबुद्धीने घाट बांधले. हिंदूंच्या दृष्टीने घाट म्हणजे पुण्यकर्म करण्याचे ठिकाण होय. घाट बांधत असतांना तो नदीच्या पात्रात बांधला जात असे. अहिल्याबाई होळकर यांनी अशा प्रकारचे घाट बनारस, माहेश्वर, पंढरपूर, नाशिक, रामेश्वर या ठिकाणी बांधले होते. पेशवेकाळात नानासाहेब पेशवे व लोकांना प्रोत्साहन दिले. रास्ते, पेठे, नाईक व नाना फडणवीस यांनी घाट बांधण्यासाठी सक्रिय प्रयत्न केले. साधारणत: आपल्या मूळ गावात घाट बांधण्याकडे लोकांचा कल असे. वाई, टोके, माहूली, पंढरपूर, आनंदवल्ली, नाशिक, माहेश्वर, कराड येथे घाट बांधण्यात आले. क्वचित प्रसंगी रयतेकडून पैसा घेवून घाट बांधण्यात येत असत. याचे उत्तम उदाहरण म्हणजे कराडचा घाट होय.

घाटाच्या पायऱ्या दोन फूट रुंद असत व उंची एक फूट असे. त्यामुळे घाटावर चढउतार करणे सहज शक्य होत असे. मराठेकालीन घाटाना बुरुज बांधले जात असत. घाटाचे विविध आकार असत. घाट बांधण्याचे मुख्य सूत्र पैसा असे. पैसा, नदीचा प्रवाह व धार्मिक ठिकाण विचारात घेऊन घाट बांधले जात होते. घाटासाठी सभामंडप, व व्हरांडे बनविले जात होते. टोके, वाई, पंढरपूर, माहूली, भिलवडी येथील घाट प्रसिद्ध आहेत.

२. धर्मशाळा :

तिर्थयात्रेला येणाऱ्या यात्रेकरुंच्या राहण्याच्या व्यवस्थेसाठी तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी धर्मशाळा बांधण्यात आल्या होत्या. थोडक्यात तिर्थयात्रेला आलेल्या यात्रेकरुंच्या राहण्याचे ठिकाण म्हणजे धर्मशाळा होय. या धर्मशाळांचे बांधकाम अत्यंत साधे असे. धर्मशाळा म्हणजे विटांच्या इमारती असत. ऐसपैस जागा हे या इमारतींचे वैशिष्ट्ये. नाशिक, पंढरपूर अशा ठिकाणी या प्रकारच्या धर्मशाळा दिसून येतात.

३. कुंड :

यात्रेकरुंच्या सोयीचा विचार करुन धर्मशाळा प्रमाणेच कुंड बांधण्यात आली होती. कुंड बांधण्यापाठीमागचा उद्देश यात्रेकरुंची सोय करणे हा होता. मराठा कालखंडात कुंडांना तिर्थक्षेत्रांमुळे महत्त्व प्राप्त झाले होते.

१५.८मराठा कालखंडातील छत्र्या व समाध्यांच्या बाबतची शिल्पकला :

मराठा कालखंडात छत्र्या व समाध्या या शिल्पकलेच्या घटकाला अनुसरुन वेगवेगळ्या प्रकारचे शिल्प निर्माण करण्यात आले होते. जेव्हा एखाद्या व्यक्तीचा मृत्यू होतो तेव्हा त्या व्यक्तीच्या आठवणीसाठी अथवा स्मरणार्थ समाधी बांधली जात. अशा समाध्यांवर काही चित्रे काढली जात असे. वास्तूशिल्पाच्या दृष्टीने छत्री व समाधी यांच्या बांधकामात काही फरक नाही. मराठा कालखंडात वेगवेगळ्या ठिकाणी अशा समाधी अस्तित्त्वात आहेत. त्यांची माहिती खाली नमूद करण्यात आली आहे.

munotes.in

१. शिवाजी महाराजांची रायगडावरील छत्री :

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर रायगडावर त्यांची आठवण म्हणून छत्री उभारण्यात आली. छत्रीचा सर्वसाधारण आकार अष्टकोनी होता. त्यामध्ये बदल करुन पुढे राजछत्राचा आकार देण्यात आला.

२. सिंहगड येथील राजाराम महाराजांची छत्री :

छत्रपती राजाराम महाराजांचा मृत्यू सिहंगडावर झाला. त्यांच्या स्मरणार्थ सिंहगडावर छत्री बांधण्यात आली. राजछत्रीच्या आकाराचे हे एक उत्तम उदाहरण होय. या छत्रीची इमारत अतिशय लहान असून चौकोनी आकाराची आहे. छत्रीचा छत वक्ररेखाच्छादित आहे. छत्रीला चुन्याचा गिलावा केलेला आहे.

३. पुण्यातील समाध्या :

मराठा कालखंडातील पुण्यामध्ये एकाच प्रकारच्या दोन समाध्या आहेत. या दोन समाध्यांपैकी एक समाधी कसबा पेठेत आहे तर दुसरी मुळामुठेच्या संगमावर आहे. दोन्ही समाध्यांचा आकार अष्टकोनी असून घुमटाला कंदमुळाचा आकार आहे. समाधीच्या भिंतीमध्ये सुरुच्या आकाराचे खांब आहेत. आणि कमानी टोकदार आहेत. संगमावरील छत्री ही होळकर घराण्यातील पुरुषाच्या स्मृतिप्रीत्यर्थ बांधली असल्यामुळे त्या काळात अस्तित्त्वात असलेल्या वास्तुशिल्पाची सर्व वैशिष्ट्ये दिसून येतात.

४. माहुली येथील समाधी :

मराठा कालखंडात कृष्णा नदीच्या काठावर माहुली येथे समाधी बांधलेली आहे. या समाधीचे छत राजछत्राप्रमाणे असून ही समाधी सर्व बाजूने मोकळी आहे. समाधीवरील शिखर हे चुन्यामध्ये बांधलेले आहे. समाधीच्या कमानी टोकदार आहेत.

५. संभाजी जाधवांची समाधी :

मराठा कालखंडातील संभाजी जाधवांची समाधी दगडी असून चौकोनी आहे. समाधीच्या शिखराचा आकार कंदमुळासारखा असून शिखराच्या चारही कोपऱ्यात चार घुमट आहेत.

६. मालेराव होळकराची समाधी :

मराठा कालखंडात नर्मदा नदीच्या घाटावर ही छत्री बांधली आहे. छत्रीचा आकार चौकोनी असून छत्रीची रचना पूर्णपणे दगडी आहे. छत्रीला सुरुच्या आकाराचे खांब आहेत व त्यांना टोकावर कमानी आहेत. छत्रीवर कंदमुळाच्या आकाराने चुन्यात बांधलेले शिखर आहे. या छत्रीवर बाहेरच्या बाजूला उत्तम नक्षी काढलेली असून त्यावर हत्तीची रांग कोरलेली आहे.

७. इंदूर येथील छत्र्या :

मराठा कालखंडात इंदूर येथे छत्रीबाग परिसरात होळकर घराण्यातील अनेक वीरपुरुषांच्या अनेक छत्र्या बांधलेल्या आहेत. त्यापैकी चार छत्र्या या विशेषत: एका प्रकारच्या असून बाकीच्या सर्व छत्र्या या वेगवेगळ्या प्रकारच्या आहेत. छत्र्यांच्या बांधकामासाठी संगमरवरी दगडाचा वापर करण्यात आला आहे. छत्र्यांच्या निर्मितीसाठी मंदिरशिल्पातील 'ब' प्रकाराचा वापर करण्यात

आला आहे. छत्र्यावर भौमितीक आकृत्या व पाना-फुलांच्या नद्या आहेत. तर काही छत्र्याची निर्मिती मंदिरशिल्पातील 'क' प्रकाराच्या वापराने करण्यात आली आहे. या छत्र्यांची शिखरे चुन्याने बांधली आहेत.

८. सखारामबाबांची समाधी :

सखाराम नावाचा एक साधुपुरुष १९ व्या शतकाच्या आरंभी होऊन गेला. त्याच्या मृत्यूनंतर तो व त्याचे दोन शिष्य यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १८२५ ते ३० च्या सुमारास अमळनेर येथे तीन समाध्या बांधल्या. यापैकी एक समाधी 'ब' प्रकारातील मंदिरासारखी असून उरलेल्या दोन समाध्या 'क' प्रकारातील मंदिरांसारख्या आहेत. 'क' प्रकारातील समाधीवर शिखर आहे.

९. अहिल्याबाईची समाधी :

माहेश्वर येथील अहिल्याबाई होळकरांची छत्री 'ब' प्रकारातील मंदिराप्रमाणे आहे. ही छत्री दगडी आहे. ही छत्री १७१७ मध्ये यशवंतराव होळकरांने बांधली.

१०.शिंद्यांची छत्री :

महादजी शिंदे यांच्या स्मरणार्थ माधवराव शिंदे यांनी उभारली. ही छत्री म्हणजे मराठ्यांच्या स्थापत्य कलेचा उत्कृष्ट नमूना आहे. पुण्याच्या आग्नेस वानवडी येथे एक सुंदर आणि भव्य वास्तू आहे. ही छत्री फरसवंद अशा चौकोनी आकाराची असून तिच्याभोवती घडीव दगडाच्या भिंती आहेत. या छत्रीस पूर्वेस भव्य प्रवेशद्वार आहे. त्याला एक दिंडी दरवाजा असून त्याच्यावर गॅलरी व छत आहे. या छताचे खांब हत्तीच्या डोक्यावर असून या हत्तींना पिवळे, निळे व करडे असे विविध रंग देण्यात आले आहेत. या हत्तीच्या वळलेल्या सोंडीमध्ये तोफेचे गोळे बसविले आहेत.

प्रवेशद्वाराच्या आत भव्य अंगण असून या अंगणाच्या मध्यभागी छत्री आहे. ही छत्री अत्यंत सुंदर आहे. छत्रीच्या हॉलची फरशी संगमरवरी आहे.

१५.९मराठा कालखंडातील प्रतिमांबाबतची शिल्पकला :

मराठा कालखंडातील शिल्पकलेशी संबधीत असणारी दुसरी महत्त्वपूर्ण कला म्हणजे 'प्रतिमा' अथवा मूर्ति कला होय. मराठा कालखंडातील मूर्ति ओबडधोबड होत्या. मराठा कालखंडातील काही मंदिरातील मूर्ति सुंदर व सुबक आहेत. या मूर्ति उत्तर-दक्षिण हिंदुस्थानामधून आणल्या आहेत.

मराठा कालखंडातील मंदिरांचे राम, लक्ष्मण, सीता, देवदेवेश्वराचे, भीमाशंकर, भुलेश्वर, शंकर, विष्णू, लक्ष्मी-नारायण, सुंदर-नारायण, मोहिनी राजा, विठ्ठल, हनुमान, परशुराम, गोराराम, काळाराम, कार्तिकस्वामी, खंडोबा, दत्तात्रेय, नृसिंह, महालक्ष्मी, यमाई, योगेश्वर या देवदेवतांच्या प्रतिमा दिसतात.

पुणे, भीमाशंकर, नाशिक, यवत, शिखर, शिंगणापूर, बेलगाव, नागपूर, केळीबाग, वाटेगाव, नेवासे, पंढरपूर, चिपळूण, धावडशी, अलिबाग, सांगली, तासगाव, पाली, जेजुरी, कणकेश्वर, कोल्हापूर, तुळजापूर, औंध, किन्हई या ठिकाणी असणाऱ्या मंदिरांमध्ये या देव-देवतांच्या प्रतिमा आढळतात.

धार्मिक श्रद्धेतून मंदिरे व देव-देवतांच्या प्रतिमा निर्माण करण्यात आल्या होत्या. रंग, उंची, आकार, नक्षी या विविधता व वेगळेपण या मूर्तीमधून पहावयास मिळते.

आपली प्रगती तपासा :

१) मराठा कालखंडातील चित्रकलेची माहिती जाणून घ्या.

२) मराठा कालखंडातील संगीत कलेची माहिती जाणून घ्या.

३) मराठा कालखंडातील नागर शिल्पकलेची माहिती जाणून घ्या.

४) मराठा कालखंडातील प्रतिमांबाबतच्या शिल्पकलेची माहिती जाणून घेणे.

१५.१० सारांश :

मराठ्यांचा सामाजिक, आर्थिक, राजकीय इतिहासावर मोठ्या प्रमाणात संशोधने झालेली आहे. वेगवेगळ्या संशोधकांना त्यावर वेगळ्या दृष्टीकोनातून प्रकाश टाकलेला आहे. परंतू सांस्कृतिक क्षेत्राकडे थोडे संशोधकांचे दुर्लक्ष झालेले दिसून येते. सांस्कृतिक वारसा, त्याची निर्मिती आणि जतन याकडे बारकाईने लक्ष दिले तर असे दिसून येते की, मराठा कालखंडातील विलक्षण, शिल्पकला, संगीतकला इतर सांस्कृतिक प्रतिकांमुळे या कालखंडाला सांस्कृतिक वैभव लाभलेले दिसून येते. आजही त्या कालखंडातील शिल्पकला, वास्तूकला, चित्रकला वेगवेगळ्या माध्यमातून उपलब्ध असल्याचे पुरावे आहेत.

त्यामुळे मराठ्यांचे सांस्कृतिक वैभव यावर प्रकाश टाकण्यासाठी अजुन यावर संशोधन होणे आवश्यक आहे. या प्रकारणाच्या माध्यमातून यावर थोडा

१५.११ प्रश्न :

१) मराठा कालखंडातील चित्रकलेची वैशिष्ट्ये उदाहरणासह स्पष्ट करा.

२) मराठा कालखंडातील विविध शिल्पकलेच्या शैलीवर प्रकाश टाका.

३) मराठा कालखंडातील धार्मिक व लष्करी शिल्पकलेवर विस्तृत टिपण लिहा.

१५.१२ संदर्भ:

१) कुलकर्णी अ. व. शिवकालीन महाराष्ट्र

२) सावंत, बी. एस. जाधव, मराठ्यांचा सामाजिक, आर्थिक,प्रशासकीय

३) भिडे, गायकवाड, हवामाने, मराठे कालीन इतिहास संस्था व विस्तार, फडके प्रकाशन, कोल्हापूर

❖❖❖❖